# ''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास :
# विशेष संदर्भ – शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य ''

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्रे**

**विद्याशाखांतर्गत इतिहास विषयात विद्यावाचस्पती**

**(Doctor of Philosophy)**

पीएच. डी.

या पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


*** सादरकर्ता ***

**श्री. सुरेश पंढरीनाथ काळे**

*** मार्गदर्शक ***

**डॉ. चंद्रकांत अभंग**



टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे,

मार्च – २०१५

# - CERTIFICATE -

This is to Certify that the thesis entitled ‘‘**अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास : विशेष संदर्भ शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य** ’’ which is being submitted herewith for the award of the Degree of Vidyavachaspati ( Ph.D.) in Dept of Histroy of Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune is the result of original research work completed by **Shri. Suresh Pandharinath Kale** under my supervision and guidance. To the best of my knowledge and belief the work incorporated in this thesis has not formed the basis for the award of any Degree or Similar title of this or any other University or examining body upon him.

PLACE :

DATE

**Dr. Chandrakant J. Abhang**
( Research Guide)

## - DECLARATION -

I hereby declare that the thesis entitled **"अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास : विशेष संदर्भ – शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य "** completed and written by me has not previously formed the basis for the award of any Degree or other similar title upon me of this or any other Vidyapeeth or examining body.

PLACE :

DATE :

**Suresh Pandharinath Kale**
**(Research Student)**

# - ऋणनिर्देश -

प्रस्तुत शोध प्रबंधात ''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास : विशेष संदर्भ - शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य'' या विषयाचा शोध घेण्यात आलेला आहे. हा पीएच.डी. साठीचा शोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मार्गदर्शन व सहकार्य केले त्या सर्वांचे नामनिर्देशन व आभार व्यक्त करणे हे मी माझे आद्य कर्तव्य समजतो.

सदर शोधप्रबंधासाठी माझे मार्गदर्शक डॉ. चंद्रकांत अभंग (के.जे. सोमय्या कॉलेज, कोपरगाव) यांनी संशोधन विषयाच्या निवडीपासून प्रबंधाच्या पूर्ततेपर्यंत अत्यंत मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यामुळेच मी हा प्रबंध पूर्ण करू शकलो. म्हणूनच त्यांच्या ऋणात राहणे मी पसंत करेन.

संशोधनाच्या या कामासाठी प्रामुख्याने संदर्भ साधने मिळविताना कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, माहेगाव देशमुख सहकारी सोसायटी, गौतम सहकारी बँक लि., कामगार पतपेढी, पतसंस्था, अहमदनगर जिल्हा परिषद, रयत शिक्षण संस्था, सातारा येथील सर्व अधिकारी - पदाधिकारी यांनी मोलाची मदत केली. संदर्भ पुस्तकांसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय, पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, डेक्कन इकॉनॉमिक्स ॲन्ड पॉलिटीक्स इन्स्टीट्यूटचे गोखले ग्रंथालय, सौ. सुशिलामाई काळे महाविद्यालय, गौतमनगर व एस. एस. जी. एम. कॉलेज, कोपरगाव यांचे ग्रंथालय या सर्व ग्रंथालयामधून वारंवार संदर्भ पुस्तके उपलब्ध झाली. त्या सर्व ग्रंथपालांचे मी आभार मानतो. त्याचबरोबर कोसाका उद्योग समुहाचे सुत्रधार मान. आमदार अशोकराव काळे, मा. श्री. आशुतोषदादा काळे, सौ. स्नेहलताताई शिंदे, सौ. पुष्पाताई काळे, सौ. चैतालीताई काळे, श्री. ज्ञानेश्वर काळे, श्री.विजयराव नागरे, श्री. बी.डी. बाळीकाई, श्री. के. एस. डगळे, श्री. प्रमोद लबडे या सर्वांनी वेळोवेळी जे सहकार्य केले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

याशिवाय संशोधनासाठी ज्यांची खास मदत व सहकार्य मिळाले ते माझे गुरूवर्य टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहास विभाग प्रमुख डॉ. नलिनी वाघमारे, डॉ. संध्या पंडीत, डॉ.श्रद्धा कुंभोजकर, प्राचार्य डॉ. शिवाजीराव सगर, प्राचार्य डॉ. भाऊसाहेब निघोट, प्राचार्य सुभाष राजवाळ, डॉ. के. एल. गिरमकर, डॉ. विलास आवारी, प्रा. रमेश झरेकर, तसेच माझे जिवलग मित्र व परमस्नेही प्रा. अविनाश शिंदे, प्रा. सौ. सुनिता शिंदे, प्रा. सौ. विजया गुरसळ, प्रा. सौ. निर्मला कुलकर्णी, प्रा. मंगला दिघे, प्रा. शामराव जगताप, प्रा. रामनाथ मोरे, प्रा.बाळासाहेब खिलारी, प्रा. प्रभाकर हापसे, प्रा. संजय देवकर, प्रा. प्रकाश सावंत, प्रा. सिकंदर शेख, प्रा. चांगदेव खरात, प्रा. राजेंद्र चव्हाण, प्रा. किशोर पवार, श्री. लक्ष्मण मोरे, श्री.सचिन मेहेत्रे, श्री. विलास खालकर, श्री. राजेंद्र रोहमारे, श्री. भरत भालके, श्री. बापू गायकवाड, श्री.संतोष सोनवणे, श्री. मयुर शिंदे, श्री. राजेंद्र जाधव, श्री. निलेश म्हस्के, तसेच सौ. सुशिलामाई काळे महाविद्यालय, गौतमनगरचे सर्व प्राध्यापक व कर्मचारी या सर्वांचे मी ऋण व्यक्त करतो.

शेवटी माझ्या परिवारातील माझे वडील, भाऊ व सौ. वहिनी, पुतणे संकेत व सुषमा, पत्नी सौ. मुक्ता, पुत्ररत्न शिवेंद्र व श्रीकांत यांचे मानसिक पाठबळ व सहकार्य मिळाल्यानेच या संशोधन कार्यास वेळ देता आला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रबंधाच्या टंकलेखनाचे काम श्री. मिलिंद कुलकर्णी यांनी अत्यंत अचूक, सुबक व परिश्रमपूर्वक केले. त्यांचेही आभार मानणे उचित ठरेल.

वरील सर्वांच्या सहकार्याने मी हा प्रबंध पूर्ण करू शकलो. त्यांच्या या बहुमोल सहकार्याबद्दल पुन्हा एकदा मी सर्वांचे आभार व्यक्त करतो, धन्यवाद.

ठिकाण –

दिनांक –

**सुरेश पंढरीनाथ काळे**

संशोधक

## - अनुक्रमणिका –


| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रमाणपत्र | -- |
| | प्रतिज्ञापत्र | -- |
| | ऋणनिर्देश | -- |
| १ | प्रास्तविक | १–३० |
| २ | अहमदनगर जिल्ह्याच्या सहकार चळवळीचा उदय व विकास | ३१–६१ |
| ३ | शंकरराव काळे यांची जडण–घडण | ६२–१३० |
| ४ | शंकरराव काळे यांचे सहकारी चळवळीतील योगदान | १३१–२०३ |
| ५ | शंकरराव काळे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान | २०४–२४६ |
| ६ | शंकरराव काळे यांचे सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान | २४७–३१७ |
| ७ | निष्कर्ष/उपसंहार | ३१८–३३४ |
| ८ | संदर्भ ग्रंथसूची | ३३५–३४३ |
| ९ | परिशिष्टे | ३४४ |

# प्रकरण – १
# प्रास्तविक

## १.१ प्रस्तावना

एखाद्या व्यक्तीच्या चरित्राचे किंवा व्यक्तिमत्वाच्या कार्याचे लेखन पहिल्यांदा कुतुहलातून जन्माला येते. नंतर ते शास्त्रीय संशोधनाच्या मार्गाने पूर्णत्वाला जाते. चरित्रविषयक कुतुहले ही एक मानवी जीवनातली वृत्ती आहे. ही जिज्ञासा जितक्या प्रमाणात वाढत जाते. तितका या प्रकारचा विकास झालेला दिसून येतो. व्यक्तीच्या जीवनविषयक ठराविक स्वरूपाच्या माहितीवर त्याचे समाधान होत नाही. व्यक्तीचा जन्म, नाव, गाव, राज्य, राष्ट्र, आई–वडील, व्यवसाय, शिक्षण, बालपण, गोत्र, कार्य, मृत्यू इ. विषयीची माहिती हे सामान्य स्वरूपाचे कुतूहल मानावे लागेल. चरित्र विषय होणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व व स्वभाव त्यातील विसंगती त्यामागे दडलेल्या खोलवरच्या सुसंगत आठवणी, अन्य व्यक्तीशी असणारे संबंध, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, सहकार विषयक परिस्थिती, त्या व्यक्तीचे कार्यक्षेत्र, त्यातील कामगिरी इ. संबंधी जिज्ञासा अधिक चांगली म्हणता येईल. व्यक्तीमधील सर्वसाधारणतेपेक्षा तिच्यातील असाधारणतेविषयी व कार्याविषयी एकसारखे प्रश्न निर्माण करणे गरजेचे असते. यावर त्या विषयाची गुणवत्ता अवलंबून असते. अशा जिज्ञासेमुळे बहिर्मुख व अंतर्मुख अशा दोन्ही भूमिकांवरून जीवनाचा शोध घेता येतो. अशा जिज्ञासा व्यक्तिजीवनाच्या आधाराने तिच्या जीवनाविषयक तत्वज्ञानाचा शोध घेऊ पाहते. कुठलेही रसरशीत जिवंत व अर्थपूर्ण तत्वज्ञान एखाद्या महापुरूषाच्या जीवनाच्या आधाराने उभे राहिलेले असते. व्यक्तीजीवनाच्या आधाराने ''अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळीचा इतिहास : विशेष संदर्भ – शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य'' हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

एखाद्या व्यक्तीच्या चरित्राचा, कार्याचा अभ्यास करताना ती व्यक्ती जिवंत असताना त्यांचा अनेक व्यक्तीशी संबंध, परिचय असतो. अनेक भूमिकांमधून, प्रसंगामधून जसे सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक, आर्थिक, कौटुंबिक, व्यक्तिगत वातावरण असते. परंतू या परिचयांना एक प्रकारचे जुजबी स्वरूप असते. अशी व्यक्ती खरोखरच काय आहे, हे तिच्या जवळच्या माणसांनाही ओळखू येऊ शकत नाही. त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिच्या चरित्रविषयक, कार्यविषयक सामुग्रीला एक प्रकारचा स्थिरपणा येऊ लागतो.

त्यावेळी एक प्रकारच्या तटस्थेने पण सखोल जिज्ञासेने आपण व्यक्तीजीवनाचा शोध घेऊ लागतो.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मराठ्यांचा इतिहास विषयाचे कुतुहल जागृत झाले. इतिहास विषयाचा तात्विक व शास्त्रविषयक विचारही सुरू झाला. खेड्यापाड्यातून विखुरलेल्या इतिहासाच्या साधनांचा शोध घेऊन त्यांची चिकित्सा करून त्यांचा संग्रह करण्यात आला. ऐतिहासिक व्यक्तीच्या जीवनावर व त्यातील महत्वपूर्ण घटनांवर नाविन्यपूर्ण प्रकाश पडू लागला. या उद्योगातून बखरी, हकीकती, कैफियती, याद्या, पत्रे शकावल्या, नामे, वंशावळी, चरित्रकाव्ये इ. चरित्र सदृश्य लेखन कृतीही प्रकाशात आल्या. इतिहास लेखनाच्या दृष्टीने त्यांची कठोर परीक्षाही करण्यात आली.

वि. का. राजवाडे यांनी केलेल्या इतिहास या संज्ञेच्या व्याख्येत इतिहास आणि चरित्रे हे शब्द योगायोगानेच एकत्र आले आहेत ते लिहितात ''लहान व्यक्तीची चरित्र्ये व मोठ्या व्यक्तींची चरित्रे मिळून समाजाचा इतिहास होतो.''[१] एखाद्या व्यक्तीविषयीच्या कार्य व व्यक्तिमत्वाविषयी लिहितांना आपणास अस्सल साधनांबरोबरच त्याच्याविषयी पूर्ण माहिती लिहितांना इतरही गोष्टींचा आधार घ्यावा लागतो. त्यात आठवणी, हकीकती, आख्यायिका, लहान कृती, उक्ती, चेहऱ्यावरील हावभाव, विकार, दर्शन, लकब आदि व भाकडकथा इ. सामुग्रीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

## १.२ विषय निवड

१५ ऑगस्ट १९४७ च्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशासमोरील अनेक प्रश्न व समस्या सोडविणे गरजेचे होते. त्या गरजेतूनच स्वातंत्र्योत्तर काळात नवसमाज निर्मितीसाठी संपूर्ण देशातून अनेक कार्येकर्ते पुढे सरसावले. प्रत्येक जण वेगवेगळ्या ध्येयाने प्रेरित झालेले होते. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जसे अनेकांनी अविरत कष्ट घेतले प्रसंगी प्राणांची आहुती दिली तसेच स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समर्थ भारताच्या उभारणीसाठी त्याग करणाऱ्या तरूणांची गरज होती. त्या गरजेतूनच अनेक तरूणांनी देशाच्या जडणघडणीत पुढाकार घेतला. महाराष्ट्रही त्याला अपवाद नव्हता या महाराष्ट्र भूमीत वैकुंठभाई मेहता, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, धनंजयराव गाडगीळ, केशवराव जेधे, शंकरराव मोरे, विठ्ठलराव विखे यासारख्या नेत्यांनी सहकार चळवळ रूजविली. या नेत्यांच्या विचारांनी प्रभावित झालेल्या अनेक कार्यकर्त्यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुजन समाजापर्यंत विकासाचे काम नेले. महाराष्ट्राच्या विकास कार्यात स्वातंत्र्यपूर्व काळात आणि नंतर गेल्या अर्धशतकात अहमदनगर जिल्ह्याचे मोठे योगदान आहे. समाजाला

गतिमान बनविण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यातून एक नवशिक्षितांची पिढी पुढे आली. त्यांनी समाजाचे नेतृत्व आपल्या हाती घेतले. सहकार, शिक्षण, शेती, समाजकारण, जलसिंचन या क्षेत्रात भरीव काम केले. अशा सुशिक्षित तरूणांमध्ये जिल्ह्यातील आण्णासाहेब शिंदे, शंकरराव काळे, बाळासाहेब विखे, मारूतीराव घुले, आबासाहेब निंबाळकर, दादा पाटील शेळके, भाऊसाहेब थोरात, बाबुराव तनपुरे, यशवंतराव गडाख, शंकरराव कोल्हे, इ. नेत्यांनी. मोलाचा वाटा उचलला. या सर्व नेत्यांमध्ये शंकरराव काळे यांचे कार्य अत्यंत उल्लेखनीय व समाजाला प्रेरणादायी ठरले आहे.

## १) ऐतिहासिक व भौगोलिक अहमदनगर जिल्हा –

प्राचीन काळी अहमदनगर परिसर हा दंडकारण्याचा भाग होता. अगस्तीऋषींनी येथे वसाहत केल्याचा इतिहास मिळतो. गोदावरी व भीमा नदीने परिवेष्टीत असलेला नगर जिल्हा पूर्वेस बीड, ईशान्येस औरंगाबाद, उत्तर–पश्चिमेस नाशिक, पश्चिमेस ठाणे आणि दक्षिणेस सोलापूर व दक्षिण पश्चिमेस पुणे जिल्हयाने वेढलेला आहे. इ.स. पु. ३ ते ५ हजार वर्षापुर्वीची संस्कृती येथे आढळते. सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट आणि देवगिरीच्या यादवांचे येथे प्राबल्य आढळते.

हिंदवी स्वराज्य संस्थापक शिवाजीराजांचे आजोबा मालोजी, वडील शहाजी, पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी विठ्ठल सुंदर, त्रिंबकजी डेंगळे आदि इतिहासातील नवरत्नेही अहमदनगर जिल्ह्यातून तयार झाली. तसेच जिल्ह्याचे भूषण चांदबीबी, वजीर मलिकअंबर, इतिहासकार फेरिस्ता, मुलूख मैदानी तोफेचा जनक रूमीखान अशा ऐतिहासिक रत्नांची खाण याच जिल्ह्यात होती. या जिल्ह्याला फक्त मध्ययुगीन ऐतिहासिक महत्व आहे असे नसून २० व्या शतकातही या जिल्ह्याने आपली वैशिष्टये अबाधित राखली आहे. पंडीत नेहरू, सरदार वल्लभ भाई पटेल, मौलाना आझाद, शंकरराव देव आदी पुढाऱ्यांना सन १९४२ च्या चळवळीनंतर अहमदनगरच्या किल्ल्यात स्थानबद्ध रहावे लागले. त्याचवेळी पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी आपला जगतविख्यात ''डिस्कव्हरी ऑफ इंडिया'' हा ग्रंथ येथेच लिहिला.[२]

अहमदनगर जिल्ह्यात अतिप्राचीन काळात सह्याद्री पर्वताच्या उदर गर्भातून प्रज्वलित झालेल्या ज्वालामुखीतून उसळणारा तप्त लाव्हारस पसरून हळूहळू थंड होत असताना उंच–सखल भूभाग तयार झालेला आहे. सह्याद्रीच्या उंच अशा रांगांमधून प्रवरा, मुळा, गोदावरी, भिमा अशा लहान मोठ्या नद्या या जिल्ह्यातून वाहातात. या नद्यांच्या परिसरात तयार झालेला सुपीक जमिनीचा भाग म्हणजेच अहमदनगर जिल्ह्याचा भू–भाग

होय. सह्याद्रीच्या लहान मोठ्या डोंगर शिखरांची किनार लाभल्याने या नद्यांच्या खोऱ्यांना अधिकच शोभा आली आहे. सह्याद्रीच्या कुशीत उगम पावलेल्या नद्या अनादी काळापासून या पठाराचे भरण-पोषण करीत आल्या आहेत. या भूमीवर अनेक थोरामोठ्यांच्या पाऊलखुणा उमठलेल्या आहेत. शहाजीराजे, शिवाजी महाराज, औरंगजेब यांच्या खुणा आजपर्यंत ताज्या आहेत. पौराणिक उपनिषदे, रामायण, महाभारत यांनी पावन झालेल्या इतिहासाइतकाच स्फुर्तिदायक या मातीचा कणन् कण झाला आहे. असा हा जिल्हा महाराष्ट्राच्या नकाशात राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. [३]

अहमदनगर जिल्हा हा उत्तर अक्षांश १८.२$^{0}$ ते १९.९$^{0}$ व पूर्व रेखांश ७३.९$^{0}$ ते ७५.५$^{0}$ या दरम्यान परसलेला आहे. हा जिल्हा दुष्काळी असून पर्जन्य छायेच्या प्रदेशात मोडतो. त्यामुळे जिल्ह्यात सरासरी पावसाचे प्रमाण कमी आहे. जिल्ह्याची पावसाची सरासरी नोंद ५५ से.मी. इतकी आहे. हवामान विषम आहे. पावसाळा मर्यादित असतो. हिवाळा व उन्हाळा कडक असतो. उन्हाळ्यात तापमान कमाल ४१$^{0}$ असते. तर हिवाळ्यात किमान १२$^{0}$अंश असते. पावसाचे प्रमाण कमी असल्याने सतत दुष्काळा सारख्या आपत्तीला तोंड देत आलेला आहे.

भौगोलिक दृष्ट्या नगर जिल्ह्याचे चार भाग पडलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे.

१) अतिशय पावसाचा प्रदेश-अकोले तालुक्याचा अंतर्भाव या विभागात होतो.

२) खुप कमी पावसाचा प्रदेश-अहमदनगर, पारनेर, श्रीगोंदा, संगमनेर, कर्जत या तालुक्यांचा या विभागात अंतर्भाव होतो. एकूण जिल्ह्याच्या क्षेत्रापैकी ४८% क्षेत्रफळ या भागाचे आहे.

३) कोपरगांव, राहाता, श्रीरामपूर व राहुरी या भागात पर्जन्य कमी आहे. परंतु गोदावरी, मुळा, प्रवरा नद्यांच्या पाटपाण्यामुळे येथे बागायती पिके घेतली जातात. याच भागात ऊस पिके जास्त असल्याने साखर कारखान्यांची संख्या जास्त आहे.

४) नेवासा, जामखेड, शेवगांव, पाथर्डी यांचा एक विभाग पडला आहे. नेवासा व शेवगांव तालुक्यात जमीन बऱ्याच प्रमाणात सुपीक आहे. मुळा नदीचे पाटपाणी या भागात गेल्याने बरीचशी बागायती पिके येथे घेतली जातात.

अहमदनगर जिल्ह्याचे क्षेत्रफळ १७०७१ चौ. कि.मी. इतके आहे. या जिल्ह्यात एकूण १४ तालुके आहेत. या जिल्ह्याच्या दुर्दैवाने मान्सुनचा लहरीपणा

दिवसेंदिवस वाढत चालला आहे. या जिल्हयातील लोकांचा व्यवसाय प्रामुख्याने शेती हा असल्याने ते ग्रामीण भागातच जास्त प्रमाणात राहातात.[४]

आज नैसर्गिक प्रतिकूल परिस्थिती असताना सुद्धा संत परंपरा प्राप्त मानसिक संस्कृतीच्या आधाराने या जिल्हयाने कायापालट करून घेतला आहे. सहकार संजीवनीच्या महामंत्राने आणि प्रगत सहकारी संस्थांच्या सहाय्याने दुष्काळाचे सुकाळात रूपांतर करून या जिल्हयाने आज नेत्रदिपक प्रगती केली आहे. या जिल्हयास आज दोन साधनांमुळे नवजीवन प्राप्त झाले आहे. एक म्हणजे शेतामध्ये पाणी खेळवणारा कालवा व दुसरे म्हणजे माणसामध्ये पाण्याप्रमाणे खेळणारा सहकार. यामुळे आज अहमदनगर जिल्हयाने दुष्काळावर मात करून आपले भाग्य उजळले आहे.

**२) ऐतिहासिक व भौगोलिक कोपरगाव तालुका –**

सह्याद्रीच्या गिरीशिखरातून अहमदनगर जिल्हयाच्या हृदयकमळातून वाहणारी गोदावरी श्री त्र्यंबकेश्वर येथील ब्रम्हगिरी डोंगरावर गोमुखातून उगम पावते. म्हणून तिला गोदावरी असे म्हणतात. तसेच तिला दक्षिणेकडील गंगा म्हणूनही ओळखले जाते. नाशिक जिल्हयातून खळखळ करीत वाहत वाहत ती कोपरगांव तालुक्याच्या अगदी मधून पुढे पुढे सरकत जाते. तिच्या गोड व मधुर पाण्याने तिच्या काठावरची शेती हिरवीगार झालेली आहे. तसेच दारणा, गंगापुर इ. धरणांनी त्यात आणखीच भर घातली आहे. नांदुर–मधमेश्वर येथे इ. स. १९१५–१६ मध्ये इंग्रज कालखंडात धरण बांधून कोपरगांवच्या दुष्काळी भागाचा प्रश्न सोडविला आहे. याच धरणातून दोन जलपाट डावा व उजवा असे कोपरगांव तालुक्याच्या शेतीसाठी वरदान ठरले आहे. त्यामुळे शतकानुशतके तृषार्त असणारी शेती अमृतमय झाली आहे. कोपरगांव हा अहमदनगर जिल्हयाच्या चौदा तालुक्यापैकी एक तालुका आहे. कोपरगांवचे ऐतिहासिक महत्व आहे. गुरू शुक्रचार्यांनी कोपरगाव बेट भागात कचदेवाला संजीवनी विद्या दिल्याची आख्यायिका आहे. कोपरगांव बेट भागात कचेश्वर, शुक्राचार्य व त्यांची कन्या देवयानी यांचे, विष्णुचे व शंकराचे प्राचीन मंदीर आहे. शेवटचा पेशवा दुसरा बाजीराव यांचे वडील राघोबादादा हे रामशास्त्री प्रभुणे यांनी त्यांना दोषी ठरविल्यानंतर प्रायश्चित घेण्यासाठी कोपरगांवला आले होते. पुढे राघोबादादांनी कोपरगांवला येथे कायम वास्तव्य केले. कोपरगांव गोदावरीकाठी एक व पश्चिमेला सात कि.मी. अंतरावरील हिंगणी येथे राघोबादादांच्या मोठया वाडयांचे अवशेष आजही आहेत. प्रायश्चित्तानंतरचा काळ राघोबादादांनी कोपरगांव बेट येथील कचेश्वर मंदिरात देवधर्म करीत घालविला. शेवटी

राघोबादादा कोपरगावला ११ डिसेंबर १७८३ रोजी मृत्यू पावले. राघोबादादांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी इतिहासप्रसिद्ध आनंदीबाई आपल्या दोन मुलांसह कोपरगांव येथेच १७९२ पर्यंत होती.[५] राघोबादादांच्या कोपरगावातील परिवारामध्ये नाटकशाळा आणि लेकावळे यांची संख्या मोठी असल्याचे दिसून येते. यातील काही नाटक शाळांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. १) मैना २) उमेदा ३) यमुनी ४) लाडू ५) केसरी ६) रत्ना ७) स्वरूपा ८) शामा इत्यादी तसेच वाड रोजनिशीत हेमंती, वसंती, चपला, चंद्रसेना या मुलींची नावे राघोबांच्या नाटकशाळा म्हणून येतात. कोणाला तीन तर कोणाला दोन रूपये पगाराची नोंद १७८० मधील कागदपत्रात पहावयास मिळते. राघोबांच्या मृत्यूनंतर आनंदीबाईंनी या नाटकशाळांचा सांभाळ केल्याचे दिसून येते. मनुबाई परदेशीन व सुंदराबाई यांना स्वतंत्र घरे होती त्यांचा खर्च सरकारातून चाले. याशिवाय कृष्णा ही सुद्धा एक नाटकशाळा होती.[६]

इ. स. १८०४ साली इंग्रजांविरूद्ध बंडखोरी केलेल्या भिल्लांना इंग्रजांनी कोपरगावला गोळा करून अनेकांना येथील दोन विहीरींमध्ये फेकण्यात आले होते.[७]

कोपरगाव जवळील कोकमठाण येथे एक प्राचीन दगडी मंदिर आहे. हे मंदिर इ.स. १२ व्या शतकात बांधललेले असावे. चालुक्य काळातील शैव धर्तीचे या मंदिराचे बांधकाम आहे. कोपरगांव पासून जवळ असलेल्या कुंभारी येथे महादेवाचे प्राचीन मंदिर आहे. त्याचे बांधकाम सुधारित द्रविडी पद्धतीचे आहे. जुन्या रिवाजानुसार दर वर्षी अक्षयतृतीयेला कोकमठाणचे लोक संवत्सर गावच्या लोकांशी गोफण–गुंडयाची लढाई खेळतात. संवत्सर गावी महानुभाव पंथाचा आश्रम आहे. महानुभव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांनी १३ व्या शतकात संवत्सर येथे एक दिवस मुक्काम केला होता.[८]

कोपरगावच्या दक्षिणेस १५ कि.मी. अंतरावर शिर्डी येथे श्री साईबाबांचे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. शिर्डी येथे साईबाबांनी दिर्घकाळ वास्तव्य केले व शेवटी १५ ऑक्टोबर १९१८ रोजी त्यांचे शिर्डी येथेच महानिर्वाण झाले. शिर्डी देवस्थान सध्या भारतात तिरूपती बालाजी नंतरचे एक महत्वाचे संपन्न देवस्थान समजले जाते. दर रामनवमीला शिर्डी येथे मोठा उत्सव असतो. शिर्डीच्या दक्षिणेस पाच किलोमीटर अंतरावर साकुरी येथे उपासनी महाराजांचे मंदिर आहे. तसेच पेशवाईत अहिल्याबाई होळकर हिने गोदावरी नदीत उतरण्यासाठी बांधलेले घाट पहावयास मिळतात.[९] उपासनी महाराजानंतर त्यांच्या शिष्या गोदावरी माता यांचे वास्तव्य तेथे होते. कोपरगावच्या पूर्वेस २५ किलोमीटर अंतरावर पुणतांबा येथे १७ व्या शतकाच्या मध्यास बांधलेले चांगदेवाचे प्रसिद्ध मंदिर आहे.

रामायण काळातील दंडकारण्यात चारित्र्य संपन्न ज्ञानतपस्वी गौतम ऋषींचे वास्तव्य गौतमनगर परिसरात होते. त्यामुळे गोदावरीला ''गौतमी'' या सार्थ नावानेही ओळखले जाते. गौतमनगर हे ठिकाण कोपरगावच्या पश्चिमेस १८ किलोमीटर अंतरावर आहे.[१०]

कोपरगाव हे ठिकाण अहमदनगरच्या उत्तरेस शंभर किलोमीटर अंतरावर असून ते $१९^{0}$.५४ उत्तर अक्षांस व $७४^{0}$.३३ पूर्व रेखांशवर आहे. ते समुद्र सपाटीपासून १८५३ फुट उंचीवर असून तालुक्याचे क्षेत्रफळ १०४४.८ चौरस कि. मी. (१,०७,२४१ हेक्टर) आहे. अहमदनगर जिल्ह्यातील हा उत्तर टोकाचा तालुका आहे. कोपरगावच्या उत्तरेस नाशिक जिल्हा व पूर्वेस औरंगाबाद जिल्हा आहे.[११]

अशा प्रकारची भौगोलिक व ऐतिहासिक परिस्थिती अहमदनगर जिल्ह्याची व कोपरगाव तालुक्याची दिसून येते. सरकारी अनास्था व दुष्काळ यामुळे शेतकरी जर्जर झालेला होते. कुणालाही स्पष्ट दिशा दिसत नव्हती. सर्वत्र अंधःकार पसरलेला होता. तरीही शेतकरी मंडळी आपापल्या परीने प्रतिकूल परिस्थितीशी तोंड देत होती. अज्ञान, दारिद्रय, आर्थिक शोषण यात अडकून पडणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनात भाग्योदय फुलविण्याचे महान कार्य याच अहमदनगर जिल्ह्यातील काही समाज सुधारकांनी केले. अशा थोर नेत्यांमध्ये कोपरगाव तालुक्यातील माहेगांव देशमुख येथील शंकरराव काळे या भुमिपूत्राचा समावेश आहे.

अहमदनगरच्या उत्तरेकडील कोपरगाव हा तालुका गोदावरीच्या खोऱ्यामध्ये वसलेला आहे. या तालुक्यातील माहेगांव देशमुख या एका लहानशा खेड्यात शंकरराव काळे यांचा जन्म एका सामान्य शेतकरी कुटुंबात ६ एप्रिल १९२१ रोजी झाला. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन त्यांनी मोठ्या पगाराची नोकरी न धरता समाजासाठी स्वतःला वाहून घेतले. संपूर्ण आयुष्यात शिक्षण, सहकार, शेती व जलसिंचन या क्षेत्रात भरीव कार्य करताना काळे यांनी राजकारणाचा एक माध्यम म्हणून उपयोग केला. कर्मवीर भाऊराव पाटील हे त्यांचे आदर्श होते. त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन शंकरराव काळे यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात शैक्षणिक वातावरण निर्माण केले. दि कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून त्यांनी प्रेरणादायी कार्य केले. कारखान्याबरोबरच अन्य प्रकल्पांमुळे परिसराचा मोठा विकास झाला आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रात प्रथमच जिल्हा परिषदा अस्तित्वात आल्या. अहमदनगर जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला. सलग १० वर्षे ते जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. त्या माध्यमातून त्यांनी जिल्ह्यामध्ये विकास कामे केली. १९७२ आणि १९७७ अशा दोन वेळा पारनेर मतदार

संघातून ते आमदार म्हणून विधानसभेत गेले. सन १९७८–१९८० या काळातील पुलोद मंत्रीमंडळात ते शिक्षण व सहकार खात्याचे राज्यमंत्री होते. सन १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत ते कोपरगांव मतदार संघातून काँग्रेसचे खासदार म्हणून निवडून गेले. रयत शिक्षण संस्थेचे १५ वर्षे चेअरमन असताना ग्रामीण भागात शिक्षणाचे जाळे पसरविले. सहकारी चळवळीच्या माध्यमातून तालुक्याचा तसेच जिल्ह्याचा कायापालट केला.

ग्रामीण परिस्थितीमध्ये क्वचितच दिसून येणाऱ्या विकासाच्या ध्येयाने प्रेरीत झालेल्या व त्यासाठी आयुष्यभर अथक परिश्रम करणाऱ्या नेत्यांमध्ये शंकरराव काळे यांचा उल्लेख करावाच लागतो. कोणतेही काम मी केले किंवा माझ्यामुळे हे काम झाले अशी भूमिका न घेता आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून कधीही गाजावाजा न करणारे, अहंमभाव न आणणारे, त्या कार्याचे श्रेय सर्वांना देणारे अशी भूमिका ठेवून शंकरराव कार्य करीत असत. शंकररावांचा जन्म ग्रामीण भागात कष्टकरी कुटूंबात झाला असल्यामुळे त्या भागातील जनतेच्या अडचणी व समस्या या सर्वांची पूर्ण जाण त्यांना होती. त्यामुळे योग्य संधी मिळताच त्यांनी स्वत:ला सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व विकासविषयक कामासाठी वाहून घेतले होते. आपल्या आयुष्याचा जास्तीत जास्त उपयोग करून जनतेला विकासाची फळे चाखायला मिळावी, यासाठी आयुष्यभर धडपडणारा माणूस म्हणजे शंकरराव काळे होय. अहमदनगर जिल्ह्यातील एकही क्षेत्र त्यांनी सोडले नाही की ज्यामध्ये शंकरराव काळे यांचा सहभाग नव्हता, मग त्यामध्ये सहकार, शिक्षण, सिंचन, धरणे, पाटबंधारे, कृषी, रस्ते, आरोग्य, दळणवळण इ. सुविधांच्या क्षेत्रात त्यांनी मोलाची कामगिरी केली आहे.

खरे तर भारत हा खेड्यांचा देश असून बहुसंख्या जनता ही ग्रामीण भागात वास्तव्य करते. भारतात एकूण ५,८०,७८१ खेडी आहेत. आणि भारतातील एकूण लोक संख्येपैकी ७२.२२% जनता ही ग्रामीण भागात वास्तव्य करते.[१२] शहरांशी तुलना करतांना खेड्यातील जीवन अत्यंत मागासलेले आहे. त्यांना आजही चांगले शिक्षण नाही. आरोग्याच्या, रस्त्यांच्या, पाण्याच्या व विजेच्या चांगल्या सुविधा नाही. खेड्यातील लोकांना आजही उदर निर्वाहासाठी भटकंती करावी लागते. विकासाच्या बाबतीत तर आजही खेड्यात आरोग्य, शिक्षण, वाहतूक व दळणवळण यासारख्या मुलभूत सुविधांचा म्हणावा तसा फारसा विकास झालेला नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील बहुसंख्य जनता दारिद्रय आणि बेरोजगारीच्या दृष्टचक्रात सापडलेली दिसते. या परिस्थितीत बदल घडवून येण्यासाठी व खऱ्या अर्थाने देशाचा विकास घडून येण्यासाठी खेड्यांचा म्हणजे ग्रामीण भागांचा विकास घडून येणे अतिशय महत्वाचे आहे. खेडी सुधारली तरच देश सुधारेल हे

तर उघड सत्य आहे. ग्रामीण भागातील विकासाचे महत्व ओळखून ‘खेड्याकडे चला’ असा मंत्र राष्ट्रपिता म. गांधींनी स्वातंत्र्यापूर्वीच दिला होता. असे असले तरी देशाच्या एकूण विकासाचे चित्र फारशे समाधानकारक नाही. देशाचा समतोल विकास झालेला दिसत नाही. आजही भारतात काही राज्ये विकसीत तर काही मागासलेले आहेत. भारतातील विकासाच्या या असमतोलाला काही ऐतिहासिक, भौगोलिक, आर्थिक, राजकीय, मानसिक, सांस्कृतिक घटक कारणीभूत असले तरी त्यातील प्रमुख घटक त्या भागाला लाभलेले राजकीय नेतृत्व होय. नेतृत्वगुण संपन्न असलेला स्थानिक नेता साधन सामुग्री व ऐतिहासिक पार्श्वभूमी तसेच मनुष्य बळाचे योग्यप्रकारे नियोजन करून विकास प्रक्रिया गतिमान करू शकतो. भारतात स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही विकेंद्रीकरणाचे धोरण स्वीकारण्यामागे ग्रामीण नेतृत्व पुढे यावे या नेतृत्वाच्या कतृत्वाने ग्रामीण विकास व्हावा अशी अपेक्षा होती. आज ग्रामीण नेतृत्व पुढे येऊन विकसित होण्याची प्रक्रिया जरी पूर्ण झालेली असली तरी या नेतृत्वाने लोकांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करावा, ही अपेक्षा अगदीच अल्प प्रमाणात सफल झालेली दिसून येते. लोकांचा विश्वास आणि नेत्यांचे कार्य या आधारावर लोकशाही प्रणित नेतृत्व निर्माण होत असते.[१३]

ग्रामीण भागाच्या पाठींब्याच्या जोरावर निवडून येऊनही काही नेत्यांनी ग्रामीण विकासासाठी मनोभावे कार्य केलेले नाही. त्यामुळे बाबा आमटेंनी सुद्धा नेतृत्वाची कर्तृत्वाशी गाठ पडली नाही असे म्हटले आहे.[१४] राज्य व केंद्रस्तरावरील नेत्यांमध्ये बहुसंख्य नेते हे ग्रामीण भागातून आलेले असतात. परंतु या नेत्यापैकी काही बोटावर मोजण्याइतकेच नेते असे आहेत की, ज्यांनी आत्मीयतनेने व तनमनधनाने ग्रामीण विकासाचे चिंतन करून ग्रामीण विकासाचा पाठपुरावा केला आहे. म्हणजेच प्राप्त झालेली सत्ता त्यांनी ग्रामीण विकासासाठी वापरली होती.

साधारणपणे ज्या भागाला विकासकार्याची दृष्टीक्षमता व बांधिलकी असणारे नेतृत्व लाभले त्याच भागाचा विकास घडून आला आहे. ज्या भागाला असे नेतृत्वच लाभले नाही त्या भागाचा विकास झालेला दिसत नाही. कुशल नेतृत्वामुळे देशाच्या ग्रामीण भागात काही ठिकाणी विकासाची केंद्र तयार झालेली दिसतात. महाराष्ट्र राज्य सुद्धा त्याला अपवाद नाही.

अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगावच्या ग्रामीण विकासाचे प्रारूप आज देशपातळीवर परिचित झालेले आहे. स्व. शंकरराव काळे यांनी त्याची पायाभरणी केली आहे. ग्रामीण विकासाच्या आकृतीबंधाची पायाभरणी करतांना स्व. शंकरराव काळे यांची

सामाजिक, सांस्कृतिक, राजकिय, शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरी आजच्या तरूण पिढीला प्रेरणादायी ठरते. म्हणूनच प्रस्तुत शोधप्रबंधासाठी 'अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास : विशेष संदर्भ – शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य' हा विषय निवडण्यात आला आहे. स्व. शंकरराव काळे हे पश्चिम महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात उदयास आलेले कार्यक्षम व ध्येयवादी ग्रामीण नेतृत्वाचे प्रातिनिधिक उदाहरण आहे. शंकरराव काळे यांनी स्थानिक पातळीपासून ते देशपातळीपर्यंत विविध सत्तास्थानावर काम करत असतांना सकारात्मक दृष्टीकोन ठेवून ग्रामीण विकासाचा सतत पाठपुरावा केलेला आहे. शंकररावांचे व्यक्तिमत्व व नेतृत्व म्हणजे स्वातंत्र्य संघर्षाच्या अंतिम टप्प्यात तरूण कार्यकर्ते व स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या पिढीचे पश्चिम महाराष्ट्रातील अत्यंत महत्वाचे नेतृत्व होय. एक अनन्यसाधारण नेते ग्रामीण भागातील व प्रतिकुल परिस्थितीतील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच प्रामाणिक व प्रयत्नशील राहिले. त्यांची कार्यप्रणाली, विचार, संकल्प व कृतीला त्यांनी ग्रामीण विकासासाठी एकरूप केले होते. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्याच्या सहकार चळवळीचा अभ्यास करत असतांना शोधप्रबंधात स्व. शंकरराव काळे यांचे व्यक्तीमत्व आणि कार्य या अभ्यासाला विशेष महत्व दिले आहे. स्व. शंकरराव काळे यांनी सहकारी चळवळीच्या माध्यमातून तालुक्याचा तसेच जिल्ह्याचा कायापालट केला. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यात ते अखेरपर्यंत अग्रेसर होते. त्यांनी केलेल्या कार्यातून बहुजन समाजास प्रेरणा मिळावी, त्यांचे कार्य प्रकाशात यावे म्हणून 'अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहासः शंकरराव काळे यांच्या विशेष संदर्भात' हा विषय प्रस्तुत शोध प्रबंधासाठी निवडला आहे.

## १.३ साहित्य व संशोधनाचे परिशिलन –

स्व. शंकरराव काळे यांच्या कार्य आणि व्यक्तिमत्वाचा आढावा तसेच विषय निवडीचे कारण आणि उद्दिष्टे स्पष्ट करण्यापूर्वी अशा स्वरूपाचे आतापर्यंतचे झालेले संशोधन अभ्यास आणि परिशीलन (Review) करणे या ठिकाणी अधिक योग्य होईल. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे मांडण्यात आलेला आहे.

डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी शब्दांकित केलेले व स्वतः स्व. शंकरराव काळे यांनी स्वत:चे लिहिलेले आत्मचरित्र म्हणजे 'समाजअभियंता'. या ग्रंथात त्यांच्या एकूण व्यक्तिमत्वावर प्रकाश पडतो. त्यातून त्यांच्या विविध पैंलूविषयी महत्वाची व विश्वसनीय माहिती मिळते. त्यांच्या सहकार, शिक्षण, राजकारण, समाजकारण,

जलसिंचन, आरोग्य, दळणवळण इ. क्षेत्रात केलेल्या कामाची माहीती मिळण्यास मदत होते. 'अंतरलेले पाणी' ही स्मरणिका त्यांनी २००३ मध्ये प्रकाशित केली होती. त्यामधून हक्काच्या पाण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची माहीती मिळते. सुहास कुलकर्णी यांनी २००१ साली संपादित केलेल्या 'विकाससूर्य' या गौरवग्रंथामध्ये शंकरराव काळे यांच्या विविध क्षेत्रातील कामगिरीवर प्रकाश टाकण्याचा काहीसा प्रयत्न करण्यात आलेला आहे. म्हणून या गौरवग्रंथास या संशोधन कार्यात अतिशय महत्व आहे. डॉ. विठ्ठलराव विखे पा. यांचे लढत, आण्णासाहेब शिंदे यांचे गौरवग्रंथ, यशवंतराव गडाख लिखित अर्धविराम, अंतर्वेध, शंकरराव कोल्हे यांचे सत्याग्रही शेतकरी, भाऊसाहेब थोरात यांचे अमृतकुंभ, अमृतगाथा, दादा पाटील राजळे यांचा पार्थ भुमीभूषण चरित्र ग्रंथ याशिवाय अहमदनगर जिल्ह्यातील सहकार विषयक विशेषांक, अहवाल, स्मृतिग्रंथ यामधून बऱ्याच गोष्टीवर प्रकाश पडतो.  जिल्हा परिषदेचे वार्षिक अहवाल, महाराष्ट्र राज्य विधानसभा कामकाज, डिबेटस्, लोकसभा डिबेटस्, रयत शिक्षण संस्थेचे वार्षिक अहवाल, दि कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचे अहवाल, विशेषांक, यांतूनही स्व. शंकरराव काळे यांच्याविषयी काही प्रमाणात माहिती उपलब्ध होते.

बोरगांवकर वसंत रामचंद्र (१९७८) 'प्राचीन मराठीतील चरित्रलेखन' यात वरील आत्मचरित्र लेखनाची परंपरा मराठी इतिहासात नवी नाही. तेराव्या शतकापासून ती चालत आलेली आहे. स्मरणशक्ती, महात्म्य किंवा ऐतिहासिक पुरूषांचे चरित्रकथन इ. विविध प्रेरणांनी हे लेखन झालेले आहे. यातील चरित्रलेखनाचे गुण विशेष लक्षणीय आहेत. लिळाचरित्र, पुजा अवसर, मुर्तीज्ञान, स्फुट आख्याने, समाधीचरित्रे, गुरूचरित्रे, मालाचरित्रे, बखरी, चरित्रकाव्ये, पोवाडे, स्त्रोत, स्तवने, संतमालिका अशा विविध चरित्रात्मक लेखातून ही परंपरा विकसीत होताना दिसते. प्रस्तुत ग्रंथात प्रा. डॉ. बोरगावकरांनी या मध्ययुगीन काळातील जुन्या चरित्रलेखनाचा चिकित्सक अभ्यास सादर केलेला आहे. या लेखनाच्या प्रेरणा, उदिष्टे, भूमिका, सामुग्री, लेखन प्रक्रिया व लेखनरूपे यांचा त्यांनी मुलभूत आणि समग्र विचार केला आहे. काही निष्कर्ष काढतांना त्यांनी तत्कालीन चरित्र लेखनाचे आदर्श, जीवनविषयक तत्वज्ञान व दृष्टीकोन, पूर्वकालीन चरित्रसदृश्य लेखनाचे संस्कार याचे भान सोडलेले नाही. हा ग्रंथ प्रस्तुत संशोधनास अत्यंत उपयुक्त असा आहे.[१५]

**बनातयत गांधी (२००६) यांच्या ''प्रबोधनकार ठाकरे यांचे सामाजिक विचार – एक समाजशास्त्रीय अभ्यास''** यात प्रबोधनकार ठाकरे यांच्या सामाजिक भुमिकांवरील ओळख व पैलू प्रकाशित केले आहेत. या लघुशोधप्रबंधात सहा प्रकरणे योजिली आहेत. प्रास्तविक, संशोधन पद्धती, जीवनकार्य, सामाजिक चळवळीतील योगदान, सामाजिक विचार व कार्य याविषयी चर्चा करण्यात आली.[१६]

कदम शंकरराव (२०००) – 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे – साहित्य व कार्य' यांच्या ग्रंथात पहिल्या भागात आत्मनिवेदनात्मक लेखन, स्फुट लेखन दिलेले आहे. तर दुसऱ्या भागातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची धर्मविषयक भुमिका व सामाजिक कार्य, राजकारणविषयक विचार, सहभाग तसेच त्यांचा जीवनपट यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. हा ग्रंथ ही प्रस्तुत संशोधनास अत्यंत उपयुक्त आहे.[१७]

इथापे देविदास (१९९६) यांनी 'यशवंतराव चव्हाणांचे राजकीय नेतृत्व – एक राजकीय चिकित्सा' या विषयावर संशोधन केले आहे. त्यांनी केलेल्या अभ्यासात प्रामुख्याने यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वावर प्रकाश टाकला आहे.[१८]

विसपुते शा.म.यांचे 'एस.एम. जोशींच्या सामाजिक, राजकीय विचारांचा आणि नेतृत्वाचा विश्लेषणात्मक अभ्यास' या शोध प्रबंधात एस. एम. जोशींच्या व्यक्तीमत्वाचा अभ्यास करण्यात आला आहे. आपल्या देशात लोकराज्य व्हायचे असेल तर पहिल्यांदा शासनाचा कारभार लोकभाषेतून झाला पाहिजे, असे मत त्यांनी मांडले आहे. म्हणजे राजकारण करतांना त्यांनी समाजकारणसुद्धा केले. शेवटी समारोप करण्यात आला आहे.[१९]

ए. वाय. दर्शनकार (१९७८), यांनी 'पंचातयराज लीडरशीप' या प्रबंधात पंचायतराज व्यवस्थेतील नेतृत्वाचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास सर्वसाधरण स्वरूपाचा असून विशिष्ट अशा व्यक्तीच्या नेतृत्वाचा असून त्याची सविस्तर चर्चा व प्रकरण निहाय मांडणी करण्यात आली आहे.[२०]

टी.बी. राजदेव (२००१) यांनी 'डॉ. दत्ता देशमुख  यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान'  या विषयावर संशोधन केले आहे. आपल्या अभ्यासात त्यांनी कॉ. दत्ता देशमुखांच्या नेतृत्वावर प्रकाश टाकला असून श्री. देशमुखांचे नेतृत्व महाराष्ट्रापुरतेच कसे मर्यादित राहिल्याचे दिसते. त्यामुळे या प्रबंधाचा आधार घेण्यात आला आहे.[२१]

सोनखासकर जो. दि. (२००२) यांनी 'भाऊसाहेब हिरे यांचे राजकीय नेतृत्व' या विषयावर संशोधनपर अभ्यास केला आहे. आपल्या संशोधनपर अभ्यासात त्यांनी भाऊसाहेब हिरेंच्या राजकीय नेतृत्वाचा व कर्तृत्वाचा परामर्श घेतला आहे.[२२]

देवरे आर.ए. (२००७) ' यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील नेतृत्वाचा विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावर संशोधन केले आहे. आपल्या अभ्यासात त्यांनी यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक कार्याचा अभ्यास केला आहे. सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते म्हणून महाराष्ट्राच्या आजच्या जडणघडणीत त्यांचे योगदान आहे. देवरे यांच्या संशोधनात यशवंतरावांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेताना निष्कर्ष असा निघाला की, शिक्षण असे असले पाहिजे की, शिक्षणाची सारी दारे सताड उघडी असली पाहिजे. जे खालच्या थरापर्यंत झिरपावे असे त्यांना वाटायचे त्यांचे हे विचार आताच्या शिक्षण सम्राटांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. असे निष्कर्ष शेवटी काढले आहेत.[२३]

अशा प्रकारे वरील शोधप्रबंध व काही ग्रंथ संशोधनासाठी परिशीलनात म्हणून घेतले आहेत. हे सर्व संशोधन महाराष्ट्रापुरतेच मर्यादित राहिले असावे. त्यामुळे ''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास : विशेष संदर्भ – शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य'' हा विषय संशोधनासाठी घेण्यात आला आहे.

### १.४ विषय निवडीची कारणे –

या शोधप्रबंधासाठी जो विषय निवडण्यात आला आहे. त्याची काही प्रमुख कारणे आहेत. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्य व कर्तृत्वाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेक संशोधकांनी केला आहे. परंतु शंकरराव काळे यांच्या कार्य व कर्तृत्वामुळे आधूनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीला कसा हातभार लागला आहे. या विषयाकडे संशोधकांनी दुर्लक्ष केलेले आहे. तसेच मी स्वतः यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये 'शंकरराव काळे' यांचे कार्य व कर्तृत्वः एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर एम. फील साठी संशोधन केलेले आहे. मात्र सदरच्या लघुशोध प्रबंधामध्ये त्यांच्याबाबतची बरीचशची माहीती व संशोधन अपूर्णच राहिल्याचे जाणवले आहे. सहकार चळवळीच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात जी मोलाची कामगिरी केली. त्याबाबत सखोल संशोधन करणे आवश्यक वाटल्यानेच मी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. इतिहास संशोधन क्षेत्रातील उणीव दूर करावी. इतिहासाच्या ज्ञान शाखेत नाविन्यपूर्ण योगदान देण्याचा

प्रयत्न या संशोधनाच्या अनुषंगाने करीत आहे. त्याची काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) अहमदनगर जिल्हयात सहकार चळवळीचा उदय केव्हा व कसा झाला. याचा अभ्यास करून या सहकार चळवळीचा इतिहास स्पष्ट करणे.

२) शंकरराव काळे यांची जडणघडण होत असतान त्यांनी समाजापुढे एक चांगला आदर्श उभा केला, याचा अभ्यास करणे.

३) शंकरराव काळे यांनी सहकारी संस्थांच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यात सहकार चळवळ उभी केली. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्याचा कायापालट घडून आला, याचा अभ्यास करणे.

४) शंकरराव काळे यांनी 'रयत शिक्षण संस्थेच्या' माध्यमातून समाजाच्या तळागाळातील समाजापर्यंत ज्ञानगंगा पोहचविली. त्यामुळे समाज जागृत झाला, याचा अभ्यास करणे.

५) शंकरराव काळे यांच्या सामाजिक कार्यामुळे परिवर्तन घडून आले. विविध सामाजिक कामांमुळे कोपरगांव तालुक्याचा तसेच अहमदनगर जिल्ह्याचा फार मोठा विकास घडून येण्यास मदत झाली याचा अभ्यास करणे.

६) शंकरराव काळे यांच्या धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीमुळे समाजात एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली. विविध जाती धर्माच्या लोकांचे नेतृत्व त्यांनी केले, याचा अभ्यास करणे.

अशा विविध कारणांमुळे तसेच ५ नोव्हेंबर २०१२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले आहे. मात्र शेवटच्या दोन महिन्यांचा कालावधी वगळता ते अखेरपर्यंत समाजकारणात सक्रीयपणे कार्यरत असल्याचे दिसून येते. सन १९६२ ते १९७२ सलग १० वर्ष अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, १९५२ साली दि कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची केलेली निर्मीती, सन १९७२ व १९७७ अशा दोन वेळा पारनेरचे आमदार, सन १९७८–८० या दोन वर्षाच्या काळात पुलोद मंत्रीमंडळात शिक्षण व सहकार खात्याचे राज्यमंत्री, १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत कोपरगाव मतदार संघाचे खासदार, रयत शिक्षण संस्थेचे १९७५ ते १९९० असे १५ वर्षे चेअरमन, ४० वर्षे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, तीन वर्ष रयतचे उपाध्यक्ष या सर्व पदांच्या माध्यमातून त्यांनी मोठे सामाजिक कार्य केले. ग्रामीण भागात शिक्षणाचे जाळे पसरविले. सहकारी चळवळीच्या माध्यमातून तालुक्याचा तसेच जिल्हयाचा कायापालट केला. सामाजिक, धार्मिक व

सांस्कृतिक कार्यात ते अखेरपर्यंत कार्यरत होते. विकासाच्या बाबतीत त्यांचा सकारात्मक दृष्टीकोन होता. सत्तेत कार्यरत असणाऱ्या व नव्याने सत्तेत येणाऱ्यांना, ग्रामीण विकासाचे कार्य, जनतेचे प्रश्न, शैक्षणिक सुविधा, बहुजनांच्या प्रश्नांचा विचार करू इच्छिणाऱ्यांना त्यांचे कार्य व कर्तृत्व प्रेरणा देणारे आहे. त्यांचा कार्यानुभव, कार्यपद्धती, जनसंपर्क, नेतृत्वगुण हे सर्व समाजाला परिचित व्हावे, त्यांनी केलेल्या कार्यातून बहुजन समाजास प्रेरणा मिळावी. त्यांचे कार्य प्रकाशात यावे म्हणून ''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास : विशेष संदर्भ – शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य'' हा विषय प्रस्तुत शोध प्रबंधासाठी निवडण्यात आला आहे.

**१.५ संशोधन पद्धती –**

कोणत्याही विषयातील अज्ञात पैलूंचे संशोधन करून अनुमान काढतांना किंवा नवीन सिद्धांत मांडतांना कोणती पर्याप्त संशोधन पद्धती उपयोगात आणली याला सामाजिक शास्त्रात फार महत्व आहे. सामाजिक शास्त्रात संशोधन करताना संशोधनापूर्वी योजिण्यात आलेल्या विषयांच्या संदर्भात तथ्यांचे अवलोकन करणे गरजेचे असते. त्यानंतरच संशोधनाची निश्चित दिशा स्पष्ट करता येते. कुठल्याही विषयाचे शास्त्रीय आकलन हे सुत्रबद्ध अशा संशोधन प्रयत्नातून शक्य होते. शंकरराव काळे यांच्या कामगिरीचे अध्ययन करताना हाच दृष्टीकोन स्वीकारला आहे.

१. संशोधन म्हणजे काय ?
२. सामाजिक संशोधन
३. ऐतिहासिक संशोधन
४. संशोधनाची तथ्ये
५. पूर्वज्ञान
६. संशोधनाची उद्दिष्टे
७. संशोधनाची आराखडा
८. संशोधनाची गृहितकृत्ये
९. संशोधनाची मर्यादा

**१. संशोधन म्हणजे काय ?**

वेब्स्टरच्या शब्दकोशात संशोधन या शब्दाचा जो अर्थ देण्यात आला आहे. त्यावरून सामान्य माणसासाठी संशोधनाचा ढोबळ अर्थ काय होतो ते स्पष्ट होते. या शब्दकोशाप्रमाणे संशोधन म्हणजे ''तथ्ये वा तत्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी

चिकित्सा किंवा परीक्षण किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पद्धतशीर केलेले परिश्रम''[२४] संशोधनाच्या शब्द कोशातील या व्याख्येवरून तथ्यांचा शोध घेण्याशी या शब्दांचा संबंध आहे एवढे समजते. परंतू असा शोध का घेतला जातो व कसा घेतला जातो तसेच याचे काहीच आकलन आपणास होत नाही. हा शोध का व कसा हे स्पष्ट होण्यासाठी संशोधनाची खालील व्याख्या उपयुक्त ठरण्यासारखी आहे. ''नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित, स्वीकृत निष्कर्ष व सिद्धांताचे पुनःपरीक्षण करण्याच्या हेतूने चिकित्सक व सखोल चौकशी वा प्रयोग म्हणजेच संशोधन असे म्हणता येईल.''[२५]

संशोधन म्हणजे उपलब्ध असलेल्या ज्ञानाचे वस्तुनिष्ठ पद्धतीने परिक्षण करणे किंवा नवीन ज्ञान प्राप्त करणे किंवा संपादन करणे होय. संशोधन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. एखाद्या विषयाशी संबंधित सत्य चौकशी किंवा शोधाच्या माध्यमातून माहीत करून घेणे म्हणजे संशोधन असाही अर्थ घेतला जातो.

कोणत्याही गोष्टीसंबंधी 'पण याचा फायदा काय?' असा प्रश्न उपस्थित करणे हे उपयुक्ततावादी या व्यवहारी वृत्तीचे द्योतक आहे. एखाद्या कार्यामुळे मिळणारे समाधान हाच त्या कार्याचा सर्वोच्च मोबदला नाही काय? जे माहीत नाही ते माहीत करून घेण्याचा प्रयत्न व्यावहारीकदृष्ट्या फायद्याचाच ठरावयास हवा अशी समजूत असणाऱ्यांना बेंझामिन फ्रँकलिनने दिलेले उत्तर मोठे समर्पक आहे. फ्रँकलिनला त्याने लावलेल्या विजेच्या शोधाबद्दल कुणी विचारले की, त्याच्या शोधाचा फायदा काय? फ्रँकलिनने याचे उत्तर एका खोचक प्रश्नाच्या स्वरूपात दिले की, नवजात मुलाचा फायदा काय? याचाच अर्थ असा की नवीन ज्ञान हे नवजात मुलाप्रमाणे आपल्याला अवर्णनीय असा आनंद देते. माहीत नसलेले माहीत करून घेण्यात एक वेगळा आनंद व आगळे समाधान शास्त्रज्ञास लाभते. प्राप्त झालेले ज्ञान उपयुक्त ठरले की नाही हा विचार शास्त्रज्ञासाठी गौण स्वरूपात असतो. संशोधनामुळे सामाजिक जीवनातील बरीच रहस्ये उलगडतात आणि सामाजिक वास्तविकतेसंबंधी आपले ज्ञान विकसीत होत असते.

प्रस्तुत शोधप्रबंधात संशोधनाच्या चौकटीत ''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास : विशेष संदर्भ – शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य'' हा विषय निश्चित करण्यात आला आहे. या विषयाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून ठरविलेली उद्दिष्टे आणि ग्राह्य धरलेल्या गृहीत कृत्यांच्या आधारे प्राथमिक व दुय्यम साहित्य साधनांच्या आधारे निष्कर्षाप्रत जाण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

## २ सामाजिक संशोधन –

वैभवाच्या दिशेने वाटचाल करू शकणारा व त्याचे खरेखुरे स्वरूप हे सामाजिक परिवर्तन प्रक्रियेतून स्पष्ट होते. सामाजिक संशोधन म्हणजे शोध घेणे तथा नवे ज्ञान उपलब्ध करून देणे. सत्याची जाणीव करून देणे. सर्वसामान्यपणे असा अर्थ संशोधनाचा घेतला जातो. मानवी जीवनात संशोधन प्रक्रियेस अत्यंत महत्व प्राप्त झालेले आहे. सामाजिक संशोधन हे मुळातच मानवाशी संबंधित आहे. जिज्ञासा व सामाजिक संशोधनात समाज जीवनाशीसंबंध असणाऱ्या विविध विषयांचा सखोल अभ्यास केला जातो.

कार्ल मार्क्सने विचारांचे दारिद्र्य हे आर्थिक दारिद्र्यांपेक्षा अधिक कठिण मानले आहे.[२६] थोडक्यात सामाजिक संशोधनात समाजाच्या वर्तनासंबंधी अभ्यास करण्यात येतो. सामाजिक शास्त्रातील संशोधनाच्या संदर्भात व. दि. कुलकर्णी स्पष्ट करतात की, सामाजिक शास्त्रातील संशोधन विषय हा 'चल' म्हणजे बदलणारा घटक आहे. भौतिकशास्त्रातील वस्तुप्रमाणे तो 'अचल' असा घटक नाही. भाव–भावना असलेला विचार करू शकणारा, कल्पना शक्ती असलेला हा माणूस व त्याने निर्माण केलेल्या संस्था व समाज हे येथे संशोधन विषय असल्याने मुळातच येथे अभ्यास क्षेत्र बदलते–सरकते आहे. येथे अवलोकन करणे, अचूकपणे नोंदी घेणे, नेमकेपणाने नोंदी घेणे अवघड असते.[२७] ही सत्यता समोर ठेवूनच शंकरराव काळे यांच्या कामगिरीचे अवलोकन करून उपलब्ध तथ्यांच्या आधारे संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

सामाजिक, आर्थिक, राजकिय आणि नैतिक स्वरूपाच्या घटना सातत्याने घडत असतात. त्यात निश्चित असा कार्यकारण संबंध असतो. परंतू तो आपल्याला माहिती नसतो. त्यातील कार्य आणि कारणभाव यांच्यातील कार्य अन्योन्य संबंधाचे विश्लेषण करून त्याचा शोध घेणे हा सामाजिक संशोधनाचा उद्देश आहे. १९ व्या शतकातील महाराष्ट्रात पेशव्यांचे राज्य संपुष्टात येऊन ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाली. या नव्या जाणीवांची जाणीव सुशिक्षित विचारवंतांनी समाजाला करून दिली. ज्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक क्षेत्रात आंदोलने उदयास आली, संघटना निर्माण झाल्या. यामध्ये अनेक सुशिक्षित तरूणांनी महत्वाची भुमिका बजावली. त्यापैकीच शंकरराव काळे यांच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास या शोध प्रबंधात शास्त्रोक्त पद्धतीने करण्यात आलेला आहे. कारण त्यांच्या कार्यामुळे समाजात जनजागृती घडून आल्याने नवसमाज निर्माण होण्यास मदत झाली आहे असे दिसते. अशा प्रकारच्या संशोधनाने समाजाच्या विकासाला मदत होते. पाण्याच्या प्रवाहासारखे संशोधनाचे कार्य अविरत चालू राहते. यातून नवीन ज्ञान शोधून काढण्याचा संकल्प केलेला असतो. असा शास्त्रीय अभ्यास करताना या शोध

प्रबंधात अहमदनगर जिल्ह्याच्या सहकार चळवळीतून निर्माण झालेले नेतृत्व श्री. शंकरराव काळे यांच्या सहकार व शिक्षण विषयक कार्याचा शोध घेतला आहे.

सामाजिक संशोधनात जुन्या व नव्या ज्ञानाची पडताळणी करून नव्या संकल्पना मांडल्या जातात. हाच या संशोधनाचा मुख्य उद्देश असतो. मानवी जीवन हे अनेक समस्यांनी घेरलेले असते. कळत नकळत पिढ्यानपिढ्या आलेल्या परंपरा आणि जुनाट संस्कारामुळे मानवापुढे ही समस्या निर्माण होते. तो त्यात पुर्णपणे गुरफटला जातो. या समस्यांचे खऱ्या अर्थाने निराकरण करण्यासाठी सामाजिक संशोधन म्हणजे संशोधन पद्धती उपयुक्त ठरते.[२८] रा. ना. घाटोळे हे सामाजिक संशोधनाबाबत म्हणतात की, 'सामाजिक संशोधन' सामाजिक घटनांचा अभ्यास होय. हा सामाजिक घटनांचा अभ्यास समाजसुधारणा व समाज प्रगती यासाठी अत्यंत उपयुक्त असतो.[२८] प्रा. जे. पी. कारवा म्हणतात की, समाजशास्त्रात निरनिराळ्या संघटनात्मक प्रक्रियांच्या ज्ञानामुळे समाजात अस्तित्वात असलेल्या अंधश्रद्धा, जुन्या चालीरीती व धार्मिक प्रथा इ. सुधारणा घडवून आणणे शक्य होते. समाजशास्त्रात व्यक्ती-व्यक्तीमधील विविध सामाजिक संबंधाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला जातो. त्यामुळे सामाजिक निर्माण कार्यात समाजशास्त्राच्या अभ्यासाचा उपयोग होतो.[३०] या शोध प्रबंधात शंकरराव काळे यांनी असे उपयुक्त कार्य कसे घडविले ते अभ्यासले आहे. १९ व्या शतकात महाराष्ट्रातील समाजावर रूढीप्रिय परंपरांचा प्रभाव होता. अंधश्रद्धा, बालविवाह, दैववाद आदींचे समाजात प्राबल्य होते. ही सामाजिक जुनी मूल्ये नष्ट करून नव्या ज्ञानामुळे जी मूल्ये उदयास आली ती शंकरराव काळे यांनी रूजविण्याचा प्रयत्न केला. अशा अवस्थेतील सामाजिक परिस्थितीवर त्याचा कसा प्रभाव पडून नवीन समाजनिर्मितीचा प्रयत्न झाला याचा या ग्रंथात चिकित्सक अभ्यास केला आहे.

### ३. ऐतिहासिक संशोधन -

''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास : विशेष संदर्भ - शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य'' हे संशोधन करताना ऐतिहासिक पद्धतीचा योग्य तेथे उपयोग करण्यात आला आहे. ऐतिहासिक दस्तऐवज, पत्रव्यवहार आणि कागदपत्रांचे अंतर्गत व बाह्य परिक्षण करून त्याची शास्त्रीय पडताळणी करण्यात आली आहे. जेथे वादांकित विषय असतील तेथे समन्वय साधण्यावर अधिक भर देण्यात आला आहे. कागदपत्रांतून मुलाखतीतून प्रगट होणारे संदर्भ लक्षात घेऊन नवा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**ऐतिहासिक संशोधन पद्धती**

| सर्वेक्षणात्मक पद्धती | प्रश्नावली पद्धती | प्रत्यक्ष मुलाखत | संदर्भ पद्धती |
|---|---|---|---|
| Survey Method | Questionative Method | Interview Method | Reference Method |

सर्वेक्षणात्मक पद्धतीमध्ये सुरवातीला सर्वेक्षणाच्या मर्यादा स्पष्ट कराव्या लागतात. विषयाच्या व भौगोलिक मर्यादा स्पष्ट झाल्या की, मग सर्वेक्षणातून माहीती गोळा करणे सोपे जाते व उपलब्ध झालेल्या माहीतीचे विश्लेषण करून त्याचे निष्कर्ष काढावे लागतात. मग या सर्वांचा ताळमेळ लावून संशोधकला आपले संशोधन पुढे नेता येते. [३१] प्रश्नावलीमधून प्रत्यक्ष माहीती किंवा डाटा आपल्या हाती येतो. आणि त्यानंतर माहीतीचे विश्लेषण करून उपलब्ध झालेली माहीती विचारात घेऊन माहीतीचे मुद्देसुद विश्लेषण करावे लागते.[३२]

सामाजिक संशोधनात अनेक पद्धतीपैकी मुलाखत ही एक महत्वाची पद्धत समजली जाते. पॉलिन यंगच्या मते, ‘‘मुलाखत ही अशी सुव्यवस्थित पद्धती आहे की, ज्यायोगे तुलनेने त्रयस्थ असलेल्या व्यक्तीच्या जीवनात अभ्यासक कल्पनाशक्तीच्या बळावर शिरत असतो.’’[३३] मुलाखत जर घेतली असेल तर प्रत्यक्ष प्रश्न समोरासमोर विचारले जातात. ऐतिहासिक संशोधनात ही पद्धत फक्त समकालीन इतिहासाच्या संशोधनातच वापरली जाऊ शकते. या पद्धतीमुळे प्रश्नकर्त्याला खुलवून त्याची मानसिकता बनवून उत्तरे घेतली जातात हे करत असताना त्याला आपल्यातील संशोधनवृत्ती व अभ्यासवृत्ती जाणवली पाहिजे. तात्पर्य असे की, इतिहास संशोधनात अशा निरनिराळ्या संशोधन पद्धती वापरल्या जातात. शेवटी संशोधन ही एक शिस्तबद्ध पद्धती आहे. एक तर्क सुसंगत अशी वैचारिक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया एका विशिष्ट पद्धतीने साकारत जाते.

इतिहासामध्ये नवीन पुराव्यांची उपलब्धता आणि त्यातून मिळालेला आशय या दोन्ही घटकांमुळे सातत्याने इतिहासामध्ये बदल घडत असतो. म्हणून इतिहासातील बदल हा प्रकृतीचा स्थायीभाव आहे. इतिहास हा एका अर्थाने सत्याचा शोध आहे. सत्य हे स्वतंत्र मुल्य आहे. इतर कोणत्याही मुल्यापेक्षा कनिष्ठ किंवा दुय्यम दर्जाचे असू शकत नाही.[३४] इतिहासलेखक किंवा अभ्यासक हा आपल्या क्षमतेनुसार व आवश्यकतेनुसार

इतिहास लेखनाची प्रादेशिक किंवा सांस्कृतिक मयार्दा निश्‍चित करतो. इतिहासलेखन ही दीर्घकाळ चालत आलेली व अखंडपणे चालू राहणारी शोधयात्रा आहे. इतिहास लेखनात कोणाचाही व कोणताही शब्द अखेरचा नसतो. तसेच कोणतेही इतिहासलेखन परिपूर्ण नसते.

**४. संशोधनाची तथ्ये –**

या शोध प्रबंधासाठी ''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास : विशेष संदर्भ – शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य'' हा विषय संशोधनासाठी घेण्यात आलेला आहे. संशोधनात तथ्यांना फार महत्व असते. तथ्यांशिवाय संशोधन करणे चुकीचे ठरेल.

सामाजिक शास्त्रांमध्ये तथ्ये सर्वसामान्यत: व्यक्तींना विचारलेल्या प्रश्नांच्या किंवा त्यांच्यासमोर प्रस्तुत केल्या गेलेल्या चेतकांच्या संदर्भात त्यांनी व्यक्त केलेल्या प्रत्युत्तरांच्या किंवा प्रतिक्रियांच्या नोंदीच्या स्वरूपात असतात. अन्य शास्त्रांप्रमाणेच सामाजिक शास्त्रांमध्येही ज्ञानेंद्रियांच्या आधारे होणारा स्थितीबोध वा निरिक्षण हाच तथ्य प्राप्तीचा आधार आहे. आपल्या ज्ञानेंद्रियावर आघात करणाऱ्या गोष्टींमुळे आपणास झालेल्या संवेनदनांची नोंद म्हणजेच तथ्य असे म्हणता येईल. म्हणजेच जे व्यक्त वा प्रकट आणि अवलोकविण्यात आलेले आहे. त्यालाच तथ्य असे म्हणतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, 'तथ्ये म्हणजे व्यक्तींच्या प्रतिक्रियांची नोंद होय.'[३५]

सामाजिक शास्त्रांमधून संकलित केल्या जाणाऱ्या तथ्यांची दोन प्रमुख उगमस्थाने आहेत.

१) कागदपत्रे, पुस्तके व अहवाल इत्यादींचा उपयोग तथ्ये प्राप्त करून घेण्यासाठी करता येतो.

२) प्रत्यक्ष व्यक्तींनी, त्यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरांवरून किंवा त्यांच्या क्रियांच्या व हावभावांच्या निरीक्षणावरून तथ्ये प्राप्त होऊ शकतात. तेव्हा कागदपत्रे व लोक हे तथ्यांचे दोन प्रमुख स्त्रोत मानता येतील. कागद पत्रांमधून सामाजिक शास्त्रज्ञास माहिती मिळू शकेल. ज्या विषयांबाबत अधिकृत माहिती कागदपत्रांतून वा पुस्तकांमधून मिळू शकते. त्या विषयाबाबत पुन:क्षेत्र सर्वेक्षण करणे सामान्यत: अनावश्यकच असते. बखरी सारखी ऐतिहासिक कागदपत्रे, रोजनिशी, जीवनचरित्रे, आत्मचरित्रे व संख्याशास्त्रीय अहवाल हे तथ्य प्राप्त करून घेण्याकरीता उपयुक्त असे आधार आहेत. अध्ययनाच्या दृष्टीने उपयुक्त

अशी माहिती अर्थातच लोकांकडूनही गोळा करता येते. यासाठी लोकांच्या व्यवहारांचे किंवा त्यांच्या प्रतिक्रियांचे वेगवेगळ्या पद्धतीने निरीक्षण करून माहिती मिळविता येण्यासारखी असते. प्रश्नावली व मुलाखत या तंत्रांना लोकांकडून शाब्दिक स्वरूपाची तथ्ये प्राप्त करून घेण्याची मुलभूत व प्रमुख तंत्रे म्हणून विशेष महत्व आहे. प्रस्तुत शोध प्रबंधात अशाप्रकारे तथ्यांचे संकलन करण्यात आले आहे. ''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास : विशेष संदर्भ – शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य'' या विषयाची तथ्ये पुढीलप्रमाणे आहे.

१) कोपरगांव तालुक्यातील परिसरात काळे यांच्या नेतृत्वगुणांमुळे नवीन युवा पिढीस प्रेरणा मिळाली.

२) या परिसरातील समाजाच्या आर्थिक परिस्थितीचा कायापालट होण्यास त्यांच्या कार्य कर्तृत्वामुळे मदत होऊन मजबूती निर्माण झाली.

३) त्यांच्या संस्थांत्मक कार्यामुळे सामाजिक दृष्टीने संघटनात्मक कार्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

४) त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्यामुळे नव–तरूण–सुशिक्षित वर्गाला विकासाची नवी दिशा प्राप्त झाली.

५) त्यांनी केलेल्या सहकार क्षेत्राच्या विकासामुळे या तालुक्यात विकासाच्या नव्या पर्वास प्रारंभ झाला.

## ५. पूर्वज्ञान –

कोपरगाव तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रात अनेक संस्थात्मक कार्य शंकरराव काळे यांच्या नेतृत्वामुळे प्रभावीपणे उभे राहिले. या संदर्भात प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा उपयोग संशोधनासाठी करण्यात आला. यामध्ये मुद्रित आणि मौखिक साधनांचा प्रामुख्याने समावेश आहे. या संदर्भातील काही साधने याप्रमाणे आहेत.

अ) प्राथमिक साधने :– १) समकालीन विविध व्यक्तिंच्या मुलाखती
२) विविध संस्थांचे अहवाल
३) मुद्रित ग्रंथ संपदा

ब) दुय्यम साधने :– इतर लेखकांची ग्रंथ संपदा, संपादन केलेले ग्रंथ, स्मृति विशेषांक, गौरव ग्रंथ, विशेषांक आदि.

## ६. संशोधनाची उद्दिष्टये –

संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी केलेले पद्धतशीर प्रयत्न होय. अर्थात संशोधन ही एक बौद्धिक प्रक्रिया असून तिच्याद्वारे नवीन ज्ञान प्रकाशात आणले जाते. किंवा जुन्या ज्ञानातील उणिवा सुधारल्या जाऊन त्यात नवीन ज्ञानाची भर घातली जाते. व्यक्तिशी निगडीत असलेल्या समुह, गट, संस्था, समस्या, संस्कृती, धर्म, परंपरा या घटकांचा समावेश सामाजिक संशोधनात होतो. म्हणून कोणतेही संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी विशिष्ट उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवावी लागतात. त्याशिवाय संशोधन कार्य पूर्णत्वास जाऊ शकत नाही. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्य व कर्तृत्वाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेक संशोधकांनी केला आहे. मात्र शंकरराव काळे यांच्या कार्य व कर्तृत्वामुळे समाजात कशाप्रकारे परिवर्तन घडून आले, त्यांचे कार्य बहुजन समाजाला कसे प्रेरणादायी ठरले. सहकारी चळवळीला कशा प्रकारे दिशा मिळाली व त्यांच्या कार्यामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीला कसा हातभार लागला आहे. या विषयाकडे संशोधकांनी दुर्लक्ष केलेले आहे. म्हणून ही एक इतिहास संशोधनाच्या क्षेत्रातील उणीव दूर करून इतिहासाच्या ज्ञानशाखेत नाविन्यपूर्ण योगदान देण्याचा प्रयत्न संशोधनाच्या अनुषंगाने करीत आहे. त्यासाठी संशोधनाची पुढील उद्दीष्टये स्पष्ट करता येतील.

१) अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा उदय केव्हा व कसा झाला, याचा अभ्यास करणे.

२) शंकरराव काळे यांची जडणघडण होत असताना त्यांनी समाजापुढे एक चांगला आदर्श उभा केला, याचा अभ्यास करणे.

३) शंकरराव काळे यांनी सहकारी संस्थांच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यात सहकार चळवळ उभी केली. त्यामुळे जिल्ह्याचा कायापालट घडून आला, याचा अभ्यास करणे.

४) शंकरराव काळे यांनी 'रयत शिक्षण संस्थेच्या' माध्यमातून समाजाच्या तळागाळापर्यंत ज्ञानगंगा पोहचवली. त्यामुळे समाज जागृत झाला, हे अभ्यासणे.

५) शंकरराव काळे यांच्या सामाजिक व राजकीय कार्यामूळे समाजात परिवर्तन घडून आले. विविध सामाजिक कार्यांमुळे तालुक्याचा तसेच अहमदनगर जिल्ह्याचा फार मोठा विकास घडून आला, हे अभ्यासणे.

६) शंकरराव काळे यांच्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यामुळे समाजात एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली. विविध जाती धर्माच्या लोकांचे नेतृत्व त्यांनी केले, हे अभ्यासणे.

## ७. संशोधनाचा आराखडा –

प्रत्येक व्यक्तीला जीवनात कोणत्याही कामात यशस्वी मजल गाठावयाची असेल तर त्याला सुत्रबद्ध नियोजनाची आवश्यकता असते. नियोजन किंवा आराखड्याशिवाय त्याच्या प्रयत्नास यश प्राप्त होणे दुर्लभ असते. आपले उद्दिष्ट निश्चित करून ते सुलभपणे प्राप्त करण्यासाठी दिशादर्शक आराखडा तयार करून व्यवस्थित नियोजन करणे महत्वाचे असते. आराखड्यामुळे इच्छित ध्येयपुर्तीसाठी केलेले प्रयत्न सार्थ ठरतात. संशोधन क्षेत्रातही आराखड्यास फार महत्व असते. त्याशिवाय संशोधक आपल्या संशोधनावर नियंत्रण ठेवू शकत नाही. संशोधन आराखड्याचे महत्व स्पष्ट करताना पु. ल. भांडाकर म्हणतात की, 'ज्याप्रमाणे स्थापत्य शास्त्रज्ञ घर बांधणीच्या कामास प्रत्यक्ष सुरूवात करण्यापूर्वी नकाशा तयार करतो. या नकाशात कोणत्या महत्वाच्या गोष्टींचा निर्णय घ्यायचा याचा तो विचार करतो. त्या अनुषंगाने तो निर्णय घेत असतो. त्यामुळे त्याचे श्रम, पैसा आणि वेळ वाया जात नाही आणि घर पण अपेक्षेप्रमाणे निर्माण केले जाते. [३६]

यावरून असे स्पष्ट होते की, संशोधन आराखड्याशिवाय संशोधन कार्य पुर्ण होऊच शकत नाही.

प्रा. रा. ना. घाटोळे संशोधन आराखड्याचे महत्व स्पष्ट करताना म्हणतात की, 'संशोधनास प्रारंभ करण्यापुर्वी प्रथम संशोधनाचा आरखडा तयार करावा लागतो. त्यात संशोधनाचा उद्देश, अध्ययन संशोधनाचे क्षेत्र, कालावधी, संशोधनासाठी आवश्यक माहिती गोळा करणे ती किती व कशी करावी, नमुना निवडीचे विश्लेषण, संशोधन कार्याचा व्यय इ. अनेक गोष्टी प्रारंभीच ठरवाव्या लागतात. आराखड्यामुळे संशोधनात सुसूत्रतता येते.[३७] यावरून सामाजिक संशोधनामध्ये संशोधन आराखडा अत्यंत महत्वाचा आहे. संशोधनाची उद्दिष्टे विचारात घेऊन सर्वच प्रकारच्या संशोधनासाठी एकच आराखडा उपयुक्त ठरत नाही. त्यामुळे संशोधनाच्या उद्दीष्टानुसार आराखड्याचा विचार संशोधनामध्ये केला जातो. संशोधन आराखड्याचे संशोधन उद्दिष्टानुसार चार प्रकार पडतात.

१) स्पष्टीकरणात्मक किंवा अन्वेषणात्मक आराखडा

२)	वर्णनात्मक संशोधन आराखडा

३)	निदानात्मक संशोधन आराखडा

४)	प्रयोगात्मक किंवा परिक्षणात्मक आराखडा

जेव्हा संशोधनाचा मुख्य उद्देश हा सामाजिक घटनेच्या मुळाशी असलेल्या कारणांचा शोध घेणे हा असतो. त्यानुसार संशोधक हा वस्तुनिष्ठ पद्धतीने शोध घेऊन त्या संशोधनाशी संबंधित आराखडा तयार करतो.

प्रस्तुत शोध प्रबंधात अन्वेषणात्मक व वर्णनात्मक आराखड्याचा उपयोग विषयाच्या अनुषंगाने करण्यात आला आहे. पु. ल. भांडाकर म्हणतात, विशिष्ट व्यक्तींच्या, सुमहांच्या व स्थितीच्या वैशिष्टयांचे किंवा लक्षणांचे तथातथ्य वर्णन करणे हाच वर्णनात्मक अध्ययनाचा प्रधान हेतू असतो.[३८]

शंकरराव काळे यांच्या शैक्षणिक, सहकार, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील कामगिरीमुळे कोपरगांव परिसरात मोठा विकासात्मक बदल घडून आला, याचा अन्वेषणात्मक व वर्णनात्मक आराखड्याच्या अनुषंगाने सूत्रबद्धपणे या शोध प्रबंधात अभ्यास करण्यात आला आहे.

### ८.	संशोधनाची गृहितकृत्ये –

निश्चित सूत्रे वा अनुमाने बांधली तर संशोधनाचा पुढील मार्ग सुलभ होतो. नित्य नव्या ज्ञान शाखांचा शोध घेताना गृहितकृत्ये निश्चित करून शोध घेतला असता पुढील आकलन करणे सुलभ होते. सर्वसामान्य माणूस आणि संशोधन करणारी व्यक्ती यांच्यात नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्याची जी लालसा असते यात फरक असतो. सामान्य माणूस नवीन ज्ञान हे स्वतःच्या फायद्या इतपतच विचार करतो. तर संशोधक हा जो नवीन ज्ञान ग्रहन करण्याचा प्रयत्न करतो त्यात त्याचा शास्त्रीय व वैज्ञानिक दृष्टीकोन असतो. कारण त्याला मिळणारे जे ज्ञान असते ते इतरांनासुद्धा त्याचा फायदा झाला पाहिजे हा मूळ उद्देश असतो. यात कार्यकारणभावाचा संबंध असतो. पुरावा आणि क्रमबध्दता यावर हे ज्ञान अवलंबून असते. त्यामुळे अशी सूत्रे मांडून त्या अनुरोधाने संशोधकास शोध घ्यावा लागतो व तथ्ये मांडता येतात. अशा शास्त्रीय अभ्यासाच्या पद्धतीत 'गृहितकृत्य' हा टप्पा महत्वाचा असतो.

संशोधक ज्या विषयात संशोधन करावयाचे त्या संबंधात संपादित केलेल्या माहितीचे वर्गीकरण करतो. त्याच्या आधारे गृहितकृत्याची पार्श्वभूमी तयार करून संशोधनाच्या बाबतीत काही अंदाज मांडतो. या अंदाजालाच शास्त्रीय भाषेत सिद्धांत

कल्पना किंवा गृहितकृत्ये असे म्हणतात. ज्ञात असलेल्या माहितीच्या आधारे एखाद्या घटनेच्या संबंधात केलेले अंदाज याला गृहितकृत्य म्हणतात. ते गृहितकृत्य बरोबरच असेल असे नाही. कोणत्याही विषयाच्या संशोधन कार्यात गृहितकृत्ये आवश्यक असते. अशी गृहितकृत्ये हे एक सुनिश्चित अनुमान असते व ते सतत शोधकार्यास पोषक ठरत असते. त्यामुळे संशोधकास दिशा प्राप्त होते. त्याच्या साहयाने अभ्यासक संशोधनानेच संभाव्य चित्र रेखाटत असतो. संशोधनाचा तो पाया असतो. तो प्रयत्नपूर्वक निर्माण करावा लागतो. त्यामुळे निरीक्षणाला दिशा प्राप्त होते. अशा प्रकारच्या सुत्रबध्द मांडणीमुळे गृहितकृत्ये निश्चित आकार घेतात.

गृहितकृत्यांशिवाय संशोधकाचे कार्य थांबते. संशोधनात सूचना देण्याचे कार्य गृहितकृत्ये करीत असते. ‘संशोधनात मार्गदर्शक, सहायक तसेच अनेक अडचणीत मार्ग काढण्यासाठी ज्या कल्पनांचा किंवा अंदाजांचा उपयोग होतो. त्यालाच गृहितकृत्ये असे म्हणतात.’[३९] अशा प्रकारे गृहीतकृत्ये ठामपणे मांडली आणि त्यांचे यथार्थ आकलन केले तर त्यातून नवीन तथ्ये प्रकाशात येऊ शकतात.

प्रस्तुत शोध प्रबंधात शंकरराव काळे यांच्या कार्य कर्तृत्वाचा अभ्यास करताना खालील गृहितकृत्ये निश्चीत केलेली आहेत. त्यांच्या आधारवरच साधनांचे वर्गीकरण करून वस्तुनिष्ठपणे विश्लेषण करण्यात आले आहे.

**गृहितकृत्ये –**

१) शंकरराव काळे यांच्या जडणघडणीतून समाजापुढे एक चांगला आदर्श निर्माण झाला.

२) शंकरराव काळे यांच्या शैक्षणिक कार्यामूळे गोरगरीब जनतेला शिक्षणाची संधी मिळाल्याने समाजात प्रबोधन घडून आले.

३) शंकरराव काळे यांच्या सहकार व सामाजिक क्षेत्रातील कार्यामुळे तालुक्याचा तसेच जिल्ह्याचा सर्वांगीण विकास घडून आला.

४) शंकरराव काळे यांच्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यामुळे समाजात एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली.

## ९. संशोधनाची मर्यादा –

शंकरराव काळे यांची कामगिरी हा अभ्यास इतिहाससंबंधीत विषयाचा असल्यामूळे मूळ साधन सामुग्रीचा व मुलाखती इ. चा अभ्यास करून त्यांच्या सामाजिक, सहकारविषयक व शिक्षणविषयक कामगिरीवर प्रकाश टाकला आहे. सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात शंकरराव काळे यांनी आपले योगदान कसे दिले. याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यात आला आहे.

शंकरराव काळे यांनी १९५३ मध्ये शेतकऱ्यांना संघटीत करून अवघ्या तीन वर्षात कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची निर्मिती केली. तसेच विविध सहकारी संस्थांची निर्मिती करून जिल्हा परिषद अध्यक्ष, आमदार, मंत्री, खासदार, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन, उपाध्यक्ष इत्यादींच्या माध्यमातून शिक्षण, सहकार, सामाजिक व धार्मिक क्षेत्रामध्ये इ. स. २०१२ पर्यंत जे कार्य केले त्याबद्दलची माहीती प्रस्तुत शोध प्रबंधात मांडण्यात आली आहे.

## १.६ विषयाचे महत्व

स्व. शंकरराव काळे यांचे व्यक्तीमत्व व कार्य म्हणजे कर्तृत्वाचा काळ. ज्वलंत व अग्नीकुंडासारखा धगधगता दीप आहे. सर्वांगीण सर्वस्पर्शी व व्यापक कार्य करणारे शंकरराव काळे हे एक कार्यकुशल व नेतृत्वगुण संपन्न व्यक्ती होते. त्यांच्या नेतृत्वाला कोठेही अहंकाराचा व विकृतपणाचा स्पर्श झालेला दिसत नाही. काळाच्या ओघात सहकारी चळवळीतही शेतकऱ्यांना लाभांश कमी कमी होत जाणे दिसू लागल्यानंतर सहकारी साखर कारखानदारीला पूरक उद्योगाचे जोड देण्याचे उपक्रमही तितक्याच प्रामाणिकपणे आणि तडफेने त्यांनी उभे केले. भूमिपुत्र हा कुठल्याही परिस्थितीत शिक्षणापासून वंचित राहाता कामा नये, या भूमिकेतून महाराष्ट्रात उभ्या राहिलेल्या शैक्षणिक चळवळींना साथ-संगत करण्याचे सामर्थ्य देण्याचे कार्य शंकरराव काळे यांनी आयुष्यभर केल्याचे चित्र दिसून येते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या 'रयत शिक्षण संस्थेच्या' गंगेच्या प्रवाहात उतरण्याचा दूरदृष्टीचा व निराहंकारी मार्ग त्यांनी अवलंबला. रयतेच्या माध्यमातून शिक्षणाची, ज्ञानाची गंगा दिन-दलित-बहुजनांपर्यंत नेऊन पोहचविण्याचे पुण्यकर्म त्यांनी केले. सर्वसाधारण शिक्षणाबरोबरच काळानुरूप आधुनिक व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण प्रसारासाठी कार्यकर्तृत्व केल्याचे दिसून येते.

## १.७ संशोधन विषयाच्या प्रकरणांचे नियोजन –

१. प्रस्तावना

२. अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा उदय व विकास

३. शंकरराव काळे यांची जडण–घडण

४. शंकरराव काळे यांचे सहकारी चळवळीतील योगदान

५. शंकरराव काळे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

६. शंकरराव काळे यांचे सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान

७. निष्कर्ष / सारांश

लोकप्रतिनिधी या नात्याने विधानसभेत आणि लोकसभेत त्यांनी केलेल्या प्रतिनिधीत्वाचे दर्शन त्यांच्या कार्यातून दिसते. जोरदार भाषणे, स्फोटक विधाने, प्रसिद्धीचा झगमगाट आदी क्षेत्रातील कलंकापासून पूर्णपणे दूर राहून खऱ्या खुऱ्या तळमळीने व लोकविकास संबंधीच्या जिव्हाळ्याने त्यांनी कार्य केले. प्रसिद्धिनुरूपता आणि आत्मप्रौढीचे ढोल बडवणारे तथाकथित पुढारपणा त्यांनी कधीही केले नाही. आजूबाजूला, खाली आणि वर चिखलच चिखल परसलेला असताना सुद्धा निष्कलंक कमलदलाप्रमाणे असणारे राजकारण सहकार, शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या विलोभनीय व्यक्तिमत्वाचे दर्शन त्यांच्या कार्यातून होते. पण हे करताना आपण एक कुटुंबप्रमुख आहोत याचे भान त्यांनी सुटू दिले नाही. प्रपंचातील कर्तव्य, भावभावना यातील आपला आवश्यक सहभाग, प्रेमळपणा, नम्रता मवाळपणा आणि अगदीच आवश्यक ठरले तर कठोरपणा ही त्यांच्यातील गृहस्थधर्माची वैशिष्टये दिसून येतात.

इंग्रज विचारवंत कार्लाईलच्या मते ‘इतिहास म्हणजे श्रेष्ठ व्यक्तींची चरित्रे व त्यांनी केलेली कामगिरी होय.’[४०] त्याच्या मते, इतिहासात प्रतिभेला फार महत्व आहे, जमावाला नाही. कारण, सर्वसामान्य माणुस कायमच्या रूळलेला मार्गानेच जातो. परंतु काही श्रेष्ठ व्यक्ती आपल्या प्रतिभेच्या जोरावर सबंध समाजाची दिशाच बदलतात. राजकारणाबरोबर काही व्यक्ती शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक तसेच सहकाराच्या माध्यमातून समाजाची जडणघडण करीत असतात. त्यांच्या कार्यातून समाजाला प्रेरणा मिळते व समाजात परिवर्तन घडून येते. याच दृष्टीकोनातून शंकरराव काळे यांच्या राजकीय, सामाजिक कार्यातून सहकार चळवळ उभी राहिली. त्यांचे चरित्र व त्यांच्या कामगिरीमुळे नवसमाज निर्माण झाला. त्यांनी केलेल्या कार्यातून बहुजन समाजास प्रेरणा मिळावी. त्यांचे कार्य व कर्तृत्व नव्या पिढीला निश्चितच मार्गदर्शक ठरेल, या दृष्टीने सदर संशोधन विषय महत्वाचा आहे.

– संदर्भ –

| | | | |
|---|---|---|---|
| १) | वि. का. राजवाडे | : | राजवाडे लेखनसंग्रह, ऐतिहासिक साहित्य अकादमी प्रकाशन, १९९८, खंड – ४, पृ. १० |
| २) | लक्ष्मणशास्त्री जोशी | : | मराठी विश्वकोश खंड –११, महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मीती मंडळ, पुणे, प्रकाशन वर्ष – १९८३, पृ. २३२ |
| ३) | ना. य. मिरीकर | : | अहमदनगरचा शहराचा इतिहास, गणेश मुद्रणालय, हिरवे गल्ली, अहमदनगर – १९६८, पृ. २७ |
| ४) | संतोष दास्ताने | : | महाराष्ट्र २००३, दास्ताने रामचंद्र ॲण्ड कंपनी, पुणे प्रकाशन वर्ष – २००४, पृ. २११ |
| ५) | गो. स. सरदेसाई | : | मराठी रियासत, खंड ६, १९९१, मुंबई, पृष्ठ २८३ |
| ६) | गणेश चिमणाजी वाड, काशिनाथ नारायण साने | : | सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, ९. माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे यांच्या कारकिर्दीतील भाग पहिला, पुणे – १९११, पृ. १०८. |
| ७) | Gazetteers of India | : | Maharashtra State Gazetteers, Ahmednagar District, Published by secretary Govt. of Maharashtra – 1976, Pg. 908. |
| ८) | लक्ष्मणशास्त्री जोशी | : | उपरोक्त पृ. २६५ |
| ९) | वा. वा. ठाकूर | : | होळकरशाहीचा इतिहास, भाग पहिला, १९४४, इंदोर, पृ. १५६ |
| १०) | स्मृतिग्रंथ | : | संजीवनी स्मृतीग्रंथ, महाराष्ट्र : विकासाचे नवे प्रवाह १९९१, प्रकाशक – चेअरमन दि संजीवनी स. सा. कारखाना लि., सहजानंदनगर, कोपरगांव, पृ.११०. |
| ११) | संतोष दास्ताने | : | उपरोक्त, पृ. १२६. |
| १२) | गॅझेट ऑफ इंडिया | : | मिनीस्ट्री ऑफ इनफॉर्मेशन ॲन्ड ब्रॉडकास्टींग इंडिया, २००४, न्यु दिल्ली, पृ.१६ |
| १३) | वि. ग. घागरेकर | : | आधुनिक राजकीय नेतृत्व, विद्या प्रकाशन, पुणे –१९९७, पृ.२०२ |
| १४) | आमटे बाबा | : | उज्वल उदयासाठी, युवक अकादमी, महाराष्ट्र आरोग्य मंडळ, पुणे, पृ. १०० |
| १५) | रा. व. बोरगावकर | : | प्राचीन मराठीतील चरित्रलेखन, कॉन्टीनेन्टल प्रकाशन |

पुणे – १९८५., पृ. ४७

१६) बनायत गांधी : प्रबोधनकार ठाकरे यांचे सामाजिक विचार– एक समाजशास्त्रीय अभ्यास (लघुशोध प्रबंध जुन २००६) पृ. १६

१७) शंकरराव कदम : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे–साहित्य व कार्य, प्रकाशन वर्ष – २००५, औरंगाबाद, पृ. ८३

१८) देवीदास अ इथापे : यशवंतराव चव्हाणांचे राजकीय नेतृत्व – एक राजकीय चिकित्सा, शोधप्रबंध, नागपूर विद्यापीठ – १९९६, पृ. ८१

१९) शा. म. विसपुते : एस.एम. जोशींच्या सामाजिक, राजकीय विचारांचा अभ्यास– शोधप्रबंध, जळगांव विद्यापीठ – १९९७, पृ. ११

२०) शा. म. विसपुते : कित्ता , पृ. १६

२१) टी. बी. राजदेव : कॉ. दत्ता देशमुख यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीमधील योगदान, प्रबंध डॉ. बा. आ. म. विद्यापीठ औरंगाबाद (२००१), पृ.३४

२२) जो. वि. सोनखासकर : भाऊसाहेब हिरे यांचे राजकीय नेतृत्व–शोध प्रबंध, नागपूर विद्यापीठ, नागपूर – २००२, पृ. १२

२३) आर. ए. देवरे : यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक नेतृत्वाचा अभ्यास, शोध प्रबंध, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव – २००९, पृ. ५३

२४) जे. डब्लू वेस्ट : रिसर्च इन एज्युकेशन, प्रेन्टीस हॉल ऑफ इंडिया – १९६३, पृ. ४.

२५) डॉ. पु. ल.भांडाकर : सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, पुणे – १९९९, पृ. १०

२६) डॉ. जी. एच.पटेल : मराठी वृत्तपत्रे आणि सामाजिक आंदोलन, स्वाभिमान प्रकाशन, औरंगाबाद – २००४, पृ. १०

२७) स. ग.मालशे : भाषा व साहित्य संशोधन, प्रकाशक – जोशी वसंत, १९९७, पृ. १५६

२८) डॉ. जी. एच. पटेल : उपरोक्त, पृ. ५९

२९) रा. ना. घाटोळे : समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर – १९९०, पृ. ६

३०) प्रा. जे. पी. कारवा : सामाजिक समस्या व सामाजिक परिवर्तन, श्रीरंग प्रकाशन, पुणे – १९८७, पृ. १७.

३१) प्रभाकर देव : इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, शिवाजीनगर, नांदेड – १९९७, पृ. १८१

३२) शांता कोठेकर : इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन,नागपूर –१०, २०१२, चौथी आवृत्ती, पृ. १८२

३३) दा. धो.काचोळे : सामाजिक संशोधन पद्धती, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद – १९९३ पृ. १९५

३४) ग. ह. खरे, गो. त्र्यं. कुलकर्णी : मध्ययुगीन भारताचा इतिहास, मुंबई – २००१, प्रस्तावना, पृ. १३

३५) पु. ल. भांडारकर : उपरोक्त, पृ. २११

३६) बी. एन. सरदेसाई : इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर – २०११, दुधाळी, पृ. १२६

३७) रा. ना. घाटोळे : उपरोक्त, पृ. ६१

३८) पु. ल. भांडारकर : उपरोक्त, पृ. १२९

३९) डॉ. जी. एच.पटेल : उपरोक्त, पृ. ८४

४०) गायकवाड, सरदेसाई, हनमाने : इतिहास लेखन शास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर – १९९६, पृ. ३

## प्रकरण – २

# अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा उदय व विकास

**प्रस्तावना**

सहकाराचा इतिहास मानवाच्या इतिहासापेक्षा बराच जुना आहे. प्राणी कळपाने राहतात हे प्रतिकात्मक सहकार म्हणावे लागेल. मानवी वंशाचा विकास सहकारामुळेच घडून आला आहे. ही सहकाराची भावना मानवाला देणगी म्हणून मिळाली. मानवाच्या एकत्रित राहण्याच्या, काम करण्याच्या शक्तीमुळेच मानव आपली सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक अशी चौफेर प्रगती करू शकला. मानवाच्या अस्तित्वासंबंधीचा संघर्ष सतत सुरू आहे. त्यातून तो जो शिकतो त्यापेक्षा अधिक प्रभावीपणे तो सहकारातून स्वत:चा विकास घडवून आणतो. सहकारी चळवळ ही केवळ आर्थिक चळवळ नाही किंवा आर्थिक संस्थांमध्ये सुधारणा घडवून आणणे हे या चळवळीचे ध्येय नाही. सहकारी चळवळीचा पाया विस्तृत असा आहे. ज्यात सामाजिक, राजकीय आणि नैतिक अधिष्ठान आहे. सकारात्मक सहकार म्हणजे समान ध्येय साध्य करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे या बाबतीत आपण खेळाडूंचा गट, एकाच वर्गातील विद्यार्थ्यांचा गट, समान शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा गट, एकाच मंडळाचे सदस्य समान ध्येय प्राप्त करतात. त्यांच्या कार्याला सहकारी कार्य म्हणता येईल. ते एकमेकांना सहकार्य करतात म्हणून त्यास सहकार म्हणतात.[१] सहकार चळवळ ही आज एखाद्या देशापुरती मर्यादित राहिलेली नसून ती विश्वव्यापी चळवळ म्हणून मान्य झाली आहे. भांडवलशाही व साम्यवाद या परस्पर विरोधी अर्थ पद्धतीचा वापर करणाऱ्या राष्ट्रामध्ये सहकार चळवळ अस्तित्वात आहे. देशाच्या आर्थिक विकासात सहकार चळवळ अत्यावश्यक आहे. हे जवळजवळ सर्वच राष्ट्रांनी मान्य केले आहे. सहकार चळवळ ही जनतेची चळवळ आहे. सहकाराकडे पाहण्याचा दृष्टीकोन, सहकारातील मुलभूत तत्वे यात कालानुसार बदल होत गेला व त्यातून सहकाराचा विकास झाला.

### १) सहकार चळवळीचा उदय व विकास –

१८ व्या शतकात युरोप खंडात काही ग्राहक सहकारी संस्था अस्तित्वात आल्या होत्या. पुढे २० व्या शतकाच्या सुरूवातीला रॉबर्ट ओवेन यांच्या प्रचारामुळे ग्राहक सहकारी संस्था स्थापन झाल्या. इ.स. १८४४ मध्ये इंग्लड येथे रॉशडेलमध्ये पायोनियर सोसायटीची स्थापना झाली. तेव्हापासून या चळवळीस मूर्त स्वरूप प्राप्त झाले. ही सोसायटी विणकरांनी २८ पौंड भांडवल जमवून स्थापन केली होती. लोणी, कणीक,

साखर वगैरे मालाचे सहकारी दुकान काढले. पुढे या उदाहरणाचे बऱ्याच ठिकाणी अनुकरण करण्यात आले. चळवळीचा प्रसार झाला. त्यामुळे रॉबर्ट ओवेन यास सहकाराचा पिता संबोधण्यात येते.[२] सहकार चळवळीचा अर्थ जरी त्यावेळी माहित नसला तरी विणकर कामगारांनी स्थापन केलेले ग्राहक भांडार हे सहकार चळवळीच्या विकासातील मैलाचा दगड म्हणून संबोधण्यात येते.

इंग्लडमध्ये पहिली सहकारी संस्था निघाली. पुढे ही चळवळ फ्रान्स, डेन्मार्क, स्वित्सरलँड या राष्ट्रात पसरली. यावेळी इंग्रजांचे साम्राज्य भारतात होते. औद्योगिक क्रांतीचे साद–पडसाद इंग्लडच्या अर्थकारण व समाजकारणावर उमटले होते. कामगार हा यंत्रवत बनविला गेला. अनियंत्रित कामाचे वाटप, कमी मोबदला, कर्जबाजारीपणा, मालक वर्गाकडून होणारी पिळवणूक या सर्व परिस्थितीवर मात करण्यासाठी कामगार वर्गाने संघटीत होऊन परस्पराच्या सहकार्यातून आपले प्रश्न सोडविण्यासाठी रॉश्डेल ग्राहक भांडार स्थापन केले होते.[३]

युरोपातील सहकार चळवळीचा उदयही लोकांच्या सामाजिक परिस्थितीतून झाला. त्यावेळी म्हणजे १८४४ मध्ये अनौपचारिकरित्या इटलीतील आणि स्वित्झरलँडमधील लोक देखील सहकारी तत्वांचा उपयोग दुग्ध व्यवसायात करत होते.

जर्मनीमध्ये १८४७ मध्ये रॅफीसेन यांनी अशा संस्थेची स्थापना केली होती. रशियामध्ये देखील शेतकरी आणि ग्रामीण कारागीर एकत्र येऊन काम करीत. या संस्थेला आरटेल्स म्हणत असत. रॉशेडल आणि रॅफीसेन यांच्या प्रयत्नातून युरोपातील सहकारी चळवळ दोन विभागामध्ये उदयाला आली. १) ग्राहकांची शहरी दुकाने २) किरकोळ विक्रीची दुकाने सहकारी चळवळ यशस्वी करण्यासाठी आपली ध्येय साध्य करावी लागतात. दुसरे तत्व म्हणजे त्याचे कार्य कायद्यानुसार चालवावे लागते. तिसरे तत्व म्हणजे संस्थेशी निष्ठा आणि पाठींबा असावा लागतो. सहकार चळवळ जी अयशस्वी झाली. त्याला याच तत्वाकडे केलेली डोळेझाक कारणीभूत आहे असा इतिहास आहे. ग्राहक भांडार चालवित असताना ब्रिटनमध्ये खेड्यापर्यंत चळवळ पोहचली होती. आयर्लंड, स्वित्झरलँड, डेन्मार्क, हंगेरी या शेतीप्रधान देशातूनही चळवळ पोहचली होती. अनेक प्राथमिक सहकारी सहकारी संस्था उत्पादनाच्या क्षेत्रात कार्य करीत होत्या. बेकरी आणि दुग्ध व्यवसायात अग्रेसर होत्या.[४]

## २. भारतातील सहकार चळवळ –

जगातील इतर राष्ट्रांप्रमाणेच भारतात सहकारी चळवळीचा उगम, विकास हा दारिद्र्य, पिळवणूक, शोषण यातून झाला. ही चळवळ प्रामुख्याने भारताच्या ग्रामीण भागात उदयास आली.

महाभंयकर दुष्काळाच्या तडाख्याने शेतकऱ्यांच्या असंतोषाच्या स्फोट होऊन १९७६ च्या दरम्यान अहमदनगर, पुणे या भागातील शेतकऱ्यांनी बंड पुकारले. नंतर शासनाने १८७९ मध्ये डेक्कन ॲग्रीकल्चरलमध्ये जमीन सुधारणा कायदा, शेतकरी कर्जविषयक कायदा पास केला. शेतकऱ्यांना अल्प व दिर्घ मुदतीचे कर्ज तगाईच्या स्वरूपात उपलब्ध करून दिले. प्रत्यक्षात मात्र ही दिली जाणारी कर्जे कमी स्वरूपाची होती. त्यानंतर सर रेमंड वेस्ट यांनी १८८७ मध्ये ''टाईम्स ऑफ इंडिया'' या वर्तमान पत्रातून अग्रलेख लिहून सहकारी पद्धतीने कर्जपुरवठा प्रश्न सोडविण्यासाठी चळवळ सुरू करावी असे मत मांडले.[५] वारंवार पडणाऱ्या दुष्काळी परीस्थितीचा अभ्यास करण्यासाठी त्यावेळचे व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झनने १९०१ मध्ये फॅमीन कमिशन नेमले. या कमिशनने टंचाईग्रस्त भागाचा दौरा करून शिफारशी सुचविल्या. शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी सुधारीत बी–बीयाणे, अवजारे, कर्ज इ. सुविधा पुरविण्यासाठी सहकारी संस्था, सहकारी पतपेढ्या निर्माण केल्या पाहिजे. या देशात सहकारी संस्था निर्माण करून त्यांची निकोप वाढ झाली पाहिजे. तरच भरघोस यश प्राप्त होईल असे मत कमिशनने मांडले. या काळात भारतात विशेषतः महाराष्ट्रात सहकारी चळवळीची बीजे रोवली गेली असे म्हणता येईल.

फॅमिन कमिशनच्या शिफारशींचा विचार करण्यासाठी सर एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखाली कमिशन नेमले. [६] या कमिशनच्या ज्या विविध शिफारशी होत्या. त्यावर आधारित १९०४ चा हिंदुस्थान क्रेडीट सोसायटीचा कायदा पास करण्यात आला. कर्झन काळात सहकारी चळवळीस कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले. परंतु परकीय सत्ता, शासकीय अनास्था यामुळे या चळवळीचा म्हणावा तसा प्रचार झाला नाही. इ. स. १८९३ मध्ये मद्रास शासनाने फ्रेड्रीक निकल्सन नावाचा तज्ञ युरोपमध्ये पाठवून बँकाचा अभ्यास करण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकली होती. [७] विविध बँकाचा तुलनात्मक अभ्यास करून जर्मनीमधील रफायझन पद्धतीच्या अनियमित जबाबदारीच्या पतपेढ्या हिंदुस्थानमध्ये निर्माण कराव्यात असे आपल्या अहवालात त्यांनी सुचविले. पुढे याच निकल्सनच्या शिफारशीप्रमाणे फेमिन कमिशनच्या शिफारशी होत्या. ब्रिटीश कारकिर्दीत दुष्काळ हे वारंवार पडत होते. दुष्काळामुळे भारतीय शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होत असे. तो

असंतोष शमविण्यासाठी वेळोवेळी इंग्रजांनी थातुरमातूर इलाज म्हणून सहकारी चळवळीस उत्तेजन दिले. परंतु सहकारी चळवळ ही फक्त कर्ज देण्यापुरतीच मर्यादित होती. इंग्रजांच्या या संकुचित धोरणामुळे शेतकऱ्यांच्या समस्या सुटणे शक्य नव्हते. तरी सुद्धा सावकारशाहीच्या जाचातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी १९०८ ते १९२० या दरम्यान सहकारी सोसायट्या स्थापन झाल्या.

१९०४ च्या कायद्याची सुरूवात ही भारतीय सहकारी चळवळीची सुरूवात होती. एका अर्थाने हा कायदा शेतकरी, कारागीर व गरीब लोकांकरिता होता. कारण संस्थांना कायदेशीर संरक्षण नव्हते. त्यांना आर्थिक मदत देणारी मध्यवर्ती संस्था नव्हती. संस्थाचे ग्रामीण आणि शहरी असे वर्गीकरण जुलमी आणि अयोग्य होते. सन १९१२ पर्यंत हा कायदा लागू होता. इ. स. १९०४ चा कायदा अपूर्ण असल्याने तो लोकप्रिय होऊ शकला नाही. या अडचणीचा विचार करून इ. स. १९१२ मध्ये सहकार विषयक को-ऑपरेटीव्ह सोसायटी ॲक्ट नावाचा सुधारीत कायदा पास करण्यात आला व सहकारी चळवळीने दुसऱ्या टप्प्यात प्रवेश केला.[८] या कायद्यात 'क्रेडीट' हा शब्द वापरल्याने खरेदी विक्री संघ, सेंट्रल प्रोव्हिन्शियल बँका, गृहपुरवठा सोसायटी व सहकारी तत्वावर नियंत्रण ठेवणाऱ्या संस्थाना मान्यता मिळाली.

इ. स. १९१४ मध्ये मॅग्लेगन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. या कमिशनने आपल्या १९१५ साली सादर केलेल्या अहवालात सहकार चळवळीची भविष्यकालीन वाढ कशी केली जावी, याबाबत महत्वपूर्ण सूचना केल्या. त्यांनी त्रिस्तरीय पद्धतीचा पुरस्कार केला. पुढे १९१९ च्या चेम्स-माँटफर्ड कायद्यानुसार सहकार खाते प्रांतिक शासनाकडे सुपूर्त करून त्यासाठी स्वतंत्र खाते, स्वंतत्र नियम करण्याची परवानगी शासनास देण्यात आली. या सुधारणेस अनुसरून आपल्या प्रांतासाठी सहकारी सोसायटीचा कायदा १९२५ मध्ये पास करण्यात आला. ग्रामीण व शहरी सोसायटी असे वर्गीकरण बदलून नियमित व अनियमित जबाबदारीचे वर्गीकरण करण्यात आले.[९] इ.स. १९२८ मध्ये रॉयल कमिशन ऑफ ॲग्रीकल्चर नेमण्यात आले. शेती व सहकार यांचा अत्यंत जवळचा संबंध असल्यामुळे या कमिनशनने सहकाराबाबत अनेक महत्वाच्या सूचना केल्या. भन्साळी वे मेहता कमिशनने शेतकऱ्यांच्या वाढत्या कर्ज बाजारीपणावर उपाय सुचवितांना जमीनीची मालकी व फायदेशीरपणा यावर भर न देता कर्जदाराच्या पतेवर भर दिला पाहिजे असे मत व्यक्त केले. नियोजनाच्या आधारे सहकारी चळवळीस गती देण्याची व विकास घडवून आणण्याची संकल्पना पुढे येऊ लागली.

लोकशाही वातावरणात नियोजित आर्थिक कार्यक्रमाची सांगड साधण्यासाठी सहकार हे अनिवार्य साधन आहे असे प्रथम पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात नमूद करण्यात आले. सहकारी वाढ, विकास व दिशा योग्य आहे किंवा नाही याची पहाणी करण्यासाठी भारतीय ग्रामीण पतपुरवठा समिती १९५१, मेहता समिती १९६०, सहकारी ग्राहक समिती १९६१, दातावाला समिती १९६६, ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती १९६९, इ. समित्या नेमण्यात आल्या. अशा पद्धतीने भारतात सहकारी चळवळीचा विकास हा क्रमाक्रमाने घडून आला.

**३. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास –**

महाराष्ट्र हे राज्य सहकाराच्या क्षेत्रात प्रगत आहे. विशेषतः येथील सहकारी साखर कारखान्यांनी जे यश मिळवून पश्चिम महाराष्ट्राचा कायापालट केला तो वाखाणण्यासारखा आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला अनेक विद्वान आणि कर्तबगार व्यक्तींचे नेतृत्व लाभले. त्यामध्ये ना. गोखले, श्री. वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, श्री. सरैय्या, श्री विठ्ठलराव विखे पाटील, श्री. वसंतदादा पाटील इ. चा आवर्जुन उल्लेख करावा लागतो. आज महाराष्ट्रात पतपुरवठा, शेती, शेतमाल, खरेदी–विक्री औद्योगिक उत्पादन, ग्राहक भांडारे, गृहनिर्माण संस्था, दुग्ध व्यवसाय अशा अनेक क्षेत्रामध्ये ही चळवळ पसरली आहे.

इ.स. १९०४ च्या कायद्यानंतर प्रगतीची जबाबदारी ब्रिटीश सरकारने प्रांतीय सरकारकडे सोपविली. ३० जून १९०४ रोजी मुंबई प्रांतीय सरकारने एक वटहुकूम काढून राज्यातील अहमदाबाद, अहमदनगर, पुणे, धारवाड आणि सोलापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीला सुरूवात केली. सुरूवातीच्या काही वर्षात राज्यातील सहकारी चळवळीचा विस्तार प्रायोगिक तत्वावर होत गेला. मुंबई राज्यातील पहिली ग्रामीण सहकारी संस्था इ. स. १९०५ साली धारवाड जिल्ह्यात नोंदविली गेली. एक वर्षाच्या काळात राज्यात एकूण १२ सहकारी संस्था स्थापन झाल्या. यापैकी आठ संस्था धारवाड जिल्ह्यात होत्या. त्यानंतर अनेक वर्ष धारवाड जिल्हा मुंबई राज्यात अग्रेसर होता.[१०]

सुरूवातीच्या काळातील सहकार चळवळ सरकारच्या अधिपत्याखाली होती. या काळातील सहकारी चळवळीने प्रामुख्याने ग्रामीण भागास कर्ज पुरविण्यावर आपले लक्ष केंद्रित केले होते. सरकारी धोरणांवरच सहकारी चळवळीच्या विकास अवलंबून होता. जिल्हा पातळीवर सहकार निबंधकाला चळवळीचा विकास कार्यात राज्यात महसूल अधिकारी मदत करत असत. सहकाराच्या प्रसारासाठी आणि प्रशासकीय

सुधारणांसाठी या काळात प्रशिक्षित अधिकारी वर्गाची सोय नव्हती. त्यामुळे चळवळीचा वेग मंद राहिला. नंतरच्या काळात टप्प्या–टप्प्याने या क्षेत्रात अधिकारी वर्ग नेमण्यात आला होता. कर्ज वाटपासाठी आवश्यक असणारे भांडवल मिळविण्याच्या कामी चळवळ सरकारवर अवलंबून असे. इ. स. १९०८–१९०९ या काळात सहकार चळवळीचे एकूण चालू भांडवलापैकी बावीस टक्के भांडवल सरकारकडून मिळाले होते. परंतु नंतरच्या काळात सरकारचा सहभाग कमी–कमी होत गेला. इ. स. १९११–१२ च्या शेवटपर्यंत राज्यातील सहकारी संस्थांची संख्या ३६८ झाली होती.[११]

इ.स. १९१२ चा कायदा पास झाल्यानंतर महाराष्ट्र राज्यात सहकारी चळवळीने प्रगती साधली. पुढील आकडेवारीवरून त्याचे चित्र स्पष्ट होते.[१२]

| अ. नं. | संस्थांची स्थापना | सदस्य संख्या | चालू भांडवल (रू. लाखात ) |
|---|---|---|---|
| १ | १९१२–१३ | ५१५ | ४८.४८ |
| २ | १९१३–१४ | ६९८ | ६६.१३ |
| ३ | १९१४–१५ | ८१६ | ८१.१३ |
| ४ | १९१५–१६ | ९६३ | ९६.८१ |
| ५ | १९१६–१७ | १,३०७ | १२३.२१ |
| ६ | १९१७–१८ | १,६५० | १६२.८८ |
| ७ | १९१८–१९ | २,०८३ | १९९.४४ |

(Co-operative Movement in Bombay State - 1953)

महाराष्ट्रात इ. स. १९१२ ते इ.स. १९१९ या काळात सहकारी संस्थांची संख्या जवळजवळ चार पटीने वाढली. इ. स. १९१४ साली भारत सरकारने देशातील सहकारी चळवळीच्या विकासाचा आढावा घेण्यासाठी मॅकलॅगन समितीची नियुक्ती केली. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची संख्या आणि त्यांच्या गुणवत्तेत भरपूर वाढ झाली होती. या समितीने इ. स. १९१५ साली आपला अहवाल सादर केला. संबंधित अहवालात महाराष्ट्राच्या (मुंबई राज्याच्या) सहकार चळवळीची प्रशंसा करण्यात आल्याचे दिसून येते. इ.स. १९१८ पर्यंत मुंबई राज्यातील सहकार चळवळ वर्षात जास्त प्रगतीपथावर होती. त्याचप्रमाणे राज्यातील सहकारी चळवळीने जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला असाच इतिहास सापडतो.[१३]

इ.स. १९१९ साली आणखी एक सहकार विषयक कायदा पास करण्यात आला. या कायद्यानुसार सहकार चळवळीने नवीन पर्वात प्रवेश केला. कारण कायद्याने सहकारी चळवळ केंद्राकडून प्रांतीय सरकारच्या अखत्यारीत दिली गेली. या कायद्यानुसार प्रत्येक प्रांताला सहकार मंत्र्यांची नेमणूक करण्यात आली. परिणामी प्रत्येक प्रांताला सहकार चळवळीच्या विकासावर लक्ष देण्यासाठी त्यांना स्वायत्ता मिळाली होती. त्यामुळे महाराष्ट्रातील सहकार चळवळीने चांगलीच प्रगती केली होती. या काळात सहकारी संस्थांची संख्या, त्यांची सदस्य संख्या आणि सहकारी संस्थांच्या चालू भांडवलात भरीव प्रमाणात वाढ झाली. इ.स. १९२९-३० पर्यंत राज्यातील सहकारी चळवळीच्या विकासाचा वेग समाधानकारक होता. मात्र त्यानंतर सहकारी संस्थांच्या व्यवहारात झालेला गोंधळ, दिवाळखोरी आणि सहकारी चळवळीत काम करणाऱ्या काही लोकांनी केलेल्या अक्षम्य चुकांमुळे राज्यातील सहकारी चळवळीचा वेग मंदावला. इ. स. १९२९ साली जागतिक महामंदीला सुरूवात झाली. राज्यातील सहकारी चळवळही त्यापासून अलिप्त राहू शकली नाही. जागतिक महामंदी आणि त्याबरोबर भारतात सुरू झालेली देशव्यापी कायदेभंगाची चळवळ या घटनांचा परिणाम राज्याच्या सहकार चळवळीवर निश्चितपणे झाला. सहकार चळवळीने प्रगती करण्याऐवजी चळवळीचा टिकाव कसा लागेल हा मुख्य प्रश्न होता. त्याचप्रमाणे मंदीच्या काळात अनेक सहकारी संस्था दिवाळखोरीत गेल्यामुळे त्यांची पुनर्रउभारणी करणे हा राज्यांसमोरील महत्वाचा प्रश्न होता.

इ.स. १९३३-३४ च्या दरम्यान राज्याची सहकार चळवळ प्रमुख वळणावर उभी असताना, दिनांक ३ जून १९३३ रोजी सहकार रोजी सहकार विषयक गोलमेज परिषद भरली. या गोलमेज परिषदेमुळे सहकार चळवळीत काम करणारे अधिकारी आणि कार्यकर्ते एकत्र येऊ लागले. परिषदेतील सूचनेनुसार के. एल. पंजाबी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीने केलेल्या सूचनेनुसार राज्यातील सहकारी चळवळ भक्कम आर्थिक पायांवर उभी करण्यासाठी दहा भू-तारण बँकांची स्थापना करण्यात आली. या सर्व संस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मुंबई येथे राज्यातील सर्वोच्च सहकारी बँकेची (शिखर बँक) स्थापना झाली. त्यामुळे नंतरच्या काळात राज्यातील सहकारी चळवळीने पुन्हा एकदा वेग प्राप्त केला.[१४]

सहकाराच्या यशस्वी वाटचालीसाठी व्यवस्थित प्रशासन आणि शिक्षणाची आवश्यकता होती. प्रशासनामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि लोकशाही

तत्वावर सहकार चळवळ भक्कम उभी करून तिचा विस्तार करण्यासाठी, राज्य सरकारने वेळोवेळी अनेक प्रयत्न केले. या प्रयत्नांमध्ये प्रामुख्याने वेगवेगळ्या ठिकाणी अधिवेशने भरविणे, चर्चासत्र आयोजित करणे इ. चा समावेश होता. कायमस्वरूपी सहकारी शिक्षणाचे काम चालू राहण्यासाठी मुंबई राज्यात इ. स. १९१८ साली सहकारी शिक्षण देणारी को–ऑपरेटीव्ह इन्स्टिट्युट स्थापन करण्यात आली होती. तसेच सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अधिकारी वर्गात परस्पर संबंध स्थापन करण्यासाठी जिल्हा सहकारी बोर्डांची स्थापना करण्यात आली. इ. स. १९३६ साली बंद करण्यात आलेल्या सहकारी शिक्षण देणाऱ्या संस्था इ.स. १९४४ मध्ये पुन्हा सुरू करण्यात आल्या. इ.स. १९४६ साली काँग्रेस मत्रिमंडळाने निर्णय घेऊन मुंबई राज्यातील सहकार विषयक शिक्षणाला गती देण्यासाठी जे. ए. मदन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने केलेल्या सूचनेनुसार जिल्हा विभाग आणि राज्य पातळीवर सहकार विषयक शिक्षण देणाऱ्या आणि संशोधन करणाऱ्या संस्था स्थापन करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी सहकारी संस्थांच्या सचिवांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्था उभारण्यात आल्या. त्याचप्रमाणे मुंबई राज्यात विभागीय पातळीवर पुणे, सुरत आणि धारवाड येथे सहकार शिक्षण संस्थांची स्थापना करण्यात आली. या संस्थांकडून सहकारातील कार्यकर्ते आणि अधिकारी वर्गाच्या प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती. सरकारच्या सहकारी खात्यातील अधिकारी आणि सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी पुणे येथे 'को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज' स्थापन करण्यात आले होते. या कॉलेजची स्थापना ही फक्त मुंबई राज्याच्या दृष्टीने नव्हे तर अखिल भारतीय सहकारी इतिहासातील महत्वपूर्ण घटना मानली जाते.[१५]

## ४. अहमदनगर जिल्ह्याची सहकारी चळवळ

अहमदनगर जिल्ह्याची सहकारी चळवळ अभ्यासण्यापूर्वी या जिल्ह्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक अशा तिनही कालखंडाचा थोडक्यात आढावा घेणे अत्यंत गरजेचे आहे. अहमदनगर जिल्ह्यात विविध ठिकाणी झालेल्या उत्खननातून, अवशेषांतून तसेच इतर ऐतिहासिक साधनांच्या अभ्यासतून तिनही कालखंडावर प्रकाश टाकता येतो.

### ४.१ अहमदनगर जिल्ह्याचा प्राचीन इतिहास –

अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा येथे केलेल्या पुरात्व उत्खननात सापडलेल्या अवशेषांवरून पहिला मानव उत्तरेला अकोला तालुक्यापासून तर पूर्वेला

नेवासा तालुक्यापर्यंत प्रवरा व गोदावरी नदी काठी वास्तव्यास असला पाहिजे असा अंदाज पुणे येथील डेक्कन कॉलेज या संशोधन प्रबोधिनीने लावला आहे. त्याने जीवनाचा मार्ग म्हणून करावा लागणाऱ्या शिकारीसाठी दगडी हत्यारांचा वापर केल्याचे दिसून येते. अहमदनगर जिल्ह्यात अतिप्राचिन काळी दगडी हत्यांराचा वापर करण्याचा कालखंड इ.स. पू. २५,००० वर्षांचा नोंदला गेला आहे. या कालखंडाचा संदर्भ सुद्धा प्रवराकाठीच जोडला जातो. या काळात मानव शिकारीवर उदरनिर्वाह करताना दिसतो. या काळात शिकारीसाठी वापरली जाणारी साधने मात्र सुधारलेली दिसतात. या काळात येथील मानवाने शिकारीसाठी धनुष्य आणि बाणांचा त्याचप्रमाणे टोकदार दगडी हत्यांराचा वापर केल्याचा अंदाज आहे. इ. स. पू. ५०० ते १५०० वर्षे या काळातील मानव प्रवरा गोदावरीच्या खोऱ्यात आपली उपजिवीका करण्यासाठी शिकारीची साधने म्हणून पूर्वीपेक्षा सुधारित साधनांचा वापर करत होता.[१६]

हत्यारांसाठी वालुकाश्म दगडांचा वापर केल्याचे दिसून येते. अन्नासाठी प्रामुख्याने मोठ्या प्राण्यांचे मांस, डुकरांचे मांस आणि मासे यांना महत्व होते. शिकार करणे आणि प्राणी पाळणे हे प्रवरा तीरावरच्या लोकांचे प्रमुख व्यवसाय होते. मृत माणसाचे शरीर घरातच किंवा घराबाहेर जवळच पुरण्याची प्रथा होती. मृत पावलेल्या लहान मुलांना शरीराभोवती काही आवरण ठेवून पुरण्याची प्रथा होती. तर मोठ्या माणसांना पुरतांना त्यांच्या गुडघ्यावर झाकण म्हणून वाटीसदृश्य भांड्यांचा वापर केल्याचे दिसून येते. मृत माणसाला पुरताना त्याच्याबरोबर काही भांडी व गळयात घालण्याचे दागिने ठेवल्याचे सुद्धा उत्खननात दिसून आले.[१७] छोट्या छोट्या खेड्यांमधून नदी काठावर राहणारे हे लोक आर्थिक दृष्ट्या गुराखी. शिकारी किंवा शेती व्यवसाय करत असावेत. धातूंचा वापर अत्यंत कमी असून दगडांचा वापर बहुतेक कामांसाठी केल्याचे दिसून येते. लोखंडाची ओळख पटेपर्यंत अशाच प्रकारचे जीवन या लोकांनी जगल्याचे दिसून येते. इ. स. पूर्व साधारणपणे ४०० वर्षापूर्वी या लोकांना लोखंडाची ओळख झाली. तेव्हापासून अनेक कामासाठी त्याचा वापर सुरू झाला.[१८]

हे लोक कोणत्या वंशाचे असावेत हे निश्चित माहित नाही. परंतु या बाबत एक शक्यता वर्तविली जाते. ती म्हणजे हे बहुधा एखाद्या आर्यवंशीय आदिवासी जमातीपैकी असले पाहिजेत. परंतु ते सिद्ध करण्यासाठी अद्यापपर्यंत इतिहासात सबळ पुरावा मिळालेला नाही.[१९] सदरची सर्व निरिक्षणे नाशिक, जोर्वे आणि नेवासा येथे

झालेल्या उत्खननावर आधारीत आहेत. पुरात्व शास्त्रज्ञांच्या मतानूसार हा कालखंड साधारणपणे इ.स. पू. ५०० ते इ.स.पू. १५०० हा आहे.

**४.२ अहमदनगर जिल्ह्याचा मध्ययुगीन इतिहास –**

साधारणपणे इ. स. १४८५ च्या दरम्यान अहमदनगर जिल्हा बहामणी साम्राज्याला जोडण्यात आला. त्याचे व्यवस्थापन निजा–उल–मुल्क बहारीचा मुलगा मालिक अहमदकडे सोपविण्यात आले. याच मालिक अहमदने पुढे इ. स. १९४० साली अहमदनगर येथे निजामशाहीची स्थापना केली. अहमदनगरच्या निजामशाहीचा कालखंड इ. स. १४९० ते इ.स. १६३६ असा इतिहास नोंदला गेला आहे.[२०] इ.स. १६५९ साली झालेल्या तालिकोटच्या लढाईत विजयनगरच्या हिंदू साम्राज्याचा अस्त झाला. हे साम्राज्य बुडविण्याच्या कामी अहमदनगरच्या निजामशाहीने नेतृत्व केले होते. इ.स. १५५६ साली मोगलांची वक्रदृष्टी अहमदनगरच्या निजामशाहीवर गेली. संपूर्ण भारताचे सम्राटपद मिळविण्यासाठी दक्षिणेचे प्रवेशद्वार ठरलेल्या अहमदनगरच्या निजामशाहीच्या पाडाव करणे अकबर बादशहाला आवश्यक वाटले होते. इ.स. १५५६ मध्ये अकबराने आपला मुलगा दाणी यास अहमदनगर जिंकण्यासाठी पाठविले होते. चांदबीबीच्या प्रखर विरोधापुढे त्याचा निभाव लागू शकला नाही. त्यानंतर मध्यंतरीच्या काळात मोगलांनी अहमदनगरचा पाडाव केला. त्यांनी भुईकोट किल्ल्याचा ताबा घेतला. इ. स. १६०९ पर्यंत या किल्ल्याचा ताबा मोंगलाकडेच राहीला होता. पुढे नंतरच्या काळात मालिक अंबर नावाचा एक कतृत्वान प्रधान निजामशाहीला लाभला. त्याने अनेक मराठा सरदारांना हाताशी धरून निजामशाहीचा कारभार चांगल्या रितीने पाहण्याचा प्रयत्न केला.[२१] अहमदनगर शहरातील आताचा नवीपेठ या नावाने ओळखला जाणारा भाग शहाजीच्या निवासस्थानाचा होता. निजामशाहीतील मराठा सरदारांच्या नावाची यादी भरपूर मोठी सापडते. या यादीत शहाजी, शरीफजी, खेलोजी, मालोजी, हंबीरराव चव्हाण, मुधोजी फलटणकर, निशाह, बल्लाळ, त्रिपदे, विठोजी काटे, दत्ताजी नागनाथ, नरसिंह पिंगळे, सुंदर जगदेव इ. चा उल्लेख सापडतो. शहाजीने आपल्या कारकीर्दीत अहमदनगर जिल्ह्यातील बालेश्वर घाटाचा आधार घेऊन गनिमी काव्याने अहमदनगरची निजामशाही वाचविण्याचे आटोकाट प्रयत्न केले. परंतु दुर्दैवाने या कामात शहाजीला यश येऊ शकले नाही.[२२]

इ.स. १६३६ मध्ये जिंकलेल्या साम्राज्यात शांततेने कारभार करण्यासाठी शहाजानने अहमदनगर आणि खानदेश या दोन राज्यांचे विलीनीकरण करून औरंगजेबला दक्षिणेच्या प्रमुखपदी नेमले. आदर्श महसूल पद्धतीचा सुत्रधार तोरडमल हा अहमदनगरचा होता. इ.

स. १६५० साली छ. शिवाजीने आपल्या वडीलांची जहागिरी असलेल्या अहमदनगरच्या सरदेशमुखीचा हक्क मागितला. परंतु शिवरायांचा आग्रा दरबारी असणारा वकील या संदर्भात कमी पडला. पुढे इ.स. १६५३ साली पुन्हा एकदा दख्खणचा सुभेदार म्हणून औरंगजेबाची नेमणूक झाली.[२३]

पुरंदरच्या तहानंतर दिनांक ५ मार्च १९६६ रोजी छ. शिवरायांनी आग्रयाला भेट देण्यासाठी राजगड सोडला. त्यावेळेस त्यांनी अहमदनगर जिल्हयातून प्रवास करून औरंगाबादमार्गे दोन महिन्यांचा प्रवास करून आग्रा सोडले.[२४]

छ. संभाजी महाराजांचाही मोगलांशी अहमदनगर येथे संबंध आला होता. अहमदनगर येथे मोगलांचे ठाणे व एक भुईकोट किल्ला होता. संभाजीने गादीवर आल्यापासून या किल्ल्यावर सतत हल्ले केले. नोव्हेंबर १६८१ मध्ये अहमदनगरच्या लुटीसाठी संभाजीने पंचवीस हजार प्यादे रवाना केले होते. नंतर हुलकावणी देत ते विजापूरकडे सरकले. सरदारांच्या बदल्या आणि अधिक कुमक पुरवून सुद्धा मराठे मागे हटत नाही हे पाहून औरंगजेबने पुढे नोव्हेंबर १६८३ मध्ये आपली स्वत:ची छावणी अहमदनगर येथे हलविली. जेव्हा गोवळकोंड्याच्या विरोधात औरंगजेबाची मोहिम सुरू होती. तेव्हा संभाजी पन्हाळगडावरून आपल्या सैन्याला सूचना देत होते. याच दरम्यान इ.स. १६८५ मध्ये संभाजीच्या सैन्याने अहमदनगरची भरसाठ लुट केली.[२५]

इ.स. १७०६ मध्ये मोगलांचे सैन्य सिंहगडावरून अहमदनगरकडे येत असताना मराठ्यांनी त्यांच्यावर प्रखर हल्ला चढविला. त्यात मोगलांचा दारूण पराभव झाला. तेव्हा औरंगजेब अहमदनगर येथे होता. औरंगजेबाला त्याच्या आयुष्याची शेवटची चाहूल लागली होती. ज्या औरंगजेबाने २१ वर्षे मराठेशाहीच्या विनाशासाठी दक्षिणेत घालविली तो अहमदनगर येथे म्हणाला, ''मी माझे कार्य संपविले आहे, माझा पृथ्वीवरील शेवटचा प्रवास आता संपला'' हताश झालेला औरंगजेब दिनांक २० फेब्रुवारी १७०७ रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी अहमदनगर येथे मरण पावला.[२६]

नंतरच्या काळात निजाम आणि मराठ्यांच्या संघर्षामध्ये अहमदनगर परिसर सातत्याने केंद्रस्थानी राहिल्याचा इतिहास आपल्याला सापडतो. मराठ्यांनी पालखेडच्या लढाईत निजामांचा पराभव केला होता. दिनांक १० मार्च १७२८ रोजी मुंगी-पैठण परगण्यातील शेवगांव येथे मराठा-निजाम तहाच्या कागदांवर सह्या झाल्या. या तहानुसार दक्षिण परगण्याच्या चौथाई सरदेशमुखीचा हक्क शाहू महाराजांना बहाल करण्यात आला.[२७] अशा रितीने अहमदनगर जिल्हा नंतरच्या काळात सुद्धा अत्यंत महत्वाचे ठिकाण

म्हणून गणला गेला. ब्रिटीशांनी इ. स. १८०३ नंतरच्या काळात उत्तर भारतात ज्या मोहिमा आखल्या त्यासाठी अहमदनगरचा किल्ला त्यांना उपयुक्त ठरल्याचे दिसून येते.

### ४.३ अहमदनगर जिल्ह्याचा आधुनिक इतिहास –

इ. स. १८१८ साली अहमदनगर जिल्ह्याची स्थापना झाली. इ.स. १८१८ सालापासून अहमदनगर जिल्ह्याचा आधुनिक इतिहास अभ्यासला जातो. इ.स. १८६९ याच वर्षी सध्याचे नाशिक आणि सोलापूर जिल्ह्यांचे काही भाग वगळून नगर जिल्ह्याची पुनर्निर्मिती करण्यात आली. पहिला कलेक्टर म्हणून हेन्री पॉटिंजर यांची नेमणूक झाली.[२८] इ.स. १८१८ साली स्थापन झालेला नगर जिल्हा उत्तरेला नाशिक जिल्ह्यातील वणीपर्यंत तर दक्षिणेला सोलापूर जिल्ह्यातील बार्शी–करमाळ्यापर्यंत विस्तारलेला होता. ब्रिटीश राज्य आल्यानंतर शांतता प्रस्थापित झाली. अनेक सैनिक हंगामी म्हणून काम करत होते असे सैनिक बेकार झाले. परकीय आयात मालामुळे स्थानिक उद्योगधंद बुडाले. व्यवसाय डबघाईस आले. रोजगाराची साधने नष्ट झाल्याने शेतीवरील ताण वाढला. सर्वांनी परंपरागत शेतीवर हक्क सांगायला सुरूवात केली. यातून कोर्ट कज्जे वाढले. सावकार, वकील, दलाल, जमीनदार, व्यापाऱ्यांचा नवीन मध्यम वर्ग दक्षिणेत स्थलांतरीत झाला. त्यापैकी बऱ्याच लोकांनी अहमदनगरचा आधार घेतला. तेथे त्यांनी व्यापारी आणि सावकारी व्यवसाय सुरू केले. नगर जिल्ह्यातील मारवाड्यांनी इ.स. १९२० नंतरच्या गांधीजींच्या  स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्याचा इतिहास आहे. १९ व्या शतकात येथे तर काही मध्यम वर्ग उदयास आला. तो म्हणजे ब्राम्हण जातीतील वकील वर्ग, मध्यमवर्गीयांनी कारकूनी व्यवसाय स्वीकारला.[२९] सततचा दुष्काळ आणि पर्जन्य छायेचा प्रदेश असलेल्या अहमदनगर जिल्ह्यात गरीबांची वाणवा नव्हती. याचा फायदा समाज सेवेच्या माध्यमातून धर्मप्रसारकांनी उठविला. जिल्ह्यातील ख्रिस्ती मिशनऱ्यांनी इ. स. १८४२ मध्ये ''ज्ञानोदय'' ची स्थापना केली. नगर शहरात एक मिशनरी शाळा सुरू केली. इ. स. १८४२ साली रामकृष्ण मोडक या चित्पावन ब्राम्हणाने ख्रिश्चन धर्म स्वीकारला. यानंतर डॉ. हिवाळे, गद्रे, ना. वा. टिळक या लोकांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. याच दरम्यान नगर तालुक्यातील अकोळनेर येथील रामजी भोर या मराठा कुटुंबाने तर शेख दाऊद या आणखी एका मुस्लीम कुटुंबाने ख्रिश्चन धर्मात प्रवेश केला. वरच्या जातीच्या लोकांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केल्यानंतर त्या काळात बरेच वादंग निर्माण झाले होते.[३०]

इ.स. १९२० नंतरचा अहमदनगर जिल्ह्याचा कालखंड असहकार चळवळीकरीता गाजल्याचा इतिहास आहे. या चळवळीमध्ये प्रामुख्याने मुकुंदराव पाटील, सरदार थोरात आणि रावबहादूर नवले यांचा पुढाकार होता. १९४२ ची चलेजाव चळवळ सुद्धा अहमदनगर मध्ये जोरात झाली. इ.स. १९३० ते इ.स. १९४७ हा कालखंड अहमदनगरमधील पटवर्धन बंधूंच्या स्वातंत्र्य चळवळीसाठी प्रसिद्ध आहे. शेवगांवचे बाळासाहेब भारदे यांनी महात्मा गांधीजींची सत्याग्रह चळवळ चालवून पुढे काँग्रेस पक्षात प्रवेश केला. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस पक्षाची सत्ता आल्यानंतर अनेक वेळा त्यांनी मंत्रीपद आणि नंतरच्यास काळात महाराष्ट्राच्या विधानसभेचे सभापतीपद सुद्धा भुषविले आहे.

अहमदनगर क्षेत्रातील संत साहित्याची सुरूवात आपल्याला नेवाशातील ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या १२ व्या शतकातील ज्ञानेश्वरीपासून करावी लागेल. याबाबतीत नाथपंथीयांचा उल्लेख टाळता येणार नाही. यात आपल्याला वृद्धेश्वर, तिसगांवचे दिनकर स्वामी, संगमनेरचे अनंत फंदी, पारनेरचे निळोबाराय, श्रीगोंद्याचे शेख महमद, ताराहाबादचे महिपतबुवा आणि नगरचे दासगणू इ. चा नम्रपणे उल्लेख करावा लागतो. आधुनिक इतिहासात आपले वेगळे स्थान निर्माण करणारा अहमदनगर जिल्हा साहित्य चळवळीत मागे रहाणे शक्यच नव्हते. १९ व्या शतकाच्या शेवटापर्यंत भारद्वाज या टोपन नावाने शिवराज भारदे यांनी ज्ञानेश्वरांनी लिहिलेली लेखमाला आणि त्यांची भावार्थदिपीका गाजत होती. २० व्या शतकाच्या सुरूवातीचा काळ कवी दत्त आणि ना. वा. टिळक या लेखकांचा समजला जातो. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झालेले वि. दा. घाटे हे याच जिल्ह्यातील घोसपुरी या गावचे होते.

### ५ अहमदनगर जिल्ह्याच्या सहकारी चळवळीचा उदय आणि विकास

ब्रिटीश काळात अहमदनगर जिल्ह्याचा विस्तार उत्तरेला नाशिक जिल्ह्यातील वणी तालुक्यापर्यंत आणि दक्षिणेला सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यापर्यंत होता. नंतरच्या काळात जिल्ह्याची पुनर्रचना झाल्याने यामध्ये बदल झाला. अहमदनगर जिल्ह्याच्या पूर्वेस औरंगाबाद जिल्हा पश्चिमेस ठाणे जिल्हा, उत्तरेला नाशिक जिल्हा, तर दक्षिण-पूर्वेस बीड जिल्हा आहे. अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिणेला सोलापूर जिल्हा असून पश्चिमेची सीमा ठाणे व पुणे जिल्ह्याला लागून आहे. या जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १७,०४८ चौरस किलोमीटर असून महाराष्ट्रात क्षेत्रफळाच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर आहे. इ.स. १९९१ च्या जनगणनेनुसार अहमदनगर जिल्ह्याची

लोकसंख्या सत्तावीस लक्ष एवढी होती. लोकसंख्येनुसार इ.स. १९९१ साली अहमदनगर जिल्हा महाराष्ट्र राज्यात पाचव्या क्रमांकावर होता.[३१]

अहमदनगर जिल्ह्यात सहकारी चळवळीचे साद पडसाद उमटले गेले. अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीची परंपरा तशी जुनीच आहे. इ.स. १९०४ पूर्वीच अहमदनगर जिल्ह्यातील कष्टाळू शेतकऱ्यांनी स्वतः होऊनच सहकाराचा स्वीकार केला आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी समजली जाते. या भूमीत अनेक साधुसंत होऊन गेले. महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' असा महामंत्र संतांनी दिला होता. 'सहकार : सह अधिक कार' सह म्हणजे मिळून आणि कार म्हणजे कार्य एकापेक्षा अनेक मना-माणसांनी मिळून केलेले उद्धाराचे, विधायक कार्य, एकमेकांना हातजोड देत, सहकार्य करत अवघ्यांनी सुपंथ धरण्याचे ज्ञानोबा, तुकोबांचे, राजा शिवाजींच्या विचारांची वाट विचारात जाणारे कार्य.[३२]

सहकार ही एक जीवनपद्धती म्हणून भारतीय संस्कृतीत यांचा फार पुरातन काळापासून वापर झाला आहे. आपल्या संस्कृतीत सहकार, सहजीवन, सहकार्य, सामुहिक जीवन या सगळ्या गोष्टींना फारच महत्व आहे. कुटुंब, गोत्र, जात, जमात अशा वेगवेगळ्याप्रकारे मानवी समुहाने एकत्रित जीवन जगण्याचा मार्ग म्हणजे सहकार या तत्वाला अनुसरून कोपरगांव, राहुरी व श्रीरामपूर परिसरात शेतकरी फड पद्धतीने ऊसाची पिके काढीत होते. ही फड पद्धत म्हणजेच ऊसाची सहकारी शेती होते. कोणाची जमीन असते. कोणाचे बैल असतात. कोणी नुसतेच कष्ट मशागत करतो व येईल ते उत्पन्न हिस्से पद्धतीने वाटून घेत असत. या फड पद्धतीत लिखित नियम नाही. सर्व काही रूढीला अनुसरून परस्परांच्या विश्वासाने चालते हीच पद्धत सहकारी चळवळीचा पाया बनत गेला. भिशी ही एक सहकाराची वैशिष्टयपूर्ण पद्धत आहे. भिशीचा उद्देश लोकांना सक्तीची बचत करायला लावणे आणि गरजू लोकांना हमीवर वाजवी व्याज देऊन धनाचा पुरवठा करणे. हे भिशीचे सभासद आपल्या मिळकतीचा काही भाग म्हणून भिशीला देतात. दर तीन वर्षांनी किंवा पाच वर्षांनी ठेव ज्याची त्याला व्याजासह परत करतात. अशा सामुहिक संस्था खेड्यापाड्यातून अनेक वर्ष काम करीत होत्या. या संस्थांना लिखीत नियम नव्हते. त्या लोकांनी नियुक्त केलेल्या पंचांकडून रूढीप्रमाणे विश्वासाने चालविल्या जात असत. सहकाराचा जरी अर्थ माहित नसला तरी त्या पद्धतीने कार्य चालू होते. इ.स. १९२१ मध्ये डॉ. मॅन यांनी अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यात सहकारी शेतीचा प्रयोग केला होता. दिनांक १ ऑक्टोबर १९१० मध्ये कर्जत तालुक्यात पहिली सहकारी

पतपेढी स्थापन झाली होती.[३३] नंतर श्रीरामपूर तालुक्यात सहकारी चळवळीस चांगले बाळसे प्राप्त झाले. त्या खालोखाल कोपरगांव तालुक्यातही सहकारी चळवळीने चांगलाच जोर धरला.

सहकारी चळवळीच्या संदर्भात अहमदनगर जिल्हयाने इतिहासात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. आशिया खंडातील सहकारी साखर कारखानदारीचा पाया नगर जिल्हयात घातला गेला. इ.स. १९४९ मध्ये पुणे येथील गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या सहकार्याने श्रीरामपूर तालुक्यात प्रवरानगर येथे सहकारी तत्वावर साखर कारखाना उभारला. त्यानंतर नगर जिल्हयामध्ये सहकारी साखर कारखानादारीचे जाळे उभे राहिले. गेली पन्नास वर्षांपेक्षा जास्त काळ सहकारी साखर कारखानदारी कार्यक्षमतेने दिसून येते. सहकाराचे मॉडेल म्हणून अहमदनगर जिल्हा नावाजला गेला आहे. या जिल्हयामध्ये ऐतिहासिक वैशिष्टये देखील मोठ्याप्रमाणात असून, आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त धार्मिक देवस्थाने म्हणूनही या जिल्हयाची सर्वत्र ओळख आहे. तर दुसऱ्या बाजूला सहकाराच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या साखर कारखानदारीचे आगार म्हणूनही या जिल्हयाची राज्यातच नव्हे तर देश-विदेशातही ओळख आहे. सहकारात जे काही उल्लेखनीय काम केले ते अहमदनगर जिल्हयाने. मॉडेल म्हणूनही राज्या-राज्यातील, देश विदेशातील प्रतिनिधी या जिल्हयाचा अभ्यास करताना आपल्याला नेहमी दिसतात. भाऊसाहेब थोररत, बाळासाहेब विखे पाटील, शंकरराव काळे अशी सहकारात काम करणारी एक पिढी अहमदनगर जिल्हयात निर्माण झाली.[३४]

सहकारी साखर कारखानदारी हा घटक अहमदनगर जिल्हयाच्या संदर्भात प्रकर्षाने समोर येत असला तरी सुद्धा चळवळ फक्त साखर कारखान्यांपूर्ती मर्यादित राहीली नसल्याचे दिसून येते. कारण इतर अनेक क्षेत्रात सहकाराच्या माध्यमातून नगर जिल्हयात काम झाल्याचा इतिहास आहे.

### १) सहकारी शेती -

जमीनीचे अत्यंत छोटे आकारमान, विभाजन व तुकडीकरण होत गेल्यामुळे शेतीचा किफायतशीरपणा घटत गेला. कारण छोट्या आकारमानाच्या जमीनीवर आधुनिक यंत्रांचा आणि पाणी पुरवठ्याच्या साधनांचा वापर करणे शक्य नव्हते. त्यासाठी जिल्हयातील लोकांना सहकारी शेतीचा मार्ग सापडल्याचे दिसून येते. आधुनिक पद्धतीच्या शेतीसाठी जिल्हयातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन कृषी सहकारी संस्था स्थापन केल्याचा

इतिहास सापडतो. सहकारी शेतीमध्ये सर्व शेतकरी आपली छोटी–छोटी धारण क्षेत्रे एकत्र करून शेतीचे व्यवस्थापन करीत असे. अशा प्रकारच्या शेती व्यवस्थेमुळे लोकांना कर्ज मिळणे, आधुनिक साधनांचा वापर करणे व जास्त उत्पादन घेणे शक्य झाले. त्यामुळे लोकांना शेतीचा एक चांगला मार्ग सापडला.

अशा प्रकारच्या सहकारी कृषी संस्था साधारणपणे स्वातंत्र्याच्या सुरूवातीच्या काही वर्षामध्ये अस्तित्वात असल्याच्या नोंदी इतिहासात सापडतात. भारताच्या इतर प्रांतामध्ये सुद्धा सहकारी शेतीचे प्रयोग झाल्याचा इतिहास सापडतो. परंतु नगर जिल्ह्याइतके यश मात्र मिळू शकले नाही. त्यामुळे अशा सहकारी संस्था इतर प्रांतांमध्ये दिर्घकाळ टिकाव धरू शकल्या नाही. इ.स. १९६८–६९ साली नगर जिल्ह्यात एकूण १८ सहकारी शेती संस्था अस्तित्वात होत्या. त्यांचे भाग–भांडवल, सभासद संख्या, कर्ज वाटप इ. चा इतिहास पाहिला तर आपल्याला उल्लेखनीय प्रगती केल्याच्या नोंदी सापडतात. सहकारी कृषी संस्थांशिवाय इ. स. १९६८–६९ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात दहा सहकारी पाणीपुरवठा संस्था सुद्धा अस्तित्वात असल्याचा इतिहास सापडतो. अशा पाणीपुरवठा संस्थांच्या कार्याबाबत सविस्तरपणे माहिती उपलब्ध होते. कोपरगांव, राहुरी व श्रीरामपूर परिसरात शेतकरी फड पद्धतीने ऊसाची पिके काढीत होते. ही फड पद्धत म्हणजेच ऊसाची सहकारी शेती होय.[३५]

### २) प्राथमिक सहकारी कृषी वित्त संस्था –

सुरूवातीपासून या संस्थांचा उल्लेख सहकारी सोसायटी असाच केला जातो. इ. स. १९६७–६८ साली जिल्ह्यातील एकूण प्राथमिक सहकारी संस्थांची संख्या १०८१ एवढी होती. तर इ.स. १९७१–७२ पर्यंत ही संख्या १०९० पर्यंत वाढल्याची नोंद सापडते. या संस्थामार्फत अल्प, मध्यम आणि दिर्घ मुदतीच्या कर्जाचे वितरण झाल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांना विकास कामासाठी आवश्यक असणारी साधने खरेदी करणे असाच या कर्जाचा उद्देश होता. सुरूवातीपासून या संस्था भांडवलासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर अवलंबून असल्याचा इतिहास आहे.

### ३) सहकारी पाणी पुरवठा संस्था –

अहमदनगर जिल्ह्यात इ. स. १९६८–६९ साली अस्तित्वात असलेल्या १० सहकारी पाणीपुरवठा संस्थांची एकूण सभासद संख्या ७१६, तर त्यांचे भाग भांडवल १,६५,३१० रू. एवढे असल्याची नोंद सापडते. या संस्थांकडे असणारा राखीव निधी सुद्धा पर्याप्त होता. तर त्यांना सरकारकडून मिळालेली एकूण कर्ज रू. ३,०६,०४३ एवढी होती.

सरकारने या संस्थांना रू. १,७९,२४९ एवढे अनुदान देऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या भारतासारख्या देशामध्ये आर्थिक विकासाबरोबर सामाजिक बदल घडवून आणणे सुद्धा अत्यंत महत्वाचे होते. यासाठी लोकांचा सर्व समावेशक विकास होणे सुद्धा आवश्यक होते. अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीने समाज विकासाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये काम करून जिल्ह्याच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय इतिहासात आपले स्थान निर्माण केल्याचे मान्य करावे लागेल. सहकारी शेती उत्पादन, विपणन, साखर उद्योग, बँकींग, वितरण व्यवस्था इ. क्षेत्रात जिल्ह्याच्या सहकारी चळवळीने प्रामाणिक कार्य केल्याचा इतिहास आहे.

**४) कृषी सहकारी संस्था –**

अहमदनगर जिल्ह्यात सहकारी चळवळीची खरी सुरूवात इ. स. १९०९ साली झाली. सन १९०९ ते १९४७ पर्यंत जिल्ह्यात सहकार चळवळीने बरीच प्रगती केली होती. स्वातंत्र्याच्या सुरूवातीच्या काळातच कृषी सहकारी संस्थांची निर्मिती होऊन त्या यशस्वी झाल्याचे दिसून येते.[३५] इ.स. १९६८–६९ साली अहमदनगर जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या कृषी सहकारी संस्थांची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | प्रकार | एकूण संख्या |
|---|---|---|
| १) | एकूण कृषी सहकारी संख्या | १८ |
| २) | सदस्य संख्या | २०९ |
| ३) | भाग भांडवल (रूपये) | |
| | १) सरकारी | रू. २,३१,००० |
| | २) व्यक्तीगत | रू. २,६१,४४० |
| ४) | राखीव निधी (रूपये ) | रू. १,९३,३२१ |
| ५) | सरकारी कर्जे | रू. १,४१,६७८ |
| ६) | लागवडी खालील क्षेत्र एकर | |
| | १) बागायती | १,०१५ |
| | २) जिरायती | ७८४ |
| ७) | उत्पादन मूल्य (रूपये) | रू. ११,०३,७३१ |
| ८) | विक्री झालेल्या शेतमालाचे मूल्य (रू.) | रू. १०,७२,२३१ |
| ९) | नफा (रूपये) | रू. ४०,६१३ |
| १०) | तुट (रूपये) | रू. १६,३८० |

(Source - Gazetteer of Ahmednagar. - 1976)

वरील सारणीतील नोंदीवरून असे दिसून येते की, स्वातंत्र्याच्या अगदी सुरूवातीच्या काळात सुद्धा सहकारी कृषीच्या क्षेत्रात अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी चांगली प्रगती केली होती. परंतु या चळवळीचा खरा मार्ग म्हणून सहकारी साखर चळवळीकडे सरकार तसेच जिल्ह्यातील लोकांनी विशेष लक्ष दिल्याचे दिसून येते. वास्तविक पाहाता सातत्याने दुष्काळाच्या सावटाखाली असणाऱ्या या जिल्ह्याच्या सर्व साखर चळवळीने तर जिल्ह्याच्या विकासात आणि शेती विकासामध्ये दिलेले योगदान इतर कोणत्याही घटकाने केले नाही असेच आपणास या जिल्ह्याचा आर्थिक व सामाजिक इतिहास सांगतो.

**५) अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक –**

कृषीक्षेत्र आणि सहकारी कारखानदारी तसेच ग्रामीण उद्योगधंद्याच्या विकासकामाला गती प्राप्त करून देण्याचे खरे काम जिल्ह्यातील सहकारी बँकींग चळवळीने केल्याच्या नोंदी इतिहासात सापडतात.[३७] जिल्ह्यातील सर्व सहकारी बँकींग क्षेत्रावर नियंत्रण ठेवणाऱ्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना इ. स. १९५८ साली करण्यात आली. जिल्ह्यातील काँग्रेसचे नेते कै. बाळासाहेब भारदे हे त्यावेळी सहकार मंत्री होते. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा बँक स्थापन कराव्यात असा सरकारचा निर्णय झाला. जिल्ह्यातील डायरेक्टर बोर्डात मोतीभाऊ फिरोदीया हे चेअरमन होते. डॉ. निसळ, के. बी. रोहमारे यांचाही यामध्ये समावेश होता.[३८] स्थापनेपासून या बँकेने इतर सर्व सहकारी संस्था व कारखाने यांच्या आर्थिक अडचणी सोडविण्याचे कार्य केले. इ. स. १९६२ सालापासून जिल्हा परिषद सुद्धा आपले आर्थिक व्यवहार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून करत असल्याच्या स्पष्ट नोंदी सापडतात.

इ.स. १९६८–६९ पर्यंत या बँकेच्या पन्नासहून अधिक शाखा होत्या. तर हिच संस्था सन १९७१–७२ पर्यंत घट्ट झाल्याची नोंद आढळते. आज जवळपास या बँकेच्या शाखांची संख्या ४०० एवढी आहे. यावरून गेल्या ५० वर्षात या संस्थेने सहकाराच्या माध्यमातून केलेल्या कार्याची कल्पना येते.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने औद्योगिक क्षेत्राला सुद्धा परके मानले नाही. बँकेच्या दरवर्षीच्या वार्षिक अहवालामध्ये सहकारी सोसायट्यांबरोबरच विविध उद्योगधंदे तसेच साखर कारखान्यांनाही कर्ज पुरवठा केला आहे.[३९] याचाच अर्थ सहकाराच्या माध्यमातून या जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला निश्चितच मदत झाल्याचे

हा इतिहास सांगतो. बँकेच्या प्रोत्साहनातून जिल्हयामध्ये खास औद्योगिक सहकारी संस्थांच्या सुद्धा स्थापना झाल्याच्या नोंदी आहेत.

**६) भु–विकास बँक – (Land Development and Mortgage Bank)**

इ.स. १९६० मध्ये अहमदनगर येथे जिल्हा जमीन तारण बँकेची स्थापना करण्यात आली. शेतीसाठी दिर्घकालीन कर्जाचा पुरवठा करणे असा या बँकेचा हेतू होता. नंतर या बँकेचे नाव बदलून जिल्हा भुविकास बँक असे ठेवण्यात आले. इ.स. १९७१–७२ पर्यंत या बँकेच्या एकूण १४ शाखा होत्या. या सर्व शाखांमधून शेतकऱ्यांना नवीन विहीर खोदणे, जुन्या विहिरींची दुरूस्ती, डिझेल इंजिन आणि विजेवर चालणारे पंप सेटस् खरेदी करणे इ. कामांसाठी सुरूवातीच्या काळात भरपूर प्रमाणात दीर्घ मुदतीची कर्जे दिल्याचा इतिहास आहे.

इ.स. १९७० च्या सुरूवातीपासून अहमदनगर जिल्ह्याच्या ग्रामीण भागाचे विद्युतीकरण सुरू झाले. त्यामुळे विहिरींमधून पाणी उपसण्यासाठी वापरात असणारी बैलमोट कालबाह्य झाली. कारण जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि जिल्हा भू–विकास बँक या दोन सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांना खुप मोठ्याप्रमाणात कर्ज पुरवठा करून वीज पंप खरेदी करण्यास प्रोत्साहीत केले. साधारणपणे जिल्ह्याच्या दुष्काळी भागातील कृषी विकासाची सुरूवात असे या कालखंडाला संबोधले जाते. या कामी सुद्धा सहकारी चळवळीने अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडल्याचा इतिहास प्रत्येक विहिर बागायतदार सांगतो.[४०]

इ.स. १९६७–६८, इ.स. १९६९–७० आणि इ. स. १९७१–७२ या काळात जिल्हा भू–विकास बँकेची प्रगती अत्यंत उल्लेखनीय स्वरूपाची होती. कारण या काळात बँकेची सभासद संख्या जवळजवळ दिडपट वाढली होती. तर भाग भांडवल दुप्पट झाले होते. तसेच राखीव निधी दहापटीपेक्षा जास्त झाला होता.[४१] मात्र काळाच्या ओघात इतर बँकांची स्पर्धा, सरकारचे धोरण यामुळे जिल्हा भू–विकास बँकांची स्थिती अत्यंत दयनीय होत गेली. त्यामुळे सरकारने या बँका शेवटी बरखास्त करण्याचा निर्णय घेतला.

**७) सहकारी खरेदी विक्री संघ –**

अहमदनगर जिल्ह्यात इ.स. १९६८–६९ साली एकूण १४ सहकारी खरेदी–विक्री संघ अस्तित्वात होते. या सहकारी खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून जिल्ह्यात कृषी उत्पादन आणि साधनांच्या बाजारपेठेचे जाळे निर्माण झाले. या सहकारी खरेदी – विक्री संघाच्या माध्यमातून खते, औषधे, बियाणे, डिझेल, सिमेंट, फवारा पंप इ. विक्री

होत असे. एवढेच नव्हे तर कमीत–कमी नफा या तत्वावर औषधे, कापड, जीवनावश्यक वस्तू, ग्रामीण भागात उपलब्ध करून देण्याचे काम केले. त्याप्रमाणे इ. स. १९६८–६९ साली जिल्हयात एकूण सहा सहकारी कृषी उत्पादन विक्री संघ अस्तित्वात होते. या संघानी शेतमाल विक्री व्यवस्थेतून दलाल व मध्यस्थांचे उच्चाटन करून पारदर्शक विक्री व्यवस्था निर्मितीचा इतिहास घडविला. या सहकारी खरेदी–विक्री संघामार्फत महाराष्ट्र सरकारच्या वतीने धान्य खरेदी करण्याचे काम सुद्धा सुरूवातीपासून केल्याचे दिसून येते. प्रवरा सहकारी साखर कारखान्यासाठी तीन लाख रूपयांची आवश्यकता होती. त्यावेळी गोदावरी–प्रवरा खरेदी विक्री संघातून १ लाख २५ हजार रू. देण्यात आल्याचा इतिहास आहे.[४२]

इ.स. १९६६–६७ ते इ.स. १९६८–६९ या दरम्यान या संघाची सदस्य संख्या १३,२९० वरून १५,२६२ पर्यंत वाढली होती. त्याचप्रमाणे इ. स. १९६८–६९ साली १६२१ सहकारी संस्था सुद्धा या संघाच्या सभासद होत्या. तसेच भाग–भांडवल, सरकारी भांडवल, खेळते भांडवल इ. बाबतीत सुद्धा या संघांनी अहमदनगर जिल्ह्यात नेत्रदिपक यश मिळविले होते. अलीकडच्या सहकारातील सरकारी धोरणांमुळे तसेच इतर स्पर्धेमुळे सहकारी खरेदी–विक्री संघांची अवस्था दयनीय बनली आहे.

**८) कृषी प्रक्रिया सहकारी संस्था –**

कृषी आणि आर्थिक विकासाला या संस्थांनी स्थापनेपासूनच महत्वाचे वळण दिले. या संस्थांच्या स्थापनेमुळे जिल्हयाच्या पीक रचनेतही बदल झाला. अहमदनगर जिल्हयाच्या उत्तर भागाने या संदर्भात अत्यंत महत्वाची व ऐतिहासिक कामगिरी केल्याचे दिसून येते. इ.स. १९७१–७२ साली जिल्ह्यात अशा प्रकारच्या दहा सहकारी प्रक्रिया संस्था अस्तित्वात होत्या. या संस्थांनी प्रामुख्याने टोमॅटो प्रक्रिया, गुळ आणि खांडसरी उत्पादन, तेल गिरणी, भात गिरणी, सुत गिरणी इ. क्षेत्रात काम केल्याचा इतिहास सापडतो.

**९) सहकारी दूध उत्पादन संस्था –**

सहकारी दूध संस्थांच्या संदर्भात अहमदनगर जिल्हयाचा इतिहास पाहताना इ. स. १९७२ च्या दुष्काळाचाही विचार करावा लागतो. दुष्काळाची झळ सोसल्यानंतर महाराष्ट्रातील ग्रामीण भागात जोडधंदे सुरू झाले पाहिजेत, म्हणून यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील यांनी जोरदार प्रयत्न केला. त्यांनी हा व्यवसाय सहकारी क्षेत्रात सुरू करण्याचा प्रयत्न केला. वसंतराव नाईक यांनी गायीचे दुध हे

म्हशीच्या दुधापेक्षा श्रेष्ठ आहे. हे तज्ञांचे मत मान्य केले व गाईचे दुध मिळावे त्यासाठी भरीव कार्यक्रम आखला आणि धवल क्रांतीच्या दिशेने प्रगती सुरू केली.[४२]

इ. स. १९६६-६७ साली दुध संकलन करण्याऱ्या महाराष्ट्रात एकूण २३ सहकारी संस्था जिल्ह्यात होत्या. मात्र खऱ्या अर्थाने १९७२ नंतरची सहकारी दुध संस्थांची संख्या वाढलेली दिसून येते. नंतरच्या काळात ही चळवळ वाढत जाऊन त्याचे स्वरूप इतके मोठे झाले की, कोणत्याही खाजगी औद्योगिक गृहाला मागे टाकू शकेल एवढी प्रगती या संस्थांनी केली.

**१०) सहकारी साखर कारखानदारी -**

अहमदनगर जिल्ह्याच्या सहकारी साखर कारखानदारीचा इतिहास अभ्यासल्याशिवाय अशिया खंडाच्या सहकारी साखर कारखानदारीचा इतिहास पूर्ण होत नाही. इ. स. १९५० साली जिल्ह्यातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर येथे उभा राहिला. यावेळी शेतकऱ्यांमध्ये सावकाराचे वजन होते. हे सर्व सावकार म्हणत असत की, शेतकऱ्यांना नीट शेती करता येत नाही ते साखर कारखाना कसा चालविणार? त्यांना ५ एच.पी. चे मोटार इंजिन दुरूस्त करता येत नाही त्या ठिकाणी १००० एच.पी. ची इंजिन कशी दुरूस्त करणार ? कारखान्याने शेअर्स घेणे हे नशीब गहाण टाकण्यासारखे आहे. ज्या विखे पाटलांना फेटा नीट बांधता येत नाही ते कारखाना नीट कसा चालविणार ? असा प्रचार बुद्धीवादी लोक करीत असत. परंतु ध्येयाने झपाटलेल्या विठ्ठलराव विखे पाटलांनी गावोगाव शेतकऱ्यांच्या सभा घेऊन रान उठविले. शेतकऱ्यांना साखर कारखानदारीसाठी तयार केले. ''गड्यांनो, पडली अशी भल्या मोठ्या ऊसाची साखर कारणाऱ्या चरकाची जिम्मेदारी तुमच्या लहानखुऱ्या खांद्यावर, तर पेलाल काय ती ? गावदेवाची शपथ घेऊन सांगा - पीछे हटनार न्हाई म्हणून''[४४] शेतकऱ्यांमध्ये जिद्द निर्माण करून विखे पाटलांनी सहकारी साखर कारखानदारीचा पाया घातला.

जिल्ह्यातील सावकारशाही विरोधात उभी असताना पुढे जाणे अवघड वाटत होते. परंतु सहकारावर असलेली निष्ठा, शेतकरी मंडळाचे पुढारी व शासनाची मदत यामुळे सहकार चळवळ यशस्वी झाली. १९५० साली अहमदनगर जिल्ह्यात प्रवरानगर येथे महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना उभा राहिला. त्याआधी १९३६ च्या दरम्यान कोपरगाव तालुक्यात गोदावरी शुगर मिल्स साकरवाडी व लक्ष्मीवाडी हे दोन खाजगी कारखाने व मोरारका उद्योग समुहाने पुणतांबा येथे चांगदेवनगरला एक असे साखरेचे तीन खाजगी कारखाने काढलेले होते.

सहकारात उद्योगाला संधी मिळावी म्हणून प्रयत्न करण्यात वैकुंठभाई मेहतांनी पुढाकार घेतला. महाराष्ट्रात भांडवलदार, व्यापारी, उद्योजक कमी आहेत. त्यांना एकत्रित आणले तर ताकद उभी राहू शकते अशी वैकुंठभाई मेहतांनी कल्पना मांडली. त्यावेळी डॉ. धनंजयराव गाडगीळ हे प्लॅनींग कमिशनचे व्हाईस चेअरमन झाले. त्यांची प्रेरणा सहकारी उद्योगाला मिळाली.[४५] प्रवरानगरच्या कारखान्यानंतर कोपरगांव, संगमनेर, श्रीरामपूर, राहुरी, नेवासा आणि जिल्ह्याच्या उर्वरीत भागात सहकारी साखर कारखान्यांची मालिका सुरू झाली. या सर्व कारखान्यांच्या उभारणीमुळे जिल्ह्यातील शेतकरी, सावकार, जमीनदारी, मारवाडी, व्यापारी, दलाल यांच्या कर्जाच्या विळख्यातून मुक्त होण्यास मदत झाली. इ.स. १९६७–६८ साली या सहकारी साखर कारखान्यांची एकूण सदस्य संख्या पंचवीस हजारापेक्षा जास्त होती तर जिल्ह्यात एकूण तेरा सहकारी साखर कारखाने कार्यरत होते.[४६]

सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून जिल्ह्यात औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक परिवर्तनाचा इतिहास घडून आला. कारण ज्याप्रमाणे साखर कारखानदारीच्या माध्यमातून जिल्ह्यात औद्योगिक विकासाला चालना मिळाली. त्याप्रमाणे अनेक प्रकारच्या शिक्षण संस्था व तंत्र शिक्षण संस्था सुद्धा उदयास आल्या. ज्या काळात फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर भारताच्या इतर राज्यात सुद्धा उच्च शिक्षण व आरोग्य विषयक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. त्या काळात नगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीने ही उणीव भरून काढल्याचे दिसून येते.

**६ अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा ऐतिहासिक मागोवा –**

अहमदनगर जिल्हा ही सहकारी चळवळीची जननी मानली जाते. इ.स. १९०५ च्या सुमारास देशात सहकार चळवळ सुरू झाली. परंतु या चळवळीने स्वातंत्र्यानंतरच खरा जोम धरला. नागरिकांचे मूलभूत हक्क व अधिकार प्रत्यक्षात अंमलबजावणीच्या स्वरूपात आणण्यासाठी भारताचे पहिले द्रष्टे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी राष्ट्रीय नियोजन घोषित करून समाजवादी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी भांडवलवादी तसेच साम्यवादी अर्थ व्यवस्थेला पर्याय म्हणून सहकारी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केल्याचे घोषित केले. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर साखर उद्योग व इतर सहकारी संस्थांचे लहान–मोठे प्रकल्प हाती घेऊन याला आवश्यक तेवढे भाग भांडवल, अर्थसहाय्य व कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्याचे राष्ट्रीय धोरण जाहीर केले. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात सुद्धा १९५० साली सहकारी

साखर उद्योगाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली.[४७] महाराष्ट्र राज्यात अहमदनगर जिल्हा पूर्वीपासून पुरोगामी समजला जातो. वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ आणि पद्‌मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी इ. स. १९५० साली अहमदनगर जिल्ह्यात पहिला सहकारी साखर कारखाना सुरू केला. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर आशिया खंडात सहकारी तत्वावर सुरू होणारा हा पहिला सहकारी साखर कारखाना होता.[४८] या साखर कारखान्याच्या माध्यमातून सहकारी चळवळीने जिल्ह्याच्या ग्रामीण विकासाला एक नवी दिशा दाखविली. सहकाराच्या माध्यमातून एकमेकांशी संलग्न असे उद्योग उभे करायचे. 'ना नफा ना तोटा' तत्वावर ते चालवावयाचे आणि त्यातून परिसराचा चोहोबाजूंनी विकास साधायचा अशी ही विकासाची दिशा होती. या दिशेने सहकार वाढत नेला तर परिसराच्या विकासाबरोबरच सर्वसामान्य ग्रामीण जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी मदत होते हे ओळखूनच जिल्ह्यातील पद्‌मश्री विठ्ठलराव विखे पाटील, गणपतराव औताडे, काशिनाथ पाटील, बापुसाहेब जगताप, आण्णासाहेब शिंदे, शंकरराव काळे, बाळासाहेब विखे पाटील, मारूतराव घुले, बाबुरावदादा तनपुरे, भाऊसाहेब थोरात, आबासाहेब निंबाळकर, दादापाटील राजळे, बाळासाहेब भगत, शंकरराव कोल्हे, शिवाजीराव नागवडे, यशवंतराव गडाख इ. कार्यकर्त्यांनी जिल्ह्याच्या सहकारी चळवळीला वाहून घेतले. या सर्वांना दिशा दाखवून मदत करण्याचे काम वैकुंठभाई मेहता व धनंजयराव गाडगीळ यांनी केले. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी संपूर्ण देशात त्यातही उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीला चालना दिली. एका अर्थाने धनंजयराव गाडगीळ आणि वैकुंठभाई मेहता हे साखर कारखान्यांचे प्रवर्तक व दिशादर्शक होते. ब्रिटीश सरकारने १९२५ मध्येच सहकाराचा कायदा केला होता. पण तो तसाच सरकार दप्तरी धूळ खात पडलेला होता. सहकार म्हणजे काय याची जनतेला पुरेशी कल्पना नव्हती. पण डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता यांनी या कायद्याला पुन्हा जिवंत केले आणि सहकाराचा अर्थ खेड्यापाड्यात पोहचवला.[४९]

कोणताही कारखाना ४० टक्के स्वत:चे भांडवल व ६० टक्के कर्ज असल्यावरच उभा राहू शकतो. अशा पद्धतीने कारखाना उभा करण्यासाठी त्यावेळी ३ ते ४ लाख रूपये लागत होते. त्याच्या ४० टक्के म्हणजे १ लाख २० हजार रूपये भांडवल व ते १ लाख ८० हजार रूपये कर्ज उभारावे लागत होते. परंतू ४० टक्के स्वभांडवल उभे करण्याची ताकद शेतकऱ्यांमध्ये नाही हे डॉ. धनंजयराव गाडगीळांच्या लक्षात आले. मग स्वभांडवल उभारणी करण्यासाठी काय करावे असा नेत्यांपुढे प्रश्न उभा राहिला. हा प्रश्न

डॉ. धनंजयराव गाडगीळांनी सोडविला. ते शेतकऱ्यांसाठी उत्तम अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांच्यात प्रामाणिकपणा व जिद्द होती. त्यासाठी त्यांनी शासनापुढे एक योजना मांडली. स्वभांडवल जमवितांना शेतकऱ्यांनी २५ टक्के रक्कम भरावी व ७५ टक्के रक्कम बँकेने शेतकऱ्यांना कर्ज म्हणून द्यावी. त्यामुळे १००० रूपयांचा शेअर २५० रूपयात मिळू शकला. वैकुंठभाई मेहता यांनी भांडून सरकारकडून या तत्वाला मंजूरी घेतली. डॉ. धनंजयराव गाडगीळांनी जी नवीन अर्थनीती उभी केली. त्याला पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी जोड देऊन शेतकऱ्यांमध्ये चळवळ उभी केली. भाग भांडवलासाठी शेतकऱ्यांनी रक्कम गुंतवावी म्हणून त्यांना संघटित केले.[५०]

कृषिक्षेत्र व सहकार यांचा संबंध अत्यंत जवळचा ठरला. किंबहूना राष्ट्रीय कृषी योजनांच्या यशस्वीतेसाठी सहकाराचे जाळे यशस्वी ठरू लागले. ही चळवळ राज्यात व देशभर खुप विस्तारात गेली. विशेषतः महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन राज्य ‘विना सहकार नही उद्धार’ या घोषवाक्याच्या निनादाने दुमदुमली होती. म्हणून सहकार आणि साखर कारखानादारीचा महाराष्ट्रात तरी अगदी जवळचा संबंध निर्माण झाला. त्याचबरोबर सहकारी तत्वावर शेतीमाल खरेदी–विक्री संघ, उपसा जलसिंचन, सुतगिरण्या, दुध कुक्कुटपालन अशा अनेक विषयांशी संबंधित सहकारी संस्था देशभर निर्माण झाल्या. पाहता पाहता सहकारी चळवळीने जाळे देशभर निर्माण झाले.

### १.१ सहकारी चळवळीतील संघटन –

सहकारी चळवळ ही आजच्या स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या जडण–घडणीत महत्वाचा वाटा असणारी चळवळ आहे. स्वातंत्र्योत्तर मराठी ग्रामीणच नव्हे तर नागरी जीवनही या चळवळीमुळे प्रभावित झालेले दिसते. गेल्या तीन चार दशकात तर चळवळ महाराष्ट्रभर नव्हे भारतभर पसरली. तिचे काही चांगले व काही वाईटही परिणाम झाले.

सहकारी क्षेत्र ग्रामीण विकासाला समर्थ ठरू शकेल. शेतकऱ्यांचे जीवन संपन्नतेच्या दिशेने नेण्यात सहाय्यभूत ठरू शकेल, याची जाणीव सर्वांनाच झाली. ग्रामीण नेतृत्व विकासाला कार्याची एक परिणामकारक दिशा व गती मिळाली. त्यानंतर ही चळवळ झपाट्याने विस्तारत गेली वाढत गेली. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये सहकाराने आपले वर्चस्व प्रस्थापित केले. एवढेच नव्हे तर सहकारी साखर कारखानदारीच्या उद्योगांनी प्रस्थापित धनदांडग्यांची खासगी कारखानदारी मोडीत काढली. आज सुतगिरणी, दुधसंघ, सहकारी पतसंस्था व बँका, गृहनिर्माण संस्था, पाणी पुरवठा संस्था, उपसा जलसिंचन याबरोबरच पद–दलितांच्या व मजूरांच्या सहकारी संस्था इ. अनेक क्षेत्रामध्ये सहकाराने

आपले वर्चस्व प्रस्थापित केले. थोडक्यात पाहता स्वातंत्र्यपूर्व काळात कसाबसा जीव धरून असणाऱ्या एका रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. याचे श्रेय डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता सारख्यांना जसे जाते. तसेच संघटन करून समाजाच्या शक्तीला, आकांक्षेला दिशा देणाऱ्या पहिल्या टप्प्यातील नेतृत्वालाही जाते. सहकारी चळवळ ही मुळातच सामान्य माणसासाठी व सामान्य माणसांच्या आत्मविश्वासाच्या जिद्दीतून उभी राहिलेली चळवळ आहे. सहकारातील संघटन प्रक्रिया निकोप असली पाहिजे व काही आवश्यक धोरणात्मक निर्णय घेऊन कार्यवाहीत आणले पाहिजे. त्यासाठी खालील काही उपाय करण्याची नितांत गरज वाटते.

१) सहकारी क्षेत्रातील निकोपपणा टिकावा, वाढीस लागावा यासाठी सततचे समाजप्रबोधन केले पाहिजे व त्याला सामुदायिक नेतृत्वाचे स्वरूप विनाविलंब द्यावे.

२) या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या नेत्यांमध्ये आपआपसात सहकार्याची भावना असलीच पाहिजे. आपआपसातील सत्ता स्पर्धेसाठी सहकार-शक्तीचा शक्तीपात कुणी करू नये. होत असेल तर तरूणांनी व संबंधितांनी रोखणे आवश्यक आहे.

३) सभासदांनी, कार्यकर्त्यांनी व सरकारने सहकारी संस्था राजकारणापासून मुक्त ठेवाव्यात, ज्यांना राजकारण करावयाचे त्यांनी सहकारापासून दूर रहावे असा अलिखित नियम पुढाऱ्यांनी अनुकरणाने सिद्ध करावा.

४) उच्च नैतिक व वैचारिक पातळी असणारे समाजहिताशी बांधिलकी असणारे नेतृत्व या संस्थांच्या केंद्रस्थानी यावे. यासाठी सभासदांनी व समाजाने सतर्क रहावे.

५) आजच्या नेतृत्वाने भविष्याचा विचार करून ध्येयाबरोबरच कौशल्य असणारे व उच्च नैतिक मूल्यांचा आदर करणाऱ्या कार्यकर्त्यांचे संच सातत्याने सांभाळले पाहिजेत.

६) सहकारी चळवळ ही सामान्यांचा सर्वांगीण विकासाचे माध्यम आहे, हे लक्षात घेऊन फक्त आर्थिक अपेक्षा न ठेवता लोकशाही व निकोप पारदर्शी व्यवस्थापनाची अपेक्षा व आग्रह सभासदांनी तसेच समाजाने ठेवला पाहिजे. यासाठी त्यागाचीही तयारी हवी आहे.

७) यातील कार्यकर्ते व प्रमुख नेतृत्वाने सहकारी संस्था आपल्यासाठी राबविण्याच्या उद्देशाने, सहकारी संस्था, चळवळ व संघटन यात पक्षाच्या स्वार्थासाठी दुरूपयोग करण्याचा दोष निर्माण होत आहे. अशी हाकाटी पेटवून ती चळवळ मोडीत

काढण्याच्या दृष्ट हेतूने अप्रत्यक्ष प्रयत्न करीत आहेत. अशांचे ते प्रयत्न सर्व शक्तीनिशी मोडून काढले पाहिजेत. अगदी वेळ आलीच तर त्यासाठी स्वकीयांशी आणि राजकीय नेतृत्वाशाही संघर्ष करण्यास सज्ज राहावे लागेल.

सहकाराचे शुद्धीकरण करण्यासाठी सतत कायद्यात दुरूस्ती करत करत गेले ३०–४० वर्ष सरकारने स्वत:कडे अनिर्बंध अधिकार घेतले आहेत. त्याचा वापर सुधारणेऐवजी राजकीय हस्तक्षेपासाठीच केल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यातून सुधारणेऐवजी गैरकामाला संरक्षणच मिळत गेले. याचे सर्वांनीच कठोर आत्मपरिक्षण करून पावले उचलली पाहिजे. सहकार चळवळीच्या नेत्वृत्वाची आपल्या उदात्त ध्येयावर अढळ श्रद्धा असावी लागते. जी सहकारी संस्था उभी करावयाची आहे. ती समाजहिताच्या निष्ठेने बांधिलकी मानणारी आहे, असा दुर्दम्य संकल्प जपावा लागतो. त्या अनुरोधाने कृतीही करावी लागते. तरच लोकांचा विश्वास टिकतो व वाढतो आणि संस्था उभ्या राहतात.[५१] फक्त संस्था उभ्या करून भागत नाही तर त्या टिकल्या पाहिजेत. वाढल्या पाहिजेत, स्वयंपूर्णतेच्या दिशेने त्यांनी वाटचाल केली पाहिजे. काळानूरूप योग्य असणारे बदलही स्वीकारले पाहिजेत. सुदैवाने सहकारी चळवळीला असे समर्थ नेतृत्व सुरूवातीच्या काळात लाभले, त्यांना जनतेने उत्स्फूर्त साथ दिली, म्हणून तर अल्पावधीत सहकाराची गंगा गावागावात पोहचली.

## १.२ सहकार चळवळ आणि विकासाचे टप्पे –

महाराष्ट्रातील सहकारी संस्था देशात सर्वत्र नावाजल्या आहेत. सहकारी क्षेत्र नावाचे एक स्वतंत्र आर्थिक क्षेत्र असावे इतका या संस्थांचा अर्थकारणात प्रभाव निर्माण झाला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात तर सहकाराचे असाधारण स्थान आहे. कोट्यावधी रूपयांची उलाढाल करणाऱ्या लाखो लोकांना रोजगार प्राप्त करून देणाऱ्या तसेच गावोगावच्या शेतकऱ्यांच्या आशा आकांक्षाचे प्रतिक बनलेल्या या सहकारी संस्थांची आज काय स्थिती आहे, प्रगतीच्या कोणत्या टप्प्यावर या संस्था आहेत. हे पहात असताना सहकारी चळवळीने ग्रामीण भागाचा चेहरा–मोहरा बदलून टाकलेला दिसतो. आज ज्या ठिकाणी शासकीय यंत्रणा लवकर पोहचू शकत नाही, अशा ठिकाणी सर्वप्रथम सहकाराच्या माध्यमातून मदतीला धावून जाण्याचे काम होत आहे. ग्रामीण भागातील रस्ते, शैक्षणिक सुविधा, सामाजिक हित, पिण्याच्या पाण्याच्या योजना, नैसर्गिक मानव निर्मीत सकंटे, दुष्काळ, रोगराई, सिंचन पाटपाण्याच्या सुविधा दगडी साठवण बंधारे, मातीचे बंधारे, कोल्हापूर पद्धतीचे मोठे बंधारे, शेतकऱ्यांच्या बांधावर शेती विकासाचे

तंत्रज्ञान, भूकंपासारखी मोठी आपत्ती, गोर–गरीब सभासद शेतकरी, रूग्णांना आजारपणासाठी वैद्यकिय मदत इ. बाबींमध्ये सहकारी संस्थांचे मोठे योगदान आहे.[५२]

जशीजशी सहकारी साखर कारखानदारी बहरू लागली तसतसे खाजगी उद्योग धंदे बंद पडले. सहकारी चळवळीमुळे ग्रामीण भागातले राहणीमान उंचावले. प्रथम जे शेतकरी गावात राहत होते. त्यातील बहुतेकांनी गाव सोडून शेतात राहण्यास सुरूवात केली. रात्रंदिवस शेतीत लक्ष देऊन शेतीचे उत्पन्न वाढवले. पाचटाच्या झोपडीत जे शेतकरी राहत होते, त्यांनी मातीची व पत्र्याची घरे बांधली. काहींनी सायकली, मोटारसायकली तर काहींनी जीप गाड्या विकत घेतल्या. ग्रामीण महाराष्ट्रात तरूणांच्या हातात सोन्याची कडी नाही तर भारी घड्याळाचे सोनेरी पट्टे आले. जिथे चार–दहा पोते ज्वारी, बाजरीची पिकायची तिथे ऊसाचे मळे उभे राहिले. त्याचबरोबर जीप, ट्रॅक्टर तसेच ट्रक्स धावू लागले. ऊसाची शेती करता करता वैभवाची व दिमाखाची सवय लागली.

## १.३ सहकार चळवळ आणि नेतृत्वाची कसोटी –

या पार्श्वभूमीवर आज सहकारातील संघटन कोणत्या वळणावर आहे, हे तपासणे आवश्यक आहे. रचनात्मक कार्यासाठी सहकारात संघटन करणाऱ्या आणि तत्व व ध्येयासाठी कोणत्याही गैरमार्गी यंत्रणेपुढे न झुकणाऱ्या नेतृत्वाने विकसित केलेल्या सहकारी संस्थांच्या योगदानाचे फायदे समाजाला मिळाले. त्याची रूचकर फळे त्यांनी चाखली. त्यामुळे ग्रामीण जनतेबरोबरच शहरी जनताही सहकाराकडे मोठ्या अपेक्षेने पाहू लागली. अनुभव घेऊ लागली आणि ग्रामीण भागाबरोबरच नागरी विभागातही सहकारी संस्था उभ्या राहिल्या. सहकारी संस्थांच्या उभारणीसाठी सरकारनेही मदतीचे धोरण ठेवले. आर्थिक लाभाची शक्यता दिसल्यामुळे संस्थेच्या निर्मितीसाठी विश्वासपात्र पुढाऱ्यांनी पुढाकार घेतला की, जनता तुलनात्मक दृष्टया सहजतेने सभासदत्वासाठी पुढे येऊ लागली. त्यामुळे नेतृत्वाची पूर्वीसारखी वणवण राहिली नाही. सहकारी चळवळीच्या आधाराने विकसित झालेले नेतृत्व समाजमान्यता पावल्यामुळे समर्थ बनत गेले. ते प्रश्नातून तावून–सुलाखून निघालेले असल्यामुळे सामाजिक बांधिलकी मानणारे असेच होते. त्यांचा सरकार दरबारी दबदबा निर्माण झाला. त्यातील अनेकांनी सत्तेच्या राजकारणात उडी घेतली. परंतु सत्ताधिशांनी पक्षहितासाठी त्यांना सत्ताकारणात ओढले. त्यामुळे सहकार चळवळ पक्षहितासाठी राबविली जाऊ लागली. सत्तेच्या राजकारणात त्यांनी दबावगट निर्माण केले. यानंतर सहकारी क्षेत्राचा आणि त्यातील संघटन पद्धतीचा व हेतूचा रंग झपाट्याने बदलू लागला. मात्र समाजविकास प्रक्रियेत प्रत्येक महत्वाच्या टप्प्यावर

ध्येयवेडी व जाणती माणसे भेटत असतात. अशी माणसे इतर भ्रष्ट व स्वार्थाच्या मार्गाने जाण्याचे नाकारतात. अपमान, उपहास या साऱ्याला तोंड देत मूलभूत मूल्यांची ज्योत तेवत ठेवत असतात. भ्रष्ट यंत्रणेविरूद्धही तेच लढत असतात. अशी द्रष्टी माणसे समाजाला दिपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरतात. हा आजवरचा सामाजिक इतिहास आहे. सहकार क्षेत्र व त्यातील संघटन त्याला अपवाद नाही.

६0 वर्षांपूर्वी ग्रामीण समाज ज्या प्रश्नाबरोबर संघर्ष करत होता, ज्या अवमानित जिण्याला व पिळवणूकीला तोंड देत होता. त्याच प्रश्नांच्या अनुभवातून वाटचाल करणारे, सामान्य परंतू असामान्य इच्छा शक्ती असणारे, दूरदृष्टीने भविष्याचा वेध घेण्याची क्षमता असणारे, काही वेगळी माणसे समाजाला, सहकारी क्षेत्राला उपलब्ध झाली. अशा माणसांनी इतरांबरोबर मळलेल्या वाटेने जाण्याचे नाकारले. स्वत:चे पाय जमिनीवर ठेवून, वास्तवाचे भान ठेवून दुर्दम्य आशावाद आणि समाज विकासाचे व पिळवणुकीतून मुक्तीचे स्वप्न पाहिले. आर्थिक बाबतीत त्याही काळात कुणावर विश्वास न ठेवणाऱ्या सामान्य शेतकऱ्यांचे संघटन केले. आपल्या प्रश्नांतून आपणच मार्ग काढला पाहिजे अशी जाणीव त्यांच्यामध्ये द्रष्ट्या नेत्यांनी निर्माण केली. त्यातूनच सहकारी चळवळीला नवीन चेतना मिळाली. अशा संघटनांसाठी मुख्य गरज असते ती कृतिशील कार्यक्रम घेऊन माणसांशी नाते जोडण्याची, त्यांच्याच पायरीवर उभे राहून संवाद साधण्याची हे करत असताना समुहाच्या समाजाच्या प्रश्नांची जाण लागते. तरच ही आत्मविश्वासाची अभाव असणारी माणसे आत्मविश्वासाने उभी राहतात व नेतृत्वावर विश्वास टाकण्यास तयार होतात. अशा नेतृत्वाकडे स्वत:चा स्वार्थ वाऱ्यावर उधळून देण्याची तयारी लागते. उपेक्षा, टवाळी, उपहास, छळ आणि विरोध मान–अपमान याने हुरळून किंवा खचून न जाता या सर्वांवर मात करण्याची व त्यासाठी आवश्यक तो संयम ठेवून प्रश्न व पर्याय निर्भयपणे मांडण्याची कुवतही लागते. शंकरराव काळे जेव्हा कोपरगांव सहकारी साखर कारखान्यासाठी भाग भांडवल उभे करताना गावागावात आपल्या सहकाऱ्यांसोबत फिरत होते. तेव्हा त्यांनी या सर्व गोष्टींचा पुरेपुर अनुभव घेतला.[५३]

ग्रामीण अर्थकारणाला दिशा देण्यासाठी सहकार चळवळीने येथील सुशिक्षीत बेरोजगारांच्या हाताला काम दिले. शेती व्यवसायाला दुग्ध व्यवसायाची जोड दिली. साखर क्रांती, धवल क्रांती तसेच शैक्षणिक क्रांतीमध्ये अहमदनगर जिल्हयाने प्रगती केल्याचे व खऱ्या अर्थाने ग्रामीण अर्थकारणाला दिशा देण्याचे काम केले असे दिसून येते.

## संदर्भ

| | | | |
|---|---|---|---|
| १) | Digby Margaret | : | The world Co-operative movement, Hutchison University Library, London- 1948, Pg. 3 |
| २) | य. रा. दाते | : | सुलभ विश्वकोष – खंड ५ वा महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती मंडळ, प्रकाशन वर्ष – १९७८, पृ. २५,३६,३९. |
| ३) | गो. स. कामत | : | सहकार तत्व व व्यवहार व्यवस्थापन, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे – १९९३, पृ. ३३ |
| ४) | M.D. Widwans | : | The Maharashtra Co-operative Society, Act – 1960, Co-operator Book Depot, Bombay – 1962. Pg. 32 |
| ५) | द. को. सांळुके | : | महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर – १९८२, पृ. ८३ |
| ६) | उपरोक्त | : | सहकार तत्व व्यवहार व्यवस्थापन, पृ. ८१ |
| ७) | उपरोक्त | : | महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था, पृ. ११ |
| ८) | R.M. Hough | : | The Co-operative Movement in India, Oxford, Calcutta – 1966, पृ. २६ |
| ९) | वार्षिक अहवाल | : | को–ऑपरेटीव्ह शुगर, नवी दिल्ली – १९९३ पृ. १३ |
| १०) | K.N., Naik C.N. Vakil | : | The Co-opeartive Movement In the Bombay State, Popular Book Depot, Bombay – 1953, Pg. 20,21,22. |
| ११) | कित्ता | : | पृ. २३,२४ |
| १२) | कित्ता | : | पृ. २३,२४ |
| १३) | E.D. Machlgaon, Laloobhai Sambaldas, A.E. English, M Azhar Ali, Committeee on Coperation Report – GOI- RBI- 1953. Pg. 13,14 | | |
| १४) | W.C. Shrishrimal | : | Co-operative Economic Problems and Potentialities, The Maharasthra State Co-operative Bank Ltd. - 1978 |
| १५) | Report of the Co-operative planning commitee – New Delhi, GOI, Pg. 181,182. | | |
| १६) | Maharashtra State Gazetteer | : | Ahmednagar Disctrict (Revised edition), Gazetteer Department of Maharashtra, Bombay – 1976, Pg. 39,50 |

| | | | |
|---|---|---|---|
| १७) | H.D. Sankaliya | : | Indian Archeology Today, Pg. 88 |
| १८) | Histroy to pre History | : | Pg. 67,68 |
| १९) | Muris Original Sanskrit | : | Tex – Vol – 1 |
| २०) | **के. एन. चिटणीस** | : | **मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, भाग – २, प्रकाशक, सौ. रा. कृ. चिटणीस, रामबाग कॉलनी, नवीपेठ, पुणे – १९९७, पृ. १४१** |
| २१) | Medows Talyor | : | Manual of History, Deep & Deep Publish, Delhi -1994, Pg. 36,37 |
| २२) | **गो. त्र्य. कुलकर्णी ग. ह. खरे** | : | **मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला, पृ. ९५** |
| २३) | **कित्ता** | : | **पृ. ३९२** |
| २४) | **कित्ता** | : | **पृ. ३९४,३९५** |
| २५) | **कित्ता** | : | **पृ. ३९०** |
| २६) | Government of Maharashtra | : | Gazetteers of India, Maharashtra State, Ahmednagar District, Published by secretary Govt. of Maharashtra – 1976, Pg. 31. |
| २७) | **कित्ता** | : | **पृ. ११८** |
| २८) | **य.न. केळकर, संग्रह** | : | **अप्रकाशित, रूमाल क्र. १, पत्र क्र. २४, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.** |
| २९) | V.M. Sirsikar | : | Politics of Modern Maharashtra, Orient Long Man Limited, Kamani Marg, Bombay, Pg. 307 |
| ३०) | A.K. Priolar | : | Biography of Dadoba Pandurang, Pg. 224,225 |
| ३१) | Dr. Talole | : | Economics of well Irigation Eqipped with Electric pumsets and Its Impacts on Agriculutural Development of Ahmednagar – 1976, Pg. 186,187 |

३२) शिवाजी सावंत : लढत, भाग पहिला प्रकाशक डॉ. आर. जी. काकडे, प्रवरानगर – १९८५, पृ. ९०
३३) स्मरणिका : अहमदनगर जिल्हा सहकारी बँक लि., अहमदनगर, रौप्य महोत्सवी स्मरणिका, अहमदनगर, पृ. ७१,७२
३४) शंकरराव कोल्हे : सत्याग्रही शेतकरी, प्रकाशक –अध्यक्ष संजीवनी सह. सा. का. लि. सहजानंदनगर, कोपरगांव –२०१२, पृ.७६
३५) स्मरणिका : उपरोक्त, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक लि., पृ.७२
३६) Maharashtra State Gazetteers : Ahmednagar Disctrict (Revised Edition) -1976, Pg. 220
३७) कित्ता : पृ. २२४
३८) गणेश देशमुख : ग्रामवेद, के. बी. रोहमारे गौरव ग्रंथ, प्रकाशक के. जे. सोमय्या महाविद्यालय, कोपरगाव–१९९८, पृ. ८
३९) वार्षिक अहवाल : अहमदनगर जिल्हा सहकारी बँक लि.,–१९७३, पृ. १६
४०) Dr. Talole : उपरोक्त, पृ. १७०,१७१
४१) कित्ता : पृ. १८३
४२) शंकरराव कोल्हे : उपरोक्त, पृ. ७३
४३) कित्ता : पृ. १२८
४४) शिवाजी सावंत : उपरोक्त, पृ. ३८५
४५) शंकरराव कोल्हे : उपरोक्त, पृ. ७२
४६) सुहास आव्हाड : सहकारी साखर कारखानदारी आणि ऊस लागवडीचे अर्थशास्त्र, पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ – १९९२, पृ. २३६
४७) गणेश देशमुख : उपरोक्त, पृ. १२१
४८) सुहास कुलकर्णी : विकाससूर्य, युनिक फिचर्स, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे – २००१, पृ. २५
४९) कित्ता : पृ. २६
५०) शंकरराव कोल्हे : उपरोक्त, पृ. ७३
५१) गणेश देशमुख : ग्रामवेद, उपरोक्त, पृ. ११५
५२) सुहास कुलकर्णी : विकाससूर्य, उपरोक्त, पृ. १६
५३) कित्ता : पृ. ३०

## प्रकरण – ३

# शंकरराव काळे यांची जडण–घडण

**प्रस्तावना**

व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या कर्तृत्वाला जेव्हा परिस्थितीतून आव्हान मिळते तेव्हा ती मोहरून उठते. ती मोठी व थोर होते. त्यामागे त्या व्यक्तीच्या अंगी असलेला आत्मविश्वास, चिकाटी, बळ, दृढनिश्चय, सचोटी हे सद्‌गुण तर कारणीभूत असतातच परंतु त्यापेक्षा ती व्यक्ती ज्या परिस्थीतीत जन्मली, रूजली, वाढली ती परिस्थितीही कारणीभूत असते. ती व्यक्ती परिस्थितीचेच अपत्य असते असेही म्हणता येईल. शंकरराव काळे यांच्या जन्माच्या अगोदर म्हणजे सन १९२० च्या दरम्यान कोपरगाव तालुका दुष्काळी भाग होता. या संपूर्ण परिसरात पाऊस अत्यंत कमी पडत असे. नाशिकपासून सुरू होणारा हा दुष्काळी पट्टा अगदी मराठवाड्याच्या सीमेपर्यंत पर्जन्य छायेचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. शेती क्षेत्र मोठ्या प्रमाणात असूनही केवळ पावसावरच अवलंबून होते. ज्वारी व बाजरी अशीच पिके घेतली जात होती. मात्र कमी पाऊस त्यातच शेतीची मशागत करण्यासाठी येणारा खर्च या सर्व बाबींमुळे या परिसरातील शेती भकास झालेली होती. त्यामुळे या परिसरातील माणसे पोट भरायला दुसरीकडे जायची. शंकररावांचे आजोबा विठोबाबाबासुद्धा कुटुबांसह कापूस वेचायला धुळ्याकडे जात होते. त्यांची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. पाटपाणी, कालवा किंवा बंधाऱ्याची सोय नव्हती. पाऊस म्हणावा तसा पडत नसल्याने शेती ही जिराईत आणि सतत दुष्काळाची छाया पडलेली असल्याने शेतकरी हैराण झालेले होते, असा हा दुष्काळी पट्टा होता.

**१) जन्म व बालपण –**

अहमदनगर जिल्ह्याच्या कोपरगाव तालुक्यातील गोदावरीकाठी वसलेल्या माहेगांव देशमुख या छोट्याशा खेड्यात शंकरराव काळे यांचा जन्म एका सामान्य शेतकरी कुटुंबात ६ एप्रिल १९२१ रोजी झाला.[१] त्यांचे वडील देवरामबाबा काळे व आई राधाबाई हे दोघेही शेतीची कामे करीत असत. त्या काळी शेती हाच मुख्य व्यवसाय होता. वडील देवरामबाबा यांचा जन्म अंदाजे १८९० चा असावा कारण त्या काळी तारखांची नोंद करण्याची पद्धत नव्हती. देवरामबाबांचे वडील विठूजी काळे हे लवकरच मरण पावल्यामुळे त्यांचा सांभाळ बालपणापासून त्यांच्या चुलत्यांनी केला होता. लहानपणापासूनच देवरामबाबा शरीराने काटक, मजबूत आणि धिप्पाड बांध्याचे होते.

पारमार्थिक ओढ आणि नेटका संसार हे दोन गुण देवरामबाबांना त्यांच्या चुलत्यांकडून मिळाले. चुलत्यांनी देवरामबाबांना शेतीच्या कामात तरबेज केले होते. स्वतः देवरामबाबा प्रयोगशील शेतकरी होते. पाणी हे शेतीचे जीवन आहे. अहमदनगर जिल्हा हा तसा दुष्काळी भागच होता. गोदावरी व प्रवरा या नद्यांनी नगरला समृद्धी आणली. पण ती नंतरच्या काळात कॅनॉल (पाट) झाल्यानंतर त्या अगोदर सर्व काही लहरी पावसावरच चालत असे. म्हणूनच शेतीला बारमाही पाणी मिळावे यासाठी देवरामबाबांनी स्वतःच्या शेतीत विहीर खणण्यावर भर दिला. त्यांनी खणलेली एक विहिर तर अभिनव अशीच आहे. अर्धा कि.मी. लांब आणि चाळीस फुट खोल अशी अभिनव विहीर खणून पाण्याच्या प्रश्नावर मात केली. कुठल्याही प्रयोगशील शेतकऱ्याने स्फूर्ती घ्यावी असे हे काम आहे. त्यांनी स्वतःच्या शेतात खणलेली दुसरी विहीर ही साठ फुट व्यासाची आणि तेवढीच खोल आहे. अशा तीन विहीरी खणून देवरामबाबांनी शेतीला सुजलाम सुफलाम बनविले होते.

देवरामबाबांना पत्नीची म्हणजे राधाबाई काळेंची संसारात फार साथ मिळाली. ''या माऊलीने फार कष्ट उपसले, आमच्या कुटुंबाला जी समृद्धी प्राप्त झाली त्यात माझ्या आईच्या कष्टाचा फार मोठा वाटा आहे. पण तिला बिचारीला काहीही सुख मिळाले नाही''[२] देवरामबाबा आणि आई राधाबाई यांच्या कष्टाला खरोखरच तोड नव्हती. शंकरराव काळे यांच्या जन्माच्या वेळेस राधाबाईंना जेव्हा प्रसुतीवेदना सुरू झाल्या, त्यावेळी त्या शेतात बाजरी सोंगत होत्या. देवरामबाबा करारी तर होतेच शिवाय फार शिस्तीचे होते. प्रत्येकाने शेतात यायलाच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. शेतातल्या पिकाची नासाडी झालेली तर त्यांना अजिबात चालत नव्हती. देवरामबाबांची एक आठवण शंकररावांनी सांगितली आहे. ''आमची आई घरातल्या काही स्त्रियांसोबत नदीवर मातेरं धुवायला गेली होती. सोबत मी होतो. त्यांनी मला शेतातून दोन–तीन ऊस तोडायला लावले. वडील बाहेरगांवी गेल्याने मी ऊस तोडला. पण नेमके बाबा तिथे आले. ऊस तोडल्याचं बघून फार संतापले. ऊस मी तोडला आहे असं समजताच त्यांनी त्याच ऊसाने ऊस मोडेपर्यंत मला मारलं.''[३] बाजारात जाईपर्यंत शेतीच्या पिकाचे अशाप्रकारे होणारे नुकसान हे शेवटी शेतकऱ्यांच्या मुळावर येते. शेतकऱ्याने सावधचित्त राहून दक्षतेने शेती करण्याचा देवरामबाबांचा गुण शंकरराव काळे यांनी उचलला. कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या केनयार्डमध्ये ते जेव्हा जायचे त्यावेळी प्रत्येक गाडीतला ऊस गव्हाणीमध्ये जातोय की नाही याकडे त्यांचे बारीक लक्ष असायचे. ऊसाची

कांडी अन् कांडी उचलून ते गव्हाणीमध्ये टाकायला लावायचे. ही काळजी शेवटी शेतकऱ्यांच्या फायद्याची ठरते, असे त्यांचे म्हणणे होते.

२) **शिक्षण –**

शंकररावांचे वडील देवरामबाबा फारसे शिकलेले नव्हते. परंतु त्यांच्याकडे जगाचा फार मोठा अनुभव होता. जग झपाट्याने बदलत चालले आहे याचा त्यांना अंदाज आला होता. पुढील काळात शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे त्यांनी ओळखले होते. आपल्या मुलांनी व पुतण्यांनी शाळेत जावे शिक्षण घ्यावे यासाठी त्यांचा आग्रह होता. अर्थात भरपूर शिकून त्यांची इच्छा शंकररावांनी पूर्ण केली. शंकरराव बी.एस्सी. बी. ई. (सिव्हील) झाले. त्याकाळात एवढे उच्च शिक्षण घेणारे कोपरगाव तालुक्यातले ते एकमेव होते.

माणूस ज्या वातारवणात वाढतो, मोठा होतो, शिकतो त्यातून त्याची जडणघडण होते. त्यावेळी झालेले संस्कार त्याला जन्मभर साथ देतात. आज शिक्षणाची साधने–संस्था, मुबलक उपलब्ध आहेत. शिकण्यासाठी फारच अडीअडचणींना तोंड द्यावे लागत नाही. परंतु १९३० च्या सुमारास अशी परिस्थिती नव्हती शिक्षण देणाऱ्या संस्था हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्याच होत्या. त्यामुळे अशा ठिकाणी प्रवेश घेणे ही अत्यंत कठीण गोष्ट होती. अगोदर प्राथमिक आणि त्यानंतर माध्यमिक शिक्षण घेताना विद्यार्थ्यांच्या पालकांच्या तोंडाला फेस यायचा. या विपरीत परिस्थितीवर मात करीत जे शिकले त्यांच्या दृष्टीने शिक्षणाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. म्हणूनच या परिस्थितीत शिकलेल्या पिढीने एक तर मोठ्याप्रमाणावर शिक्षण संस्था उभ्या केल्या किंवा शिक्षण संस्थांना प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे भरघोस मदत केली. शंकरराव काळे यांनी पुढे स्वतःच्या कारकिर्दीत रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात फार मोठे योगदान दिले. त्याची बीजे त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत घेतलेल्या शिक्षणात होती.

माहेगांव देशमुख या त्यांच्या मूळ गावापासून त्यांची वस्ती जवळजवळ पाच किलोमीटर शेतात होती. माहेगाव देशमुखला प्राथमिक शाळा होती. परंतु रोज ५ कि. मी. अंतरावरून शाळेत येणे जाणे शक्य नव्हते. म्हणून देवराम बाबांनी त्यांना कठोरपणे त्यांच्या आईपासून दूर करून गावातच एक आजी राहात होती तिच्याकडे ठेवले. त्यावेळी त्यांचे वय ५ वर्षांचे होते. तिच्याकडे भाकर तुकडा खाऊन ते शाळेत जायचे. ‘‘गावात एक माळी समाजाचा ज्योतिषी होता. त्याने माझे भविष्य आजीला सांगितलं होत. हा मुलगा पुढे फार मोठा मनुष्य होणार आहे, पण त्या भविष्यावर कोणाचा विश्वास

बसतो? या माहेगावच्या शाळेत मी उडाणटप्पू होईन म्हणून आमच्या गावातील एक ब्राम्हण कोपरगावला होते. त्यांच्याकडे मला ठेवले. त्या ब्राम्हणाला वर्षाला एक एकर ऊसाचे उत्पन्न द्यावे लागत होते ''[४] शंकरराव कोपरगावला शिकायला आले तेव्हा एक वर्ष वाया जाणार होते. म्हणून त्यांनी तिसरी आणि चौथीची परीक्षा एकाच वेळी दिली. कोपरगावात आजच्या म्युनिसिपालटीच्या शाळेच्या जागेवर पूर्वी मराठी शाळेची इमारत होती. या काळात सासवडकडच्या माळी समाजाने कोपरगाव तालुक्यात मोठ्याप्रमाणात शेती घेतली होती. व्यापार व शेतीबरोबरच कोपरगाव तालुक्यतील शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांनी माळी बोर्डींग कोपरगावात सुरू केले होते. ब्राम्हणाचे घर सोडून शंकररावांनी माळी समाजाच्या बोर्डींगमध्ये प्रवेश घेतला. त्या ठिकाणी राहण्याची व जेवणाची सोय झाली. त्यामुळे शिक्षणाला गती मिळाली. बोर्डींग नवीनच होती. त्यावेळी आजच्यासारख्या लाईटची सोय नव्हती. रात्री कंदिल घेऊन अभ्यास करावा लागत असे. शंकरराव फार हुशार नव्हते. परंतु कष्टाळू, ध्येयनिष्ठ होते. त्यामुळे १९३४ मध्ये व्हफा पास झाले. व्ह. फा. म्हणजे व्हर्नाक्युलर फायनल. तेव्हाची सातवी. सातवीचा विद्यार्थी एका वर्षात तीन वर्ग करीत असे. अशाप्रकारे कोपरगावात ते १९३४ साली सातवी पास झाले.

सातवी पास झाल्यानंतर काहीही झाले तरी पुढे शिकायचेच म्हणून वडीलांना बरोबर घेऊन ते नाशिकला गेले. नाशिक येथील उदोजी मराठा बोर्डींगमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. त्यावेळी त्यांचे वय तेरा वर्ष होते. सन १९३९ साली शंकरराव मॅट्रीक पास झाले. नाशिकला आज मुलींचे गव्हर्मेंट हायस्कूल आहे. त्या ठिकाणी बोर्डींग होती. कारभारी वाघ हे बोर्डींगचे सुपरिंटेंडेंट होते. त्यांची शिस्त फार कडक होती. त्या ठिकाणी जेवण वाढण्याचे काम हे विद्यार्थ्यांनाच करावे लागत असे. जेवताना दररोज एका विद्यार्थ्याने वर्तमानपत्राचे जाहीर वाचन करायचे. इतरांनी शांत बसून ते ऐकायचे. प्रत्येकाने स्वतःचे कपडे स्वतःच धुतले पाहिजे असा कडक नियम होता. आंघोळीनंतर प्रार्थना होत असे. या बोर्डींगमध्येच शिस्तीचे धडे त्यांना मिळाले. ''या ठिकाणी गाणू नावाचे क्लासटीचर होते. ते वर्गात नेहमी मला म्हणायचे, हा मुलगा आमदार होणार, मोठा मनुष्य होणार आहे.''[५] नाशिकच्या उदोजी मराठा बोर्डींगमध्ये असताना शंकररावांचे व्यक्तीमत्व सर्वांगाने फुलत गेले. या ठिकाणी त्यांनी खूप वाचन केले. याच ठिकाणी वाचनाची गोडी त्यांना लागली. माणसं कशी जोडावी, सांभाळावी याचे शिक्षण त्यांना आपोआप मिळत गेले. दररोज दैनिक जोरात वाचून दाखविण्याच्या नियमामुळे जगात काय सुरू आहे, याची

माहिती मुलांना व्हायची. वर्तमानपत्राचे वाचन करण्याची जबाबदारी रोज एका विद्यार्थ्यावर असल्यामुळे बऱ्याच वेळा शंकररावांचा आवाज चांगला असल्याने हे काम त्यांना करावे लागत असे. यातूनच त्यांची वक्तृत्वशैली विकसित होत गेली.

१९३९ साली मॅट्रीक झाल्यानंतर काही दिवस शंकरराव घरीच होते. या काळात त्यांना वडील देवरामबाबांच्या शिस्तीखाली शेतीची कामे करावी लागली. बैल, गायी राखण्याचे काम करावे लागले. अर्थात आपल्या मुलाने पुढे शिकावे अशी देवरामबाबांची इच्छा होती. परंतु शहरातील फारशी माहिती नसल्यामुळे स्वतः शंकररावांनी त्यासाठी पुढाकार घेतला. वडीलांचा मोठेपणा सांगताना ते म्हणतात ''शिक्षणाच्या बाबतीत माझ्या वडीलांनी मला कधीच कमी पडू दिलं नाही. पैसे देण्याशिवाय ते काय करू शकत होते? बाकी सारं मलाच करायचं होतं. वडीलांनी शिक्षणासाठी पैसे कधी कमी पडू दिले नाहीत आणि मीही शिकत गेलो. त्यांनी शिकवलं नसतं तर आज मी जो आहे तो घडलोच नसतो.''[६] चंदु पाटील या मुस्लीम समाजाच्या स्नेह्याची मदत घेऊन आणि वडीलांना बरोबर घेऊन ते पुण्याला गेले. इंजिनीअरींगला भविष्यात चांगली संधी आहे अशी माहिती मिळाल्यानंतर पुण्यातले एक चांगले कॉलेज म्हणून त्यांनी फर्ग्युसन कॉलेजात सायन्सला प्रवेश घेतला. वसतिगृहात त्यांना लगेचच प्रवेश मिळाला. येथील वातावरण नाशिकपेक्षा खुप वेगळे होते. १०१ नंबरच्या खोलीत राहण्याची व्यवस्था झाली. कॉलेजमध्ये अहमदनगर क्लब होता. त्यात जेवणाची व्यवस्था करून कॉलेज जीवनाला सुरूवात झाली. कॉलेजमधील एन.सी.सी. मध्येही त्यांनी भाग घेतला. त्यामुळेच त्यांना लष्करी शिक्षणही मिळाले होते. फस्ट इयरला उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी दुसऱ्या वर्षाला प्रवेश घेतला. त्याला इंटर सायन्स असे म्हटले जायचे. दुसऱ्या वर्षी होस्टेल सोडून बाहेर राहण्याची व्यवस्था केली. खानावळही बाहेरच लावली होती. मुलांची संख्या भरपूर होती. उत्तम प्रोफेसर, उत्तम प्लेग्राऊंड, लायब्ररी यामुळे त्यावेळी फर्ग्युसन कॉलेज हे पुण्यामधील एक नंबरचे कॉलेज होते. इंजिनीअरींगला जाण्यासाठी त्यांनी मॅथचा खाजगी क्लास लावला. पण सेकंड इयरला फक्त ४८% मार्क्स मिळाले. त्यावेळी ५४% च्यावर इंजिनीअरींगला प्रवेश मिळत होता. तेव्हा मुंबई इलाख्यात सरकारी इंजिनीअरींग कॉलेज दोनच होते. एक पुण्यात आणि दुसरे कराचीला, मुंबई इलाखा म्हणजे आजच्या पाकिस्तानातील सिंध प्रांत, गुजरात, मुंबई, प. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील बेळगांव, विजापूर इ. चार जिल्हे असा हा मोठा इलाखा आणि त्यात ही दोनच कॉलेज होती. ५४% वर ॲडमिशन बंद झाले. आत पुढे काय करायचे असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा

ठाकला. इंजिनीअरींग कॉलेजचे प्राचार्य मॅक्सनिकस हे नाशिकला डाव्या कालव्यावर डेप्युटी होते. त्यामुळे कोपरगावच्या सी. एम. मेहतांचे ते चांगले मित्र होते. त्यांच्या मैत्रीच्या संबंधामुळे गाईडलाईन मिळाली. आणि डीग्री ऐवजी त्याचवेळी डिप्लोमासाठी पुना इंजिनीअरींग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्या ठिकाणी त्यांना १००० गुणांपैकी ४०० मार्क्स वर्कशॉप, कारपेंटींग या विषयांना मिळाले धडधाकट व कष्टाळू असल्यामुळे त्यांनी चांगले मार्क्स मिळवले. इंटर सायन्सला मॅथ्सला फर्स्ट क्लास मिळवला. पण सर्व्हीसींग पेपरला नापास झाले. तेव्हा आजच्या सारखी ए.टी.के.टी. नव्हती. वर्ष वाया जाणार म्हणून फर्ग्युसन कॉलेजला ज्युनिअर बी.एस्सीला प्रवेश घेतला. इंजिनीअरींगला पूरक असे मॅथ्स् आणि जिऑलॉजी असे विषय घेतले. परंतु सेकंड इयर इंजिनीअरींगला पुन्हा बिल्डींग कन्स्ट्रक्शन मध्ये नापास झाले. त्यामुळे परत त्यांनी फर्ग्युसनला सिनियर बी. एस्सी. ला प्रवेश घेतला. ऑक्टोबरला सबस्टीट्यूट परीक्षा दिली. मात्र ते नाराज झाले नाही. कुवतीपेक्षा आपण अधिक महत्त्वाकांक्षा बाळगतो याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे थर्ड इयरचा पेपर सहा महिन्यात देऊन १९४७ मध्ये ते बी. एस्सी. व बी.ई. (सिव्हील) या दोन पदव्या घेऊन बाहेर पडले.[७]

**३ स्वातंत्र्य चळवळ –**

शंकरराव पुण्याला शिकत होते. त्याचकाळात स्वातंत्र्याच्या आंदोलनाने देशभर प्रचंड जोर धरला होता. त्याचे पडसाद महाराष्ट्रातील सर्व शहरांमध्ये व ग्रामीण भागात उमटले होते. साहजिकच शंकररावांसारख्या नवतरूणांमध्ये स्वातंत्र्याची प्रचंड उर्मी निर्माण झाली होती. देशाला स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय आपली प्रगती होणार नाही. इंग्रजांची गुलामगिरी संपविल्याशिवाय आपणाला मोकळा श्वास घेता येणार नाही अशी भावना प्रत्येक भारतीयांच्या मनात निर्माण झाली होती. ९ ऑगस्ट १९४२ रोजी ऑल इंडिया काँग्रेसच्या अधिवेशनात वर्कींग कमिटीने ठराव केला. त्यानुसार 'इंग्रजांनो चालते व्हा' आमच्या देशातील सरकार चालवायला आम्ही समर्थ आहोत, आमच्या लोकांचे कल्याण आम्ही करू शकतो अशी भाषणे सर्वत्र सुरू झाली होती. शंकररावांनी नुकताच इंजिनीअरींग कॉलेजच्या पहिल्या वर्षाला प्रवेश घेतला होता. मोठ्या परिश्रमाने इंजिनअरींगला प्रवेश मिळाला होता. त्यांना सिव्हील इंजिनिअर व्हायचे होते. त्यामुळे सभा, मोर्चे व भाषणे ऐकायला ते जायचे. परंतु अटक होऊ नये याची त्यांनी सतत काळजी घेतली. मात्र त्यांचे मित्र दत्ता देशमुख ताराबाई बोर्डींगमध्ये राहात होते. ते आणि इतर मित्र स्वातंत्र्यचळवळीत सहभागी झाले होते. ते सर्वजण भूमिगत असताना त्यांना

मदत करणे, पत्रके वाटणे, निरोप देणे-घेणे असे काम शंकररावांनी यावेळी केले. दत्ता देशमुख पकडले गेले होते. इकडे कोपरगावात शंकररावांचे चुलत बंधु विठू गमाजी काळे, स्वामी सहजानंद भारती, शांतीलाल लोहाडे, प्रेमचंद काले आणि राहत्यातील बऱ्याच मंडळीना यावेळी अटक झाली होती. या सर्वांना पुण्याच्या येरवडा कारागृहात ठेवण्यात आले होते. तेव्हा शंकरराव त्यांना येरवड्याला भेटायला जायचे. स्वामींचा आदेश कार्यकर्त्यांना पोहचवणे, सामान, काही वस्तू आणून देणे, निरोप देणे, अडीनडीला उपयोगी पडणे अशी कामे शंकरराव करायचे. नाशिकच्या काही तरूणांना नाशिक येथील जेलमध्ये टाकण्यात आले होते. त्यांनाही त्या ठिकाणी जाऊन मदत केली होती. स्वातंत्र्य चळवळीत खारीचा वाटा उचलणे महत्त्वाचे होते. परंतु सर्व काम त्यांनी अत्यंत गुपचूप व गुप्तता बाळगून केले. कारण त्यांना इंजिनीअर व्हायचे होते. उघडपणे केले असते व अटक झाली असती तर शिक्षण अपूर्ण राहिले असते. यासाठीच हे सर्व पथ्य पाळले. मात्र स्वातंत्र्यचळवळीतील सर्व मित्रांना व सहकाऱ्यांना अत्यंत निष्ठापूर्वक व मोलाची मदत केली होती. ''१५ ऑगस्ट १९४७ रोजी पहिल्या स्वातंत्र्यदिनी सत्ता हस्तांतरित झाली. तेव्हा मी इंजिनीअरींगच्या शेवटच्या वर्षाला होतो. यावेळी स्वातंत्र्य मिळाल्याचा प्रचंड आनंद झाला. खूप मोठा अभिमान वाटला.''[८] शंकरराव फारसे हुशार नव्हते. शिकवण्या लावून अभ्यास करून पास होत होते. स्वातंत्र्य संग्रामात प्रत्यक्षपणे उडी घेतली असती तर शिक्षण अपूर्ण राहिले असते व ते स्वातंत्र्यसैनिक झाले असते. परंतु वडिलांनी खूप कष्ट करून पैसे दिले होते याची जाणीव त्यांना सतत व्हायची. शिक्षणाला वडीलांनी कधीच पैसे कमी पडू दिले नाही. त्यावेळी वीस-वीस हजार रूपये त्यांनी शंकररावांजवळ पुण्याला बँकेत ठेवले होते. कारण गावात पोस्ट नाही. गावापासून वस्ती दूर अंतरावर होती. त्यामुळे पैशाची अडचण येऊ नये यासाठी वडिलांनी एवढी मोठी रक्कम त्यांच्या नावावर बँकेत ठेवली होती. एवढी रक्कम त्या काळात खूप मोठी होती. परंतु शंकररावांनी कधीही याचा गैरफायदा घेतला नाही. नाटक-सिनेमा व इतर गोष्टींमध्ये कधीही लक्ष घातले नाही. याउलट सतत वडीलांच्या कष्टाची जाणीव ठेवली. वक्तृत्वाची आवड असल्याने लायब्ररीत बसून वर्तमानपत्र, मॅगेझिन्स व इतर ग्रंथ यांचे सतत वाचन करून बोलायची सवय लावून घेतली. त्याचाच फायदा त्यांना पुढे सार्वजनिक जीवनात झालेला दिसून येतो.

## ४ मित्र परिवार –

स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षण संस्था अत्यंत कमी होत्या. पुणे, मुंबई सारख्या शहरांमध्ये चांगल्या शिक्षणाच्या सुविधा असल्यामुळे ग्रामीण भागातून अत्यंत तुरळकपणे काही मुले शिक्षणासाठी शहरांमध्ये राहात होती. ग्रामीण भागात शिक्षणाच्या सुविधा नसल्यामुळे बहुजन समाज मोठ्याप्रमाणात शिक्षणापासून वंचित राहीला होता. शहरामध्येही राहण्याची व्यवस्था होत नसल्युळे ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाची हेळसांड होत होती. पुण्यामध्ये तर त्यावेळी ब्राम्हण–ब्राम्हणेत्तर असा प्रकार बराच रूढ झालेला होता. बहुजन समाजाच्या मुलांनी शिकावे म्हणून छ. शाहू महाराजांनी पुढाकार घेतला. त्यांनी कोल्हापूरात इ. स. १९०१ मध्ये मराठा वसतिगृहाची स्थापना केली होती. शिवाय इतर जातींच्या लोकांनी वसतिगृहे सुरू करावी म्हणून त्यांनी प्रोत्साहन दिले. स्वतःच्या खजिन्यातून अनेकांना मदत केली. पुण्यामध्येही मराठा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे त्यांचे लक्ष होते. या काळात शिक्षण आणि सरकारी नोकरदारांमध्ये ब्राम्हण वर्ग सोडून कोणीच नव्हते. पुण्यामध्ये या काळात ब्राम्हण आणि दलित सोडून बाकी सर्वांना मराठे म्हटले जायचे. त्यामध्ये माळी, कुणबी, सोनार, सुतार अशा सर्व जाती येत असत. हा नोकरदार व शिक्षित ब्राम्हणवर्ग इतरांना तुच्छ लेखत असे. ‘अरे–कारे’ अशा भाषेत सर्वांशी बोलत असे. ब्राम्हणांची सर्वच क्षेत्रात मक्तेदारी निर्माण झाली होती. मात्र छत्रपती शाहू महाराजांनी ही मक्तेदारी मोडून काढण्यासाठी व बहुजनांच्या उद्धारासाठी कार्य सुरू केले होते. त्यांनी मराठा तरुणांसाठी सुरू केलेली वसतिगृहाची व्यवस्था १९४० च्या दरम्यान पुण्यात चांगली रूळली होती. त्यामुळे पुण्यात ताराबाई बोर्डींगमध्ये शंकररावांची चांगली सोय झाली. शाहू महाराज नसते तर मराठ्यांची शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात प्रगती झाली असती काय? असा प्रश्न त्यावेळी उपस्थित केला जात असे. या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी जरी असले तरी विचार केला तर मराठ्यांची प्रगती होण्यासाठी अजून पन्नास–शंभर वर्षे वाट पहावी लागली असती.

शंकररावांना पुण्यामध्येच असताना म. फुले, छ. शाहू यांचे विचार समजावून घेता आले. ब्राम्हण–ब्राम्हणेतर वाद कळू लागला होता. स्वातंत्र्य चळवळीतील आंदोलने जवळून पहाता आली होती. याशिवाय या पुण्याच्या वसतिगृहातील लाख मोलाचे अनुभव आयुष्यभरासाठी उपयोगी तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे पुण्यातील या कालावधीत अनेक जीवाला जीव देणारे मित्र मिळाले. या मित्रांबरोबर आयुष्याला एक चांगली दिशा मिळाली. पुढील काळात राजकीय व सार्वजनिक जीवनात अनेक संधी या

जिवलग मित्रांच्या सहकार्याने उपलब्ध झाल्या. या मित्रपरिवारात अनेकांचा उल्लेख करता येईल. पुण्याजवळील अवसरी येथील नामदेवराव शिंदे हे शंकररावांचे अत्यंत जवळचे मित्र होते. फर्स्ट इयरपासून ते शंकररावांबरोबर होते. त्यांना आई-वडील नव्हते. मोठ्या भावानेच त्यांचे पालनपोषण केले होते. साक्री (धुळे) येथील एन.वाय. पाटील हे आणखी एक शंकररावांचे जीवलग मित्र होते. त्यांचा भाऊ पुढारी होता. एन.वाय. अत्यंत कष्टाळू, हुशार होते. त्यांच्या नोटस्‌वरच शंकरराव अभ्यास करायचे. तसेच व्ही. डी. पवार हे देखील एक चांगले मित्र होते. ''व्ही.डी.पवार, नामदेव व मी ताराबाई बोर्डींगमध्ये एकाच खोलीत राहत होतो. आम्ही परममित्र होतो. व्ही. डी. चहा करायचा. मी व नामदेव भांडी घासायचो अशी आमची मैत्री होती.''[९] दत्ता देशमुख हा संगमनेरचा तरूण गोरागोमटा व राजबिंडा होता. पुण्यातच बी.ई. करत होता. नेहमी पांढरे स्वच्छ कपडे घालत असे. इंजिनीअरींग् कॉलेजच्या रेल्वे क्रॉसिंगजवळ तेव्हा ओव्हरब्रीज नव्हता. त्यामुळे सायकल उचलून न्यायला शंकररावांना नेहमी मदत करीत असे. तेव्हापासून त्यांची चांगली मैत्री जमली होती. दत्ता देशमुख १९४२ च्या चलेजाव चळवळीत सामील झाल्यामुळे त्यांना दोन वर्ष जेलमध्ये जावे लागले होते. त्यामुळे त्यांचे कॉलेज बुडाले. त्यानंतर त्यांनी परीक्षा दिली. आणि बी.ई. होऊन हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन गया येथे नोकरीला गेले. त्या ठिकाणी त्यांनी फार दिवस नोकरी न करता नगरला येऊन वकिली सुरू केली होती.[१०]

१९४६ मध्ये विधानसभेच्या चार जागा होत्या. बापुसाहेब भापकरांशी त्यांचा चांगला परिचय होता. चांगली मैत्री होती. भापकर डाव्या विचारांचे होते. दत्ता देशमुख यावेळी नगरला वकिली करत होते. स्वामी सहजानंद भारतींनी दत्ता देशमुखांना विधानसभेचे तिकिट दिले आणि दत्ता देशमुख निवडून आले. दत्ता देशमुख विधानसभेतही खुपच आक्रमक होते. यावेळी मोरारजी देसाई मुख्यमंत्री होते. त्यांचा कारभार चांगला नाही. म्हणून निघालेल्या मोर्चात दत्ता देशमुख सहभागी झाले. त्यावरून त्यांना अटक झाली. त्यांना जेलमध्ये टाकण्यात आले. आणि इकडे विधानसभेत सतत गैरहजर म्हणून त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले होते. पुन्हा निवडणूकीत दत्तांनी येरवडा जेलमधून अर्ज भरला. पण आर. सी. जोशी नावाचा जिल्हाधिकारी होता. प्रत्यक्ष उमेदवाराने अर्ज भरला नाही, म्हणून त्यांचा अर्ज बाद करण्यात आला आणि जगन्नाथराव बारहाते निवडून आले.[११] तेव्हा नऊ रूपये शेतसारा, घरपट्टी, घरभाडे भरणाराच मतदार असायचा सार्वजनिक मतदान नव्हते. आचार्य अत्रे यांनी या सर्व प्रकारावर 'नवयुग' मधून

'' हलकटपणाचा परमावधी'' असा लेख लिहिला. उच्च न्यायालयाने शेवटी हस्तक्षेप केला पुन्हा निवडणूक झाली. आणि दत्ता देशमुख निवडून आले. १९५२, ५७ व ६२ असे तीन ते वेळा निवडून आले. ''दत्ता देशमुखांना आपण बी.ई. झालो. नोकरी करावी, पैसा कमवावा असे वाटत नव्हते. त्यापेक्षा राजकारणात त्यांना आनंद वाटत होता. त्यांचे बंधु शंकरराव यांचे दत्तावर फार प्रेम होते. निवडणूक आली की ते यायचे. निवडणूकीसाठी दत्ता देशमुखांना मी सतत आर्थिक मदत द्यायचो. ते माझे अत्यंत जीवलग मित्र बनले होते.'' [१२]

कोल्हापूरचे पी. बी. पाटील, साताऱ्याचे बी. जी. शिर्के हे दोघे मित्रही शंकररावांना या काळात लाभले. ते दोघेही अत्यंत हुशार होते. दोघांच्याही घरची खूप गरिबी होती. दोघेही कॉलेजला एकाच सायकलवर येत असत. त्यांना डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीची स्कॉलरशीप मिळत होती. पुढे पी.बी. पाटील आमदार झाले. शिर्के फार मोठे उद्योगपती झाले. त्यांच्याकडे आज स्वतःचे हेलीकॉप्टर आहे. भरपूर पैसा मिळवला. तसेच संपूर्ण देशात नावलौकिक मिळवला आहे. त्यांची मुलेही अत्यंत चांगल्या रितीने काम करत आहेत. बी.जे. खताळ, रामदास चव्हाण असे अनेक मित्र शंकररावांना पुण्याच्या सहवासात मिळाले होते. बी. जे. खताळ पाटील आजही चांगले निरोगी आहेत. व्यायाम करतात. तीन चार वेळा ते मंत्री होऊन गेले आहेत. रामराव चव्हाण नगरला स्थायिक झाले आहेत. प्लॉट खरेदी–विक्रीचा व्यवसाय ते तेथे करतात. दत्ता देशमुखांनी एक दिवस आण्णासाहेब शिंदे यांची शंकररावांशी ताराबाई बोर्डींगवर ओळख करून दिली. दत्ताप्रमाणेच आण्णासाहेब इंटरला असतानाच स्वातंत्र्य संग्रमात सहभागी झाले होते आणि तुरूंगात गेले होते. तुरूंगांतच दत्तांची व त्यांची भेट झाली होती. ते आता पुण्यात एल.एल.बी. करण्यासाठी आले होते. आर्थिक अडचण असताना शक्य तेवढी मदत शंकरराव सर्व मित्रांना करत असत.[१३] आण्णासाहेबांचा आणि शंकररावांचा दिवसेंदिवस परिचय वाढत गेला. पुढे आण्णासाहेब राजकारणात आले. त्यांनी शंकररावांना देखील राजकारणात फार मोठी मदत व सहकार्य केले. लोणीचा प्रवरा सहकारी साखर कारखाना काढण्यासाठीही आण्णासाहेबांनी खूप कष्ट घेतले होते. दिल्लीच्या राजकारणात ते खूप स्थिरावले होते. १८ वर्षे कृषिराज्यमंत्री म्हणून केंद्रियमंत्री मंडळात त्यांनी अत्यंत चांगले काम केले. १९६२ मध्ये जिल्हा परिषद अस्तित्वात आल्या. तेव्हा जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष म्हणून शंकररावांना जी संधी मिळाली. त्यामध्ये आण्णासाहेबांचे मोलाचे सहकार्य लाभले होते. पुढे १९६७ च्या विधानसभा निवडणूकीत

शंकरराव पराभूत झाल्यानंतरही पुन्हा जिल्हा परिषद अध्यक्ष करण्यासाठी आण्णासाहेबांनी शंकररावांना चांगली मदत केली. आण्णासाहेबांच्या रूपाने एक चांगला मित्र शंकररावांना मिळाला होता. आण्णासाहेबांनी दिड तप दिल्लीत कृषिराज्यमंत्री म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे. सामाजिक क्षेत्रातही त्यांनी अत्यंत चांगले काम केले आहे. त्यांनी केलेल्या कामामूळेच कृषिक्षेत्रात क्रांती घडून आली. शेतकरी आणि सहकार वाढला. आण्णासाहेबांचे बंधु रावसाहेब हे सध्या रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन आहेत. तेही शंकररावांचे अत्यंत चांगले मित्र होते. अशा रितीने शंकररावांनी शिक्षण घेत असताना अत्यंत जीवाभावाने साथ देणारे मित्र मिळवले होते. आयुष्याच्या जडणघडणीमध्ये पुढे कळत–नकळत मित्रांचे फार मोठे योगदान मिळाले आहे.

**५ विवाह – प्रवाहाविरूद्ध –**

१९४७ साली शंकरराव बी. एस्सी. बी. ई. (सिव्हील) झाले. त्यावेळी कोपरगाव परिसरातही त्यांच्या इतका शिकलेला दुसरा कोणीही नव्हता. त्यांनी मनात आणले असते तर त्या काळी अतिशय मोठ्या हुद्दयाची नोकरी त्यांना सहज मिळाली असती. पुण्यामध्येच त्यांनी दोन महिने नोकरी केली. पुण्यात त्यावेळी नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (एन.सी.एल.) इमारत उभारणीचे काम सुरू होते. या कामावर देखरेखीसाठी त्यांची एका ठेकेदाराकडे शंभर रूपये पगारावर नेमणूक झाली होती. मात्र थोड्याच दिवसात घरून वडिलांचा निरोप आला. वडिलांनी चैनचा ट्रॅक्टर घेतला होता. तो लासलगावला रेल्वे स्टेशनवर उतरून घ्यावयाचा होता. वडिलांना त्यातील काहीच माहीत नव्हते. त्यामुळे शंकरराव दोन महिन्यांची नोकरी सोडून ताबडतोब माहेगांवला आले. आपल्या मुलाने नोकरी करावी अशी देवरामबाबा यांची कधीच इच्छा नव्हती. पुढची दोन वर्ष त्यांनी मनापासून शेती केली. या दोन वर्षाच्या काळात त्यांनी शेतीमध्ये बरेच प्रयोग केले. वडीलांनी घेतलेल्या नवीन ट्रॅक्टरच्या मदतीने त्यांनी शेतीत ऊसाची लागवड मोठ्या प्रमाणात केली. ऊसाच्या शेतात तण फार माजत असे. ते काढून टाकण्यासाठी जरा जास्त पैसे खर्च करून ऊसाचे भरपूर पीक घेतले होते. पण मुलाने शेतीवर जास्त पैसे खर्च केले म्हणून वडीलांचे आणि मुलाचे मतभेद झाले. बाबांचा स्वभाव काटकसरी तर शंकरराव थोडा जास्त मोबादला देऊन खर्च करून जास्त उत्पन्न घेण्याच्या स्वभावाचे होते.

शेतीवरून बाबांशी मतभेद झाल्यानंतर शंकररावांनी नोकरी करण्याचा विचार पक्का केला. परंतु त्या अगोदर त्यांनी स्वत:च्या लग्नाच्या निमित्ताने केवळ घरच्यांनाच नव्हे तर अप्रत्यक्षपणे संपूर्ण समाजाला धक्का देऊन समाजासमोर एक आदर्श

ठेवला. सन१९४८ मध्ये शंकररावांचा विवाह सुशिलाबाई उर्फ माई यांच्या बरोबर झाला.[१४] सुशीलामाईंचे वडील रिटायर्ड पोस्ट मास्तर शंकरराव तुकाराम जगताप हे अहमदनगरला राहत होते. त्यांना सहा मुले व चार मुली होत्या. जगताप यांचा ब्राम्हणेत्तर चळवळीशी जवळून संबंध होता. बापुसाहेब भापकर, रावबहादूर नवले, भाऊसाहेब कानवडे, ही मराठा समाजातील सुधारक मंडळी मराठा समाजाची सुधारणा, जुन्या समजुतींचे समाजातून उच्चाटन करून मुलींना शिक्षण देण्याच्या बाबतीत पुढाकार घेत असत. जगतापांनीही त्यांच्या मुलांना काळाच्या मानाने उत्तम शिक्षण दिले. विशेषतः आपल्या मुलींनी शिकावे याकडे त्यांचा फार मोठा कटाक्ष होता. तो काळच असा होता की, बहुतेक समाज मुलींना शिकवण्यासाठी फार उत्सुक नव्हता. साधारणपणे मुलगी तिसरी–चौथी शिकली की, लगेच तिचे लग्न करून दिले जात असे. बाराव्या – पंधराव्या वर्षीच मुलींना संसारात अडकवले जायचे. अशा वातावरणात शंकरराव जगताप यांनी मुलींना उत्तम शिक्षण दिले. विशेष म्हणजे मुलींच्या लग्नात त्यांनी हुंडा दिला नाही.

देवरामबाबा म्हणजे शंकररावांचे वडील रूढी–परंपराच्या बाबतीत फार आग्रही होते. याबाबत शंकरराव गमतीने म्हणतात की, ‘‘बाबांनी आग्रह धरला असता तर मला दुसऱ्याच मुलीसोबत लग्न करावं लागलं असतं. पण बाबांना ते अजिबात मान्य नव्हतं. ते माझ्या लग्नाच्या बाबतीत एकदम हातघाईवर आले. अर्थात माईंसोबत माझं लग्न झाल्याने माझ्या आयुष्याला चांगली कलाटणी मिळाली. त्यांनी मला खूप मोलाची साथ दिली.’’[१५] घरी लग्नाची घाई सुरू झाली. तेव्हा शंकररावांचे एक स्नेही श्री. मुळाणे यांनी त्यांना सुशीलामाईंचे स्थळ सुचविले. हुंड्याच्या बाबतीत शंकरराव आणि सुशिलामाईंचे वडील शंकरराव जगताप यांचे विचार जुळणारे होते. हुंडा न घेता लग्न करायचे असा निश्चय शंकररावांनी केला होता. शंकररावांनी मुळाणेंच्या सूचनेनुसार अपरोक्षपणे मुलीला बघायचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी नगरला शाळेच्या रस्त्यावर सुशीलाबाईंना बघितले. त्यांना मुलगी पसंत पडली. त्यानंतर शंकरराव जगतापांनी देवराम बाबांची भेट घेतली. तोपर्यंत मुलगा हुंडा न घेता लग्न करणार आहे याची देवरामबाबांना अजिबात कल्पना नव्हती. ते रिवाजाप्रमाणे मुलगी बघायला गेले. शंकररावांनी आधीच ठरवले असल्याने पसंतीचा प्रश्नच नव्हता. व्यवहाराची बोलणी सुरू झाली आणि हुंडा न देण्याच्या आपल्या विचारावर ठाम राहत जगतापांनी २५१ रू. देऊ असे सांगितले. देवरामबाबा त्यावेळी काहीच बोलले नाहीत. ते आधी जगतापांच्या घराबाहेर पडले आणि खाली उभे राहून रागारागाने बोलू लागले. या सगळ्याला आपल्या मुलाची संमती आहे हे

समजल्यावर तर ते आणखीच भडकले. पण शंकरराव काळे आपल्या विचारावर ठाम होते. त्यांना हुंडा न घेता, जेवणावळी न घालता अतिशय साध्या पद्धतीने लग्न करायचे होते. सोबतच्या नातलगांनी देवरामबाबांची समजूत घातली. मुलाचा आग्रह पाहून देवरामबाबाही शांत झाले. देवरामबाबांनी सुशिलाबाईंच्या अंगावर तेरा तोळा सोने घातले. लग्नाचा सारा खर्चही देवरामबाबांनीच केला. शंकररावांनीही लग्नासाठी नवे कपडे न घेता जुन्याच कपड्यांना इस्त्री केली. जुनाच कोट घालून कोपरगावच्या शुक्लेश्वर मंदिरात अत्यंत साध्या पद्धतीने विवाह केला. विशेष म्हणजे लग्नासाठी मुहूर्त देखील काढला नाही.

पुरोगामी विचारांचा प्रभाव असल्याने हुंडा घेऊन थाटामाटात लग्नसोहळा व जेवणावळी घालण्यास शंकररावांचा प्रथमपासून विरोध होता. योगायोगाने त्यावेळी पंचवीसपेक्षा जास्त माणसांना भोजन देण्यास कायद्याने बंदी होती. बंदी झुगारून बाबुराव सणस यांच्या घरी जेवणावळीला एकदा हजर राहिले म्हणून केशवराव जेधे आणि शंकरराव मोरे यांच्यावर खटला भरण्यात आला होता. केशवराव जेधे हे त्यावेळी काँग्रेसचे प्रांताध्यक्ष होते.[१६] ''आपल्या बहुजन समाजात या डामडौलाने माणसे कर्जबाजारी होताता. मुलीकडच्या मंडळीना खर्चात टाकतात. दहा, दहा मुली पाहून स्त्रियांचा अपमान करतात. या गोष्टी मला आवडत नाहीत, म्हणून मी बाबांच्या विरोधात बंडच केलं, असंच आज मला वाटतं.''[१७] वास्तविक मनात आणले असते तर शंकरराव काळे यांना भरपूर हुंडा मिळू शकला असता, मोठ्या धुमधडाक्यात ते लग्न करू शकत होते. आजही मराठा समाजात प्रचंड पैसा खर्च करून वाजत-गाजत लग्न होतात. पन्नासवर्षापूर्वी तशी प्रथाच होती. पण या सर्व गोष्टींना छेद देत शंकरराव काळे यांनी अतिशय साध्या पद्धतीने लग्न करून कृतीने एक आदर्श सगळ्यांसमोर ठेवला. मराठा समाजातला एक उच्चशिक्षित मुलगा साध्या पद्धतीने लग्न करतो, भरपूर ऐपत असताना लग्नाच्या जेवणावळी घालत नाही. हीच गोष्ट अनेकांना धक्का देणारी होती. पण आपल्या निर्णयाशी पक्के राहून शंकररावांनी त्यांच्यावर असलेल्या पुरोगामी संस्कारांचा प्रभाव दाखवून दिला होता.

**६ नोकरीचा अनुभव –**

पुण्याची नोकरी सोडून आल्यानंतर काही दिवस शंकरराव माहेगावलाच होते. दरम्यानच्या काळात लग्न झाले आणि ते झटून शेतीच्या कामाला लागले. देवरामबाबांनी घेतलेला लार्सन ॲण्ड टिब्रो कंपनीचा चैन ट्रॅक्टर ते स्वतः चालवू लागले. शंकररावांनी शेती करावी, अशीच देवरामबाबांची इच्छा होती. ट्रॅक्टर ड्रायव्हर म्हणून काम करताना घरची शेती थोडीच असल्यामुळे ट्रॅक्टर उभा राहण्याऐवजी दुसऱ्यांच्या शेतात शंकरराव मशागतीला जाऊ लागले. ट्रॅक्टरला खूपच मागणी होती. रात्रंदिवस काम करू

लागले. कामात रमून आवडीने काम करू लागले होते. शेतीच्या कामात त्यांनी स्वतःला गुंतवून घेतले. घरचे गुऱ्हाळ होते. त्यामध्ये सुधारणा केली. लाकडी चरक्याऐवजी डिझेल इंजिनवर चालणाऱ्या क्रशर्सचा त्यात उपयोग केला. गुऱ्हाळ, कढाया, चुलांगण, गुळ तयार करणे, लासलगांवला विकायला नेणे अशी कामे शंकरराव करू लागले. मुलगा सुशिक्षित असूनही शेती करतो याचे देवरामबाबांना समाधान वाटत होते. नंतर त्यांच्यावरचा विश्वास वाढला म्हणून फक्त गुळाचे ट्रक लासलगांवला घेऊन जाणे-आणणे अशी कामे ते करू लागले होते. शंकररावांना तीन भाऊ होते. शंकरराव चौघांपैकी सर्वात मोठे असल्याने शेतीच्या व्यवहाराची सर्व जबाबदारी त्यांच्यावर आली होती. दोन नंबरचे भाऊ सुकदेव यांच्याकडे शेतीवर लक्ष देण्याची जबाबदारी होती. ऊसाची लागवड करणे, पाणी देणे, खते देणे अशी सर्व जबाबदारी त्यांच्याकडे होती. तीन नंबरचे बंधू किसन यांचेकडे ट्रॅक्टरची जबाबदारी सोपविली होती. आणि सर्वात लहान भाऊ गोविंदा हे शाळेत शिक्षण घेत होते. असा सर्व प्रपंच सुरू होऊन शंकररावांवर सर्वच प्रकारची जबाबदारी आली होती. या दरम्यान देवरामबाबा तीन चार महिन्यांसाठी चारधाम यात्रेला गेले. यावेळी शंकररावांनी पंचवीस एकरात ऊस उभा केला होता. देवरामबाबा यात्रेवरून आल्यानंतर शेतीचा सर्व खर्च फार झाला म्हणून ते प्रचंड चिडले. शंकररावावर अतिशय संतापले. त्यामुळे शंकररावांनाही देवरामबाबांच्या बोलण्याचा राग आला. म्हणून शंकररावांनी नोकरी करण्याचे ठरविले. त्याचवेळी खासदार भाऊसाहेब हिरे नाशिक जिल्हा काँग्रेसचे नेते आणि जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. आपल्या मराठा समाजाचा मुलगा ग्रॅज्युएट इंजिनअरींग आहे म्हणून त्यांनी शंकररावांना जिल्हा लोकल बोर्डात चिफ इंजिनीअर करतो म्हणून शब्द दिला. परंतु नोकरीचा अनुभव नसल्यामुळे एकदम चिफ इंजिनीअर करता आले नाही. मात्र सब डिव्हिजनल ऑफिसर म्हणून शंकररावांची नेमणूक मालेगांवला केली होती. शंकरराव सुशिलामाईंना घेऊन मालेगावला राहू लागले. तेव्हा सरकारी स्वतंत्र क्वार्टर नव्हत्या. त्यामुळे भाड्याच्या घरातच ते राहू लागले. नोकरीही फिरतीच होती. शंकररावांकडे बागलाण (सटाणा), कळवण, मालेगांव व चांदवड असे चार तालुके होते. स्वतःचे वाहन नसल्यामुळे बसने प्रवास करायाचा. जेथे बसची सोय नसेल तेथे सायकलने प्रवास करायचा अशी धावपळीची नोकरी शंकररावांची सुरू झाली होती. दरम्यानच्या काळात घरी माहेगांवला ऊसाचे पिक निघाले होते. शंकररावांनी लावलेल्या ऊसाचे उत्पन्न चांगले मिळाल्याने व भावही चांगला मिळाल्याने देवरामबाबांचा शंकररावांवरील राग गेला होता. तेव्हा वडीलांना मुलाने शेतीसाठी घेतलेल्या कष्टाची जाणीव झाली होती.

देवरामबाबा मालेगांवला शंकररावांकडे गेले आणि उत्पन्न चांगले झाले, भावही चांगली मिळाला म्हणून नोकरी करण्यापेक्षा घरी परत चल म्हणू लागले. परंतु शंकरराव घरी जाण्याच्या मनःस्थितीत नव्हते. भाऊसाहेब हिरे शब्दांचे पक्के होते, शंकररावांना चीफ इंजिनीअर करण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला. प्रस्तावाच्या बाजूने मंजुरी देण्यासाठी सभासदांना त्यांनी तयारही केले होते. पण ज्या दिवशी ही बैठक होणार होती. त्याच दिवशी सरदार वल्लभभाई पटेल यांचे निधन झाले. त्यामुळे ती सभा होऊ शकली नाही. आणि पुन्हा तो योग कधीच आला नाही. त्यामुळे शंकरराव नोकरी सोडण्याचा विचार करू लागले. नगरला सरदार थोरात होते. मराठा समाजाचे सुधारक म्हणून त्यांचे बरेच नाव होते. त्यांची आणि शंकररावांचे सासरे यांची ब्राम्हणेत्तर चळवळीच्या निमित्ताने चांगली मैत्री होती. सरदार थोरात नगर जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. ते शंकरराव जगतापांना म्हणाले, ''अरे आपला जावई नाशिकला नोकरी करतोय. त्याला इकडे घेऊन ये. आपण इथे नोकरी देऊ''[१८] नाशिक लोकल बोर्डाच्या नोकरीत काही भविष्य दिसत नसल्याने शंकररावांनी सासऱ्याच्या सांगण्यावरून नगर जिल्हा लोकल बोर्डात नोकरी स्वीकारली. परंतु सात–आठ महिन्यांच्या कालावधीनंतर त्यांनी याही नोकरीचा राजीनामा दिला. अर्थात शंकरराव काळे नाशिकला चीफ इंजिनीअर झाले नाहीत हे एका अर्थाने अत्यंत चांगले झाले. कारण तसे झाले असते तर त्यांच्या आयुष्याला वेगळीच दिशा मिळाली असती. मुख्य म्हणजे पुढील आयुष्यात त्यांच्याकडून सहकार आणि सामाजिक क्षेत्रात जे भरघोस कार्य झाले ते घडले नसते. सामाजिक कार्याची आवड, लोकांची सेवा करण्याची वृत्ती आणि नवनिर्मितीसाठी धाडसी काम अंगावर घेण्याचा स्वभाव यामुळे शंकररावानी राजकारणात आणि समाजकारणात उतरण्याचा निर्णय घेतला.

**७ उदयोन्मुख नेतृत्व –**

जिल्हा लोकल बोर्डात काम करीत असताना जिल्हयातील अनेक राजकीय नेत्यांशी शंकररावांचा चांगला परिचय झाला होता. वास्तविक त्या वेळी संपूर्ण भारतात काँग्रेसचे जोरदार वारे वाहत होते. स्वातंत्र्य मिळवून देणारा पक्ष म्हणून काँग्रेसला जनमानसात आदराचे स्थान होते. अशा काँग्रेसतर्फे निवडणूक न लढवता काँग्रेसच्या तुलनेत खूपच नव्या असलेल्या शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) तर्फे शंकररावांनी विधानसभेची निवडणूक लढवली होती. मात्र त्यावेळची परिस्थिती आणि आयुष्यात काही घडलेल्या घटना यामुळे शंकररावांनी शेकापकडून निवडणूक लढवून पराभव पदरी पाडून घेतला होता.

१९४२ च्या सुप्रसिद्ध ऑगस्ट ठरावात कॉंग्रेसने किसान कामगार यांचे राज्य स्थापन करण्याची घोषणा केली होती. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी कॉंग्रेस पक्षात अनेक विचारांचे प्रवाह सामील झाले होते. त्यात साम्यवादी, समाजवादी, गरिबांचे कैवारी, श्रीमतांचे पुढारी, भांडवलदारांचे प्रतिनिधी अशी सर्वांची गर्दी होती. पण स्वातंत्र्य मिळाल्यावर कॉंग्रेसकडे सत्ता जाण्याची लक्षणे दिसू लागताच उजव्या घटकांचा प्रभाव वाढू लागला आणि शेतकऱ्यांचे कामगारांचे कैवारी मागे पडू लागले. त्याअगोदर कॉंग्रेस पक्षात अनेक उपपक्ष आणि घटक पक्ष होते. १९४६ साली २४ एप्रिलला अखिल भारतीय कॉंग्रेसच्या महाअधिवेशनात 'कोणत्याही कॉंग्रेसजनाला स्वतंत्र घटना आणि कार्यक्रम असणाऱ्या पक्षाचे सभासद होता येणार नाही' असा नियम मंजूर केला होता.[११] या निर्णयावर बऱ्याच उलट-सुलट प्रतिक्रिया त्या काळात व्यक्त झाल्या होत्या. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यावर कॉंग्रेस विसर्जित करावी ही महात्मा गांधी यांची सूचना कॉंग्रेसमधल्या काही गटांनी उडवून लावली. कॉंग्रेस विसर्जित न करण्याचा विचार अनेकांना आवडला नाही. शिवाय कॉंग्रेसमध्ये उपपक्ष किंवा घटक असू नयेत हे अनेकांना आवडलेले नव्हते. महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीत त्यावेळी अशोकराव जेधे, शंकरराव मोरे, क्रांतिसिंह नाना पाटील, दत्ता देशमुख, तुळशीदास जाधव, कर्मवीर भाऊराव पाटील, व्ही. एन. पाटील या जेष्ठ नेत्यांचा मोठा गट होता. कॉंग्रेसचे बदलते स्वरूप त्यांनाही मान्य नव्हते. तेव्हा महाराष्ट्र कॉंग्रेसमध्ये काही ठराविक समाजाचे वर्चस्व असलेला एक मोठा गट कार्यरत होता. या सर्व कारणांमुळे कॉंग्रेस पक्ष हा आता बहुजनांचा राहिलेला नाही या निष्कर्षापर्यंत ही सर्व मंडळी आली होती. शेवटी शंकरराव मोरे यांनी शेतकरी कामगार संघटनेचे अध्यक्ष या नात्याने २६ एप्रिल १९४८ रोजी मुंबईला भाऊसाहेब राऊत यांच्या घरी एक बैठक बोलाविली. त्या बैठकीत १९४२ च्या ऑगस्ट ठरावानुसार शेतकरी, कामगारांचे राज्य आणण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. त्याच ठिकाणी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. बहुजनांचा पक्ष म्हणून शेकापच्या कामाला वेग आला.

या सर्व घडामोडी घडत असताना शंकरराव जिल्हा लोकल बोर्डात नोकरीमध्ये रमलेले होते. परंतु सुरू असलेल्या घडामोडींकडे त्यांचे बारीक लक्ष होते. पुण्याला शिकत असताना ताराबाई बोर्डींगमध्ये बी. जे. खताळ, पी. जी. साळुंके, दत्ता देशमुख, बी. जी. शिर्के त्यांचे रूमपार्टनर होते. दत्ता देशमुख तर त्यांचे अत्यंत खास मित्र होते. त्यांच्याशी घरोबा होता. मुळातच शेतकरी कष्टकरी यांचे आयुष्य अगदी जवळून पाहिल्याने शंकररावांचा ओढा शेकापकडेच होता. त्यातच दत्ता देशमुखांशी घट्ट मैत्री

असल्याने त्यांनी शेकापच्याच माध्यमातून राजकारण करायचे ठरविले. याच दरम्यान दाभाडी येथील शेकापच्या परिषदेला तीन दिवस हजर राहण्याची संधी मिळाल्याने त्यांची शेकापबद्दलची वैचारिक भूमिका अधिक स्पष्ट आणि पक्की झाली. त्यावेळी शंकरराव मालेगांवला सब डिव्हिजनल ऑफिसर म्हणून होते. दाभाडी हे गाव तेथून केवळ पाच किलोमीटर अंतरावर आहे. शेकापचे अधिवेशन तेथेच असल्याने शंकरराव या अधिवेशनाला सहजपणे हजर राहू शकले. हे अधिवेशन 'दाभाडी प्रबंध' या नावाने प्रसिद्ध आहे. शंकरराव काळे यांनी काँग्रेस सोडून शेकापच्या माध्यमातून राजकारण प्रवेश का केला यामागे एवढा सर्व इतिहास होता. आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे खुद्द देवरामबाबा हे राजकारणाच्या धकाधकीपासून दूर असले तरी त्यांचा कल शेकापकडेच होता. कारण त्यांचे मित्र आणि स्नेही गणपतराव रभाजी औताडे हे शेकापचे खंदे समर्थक होते. औताडेंच्या सांगण्यावरून देवरामबाबांनी शेकापच्या मुखपत्राच्या प्रकाशनासाठी २५,००० रूपयांची मदतही केली होती.[२०]

१९५२ च्या विधानसभा निवडणूकीत कोपरगावातील पुरोगामी मंडळींनी शंकररावांना काँग्रेसच्या विरोधात निवडणूक लढविण्याचा आग्रह केला. शंकररावांनाही काँग्रेसच्या विरोधात निवडणूक लढविण्याची इच्छा होती. मात्र निवडणूक लढविल्यास वडिलांचा विरोध होता. कोपरगावातील काँग्रेसमंडळी स्वामी सहजानंदभारती, सरदार थोरात यांनी विधानसभेसाठी काँग्रेसचे तिकिट देतो असे शंकररावाना सांगितले. पण डोक्यात दाभाडी प्रबंधाचे वारे होते. त्यामुळे त्यांनी या प्रस्तावाला नकार दिला. शंकररावांऐवजी पत्नी सुशिलाबाईंना काँग्रेसचे तिकिट देतो असाही प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेवण्यात आला. पण त्यालाही त्यांनी नकार दिला. काँग्रेसचे तिकिट नाकारून शेकापकडून शंकररावांनी निवडणूक लढविली. कोपरगाव तालुक्यातील सर्वच काँग्रेसविरोधी मंडळींनी शंकररावांना निवडणूक लढवावी या गोष्टीला पाठींबा दिला. १९५१ मध्ये ते नोकरीचा राजीनामा देऊन निवडणूकीच्या रिंगणात उतरले. निवडणूकीची धामधूम सुरू झाली. प्रचार कार्यालय थाटले. प्रचार यंत्रणा उभी राहिली. सर्व कार्यकर्त्यांनी पाठबळ दिले. काँग्रेसकडून जगन्नाथ बारहाते (पुणतांबा) यांना उभे करण्यात आले. समाजवादी पार्टीकडून गंगाधर गवारे उभे होते. बाकी डाव्या विचारांच्या पक्षांनी शंकररावांना पाठींबा दिला होता. काँग्रेसच्या नेत्यांनी ब्रिटीशांना देशाबाहेर काढले. स्वातंत्र्य मिळवून दिले, घटना तयार केली. घटनेनुसार सामान्य माणसाला मतांचा अधिकार मिळूवन दिला, हे विचारात घेऊन जनता काँग्रेसबरोबरच राहणार होती. त्यामुळे

काँग्रेसचे उमेदवार जगन्नाथ बारहाते विजयी झाले. अर्थात ते डमी उमेदवार होते. प्रांतीय काँग्रेसने के. बी. रोहमारेंना तिकीटाची शिफारस केली होती. तर बारहाते पंडीत नेहरूना जाऊन भेटले होते. संपूर्ण भारत काँग्रेसमय झाला होता. याबाबत शंकरराव सांगतात ''माझ्याकडे तर पैसे नव्हते फक्त पाच सहा हजार रूपये होते. निवडणूक लढविण्याला वडिलांचा तीव्र विरोध होता. पण माझाही आग्रह मी सोडला नाही. मी गणपतराव औताडे यांच्याकडून दहा हजार रूपये ऊसनवार घेतले आणि काँग्रेसच्या विरोधात शेकापतर्फे निवडणूक लढविली आणि त्यात पराभूत झालो.''[२१]

निवडणूकीत पराभूत झाल्यानंतर शंकररावांचा अतिशय कष्टाचा कालखंड सुरू झाला. परंतु या त्रासातून त्यांच्यातला कुशल संघटक आकाराला येत गेला. मुलगा निवडणूक हरला. पैसे खर्च केले. म्हणून देवरामबाबांनी त्यांना शेतीच्या कामाला जुंपले. पुढची पाच–सहा वर्षे शंकरराव हे सारे काही विसरून शेती करत होते. गणपतराव औताडे हे पैसे मागायला यायचे पण त्यांचा शंकररावांवर जीव होता. याच्या हातून मोठे काम घडू शकते याची त्यांना खात्री पटली होती. यातून कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची कल्पना गणपतराव औताडे यांच्या मनात आली आणि शंकररावांनी ते आव्हान स्विकारले.

**८ सहकाराची मुहूर्तमेढ –**

शंकरराव १९५२ च्या निवडणूकीतून अनेक गोष्टी शिकले होते. त्यात गावचा विकास करणे एकट्या माणसाचे काम नाही. सर्वांचेच सहकार्य असले पाहिजे हा विचार त्यांनी केला. ते स्वतः शेती करू लागले होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांना समजत होत्या. माहेगांव देशमुख विभागाला शेतीसाठी पैशाची आवश्यकता होती. कार्यकर्त्यांचा आग्रह सेवा सोसायटी काढावी असा होता. शंकररावांनी सर्व गावकऱ्यांच्या सहकार्यातून ३० एप्रिल १९५३ रोजी 'माहेगांव देशमुख विविध कार्यकारी विकास सेवा संस्था मर्यादित' ही सोसायटी सुरू केली.[२२]

अपयशाने खचून जाणे हा स्वभावच त्यांचा नव्हता. जी आव्हाने समोर येतील त्यांना निधड्या छातीने भिडायचे ही वृत्ती असल्याने त्यांनी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीसाठी सारा जीव एक केला. जीवन म्हणजे आव्हान, प्रदीर्घ साहस, आणि पात्रतेची कसोटी असते हे त्यांना अनुभवाने समजले होते. नवी आव्हाने अंगावर घेण्याची आवड होतीच, त्यात समाजसेवाही जोडलेली आहे हे बघितल्यावर त्यांनी कोपरगाव सहकारी साखर कारखान्यासाठी स्वतःला अक्षरशः वाहून घेतले. त्यावेळी महाराष्ट्रात सहकाराचे वारे वाहत होते. आपल्या भागातही ऊसाचे चांगले पीक आहे.

त्याचा उपयोग करून शेतकऱ्यांना संघटित करून सहकारी साखर कारखाना उभारून आपल्या उपेक्षित भागाचा विकास करू शकतो हे त्यांनी ओळखले. श्री. गणपतराव रभाजी औताडे व शंकरराव एक एक माणूस एक एक वीट जोडत गेले. पैसा-पैसा उभारत गेले. आणि अवघ्या तीन वर्षात कारखाना उभा राहिला. विकासाचे रथचक्र फिरू लागले. विरोधक, समर्थक, सहकारी या अफाट कार्याने अचंबित झाले. माहेगांव देशमुख मधल्या एका सामान्य शेतकऱ्याच्या मुलाने असामान्य कष्ट उपसून एक कामधेनू उभी केली होती. १९५३ मध्ये साखर कारखान्याच्या उभारणीला सुरूवात केली आणि १९५६ मध्ये पहिल्या गळीत हंगामात ५२,२३४ मेट्रीक टन ऊसाचे गाळप झाले.[२३] ही बाब अत्यंत उल्लेखनीय ठरली.

शंकररावांमुळे कोपरगाव तालुक्याच्या विकासाला गती मिळू लागली. धनंजयराव गाडगीळ, वामनराव वर्दे, पद्मश्री विखे पाटील, गणपतराव औताडे या जेष्ठांच्या विचारांची बैठक या विकासाला लाभली. एका माळरानाचे रूपांतर नंदनवनात होऊ लागले होते. शंकरराव काळे यांचे आयुष्य दोन महत्त्वाच्या टप्प्यात विभागलेले आहे. या काळात त्यांच्यातला कार्यकर्ता-संघटक घडत होता. नवे प्रयोग ते करत होते. तर दुसऱ्या टप्प्यात त्यांच्यातील कुशल संघटकाची जागा कुशल नेतृत्वाने घेतली होती. त्यांच्यातला सजग उद्योजक जागा होत होता. नवप्रयोगांचे, नवनिर्मीतीचे निर्णय वेगाने होत होते. कल्पनांना व्यवहाराची जोड मिळत होती आणि या सगळ्यात शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या हिताला सर्वाधिक प्राधान्य होते. याच गुणांमुळे शंकरराव काळे यांची लोकप्रियता अहमदनगरच्या सीमा ओलांडून सर्वत्र पसरली होती.

वामनराव वर्दे हे कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचे पहिले चेअरमन होते. त्यांची दूरदृष्टी कोसाकाच्या प्रगतीसाठी उपकारकच ठरली. सुरूवातीच्या काळात कारखाना परिसराचा पुरेसा विकास झालेला नव्हता. कामे सुरू होती. माणसे गोळा होत होती. कोळपेवाडी गाव वसत होते. हा बदल अर्थातच वामनराव वर्देसमोर झाला नाही. शंकरराव काळे कारखान्याचे चेअरमन झाल्यावरही वामनराव वर्दे कारखान्याच्या प्रगतीची आस्थेने चौकशी करायचे. त्यांच्या कानावर इतर लोकांकडूनही कारखान्याच्या संदर्भात कौतुकाचे शब्द जातच होते. एका भेटीत वामनराव वर्दे शंकररावांना म्हणाले ‘कारखाना चांगली प्रगती करतोय असं माझ्या कानावर आलंय. एकदा प्रत्यक्ष येऊन बघायला हवं.’[२४] वामनरावांचा शब्द शंकररावांनी खाली पडू दिला नाही. त्यांनी वामनराव वर्देंना मानाने कारखान्यावर बोलावले, त्यांचा भव्य सत्कार केला. त्यांना मानपत्र दिले. ज्येष्ठांचा

शब्द खाली पडू द्यायचा नसतो. त्यांच्या प्रत्येक शब्दात मार्गदर्शनाची, भविष्याची बीजे दडलेली असतात याची फार चांगली जाणीव त्यांना होती. त्यामुळेच त्यांनी यशवंतराव चव्हाण यांचा कॉंग्रेसमध्ये येण्याचा शब्दही खाली पडू दिला नाही.

**९ राजकीय वाटचाल –**

१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यावर यशवंतराव चव्हाण यांनी पंचायत राज्याचा स्वीकार केला. या निर्णयामुळे कॉंग्रेस बहुजनांच्या हितासाठी काम करणार आहे हे स्पष्ट झाले. शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणाऱ्या शंकरराव काळे यांनी अभ्यासू वृत्तीने अगोदर सर्व पैलूंचा विचार केला आणि यशवंतराव चव्हाणांच्या साक्षीने कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचा व्यक्तिमत्वाचा प्रभाव हेही एक महत्त्वाचे कारण त्यामागे होते.

ग्रामीण भागातील एक तरूण कुशल संघटनाच्या जोरावर आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाचा सहकारी साखर कारखाना उभा करतो याचे यशवंतराव चव्हाणांना खूप कौतुक होते. म्हणून त्यांचा शंकरराव काळे यांच्यावर विशेष लोभ होता. पुढच्या काळात शंकरराव हे यशवंतरावांचे अतिशय विश्वासू सहकारी बनले. जिल्ह्याच्या राजकारणात अनेक घडामोडी घडल्या. पक्षांतर्गत अनेक गट–तट उभे राहीले. परंतु शंकरराव आणि यशवंतराव यांच्या स्नेहात त्यामुळे कधीच बाधा आली नाही. यशवंतरावांना उभा महाराष्ट्र 'साहेब' म्हणून ओळखायचा. पण यशवंतराव शंकररावांना 'साहेब' म्हणून संबोधायाचे.[२५] कॉंग्रेसमध्ये प्रवेश केल्यावर माणसे जोडण्याच्या उपजत कलेमुळे शंकररावांचा जिल्ह्याच्या राजकारणात प्रभाव वाढत गेला. एकीकडे कारखान्याच्या प्रगतीत लक्ष घालत असताना शंकरराव राजकारणात सक्रिय होत गेले. १९६२ मध्ये विधानसभेच्या आणि लोकसभेच्या निवडणूका झाल्या होत्या. त्यातच जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची नव्याने स्थापना झाली होती. त्याही निवडणूका होणार होत्या. कॉंग्रेससाठी या निवडणूका म्हणजे फार मोठे आव्हान होते. कारण १९५७ च्या निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्र समितीने नगर जिल्ह्यात कॉंग्रेसचा संपूर्ण पराभव केला होता. बाळासाहेब भारदे यांच्या आमदारकीचा अपवाद सोडल्यास विधानसभेच्या, लोकसभेच्या बाकी सर्व जागा समितीच्या ताब्यात होत्या. परंतु हळूहळू चित्र बदलत होते. जिल्हा मध्यवर्ती बँकेची स्थापना झालेली होती. सहकारी साखर कारखान्यांची संख्याही वाढलेली होती. सामान्य जनतेचा राजकारणात सहभाग वाढलेला होता. सहकारातून नवे नेतृत्व उभ राहत होते. कॉंग्रेसचा प्रभाव पुन्हा वाढत होता. अशा वातावरणात १९६२ च्या निवडणूका

लागल्या. काँग्रेसने कोपरगाव विधानसभा मतदार संघातून शंकररावांना उमेदवारी देण्याचे ठरविले. पण त्यांनी अत्यंत नम्रपणे नकार दिला होता. याचे एकमेव कारण म्हणजे या उमेदवारीवर के. बी. रोहमारे यांचा हक्क होता. के. बी. रोहमारे हे नगर जिल्ह्यात सहकारी क्षेत्रातील एक महत्त्वाचे नेते होते. शिवाय काँग्रेसशी ते एकनिष्ठ होते. त्यांचा अधिकार डावलण्याची शंकररावांची इच्छा नव्हती. वास्तविक पक्ष काळेंच्या बाजूने होता. पण कोणाचा हक्क हिरावून घेण्याचा शंकररावांचा स्वभावच नसल्याने त्यांनी के. बी. रोहमारेंना पूर्ण सहकार्य केले आणि १९६२ च्या निवडणूकीत निवडून आणले. त्यावेळी अहमदनगर काँग्रेसमध्ये दोन गट होते. एक स्वामी सहजानंद भारती यांचा, तर दुसरा बाळासाहेब भारदे यांचा. शंकरराव हे स्वामी सहजानंदभारती यांच्या गटाचे तर रोहमारे हे भारदे गटाचे. दुसऱ्या गटाला नामोहरम करण्याची संधी असूनही शंकररावांनी रोहमारेंवर अन्याय होऊ दिला नाही. अशा कारवायांमुळे पक्ष खिळखिळाच होतो. याची जाणीव त्यांना होती. शिवाय बेरजेचे राजकारण करणाऱ्या यशवंतरावांचा प्रभाव त्यांच्यावर होताच. म्हणूनच विधानसभेच्या निवडणूकीत न उतरता शंकररावांनी काँग्रेसतर्फे जिल्हा परिषदेची निवडणूक लढविण्याचे ठरविले

१९६२ च्या निवडणूकीत काँग्रेस पक्षाने आधीच्या पराभावाचा वचपा काढत विधानसभेच्या बारा जागांपैकी दहा जागा तर लोकसभेच्या दोन्ही जागा जिंकत वर्चस्व निर्माण केले. जिल्हा परिषदेच्या निवडणूकीतही ५८ जागांपैकी ३४ जागा जिंकत तेथेही आपला झेंडा रोवला होता. साहेबराव पाटील, शंकरराव काळे, एकनाथराव विखे, वसंतराव खंडागळे, पी. बी. कडू पाटील, रंगनाथ पंदरकर यांचा विजयी उमेदवारांमध्ये समावेश होता. निवडणूकीनंतर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदावर शंकरराव काळेंची तर उपाध्यक्षपदी एकनाथराव विखेंची निवड बिनविरोध झाली होती.[२६] विशेष म्हणजे शंकररावांची बिनविरोध अध्यक्ष म्हणून निवड होण्यासाठी के. बी. रोहमारे व दादा शहाजी रोहमारे यांचे सहकार्य लाभले होते. कालांतराने शंकररावांनी जिल्हयाच्या राजकारणावर आपली चांगली पकड बसविली.

१९६२ मध्ये शंकरराव जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाल्यावर त्यांनी कामाचा धडकाचा लावला. संपूर्ण जिल्ह्यात सहकाराचे वारे वाहत होते. कार्यकर्ते, नेते, शेतकरी यांच्यात उत्साह निर्माण झाला होता. सहकारातून वेगवेगळ्या संस्था उभ्या राहिल्या होत्या. शेती सोबतच ग्रामविकासाचे दालनही खुले झाले. १९६२ ते १९७२ अशी सलग दहा वर्षे शंकरराव जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते.[२७] या कालावधीत त्यांनी जिल्हयात अनेक विकास

कामे केली. शिक्षणक्षेत्रात आणि जलसंवर्धन क्षेत्रात त्यांनी सर्वात महत्वाचे काम केले. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी अनेक शाळांच्या उभारणीस चालना दिली. तसेच शेतीसाठी बारमाही पाणी मिळावे म्हणून अनेक योजना राबविल्या. ही सर्व कामे अहमदनगर जिल्ह्याच्या विकासासाठी पायाभूत ठरली. जिल्हा परिषदेच्या यशस्वी कामगिरीने शंकरराव काळे जिल्हा पातळीवरून राज्यपातळीवरील राजकारण करण्यास सज्ज झाले.

कोपरगाव तालुका हे शंकररावांचे साखर कारखान्याच्या निमित्ताने कार्यक्षेत्र असूनही काँग्रेस पक्षाने त्यांना विधानसभेची उमेदवारी पारनेर मतदार संघातून दिली होती.या निवडणूकीत जिल्ह्याच्या राजकारणात राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील राजकीय बदलांचे प्रतिबिंब उमटले. १९६९ साली राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसमध्ये फूट पडली होती. तरी अहमदनगर जिल्ह्यातील काँग्रेसपक्ष एकसंघपणे यशवंतराव चव्हाण व इंदिरा गांधी यांच्या पाठीशी उभा राहिला. परंतु या सगळयांचा परिणाम १९७२ च्या निवडणूकीत दिसून आला. अगोदरच्या दशकात सहकाराच्या माध्यमातून विकासाचे जे सकारात्मक राजकारण केले गेले. त्याला नवे वळण लागले. सहकार आणि विशेषतः सहकारी साखर कारखानदारी यामधून उदयाला आलेल्या नेतृत्वाला आव्हान दिले जाऊ लागले. परंतु शंकरराव काळेंचा आपल्या कामावर जास्त विश्वास होता. त्यांचे राजकारण सरळ, साधे, उघड आणि स्पष्ट होते. कपट–कारस्थाने त्यांच्या स्वभावातच नसल्यामुळे निवडणूकीत त्यांचा विजय अटळ होता. बंडखोर काँग्रेस उमेदवार म्हणून उभे असलेले बाळासाहेब भगत यांचा पराभव करून शंकरराव काळे काँग्रेसतर्फे पहिल्यांदा आमदार झाले.[२८] जिल्हा परिषदेचा अध्यक्ष म्हणून शंकरराव काळेंची कारकिर्द त्यांनी केलेल्या विकास कामांमुळे प्रचंड गाजली याच काळात शंकररावांनी जिल्हा काँग्रेसचा अध्यक्ष या नात्याने काँग्रेस पक्षाला जिल्ह्यात मजबूती दिली. दहा वर्षे त्यांनी ही जबाबदारी सांभाळली. जिल्ह्यातील विविध घटकांना त्यांनी काँग्रेसमध्ये आणले. त्यामुळे ते जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष असताना जिल्हा परिषद, विधानसभा आणि लोकसभा निवडणूकीत काँग्रेसचे उमेदवार मोठ्या फरकाने विजयी झाले. काँग्रेस पक्ष सत्तेत असल्याने त्यांनी जिल्हा काँग्रेसतर्फे जादा जमिनींचे वाटप, भूमीहिनांना घरे बांधून देणे अशी महत्त्वाची कामे केली. त्यांनी काँग्रेस पक्ष मजबूतीसाठी केलेल्या प्रयत्नांमुळे अहमदनगर जिल्ह्यात काँग्रेसचे वर्चस्व कायम राहिले.[२९]

लोकसंपर्क आणि ज्येष्ठ तसेच समकालीन नेत्यांशी मग ते कुठल्याही पक्षाचे असोत जिव्हाळ्याचे संबंध हे शंकररावांचे वैशिष्टये होते. यशवंतराव चव्हाण तर शंकररावांच्या प्रचारासाठी त्यांच्या मतदार संघातही आले होते. यशवंतरावाप्रमाणेच वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई, मधुकरराव चौधरी, शेषराव बनसोडे, शंकरराव चव्हाण, रत्नाप्पा कुंभार यांच्यासोबत त्यांच्या अकृत्रिम स्नेह होता. शरदराव पवारांचे तर अखेरपर्यंत स्नेही होते. त्या काळात निवडणूकीच्या वेळी फार उत्साही चैतन्याचे वातावरण असायचे. आजच्या सारखी अद्ययावत प्रचाराची साधने अस्तित्वात नव्हती. परंतु लोकांशी थेट सपर्क होता. सरपंच, कारखान्याचे तसेच इतर सहकारी संस्थांचे सभासद यांचे जाळे होते. या पाठबळावरच निवडणूकांचे आखाडे रंगायचे निवडणूकीत गाड्यांचे ताफे नसायचे. एखादी जीप असायची परंतु पेट्रोल पुरेसे नसायचे. त्यामुळे जीपने ज्या गावापर्यंत जाता येईल तिथे जायचे आणि प्रत्येक घर न् घर आणि झोपडी खोपटाला भेट द्यायची असे तंत्र होते. यशवंतराव चव्हाण पारनेरला शंकररावांच्या प्रचारासाठी आले तेव्हा त्यांची उघड्या जीपमधून मिरवणूक काढली होती. यावेळी यशवंतरावांनी या ठिकाणी शंकररावांनी केलेल्या विकास कामांचे तोंड भरून कौतुक केले होते. पारनेरकरांसाठी शंकरराव परके नव्हतेच. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षीय कारकिर्दीत त्यांनी पारनेराच्या विकासात लक्ष घातले होते. या सगळ्याचा अपेक्षित परिणाम होऊन शंकरराव विजयी झाले होते. हीच परंपरा त्यांनी १९७८ च्या निवडणूकीतही राखली होती. १९७८ साली शंकररावांनी कम्युनिस्ट पक्षाचे प्रभाकर ठुबे यांचा पराभव करून निवडणूक जिंकली. याच सुमारास महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर मोठी उलथा–पालथ झाली. शरदराव पवार यांनी काँग्रेसमधून बाहेर पडून पुलोदची स्थापना केली आणि सरकार स्थापन केले.[३०] त्यावेळी पुलोदच्या मत्रिमंडळात शंकररावांना शिक्षण व सहकार खात्याचे राज्यमंत्रीपद चालून आले. पुलोद सरकार फार काळ टिकले नाही पण त्या अल्पमुदतीतही शंकररावांनी भरीव कार्य केले. पारनेरसारख्या दुष्काळी तालुक्यात विकासाची अनेक कामे केली. युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. शंकररावांनी अत्यंत समर्पक वृत्तीने समाजकारण, राजकारण केले. त्यांच्या कामाची दखल पक्ष श्रेष्ठींनी घेतली होती. १९९१ च्या सार्वजनिक निवडणूकीत त्यांना काँग्रेसपक्षातर्फे खासदारकीची उमेदवारी देण्यात आली. यावेळी भाजपचे वसंतराव गुंजाळ यांचा शंकररावांनी १ लाख ७२ हजार मतांनी पराभव केला होता. त्यावेळची देशातील राजकीय परिस्थिती खूपच अस्थिर होती. मध्यावधी निवडणूकींची सतत टांगती तलवार होती. मात्र

त्यांना १९९१ ते १९९५ अशी पूर्ण पाच वर्ष खासदार म्हणून काम करता आले होते. दुर्देवाने १९९६ च्या निवडणूकीत भाजप शिवसेनेची आलेली लाट आणि पक्षांतर्गत झालेला दगा – फटका यामुळे त्यांचा पराभव झाला होता. परंतु पराभवाने खचून न जाता पुन्हा जोमाने काम करण्याची त्यांची वृत्ती असल्यामुळे त्यांच्या कार्यात खंड पडला नाही.

या सगळ्या प्रवासात त्यांचे व्यक्तिमत्व सर्व बाजूंनी प्रगल्भ होत गेले. सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत गाव–तालुका–जिल्हा–राज्य आणि पुढे देशपातळीवर कसा विचार करायचा, एखाद्या प्रश्नाकडे व्यापकतेने कसे पहायचे याबाबत त्यांचे विचार खुप स्पष्ट होत गेले. एकच व्यक्ती अनेक पातळ्यांवर किती कुशलतेने काम करू शकते याचा परिपाठ ते आपल्या कामाने घालून देत होते.

**१० कोसाका उद्योग समूह –**

कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची उभारणी करून न थांबता सतत अविश्रांत परिश्रम घेऊन हळूहळू कोसाका उद्योग समूह उभा केला. मुळातच शंकरराव कुशल राजकारणी असले तरी त्यांचा मूळ पिंड हा सहकारी चळवळीत रमणारा होता. म्हणूनच कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचा विकास होत असताना केवळ साखरेच्या उत्पादनावर अवलंबून न राहाता काळाच्या ओघात बदल करून उप–पदार्थ निर्मिती करण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

१९७६ साली त्यांनी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या आवारात आसवनी प्रकल्प (डिस्टिलरी) उभारला. आज हा प्रकल्प अत्यंत चांगल्या पद्धतीने सुरू असून त्याचा कारखान्याला खूप फायदा होत आहे.[३१] साखर कारखान्यातला एकही पदार्थ वाया जाऊ नये याकडे त्यांचा कटाक्ष होता. आसवनी विभाग सुरू केल्यावर पुढे ऊसाच्या बगॅसपासून क्राफ्ट पेपर म्हणजे कागदनिर्मितीचा प्रकल्प सुरू झाला. हा प्रकल्प देशहिताचाच ठरला. कारण या प्रकल्पासाठी मोठ्याप्रमाणावर जंगलतोड करावी लागते. पर्यायाने राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होते. पर्यावरणाचाही तोल बिघडतो. बगॅसपासून कागदनिर्मिती सुरू झाल्याने पर्यावरणाचा तोल तर सांभाळला गेलाच पण रोज २५ मेट्रीक टन कागदाचे उत्पादन होऊ लागले.[३२] कागदनिर्मितीच्या संदर्भात कोसाका उद्योग समूहाला राष्ट्रीय पातळीवर अनेक पारितोषिके तसेच प्रमाणपत्रे मिळाली आहेत. साखर कारखान्यामुळे त्या परिसराचा जसा विकास होतो. त्याचप्रमाणे प्रदूषणाचेही काही गंभीर प्रश्न उभे राहू शकतात आणि कारखान्याच्या प्रगतीला मारक ठरू शकतात. याची अनुभवाने जाणीव त्यांना होती. कोसाका उद्योग समूह यात अडकू नये म्हणून शंकररावांनी

पुढाकार घेऊन बायोगॅस प्रकल्प सुरू केला. त्याचप्रमाणे बायोगॅस प्लॅन्टमधून शेवटच्या टप्प्यात बाहेर पडणारा स्पेन्टवॉश प्रेसमडमध्ये मिसळून कम्पोस्टींग फर्टिलायझर बनविण्याचा प्रयत्न सुरू करण्यात आला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कारखान्याच्या कार्यक्षमतेत आणि फायद्यात प्रचंड वाढ झाली.

'विकास' ही विस्तृत अर्थाने अभिव्यक्त होणारी संकल्पना असून विशिष्ट उद्दीष्टपूर्तीसाठी संख्यात्मक व गुणात्मक स्वरूपाचे बदल विकासाला अभिप्रेत असतात. या सिद्धांताला अनुसरून त्यांनी कोसाकाचा विकास केला. कोणत्याही साखर कारखान्याचे लाभार्थी हे केवळ सभासद अथवा कर्मचारीच असत नाहीत. कारखाना परिसरातील अनेक घटकांना त्याचा लाभ होतो. किंवा तो मिळवून द्यावा अशीच शंकररावांची धारणा असल्याने त्यांनी गोदावरी खोरे आणि गौतम केन ट्रान्सपोर्ट कंपन्यांची स्थापना केली. ऊस वाहतुकीतील खाजगी ट्रक धारकांची मक्तेदारी संपुष्टात आणणे हे यामुळे साधले गेलेच. शिवाय सभासद तसेच परिसरातील अनेकांना त्यामुळे रोजगार मिळाला. व्यवसायाची संधी मिळाली.

कोसाकाच्या भव्य इमारतीवर 'ऊस हा साखर कारखान्याचा आत्मा आहे' असे भल्या मोठ्या अक्षरात लिहून ठेवलेले आहे. पण ऊस पिकविणारा शेतकरी जगलाच तरच कारखान्यात प्राण राहू शकतो. स्वतः शेतकरी कुटुंबात जन्मल्यामुळे शंकररावांना याची चांगल्या प्रकारे माहिती होती. शेतकऱ्यांचे सावकारांकडून होणारे शोषण त्यांनी जवळून पाहिले होते. शेतकरी शोषणमुक्त करायचा असेल आणि शेतीला खऱ्या अर्थाने उर्जितावस्था आणायाची असेल तर सहकारी बँकेशिवाय पर्याय नाही हे त्यांनी ओळखून सहकारी बँक स्थापन करण्याविषयी पुढाकार घेतला. १९५७ मध्ये यशवंतराव चव्हाण यांनी 'जिल्हा सहकारी बँका' स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाच्या आधारे शंकररावांनी 'जिल्हा सहकारी बँक' स्थापन करण्यात सक्रीय मदत केली. १९७६ साली 'गौतम सहकारी बँक' ची स्थापना केली. गेल्या ३८ वर्षात गौतम सहकारी बँकेने परिसराच्या विकासात अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे.[३३]

आज गौतम सहकारी बँकेच्या नऊ शाखा असून तिचा अग्रगण्य नागरी बँकात वरचा क्रमांक लागतो. शंकररावांसारखा निर्धार व चिकाटी बाळगणारा विचारी नेता या बँकेला लाभल्यामुळे गौतम सहकारी बँकेचा विकास फारच झपाट्याने झाला. कारखाना कार्यक्षेत्रातील विकासासाठी शंकररावांनी गौतम सहकारी बँकेचा कल्पकतेने वापर करून घेतला. शिवाय कुक्कुटपालन, गौतम मिल्क, गौतम पशुखाद्य हे सहकारी

उद्योग सुरू करण्याला चालना दिली. या सर्व योजना राबवताना त्यांनी आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन सतत बाळगला. ग्रामीण क्षेत्रात कृषीपूरक जोड व कृषीमाल प्रक्रिया उद्योगाच्या वाढीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न हाच दृष्टिकोन या मागे होता. हे सर्व करत असनाना त्यांनी शेतीविकास आणि शेतीला पाणीपुरवठा याकडे अजिबात दुर्लक्ष केले नाही. किंबहूना कोपरगाव तालुक्याला हक्काचे पाणी मिळावे यासाठी त्यांनी केलेला संघर्ष आणि नंतर जलसंवर्धनासाठी केलेले प्रयत्न हे त्यांच्या कारकिर्दीतले महत्वाचे टप्पे ठरले आहे.

कोपरगाव तालुका हा जळगाव जिल्ह्यातील चाळीसगांवपासून नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, बीडपासून माण तालुक्यापर्यंत पसरलेल्या पर्जन्यछायेच्या प्रदेशात मोडतो. सह्याद्री पर्वतामुळे पाऊस घेऊन येणारे ढग हा पर्जन्यछायेचा प्रदेश ओलांडून पुढे जातात. त्यामुळे हा प्रदेश सततपणे दुष्काळी म्हणूनच राहिलेला आहे. कोपरगाव तालुक्यातील शेती 'सुजलाम सुफलाम' झाली आहे. गोदावरी नदीच्या उजव्या व डाव्या कालव्यामुळे फार मोठा फायदा झाला आहे. परंतु आता या कालव्यांना पाणी कमी असल्याने शेतकऱ्यांसमोर आणि कोसाकासमोर मोठी बिकट परिस्थिती उभी राहीली आहे. कारण गोदावरी कालव्यांना मिळणारे ११ टि.एम.सी. पाणी कमी झाले आहे.[३४] तालुक्यातील शेती उजाड होत चालली आहे. ऊस क्षेत्रात फार मोठी घट झाल्याने कारखान्यास ऊस मिळविण्यासाठी शेकडो किलोमीटर दूर जावे लागत आहे. परिणामी त्यांनी हक्काच्या पाण्यासाठी संघर्ष पुकारला होता. राष्ट्रीय पातळीवर त्यांनी या प्रश्नाचे गांभीर्य मांडले होते. तालुक्यात रस्ता रोको केला, पाणी परिषद भरवून जनजागृती केली. या समस्येसंदर्भात शंकरराव अखेरपर्यंत जागरूक राहिले होते. आपण आपल्या हक्काचे पाणी मिळवूच असा दांडगा आत्मविश्वास त्यांच्याकडे होता. कर्मयोगी माणसे अपयशाने खचून जात नाहीत. तसेच यशाने हुरळून जात नाही. हक्काचे पाणी मिळविण्याचा प्रश्न लवकर सुटण्याची चिन्हे दिसत नाहीत म्हटल्यावर शंकररावांनी जलसंवर्धनाचे उपक्रम राबवले. त्यांनी शासनाच्या मदतीने गोदावरी नदीवर कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची मालिकाच निर्माण केली. डाऊच, माहेगांव देशमुख, वडगांव-कानळद व सडे हे बंधारे बांधले. कार्यक्षेत्रातील गावागावात साठवण तलाव, गावतळी निर्माण करून 'पाणी-अडवा, पाणी -जिरवा' हा उपक्रम राबवला. त्यामुळे पाणी उपलब्ध होऊन हजारे हेक्टर ऊस उभा राहिला. शंकरराव काळे यांच्या व्यापक दृष्टीकोनाचाच हा परिपाक होता. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाणी संघर्ष आणि जलसंवर्धनाने उपक्रम राबवणे यात त्याचा कसलाही

स्वार्थ नव्हता. त्यांचे समकालीन सहकार नेते स्वतःची राजकीय कारकिर्द घडवण्यात मग्न होते. त्यावेळी शंकरराव काळे समाधान मिळेल असे काम करण्यात गुंग होते. याबाबत शंकरराव म्हणतात की, 'एक साखर कारखाना अनेक पैलूंनी अवतीभवतीच्या परिसरात विकास करू शकतो. पूर्वी आमच्या भागात रस्ते नव्हते, वीज नव्हती, बँका नव्हत्या, आज सारं काही आहे पण हे सगळे उभारणे जेवढे कठीण होते. त्यापेक्षा हा पसारा सांभाळणे अवघड आहे. डोळ्यात तेल घालून सगळीकडे लक्षं द्याव लागतं. नुसता ऊस पिकतोय म्हणून चालत नाहीतर जमिनीची धूप कशी होणार नाही, शेतीचं क्षारीकरण होणार नाही याची सतत काळजी घ्यावी लागते.''[३५] जादा पाणी वापरामुळे आज इतर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातल्या ऊस शेतीची नासाडी होत असताना कोसाकाने आपल्या कार्यक्षेत्रातल्या शेतकरी सभासदांची पोटच्या मुलाप्रमाणे काळजी घेण्याचे धोरण राबवले. कोसाकाने सभासद शेतकऱ्यांच्या जमिनीती जिप्स्म वापरून क्षारीकरण कमी करण्याचा प्रयत्न केला. अधिक ऊस लागवडीसाठी शेतीचे सपाटीकरण करण्यासाठी मदत दिली. सुधारित बेणे, जंतुनाशके, ठिबक सिंचन, तुषार सिंचन अशा सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. याबाबत शंकरराव म्हणतात की, ''गेली कित्येक वर्षे दुष्काळाने ग्रासलेल्या शेतकऱ्यांना पाणी हा प्रश्न महत्त्वाचा वाटतो. पाण्याचा थेंब अन् थेंब यापुढे काटकसरीने वापरला पाहिजे आणि शेतीत पाणी भरतांना शास्त्रशुद्ध रितीने पिकास हवे तितके पाणी द्यावयास हवे याची जाणीव सर्वसामान्य शेतकऱ्यांना प्रकर्षाने झाली आहे. म्हणून ठिबक सिंचन पद्धतीविषयी शेतकऱ्यांत अपार जिज्ञासा दिसून येत आहे.''[३६]

**११. कर्मवीर आण्णांचा प्रभाव –**

कोसाका उद्योग समुहाला वैभवाचे दिवस दाखविण्याचे काम सुरू असताना शंकररावांनी शिक्षण क्षेत्रात तर अत्यंत मोलाची कामगिरी केली. कोसाका परिसरात गौतम एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना इंग्रजी त्यांच्या गावातच शिकता यावे यासाठी गौतम पब्लिक स्कूल सुरू केले. त्याचप्रमाणे कारखाना परिसरात रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाळा कॉलेज उभारणीत पुढाकार घेतला. स्वतः उच्च शिक्षित असल्याने त्यांना शिकण्याचे महत्त्व माहीत होते. पण कर्मवीर भाऊराव पाटील यांचा त्यांच्यावर असलेला प्रभाव हे सर्वात महत्त्वाचे कारण होते.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ज्यांनी प्रत्यक्ष काम करताना पाहिले त्या सुदैवी लोकांपैकी शंकरराव हे एक आहेत. कर्मवीरांसोबत शंकररावांचा संपर्क १९४८ च्या सुमारास आला. शिक्षण प्रसारासाठी अहोरात्र झटणाऱ्या या ऋषीतुल्य व्यक्तिमत्वाने

शंकरराव भारावले होते. कारखाना सुरू झाल्यावर एकदा कर्मवीर भाऊराव पाटील कोपरगाव सहकारी साखर कारखान्यात शंकररावांना भेटायला आले. शंकररावांच्या आयुष्यातला तो अत्यंत महत्त्वाचा दिवस होता. एवढेच नव्हे तर कर्मवीर आण्णा शंकररावांच्या माहेगांव देशमुख येथील वस्तीवर मुक्कामीही आले. कर्मवीरांनी शंकररावांकडे एकच मागणी केली. ''मला तुम्ही खळ्यातलं मातेरं द्या आणि धान्य तुम्हाला ठेवा.''[३७] म्हणजे शिक्षण प्रसारासाठी रयत शिक्षण संस्थेला मदत करा. शंकररावांनी कर्मवीरांचा शब्द प्रमाण मानला. त्यांनी थोडी नाहीतर भरघोस मदत केली. स्वतः नव्या शाळा काढल्या. इतरांना शाळा सुरू करायला मदत केली. रयत शिक्षण संस्थेच्या शाळांचा प्रसार केला. प्रसंगी पदरमोड करून अनेक शाळा- महाविद्यालये उभी केली. हे सर्व करत असतांना शंकररावांनी कोणताही हेतू मनात ठेवला नव्हता. प्रसिद्धीची हाव नव्हती. पदाची लालसा नव्हती. कर्मवीरांनी दाखविलेल्या ज्ञानप्रकाशात त्यांनी पुढची वाटचाल केली. म्हणून आशियातील सर्वात मोठी शिक्षण संस्था म्हणून नावाजलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमन या पदावर त्यांची नेमणूक झाली. तेव्हा ती शंकररावांसाठी सर्वात समाधानाची बाब होती. प्रसिद्धीपासून दूर राहण्याच्या स्वभावाने शंकररावांनी केलेल्या भरीव कामगिरीची नोंद फारशी कोठे झाली नसेल पण पुढच्या अनेक पिढ्यांसाठी हे काम म्हणजे अनमोल ठेवा ठरले आहे. 'शहाणे करून सोडावे सकळ जन' ही उक्ती प्रत्यक्षात आणत ते सतत झटले. अखेरपर्यंत रयत शिक्षण संस्था त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होती. आज सर्वत्र शिक्षणाचा बाजार मांडला गेला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांचे काम अत्यंत बोलके आहे.

**१२. संसार – प्रपंच –**

शंकररावांचा स्वभाव अत्यंत संयमी, कुशल व्यवस्थापकाचे आणि नेतृत्वाचे दर्शन घडविणारा होता. मुख्य म्हणजे यात कुठेही आविर्भाव नव्हता. शंकररावांचा दिनक्रम पहाटेपासूनच सुरू व्हायचा आणि रात्री दहा-अकरा वाजता संपायचा. या दरम्यान घरच्या शेतीकडे लक्ष देण्यापासून कारखान्याच्या कामाचा आढावा घेणे, कार्यकर्त्यांना भेटणे, त्यांचे प्रश्न सोडविणे, कोपरगाव तालुक्याच्या विकासासंदर्भात लक्ष घालणे अशी अनंत कामे ते हातावेगळी करत असत. या सर्व व्यापातून 'आधी प्रपंच करावा नेटका' या उक्तीप्रमाणे त्यांनी कुटुंबाकडे अत्यंत बारकाईने लक्ष दिले होते. त्यांना त्यांच्या पत्नीचे म्हणजे सुशिलाबाई उर्फ माई यांची मिळालेली साथ अत्यंत मोलाची ठरली.'' माई फारच कर्तबगार होत्या. पण त्यांनी स्वतःच व्यक्तिमत्व माझ्यात-आमच्या घरादारात साखरे

सारखं विरघळून टाकलं. त्यांनी घराची बाजू अतिशय समर्थपणे सांभाळल्यामुळे माझी राजकीय आणि सामाजिक कारकिर्द बहरत गेली यात शंका नाही. १९५२ साली ज्यावेळी काँग्रेस पक्षाची विधानसभेची उमेदवारी मी नाकारली तेव्हा ती माईंना देण्याचा जवळपास ठाम निर्णय झाला होता. पण त्यांनी या प्रस्तावास नम्रपणे नकार देऊन संसाराला प्राधान्य दिले. सुशिक्षित मध्यमवर्गीय घराण्यातील माई आमच्या ग्रामीण, एकत्रित मराठमोळ्या शेतकरी कुटूंबात समरस झाल्या. विना तक्रार अपार कष्ट सोसून सर्वांना मायेची उब दिली.[३८] माईंच्या आठवणी शंकरराव सद्‌गदित होऊन सांगतात.

शंकरराव आणि माईंचा विवाह १९४९ मध्ये झाला. त्यावेळी शंकरराव नोकरीनिमित्त घराबाहेरच होते. घराची सगळी जबाबदारी सांभाळताना माईंना खूपच कष्ट पडले. त्यावेळी आजच्यासारखी गॅस, कुकरसारखी साधने नव्हती. मोठ्या एकत्रित कुटुंबाचा स्वयंपाक त्यांना चुलीवर करावा लागे. पण या सर्व परिस्थितीशी त्यांनी जुळवून घेतले. याबाबत शंकरराव सांगतात की, 'सुरूवातीच्या काळात आम्हाला मुलबाळ नसल्याने त्या फार उदास असत. मीही त्यांना माझ्या व्यापामुळे पुरेसा न्याय देऊ शकत नव्हतो. पण चिरंजीव अशोकचा आणि स्नेहलचा जन्म झाल्यावर परिस्थिती बदलली. मी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष झाल्यावर त्यांना सुखाचे दिवस आले. मग मात्र माझ्या वैयक्तिक कारकिर्दीतल्या यशाबरोबर त्या उत्तरोत्तर समाधान होत होत्या. त्या उत्तम गृहीणी तर होत्याच. पण शिकण्याचा उपजत स्वभाव असल्याने माईंनी शेती, दूध व्यवसाय यात लक्ष घालून त्यात भर घातली.'[३९] स्वतः उच्चशिक्षित असल्याने शंकररावांनी आपल्या मुलांना म्हणजे अशोकराव आणि स्नेहल यांच्या शिक्षणात लक्ष घातले. मुलांना शिक्षणाची गोडी लावणे आणि त्यांच्यावर उत्तम संस्कार करणे हे काम शंकरराव आणि माई या दोघांनीही केले. आज त्यांची मुले आपापल्या क्षेत्रात यशस्वी आहेत. समाधानी जीवन जगत आहेत. अशोकराव काळे हे शंकररावानंतर कोसाका उद्योग समूहाची धुरा यशस्वीपणे सांभाळून कोपरगाव तालुक्याचे लोकप्रिय आमदार म्हणून गेल्या १० वर्षांपासून कार्यरत आहेत. तर स्नेहल शिंदे या अमेरिकत स्थायिक आहेत.

''प्रपंच आणि परमार्थ या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ते परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत. श्रेष्ठ संतांनी याचा दाखला जागोजागी दिलेला आहे. या दोन गोष्टींचा एकात्म साधण्यासाठी गरज असते, ती ईश्वरशक्तीवर असीम श्रद्धा ठेवत आनंदाचे क्षण गोळा करण्याची.[४०] रानात वेड्यावाकड्या वाढलेल्या बाभळीच्या झाडाकडे कोणाचेच लक्ष जात नाही. पण एखादे सरळसोट झाड असेल तर त्यावर आधी

कुऱ्हाडीचा घाव पडतो. शंकरराव हे अशाच सरळसोट झाडाप्रमाणे होते. त्यांचा अनेकांनी फक्त वापर करून घेतला हेही सत्यच आहे. पण निष्काम कर्मयोग्याप्रमाणे त्यांनी कधीही कशाही बाबतीत तक्रार केली नाही. उलट राजकारणातील प्रतिस्पर्ध्यांनाही त्यांनी मनापासून मदतच केली. विचार आणि कार्यपद्धती यांचा मेळ ज्याला घालता येतो, तोच समाजाचे यशस्वी नेतृत्व करू शकतो ज्यांच्या आचार, विचार व उच्चारामध्ये एकवाक्यता आढळते असा माणूस सुसंस्कृत असतो. त्यालाच यशस्वी जीवन जगता येते. त्यांचेच अनुकरण समाजही करतो. आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत शंकरराव काळे अशाच पद्धतीने जीवन जगले शंकरराव हे त्यांच्या कुटुंबासाठी, जिल्ह्यासाठी, सावली देणारा, आसरा देणारा वटवृक्षच ठरले आहेत. सार्वजनिक कार्य करताना आणि राजकारण करताना त्यांनी घरपण जाणीवपूर्वक जोपासले. जीवनात त्यांनी अनेक कटू-गोड अनुभव घेतले. दुःखाने न खचणारे आणि यशाने हुरळून न जाणारे असे हे 'अजातशत्रू' व्यक्तिमत्व होते. दि. १९ जानेवारी १९९९ रोजी झालेल्या सुशिलामाईंच्या निधनाने त्यांना प्रचंड धक्का बसला होता.[४१] कारण शंकररावांच्या यशस्वी जीवनाच्या त्या साक्षीदार होत्या. पण या दुःखातूनही त्यांनी स्वतःला सावरले होते. आणि पुन्हा समाजसेवा सुरू केली होती. अध्यात्मकडे विलक्षण ओढा असणाऱ्या शंकररावांनी कर्मकाडांत न अडकता अध्यात्माचे, संतांच्या विचासरणीचे सार स्वतःच्या जीवनात कृतीत उतरवले होते.

## १३. माझी आई –

वडिल देवराम बाबांनी आणि आई राधाबाई यांनी शंकररावांना उच्च शिक्षित करण्याचे जे स्वप्न पाहिले होते. ते पूर्ण झाले होते. पण हा क्षण बघायला राधाबाई म्हणजे शंकररावांची आई हयात नव्हती. शिक्षणासाठी दूर गेलेल्या मुलाला आईचे सुख मिळाले नाही की आईला मुलाचा सहवास कधी लाभला नाही. शंकरराव इंटरसायन्सला असतानाच त्यांच्या आईचा मृत्यू झाला होता. या घटनेची खोल अशी जखम शंकररावांच्या मनावर कायम झाली. 'माझी आई' या छोट्याशा पुस्तिकेत शंकररावांनी आईविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या आहे.....''माझ्या आईचे नाव होते राधाबाई. मी रयत शिक्षण संस्थेसारख्या विशाल संस्थेचा चेअरमन होतो. मी महाराष्ट्र राज्याचा शिक्षण राज्यमंत्री झालो. मी बी.ई. (सिव्हील) इंजिनीअर आहे. परंतु मित्रहो, मला जन्म देणारी माझी आई ही अक्षरशत्रू होती. ती अडाणी होती. तिला लिहिता वाचता येत नव्हते. माझी आई माझ्या मनात आहे. स्मरणात आहे. पण तिचा फोटो कोठेही उपलब्ध नाही. तिचा कोणी फोटो काढला नाही. तिचे जीवन उपेक्षितच होते.

माझ्या आईचे जीवन खूप कष्टमय गेले. पूर्वीच्या काळात शेतकरी स्त्रियांचे जीवन असे कष्टमय होते. तसेच कष्टमय गेले. माझ्या वडिलांचे बालपणीच लग्न झाले. त्यांची पहिली पत्नी मृत्यू पावली. आमची आई ही त्यांची द्वितीय पत्नी. त्या काळात शेतकरी समाजात बहुपत्नित्वाची पद्धत होती. माझी आई फारशी सुस्वरूप नव्हती. त्यामुळे ती आमच्या वडिलांची नावडती बायको होती. नंतर वडिलांनी तिसरा विवाह केला. पूर्वी सवती –सवतींचे खुप प्रेम असायचे व त्यांचे एकमेकांशी खूप जमायचे. परंतु माझी आई नावडती असल्याने घरात तिला उपेक्षेचे जीवन जगावे लागेल. माझी सावत्र आई दहा वर्षापूर्वी वारली. तिला फक्त दोन मुली होत्या. आमच्या आईला चार मुलेच झाली. मी शंकरराव, सुखदेवराव, किसनराव आणि गोविंदराव. आम्हाला सख्खी बहिण नाही. माझ्या सावत्र आईच्या निधनाच्या अगोदर माझ्या दोन भावांचे निधन झाले. सन १९६१ साली माझे द्वितीय बंधु सुखदेवराव निर्वतले. तर १९७५ साली माझे तृतीय बंधु किसनराव यांचे निधन झाले.

माझे वडील श्री. देवराम काळे यांचे सन १९८७ साली निधन झाले. माझ्या वडिलांचा जन्म अंदाजे १८९० सालचा असावा. अर्थात अंदाज आहे. कारण तारखा टिपलेल्या नाहीत. मी खासदार शंकरराव काळे, पण माझी जन्मतारीख कोठेही टिपलेली नाही. ती सुद्धा अंदाजावर आधारलेली आहे. त्या काळात शेतकरी समाजात एवढी जागृती नव्हती.

माझ्या आईचे जीवन खूपच दु:खात गेले, याची मला वारंवार खंत वाटते. आमच्या गावापासून दहा किलोमीटर अंतरावर असलेले टाकळी हे गाव तिचे माहेर होते. आईला सख्खा भाऊ नव्हता. तिला फक्त एकच बहीण होती. माझ्या आईचे वडील लहानपणीच वारले. वडिलांचे कृपाछत्र तिला लाभलेच नाही. आईला माहेरचा व इतर कुठलाही आधार नव्हता. माहेरपणाचे सुख नव्हते. मला माझ्या आजोळी गेल्याचे आठवत नाही.

आमच्या आईने खूप दु:खी व कष्टप्रद जीवन जगले. तिला खूप खूप काबाडकष्ट करावे लागत होते. पूर्वी आमची खूप गरिबी होती. माझ्या जन्माच्या वेळेस जेव्हा माझ्या आईला प्रसुतिवेदना सुरू झाल्या. तेव्हा ती शेतात बाजरी सोंगत होती. आम्ही शेतीवरील वस्तीवर झोपडीत राहायचो. अहो! शेत कसले, पूर्वी सगळे जंगल असल्यासारखे होते. माझ्या वडिलांनी सन १९१८ ते १९२२ मध्ये जो कॅनॉल खणला गेला. त्यावर रोजंदारीचे काम केले. मग थोडी जमीन घेतली. नंतर एक एकर ऊस लावला.

आमच्या आईने आमच्या वडिलांना संसारात खूप साथ दिली. जिवापाड कष्ट केले. किंबहूना आमच्या कुटुंबाला जी समृध्दीप्राप्त झाली, त्यात तिच्या कष्टाचा फार मोठा वाटा आहे. पण तिला बिचारीला काय मिळाले? पहाटे लवकरच उठायचे. मग जात्यावर दळण दळायचे. त्याकाळी आजच्यासारख्या पिठाच्या गिरण्या नव्हत्या. आमच्या शेतावर सालाने गडी असायचे. त्यांना वर्षाला कपडे आपण करायचे, पगार द्यावयाचा. परंतु जे जेऊन खाऊन कामाला असत. त्या चार-पाच गड्यांचा अधिक घरचा स्वयंपाक आई करीत असे. रोज एवढे दळण लागे. त्याकाळी आजच्या सारख्या गॅसच्या शेगड्या स्वयंपाकासाठी नव्हत्या. चुलीवर स्वयंपाक करावा लागे. त्यासाठी शेतातून लाकडे तोडून आणावा लागत. जळणासाठी शेणाच्या गोवऱ्या थापाव्या लागत. जाळ होण्यासाठी फुंकणीने ते चुलीत फुकावे लागे. लाकडे ओली असली तर धुर होई. पण आमची आई ही सगळी कामे विनातक्रार करी. परत पुरूषांबरोबर दिवसभर शेतात काम करायचे. मुलांचे संगोपन करायचे. ते काम वेगळेच. माझ्या आईची आणि माझी लहानपणापासूनच ताटातूट झाली. मला वडिलांनी शिक्षणासाठी वयाच्या पाचव्या वर्षापासून घराबाहेर ठेवले. मी व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत (इयत्ता सातवी) कोपरगावच्या शाळेत शिकलो. १९३४ साली व्ह. फा. झालो. १९३४ ते १९३९ नाशिकच्या उदोजी बोर्डिंगमध्ये राहून हायस्कूलचे शिक्षण घेतले. १९३९ साली एस.एस.सी. झालो. १९३९ ते १९४७ पर्यंत मी पुण्याला फर्ग्युसन कॉलेज व इंजिनीअरींग कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. मी बी. एस्सी. आणि बी.ई. या पदव्या घेतल्या. थोडक्यात मी वयाच्या पाचव्या वर्षापासून आईच्या निधनापर्यंत घराबाहेर होतो.

अशी ही माझी आई राधाबाई १९४४ साली आजाराने मृत्यू पावली. त्यावेळी मी इंटर-सायन्सला होतो. पण माझ्या मनावर व अभ्यासावर परिणाम होऊ नये म्हणून मला कोणीही बातमी पुण्याला कळविली नाही. मी माझ्या आईच्या अंत्यसंस्काराला नव्हतो. तिच्या दहाव्या-तेराव्याला नव्हतो. तिच्या मृत्यूनंतर दोन महिन्यांनी तिचे निधन झाल्याचे मला कळले. तिच्या आजारात तिची नीट देखभाल झालीच नाही. तिला नीट औषधपाणी सुद्धा मिळाले नाही. एक कष्टमय जीवन कायमचे संपले. १९१८-२० सालचा काळ असेल, आमची खूप गरिबी होती. आमचे पूर्वज धुळ्याला कापूस वेचायला जायचे. वडिलांनी सुरूवातीला एक एकर ऊस लावला. त्यावेळी लाकडी चरक होते. त्याने रस काढून गुऱ्हाळ लावावयाचे, गुळ तयार करायचे. नंतर डिझेल इंजिनीवर चालणारे क्रशर आले. इलेक्ट्रीसीटी नव्हती. घरात गोडे तेलाचे दिवे

लागले जायचे. माझ्या आईला कधी चहासुध्दा नीट प्यायला मिळाला नाही. तिला कधी चांगले पातळ, चांगली चोळी ल्यायला मिळाली नाही. अशी ही माझी आई आजाराने झोपेतच वारली. माझी आई अप्रसिद्ध होती. कोणी तिच्यावर लेख लिहीला नाही. कोणी तिच्यावर कविता केली नाही. तिने खूप दुःख सहन केले. पण आम्ही लहान असल्यामुळे, कर्ते नसल्यामुळे तिचे दुःख कमी करू शकलो नाही. पण तिने खूप कष्ट केले, तिने आमच्या कुटूंबाच्या सुखासाठी स्वतःच्या सुखाची तमा बाळगली नाही. तिचे दुःख तिने धिरोदात्तपणे सहन केले. तिची वेदना अबोल राहीली. नंतर आमची खूप इस्टेट वाढली. १९४५-४६ नंतर आमची श्रीमंतात गणना होऊ लागली.

आमच्या आईची आम्हाला सतत आठवण रहावी, म्हणून आमच्या माहेगाव देशमुख येथील वस्तीवरील बंगल्यास 'राधा निवास' असे नाव दिले. माझा मुलगा चि. अशोकने दूध सोसायटी काढली. त्या सोसायटीला आम्ही आमच्या आईच्या स्मरणार्थ 'राधा-मिल्क' सोसायटी असे नाव दिले आहे. कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचे संचालक मंडळ, मला माझ्या वाढदिवसानिमित्त तीन लाख रूपयांची गाडी भेट देणार होते. परंतु मी त्यांना सूचना केली की, त्यापेक्षा तुम्ही रयत शिक्षण संस्थेच्या कन्या शाळेला ही रक्कम देणगी म्हणून द्या! रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन माननीय एन.डी. पाटील व संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यांनी या शाळेला ''कै. राधाबाई काळे कन्या विद्यालय'' असे नाव देण्यास संमती दिली. मी फार मोठी देणगी दिली नसतानाही, रयत शिक्षण संस्थेने या कन्या शाळेला माझ्या आईचे नाव दिले. रयत शिक्षण संस्थेने या शाळेला नाव देताना माझ्याकडून काहीही अपेक्षा केली नाही. पण मीही ठरवले की, या कन्या विद्यालयाला मी काही कमी पडू देणार नाही. मी अजून पाच-सहा लाख रूपये घालून कै. राधाबाई काळे कन्या विद्यालयाला चांगली इमारत बांधून देण्याचे ठरवले आहे. आमची आई वारली तेव्हा माझ्या फक्त एका भावाचे लग्न झाले होते. इतर तिघांचे लग्ने झाली नव्हती. आम्ही तिच्या हयातीत आमच्या आईला सुख देऊ शकलो नाही, तिचे दुःख वाटून घेऊ शकलो नाही. ही माझ्या मनातील वेदना आहे. ज्या आईच्या त्यागाने आमचे जीवन समृद्ध केले, त्या आईसाठी आम्ही काही करू शकलो नाही. त्या आईची सेवा करण्याची संधी परमेश्वराने आम्हाला दिली नाही. याबद्दल आम्ही स्वतःला दुर्दैवी समजतो. नियतीने दिलेला हा न्याय आम्हाला स्वीकारणे भाग आहे. अशा या आमच्या आईची स्मृती चिरंतन ठेवण्यासाठी 'कै. राधाबाई काळे कन्या विद्यालय' हे तिचे स्मारकच आहे.

त्याचबरोबर अहमदनगर सारख्या जिल्हयाच्या ठिकाणी मुलींच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून रयत शिक्षण संस्थेने स्वतंत्र महिला महाविद्यालय सुरू केले. 'कै. राधाबाई काळे महिला महाविद्यालय' असे नामाभिधान करून माझ्या आईचा गौरव केला आहे. तसेच कोपरगाव सहकारी साखर कारखान्यावर राधाबाई काळे कन्या विद्यालय सुरू केले आहे. त्याबद्दल संस्थेचा मी सदैव ऋणी राहीन. आमची आई निरक्षर होती. पण आमच्या ग्रामीण भागातल्या मुली त्यात सुविद्य होतील. मला माझ्या वेदना विसरण्याचा व मातृऋणातून मुक्त होण्याचा तेवढाच एक मार्ग दिसतो आहे.''[४२]

शंकरराव काळे यांची आईला राधाबाई काळे हयात असताना प्रकाशझोतात आल्या नाहीत. पण पुढे रयत शिक्षण संस्थेच्या नगर येथील महिला महाविद्यालयास व कोळपेवाडीच्या कन्या विद्यालयास राधाबाई काळे यांचे नाव दिले आणि या माऊलीचे नाव कायमचे कोरले गेले. अहमदनगर येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयाच्या व कोळपेवाडी येथील कन्या विद्यालयाच्या इमारतीच्या दर्शनी भागात संगमरवरी दगडावर 'माझी आई' हे शंकररावांनी लिहिलेले मनोगत कोरलेले आहे. याबाबत शंकरराव म्हणतात की, ''मी शिकावे ही वडिलांची इच्छा आणि आईची त्यांना असलेली साथ यामुळे इतका शिकू शकलो. शिवाय मी सतत बाहेर राहिल्यानेही आपण शिकावे ही इच्छा माझ्या मनात प्रबळ होत गेली. घरच्या वातावरणात राहिलो असतो तर इतका शिकू शकलो असतो का, याची शंका वाटते.''[४३]

## १४. राजकीय संघर्ष –

१९५२ च्या विधानसभा निवडणूकीत काँग्रेसची उमेदवारी मिळत असतानाही शंकररावांनी शेकापकडून निवडणूक लढविली व ते पराभूत झाले. या निवडणूकीतून ते अनेक गोष्टी शिकले. त्यानंतर माहेगाव सहकारी सोसायटीची स्थापना, कोसाकाची उभारणी या कामात त्यांनी स्वतःला गुंतवून घेतले. १९६२ साली यशवंतराव चव्हाणांनी शंकररावांना काँग्रेसमध्ये येण्याबाबत आव्हान केले. त्यामुळे त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. कोपरगाव तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात नावाजलेला काळे–कोल्हे संघर्ष सुरू झाला. अर्थात सुरूवातीला के. बी. रोहमारे यांच्याबरोबर सर्वच नेते होते. १९६२ च्या निवडणूकीत के.बी. ना प्रचंड मतांनी निवडून आणले होते. शंकरराव कोल्हे देखील के. बी. रोहमारेंचे प्रामाणिक कार्यकर्ते होते. परंतु संजीवनी साखर कारखान्याच्या चेअरमनपदावरून के. बी. रोहमारे व शंकरराव कोल्हे एकमेकांचे विरोधात गेले. त्यामुळे

शंकरराव कोल्हेंनी शंकरराव काळेंबरोबर हात मिळविणी करून तालुक्यात के. बी. रोहमारेविरूद्ध राजकारणाला सुरूवात केली. १९६३ ते १९७८ या काळात शंकरराव काळे आणि शंकरराव कोल्हे हे अत्यंत जीवलग मित्र होते.[४४] या दोघांनी मिळून के. बी. रोहमारे यांचे राजकीय वर्चस्व संपुष्टात आणले होते. मात्र १९७८ साली महाराष्ट्रात शरदराव पवार यांनी पुलोदचे सरकार स्थापन केले. या सरकारमध्ये शंकरराव काळे राज्यमंत्री झाले आणि काळे–कोल्हे संघर्षाला सुरूवात झाली. शंकरराव कोल्हे वसंतदादा पाटील यांच्या बरोबर राहिले. या घटनेपासून तर आजपर्यंत तालुक्यात काळे–कोल्हे असा संघर्ष सतत चालू आहे. गेली ३५ वर्षापासून काळे–कोल्हे अतिटोकाचा संघर्ष तर कधी गळ्यात गळा घालून राजकारण. दोघांकडेही दोन सहकारी साखर कारखाने राजकीय संघर्ष केवळ आमदारकीवरून चालू जरी असला तरी तालुक्यात तिसरी शक्ती उदयास येऊ नये. म्हणून दोघांनीही अगदी पद्धतशीर केलेले प्रयत्न आणि आपले साखर कारखाने आपल्याकडेच राहतील यासाठीची केलेली व्युहरचना, या सर्व बाबी संपूर्ण महाराष्ट्राने अनुभवलेल्या आहेत. अर्थात या सर्व घडामोडींमध्ये शंकरराव कोल्हे यांनी बऱ्याचवेळा शंकरराव काळे यांच्या भोळ्या स्वभावाचा फायदाही घेतलेला दिसून येतो. याबाबत शंकरराव काळे म्हणतात, ‘‘दादासाहेब बोरावके माझे जिवलग मित्र, कार्यकर्ते होते. ते सतत मला शंकरराव कोल्हे यांच्यापासून जपून रहा, स्वतःचा गट तयार करा असं सांगायचे. पण तेव्हा आमचा खरा संघर्ष के. बी. रोहमारेंशी होता. कोल्हे आमचे मित्र होते. सहकारी होते. असा काही डावपेच करून ते वेगळा गट करतील असे वाटले नव्हते.’’[४५] काळे–कोल्हे संघर्ष येथून पुढील काळात कोणत्या ना कोणत्या निवडणूकीच्या निमित्ताने सतत उफाळून येऊ लागला. दोन्ही गटाकडे तालुक्यातील निम्मे–निम्मे कार्यकर्ते विभागले गेले. १९८० च्या विधानसभा निवडणुकीत शंकरराव काळे पुलोदचे उमेदवार होते तर शंकरराव कोल्हे इंदिरा काँग्रेसचे उमेदवार होते. ही निवडणूक प्रचंड गाजली. शंकरराव काळे यांचा पराभव झाला. विरोधकांनी प्रचंड जाळपोळ केली. मारामाऱ्या झाल्या. घरे–वाहने यांची जाळपोळ केली. संपूर्ण महाराष्ट्राने हा अतिटोकाचा संघर्ष पाहिला. या निवडणुकीत अनेक निष्ठावान कार्यकर्ते तयार झाले. प्रसंगी लढले याशिवाय आयुष्यभर त्यातील अनेकांनी शंकररावांना साथ दिली. कार्यकर्त्यांना जीव लावणे, त्यांना वेळोवेळी मदत करणे आणि त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हे नेतृत्वाचे कामच आहे. कार्यकर्त्यांचे महत्त्व त्यांनी जाणले असल्याने त्यांनी कार्यकर्त्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जीव लावले. कार्यकर्त्यांचे महत्त्व सांगताना ते म्हणतात, ‘‘यशवंतराव चव्हाण एकदा मारूतराव घुले

यांच्याकडे एका कार्यक्रमाला आले होते. तेव्हा ते म्हणाले होते, पतिव्रता स्त्रीच्या गळ्यातील मंगळसूत्राचे पावित्र्य मोठे आहे. एक एक मणी जमा करून त्याला पावित्र्य येत असते. राजकीय कार्यकर्ते हे असेच एका एका मण्याप्रमाणे असतात. म्हणून मीही माझ्या प्रत्येक कार्यकर्त्याला मंगळसूत्राच्या मण्याप्रमाणे सन्मानाची वागणूक देतो. मणी आहेत तोपर्यंतच मंगळसूत्र आहे. मंगळसूत्र नसेल तर बाईला कोणी सन्मानाची वागणूक देत नाही आणि सुट्ट्या मण्यालाही कोणी विचारात नाही. त्यांच्या सुटेपणात पावित्र्य नसते.''[४६]

प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांच्या बळावर शंकररावांनी तालुक्यात एक बळकट असा गट तयार केला. शंकरराव कोल्हे यांचा गटही त्याच प्रकारचा तयार झाला. परिणामी काळे-कोल्हे हे एक समीकरणच तयार झाले. ग्रामपंचायत, कारखाना, पंचायत समिती, जिल्हा परिषद, लोकसभा, विधानसभा, कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकारी सोसायट्या व इतर छोट्या मोठ्या निवडणुकींनी तालुका ढवळून निघू लागला. प्रचंड संघर्ष, मारामाऱ्या, जाळपोळ तसेच कोर्ट कचेऱ्या यामुळे वातावरण गढूळ बनत गेले. कोणतीही निवडणूक असली तरी कार्यकर्ते ती प्रतिष्ठेची करीत असत. त्यातून संघर्ष उद्‌भवत असे. मात्र मधूनच वर डोके काढणारी तिसरी शक्तीपुढे आली की, यांच्यातील संघर्षाची धार कमी होऊन तिसरी शक्ती छाटण्याची व्युहरचना केली जात असे. यामुळे अनेक शक्ती नष्ट झाल्या. काळे-कोल्हे संघर्ष आणि दोन्ही गट आजही शाबूत दिसून येत आहे. हा संघर्ष व ही गटबाजी आता पुढच्या पिढीकडे वारसा हक्काने आली आहे. शंकररावांचे चिरंजीव आमदार अशोकराव काळे हे गटाचे नेतृत्व करत असून तिसरी पिढीही समर्थपणे पुढे येत आहे. शंकररावांचे नातू आशुतोषराव काळे हे राजकारणात सक्रीय झाले आहेत. ते उच्च विद्यविभूषित आहेत. बी.ई. (आय.टी.) एम. एस. (आय.एस.) अमेरिकेत पूर्ण करून शंकररावांचा वारसा पुढे चालविण्यासाठी सिद्ध झाले आहेत. विशेष म्हणजे अत्यल्प काळातच संपूर्ण तालुक्यात विशेषतः तरूणांमध्ये अत्यंत लोकप्रिय बनले आहेत. अर्थात त्यांची काम करण्याची पद्धत, लोकांशी संपर्क ठेवण्याची व संवाद साधण्याची कला आणि प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होऊन मदतीच्या हात देण्याची प्रवृत्ती, लोकांचे प्रश्न जाणून घेऊन ते सोडविण्याचा स्वभाव यामुळेच त्यांचे नेतृत्व सर्वमान्य होत आहे. त्यांच्यामुळे काळे गटाला एक अत्यंत उमदा व तरूण नेता मिळाल्याची भावना कार्यकर्त्यांची झाली असल्याने कार्यकर्त्यांना प्रचंड उभारी मिळाली आहे. गेल्या १० वर्षापासून आमदार श्री. अशोकराव काळे हे कोपरगाव विधानसभा

मतदारसंघाचे नेतृत्व करत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील बऱ्याच निवडणूका जिंकल्याने कार्यकर्ते जिद्दीने काम करत आहेत.

काळे-कोल्हे संघर्षाच्या इतिहासाकडे वळून पाहिल्यास बऱ्याचवेळा संभ्रामावस्था निर्माण होते. कार्यकर्ते लढतात. एकमेकांना भिडतात. त्यांच्यातील पीळ कायमच राहतो. गेल्या ३५ वर्षात त्यांचे परिणामी अनेकांनी भोगले आहेत. मात्र काळे-कोल्हे कधी-कधी संघर्ष बाजूला ठेवून एकत्रही आलेले सर्वांनी पाहिले आहे. त्यामुळे अलिकडच्या काळात कार्यकर्त्यांनीही आपल्यामध्ये बरीचशी सुधारणा घडवून आणल्याचे जाणवते. त्यातच सुशिक्षित कार्यकर्ते तयार झाल्यामुळे वैचारिक बदल झालेला दिसून येत आहे. आपल्या गटाचे काम प्रामाणिकपणे व निष्ठेने करायचे, पण राजकारण हे निवडणुकीपुरतेच ठेवायचे. अति टोकाला जाऊन संघर्ष करायचा नाही. त्या उलट खेळीमेळीत निवडणूका पार पाडायच्या अशा प्रकारच्या कार्यकर्त्यांच्या भावना तयार होत आहेत. त्यामुळे पूर्वीइतकी धार संघर्षातील राहिलेली नसली तरीही काळे-कोल्हे संघर्ष मात्र तालुक्यात आजही अस्तित्वात दिसून येतो. त्यातच शंकरराव काळे व कोल्हे यांनी खाजगी वैयक्तिक जीवनात एकमेकाबद्दल ठेवलेले संबंध आणि एकमेकांची केलेली स्तुती यामुळेही पूर्वीइतकी तणावग्रस्त परिस्थिती तालुक्यात दिसून येत नाही. तरीही आपला कार्यकर्ता व आपला गट याबाबत दोन्हीही नेते काळजी घेतांना दिसून येतात.

शंकरराव कोल्हे यांनी 'सत्याग्रही शेतकरी' हे आत्मचरित्र लिहीले आहे. त्यामध्ये 'शंकरराव काळे आणि मी' हे स्वतंत्रपणे प्रकरण लिहून त्यामध्ये अनेक बाबींवर प्रकाश टाकला आहे. ''शंकरराव काळे यांच्याशी माझे संबंध कसे होते व आहेत. याबद्दल शरद पवारांपासून ते गावच्या गल्लीतील पुढाऱ्यांपर्यंत चर्चा होत असते. आमदारकीच्या निवडणुकीत आम्ही एकमेकांच्या विरोधात उभे राहतो. कोणीतरी एकजण पराभूत होतो, पण कारखान्यांच्या निवडणूका किंवा मार्केट कमिटीच्या निवडणूका आल्या की, त्यामध्ये कॉम्प्रोमाईस होणार, निवडणूका बिनविरोध होणार असे अनेक वर्षे सुरू आहे. त्यांचा कोसाका त्यांना, आमचा 'संजीवनी' आमच्याकडे. मात्र बिनविरोध निवडणूका झाल्या म्हणजे ऊसासाठी संघर्ष ठरलेला आहे.''[४७]

शंकरराव काळे व कोल्हे या विषयांवर अनेकांनीही लेखन केलेले आहे. यशवंतराव गडाख यांनी त्यांच्या 'सहवास' पुस्तकात लिहीले आहे. 'शंकरराव काळे-शंकरराव कोल्हे' हे दोघेही जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते. सहकारातील जाणकार, मुरब्बी

राजकारणी, दोघेही कोपरगाव तालुक्यातील दोघांचे दोन साखर कारखाने, आधी एक होते. नंतर त्यांच्यात स्पर्धा सुरू झाली.

त्यांच्या भांडणाचे परिणाम जिल्ह्याच्या राजकारणावर होऊ लागले. तालुक्या - तालुक्यातील गटबाजी वाढायला लागली. त्याचे चटके सगळ्यांनाच बसू लागले. ते मिटावे म्हणून मी पुढाकार घेतला. आण्णासाहेब शिंदे, शरद पवार यांच्या कानावर या सगळ्या गोष्टी घातल्या. राजकारणातल्या आमच्या दुसऱ्या पिढीला या भांडणाचा किती त्रास होतो हेही सांगितलं. जिल्ह्याच्या बाहेर नाशिकला तातडीने त्यांनी बैठक बोलाविली, पुढे लवकरच्या लोकसभेच्या निवडणूका लागणार होत्या. त्या पार्श्वभूमीवर हे भांडण मिटावं असं सगळ्यांनाच वाटत होतं.

जिल्हयातील आम्ही आठ-दहा प्रमुखजण बैठकीसाठी नाशिकला आलो होतो. रात्रीचे दहा वाजले. पवार साहेबांना यायला थोडा वेळ होता. कोल्हे साहेबांनी मला एकट्याला बाजूला त्यांच्या खोलीत बोलावलं.

ते मला म्हणाले, ''यशवंतराव, तुमचा प्रॉब्लेम काय आहे ?'' मी त्यांना सगळी परिस्थिती सांगितली. ते म्हणाले ''आमची भांडणं राहणार आहेत. त्यामुळे निम्मे कार्यकर्ते मी सांभाळतो, निम्मे काळेसाहेब सांभाळतात. आम्ही दोघे जर एकत्र आलो तर तिसरीच शक्ती तालुक्यात तयार होईल आमचं दोघांचेही राजकारण संपेल. आम्ही एकमेकांशी बोलून आमच्या दोघांच्याही कारखान्याच्या निवडणूका बिनविरोध करतो, ऊसाचा भाव एकमेकांना विचारून काढतो. रात्री एकमेकांच्या तब्येतीची फोनवर विचारपूस करतो. एकमेकांच्या वाढदिवसाला जातो. राजकारणात लढतो, कधी त्यांची तर कधी आमची सरशी होते.'' मी म्हटलं, ''पण या तुमच्या आपसातल्या भांडणामुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांवर त्याचे किती वाईट परिणाम होतात ? शत्रुत्व तयार होतं. ते तर एकमेकांचे तोंडही पहायला तयार नाहीत.''

कोल्हे साहेब म्हणाले, ''कार्यकर्त्यांना समजत नाही का?'' राजकारण हा काय धंदा आहे? कुठ लढायचं, कुठं थांबायचं याची त्यांना अक्कल नाही का ? खाजगी वैयक्तिक संबंध जपायचे नाहीत का ? आम्ही दोघं मित्र आहोत. मित्र राहणार. राजकारणात आमची भांडण चालूच राहणार. वाटलं तर काळे साहेबांना विचारा, त्यांचेही मत माझ्यासारखंच आहे.''[४८]

अशा रितीने अनेकांनी काळे-कोल्हे यांच्या संघर्षाबाबत अनेक गोष्टी समाजापुढे आणल्या. काळे साहेबांनी बऱ्याच वेळा राजकारणात कार्यकर्त्यांना फार वाहून

न घेता निवडणुकीपुरतेच राजकारण करावे. आपला व्यवसाय धंदा याकडे इतरवेळी लक्ष द्यावे, याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले. ''गावाचा विकास साधण्यासाठी गट-तट संपुष्टात आणणे गरजेचे आहे. त्यासाठी ग्रामस्थांनी एकदिलाने गावाचा विकास साधावा.''[४९] राजकारणात तरूणांनी यावे म्हणूनही त्यांनी तरूणांना बऱ्याचवेळा संधी दिली. राजकीय संघर्ष करत करत त्यांनी अनेकवेळा विजय मिळविला तर अनेकवेळा पराभव देखील पत्करला. मात्र अपयशाने ते कधीही खचले नाहीत. पराभवाने कधीच नाउमेद झाले नाहीत. याबाबत त्यांच्या दिलदार स्वभावाच्या अनेक जुन्या आठवणी त्यांचे सहकारी आजही सांगतात. काळे-कोल्हे यांच्यातील संघर्षात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भाग घेतलेले अनेक कार्यकर्ते काळे साहेबांना अनेकवेळा कोल्हेसाहेबांनी फसवून बाजी मारल्याचेही सांगतात.

काळे आणि कोल्हे यांच्यातील मैत्री आणि विरोध यांची चर्चा केवळ कोपरगावातच झाली असे नाही, तर ती संपूर्ण महाराष्ट्रात गाजली. प्रसिद्धी माध्यमांनीही त्यामध्ये रंगत आणली. काळे-कोल्हे संघर्ष म्हणजे मिडियासाठी फार मोठे भांडवल असते. लोक देखील काळे-कोल्हे संघर्षाच्या बातम्या वाचायला व ऐकायला उत्सुक असतात.

**१५. आजारपण -**

शंकरराव लहानपणापासून तसे धडधाकटच होते. फारसे आजार त्यांना झालेच नाही. लहानपणी नारूची साथ आली. त्यावेळी त्यांना नारू झाला होता. त्यानंतर आमदार असताना ॲमिबिया आणि गॉल बॅडर या आजारांनी पोटात दुखण्याचा आजार झाला होता. त्यावर नगरला त्यांनी डॉ. श्रीराम रानडे या फॅमिली डॉक्टरकडे ट्रिटमेंट घेतली होती. बॉम्बे हॉस्पिटलमधील डॉ. श्रीखंडे हे पोटाचे सर्जन होते. त्यांनी गॉल बॅडरचे १९८९ मध्ये अत्यंत चांगले ऑपरेशन केले. त्यामुळे तो आजार कायमचा संपला होता. डोळ्यांचे मोतीबिंदूचे ऑपरेशनही झाले होते. मात्र २००१ मध्ये शंकरराव ८० वर्षांचे असताना ब्लड टेस्ट आणि सोनोग्रीफी केली असता लघवीच्या पिशवीला कॅन्सर झाल्याचे निदान झाले आणि जीवनात एका मोठ्या शत्रूचा उदय झाला. अमेरिकेत कन्या आणि जावई असल्याने अमेरिकेत ऑपरेशन करण्यासाठी ते अमेरिकेला २००२ मध्ये गेले होते. ज्या डॉक्टरने ऑपरेशन केले, त्यांचे असे मत होते की, पिशवी काढू नये. तिकडे मेडिकल बोर्डाच्या सल्ल्याने निर्णय घ्यावे लागतात. मेडिकल बोर्डाने ऑपरेशन करण्याचा निर्णय दिला. ऑपरेशनच करावे असे शंकररावांना वाटत होते. मुंबईच्या डॉक्टरांनीही ऑपरेशन

करण्याचा सल्ला दिला होता. त्यामुळे शेवटी ऑपरेशन केले. ऑपरेशन व्यवस्थित झाले. परंतु पुढे अनेक कटकटी निर्माण झाल्या. स्टोअरेज ऑफ युरीन म्हणजे लघवी साठविण्याची पिशवी असते ती काढून तिच्याऐवजी एक आर्टीफिशियल्ड पिशवी बसविण्यात आली होती. ती आठ–नऊ दिवसांनी बदलावी लागायची. परंतु अशा पिशवीची जाणीव सार्वजनिक जीवनात वावरताना कोणालाही होत नसे. ऑपरेशन करून पिशवी काढली पण तरी कॅन्सरचा काही अंश तेथे असावा म्हणून त्याला नष्ट करण्यासाठी केमोथेरपीची ट्रिटमेंट घ्यावी लागत असे. याबाबत शंकरराव सांगतात की, ''केमोथेरपीचं काम एवढं अवघडं असतं हे मला माहिती नव्हतं. असलेल्या कॅन्सरची काळजी नाही, अस वाटायचं. ऑपरेशनपेक्षा या केमोथेरपीच्या इंजेक्शनचा फार त्रास झाला. या इंजेक्शनमुळे जेवणाची इच्छा होत नसायची. वांत्या व्हायच्या. केमोथेरपीएवढा त्रास जीवनात कोणत्याच गोष्टींनी दिला नाही. बाकी आता मी पूर्णपणे निरोगी आहे. काम करताना कोणताही त्रास होत नाही. सार्वजनिक जीवनात मन उत्साहाने भरलेले आहे. थोडा हार्टचा प्रॉम्ब्लेम आहे, शुगरचा त्रास आहे. पण नॉट सो शुअर. थोडी वयाची मर्यादा येते. कधी मन उत्साहात असते, पण शरीरप्रकृती साथ देत नाही. पण एकूण जीवनात समाधानी आहे.''[५०]

वयाच्या ८२ व्या वर्षी शंकररावांचे कॅन्सरचे निदान होऊन ऑपरेशनही व्यवस्थित झाले होते. दोन महिने त्यांनी अमेरिकेतच आराम केला. मात्र हा कालावधी म्हणजे त्यांच्या सार्वजनिक जीवनातील विरक्तीचा कालावधी ठरला. या दरम्यानच्या काळात संपूर्ण तालुक्यासह जिल्ह्यातही शंकररावांच्या बद्दल एक वाईट अफवा पसरली होती. काही हितशत्रूंनी कॅन्सरच्या आजाराने अमेरिकेत शंकररावांचे निधन झाल्याची अफवा सोडली आणि संपूर्ण तालुक्यासह जिल्ह्यातून याबाबत सर्वत्र कुजबूज सुरू झाली होती. लोक एकमेकांकडे चौकशी करायचे, कारखान्यावरही सारखे फोन करून चौकशी करायचे. अशाप्रकारे काही काळ सर्वत्र शोककळा पसरली होती. मात्र अखेर ही अफवा अफवाच ठरल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला होता. एवढेच नव्हे तर अनेकांनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला तसेच शंकररावांना लवकरच बरे वाटावे व त्यांनी पुन्हा सार्वजनिक जीवनात सक्रीय व्हावे, यासाठी अनेकांनी देवालाही अभिषेक करून साकडे घातले होते. खरोखर चमत्कारच झाला. अमेरिकेतून पूर्णपणे ठणठणीत होऊन शंकरराव भारतात परतले आणि सार्वजनीक जीवनात पूर्वीसारखेच सक्रीय होऊन कार्य करू लागले. अर्थात आता या आजाराने त्यांच्या जीवनात प्रवेश केला असल्याने कामाला बऱ्याच

प्रमाणात मर्यादा येत होत्या. पण तरीही मोठ्या उत्साहाने शंकररावांनी सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रात काम करण्यास सुरूवात केली. राजकीय क्षेत्रातून मात्र निवृत्ती घेऊन आपले चिरंजीव आमदार अशोकरावांवर राजकारणाची जबाबदारी सोपविली होती. तब्येतीच्या सततच्या कुरबूरी चालूच होत्या. तरीही त्यांनी अखेरपर्यंत म्हणजे वयाच्या ९२ व्या वर्षापर्यंत आपले कार्य चालूच ठेवले होते.

**१६. कृतज्ञता सोहळा –**

कॅन्सर सारख्या बलाढ्य आजाराशी यशस्वीपणे लढा देतानाच ऑपरेशन होऊनही जवळपास १० वर्षे पूर्ण झाली होती. शंकररावांनी ६ एप्रिल २०११ मध्ये ९१ व्या वर्षात प्रवेश केला होता. अर्थात वाढदिवस साजरा करणे ही संकल्पना त्यांना फारशी आवडत नव्हती. परंतु बऱ्याच वेळा कार्यकर्ते, हितचिंतक सभासद व कामगार यांचा आग्रह मोडता येत नव्हता. मात्र प्रत्येक वाढदिवस अगदी साधेपणाने साजरा करून त्या दिवशी जी काही रक्कम जमा होईल ती रक्कम रयत शिक्षण संस्थेच्या एखाद्या शाळेला सुपूर्द केली जात असे. बऱ्याचवेळा ते स्वतः कार्यकर्त्यांना सांगून मला हारतुरे देण्यापेक्षा रोख स्वरूपात रक्कम दिली तर त्यातून शैक्षणिक कार्याला हातभारच लागेल. याबाबत ते नेहमी म्हणत असत ‘‘शिक्षणा सारख्या पवित्र कार्याला मदत करणे ही मी ईश्वरची सेवा समजतो. शिक्षण क्षेत्रातील आपणा सर्वांची भूमिका पवित्र व न्यायाला धरून असावी. ज्ञानदानाचे कार्य म्हणून सर्वांनी कर्तव्यबुद्धीने या क्षेत्राकडे पहावे व कार्यरत रहावे. सर्वांमध्ये भावनात्मक ऐक्य असेल तरच कार्य यशस्वी होते’’[५१] त्यामुळे प्रत्येक वाढदिवस म्हणजे त्यांच्या दृष्टीने शैक्षणिक संस्थांना किंवा शाळांना आर्थिक मदत देण्याचाच दिवस असे. त्यामध्ये बहुसंख्येने रयत शिक्षण संस्थेंच्या शाळा व महाविद्यालयांचा समावेश होता. बऱ्याचवेळा इतरही शिक्षणसंस्थेच्या शाळानाही ते मदत करत असत.

६ एप्रिल २००८ चा वाढदिवस असाच आगळा वेगळा ठरला. भारत सेवा संघ, पाचेगाव, ता.नेवासा येथील शैक्षणिक संस्थेचे सोनेवाडी ता.कोपरगाव येथे न्यू इंग्लीश स्कूल, हायस्कूल आहे. त्या संस्थेच्या या हायस्कूललाही शंकररावांनी वेळोवेळी मदत केली होती. त्यामुळे मनाचा मोठेपणा दाखवून या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी शंकररावांचे नाव या वाढदिवसाच्या निमित्ताने या शाळेला देण्याचे ठरविले. तत्कालीन शिक्षणमंत्री मा. नामदार श्री. पतंगराव कदम यांच्या हस्ते या शाळेचे ‘कर्मवीर शंकरराव काळे विद्यालय, सोनेवाडी’ असे नामकरण करण्यात आले. या वाढदिवसालाही मिळालेली संपूर्ण देणगी शंकररावांनी या शाळेला दिली. त्यानंतर दोन वाढदिवस अत्यंत

साधेपणानेच घरी साजरे करून आपला नित्यक्रम म्हणजे शाळांना मदत करणे हा चालूच ठेवला. वाढदिवसाबरोबरच अनेक ठिकाणी लग्न कार्यात तसेच इतर सत्कार समारंभातही हार-तुऱ्यांनी सत्कार करण्यापेक्षा रोख रक्कम घेऊन त्यांनी संयोजकांना धन्यवाद दिले. याबाबत ते म्हणत ''लग्नविधीमध्ये होणाऱ्या सत्कार समारंभाच्या खर्चाला फाटा देऊन हा खर्च शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राला दान केला तर आपण हा खर्च सत्कारणी लावल्याचे भाग्य लाभेल.''[५२]

६ एप्रिल २००१ ला शंकररावांनी ८१ व्या वर्षात पदार्पण केले होते. हा वाढदिवस विशेष महत्त्वाचा होता. ८१ व्या वर्षात पदार्पण करणे म्हणजे सहस्त्रचंद्रदर्शनाचा लाभ होणे, असा त्याचा अर्थ होतो. म्हणून परिसरातील कार्यकर्ते, हितचिंतक, सभासद व संचालक मंडळाने 'सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा' आयोजित केला होता. कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाने गौतम पब्लिक स्कूलच्या भव्य पटांगणावर हा अत्यंत भव्य व दिव्य सोहळा मोठ्या दिमाखात साजरा केला होता. मात्र हा वाढदिवस झाल्यानंतर हा सोहळा शेवटचाच ठरतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. कॅन्सरच्या आजाराने अचानक डोके वर काढले आणि तब्येतीची कुरबूर सुरू झाली. शेवटी अमेरिकेत जाऊन लघवीच्या पिशवीच्या कॅन्सरचे ऑपरेशन केले. त्या नंतरही म्हणावी अशी प्रकृती ठणठणीत झालीच नाही. त्यातच वाढते वय म्हणजे वाढत चाललेले म्हातारपण अडचणीचे ठरत होते. परंतु प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर सर्व अडचणींवर मात करून आपले समाजकार्य चालूच ठेवले होते. याबाबत ते म्हणतात ''मन, बुद्धी चांगल्या कामात गुंतवून ठेवली व चारित्र्याला धक्का लागू दिला नाही, तर अंतःकरणात वाईट विचार न येता जीवनात आपण बरेच काही चांगले करू शकतो.''[५३]

कॅन्सरवरील उपचार, थोडासा हार्ट प्रॉब्लेम तसेच शुगर प्रॉब्लेम आणि वाढते वय या सर्व बाबींमुळे कामाला काही प्रमाणात मर्यादा आल्या होत्या. मात्र सार्वजनिक जीवनात काम करण्याची जिद्द कायम होती. कोपरगाव सहकारी साखर कारखाना, गौतम सहकारी बँक, कर्मवीर शंकरराव काळे एज्यु. सोसायटी आणि जीवापाड जपलेली रयत शिक्षण संस्थेची शैक्षणिक संकूले या सर्वांची सतत देखभाल करणे, त्यांच्या अडी-अडचणी सोडविणे, त्यांच्या विकासासाठी सततचा ध्यास यावर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले होते. सतत स्वतःला त्यांनी कामामध्ये गुंतवून ठेवले. कार्यकर्ते, सभासद, कामगार, शेतकरी व सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपला वेळ खर्च केला. कॅन्सरचे ऑपरेशन होऊन आता जवळपास ९ वर्षे पूर्ण झाली होती. गेल्या ९ वर्षांपासून

सार्वजनिक जीवनातील त्यांच्या कामाचा आवाका पाहता तरूणांना लाजवेल अशा पद्धतीने त्यांचे काम चालू होते. ६ एप्रिल २०११ मध्ये शंकरराव ९१ व्या वर्षात पदार्पण करणार होते. त्यामुळे सर्व हितचिंतक, नातेवाईक, कार्यकर्ते व कामगार यांनी हा वाढदिवस एका विशिष्ट पद्धतीने साजरा करण्याचे ठरविले. वाढदिवस ही संकल्पना त्यांना मान्यच नव्हती. याबाबत ते म्हणतात, 'मनुष्याचे आयुष्य ही लढाई आहे. ती प्रत्येकाने लढली पाहिजे. त्याप्रमाणे मी देखील आजवर लढत आलो आहे. माझ्या आयुष्यात मला लाभलेली आई-वडिलांची पुण्याई व त्यांनी दिलेले संस्कार यामुळेच मी जीवनात यशस्वी झालो आहे.'[५४] तरी देखील सर्वांनी हा वाढदिवस अविस्मरणीय वाढदिवस कृतज्ञता सोहळा म्हणून साजरा करण्याचे ठरविले.

६ एप्रिलऐवजी सदरचा कृतज्ञता सोहळा ९ एप्रिल २०११ रोजी गौतम पब्लिक स्कूलच्या भव्य पटांगणावर आयोजित करण्यात आला होता. या कृतज्ञता सोहळ्यासाठी राज्यातील सर्वपक्षीय नेत्यांना निमंत्रणे देण्यात आली. त्यामध्ये तत्कालीन केंद्रिय मंत्री नामदार श्री. विलासराव देशमुख, नामदार श्री. पंतगराव कदम, मा. श्री. गोपीनाथराव मुंडे, मा. श्री. मनोहर जोशी, मा. नामदार श्री. बाळासाहेब थोरात, मा. ना. श्री. बबनराव पाचपुते, मा. खासदार भाऊसाहेब वाकचौरे, मा. खा. श्री. यशवंतराव गडाव, मा. श्री. बाळासाहेब विखे पाटील, मा. श्री. शंकरराव कोल्हे इ. नेते या कृतज्ञता सोहळ्याला उपस्थित राहीले होते. त्याचबरोबर संपूर्ण अहमदनगर जिल्हयाबरोबर महाराष्ट्रातील कार्यकर्ते, हितचिंतक व आप्तेष्ट या कार्यक्रमाला उपस्थित राहिले. रयत शिक्षण संस्थेमधील सर्व पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी यांची संख्या तर मोठी उल्लेखनीय होती. त्यामुळे कृतज्ञता सोहळ्याला जवळपास २० हजार लोकांची हजेरी होती. मात्र कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळ, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व इतर संस्थांचे कर्मचारी व कार्यकर्त्यांनी नियोजन अत्यंत चोख केले होते.

सदर कृतज्ञता सोहळा अत्यंत मंगलमय वातावरणात संपन्न झाला. ९१ व्या वर्षातील पदार्पणानिमित्त या ठिकाणी शंकररावांचा भव्य सत्कार करण्यात आला. या कृतज्ञता सोहळयानिमित्त आलेल्या सर्वच नेत्यांनी शंकररावांविषयी भरभरून प्रेम व्यक्त केले. यावेळी केंद्रिय मंत्री मा. नामदार श्री. विलासराव देशमुख म्हणाले ''शंकरराव हे यशस्वी व कुशल असे संघटक आहेत. नेता या नात्याने प्रशासनातील सर्व सद्‌गुण त्यांच्याकडे आहेत. त्यांना सत्तेचा कधीच अहंकार झाला नाही. एखादा प्रश्न सोडविण्याचे व त्यासाठी निर्णय घेण्याचे त्यांचे कसब हे खंद्या, अनुभवी व यशस्वी राज्यकर्त्यालाच

शोभेसे आहे. त्यांचे निर्णय समाजाच्या सर्वंकष विकासाच्या कामात कल्पक, धाडसी, प्रामाणिक, जनहिताचे व दुरगामी परिणाम करणारे समाजपरिवर्तनाची दिशा देणारे आहेत. हे आज आपल्या प्रत्ययास येत आहे. अहमदनगर जिल्हयातील एक समर्थ नेतृत्व, समन्वय घडवणारा नेता अशी त्यांची ओळख आहे. त्यांनी आमच्यावर खुप प्रेम केले. शिक्षणक्षेत्रात सगळीकडे व्यवसाय झाला असताना त्यांनी गरीबांसाठी रयतचे जाळे विणले. हाच आशिर्वाद त्यांच्या पाठीशी आहे. रयत शिक्षण संस्थेसाठी निःस्वार्थपणे जे काम केले. ते राज्यातील सर्वच पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना मार्गदर्शक व आदर्श आहे. जे आम्हाला जमले नाही, ते शंकररावांनी करून दाखविले आहे. लोकसभेत असतांना त्यांनी मतदार संघाचे अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. मी सत्तेत असतांना अनेकवेळा त्यांनी मला कार्यक्रमासाठी या ठिकाणी बोलावले. तसेच सत्तेत नसतानाही अनेक वेळा बोलावले. सत्तेत नसताना बोलावणारा असा एकमेव माणूस मी पाहिला आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष, आमदार, मंत्री, खासदार इ. च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासाला त्यांनी फार मोठा हातभार लावला आहे.''[५५]

शंकररावांबद्दल बोलताना तत्कालीन वनमंत्री मा. नामदार श्री. पतंगराव कदम म्हणाले ''शंकरराव काळे हे एक अजातशत्रू असे व्यक्तिमत्त्व आहे. सर्वत्र शिक्षणाचा व्यवसाय झालेला आपण पहात आहेत. मात्र शंकररावांनी आपली सर्व शक्ती 'रयत शिक्षण संस्थेसाठी' खर्च केली असून ते कर्मवीरांचे सच्चे अनुयायी आहेत. सन १९७८ साली ते शिक्षण राज्यमंत्री असताना माझ्या संस्थेला त्यांनी मेडिकल कॉलेजसाठी परवानगी दिली होती. ठरविले असते तर त्यांनी स्वतःच्या शिक्षण संस्थेसाठी अनेक कॉलेज काढून स्वतः शिक्षण सम्राट बनले असते. परंतु कर्मवीरांचा वारसा समर्थवणे चालविण्याचे तत्व त्यांनी आयुष्यभर पाळले आहे. आमच्या भारती विद्यापीठासाठी १९६४ त्यांनी आशीर्वाद दिले. त्यासाठी पहिले सर्क्युलर काढून भारती विद्यापीठाच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहिल्यानेच आज भारती विद्यापीठाचा एवढा मोठा विकास होऊ शकला आहे. 'रयत' च्या माध्यमातून त्यांनी गोरगरिबांची सेवाच करण्याचे काम चालविलेले आहे. त्यामुळेच आज या वयातही ते सार्वजनिक जीवनात सुखी व समाधानी असल्याचे जाणवते आहे.''[५६]

महाराष्ट्रातील ऊसतोडणी कामगारांचे नेते व भाजपाचे जेष्ठ नेते मा. श्री. गोपीनाथरावजी मुंडे यावेळी म्हणाले ''शंकरराव काळे हे महाराष्ट्रातील जुन्या पिढीतील एक आदर्श नेते आहेत. सहकारी साखर कारखान्यांचा इतिहास पाहिला तर तो इतका

चांगला नाही असे दिसून येते. मात्र शंकरराव काळे यांनी सहकाराच्या माध्यमातून या जिल्ह्यात जे काम उभे केले आहे. त्याला तोड नाही. ऊस तोडणी कामगारांच्यासाठी मी सतत सहकार सम्राटांशी लढा देत आलो आहे. मात्र 'कोसाका' कारखान्याच्या बाबतीत मला वेगळा अनुभव आहे. शंकररावांनी नेहमीच ऊस तोडणी कामगारांच्या बाबतीत न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. केवळ ऊस तोडणी कामगारच नव्हे तर कारखाना कामगार, सभासद व शेतकरी यांची कामधेनू समजूनच कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून तालुक्याचाच नव्हे. तर संपूर्ण जिल्ह्याचा विकास साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील 'कोसाका' हा राज्यातील एक आदर्श सहकारी साखर कारखाना म्हणून ओळखला जातो.'[५७] मा. नामदार श्री. बबनराव पाचपुते यांनी या वेळी शंकररावांचा गौरव करताना म्हटले की, ''काळे साहेब हे जिल्ह्यातील एक सुसंस्कृत नेते आहेत. यशवंतरावजीच्या राजकीय विचारांचा वारसा त्यांनी आत्मसात केलेला असल्याने महाराष्ट्रातील शेती, शेतकऱ्यांची स्थिती, सहकारी चळवळ, शेतीपूरक उद्योगधंदे, शेती मालावरील प्रक्रिया, शेतीचा पाणीपुरवठा, औद्योगिक विकास अशा जनतेच्या जिव्हाळ्याच्या अनेक प्रश्नांची माहिती करून ते प्रश्न सोडविण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला आहे. त्यांचा स्वभाव सर्वांशी मनमोकळेपणाने वागण्याचा आहे. विरोधकांकडे देखील ते आदरानेच पहातात. विरोधकांचेही म्हणणे ते अत्यंत संयमाने ऐकून घेतात. हे लोकशाहीतील सर्व संकेत आजही पाळताना त्यांना आपण पहातो. विरोधी पक्षाच्या अनेक नेत्यांशी व्यक्तिगत जीवनात त्यांचे स्नेहाचे संबंध आहेत. अनेक विरोधी पक्षातील सदस्य त्यांचे अत्यंत जीवाभावाचे मित्रही होते. त्यांच्या या मृदू व उमद्या स्वभावामुळे ते सर्वांना प्रिय आहेत. त्यांच्या सार्वजनिक जीवनातील हा सर्वात चांगला गुण म्हणावा लागेल. 'रयत' शिक्षण संस्थेतील त्यांचे कार्य म्हणजे कर्मवीर आण्णाच्यानंतर दुसरे 'कर्मवीर' म्हणून त्यांचा गौरव करता येईल. श्रीगोंदा येथे महाविद्यालय सुरू व्हावे म्हणून मी त्यावेळी काळेसाहेबांकडे आग्रह धरला. शिवाय हे कॉलेज रयतचेच असले पाहिजे म्हणून काळेसाहेबांना रयतचे चेअरमन या नात्याने सततचा लकडा लावला होता. यावेळी इतर स्थानिक संस्थांनी हालचाली सुरू केल्या होत्या. परंतु मी काळेसाहेबांना सांगितले की, ''श्रीगोंद्यात रयतचे कॉलेज जोपर्यंत होणार नाही, तो पर्यंत मी लग्न करणार नाही.'' माझी अशी विचित्र अट पाहून काळेसाहेबांनी जोरदारपणे मंत्रालय पातळीवर जाऊन

श्रीगोंद्यात रयतचे महाविद्यालय सुरू केले. आणि माझ्या लग्नाचा मार्ग मोकळा केला, असे हे काळे साहेब जिल्ह्यातील एक सुसंस्कृत व आदर्श नेतृत्व आहे.'[५८]

तत्कालीन कृषीमंत्री नामदार श्री. बाळासाहेब थोरात यांनीही शंकररावाचा गौरव करताना म्हटले की, '' काळेसाहेबांचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अत्यंत उंचीचे आहे. त्यांची कार्यक्षमता अफाट आहे. आज ९१ व्या वर्षात पदार्पण करत असताना तरूणांना लाजवेल असा उत्साह आणि काम करण्याची उमेद त्यांच्यात आहे. अहमदनगर जिल्ह्याच्या विकासामध्ये त्यांचे फार मोठे योगदान आहे. जुन्या पिढीतील एक अभ्यासू तितकाच कार्यकुशल नेता म्हणून त्यांची ख्याती आहे. जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष म्हणून त्यांनी जो पॅटर्न राबविला होता, तो संपूर्ण राज्याने स्विकारला होता. यावरून त्यांची बुद्धीमत्ता व समाजभिमूख वृत्ती यांची प्रचिती येते. आम्हा सर्व कार्यकर्त्यांना आजही त्यांचेच मार्गदर्शन मिळते आहे. याचा आम्हाला निश्चित अभिमान आहे. अनेक सामाजिक व सार्वजनिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ते आग्रही असतात. त्यांचा या वयातील उत्साह पाहून खरोखरच आपणदेखील त्यांच्यापुढे फारच कमी आहोत. असेच मला वाटते. केवळ आठ दिवसात ठरवलेल्या कार्यक्रमाला एवढी मोठी  माणसे एकत्र येतात. यावरूनच महाराष्ट्रात त्यांच्याबद्दल किती जिव्हाळा आहे, हे यावरून स्पष्ट होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व अंत:करणात पोहचले आहे. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांनी निर्माण केलेला एक हिरा आहे. जिल्हा परिषदेतील त्यांच्या कामाची नोंद सुवर्णअक्षरांनी केली जाईल. आजच्या आमुलाग्र बदलाचे ते खरे दूत आहेत. 'रयत' चे आणि त्यांचे अतुट असे नाते आहे. त्यांची इच्छाशक्तीही अत्यंत जबरदस्त आहे. यापुढेही आम्हाला त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करायचे आहे.''[५९]

अहमदनगर जिल्ह्यातील जेष्ठ नेते व माजी खासदार श्री. बाळासाहेब विखे पाटील यांनी शंकररावांचा गौरव करताना म्हटले की, ''शंकरराव काळे हे एक आदर्श व्यक्तीमत्त्व आहे. १९६१ च्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर अहमदनगर जिल्हा परिषदेचे ते पहिले अध्यक्ष झाले व मला उपाध्यक्षपदाची संधी मिळाली. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून ते सलग १० वर्ष कार्यरत होते. एक अभ्यासू व कर्तबगार जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे त्यावेळी नाव झाले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मला काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे मला देखील भविष्यकाळात त्याचा फार मोठा फायदा झाला. अहमदनगर जिल्हा परिषदेत त्यांनी

राबविलेला पॅटर्न पुढे संपूर्ण महाराष्ट्राने स्वीकारला होता. जिल्हा परिषदेतील त्यांच्या या कामामुळे जिल्ह्याच्या विकासाला फार मोठी गती व दिशा मिळालेली आहे. शिवाय त्यांचा कारभार व काम करण्याची पद्धत पुढील पिढिंना मार्गदर्शकच ठरलेली आहे.''[६०]

खासदार मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे म्हणाले, ''इतिहासाची पाने चाळली तर माझ्याबाबतीत काळे साहेब हे मला भेटलेले पहिले देवमाणूस आहेत. जिल्हा परिषदेत १९७०-७१ साली शिक्षकाची नोकरी त्यांनी दिली होती. माझ्या चांगल्या आयुष्याची सुरूवात त्यांनी करून दिली होती. म्हणून अशा देवमाणसाला माणूस कधीच विसरत नाही. काळे साहेब हे राजकारणातील एक मोठे विचारवंत आहेत. एक आदर्श व्यक्तिमत्व, पुरोगामी विचारांचा वारसा चालविणारा भावी पिढीचा एक अत्यंत महत्त्वाचा दुवा आहेत. कर्मवीरांच्या पावलावर पाऊल ठेवून गरिबांना शिक्षण देण्याचा विचार भावी पिढीसाठी इतिहास ठरेल.''[६१]

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन ॲड. रावसाहेब शिंदे म्हणाले, ''गेल्या ४० वर्षांपासून रयत शिक्षण संस्थेत आम्ही सहकारी म्हणून काम करत आहोत. त्यामुळे 'रयत' साठी काम करण्याची त्यांची धडपड मी अत्यंत जवळून पाहिली आहे. १५ वर्ष ते 'रयत' चे चेअरमन होते. त्या काळात तर कर्मवीर आण्णांच्यानंतर महाराष्ट्रात रयतच्या शाळांचे जाळे विणणारे ते एकमेव आहेत. 'रयत' शिक्षण संस्था वाढविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.''[६२]

शंकररावांचे तालुक्यातील पारंपरिक विरोधक, राजकीय प्रतिस्पर्धी माजी मंत्री श्री.शंकरराव कोल्हे यांनीही यावेळी शंकररावांचा गौरव करतांना म्हटले की, ''काळे साहेब आणि मी राजकारणात नेहमीच एकमेकांच्या विरोधात राहिलो आहे. परंतु आमचे राजकारण हे नेहमीच विकासाचे राहिले आहे. विधायक कामासाठी आम्ही एकत्रच असतो. कोठे भांडावे, कोठे थांबावे हे आम्हाला दोघांनाही चांगले माहीत आहे. काळेसाहेब हे माझे गुरू आहेत. शाळेत असताना ते माझे पालक होते. माझ्या प्रगतीपुस्तकावर ते सह्या करायचे. राजकारणामुळे त्यांची आणि माझी ताटातूट झाली ते पुलोदमध्ये गेले आणि मी वसंतदादा गटाकडे गेलो. त्यावेळेपासून आमचे राजकीय मार्ग वेगळे झाले. आमच्यातील स्पर्धा तीव्र होती आणि त्याचा कोपरगावच्या जनतेला फायदाच झाला असे वाटते. पण आम्ही अनेक वर्षे बरोबर होतो हे सत्य आहे. या तालुक्यात शेतीच्या पाण्याचा प्रश्न मोठा आहे. त्यासाठी आम्ही एकत्रच लढत आहोत. काळे साहेब रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाल्यामुळे अहमदनगर जिल्ह्यात सर्वात जास्त

शाखा सुरू झाल्या व ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहचण्यास मदत झाली. त्याचा मला फार मोठा अभिमान वाटतो. विरोधक म्हणजे शत्रू नाही, प्रतिस्पर्धी म्हणजे वैमनस्य नाही. व्यक्तीगत पातळीवर आम्ही मैत्रभाव राखला. हे पथ्य आम्ही पाळले आहे.''[६३]

या सोहळ्याचे निमित्ताने राज्यभरातील इतरही मान्यवर नेत्यांनी शंकररावांचा गौरव केला. माजी खा. श्री. यशवंतराव गडाख, रयत शिक्षण संस्थेचे व्हा. चेअरमन डॉ. अनिल पाटील, प्रेमानंद रूपवते, आ. चंद्रशेखर घुले, आप्पासाहेब राजळे, आमदार सुधीर तांबे, आमदार शिवाजीराव कर्डीले, आमदार अरूणकाका जगताप, आमदार भाऊसाहेब कांबळे इ. मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. याशिवाय परिसरातील असंख्य कार्यकर्ते, हितचिंतक, कामगार, सभासद, शेतकरी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शंकररावांना शुभेच्छा दिल्या. रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी व अनेक माजी–आजी विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित राहिले होते. असा हा भव्य व डोळे दिपवून टाकणारा सोहळा आणि आपल्यावर प्रेम करणारे असंख्य चाहते, कार्यकर्ते व हितचिंतक पाहून शंकररावांना गहिवरून आले. सत्काराला उत्तर देतांना त्यांना शब्द फुटेना केवळ अश्रूंना वाट मोकळी करून त्यांनी सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. दुर्दैवाने कृतज्ञता सोहळा हा वाढदिवस त्यांच्या जीवनातील शेवटचा मोठा सोहळा ठरला. त्यानंतर ९२ वा वाढदिवस त्यांनी पाहिला परंतु यावेळी मात्र त्यांना तब्येतीची साथ मिळाली नाही. दिवसेंदिवस तब्येतीच्या कुरबुरी वाढत गेल्या. त्यामुळे त्यांच्या जीवनातील हा अखेरचा वाढदिवस आजारपणात गेला. अर्थातच कृतज्ञता सोहळा हा कार्यक्रम त्यांच्या जीवनातील सार्वजनिक आणि आनंदाचा कार्यक्रम ठरला.

**१७. उदात्त अखेर –**

शंकररावांना लघवीच्या पिशवीचा कॅन्सर झाल्याचे निदान झाल्यानंतर २००२ मध्ये अमेरिकेत ऑपरेशन केले. मात्र ८० वर्षापर्यंत ठणठणीत असणाऱ्या तब्येतीच्या कुरबुरी तेथून पुढे सतत सुरू झाल्या. कॅन्सरचा काही अंश तेथे असावा म्हणून त्याला नष्ट करण्यासाठी केमोथेरपीची ट्रिटमेंट घ्यावी लागायची, त्या ट्रिटमेंटमुळे प्रचंड त्रास सुरू झाला. याशिवाय वाढलेले वय या दोन्हींमुळे १०–१२ वर्ष त्यांनी अत्यंत कडवटपणे आजाराशी झुंज चालू ठेवली. मात्र केवळ आजारपण धरून ते बसले नाही. याही काळात ट्रिटमेंट सुरू असूनही सार्वजनिक कामांमध्ये ते गुंतून राहिले. सतत कारखान्यांत येऊन कारखान्याच्या कामकाजाची पहाणी करणे, गौतम सहकारी बँक, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट, कोपरगाव सहकारी जिनिंग प्रेसिंग, गौतम नगर एज्युकेशन

सोसायटी, रयत शिक्षण संस्था या सर्व संस्थांचे कामकाज पहाणे हा त्यांचा नित्यनियमच होता. वयाच्या ९२ व्या वर्षीदेखील त्यांनी कारखान्याच्या कार्यालयात बसून कामकाज पाहिले. सर्व सस्थांवर बारकाईने नजर ठेवली होती. त्यांची इच्छाशक्ती अत्यंत प्रबळ होती. अत्यंत गंभीर आजार असताना देखील गेली १०–१२ वर्ष त्या आजाराशी त्यांनी यशस्वी झुंज देण्याचे काम केले होते. परंतु दिवसेंदिवस प्रकृती ढासाळत गेली. नाशिक, मुंबई हॉस्पिटल वाऱ्या चालू झाल्या. अखेरच्या दिवसात नाशिक येथील मॅग्नम हॉस्पिटल येथे उपचार करण्यात आले. तेथील डॉ. चोपडा यांनी शर्थीचे प्रयत्न केले. परंतु त्यामध्ये यश येत नव्हते. म्हणून शेवटी मुंबईला ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले. त्या ठिकाणीही डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न चालविले होते असे असले तरी बळावलेला आजार आणि वृद्धापकाळ या दोन गोष्टींवर मात करणे शक्यच नव्हते. त्यामुळे शेवटी ५ नोव्हेंबर २०१२ रोजी रात्री ठिक ११.३० वा. ब्रीच कँडी रूग्णालयात त्यांची प्राणज्योत मालवली आणि एका महान पर्वाची उदात्त अखेर झाली.[६४]

६ तारखेला शंकररावांचे पार्थिव मुंबईहून शिर्डीला आणण्यात आले. त्याच दिवशी अंत्यसंस्कार करणे शक्य नव्हते. कारण अंत्यविधीचे स्वरूप आणि त्यासाठी लोटणारा प्रचंड जनसमुदाय लक्षात घेऊन त्याची तयारी करणे आवश्यक होते. त्यामुळे शिर्डी येथील साईबाबा सुपर हॉस्पिटल येथे शीतपेटीमध्ये त्यांचे पार्थिव ठेवण्यात आले. वृत्तपत्रे, आकाशवाणी व विविध वाहिन्यांवर त्यांच्या निधनाची बातमी प्रसिद्ध होताच माहेगांव देशमुख येथील त्यांच्या वस्तीवर प्रचंड गर्दी होऊ लागली. त्याचबरोबर शिर्डी येथे मात्र कुणालाही जाऊ दिले जात नव्हते. परंतु लोकांच्या भावना व वाढती गर्दी लक्षात घेऊन वस्तीवरच शीतपेटीची व्यवस्था करण्यात आली. त्यानुसार त्या दिवशी संध्याकाळी पार्थिव वस्तीवर अंत्यदर्शनासाठी आणण्यात आले. रात्रभर वस्तीवर लोकांची गर्दी असल्यामळे रात्री भजनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला. इकडे अंत्यविधीची जोरदारपणे तयारी करण्यात आली. माहेगाव देशमुख गावामध्ये गोदावरी नदीच्या काठी अंत्यविधीसाठी मोठ्याप्रमाणात बुलडोझरच्या साहाय्याने जागा सपाट करून जेथे प्रत्यक्ष दहन करावयाचे तेथे एक चौथरा बांधण्यात आला. त्याचबरोबर बाजूला काही मान्यवर येणार होते म्हणून प्रचंड मोठा मंडप टाकण्यात आला. माहेगावकडे येणाऱ्या सर्वच रस्त्यांची दुरूस्ती करण्यात आली. जिल्हा पोलीस उपअधीक्षक यांनी चोख बंदोबस्त ठेवून सर्व परिस्थितीवर जातीने लक्ष दिले. महाराष्ट्र शासनाने सरकारी इतमामाने अंत्यसंस्कार करण्याची घोषणा केली. त्यामुळे मोठ्याप्रमाणात तयारी करण्यात आली.[६५] ७ नोव्हेंबर

२०१२ सकाळी १०.०० वा. अंत्यविधी करण्याचे ठरविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुख्यमंत्री नामदार श्री. पृथ्वीराज चव्हाण, नामदार श्री. हर्षवर्धन पाटील, नामदार श्री. सतेज पाटील, मा. नामदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील, मा. नामदार श्री. पतंगराव कदम, मा. नामदार श्री. बबनराव पाचपुते इ. उपस्थित राहणार असल्यामुळे गौतम पब्लिक स्कूल येथे दोन हेलीपॅड बनविण्यात आले. मुख्यमंत्र्यांची उपस्थिती राहणार असल्यामुळे सगळीकडे प्रचंड पोलीस यंत्रणा कार्यरत होती. कलेक्टर, तहसीलदार आणि मा. नामदार श्री. बाळासाहेब थोरात हे दोन दिवसांपासून सर्व तयारीवर बारकाईने लक्ष देऊन कामकाजाची माहिती घेत होते. आवश्यक त्या सूचना संबंधितांना करून अंत्यविधीचे नियोजन करत होते.[६६] त्याचबरोबर कोसाका उद्योग समुहाचे सर्व पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी रात्रंदिवस राबत होते. कारण अंत्यविधीला प्रचंड जनसमुदाय येणार म्हणून कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये. यासाठी काळजी घेतली जात होती. संपूर्ण काळे कुटुंबीय, माहेगांव देशमुख येथील ग्रामस्थ, परिसरातील कार्यकर्ते व हितचिंतक सर्व आपापल्या परीने यामध्ये भाग घेऊन नियोजन करण्याच्या दृष्टीने राबत होते. [६७]

७ तारखेला ठिक ८.०० वा. वस्तीवरून फुलांनी सजविलेल्या ट्रकवरून अंत्यविधीला सुरूवात झाली. राष्ट्रध्वजात गुंडाळलेला शंकररावांचा पार्थिव देह ५ कि. मी. वरील वस्तीवरून माहेगांव देशमुख गावात वाजत गाजत आणण्यात आला. गावाजवळ अमृतेश्वर महादेव मंदिराच्या प्रचंड प्रांगणात त्यांचा पार्थिव देह अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आला. त्या ठिकाणी हजारो लोकांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. या ठिकाणी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी सरकारच्या वतीने पुष्पचक्र अर्पण केले. यावेळी बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले ‘‘शंकरराव काळे हे महाराष्ट्रातील काँग्रेसचे एक ज्येष्ठ नेते होते. अत्यंत भारदस्त व्यक्तिमत्वाचे काळे साहेब हे सर्वांचे आदर्श आहेत. संसदेत आम्ही बरोबर काम केले आहे. त्यांची काम करण्याची पद्धत मी अत्यंत जवळून पाहिली आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून सुरूवातीला जे काम त्यांनी केले होते त्याचा आदर्श संपूर्ण महाराष्ट्रात घेतला गेला यावरूनच त्यांचे कर्तृत्व सिद्ध होते. कर्मवीर आण्णांच्यानंतर रयत शिक्षण संस्थेचे महत्त्वाचे घटक म्हणून त्यांनी काम केले. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. विविध राजकीय पदांच्या माध्यमातून त्यांनी तालुक्याच्या, जिल्ह्याच्या तसेच महाराष्ट्राच्या विकासामध्ये मोठे योगदान दिलेले आहे. सहकारातील त्यांची कामगिरी तर शेजाऱ्यांना आदर्श व्हावा अशीच राहिली आहे. अशा या महान नेत्याला मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. [६८] या

ठिकाणी नामदार हर्षवर्धन पाटील यांनीही शंकररावांविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. ''सर्व सामान्यांसाठी आयुष्य वेचणारा एक महान नेता. सहकार, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील काळे साहेबांच्या कार्याला तोड नाही. राजकारणात तर लोकशाही मार्गानेच त्यांची वाटचाल होती.'' [६९] यावेळी नामदार पतंगराव कदम, ना. सतेज पाटील, ना. बबनराव पाचपुते, ना. राधाकृष्ण विखे पाटील, ना. बाळासाहेब थोरात इ. आपल्या भावना व्यक्त केल्या.

अमृतेश्वर महादेवाच्या प्रांगणात हजारो लोकांनी अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिल्यानंतर पोलिस दलाने मानवंदना दिली व तेथून पुढे चौथऱ्यापर्यंत पुन्हा अंत्ययात्रा सुरू झाली.यावेळी पोलिस दलाचे बँडपथक पुढे आणि पार्थिव देह खांद्यावर घेऊन अंत्ययात्रा त्यामागे होती आणि हजारे लोक शंकररावांना अखेरचा निरोप देत होते. हारांचा वर्षाव होत होता. अनेकांना हुंदके आवरत नव्हते. संपूर्ण परिसरात प्रचंड गर्दी लोटली होती. गोदावरी काठचे संपूर्ण वातावरण भारावून गेले होते. या ठिकाणी बांधलेल्या चौथऱ्यावर पार्थिव देह ठेवण्यात आला. चिरंजीव आमदार अशोकराव काळे व कन्या स्नेहलताताई शिंदे यांनी पंडितजींच्या मंत्रोच्चारामध्ये अखेरचा विधी पूर्ण करून आमदार अशोकरावांनी शंकररावांच्या देहाला अग्नी दिला. पोलिसांनी आकाशात बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना दिली. त्यावेळी उपस्थितांचे अश्रू अनावर झाले होते.[७०]

अंत्यविधीला इतकी प्रचंड गर्दी झाली होती मात्र पोलिस यंत्रणा, कोसाका उद्योग समूह कर्मचारी, माहेगांवचे ग्रामस्थ व इतर स्वयंसेवक यांनी उत्कृष्ट पार्कींग व्यवस्था, बैठक व्यवस्था आणि इतर नियोजन केल्यामुळे ४०-५० हजारांचा जनसमुदाय लोटला असूनही कोठेही अडचण वा गोंधळ निर्माण झाला नाही. उपस्थितांमध्ये जिल्हयातील व महाराष्ट्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये प्रामुख्याने मा. नामदार श्री. मधुकरराव पिचड, श्री. गोविंदराव आदिक, श्री. बाळासाहेब विखे, श्री. यशवंतराव गडाख, श्री. घनश्याम शेलार, श्री. शंकरराव कोल्हे, श्री. आप्पासाहेब राजळे, मा. आमदार श्री. सुधीर तांबे, मा. आमदार श्री. विजयराव औटी, आमदार श्री.शिवाजीराव कर्डीले, श्री. रावसाहेब शिंदे, माजी आमदार श्री. चंद्रशेखर कदम, मा. आमदार श्री. भाऊसाहेब कांबळे, मा. आमदार श्री. जयवंतराव ससाणे, खासदार श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा. आमदार श्री. अरूण जगताप इ. माजी-आजी मंत्री, आमदार, खासदार धरून कितीतरी राजकीय पुढारी आणि कार्यकर्ते तसेच सरकारी अधिकारी, व्यापारी, बागाईतदार, शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते, नागरिक अनेक संस्था

आणि कारखान्यांचे प्रतिनिधी, शिक्षण क्षेत्रातील मंडळी, लेखक व पत्रकार इ. सामील होते. याशिवाय ह.भ.प.मिराबाई मिरीकर, ह.भ.प. मोहनराव चव्हाण, जंगली महाराज आश्रमाचे गुरूवर्य देवेंद्रनाथ महाराज इ. आध्यात्मिक क्षेत्रातील मंडळी देखील यावेळी उपस्थित होती.[७१]

अशाप्रकारे वयाच्या ९१ व्या वर्षी शंकरराव काळेंनी जगाचा निरोप घेतला. त्यांच्या एकूण जडणघडणीचा मागोवा घेतल्यास अनेक पैलूंवर प्रकाश पडतो. दीर्घकाळ सत्तेत राहूनही त्यांनी आपले चारित्र्य स्वच्छ ठेवले होते. आपल्या पदाचा दुरूपयोग कधीही केला नाही. अहंकाराचाही स्पर्श त्यांना कधी झाला नाही. एकापेक्षा एक सरस असे कार्यकर्ते नगर जिल्ह्यात पुढे आले. त्यांची साखळी तयार करण्याचे व जोड – जाड करण्याचे काम शंकररावांनी केले. जे काम उभे केले ते सर्वच चांगले चाललेले आहे असेही म्हणता येणार नाही. परंतु चांगल्या चाललेल्या कामांची व उभारलेल्या संस्थांची यादीही फार मोठी आहे. काही बाबतीत अपयश आले असल्यास त्याच्या मुळाशी राष्ट्रीय व राज्यपातळीवरील धोरणेही दिसून येतात. परंतु सहकारातील त्यांचे काम अत्यंत मोठ्या दर्जाचे आहे. विशेषतः दि कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचे उत्कृष्ट प्रशासन व पूरक उद्योगाच्या माध्यमातून साधलेला शैक्षणिक व सामाजिक विकास या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. सहकारात अनेक चढ –उतार आले. त्यात महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखाने व इतर संस्था बंद पडल्या तर काही कायमच्या बुडाल्या मात्र गेली ६0 वर्ष 'कोसाका' सर्व अडचणींवर मात करून आजही अत्यंत सुव्यवस्थित चालू आहे. गेल्या ६0 वर्षापासून कारखान्याला लाभलेले त्यांचे नेतृत्व व मार्गदर्शन यामुळेच 'कोसाका' हा महाराष्ट्रातील एक सर्वोत्कृष्ट कारखाना म्हणून ओळखला जातो. शंकररावांच्या निधनानंतर कारखान्याचे चेअरमन, संचालक मंडळ व सभासदांनी शंकररावांच्या स्मृती त्यांच्या विषयी असलेले प्रेम, जिव्हाळा आदर व विश्वास व्यक्त करण्यासाठी 'कोसाका' चे कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि., असे नामकरण केले आहे.[७२]

थोडक्यात शंकरराव काळे यांचे जीवनचरित्र व जडणघडण भावी पिढीसाठी निश्चितच आदर्श व एक प्रेरणादायी इतिहासच ठरणार आहे.

### १८. सार्वजनिक जीवनातील मान-सन्मान –

शंकरराव काळेसाहेब यांचा जन्म दिनांक ६ एप्रिल १९२१ रोजी माहेगांव देशमुख येथे झाला. छोट्याशा खेडेगावी जन्म घेऊनही त्यांनी राष्ट्रीय पातळी पर्यंत

आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला. महाविद्यालयीन शिक्षणानंतर २ वर्षे राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये त्यांनी सब् डिव्हिजनल इंजिनियर म्हणून नोकरी केली. सामाजिक कार्याची आवड असल्याने नोकरीचा राजीनामा देऊन सामाजिक कार्यास सुरूवात केली. सन १९५३ मध्ये कोपरगांव तालुक्यात माहेगांव देशमुख विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची स्थापना केली. शंकरराव काळेसाहेब यांनी स्वामी सहजानंद भारती यांच्या प्रेरणेने काँग्रेस पक्षात प्रवेश केला. शंकरराव काळेसाहेब यांचे आयुष्य दोन महत्त्वाच्या टप्प्यात विभागले गेले. पहिल्या टप्प्यात खडतर बालपण, शिक्षण ते कोपरगांव सहकारी साखर कारखान्याची उभारणी. यामध्ये त्यांच्यातील कार्यकर्ता व कुशल संघटक घडला. विकासाच्या नव्या कल्पना त्यांनी या काळात साकारल्या. तर दुसऱ्या टप्प्यात त्यांच्यातल्या संघटकाची जागा कुशल नेतृत्वाने घेतली. कल्पनांना व्यवहाराची जोड मिळत गेल्याने ते जिल्हयाचे नेते झाले. त्यांच्या जीवन प्रवासात सहकारात धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, पद्मश्री विखे पाटील व ग. र. औताडे पाटील यांनी पायाभरणी केली. शिक्षण क्षेत्रात पद्मभुषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी तर राजकीय क्षेत्रात स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण व स्वर्गीय वसंतदादा पाटील यांनी भक्कम पायाभरणी केली.

महाराष्ट्र राज्यात प्रथम पंचायत राज निर्मितीनंतर सन १९६२ मध्ये अहमदनगर जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष होण्याचा बहुमान शंकरराव काळे यांना मिळाला. सन १९६२ ते १९७२ सलग दहा वर्षे अध्यक्ष पदाच्या माध्यमातून प्रभावी काम करून जिल्हा परिषदेला उल्लेखनीय कार्याबद्दल शासनाकडून प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळवून दिला. सन १९७२ ते १९८० पर्यन्त अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून पक्ष संघटनात्मक कार्य केले.

सहकारी तत्वावरील पहिल्या प्रवरा सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ सन १९४५ साली रोवली गेली. कै. धनंजय गाडगीळ, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, वैकुंठभाई मेहता, कै. गणपतराव औताडे पाटील या ज्येष्ठांच्या विचाराची बैठक शंकरराव काळे यांना लाभली. शंकरराव काळे सिव्हिल इंजिनियरींगमधील पदवीधर असल्याने धनंजयराव गाडगीळ व पद्मश्री विखे पाटील यांनी त्यांना प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत प्रवर्तकिय संचालक मंडळात घेतले.[७३] प्रवरा सहकारी साखर कारखाना ही संस्था शंकरराव काळे यांची अनुभवाची शिदोरीच ठरली. प्रवराच्या उभारणीचे काळात शंकरराव काळे यांना केवळ सहकार चळवळीच्या विचारांचा वारसा

मिळाला नाही तर संचालक म्हणून काम करतांना ग्रामीण भागातील लोकांचे प्रश्न, कारखाना उभा करतांना येणाऱ्या अडचणी, व्यवस्थापन, काटकसर, व्यापक दृष्टिकोन आदी पैलूंचा  खोलवर अनुभव मिळाला. या अनुभवाच्या शिदोरीवर गणपतराव औताडे व शंकरराव काळे  यांनी सन १९५३ मध्ये कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., ह्या आशिया खंडातील सहकारी तत्वावरील दुसऱ्या सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेत पुढाकार घेतला. कोपरगांव सहकारी साखर कारखाना स्थापन करण्याचे श्रेय शंकरराव काळे यांनाच द्यावे लागते.

कोसाका उद्योग समुहाच्या स्थापनेपासूनच विकास व संवर्धनासाठी त्यांनी आयुष्यभर अपरिमित कष्ट घेतले. केवळ साखर उत्पादनावर विसंबून न रहाता पेपर उद्योग, अल्कोहोल उत्पादन, बायोगॅस, उपपदार्थ निर्मिती प्रकल्प सुरू केले.  कोसाका उद्योग समुह कायम विकासाभिमुख ठेवून सहकाराची विकासगंगा परिसरातील व तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी. कामगार व एकूणच जनतेच्या दारी पोहोचविली. कोपरगांव तालुका सहकारी कापूस जिनिंग अँड प्रेसिंग सोसायटी, गौतम सहकारी कुक्कुटपालन संस्था, गौतम एज्युकेशन सोसायटी, गौतम सहकारी बँक लि., अशा कितीतरी लोकोपयोगी संस्था स्थापन करून त्यांचे अनेक वर्षे नेतृत्व करून या संस्थांना विकासाची नवी दिशा दिली.

शंकरराव काळे यांनी ३५ वर्षे कोसाकाचे अध्यक्षपद भुषविले. कारखान्याचे संस्थापक व मार्गदर्शक या नात्याने त्यांनी जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यन्त अविरतपणे काम केले. दि  कोपरगांव सहकारी साखर कारखान्याचे माध्यमातून कोपरगांव तसेच नाशिक जिल्ह्यातील येवला, सिन्नर, निफाड व नांदगांव तालुक्यात ऊस पिक लागवड व सर्वांगीण विकासासाठी भगिरथ प्रयत्न केले.  शंकरराव काळे यांच्यामुळे साखर कामगार युनियन, ऊस तोडणी मजूर व वाहतुक संघटना आणि कारखाना व्यवस्थापन यांचे कायमचे सलोख्याचे संबंध राहिले. शासनाने जाहीर केलेल्या सर्व सवलती लागू करण्याचे बाबतीत कोपरगांव सहकारी साखर कारखाना शंकरराव काळे यांचेमुळे सतत अग्रेसर राहिला. त्यामुळे कधीही संप अथवा कलह निर्माण झाला नाही. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या ऊसाला रास्त दर दिला पाहिजे यासाठी वेळप्रसंगी सरकार विरोधी टोकाची भुमिका घेऊन त्याची अंमलबजावणी करणारे शंकरराव काळे हे महाराष्ट्रातील एकमेव नेते होय. शंकरराव काळे यांनी खऱ्या अर्थाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिलेला आहे. काळेसाहेबांनी जाहीर केलेला ऊसाचा दर नक्की मिळणार अशी

विश्वासाची भावना ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मनात रहात असल्यामुळे त्यांनी प्रथम कोसाकाला ऊस गळीतास देण्यास प्राधान्य दिले. शंकरराव काळे या  नावामध्ये ताकद व विश्वास होता. त्यांनी दिलेला शब्द हा प्रमाण असल्यामुळे त्याची वचनपूर्ती होत असे. दि कोपरगांव सहकारी साखर कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ दिनांक १७ ऑक्टोंबर २०१२ रोजी संपन्न झाला. शंकरराव काळे यांची प्रकृती ठिक नसतांनाही कारखाना प्रेमापोटी त्यांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती लावली. ही त्यांच्या आयुष्यातील कारखान्याच्या सार्वजनिक कार्यक्रमातील शेवटचीच भेट ठरली.

पारनेर विधानसभा मतदारसंघातून सन १९७२ व १९७८ असे दोन वेळा ते महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेले.  पारनेर सारख्या सतत दुष्काळी भागासाठी विकासाची कामे केली.  पाझर तलाव, ग्रामीण रस्ते, दवाखाने, हायस्कूल, सहकारी संस्थांची स्थापना करून ग्रामीण भागाला संजीवनी प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र राज्याच्या मंत्री मंडळात सन १९७८ साली शिक्षण व सहकार खात्याचे राज्यमंत्री म्हणून समावेश झाला.[७४]  त्यांनी राज्यमंत्री असतांना खाजगी व विनाअनुदानित प्राथमिक शाळांना अनुदानित करून तंत्रशिक्षण व महिला–मुलींचे शिक्षणाला प्रथम प्राधान्य दिले. राजकीय क्षेत्रात कार्य करण्याची मिळालेली संधी हे समाजसेवेचे व्रत आहे असे मानून ते कार्यरत राहिले.

रयत शिक्षण संस्थेचे आद्य संस्थापक पद्‌मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील हे काळेसाहेब यांच्या जीवनाचे आदर्श होते. कर्मवीर अण्णांवर काळेसाहेब यांची अढळ श्रध्दा होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचे खरे वारसदार होते. अण्णांच्या विचाराने प्रभावित होऊन शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचविण्यासाठी स्वत:ची खाजगी शैक्षणिक संस्था न वाढविता सन १९७५ ते १९९० या १५ वर्षाच्या चेअरमन पदाच्या काळात रयत शिक्षण संस्थेचा राज्यव्यापी विस्तार करण्याचे मोठे काम कर्मवीर अण्णा यांचेनंतर काळेसाहेब यांनी केले.  त्यांच्या शैक्षणिक कार्याचा वारसा मोठया जिद्दीने पुढे  नेला.

वडिल कै. ह.भ.प. देवराम बाबा, आई कै. राधाबाई काळे व पत्नी कै. सुशीलामाई काळे यांच्या प्रेरणेतून त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून मुलींच्या शिक्षणाला विशेष प्राधान्य देत १५ स्वतंत्र कन्या विद्यालये तसेच पाच महिला महाविद्यालये स्थापन करून स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले.[७५]  सन १९६२ पासून रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलवर सदस्य तसेच सन ७५ ते ९० चेअरमन व मे २०११

पर्यन्त संस्थेचे उपाध्यक्ष पद त्यांनी भुषविले. काळेसाहेब यांनी खऱ्या अर्थाने कर्मवीर अण्णांचा 'कमवा व शिका' हा व्यापक दृष्टिकोन समाजापुढे मांडला होता. समाजातील गुणी मुलांना, दुर्लक्षित, दीन-दलित, गोर-गरीब, खेडयापाड्यातील मुलांना एकत्रित आणून त्यांच्यात शिक्षणाविषयी गोडी निर्माण करून सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याचे काम अखेरच्या क्षणापर्यन्त केले. रयत शिक्षण संस्था, सातारा ही आपली मातृसंस्था व आत्मा मानून या संस्थेच्या विशेषतः उत्तर विभागातील माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयांना सर्वांगीण विकासासाठी तन-मन-धनाने मदत केली.

कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचे सभासद व शेतकऱ्यांच्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षणाची सोय व्हावी म्हणून कारखान्याच्या पुढाकाराने गौतम एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. ११०० चे वर विद्यार्थी गौतम पब्लिक स्कूलमध्ये होस्टेलला राहून शिक्षण घेत आहेत. महाराष्ट्रात निवासी म्हणून गुणवत्तेच्या बाबतीत बोटावर मोजण्याइतपत ज्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत, त्यात गौतम पब्लिक स्कुलचा वरचा क्रमांक लागतो.

शंकरराव काळे यांनी दूरदृष्टी ठेऊन कोपरगांव सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना तसेच पुरक व्यावसायिक, सुशिक्षित बेरोजगार, कारागिर व गरजूंना कर्ज पुरवठा करण्यासाठी गौतम सहकारी बँक लि., गौतमनगर या बँकेची सन १९७६ मध्ये स्थापना केली. सन १९८० ते ९० तसेच २००३ ते २०११ अखेर गौतम सहकारी बँकेचे चेअरमन पदाचे माध्यमातून बँकींग क्षेत्रात प्रतिकुल परिस्थितीतही उल्लेखनिय काम केले. कोपरगांव येथे महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेचे ४२ वर्षे अध्यक्ष पदाच्या माध्यमातून श्री साईबाबा तपोभूमी व्यवस्थापन समिती व श्री साईबाबा मंदिराची उभारणी करून साईभक्तांना विविध मुलभूत सुविधा उपलब्ध करून धार्मिक कार्यात शंकरराव काळे यांनी वयाचा विचार न करता हिरिरीने सहभाग घेतला.

कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून सार्वजनिक क्षेत्रात काम करीत असतांनाच काळेसाहेब यांनी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळावर तीन वर्षे संचालक पद भुषविले. त्याचप्रमाणे वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, पुणे या संस्थेचे काळेसाहेब २२ वर्षे गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य होते. काळेसाहेब यांनी ३५ वर्षे महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे संचालक, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन या संस्थेचे २ वर्षे प्रेसिडेंट पद भुषविले. तसेच महाराष्ट्र डिस्टिलर्स

असोसिएशनचे १० वर्षे संचालक, सन १९९१ ते ९६ झोनल रेल्वे यूजर्स सल्लागार समिती व राज्य ग्राहक संरक्षण समितीचे सदस्य अशा विविध समित्यांवर काम करून आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला.

काळेसाहेब हे राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या नॅशनल को–ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कौन्सिल, नवी दिल्ली या संस्थेचे सन १९९२ ते ९५ अखेर तीन वर्षे संचालक होते. ऑल इंडिया डिस्टिलर्स असोसिएशन, नवी दिल्ली या संस्थेचे सन १९९२ ते ९५ अखेर तीन वर्षे उपाध्यक्ष व सन १९९६ ते २००३ अखेर आठ वर्षे अध्यक्ष पद भुषविले. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघाचे तीन वर्षे संचालक, तसेच सन १९९१ ते १९९६ अखेर पांच वर्षे केंद्र सरकारच्या शुगर इंडस्ट्रि डेव्हलपमेंट कौन्सिल, ग्रामविकास समिती, नवी दिल्ली तसेच विज्ञान व तंत्रज्ञान, वन व पर्यावरण समितीवर सदस्य अशा विविध राष्ट्रीय पातळीवरील समित्यांवर प्रतिनिधित्व करून जबाबदार व अभ्यासपूर्ण नेतृत्व दिले.[७६]

काळेसाहेब हे १० व्या लोकसभेसाठी कोपरगांव लोकसभा मतदारसंघातून मे १९९१ मध्ये विक्रमी मतांनी विजयी झाले. त्यांनी या मतदारसंघाचे सन १९९१ ते १९९६ अखेर प्रतिनिधीत्व केले होते. कोपरगांव लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी या नात्याने पिण्याचा पाण्याचा प्रश्नाला प्रथम प्राधान्य दिले. बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले. पाझर तलाव, साठवण तलावासाठी आर्थिक मदत, पंतप्रधान राष्ट्रीय सहाय्यता निधीतून गरजूंना ऑपरेशन व उपचारासाठी रूग्णांना लक्षावधी रूपयांचे अर्थसहाय्य मिळवून दिले. पाटबंधारे प्रकल्प, शेतकऱ्यांचे शेतीविषयक प्रश्न मार्गी लावण्यासाठी व अडचणी सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले. केंद्र शासनाच्या असलेल्या विविध योजना कोपरगांव लोकसभा मतदारसंघात राबविल्या. केवळ कोळपेवाडी व कोपरगांव विकासाचा केंद्रबिंदू न ठेवता सर्वांना लाभ देण्याचा प्रयत्न केला.

अहमदनगर जिल्ह्यातील निळवंडे धरणाचा प्रश्न अनेक वर्षे ऐरणीवर होता. धरण लवकर झाले पाहिजे अशी मागणी होती परंतू निर्णय होत नसल्याने प्रश्न लोंबकळत पडला होता. काळेसाहेब यांची नाळ ग्रामीण भागात सहकारी चळवळीचे माध्यमातून जोडली गेली होती. काळेसाहेब यांचा जलसंधारण व जलसिंचन विषयावर अभ्यास होता. म्हणून दिनांक २६ मे १९८६ रोजी महाराष्ट्र शासनाने त्यांच्या अध्यक्षतेखाली निळवंडे धरणाच्या भुसंपादन व विस्थापितांचे पुनर्वसन याचा विचार

करण्यासाठी काळे समिती नेमण्यात आली. या समितीच्या सहा बैठका झाल्या. विस्थापितांचे पुनर्वसन ही सरकार, समाज व लाभक्षेत्रातील शेतकरी व सर्वांचीच नैतिक जबाबदारी आहे. त्यासाठी लाभक्षेत्रातील ज्या खातेदारांच्या जमिनी त्या कायद्याखाली मागितल्या जातील त्यांनी त्या स्वखुशीने कसलाही कोर्ट कचेरीचा आधार न घेता शासनाला उपलब्ध करून द्याव्यात तसेच विस्थापितांचा प्रश्न केवळ कायद्याने सुटणारा नाही, त्यासाठी व्यवहार व माणुसकीचा दृष्टीकोन स्विकारायला हवा हा मुलमंत्र त्यांनी दिला.

काळेसाहेब यांनी सन १९८५ ते १९९५ या कालावधीत गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रातील शेती पाण्याअभावी संपुष्टात येत असतांना महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अभ्यासपूर्ण लेखन करून 'आंतरलेले पाणी' या शीर्षकाखाली पुस्तक लिहिले. दारणा व गंगापूर धरणातील गोदावरी कालव्यांचे हक्काचे ११ टी. एम. सी. पाणी नांदूर मध्मेश्वर पिकअप् वेअरमधून मोजून द्यावे यासाठी महाराष्ट्र शासनाकडे आग्रह धरला. १७ एप्रिल ८९ रोजी कोपरगांव ते मुंबई पायी पाणी दिंडीचे आयोजन केले तसेच १६ ऑक्टोंबर १९८९ रोजी हिवाळी अधिवेशनाच्या वेळी नागपूरला उपोषण केले. १५ मे १९९२ रोजी कोपरगांव येथे दुष्काळी पाणी परिषद घेतली. रास्ता रोको आंदोलनात सामान्य शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून हिरिरीने भाग घेतला होता.[७७] धरणातील पाणी वापराचा प्राधान्यक्रम प्रथम पिण्यासाठी, द्वितीय शेतीसाठी व नंतर औद्योगिक वापरासाठी असावा तसेच वॉटर ऑडीट व्हावे हे मुद्दे प्रथम काळेसाहेब यांनी मांडले. गोदावरी कालव्याचे लाभक्षेत्रातील ब्लॉकधारक शेतकऱ्यांना पाटबंधारे खाते १४ दिवसांनी पिकांना पाणी देत असे. परंतु गोदावरी कालव्यावरील पाण्याचे जस-जसे आरक्षण वाढत गेले, त्या प्रमाणात कॅनॉलला कमी कमी पाणी मिळू लागले. सन १९८५ मध्ये तर ८० दिवसांनी कालव्याचे रोटेशनचे पाणी मिळाले होते. त्यामुळे शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाखाली कोपरगांव तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात मे. सिव्हिल जज्ज, सिनियर डिव्हिजन, कोपरगांव यांचे कोर्टात मान. शासनाच्या विरूध्द पूर्वीप्रमाणे पिकांना पाणी मिळावे यासाठी सन १९९३ मध्ये दावा दाखल केलेला होता. सदर दाव्यामध्ये मान. नामदार कोर्टाने ब्लॉकधारक शेतकऱ्यांची विनंती मान्य केली व ब्लॉकधारक शेतकऱ्यांना त्यांचे हक्काचे पाणी पूर्ववत द्यावे अशा आशयाचा आदेश दिला.

सुमारे एक लाख एकर शेतीचे भवितव्य अवलंबून असलेल्या गोदावरी कालव्याचे हक्काचे व वहिवाटीचे ११ टी एम सी पाणी पुन्हा मिळविण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष नव्या पिढीला दिशादर्शक आहे. पाटपाण्याची न्यायालयीन लढाई काळेसाहेब यांचे पराकोटीचे प्रयत्न व आत्मविश्वासामुळेच जिंकली. गोदावरी कालव्याचे पाणी प्रश्नावर काळेसाहेब यांनी दाखविलेल्या मार्गानेच यापुढील वाटचाल सुरू आहे.

कोपरगाव तालुक्यात कोपरगांव – कोळपेवाडी रस्त्यावरील गोदावरी नदीवर कुंभारी – धारणगांव या ठिकाणी तसेच कोपरगांव बेट व चास (नळी) येथे पुल व्हावा अशी शंकरराव काळे यांची खूप इच्छा होती. गोदावरी नदीवर धारणगांव कुंभारी येथे पुल बांधावा यासाठी महाराष्ट्र शासनाकडे काळेसाहेब यांनी खूप पाठपुरावा केला. निवेदने दिली. शासन दरबारी मुख्यमंत्री, मंत्री महोदयांना समक्ष भेटून वस्तुस्थिती मांडली, परंतु निधी नसल्यामुळे महाराष्ट्र शासन ह्या पुलाचे काम हाती घेऊ शकले नाही. यावर काळेसाहेब थांबले नाहीत. त्यांनी धारणगांव कुंभारी व कोपरगांव बेटातील गोदावरी नदीवरील पुलाचा प्रश्न केंद्र शासनाच्या दरबारी मांडला. त्यावेळी मान. नामदार श्री. के. एच. मुनीअप्पा, मंत्री, शिपींग, रोड ट्रान्सपोर्ट व हायवेज मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेबरोबर काळेसाहेब यांचे मैत्रीचे व स्नेहाचे संबंध होते. त्यांचेकडे या पुलांचे कामासंदर्भात त्यांनी अनेकवेळा चर्चा केली, पत्रव्यवहार केला. कोपरगांव तालुक्याचे लोकप्रतिनिधी या नात्याने आमदार श्री. अशोकराव काळे यांना सतत पाठपुरावा करण्यासाठी शक्ती व पाठबळ दिले. त्यात काळेसाहेब यांना यश आले. काळेसाहेब यांना एक नव्हे तर दोन ठिकाणी गोदावरी नदीवर पुल बांधून देण्याचे आश्वासन मान. नामदार श्री. के. एच मुनीअप्पा यांनी दिले. केंद्र शासनाच्या शिपींग, रोड ट्रान्सपोर्ट व हायवेज मंत्रालयाने सेंट्रल रोड फंड (सीआरएफ) योजना – सन २००५–२००६ अंतर्गत कोपरगांव नगर परिषद हद्दीत गोदावरी नदीवर पुल बांधकामास केंद्र शासनाने मान्यता दिली. तसेच सेंट्रल रोड फंड स्किम सन २००७–२००८ अंतर्गत गोदावरी नदीवर धारणगांव – कुंभारी येथील पुलाचे बांधकाम सेंट्रल रोड फंडामधून (सीआरएफ) करण्यास मंजूरी दिली. हे गोदावरी नदीवरील हे दोन्ही पुल काळेसाहेब यांचे भगिरथ प्रयत्नामुळे पुर्ण झाले. [७८]

शंकरराव काळे यांचे जीवन व कार्य यावर आधारित डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी समाज अभियंता हे आत्मचरित्रपर पुस्तक लिहिले. दिनांक ५ ऑक्टोंबर २००८ रोजी 'समाज अभियंता' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री

मा. नामदार श्री. विलासरावजी देशमुख व अनेक मंत्रीमहोदयांच्या उपस्थितीत संपन्न झाला. हा त्यांच्या आयुष्यातील आनंदाचा क्षण होता.

जिद्द, कठोर परिश्रम, संघर्ष, आणि चिकाटीच्या बळावर ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणूस असामान्य असं कर्तृत्व उभे करू शकतो याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजेच शंकरराव काळे हे होय. त्यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकार, कृषी, औद्योगिक आदी क्षेत्रात रयत शिक्षण संस्था, सातारा व कोपरगांव सहकारी साखर कारखान्याचे माध्यूमातून जे कार्य केले, त्यांची दखल घेऊन त्यांना नवी दिल्ली येथील सेवाभावी संस्थेने **'उद्योगरत्न पुरस्कार'** देऊन सन्मानित केले.

त्याचप्रमाणे सन २००५ मध्ये पुणे विद्यापीठाच्या वर्धापनदिनी काळेसाहेब यांना सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कृषी, सहकार आदी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुणे विद्यापीठाने मा. नामदार श्री. शरदराव पवार साहेब, केंद्रीय मंत्री यांचे शुभहस्ते **"जीवन गौरव पुरस्कार"** देऊन गौरविले. तसेच रयत शिक्षण संस्था, सातारा या संस्थेने **'रयत माऊली'** हा संस्थेचा उच्च पुरस्कार देऊन सन्मानित केले होते.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष, माजी खासदार, सहकार चळवळीचे देशातील अग्रणी नेतृत्व स्वर्गीय गुलाबराव पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त गुलाबराव पाटील मेमोरियल ट्रस्ट, मिरज, जि. सांगली यांचे वतीने काळेसाहेब यांना **'सहकार प्रबोधनकार गुलाबराव पाटील'** पुरस्कार देऊन सन्मान देऊन गौरविले होते. तसेच त्यांना गिरणा गौरव प्रतिष्ठान, नाशिक यांचे वतीने **'गिरणा गौरव पुरस्कार – २०१२'** देऊन सन्मानित केले.

काळे साहेब यांच्या निधनाने कोपरगांव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून कार्य करणारे खंबीर नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांचे कर्तृत्व म्हणजे राजकीय, सहकार आणि शिक्षण क्षेत्राच्या इतिहासातील एक सुवर्णपानच आहे.

स्व. काळेसाहेब यांनी आपले सामाजिक व शैक्षणिक कार्य एका विशिष्ट गावाशी, तालुक्याशी वा जिल्ह्याशी मर्यादित न ठेवता रयत शिक्षण संस्था व कोपरगांव सहकारी साखर कारखाना यांना आपली मातृसंस्था मानून या संस्थांच्या माध्यमातून सुसंस्कृत, सुशिक्षित व सुजाण समाज घडविण्याचे कर्मवीर अण्णांचे खरे स्वप्न साकारण्याचे कार्य अखेरच्या श्वासापर्यन्त केले. एक प्रगतीशील शेतकरी व एक आदर्श कुटुंबप्रमुख म्हणून त्यांनी कुटुंबाला अत्यंत चांगल्या पध्दतीने दिशा देऊन समाजापुढे

आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, कृषी, सहकार, धार्मिक आदी क्षेत्रात जे काम केलेले आहे ते तरुणांना सतत प्रेरणादायी ठरणारे आहे.

**१९. कर्मवीर शंकरराव काळे स्मृती उद्यान –**

अगदी तरूण वयापासून दूरदृष्टी ठेवून कोपरगावसारख्या दुष्काळी भागात त्यांनी केलेल्या कार्यामुळे ह्या संपूर्ण भागाचा, इथल्या समाजाचा कायापालट झाला. त्यांच्या आदर्श जीवनापासून नव्या पिढीला स्फूर्ती मिळावी आणि उत्तम दर्जाचे सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा मिळावी ह्या हेतून, काळे साहेबांच्या स्मृतींचे जतन करणाऱ्या स्मारकाची निर्मिती त्यांच्याच कार्यपरिसरात झाली, तर ती कर्मवीर शंकरराव काळे साहेबांना खऱ्या अर्थाने आदरांजली ठरेल, हे ध्यानात घेऊन आमदार अशोकराव काळे साहेब यांचे मार्गदर्शनाखाली आणि श्री. आशुतोष काळे यांचे नेतृत्वाखाली कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाने 'कर्मवीर शंकरराव काळे स्मृती–उद्यान' हा प्रकल्प हाती घेतला.

सर्वसाधारण एखाद्या व्यक्तीचे स्मारक म्हणजे त्या व्यक्तीचा पूर्णाकृती पुतळा आणि त्याच्या भोवतीची बाग अशीच कल्पना रूढ आहे. या पारंपारिक कल्पनेला थोडासा छेद देऊन कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाने, येथील संपूर्ण पंचक्रोशीत कुठेही नसेल अशा एका स्थानाची निर्मिती केली, की ज्या स्थानामुळे कर्मवीरांची स्मृती आणि त्यांनी समाजापुढे ठेवलेला आदर्श लहान–थोरांच्या मनात सतत जागृत राहील.

**स्मृती–उद्यान प्रकल्पासाठी योगदान –**

कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाच्या विश्वस्त मंडळाने स्मृती–उद्यान प्रकल्पाची कल्पना मांडली. मित्रमंडळाच्या विनंतीनुसार कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर मंदिर परिसरात ४ एकर जागा ही मोफत वीज, पाणी व सुरक्षा व्यवस्थेसह स्मृती–उद्यान प्रकल्प उभारणीसाठी दिली. त्याचप्रमाणे प्रकल्पांतर्गत रस्ते, बाग व विकासाची कामे कारखान्याने करून दिली.

कर्मवीर शंकरराव काळे यांचे साखर कारखाना व संलग्न संस्था यातील अधिकारी यांच्याशी अतूट नाते होते. स्मृती–उद्यान प्रकल्पासाठी कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळ, गौतमनगर, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि., गौतमनगर तसेच ट्रकमालक बंधू व कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्यातील कामगारांनी मोठे आर्थिक योगदान दिले.

**स्मृती–उद्यानातील आकर्षणे**

- कै. देवरामबाबा आणि राधाबाई यांचे माहेगांव देशमुख, तालुका कोपरगाव येथील जुने घर आणि शेत.
- कष्टकरी कुटुंबात कै. शंकररावांचा जन्म झाला. त्या काळातले माजघर, घरातले स्नेहपूर्ण वातावरण, घराभोवतीचा परिसर, ह्या पार्श्वभूमीवर मंगलमय वातावरणात संपन्न झालेला शंकररावांच्या बारश्याचा पारंपरिक पद्धतीचा समारंभ, अगदी त्या काळी वापरात असलेल्या पाळण्यासहीत निर्माण करण्यात आला आहे.
- बालपणी शंकररावांनी शिस्तीचे पालन करावे ह्यासाठी प्रसंगी कठोर होऊन शंकररावांना शासन करणारे त्यांचे वडील आणि मुलावर संस्कार करतेवेळी त्या प्रसंगी वडिलांच्या साथीला खंबीरपणे उभी राहाणारी शंकररावांची आई आणि ह्या प्रसंगांच्या साक्षीदार अशा इतर आप्तस्वकीय स्त्रिया. ह्या छोट्या, परंतु अत्यंत महत्त्वपूर्ण अशा प्रसंगाचे सादरीकरण.
- लहानगे शंकरराव शिक्षणासाठी घराबाहेर पडतात.
- शालेय शिक्षणाचे वेळी स्वर्गीय काळे साहेब नाशिक येथील उदोजी मराठा बोर्डींगमध्ये वास्तव्यास होते. त्या बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांसमोर वर्तमानपत्र वाचत असतानाचा प्रसंग.
- पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वसतिगृहाच्या १०१ क्रमांकाची खोली.

  शंकररावांच्या सामाजिक जीवनामध्ये महत्त्वाचे स्थान असणाऱ्या मित्रमंडळीचा येथे जमलेला फड. याच काळात त्यांच्यावर गांधी नेहरू, पटेल यांचा प्रभाव पडलेला दृष्टोत्पत्तीस येतो. (१९३९) ह्या प्रसंगाचे स्मरण करून देणारी संवेदनशील मांडणी.
- आईच्या मृत्यूची बातमी समजल्यावर शोकदग्ध झालेले शंकरराव.

  ''माझ्या आईच्या वाट्याला आयुष्यात खूप दुःख आणि अमाप कष्ट आले. आमच्या कुटुंबाला जी समृद्धी प्राप्त झाली. त्यात आईच्या कष्टाचा फार मोठा वाटा आहे. ''

  हे कर्मवीर शंकररावांचे उद्‌गार स्मरणीय होतील, अशा पद्धतीने संगमरवरात कोरण्यात आली आहेत.

- शंकरराव आणि सौ. माई यांच्या, हुंडा न घेता, वडिलांच्या मर्जीविरूद्ध आणि शुक्लेश्वर मंदिरात संपन्न झालेल्या, प्रवाहाविरूद्धच्या विवाहसोहळ्यांचे जणू प्रत्यक्ष दर्शनच प्रेक्षकांना ह्या ठिकाणी होईल.
- कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची कल्पना, प्रत्यक्षात अवतरताना. श्री. ग. र. औताडे यांच्याबरोबर कारखाना उभारणीसाठी साहेबांनी घेतलेले अमाप कष्ट.
- प्रथम गळीत हंगामाची पूजा (१९५६)
- साहेबांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामध्ये ज्यांचं अढळ स्थान आहे, अशा कर्मवीर भाऊराव पाटील यांची साहेबांच्या निवासस्थानी भेट. (१९५८)
- जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाल्यानंतरच्या कार्यकाळातील विविध समाजोपयोगी कामे (१९६२ ते १९७२)
- आमदारकीच्या कार्यकाळातील (१९७२ ते १९८०) काही महत्त्वाचे प्रसंग.
- आसवनी प्रकल्प, गौतम सहकारी बँक व इतर प्रकल्प (१९७६)
- खासदारपदी असताना – ह्या दरम्यान संपूर्ण नगर जिल्ह्याच्या विकासासाठी काळे साहेबांनी केलेले अखंड प्रयत्न (१९९१ ते १९९६)
- आजच्या कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचे अभिमानास्पद दर्शन (२०१३)

असे एकाहून एक अविस्मरणीय प्रसंग पाहत असताना उच्च दर्जाच्या ध्वनी आणि प्रकाश योजनेमुळे यातल्या प्रत्येक दृश्यातून प्रेरणा घेऊनच प्रेक्षकांनी पुढे सरकावे आणि प्रकल्पाच्या स्मृती दीर्घकाळ मनात जपाव्यात अशा पद्धतीने ह्या दृश्यांची मांडणी १२००० चौरस फुटांच्या शेडमध्ये केली आहे.

**विकाससूर्य –**

कर्मवीरांचे जीवनचरित्र याच समर्पक नावाने अतिशय सुंदररित्या सादर केले आहे. त्यांच्या आयुष्यातले सुमारे १५ ते २० निर्णायक प्रसंग निवडून ते योग्य प्रकारची अत्याधुनिक दृकश्राव्य माध्यमांचा वापर करून अत्यंत प्रभावीपणे सादर केले आहेत. पुतळे, चित्रे, रेखाचित्रे, चलत्‌चित्रे, छायाचित्रे, साहेबांच्या प्रत्यक्ष वापरातल्या वस्तू, पार्श्वसंगीत आणि अतिशय प्रभावी आणि मोहक अशी प्रकाशयोजना आणि लघुचित्रपट प्रक्षेपण, ही ह्या प्रकल्पाची महत्त्वपूर्ण वैशिष्टये आहेत.

**संग्रहालय –**

कर्मवीर शंकरराव काळे यांच्या रोजच्या जीवनातील वापरावयाच्या वस्तू, त्यांना मिळालेली मानपत्रे, सन्मानचिन्हे, सार्वजनिक जीवनातील त्यांची छायाचित्रे, आणि

त्यांनी सामाजिक प्रश्नांविषयी वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार या सर्वांची देखण्या पद्धतीने मांडणी ४००० चौरस फुटांच्या शेडमध्ये केली आहे. कर्मवीरांच्या जीवनात असलेले कै. माईंचे स्थान लक्षात घेऊन त्यांचेही स्मरण येथे केलेले आहे.

**एकात्मतेचं बेट (Unity ISland) –**

कर्मवीर शंकरराव काळे यांच्या जीवनावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. हे आपण सर्वजण जाणतोच. त्यांनी रयत शिक्षण संस्थेसाठी केलेले कार्य सर्वज्ञात आहे. त्याचीच स्मृती म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या सर्व विभागातील ४८० शाळा व महाविद्यालयांमधून एक एक पोतं माती आणून येथे कर्मवीर शंकरराव काळे साहेबांनी केलेल्या शैक्षणिक कार्याची स्मृती जतन केली आहे. ह्या परिसरास'Unity ISland' असे वैशिष्टयपूर्ण नामांकन करण्यात आले आहे.

कर्मवीर शंकरराव काळे साहेबांचे भव्य आणि ऊर्जा देणारे असे कलात्मक स्मृतीशिल्प उद्यानाच्या मध्यभागी, प्रवेशद्वारातून ठळकपणे दिसेल अशा रितीने उभारले आहे. सायंकाळीसुद्धा हे शिल्प सुशोभित दिसेल अशासाठी पाण्याच्या कारज्यांसमवेत सुंदर प्रकाशयोजनेचा वापर ह्या शिल्पाभोवती केला आहे.

**आगामी संकल्प –**

सध्याचे युग हे विज्ञान, माहिती व तंत्रज्ञानाचे आहे. मुलांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी स्मृती उद्यानाला आसपासच्या जिल्हयांमधील विद्यार्थ्यांनी भेट देऊन याची माहिती घ्यावी म्हणून छोट्या स्वरूपात 'सायन्स पार्क' (शास्त्रीय सिद्धांतावर आधारित प्रात्यक्षिक दाखविणारे) विज्ञान केंद्र स्वरूपात दुसऱ्या टप्प्यात उभारण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली तसेच नॅशनल कौन्सिल ऑफ सायन्स म्युझियम, कोलकत्ता व नेहरू  सायन्स सेंटर, वरळी, मुंबई यांचे मागदर्शन व मदतीने पूर्ण करण्याचा मानस असून या नियोजित 'सायन्स पार्क'चे भूमीपूजन करण्यात आलेले आहे.

स्व. शंकरराव काळे यांच्या स्मृती उद्यानाचे काम पुणे येथील गार्डीयन मिडीया ॲण्ड एन्टरटेन्टमेंट, पुणे या कंपनीच्या माध्यमातून ३ जुलै २०१३ मध्ये सुरू करण्यात आले होते. कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याच्या कार्यस्थळालगत चार एकर जागेमध्ये भव्य स्वरूपात उद्यानाची निर्मिती झाली असून 'कर्मवीर शंकरराव काळे उद्यान' नावाचे प्रवेशद्वार ३५ फुट उंच तर ६० फुट रूंद असून त्याची घडण पुरातन लेण्याच्या प्रवेशद्वारासारखी केलेली आहे. उद्यानाच्या मध्यभागी स्व. शंकरराव काळे यांचा भव्य १६

फुटाचा पूर्णाकृती पुतळा असून चौथरा ६ फुटाचा असल्याने पुतळ्याची उंची ही २२ फुट झालेली आहे.[७९]

सदरच्या स्मृती उद्यानाचे उद्घाटन व स्व. शंकररावांच्या पुतळ्याचे अनावरण मान. शरदराव पवार साहेब यांचे हस्ते शनिवार दिनांक १९ जुलै २०१४ रोजी मोठ्या थाटामाटात व उत्साहात झाले. शंकररावांचे पारंपरिक राजकीय प्रतिस्पर्धी श्री. शंकरराव कोल्हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी स्व. शंकररावांवर प्रेम करणारे शेतकरी, सभासद, कामगार, कार्यकर्ते व हितचिंतक मिळून जवळजवळ ५० हजारांचा जनसमुदाय उपस्थित होता. याप्रसंगी बोलतांना मा. शरदरराव पवार म्हणाले, ''कर्मवीर शंकरराव काळे यांनी शिक्षण, पाणी व पंचायत राज व्यवस्थेमध्ये केलेले कार्य उल्लेखनीय असून पंचायत राजची निर्मिती झाल्यानंतर जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष म्हणून केलेले त्यांचे कार्य आजही स्मरणात राहील. त्यांनी राज्यमंत्री मंडळात केलेले काम आजही प्रभावी वाटते. तालुक्याच्या पाणी प्रश्नासाठी त्यांनी सतत लढा दिला. आयुष्यभर दुसऱ्यासाठी जगले. त्यागाची भावना त्यांच्याकडून शिकावी. त्यांनी रयत शिक्षण संस्थेसाठी घेतलेल्या मेहनतीची फळे आजही आपल्यासमोर आहेत. विधायक कामात काळे साहेबांचा हातखंडा होता. आजच्या तरूण पिढीला व समाजाला त्यांचा इतिहास नक्कीच प्रेरणादायी व आदर्श ठरेल.''[८०]

महसूलमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले, की कर्मवीर शंकरराव काळे यांनी केलेल्या सर्वच क्षेत्रातील कामांचा अभिमानाने उल्लेख केला जातो. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून आमदार अशोकराव व युवानेते आशुतोष दादा यांनी काम चालू ठेवले आहे. त्यांच्या संकल्पनेतून साकारलेले 'कर्मवीर शंकरराव काळे स्मृती उद्यान' हे महाराष्ट्रातील सर्वाधिक सुंदर स्मृती उद्यान आहे.''[८१] यावेळी व्यासपीठावर ना. श्री. छगनराव भुजबळ, मा. ना. मधुकराव पिचड, मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील, मा. ना. जितेंद्र आव्हाड, खासदार सदाशिव लोखंडे, माजी मंत्री बबनराव ढाकणे, रयतचे अध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे, माजी मंत्री बी. जे. खताळ, मा. खा. यशवंतराव गडाख, माजी आमदार पी. बी. कडू, मा. आ. आप्पासाहेब राजळे, मा. आ. शिवाजीराव नागवडे, आमदार बबनराव पाचपुते, मा. ना. विठ्ठलराव लंघे, मा. खा. प्रसाद तनपुरे, आमदार चंद्रशेखर घुले, मा. आ. नरेंद्र घुले, मा. जिल्हा बँक चेअरमन बाजीराव खेमनर, आ. माणिकराव कोकाटे, मा. आ. भानुदास मुरकुटे, मा.आ.पांडूरंग अभंग, मा. आ. दौलतराव पवार, मा. आ.ज.य. टेकावडे, मा. आ. जयंतराव ससाणे, मा.आ.दगडू पाटील बडे, बिपीन कोल्हे

इत्यादीसह प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दूरदर्शनचे वृत्तनिवेदक प्रदिप भिडे यांनी केले.

पर्यटनाच्या दृष्टीने कर्मवीर शंकरराव काळे स्मृती उद्यान नावारूपास येत असून हे ठिकाण शिर्डी या जागतिक किर्तीच्या श्री साईबाबा देवस्थापनापासून केवळ १५ ते २० कि.मी. अंतरावर आहे. त्यामुळे कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना गौतमनगर, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर येथील हे स्व. शंकरराव काळे यांचे स्मृती उद्यान देखील पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे.

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | ज्ञानेश्वर सोनवणे | : | समाजअभियंता, पद्‌मगंधा प्रकाशन पुणे –२००९ पृ. २१ |
| २) | सुहास कुलकर्णी | : | विकाससूर्य, युनिक फिचर्स, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे – २००१ पृ. ४ |
| ३) | कित्ता | : | पृ. ५ |
| ४) | ज्ञानेश्वर सोनवणे | : | समाज अभियंता, उपरोक्त पृ. २७ |
| ५) | सुहास कुलकर्णी | : | उपरोक्त, पृ. ५ |
| ६) | मुलाखत | : | शंकरराव काळे, दि. ५ मे २०१२ |
| ७) | कित्ता | : | शंकरराव काळे, दि.५ मे२०१२ |
| ८) | कित्ता | : | शंकरराव काळे, दि. ५ मे२०१२ |
| ९) | ज्ञानेश्वर सोनवणे | : | समाज अभियंता, उपरोक्त पृ. ३७ |
| १०) | टी.बी. राजदेव | : | शोधप्रबंध, कॉ. दत्ता देशमुख यांचे डॉ. बा. आ. मराठवाडा विद्यापीठ – औरंगाबाद, पृ. २१६ |
| ११) | कित्ता | : | पृ. २१७ |
| १२) | मुलाखत | : | शंकरराव काळे, दि. ५ मे २०१२ |
| १३) | सविता भावे | : | कृषीक्रांतीचे सेनानी– आण्णासाहेब शिंदे, कल्पना मुद्रणालय पुणे – १९९४, पृ. १७८ |
| १४) | मुलाखत | : | शंकरराव काळे, दि. ५ मे २०१२ |
| १५) | सुहास कुलकर्णी | : | उपरोक्त, पृ. ८ |
| १६) | Dr. Vijay N. Nalawade | : | The Life & Career of Deshbhakt Keshavrao Jedhe, 1997, Pune –7, Page 74 |
| १७) | मुलाखत | : | शंकरराव काळे, दि. ५ मे २०१२ |
| १८) | कित्ता | : | शंकरराव काळे |
| १९) | सुहास कुलकर्णी | : | विकाससूर्य, उपरोक्त, पृ. १० |
| २०) | कित्ता | : | पृ. ११ |
| २१) | मुलाखत | : | शंकरराव काळे, दि. ५ मे २०१२ |
| २२) | ज्ञानेश्वर सोनवणे | : | समाज अभियंता, उपरोक्त पृ. ४७ |
| २३) | वार्षिक अहवाल | : | दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., १९५६–५७, प्रकाशक, चेअरमन कोसाका गौतमनगर, पृ. ६ |
| २४) | सुहास कुलकर्णी | : | विकाससूर्य, उपरोक्त पृ. ११ |

२५) कित्ता : पृ. १२
२६) ग. दी. देशमुख : ग्रामवेद, के. बी. रोहमारे गौरवग्रंथ, कोपरगांव पृ. १४०
२७) मानपत्र : पुणे विद्यापीठ, जीवनसाधना गौरव पुरस्कार २००३
२८) स्मरणिका : संकल्पातून सिद्धीकडे- शंकरराव काळे कार्य व कर्तृत्व, प्रकाशक - बी. डी. बाळीकाई, पृ. २०
२९) कित्ता : पृ. २१
३०) कित्ता : पृ. २२
३१) वार्षिक अहवाल : दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर १९८५-८६, प्रकाशक - चेअरमन कोसाका पृ. १०
३२) कित्ता : पृ. ११
३३) वार्षिक अहवाल : गौतम सहकारी बँक लि., गौतमनगर २०१२-१३ प्रकाशक - काळे शं. दे., पृ. ११
३४) स्मरणिका : अंतरलेले पाणी - २००३, प्रकाशक - काळे शं. दे., पृ.३२
३५) शंकरराव काळे : मुलाखत दि. ५ मे २०१२
३६) स्मरणिका : अमृतवाणी, कर्मवीर शंकरराव काळे यांचे विचारधन - २०१३, प्रकाशक बी.डी. बाळीकाई पृ. २६
३७) शंकरराव काळे : मुलाखत, उपरोक्त, ५ मे २०१२
३८) कित्ता : उपरोक्त
३९) कित्ता : उपरोक्त
४०) स्मरणिका : अमृतवाणी, उपरोक्त, पृ. १५
४१) स्मरणिका : स्नेहांजली- १९९९, प्रकाशक - बी.डी. बाळीकाई, पृ. ९
४२) शंकरराव काळे : माझी आई - स्मरणिका - १९९९
४३) शंकरराव काळे : मुलाखत, उपरोक्त
४४) शंकरराव कोल्हे : सत्याग्रही शेतकरी, उपरोक्त, पृ. १६१
४५) ज्ञानेश्वर सोनवणे : समाजअभियंता, उपरोक्त पृ. ८१
४६) कित्ता : पृ. ६८
४७) शंकरराव कोल्हे : सत्याग्रही शेतकरी, उपरोक्त पृ. १२३

४८) कित्ता : पृ. २१३

४९) स्मरणिका : अमृतवाणी, उपरोक्त, पृ. ४९

५०) शंकरराव काळे : मुलाखत, उपरोक्त ५ ते २०१२

५१) स्मरणिका : अमृतवाणी, उपरोक्त, पृ. ४८

५२) कित्ता : पृ. ५६

५३) कित्ता : पृ. ४४

५४) कित्ता : पृ. ४८

५५) कर्मवीर शंकरराव काळे – कृतज्ञता सोहळा, दिनांक ९ एप्रिल २०११.

५६) ५६ ते ६३ कित्ता

६४) दै. सार्वमत : अहमदनगर आवृत्ती दिनांक ६ नोव्हेंबर २०१२

६५) दै. सकाळ : अहमदनगर आवृत्ती दिनांक ७ नाव्हेंबर २०१२

६६) दै. लोकमत : अहमदनगर आवृत्ती दिनांक ७ नोव्हेंबर २०१२

६७) दै. पुण्यनगरी : अहमदनगर आवृत्ती दिनांक ७ नोव्हेंबर २०१२

६८) दै. सार्वमत : दिनांक ८ नाव्हेंबर २०१२

६९) दै. लोकमत : दिनांक ८ नाव्हेंबर २०१२

७०) दै. सकाळ : दिनांक ८ नाव्हेंबर २०१२

७१) मयुर फोटोज ॲण्ड व्हिडीओ शुटींग, गौतमनगर, ता. कोपरगांव

७२) वार्षिक अहवाल – दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, २०१२–१३ प्रकाशक – चेअरमन, कोसाका, पृ. १०

७३) सुहास कुलकर्णी : विकाससूर्य, उपरोक्त, पृ. ३६

७४) गणेश दी. देशमुख : ग्रामवेद, उपरोक्त, पृ. ४३

७५) ज्ञानेश्वर सोनवणे : समाजअभियंता, पृ. ५६

७६) वार्षिक अहवाल : दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि. गौतमनगर सन २०१२–१३, पृ. ११

७७) शंकरराव काळे : अंतरलेले पाणी, स्मरणिका –२००३, पृ. २३

७८) ज्ञानेश्वर सोनवणे : समाजअभियंता, उपरोक्त, पृ. ३२

७९) स्मरणिका : कर्मवीर शंकरराव काळे स्मृती उद्यान –२०१४

८०) दै. सार्वमत, दै. सकाळ, दैनिक लोकमत व इतर वृत्तपत्रे – २० जुलै २०१४

८१) कित्ता :

## प्रकरण – ४

# शंकरराव काळे यांचे सहकारी चळवळीतील योगदान

**प्रस्तावना**

सहकारी चळवळ ही आज कोणत्याही एखाद्या देशापुरती मर्यादित राहिलेली नसून ती विश्वव्यापी चळवळ म्हणून मान्यता पावली आहे. भांडवलशाही व साम्यवाद या परस्पर विरोधी अर्थपद्धतीचा वापर करणाऱ्या राष्ट्रांमध्ये सहकार चळवळ अस्तित्वात आहे. देशाच्या आर्थिक विकासात सहकार चळवळ अत्यावश्यक आहे. असे जवळजवळ सर्वच राष्ट्रांनी मान्य केले आहे. सहकार चळवळ ही जनतेची चळवळ आहे. सहकाराकडे पहाण्याचा दृष्टीकोन, सहकारातील मूलभूत तत्वे यात कालानुसार बदल होत गेला आहे व त्यातून सहकाराचा विकास झाला आहे.

महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीच्या यशात आणि विकासात महाराष्ट्रातील अनेक सहकारी नेते, कार्यकर्ते, संस्था पदाधिकारी व अधिकारी यांचाही फार मोठा सहभाग आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ भारतात अग्रेसर ठरलेली आहे. अहमदनगर जिल्हा तर सहकाराचा केंद्रबिंदूच ठरलेला आहे. या जिल्ह्यातील अनेक नेत्यांनी सहकार चळवळीला आक्रमक पायावर उभी करून तिला आकार देण्याचे काम केलेले आहे. यामध्ये शंकरराव काळे यांचे योगदान अत्यंत मोलाचे असून सहकाराच्या माध्यमातून त्यांनी जिल्हयाचा कायापालट केला आहे. सहकारी साखर कारखाना, सहकारी सोसायट्या, पतसंस्था, बँका, पाणी वापर संस्था, दूध संस्था, कुक्कुट पालन अशा प्रकारे सहकाराच्या माध्यमातून त्यांनी कोपरगाव तालुक्याच्या विकासाबरोबरच जिल्ह्याच्या विकासाला हातभार लावला आहे.

### ४.१ महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे शिल्पकार

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ भारतात अग्रेसर आहे. भारताचे पहिले पंतप्रधान कै. पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या स्वप्नातील सहकारी चळवळ संपूर्ण भारतात महाराष्ट्रातच मोठ्या प्रमाणात विकसीत झालेली दिसून येते. पंडीत नेहरूंनी भारताच्या मिश्रअर्थव्यवस्थेत खाजगी व सरकारी क्षेत्राएवढेच किंबहुना शेती व ग्रामीण विकासाच्या बाबतीत सहकारी क्षेत्राला विशेष महत्त्वाचे स्थान मिळवून दिलेले आहे. आज महाराष्ट्रात सहकारी चळवळीने ग्रामीण व नागरी समाजाच्या आर्थिक जीवनाच्या विविध क्षेत्रात यशस्वीपणे प्रवेश करून नेत्रदिपक यश प्राप्त केले आहे.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने दृष्टीक्षेप टाकल्यास आपणास त्यात शेती अल्प मध्यम व दीर्घमुदत कर्ज पुरवठा, शेती उत्पादन वाढीसाठी सुधारित बी–बीयाणे, रासायनिक खते, कीटकनाशक औषधे, सुधारलेली शेती, औजारे यांचा पुरवठा आणि सुधारित शेती तंत्रज्ञान व लागवडीच्या पद्धती याबद्दलचे मार्गदर्शन, शेतीमालाची सहकारी तत्वावर खरेदी–विक्री, शेती मालावर प्रक्रिया, लघु व कुटीर उद्योगास प्राधान्य, जलसिंचनाच्या सोयी, जमिनीची सुधारणा, शेतीत कायम स्वरूपी भांडवली गुंतवणूक, गृहनिर्माण, ग्राहक – व्यवहार, सार्वजनिक वितरण व्यवस्था, नागरी भागातील छोटे उद्योग, व्यापारी, पगारदारांना त्यांच्या व्यवसायाच्या विकासासाठी अर्थपुरवठा वैद्यकीय सेवा, ग्रंथालय, शिक्षण–प्रशिक्षण, समाजातील दुर्बल घटकांसाठी रोजगार निर्मिती व पुरवठा इ. अनेक विविध क्षेत्रात महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने मिळविलेल्या यशास तोड नाही. यामुळेच महाराष्ट्रातील सहकारी चळवळ आज भारतात अग्रेसर ठरलेली आहे. अर्थातच याचे सर्व श्रेय महाराष्ट्रातील सहकार तज्ञ, अभ्यासक, द्रष्टे विचारवंत, कर्मयोगी, सहकारी नेते, समर्पित कार्यकर्ते, कर्तबगार पदाधिकारी, सुजाण सभासद आणि कार्यक्षम अधिकारी यांचेकडे जाते. महाराष्ट्रातील या सहकारी चळवळीला नवी दिशा देणाऱ्या नामवंत शिल्पकारांमध्ये सहकार महर्षी कै. वैकुंठभाई मेहता, कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ, कै. यशवंतराव चव्हाण, कै. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील तसेच कै. कर्मवीर शंकरराव काळे इ. चा समावेश होतो.

### १. सहकार महर्षी कै. वैकुंठभाई मेहता –

महाराष्ट्राची सहकारी चळवळ आज देशात अग्रेसर ठरली आहे, त्याचे बरेचसे श्रेय कै. वैकुंठभाईंकडे जाते. बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को–ऑप बँकेचे वैकुंठभाई अध्यक्ष होते. सुरूवातीला सहकारी सोसायटयांना ही बँक कर्जपुरवठा करीत असे. त्यांना शेतकरी हा कर्जबाजारी दिसत होता. शेतकऱ्यांच्या जमिनीचे लिलाव होत होते. सावकारांच्या ताब्यात जमिनी जात होत्या. मूळचे शेतकरी शेतमजूर होत होते. यावर उपाय म्हणून सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. कै. वैकुंठभाईंनी महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात सहकारी चळवळ राबविली, रूजविली, वाढविली, लोकाभिमुख केली. समाजातील सर्व स्तरांतील लोकापर्यंत पोहचविली. सहकारी चळवळीबद्दल विश्वासार्हता निर्माण केली. तिला तात्विक अधिष्ठान निर्माण करून दिले आणि जनसमान्यातून अनेक सहकारी नेते, कार्यकर्ते आपल्या आदर्शवत वागणुकीतून, शिकवणीतून निर्माण केले. हे सहकारी क्षेत्रातील या

ऋषितुल्य महामानवाचे ऋण महाराष्ट्राच्या आणि भारताच्या सहकारी चळवळीस कधीही विसरता येणार नाही.

वैकुंठभाईंचा जन्म अत्यंत संपन्न अशा कुटुंबात झाला. त्यांचे आजोबा भावनगरच्या संस्थांनचे दिवाण होते. वैकुंठभाईंचे वडील लालुभाई शामलदास हे उद्योग व्यवसायानिमित्त मुंबईला आले आणि तेथेच स्थायिक झाले. विद्यार्थीदशेपासून वैकुंठभाई अत्यंत हुशार होते. मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या कार्यकारी संचालकपदाबरोबरच इतर अनेक महत्त्वाच्या शासकीय समित्यांवर सुद्धा त्यांनी काम केले. सहकारी चळवळीला त्यांनी नवी दिशा दिली. साधी राहणी, वक्तशीरपणा, काटकसर आणि समर्पण भावना यामुळे वैकुंठभाईंनी सहकारी चळवळीत स्वतःचे आगळेवेगळे अढळ स्थान निर्माण केले. त्या काळात वैकुंठभाई सहकारी चळवळीचे सर्वेसर्वा झाले होते असे म्हटले तर वावगे होणार नाही. त्यांच्या मार्गदर्शनामुळे सहकारी चळवळीला निश्चित दिशा मिळाली. म्हणून वैकुंठभाईंना सहकारी चळवळीचे अध्वर्यू मानले जाते.

१९४६ साली मुंबई राज्याच्या विधिमंडळाच्या निवडणूका आल्या असताना महात्मा गांधीजींनी त्यांना मुंबई प्रांतिक बँकेतील कार्यकारी संचालकांची नोकरी सोडावयास लावली व निवडणुकीला उभे केले.[१] निवडून आल्यावर वैकुंठभाई सहकार व अर्थ खात्याचे मंत्री झाले. आपल्या मंत्रिपदाच्या कारकिर्दीत वैकुंठभाईंनी आपल्या कार्यक्षमतेचा, कर्तबगारीचा व सहकारी चळवळीवरील अतूट निष्ठेचा चिरंतन ठसा आपल्या कार्याद्वारे उमटविला.

वैकुंठभाईंची राहणी अत्यंत साधी होती. मंत्रिपद स्वीकारल्यानंतरही त्या राहणीत बदल झाला नाही. वैकुंठभाई मंत्री असताना शेवगांव येथे मोतीभाऊ फिरोदीया व जिल्ह्यातील सहकारी कार्यकर्त्यांनी एक सहकार मेळावा आयोजित केला होता. वैकुंठभाई मेळाव्याचे मुख्य पाहुणे होते. शेवगावला जाण्यासाठी वैकुंठभाई रेल्वेने प्रथम अहमदनगरला आले. बरोबर फक्त एक शिपाई होता. सोबत कपड्याची वळकटी होती. नगर स्टेशनवर उतरून वैकुंठभाई टांग्यात बसून अहमदनगर शहरात निघाले. वैकुंठभाईंच्या स्वागतासाठी स्टेशनवर गेलेल्या कार्यकर्त्यांना साध्या पोषाखातील मंत्री वैकुंठभाई ओळखू आले नाहीत. कार्यकर्ते स्टेशनवर प्रत्येक डब्यात मंत्र्यांची शोधाशोध करू लागले. नंतर कार्यकर्त्यांना कोणीतरी सांगितले की, थोड्याच वेळापूर्वी अत्यंत साध्या वेषात असलेले आणि सोबत एक नोकर व कपड्याची वळकटी असलेले जे सद्‌गृहस्थ टांग्यात बसून नगर

शहराकडे गेले ते मंत्री महोदय वैकुंठभाई होते.[२] अशी अत्यंत साधी राहाणी त्यांची होती. त्यामुळेच ते एक आदर्श नेते होते.

१९६४ साली वैकुंठभाईंचे निधन झाले. महाराष्ट्रातील व भारतातील सहकारी चळवळीच्या इतिहासात वैकुंठभाईंचे नाव सदैव संस्मरणीय राहील.

**२. डॉ. धनंजयराव गाडगीळ –**

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीस अर्थशास्त्रीय दृष्टीने शास्त्रीय बैठक निर्माण करून देण्यात डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेत सहकारी क्षेत्रास महत्वाचा घटक या नात्याने स्थान मिळवून दिले. त्यांनी महाराष्ट्रात सुरू केलेली पीक कर्ज योजना एवढी शास्त्रशुद्ध होतो की, अल्पावधीतच तिचा स्वीकार संपूर्ण भारतभर करण्यात आला. ग्रामीण आर्थिक पुनर्रचनेचे प्रभावी साधन या नात्यानेच डॉ. गाडगीळ हे सहकारी क्षेत्राकडे पहात आणि त्याप्रमाणेच ग्रामीण आर्थिक पुनर्रचनेचे कार्य सहकारी क्षेत्राकडून घडवून आणले. सहकारात उद्योगाला संधी मिळावी म्हणून प्रयत्न करण्यात वैकुंठभाई मेहतांनी पुढाकार घेतला. महाराष्ट्रात भांडवलदार, व्यापारी, उद्योगजक कमी आहेत. त्यांना एकत्रित आणले तर ताकद उभी राहू शकते अशी वैकुंठभाईंनी कल्पना मांडली. त्यावेळी डॉ. धनंजयराव गाडगीळ हे प्लॅनिंग कमिशनचे व्हाईस चेअरमन झाले. त्यांची प्रेरणा सहकारी उद्योगाला मिळाली होती. [३]

डॉ. धनंजयराव शेतकऱ्यांसाठी उत्तम अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांच्यात प्रामाणिकपणा व जिद्द होती. त्यांनी शासनापुढे एक योजना मांडली होती. स्वभांडवल जमवितांना शेतकऱ्यांनी २५ टक्के रक्कम भरावी व ७५ टक्के रक्कम बँकेने शेतकऱ्यांना कर्ज म्हणून द्यावी. त्यामुळे १००० रूपयांचा शेअर २५० रूपयात मिळू शकला. वैकुंठभाई मेहतांनी भांडून सरकारकडून या तत्वाला मंजूरी घेतली. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी जी नवीन अर्थनीती उभी केली. त्याला पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी जोड देऊन शेतकऱ्यांमध्येच चळवळ उभी केली. [४]

**३. यशवंतराव चव्हाण –**

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ खऱ्या अर्थाने लोकाभिमुख करण्याच्या कामात महाराष्ट्राचे शिल्पकार कै. यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा आहे. [५] स्वर्गीय यशवंतरावजी हे ज्याप्रमाणे कुशल प्रशासक होते. त्याप्रमाणेच ते अत्यंत कुशल असे संघटक आणि थोर विचारवंत देखील होते. यशवंतरावांच्या काळात खऱ्या अर्थाने सहकारी चळवळीला राजाश्रय मिळाला आणि सहकार चळवळ महाराष्ट्राच्या सर्व

विभागात, कानाकोपऱ्यात पोहचवली. यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या सुविधा त्यांनी सहकारी चळवळीस उपलब्ध करून देण्यात सतत परिश्रम घेतले. महाराष्ट्रातील आजच्या सहकारी चळवळीच्या सर्वव्यापी विस्ताराचे बरचसे श्रेय कै. यशवंतराव चव्हाण यांचेकडेच जाते.

**४. कै. बाळासाहेब भारदे –**

महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीच्या विकासात सहकारी क्षेत्रातील थोर विचारवंत कै. बाळासाहेब भारदे यांचे मोठे योगदान आहे. कै. भारदे यांनी दीर्घकाळापर्यंत महाराष्ट्राचे सहकार मंत्रीपद भूषविले होते. त्यांच्या काळातच महाराष्ट्रात सहकारी चळवळीच्या विस्तारास फार मोठ्या प्रमाणावर गती मिळाली. [६] महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीच्या दृष्टीने तो विकासाचा कालखंड होता. राज्यातील जास्तीत जास्त खेडी आणि जनता सहकारी क्षेत्रात आणण्याचे विकासात्म कार्य या काळात अत्यंत वेगाने पार पडले यासाठी बाळासाहेब भारदे यांनी सहकार मंत्री या नात्याने सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी त्या काळात अनेक योजना आखल्या. त्या योजना परिश्रमपूर्वक कार्यरत केल्या.

**५. कै. वसंतदादा पाटील –**

महाराष्ट्र सहकाराच्या माध्यमातून कृषी औद्योगिक समाजरचनेचा पाया घालण्याचे महत्त्वपूर्ण काम महाराष्ट्राचे लोकनेत सहकार महर्षी कै. वसंतदादा पाटील यांनी केलेले आहे. [७] महाराष्ट्रातील शेती ही आतबट्ट्याची ठरत असून तिला शेतीपूरक उद्योगधंद्याची जोड दिल्याशिवाय ती किफायतशीर ठरणार नाही आणि शेती किफायतशीर ठरल्याशिवाय या राज्यातील आणि पर्यायाने देशातील शेतीवर अवलंबून ७० ते ८० टक्के जनता दारिद्र्याच्या जोखडातून मुक्त होणे शक्य नाही, हे मर्म त्यांनी ओळखले होते. वसंतदादांच्या प्रेरणा व सक्रीय सहकार्यामुळे महाराष्ट्रात कृषी औद्योगिक समाजनिर्मितीच्या कार्यास चालना मिळाली.

**६. कै. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील –**

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचे जनक कै. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील हे आहेत. त्यांनी स्वतःच्या शेतीचे हिशेबही नीट न समजू शकणाऱ्या सामान्य शेतकऱ्यास आज कारखानदार बनविलेले आहे. [८] ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे सहकारी साखर कारखाना हे आज महत्त्वाचे केंद्र बनलेले आहे. सहकारी साखर कारखानदारीमुळे त्या त्या भागातील परिसर विकास घडला असून ग्रामीण भागाचा कायापालट झालेला आहे. सहकारी साखर कारखान्यास पूरक

असे अनेक उद्योग विकसित झालेले आहेत. असंख्या लोकांना रोजगार संधी उपलब्ध झाली आहे. कै. विठ्ठलराव विखे पाटलांनी सुरू केलेल्या सहकारी साखर कारखानदारीमुळे महाराष्ट्रातील कृषी औद्योगिक समाजरचनेच्या वाटचालीस गती प्राप्त झालेली आहे. विशेष म्हणजे या क्रांतीकारक प्रयोगातून ग्रामीण भागातील नेतृत्व बांधणीस फार मोठा वाव आणि चालना मिळालेली आहे. सहकारी साखर कारखान्याच्या यशातून विविध शेतीमालावर प्रक्रिया करण्याची प्रेरणा मिळून तेलगिरण्या, सुतगिरण्या, भातगिरण्या, दाळगिरण्या, इ. कारखाने मोठ्या संख्येने सहकारी क्षेत्रात निर्माण झालेले आहेत.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीपासून प्रेरणा घेऊन भारतातील अनेक राज्यांत सहकारी तत्वावर सहकारी साखर कारखाने आणि शेती उत्पादनावर प्रक्रिया करणाऱ्या अनेक संस्था निर्माण झाल्या आहेत. या दृष्टीने महाराष्ट्राची सहकारी चळवळ भारतास मार्गदर्शक ठरली आहे. ही महाराष्ट्राच्या दृष्टीने अभिमानास्पद गोष्ट आहे.

## ४.२ अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीची पार्श्वभूमी

अहमदनगर जिल्ह्यात सहकारी चळवळीचे साद–पडसाद उमटले गेले. अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीची परंपरा तशी जुनीच आहे. इ. स. १९०४ पूर्वीच अहमदनगर जिल्ह्यातील कष्टाळू शेतकऱ्यांनी स्वतः होऊन सहकाराचा स्वीकार केला आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी समजली जाते. या भूमीत अनेक साधुसंत होऊन गेले. महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी ''एकामेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ'' असा महामंत्र संतांनी दिला होता.

कोपरगाव, राहुरी व श्रीरामपूर परिसरात शेतकरी फड पद्धतीने ऊसाची पिके काढीत होते. ही फड पद्धत म्हणजे ऊसाची सहकारी शेती होती. कोणाची जमीन असते, कोणाचे बैल असतात, कोणी नुसतेच कष्ट, मशागत करतो व येईल ते उत्पन्न हिस्से पद्धतीने वाटून घेत असत या फड पद्धतीत लिखीत नियम नाही. सर्व काही रूढीला अनुसरून परस्परांच्या विश्वासाने चालते. हीच पद्धत सहकारी चळवळीचा पाया बनली गेली.

भिशी ही एक सहकाराची वैशिष्टयपूर्ण पद्धत आहे. भिशीचा उद्देश लोकांना सक्तीची बचत करायला लावणे व गरजू लोकांना हमीवर वाजवी व्याज घेऊन धनाचा पुरवठा करणे. हे भिशीचे सभासद आपल्या मिळकतीचे काही भाग म्हणून भिशीला देतात. दर तीन वर्षांनी किंवा पाच वर्षांनी ठेव ज्याची त्याला व्याजासह परत करतात.

अशा सामुहिक संस्था खेड्यापाड्यातून अनेक वर्षे काम करीत होत्या. या संस्थांना लिखित नियम नव्हते. त्या लोकांनी नियुक्त केलेल्या पंचांकडून रूढीप्रमाणे विश्वासाने चालवल्या जात होत्या. सहकाराचे जरी तत्वज्ञान माहित नसले तरी त्या पद्धतीने कार्य चालू होते. इ. स. १९२१ मध्ये डॉ. मॅन यांनी अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यात सहकारी शेतीचा प्रयोग केला होता. दिनांक १ ऑक्टोबर १९१० मध्ये अहमदनगरच्या कर्जत तालुक्यात पहिली सहकारी पतपेढी स्थापन झाली.[९] नंतर श्रीरामपूर तालुक्यात सहकारी चळवळीस चांगले बाळसे प्राप्त झाले. त्या खालोखाल कोपरगाव तालुक्यातही सहकारी चळवळीने जोर धरला होता.

कोपरगाव तालुक्यात १९१७ साली पहिली सोसायटी पोहेगांव येथे सुरू झाली होती.[१०] १९१७ ते १९२५ या काळात कोपरगाव तालुक्यात अनेक सोसायट्या स्थापन झाल्या होत्या. या सोसायटीला बॉम्बे प्रॉव्हिन्शीयल को-ऑपरेटीव्ह बँक ही कर्जपुरवठा करीत होती. परंतु या सहकारी संस्थेत असे एक तत्व होते की, ज्या सोसायटीमध्ये ५० सभासद असतील आणि त्यातील ५ सभासदांनी कर्ज थकविले असेल तर इतर ४५ सभासदांनी मिळून त्या थकबाकीची भरपाई करावी व त्यासाठी गरज पडल्यास थकबाकीदार सभासदांच्या जमिनीचा लिलाव करावा. यामुळे सहकारावरील लोकांचा विश्वास उडाला. कोणीही सहकारी सोसायटीमध्ये सभासद होण्यास तयार होत नसे. प्रत्यक्षात काही वेळा जामीनदार व इतर सभासदांच्या जमिनींचे लिलाव होत होते. त्यामुळे ही चळवळ मोडकळीस आली होती. परंतु सहकारावर असलेली निष्ठा, शेतकरी मंडळींचे पुढारी व शासनाची मदत यामुळे सहकार चळवळ यशस्वी झाली. १९५० साली अहमदनगर जिल्ह्यात प्रवरानगर येथे देशातील पहिला सहकारी साखर कारखाना उभा राहिला. त्यानंतर सहकारी क्षेत्राचे स्वरूप व्यापक बनले. विशेषतः वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ आणि विठ्ठलराव विखे पाटील यांचे योगदान मोलाचे ठरले. त्यांनी या चळवळीला वैचारिक बैठकीची जोड दिली. त्यातूनच कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, पो. कोळपेवाडी, ता कोपरगाव हा गणतपराव रभाजी औताडे व कर्मवीर शंकरराव काळे यांनी सुरू केला. महाराष्ट्र राज्यात सहकार चळवळ फोफावली. सहकारी चळीवळीद्वारा ग्रामीण भागाच्या विकासाला साकार रूप दिले जाऊ लागले. त्यामुळेच सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या सुरू झाल्या. त्याचबरोबर सहकारी तत्वावर शेतीमाल खरेदी-विक्री संघ, उपसा जलसिंचन, सुतगिरण्या, दूध, कुक्कुटपालन

इ. अनेक विषयांशी संबंधित सहकारी संस्था निर्माण झाल्या व हळूहळू संबंधित चळवळीचे जाळे देशभर निर्माण झाले.

**४.३ सहकार चळवळीच्या पूर्वीची कोपरगाव तालुक्याची आर्थिक परिस्थिती –**

कोपरगाव तालुका पर्जन्य छायेच्या प्रदेशात मोडत असल्याने सतत दुष्काळाच्या परिस्थितीला जनतेला तोंड द्यावे लागत असे. येथील शेतकरी लहान होता. त्याची शेती मान्सूनच्या लहरीवर अवलंबून असल्याने तिला जुगारी स्वरूप प्राप्त झाले होते. केवळ परंपरागत चालत असलेल्या पद्धतीने शेतकरी शेती करीत असल्यामुळे वर्षानुवर्षे श्रम करूनही त्यांच्या नशिबी शेवटी दारिद्र्य होते. गोदावरी सारखी नदी तालुक्यातून वाहत असताना केवळ पावसावर अवलंबून रहावे लागत असे. वेळेवर पाऊस न पडल्याने शेतात चांगली पिके येत नसत. जे थोडेफार पीक येत असे ते सावकाराच्या घशात शेतसारा भरण्यासाठी जात असे. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थीती केविलवाणी झालेली होती. प्रत्येक ऋतूत जनावराप्रमाणे काम करून पोटाला पोटभर भाकर मिळत नव्हती, अंगाला कपडा मिळत नव्हता.

पूर्वी कर्ज काढण्याची पद्धत नव्हती. ब्रिटीश काळात शेतकरी आहे तसाच राहिला. कारण तो विज्ञानात मागासलेला होता. त्यामुळे शेतकरी नवीन अवजारांचा, साधनांचा वापर करत नव्हता. शेतीशिवाय दुसरा उद्योगधंदा स्वीकारत नसल्यामुळे तो आहे तिथेच होता. त्याची प्रगती होऊ शकलेली नव्हती. धनवान लोकांनी एकही संस्था स्थापन केली नाही. उलट साधन उपलब्ध केले होते. धर्मगुरूंनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी एखादे पुराण लिहीले नाही. शेतकरी धार्मिक व सामाजिक बंधनात गुंतल्यामुळे त्यांची त्यातून सुटका होणे अवघड होऊन बसले होते. शेतकऱ्यांची मुले सुद्धा वडिलांची चाल न मोडता त्यांच्या मागे जात होती. अशा रितीने शेतकरी हा अप्रगत व प्रतिगामी होता.

थोडक्यात शेतकऱ्यांची निकृष्ठ स्थिती होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आढळून येतात.

१) कामधंदा करण्याची पद्धत योग्य नव्हती.

२) खर्च हा वारेमाप व निष्फळ होता.

३) प्रत्येकाच्या दारातील स्वच्छता व टापटीप योग्य नव्हती.

४) वेळेची किंमत नव्हती.

५) शिक्षणाच्या संदर्भात प्रगती नव्हती.

६) शेतकरी विविध व्यसनांच्या आहारी गेलेला होता.

७) त्याचा नशिबावर, भविष्यावर विश्वास होता.


८) भाऊबंदकीच्या पद्धतीने कित्येक जमिनी ओसाड होत्या. तसेच त्यांची योग्य पद्धतीने विल्हेवाट केली जात नव्हती.

९) बलुतेदार पद्धत होती.

१०) नवीन अवजारे व बियाणांचा अभाव होता.

११) विद्या व शहाणपण याचा अभाव असल्याने त्याची स्थिती निकृष्ठ बनली होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात शेतकऱ्यांचे सर्व बाजूने शोषण केले जात होते. शेतकरी व मजूर यांच्यात पिकाच्या वाटणीबाबत मतभेद होते. त्यामुळेच शेतीचे उत्पादन कमी झाले होते. शेतकरी या सर्वांच्या मध्ये कसा भरडला जात होता. त्याचे चित्रण असे.




**१. सावकार व दलाल –**

पूर्वी शेती व्यवसाय कर्ज देण्यासाठी शासकीय योजना नव्हत्या. त्यामुळे जास्त व्याज देऊन शेतकरी सावकाराकडून कर्ज घेत असे. या कर्जांच्या फेडीसाठी शेतीतील उत्पन्न सावकारांच्या, दलालांच्या स्वाधीन करीत असे.

**२. शासकिय अधिकारी –**

शेतकऱ्यांचा संबंध तलाठ्याशी येत असे. शेतसारा, जमीन खरेदी विक्री इ. कामे तलाठ्यामार्फत होत असत. उदा. तगाई, कर्ज, बी–बियाणे, पाणी, मजूरी इ. तलाठी तसेच शासकीय अधिकारी शेतकऱ्यांच अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची पिळवणूक करीत असत.

३. **बलुतेदार –**

पूर्वी बलुतेदार पद्धत अस्तित्वात होती. शेतकऱ्यास ज्या वस्तूची गरज भासेल ती वस्तू बलुतेदार देत असत व त्या बदल्यात धान्य घेत असत. आज या वर्गाचे महत्त्व कमी झाले असून व्यापारी व कारागीर यांचे महत्व वाढलेले दिसून येते.

४. **समाज कंटक –**

स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात शेतकरी गावात राहात होता. अशा वेळी अंतरावर असणाऱ्या शेतीचे रक्षण करणे जिकरीचे होते. रात्री–अपरात्री शेतमालाच्या चोऱ्या होत असत. शेतकरी असंघटित व असुरक्षित असल्याने तक्रार नोंदवित नव्हते. तसेच समाजकंटकांच्या मारहानीमुळे व भितीपोटी पोलीसांकडे जात नव्हते. थोडक्यात शेतकरी कायद्याच्या बाबतीत अज्ञानी होता.

५. **शेतमजूर –**

हा वर्ग शेतकऱ्यांचा सहाय्यक मित्र आहे. शेतकऱ्याच्या वस्तीवर राहत असे. त्याचा सर्वप्रकारचा खर्च शेतकरी करीत असे. त्या खर्चाच्या मोबदल्यात शेतमजूर वर्षानुवर्ष शेतकऱ्यांकडे कायम कामास राहत असे.

६. **नैसर्गिक आपत्ती –**

या ठिकाणच्या शेतकऱ्यांना नेहमी दुष्काळ, अतिवृष्टी, टोळधाड अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागत होते.

अशा रितीने या कालखंडात शेतकरी सर्वार्थाने उपेक्षित राहिला होता. अज्ञान, दारिद्र्य, शोषण, नैसर्गिक आपत्ती याने ग्रासला होता, परंतु त्याची समस्या, गाऱ्हाणी शासनासमोर मांडण्याचे तसेच त्यावरील अन्याय दूर करण्याचे कोणतेही प्रयत्न या काळात होत नव्हते.

### ४.४ शंकरराव काळे यांचे संस्थात्मक कार्य

पन्नास – साठ वर्षापूर्वी ग्रामीण भागातील माणसे अत्यंत मागासलेली होती. शेतकऱ्यांना सावकारी पाशाने आवळलेले होते. त्यात शेतकरी समाज संघटीत नव्हता. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश लोक भारतीयांवर अन्याय–अत्याचार करीत. त्याबरोबरच सावकारही शेतकऱ्यांची पिळवणूक करीत असत. शेतात ज्वारी– बाजरीच्या पिकांप्रमाणेच ऊस लागवड काही प्रमाणात केली जात होती. ऊस पिकविल्यावर आसपासच्या बाजारात नेऊन विकण्याची प्रथा होती. गुऱ्हाळ टाकण्याची आणि चालविण्याची ऐपत फारच थोड्या शेतकऱ्यांकडे असल्याने आम शेतकरी वर्गाला गुळाचा

गोडवा कधीच चाखायला मिळाला नाही. कोल्हापूरप्रमाणेच कोपरगाव, श्रीरामपूर व नाशिक ही गावे गुळाच्या बाजारपेठेसाठी प्रसिद्ध होती. पण या व्यवसायातही सावकार गुंतलेलले असल्याने शेतकऱ्याने स्वतः ऊस पिकवला, गुळ बनवला तरी तो कर्जातच रहायचा.

स्वातंत्र्यापूर्वीच म्हणजेच १९०४ पासून सहकारी चळवळीचे बीजारोपण झालेले होते. पण त्याचे वटवृक्षात रूपांतर हे स्वातंत्र्यानंतर झाले. शेतकऱ्यांच्या परिस्थितीत बदल होण्याची, करण्याची निकड सगळ्यांना भासू लागली. पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरून यांच्या डोळ्यासमोर नव-भारत निर्मितीचे स्वप्न होते. सर्व नागरीकांना विकासाची समान संधी व मुलभूत हक्क मिळावेत यासाठी त्यांनी राष्ट्रीय नियोजन घोषित करून समाजवादी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी तसेच साम्यवादी अर्थव्यवस्थेला पर्याय म्हणून सहकारी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केल्याचे घोषित केले. [११] डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर सहकारी उद्योग व सहकारी संसथांचे लहानमोठे प्रकल्प हाती घेऊन आवश्यक तेवढे भाग-भांडवल, अर्थ सहाय्य व कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्याचे राष्ट्रीय धोरण जाहीर केले. या एका निर्णयामुळे सहकारी चवळवळीतून विकासकामांना जबरदस्त वेग आला.

### १. माहेगांव देशमुख विविध कार्यकारी (विकास) सेवा संस्थेची स्थापना

१९५२ च्या निवडणुकीनंतर शंकररावांनी सहकारात काम करण्यास सुरूवात केली. गावाचा विकास करणे हे एकट्या माणसाचे काम नाही. त्यासाठी सर्वांचे सहकार्य असणे आवश्यक आहे, असा विचार त्यांनी केला. ते स्वतः यावेळी शेती करत होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांना समजत होत्या. शेतीसाठी पैशांची आवश्यकता होती. सेवा सोसायटी काढावी असा कार्यकर्त्यांचा आग्रह होता. मात्र काही ग्रामस्थांचा अशी सोसायटी काढण्यास विरोध होता. कारण त्यापूर्वीही अशा प्रकारची सोसायटी गावात सुरू झाली होती. परंतु ती लिक्विडेशनमध्ये जाऊन तोट्यात गेली होती. लोकांच्या जमिनींचा लिलाव झाला होता. त्या जमिनी शंकररावांच्या वडीलांनी म्हणजेच देवरामबाबांनी घेतल्या होत्या. त्यामुळे लोकांचा विश्वास नव्हता. तेव्हा शंकररावांनी ग्रामस्थांना समजावून सांगितले. ''वडिलांत आणि माझ्यात फरक आहे. मी काही सावकारकी करणार नाही. लोकांना ते पटलं. मग चांगलं काम म्हणून ग्रामस्थांनी सहकार्य केले.''[१२] सर्वांच्या सहकार्यातून ३० एप्रिल १९५३ रोजी 'माहेगांव देशमुख विविध कार्यकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित' ही सोसायटी सुरू झाली. पुढे या सोसायटीचा

चांगला फायदा ग्रामस्थांना झाला. मळेगांव थडी, मढी बु., कोळपेवाडी या गावांना सोसायटी नसल्याने तेथील शेतकऱ्यांनाही या सोसायटीचा फायदा झाला. त्यामुळे ही सोसायटी म्हणजे कोपरगाव तालुक्यातील एक चांगली सोसायटी म्हणून नावरूपास आली.

## १.१ सुरूवातीची संस्थेची परिस्थीती

**कार्यकारी मंडळ –**

| अ. नं. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मे. शंकरराव देवराम काळे, B.Sc. B.E. Civil | चेअरमन |
| २) | मे. भाऊ बाबुराव पा. पानगव्हाणे | कमेटी पंच |
| ३) | मे. बाबुराव पुंजाजी पा. काळे | कमेटी पंच |
| ४) | मे. यशवंत धोंडी पा. पानगव्हाणे | कमेटी पंच |
| ५) | मे. सिताराम यशवंत ढेकणे | कमेटी पंच |
| ६) | श्री. महादेव धोंडापंत एकबोटे | सेक्रेटरी |

(सदरचे कार्यकारी मंडळ वार्षिक अहवाल १९५७–५८ वरून घेतले आहे. [१३])

**सभासद –**

सुरूवातीला सभासद संख्या अत्यंत कमी होती. १९५७–५८ अखेर ती ८७ होऊन पुढे त्यात वाढ झाली व वर्षअखेरीस ती ९५ झाली होती. सहकारी धोरणानुसार जास्तीत जास्त खातेदार सोसायटीत सभासद होतील या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत होते. मात्र हे करताना सोसायटीच्या हितास बाधा येणार नाही याकडे लक्ष दिले जात होते.

**ऑडिट –**

ऑडिट ता. ३१–१२–१९५७ अखेरपर्यंत मे. बोकील सेकंड आडि. सब् ऑडिटर साहेब नगर यांनी केले आहे. त्यांनी संस्थेबद्दल समाधान व्यक्त करून संस्थेस ‘अ’ वर्ग दिला आहे. सतत दोन वर्षापासून संस्था ‘अ’ वर्गात आहे. त्याचप्रमाणे मे. आठवले बँक इन्स्पेक्टर साहेब ही बॉम्बे स्टेट को. बँक लि., शाखा कोळपेवाडी व मे. धारप बँक इन्स्पेक्टर साहेब दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट को. ऑप. बँक लि., शाखा कोळपेवाडी, मे. ए.डी.सी. ओ. कोपरगाव मे. कोतवाल ग्रामसेवक भाग कोळपेवाडी यांनी वेळोवेळी सोसायटीचे इन्स्पेक्शन घेऊन व्यवहारातील मार्गदर्शन केलेले आहे.

**शेअर्स भांडवल –**

३१–१२–१९५७ अखेर प्रत्यक्ष वसूल झालेले शेअर्स भांडवल रू. ३०,७४५ होते. या वर्षात रू. १४,३६०/– भांडवल जमा झाले. चालू वर्षात रू. ३०५/– परत केलेले आहे. त्यामुळे साल अखेर शेअर्स भांडवल रू. ४४,८००/– जमा आहे. [१४]

**रिझर्व फंड –**

मागील वर्षी रिझर्व फंड रू. ८९ होता. यावर्षी प्रवेश फीचे रू. १० फंडात टाकण्यात आले. त्यामुळे वर्षअखेरीस रिझर्व फंडाची रक्कम रू. ९९ झालेली आहे.

**बँक कर्ज –**

दिनांक ३१–१२–१९५७ अहवाल सालात संस्थेने मागणी करून मुंबई राज्य सहकारी राज्य सहकारी बँक लि., मुंबई व अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेट्रंल को. बँक लि., अहमदनगर या संस्थेने सभासदांस ऊसाचे व भुसाराचे पिकांसाठी कर्ज मंजूर केलेले आहे.

१) आडसाली कर्ज रू. ८१,१३६=९८

२) साधे कर्ज नं.१ रू. ७४,३३४=६९

**एकूण रू. १,५५,४७१=00**

अहवाल साली बँकेची बाकी आडसाली रू. ७८,0७५=00 साधे कर्ज नं. १ रू. ३९,0१५=६२ व मध्यम मुदतीचे कर्ज रू. १,000/– देणे आहे. बँकेने संस्थेच्या वेळोवळी मागणीप्रमाणे संस्थेच्या वाढत्या व्यवहाराच्या दृष्टीने संस्थेस जरूर ते भांडवल पुरवून प्रोत्साहन दिले.

**सभासद कर्ज –**

मागील साल अखेर सभासदांकडे साधे कर्ज रू. १,३३,४0७=0१ येणे होते. चालू सालांत सभासदांना रू. १,४१,९८३=१८ कर्ज दिले. चालू सालात सभासदांकडून रू. १,२४,६0७=0९ साधे कर्ज वसूल झाले. साल अखेर सभासदांकडे रू. १,५0,७८३=१0 साधे कर्ज येणे आहे.[१५]

**पीक कर्ज –** मागील साल अखेर ३ सभासदांकडे रू. ४,३७१/– पीक कर्ज येणे होते.

चालू सालात सभासदांना रू. ९,३८५ पीक कर्ज दिले. चालू सालात २ सभासदांकडून रू. ५२३२=२८ पीक कर्ज वसूल झाले. सालअखेर ३ सभासदांकडे रू. ८,५२३=७२ येणे आहे. सदर रकमेच्या वसूलीसाठी हुकूमनामा मिळविला असून तो वसूलीसाठी स्पेशल रिकव्हरी ऑफिसरसाहेब श्रीरामपूर यांचेकडे पाठविला आहे.

मध्यम मुदत कर्ज एंजिनकरीता :- चालू अहवालाचे सालात एका सभासदास एंजिनकरीता रू. १६५०/- तीन वर्षाचे फेडीचे कराराने दिलेले आहेत. त्यापैकी चालू सालात रू. ६५०/- वसूल आला असून एका सभासदाकडे १००० मध्यम मुदत कर्ज येणे आहे.

**थकबाकी –**

अहवालाचे सालात एकूण थकबाकी १० सभासदां मिळून रू. २१,१६५/- आहे. यापैकी एक पीक कर्जावर सभासदांकडे रू. ६२१ थकलेले आहेत व त्यांचेवर लवादही केलेले आहेत.

त्यापैकी १७ साधे व पीक कर्जावर सभासदांना रू. ८,६२३ ची तहकुबी तारीख ३१-७-५८ पर्यंत देण्यात आलेली आहे. तहकुबी देतांना दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., कोळपेवाडीचे फायनल पेमेंटमधून ९० टक्के तरी हमखास वसूल येईल अशी खात्री होती. परंतु कारखान्याने संस्थेस कोणत्याही प्रकारे न कळविता फायनल पेमेंटमधून टनामागे ५ रू. शेअर्सकरीता कपात केल्यामुळे येणारे वसुलापैकी फक्त जुलै १९५८ अखेर रू. ४,७८२ वसूल आहे. त्यामुळे ७ सभासदांना रू. ३८४० तहकुबी देण्यात आलेली आहे. ही तहकूबी देताना कार्यकारी मंडळाने पूर्ण विचार करून मगच निर्णय दिला आहे. तेव्हा खऱ्या अर्थाने थकबाकी ७ साधे कर्जदार सभासद यांचेकडेस रू. ११,९०८ व १ पीक कर्जदार सभासद यांचेकडे रू. ६२१ आहे. एकूण ८ सभासदांकडे रू. १२,५२९ एवढीच थकबाकी राहते. हे थकबाकीचे प्रमाण एकूण कर्जाशी शेकडा ७.७ आहे. थकबाकी प्रमाण वाढणेचे कारण एका मोठे कर्ज घेणरे बागाईतदाराचे ऐन उन्हाळ्यात एंजिन फुटलेमुळे ऊसाचा माल बसून त्याचा उत्पन्नावर परिणाम होऊन वसूल येऊ शकला नाही. त्यामुळे थकबाकीचे शेकडा प्रमाण वाढले आहे.[१६]

**१.२ गेल्या ६० वर्षातील संस्थेची स्थिती –**

संस्थेच्या ३१ मार्च २०१३ अखेर संपलेल्या ६० व्या वर्षाच्या कामकाजाचा अहवाल, तेरीज, नफा-तोटा, व्यापारी व ताळेबंद पत्रके यानुसार संस्थेची सध्याची स्थीती व गेल्या ६० वर्षाची संस्थेची प्रगती दिसून येते.

**सभासद –**

अहवाल अखेर पटावर सभासद संख्या ४२९ आहे.

**साधन संपत्ती –**

संस्थेचे साधन संपत्तीचे गेल्या पाच वर्षातील तुलनात्मक आकडे पुढे दिलेले आहे.

| अ.नं. | प्रकार | सन २००८–०९ | सन २००९–१० | सन २०१०–११ | सन २०११–१२ | सन २०१२–१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | भाग भांडवल | ३५,५०,६६० | ३६,४९,५०० | ३७,७६,९६० | ३९,०७,०२५ | ३९,९९,०६० |
| २) | फंडस् | १३,५२,९११ | २७,२३,०३८ | ३०,०२,३२१ | ३४,२१,३३१ | ३९,००,८७४ |
| ३) | ठेवी | ४,५४,६८० | ४,४६,२१५ | ४,४६,२१५ | ४,०८,६९० | ३,९३,६९० |
| ४) | बाहेरील कर्जे | ११८,८९,९४१ | १२२,६०,४३० | १०२,६४,५१७ | ९७,९९,७११ | १०१,६४,६१७ |
| ५) | गुंतवणूक | ३१,०२,७६३ | २८,२४,५५० | २८,९७,३८० | ३०,९९,८३७ | ३२,११,५९१ |
| ६) | मेंबर कर्ज येणे | १०५,८७,९५७ | १०५,४५,६७२ | १०४,१३,०८५ | ८८,८१,६९८ | ९१,९०,१६८ |

(सन २०१२–१३ च्या वार्षिक अहवालावरून) [१७]

वरील परिस्थिती लक्षात घेता भागभांडवल फंडस्, बाहेरील कर्ज, गुंतवणूका, मेंबर येणे कर्ज यामध्ये वाढ झालेली आहे व ठेवीमध्ये घट झालेली आहे.

**सभासद कर्जवसूली व थकबाकी –**

संस्थेने सभासदांना त्यांच्या पिकाच्या प्रमाणात बँकेकडून कर्ज घेवून वाटप केलेले आहे. अहवाल सालात अल्पमुदत व मध्यम मुदत कर्ज एकूण वसूलास पात्र रक्कम रू. ८४.४२ लाख होती. वसुलास पात्र रकमेपैकी सभासद वसुल रू. ३१.६७ लाख झालेला आहे. सभासदांकडे एकूण येणे रू. ५३.०५ लाख आहे. त्यापैकी आज अखेर ६३ सभासदांकडे रू. १६.०४ लाख थकबाकी झालेली आहे. थकबाकीचे येणे कर्जाशी शेकडा प्रमाण १९ टक्के इतके आहे.

**बँक कर्जे –**

संस्थेचे अहवाल सालात बाहेरील कर्जे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अहमदनगर शाखा माहेगांव देशमुखकडून उचल केलेले आहे. अहवाल सालात एकूण वसुलास पात्र कर्जाची देय रक्कम रू. ७४.९१ लाख होती. वसुलास पात्र कर्ज देय

रकमेपैकी रू. ३२.४९ लाख कर्जवसुली बँकेला दिलेली आहे. बँकेची रू. ४२.५० लाख रक्कम देय आहे.[१८]

**प्रत्येक विभागाची व्यापारी व नफा – तोटा पत्रके**

सन २०१२–२०१३ सालाच्या प्रत्येक विभागाचे व्यापारी व नफा–तोटा पत्रके

| अ.नं. | विभागाचे नांव | व्यापारी पत्रक | | **नफा–तोटा पत्रक** | |
|---|---|---|---|---|---|
| | | नफा | तोटा | नफा | तोटा |
| १) | हेड ऑफिस | -- | -- | -- | १७,२०,९०१ |
| २) | खत विभाग (हेडऑफिस) | ३,१९,६०० | -- | ३,१९,६०० | -- |
| ३) | खत विभाग (कोळपेवाडी) | १,५६,२३४ | -- | १,५२,८१६ | -- |
| ४) | स्वस्त धान्य दुकान | १९,७९९ | -- | ९,५६६ | -- |
| ५) | पेट्रोल पंप | २०,७४,६२६ | -- | १८,११,१२० | -- |
| | **एकूण** | **२५,७०,२५९** | **--** | **२२,९३,१०२** | **१७,२०,९०१** |

(सन २०१२–१३ च्या ६० वा वार्षिक अहवालावरून)[१९]

**व्यवस्थापक मंडळ –**

अहवाल वर्षात व्यवस्थापक मंडळाने आपला बहुमोल वेळ खर्चून संस्थेचे कामकाज चांगल्या प्रकारे केले. सभासदांच्या शेती विषयक गरजा लक्षात घेऊन योग्य ते मार्गदर्शन व सहाय्य केले.

**नोकरवर्ग –**

संस्थेचे मॅनेजर श्री. बालमभाई सय्यद व इतर सहाय्यक कर्मचारी यांनी संस्थेशी प्रामाणिक राहून सभासदांच्या गरजा व त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून चांगल्या प्रकारे संस्थेची वाढता जबाबदारी लक्षात घेऊन कामकाज केलेले आहे.

**अंतर्गत तपासणी –**

संस्थेचे टॅक्स् व व्हॅट ऑडीट हे कोपरगाव येथील नामवंत चार्टर्ड अकौंटंट मा. श्री.डी. बी. खेमनर साहेब व त्यांचे सहाय्यक कर्मचारी यांनी वेळोवेळी येऊन घेतलेले आहे व याकामी योग्य मार्गदर्शन केलेले आहे.

**सरकारी ऑडीट –**

सन २०१२–२०१३ सालाचे ऑडीट मा. श्री. एस. आर. फळे, प्रमाणित लेखापरिक्षक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी व त्यांचे सहकारी यांनी घेतलेले आहे. संस्थेला ऑडिट वर्ग 'अ' दिलेला आहे.[२०]

**संस्थेचे ध्येय –**

संस्थेच्या वतीने सर्व सभासद बांधव व पंचक्रोशीतील सर्व ग्राहकांना सर्व शेती उपयुक्त अधिकाधीक सेवा उपलब्ध करून देणे. तसेच सभासदांमध्ये काटकसर, बचत, स्वावलंबन व सहकाराचा प्रचार होण्यास उत्तेजन देणे.

**भेटी व आभार –**

संस्थेच्या कामकाजाशी संबंधित अधिकारी वर्ग सरकारी व निमसरकारी अधिकारी, सहकारी कार्यकर्ते व अधिकारी, शेतकी खात्याचे अधिकारी व सहकारी खात्याचे अधिकार वर्ग, दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मा. चेअरमन, संचालक, कार्यकारी संचालक, विकास अधिकारी, इतर अधिकारी वर्ग व माहेगांव देशमुख तसेच कोळपेवाडी कारखाना शाखेचे अधिकारी शाखाधिकारी, दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि. चे मा. चेअरमन व त्यांचे अधिकारी वर्ग, गौतम सहकारी बँक लि. चे चेअरमन, मॅनेजर, व अधिकारी, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि., गौतमनगरचे मा. चेअरमन, कार्यकारी संचालक व अधिकारी तसेच संस्थेचे हितचिंतक यांनी वेळोवेळी आपल्या कामकाजाच्या दृष्टीने सहकार्य व मार्गदर्शन केलेले आहे.

**१.३ सहकाराचा विस्तार**

माहेगांव देशमुख या संस्थेमुळे गावातील एकूण विकासाला चालना तर मिळालीच परंतु पुढे संपूर्ण गावाला सहकाराच्या तत्वाने एकत्र गुंफून प्रत्येकाला स्वावलंबी करण्याचा सोसायटीने केलेला प्रयत्न वाखाणण्याजोगा आहे. प्रचंड कष्ट करण्याची उमेद बाळगणाऱ्या शेतकरी शेतमजुरांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन सोसायटीने प्रथम लोकांना अत्यावश्यक वस्तूंची सेवा पुरवली. यामध्ये प्रामुख्याने बी–बीयाणे, खते, कीटकनाशके , पशुखाद्ये त्याचप्रमाणे पेट्रोल, डिझेल, रॉकेल अशा काही वस्तूंचा समावेश होता. कारण याच वस्तूंसाठी लोकांना सावकारांकडून कर्ज घ्यावं लागत असे. सोसायटीने या साऱ्या वस्तू 'ना नफा ना तोटा' तत्वावर उपलब्ध करून दिल्याने अनेक शेतकरी सावकाराच्या जाचातून सुटू शकले.

अर्थात हे करत असताना सोसायटीला अनंत अडचणींना सामोरे जावे लागले. एकतर पाच हजार लोकवस्तीच्या या गावातील बहुसंख्य लोक कर्जबाजारी होते. त्यामुळे सुरूवातीला सोसायटीला फारसे सभासद मिळाले नाही. परिणामी भाग भांडवल मर्यादित राहिले. पण शंकरराव काळे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने विविध कल्पना लढवून गावात विकासाची मुहूर्तमेढ रोवली. गावातील सर्व समाजघटकांच्या गरजा लक्षात घेऊन शंकरराव काळे यांनी सोसायटीमार्फत अनेक कार्यक्रम राबवले.

गावची शेती सुधारल्याशिवाय इथला समाज सुधारणार नाही हे ओळखून शंकरराव काळे यांनी शेतीसाठी आवश्यक त्या सर्व सेवा –सुविधा सोसायटीद्वारे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. छोट्यातला छोट्या शेतकऱ्याला शेतीसाठी पाणी मिळाले पाहिजे म्हणून सोसायटीने गोदावरी नदीवरील दत्तसागर बंधाऱ्यातील पाण्याचा योग्य वापर करता यावा म्हणून श्री दत्त दिगंबर, कुंभारी–माहेगांव आणि श्री. पांडुरंग रोकडे अशी तीन सहकारी पाणी उपसा जलसिंचन संस्था स्थापण्यास हातभार लावला. यातली श्री पांडुरंग रोकडे सहकारी पाणी उपसा जलसिंचन संस्था ही खास आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या समाजातील शेतकऱ्यांना योग्य प्रमाणात पाणी मिळावे म्हणून स्थापन करण्यात आली आहे. आज या संस्थांमुळे अनेक छोट्या शेतकऱ्यांना पाणी मिळालेले आहे.

शेतात पाणी खेळू लागल्याने वावर हिरवे झाले. आसपासच्या परिसरात हिरवा चारा कुठे पाहायला मिळत नव्हता, तो एका केटीवेअरमुळे दिसायला लागला. त्यामुळे माहेगाव देशमुखचे छोटे–छोटे शेतकरी मोठ्या प्रमाणात दुधाच्या व्यवसायाकडे वळले. त्यातही सोसायटीने मोठी मदत गावकऱ्यांना केली. सोसायटीच्या माध्यमातून दुभती जनावरे घेण्यासाठी शेतकरी, शेतमजुरांना अर्थसहाय्य तर उपलब्ध करून दिलेच, परंतु दूध उत्पादन वाढीसाठी म्हणून रास्त किंमतीत पशुखाद्यही उपलब्ध करू दिले. त्याचबरोबर या व्यवसायाच्या वाढीसाठी म्हणून गावात श्रीकृष्ण सहकारी दुग्ध व्यवसाय संस्था, राधाबाई काळे दूध उत्पादक सहकारी संस्था याची स्थापना केली. या संस्थांमुळे दूध संकलन आणि विक्रीची व्यवस्था झाल्याने लोकांना हा जोडधंदा करण्यास प्रोत्साहनच मिळाले. एवढेच नाही तर गाव आणि परिसरातील सर्वसामान्य माणूस आर्थिक विंवचनेतून बाहेर पडला. पण म्हणून लोकांना आर्थिक आधार देण्याचे काम सोसायटीने थांबवले नाही.

ज्यांचे हातावरचे पोट आहे किंवा शेतकरी आहे पण पुरेसे उत्पादन निघत नाही अशा सर्वसामान्य जनतेला स्वस्तातले अन्नधान्य उपलब्ध झाले तर अनेक कुटुंबांसमोर असलेला महत्वाचा प्रश्न सुटू शकेल. या विचाराने सोसायटीने 'ना नफा ना तोटा' तत्वावर गावात स्वस्त धान्य दुकान चालवायचे ठरवले. त्यानुसार परवाना मिळवला आणि ते सुरू केले. आजही हे दुकान यशस्वीपणे चालू आहे, त्याचप्रमाणे सोसायटीच्या सभासद शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसारख्या वाहनांसाठी लागणारे इंधन जवळ आणि वेळेत उपलब्ध व्हावे म्हणून सोसायटीने स्वतःच्या जागेत इंडियन ऑईल कार्पोरेशनचा पेट्रोल पंप सुरू केला.

अन्नधान्याची सुरक्षित साठवणूक व्यवस्था असणे ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब मानली जाते. कारण शेतमाल साठवणुकीची योग्य सोय नसल्याने आजदेखील सुमारे ३० टक्के उत्पादन वाया जाते. नाशवंत मालाच्या बाबतीत तर हे प्रमाण अधिक आहे, त्यामुळे बहुतेक शेतकरी मिळेल त्या किंमतीत शेतमाल विकण्याची घाई करतात. वास्तविक मालाला किंमत येईल तसा थोडा, थोडा माल विक्रीला काढला तर निश्चित चांगला भाव मिळून शेतकऱ्यांचा फायदा होतो. पण त्यासाठी उत्तम दर्जाची गोदामे गावपातळीवर असावी लागतात. शासनाची गोदामे आहेत पण ती तालुक्याच्या ठिकाणी शिवाय तिथे उंदरांनी धान्य नासधूस करण्याचे प्रमाणे बरच असते. त्यामुळे शासनाची बहुतेक गोदामे सिमेंटसारख्या वस्तू ठेवण्यासाठी वापरली जातात. परिणामी शेतकऱ्यांना या गोदामांचा फारसा उपयोग होत नाही. हीच बाब लक्षात घेऊन गावातच काही गोदामे उभारली तर त्याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होऊ शकतो हे लक्षात घेऊन सोसायटीने गावातच काही गोदामे बांधण्याचा निर्णय घेतला आणि एकेक करत आज सहा गोदामे सोसायटीत लोकांसाठी उपलब्ध करून दिली. २५०० मे.टन क्षमतेची ही गोदामं धान्याबरोबर खते साठवण्यासाठीही वापरली जातात.[२१]

शिक्षण हा शंकरराव काळे यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. खेड्यातील मुलांना शिक्षण मिळाले तर या भागाचा मोठा विकास होऊ शकतो असे सुरूवातीपासूनच त्यांना वाटत होते. त्यामुळे माहेगांव देशमुख सोसायटीच्या माध्यमातून स्थानिक लोकांच्या छोट्या-छोट्या गरजा पूर्ण करत परिसराचा विकास साध्य करण्याची धडपड सुरू केली. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी कुंभारी येथे सुरू झालेल्या शाळेला मदत केली. सुरूवातीच्या लोकांच्या प्रतिसादाअभावी पुरेशी मुले मिळाली नाहीत व जी मुले शाळेत दाखल झाली तीही मध्येच शाळा सोडून निघून गेली. त्यामुळे शाळा सुरू

होतानाच बंद पडणार असे वाटत होते. पण शंकरराव काळे ठाम होते. काहीही झाले तरी मुले शिकली पाहिजेत शाळा चालली पाहिजे म्हणून त्यांनी एक वर्षभर शाळेत येणाऱ्या मुलांना प्रति महीना दहा रूपये दिले. त्या आकर्षणातून अनेक मुले शाळेत येऊ लागली आणि बघता – बघता कुंभारीची शाळा मुलांनी बहरून गेली. आज या शाळेत अनेक मुले शिक्षण घेत असून परिसरातले एक चांगले दर्जाचे हायस्कूल म्हणून लोक या शाळेकडे पाहतात. अर्थात एवढ्यावरच त्यांनी शैक्षणिक कामे थांबवले नाही.

आदिवासी आणि इतर गोरगरीब मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून सोसायटीमार्फत शंकरराव काळे यांनी अनेक पातळ्यांवर प्रयत्न केले. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून काळे वस्तीवर आदिवासी आणि इतर मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून जिल्हा परिषदेची एक प्राथमिक शाळा सुरू केली. त्यासाठी तीन खोल्या बांधून दिल्या. एवढेच नाही तर काही होतकरू मुलांना वैयक्तिक मदत देऊन मोठ्या पदापर्यंत पोहोचवण्याचे कामही शंकरराव काळे यांनी या सोसायटीमार्फत केले. थोडक्यात सांगायचे तर आज उभ्या असलेल्या कोसाका उद्योग समुहाची मुहूर्तमेढ शंकरराव काळे यांनी या संस्थेद्वारे रोवली. त्याहीपेक्षा परिसराच्या एकूण विकासाला दिशा देण्याचे काम या सोसायटीमार्फत शंकरराव काळे यांनी केले.

**२. कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची स्थापना –**

रामायण काळातील दंडकारण्यात, चारित्र्यसंपन्न, ज्ञानतपस्वी गौतम ऋषीचा सहवास अनुभवणाऱ्या गोदावरी म्हणजेच गोदामायला 'गौतमी' या सार्थ नावाने ओळखले जाते. या 'गौतमी' च्या खळाळत्या पाण्याने कोपरगाव तालुक्याला शेतीसंपन्न केले आहे. 'गौतमी' च्या पाण्यावर उभा राहिलेला गौतमनगरीतील कोपरगाव सहकारी साखर कारखाना सहा दशकांहून अधिक काळ कोपरगाव तसेच अहमदनगर जिल्ह्याच्या विकासाचा दीपस्तंभ बनला आहे. भारतातील नव्हे तर अशिया खंडातील दुसरा सहकारी साखर कारखाना ठरलेल्या 'कोसाका' मुळे कोपरगाव आणि आसपासच्या परिसराचे संपूर्ण चित्र बदलले. 'कोसाका' चा इतिहास म्हणजे येथे झालेल्या सकारात्मक सामाजिक स्थित्यंतराचा मागोवा ठरतो. व्यापक दृष्टिकोनाने इथल्या विकासाला ज्यांनी –ज्यांनी प्रेरणा दिली त्यात कोसाकाचे संस्थापक शंकरराव काळेंचे योगदान अनन्यसाधारण आहे. शंकररावांनी नेतृत्व गुणांच्या जोरावर व्यक्तिगत आयुष्यात स्वतःची प्रगती तर साधलीच पण त्याचबरोबर आपल्या परिसराच्या, जिल्ह्याच्या आणि सहकार चळवळीची तत्व अंगी बाणवत महाराष्ट्राच्या विकासाला मोठाच हातभार लावला. शंकरराव यांनी 'कोसाका'

च्या निमित्ताने जे काही केले त्यातून त्या भागाचा विकासच झाला. वास्तविक स्वतः उच्चशिक्षित असल्याने त्यांनी सरकारी नोकरीत मोठ्या हुद्दयावर काम केले असते तर ते स्वाभाविकच ठरले असते. परंतु आज गौतमनगर उभे राहिले आहे. 'कोसाका' उभा राहिला आहे, इथला शेतकरी सावकारी पाशातून मुक्त झाला आहे.

चाळीस–पन्नास वर्षापूर्वी ग्रामीण भागातील माणसे अतिशय गलितमात्र झालेली होती. शेतकऱ्यांना सावकारी पाशाने करकचून आवळलेले होते. त्यात शेतकरी समाज संघटित नव्हता; त्यामुळे त्यांचे मूक रूदन कोणाच्या कानी पडत नव्हते. आपली दैन्यावस्था ही आपल्या पूर्वजन्माचे फळ आहे व आपण आपल्या कर्माचीच फळे भोगत आहोत असा निराशावाद सर्वत्र पसरलेला होता. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश लोक भारतीयांवर अन्याय–अत्याचार करीत. त्याचबरोबर सावकार शेतकऱ्यांची पिळवणूक करत होते. शेतकऱ्यांना कर्ज देऊन त्यांच्या जमिनी हडप करणे, चक्रवाढ व्याजाने कर्जवसुली करणे, यात शेतकरी कर्जाच्या चरकात पिळला जात होता. 'शेतकरी कर्जातच जन्मतो, कर्जातच मरतो' अशी परिस्थिती सर्वत्र होती. अशा दिवसात शेतीच्या विकासाचा विचारही कोणाच्या मनात येत नव्हता. शेतीमध्ये ज्वारी–बाजरीच्या पिकांप्रमाणेच ऊस लागवड काही प्रमाणात केली जात होती. पुंड्या ऊसाची लागवड काही प्रमाणात शेतकरी करायचे. ऊस पिकविल्यानंतर आसपासच्या बाजारात नेऊन विकण्याची प्रथा होती. ऊसापासून गुळही मोठ्याप्रमाणात बनवला जात असे. पण गुऱ्हाळे टाकण्याची आणि चालवण्याची ऐपत फारच थोड्याप्रमाणात शेतकऱ्यांकडे असल्याने आम शेतकरी वर्गाला गुळाचा गोडवा चाखायला कधीच मिळायचा नाही. कोल्हापूरप्रमाणेच कोपरगाव, नाशिक, श्रीरामपूर ही गावे गुळाच्या बाजारपेठेसाठी प्रसिद्ध होती. पण या व्यवसायातही सावकार गुंतलेले असल्याने शेतकऱ्याने स्वतः ऊस पिकविला, गुळ बनवला तरी तो कर्जातच राहायचा.

## २.१ कोपरगाव सहकारी साखर पायाभरणी –

स्वातंत्र्यानंतर मात्र शेतकऱ्यांच्या परिस्थितीत बदल होण्याची–करण्याची निकड सगळ्यांना भासू लागली. पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या डोळ्यासमोर नव–भारत निर्मितीचे स्वप्न होते. सर्व नागरिकांना विकासाची समान संधी व मूलभूत हक्क मिळावे यासाठी त्यांनी राष्ट्रीय नियोजन घोषित करून समाजवादी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी भांडवलवादी तसेच साम्यवादी अर्थव्यवस्थेला पर्याय म्हणून सहकारी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केल्याचे घोषित केले. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या

मार्गदर्शनाखाली देशभर सहकारी साखर उद्योग व सहकारी संस्थांचे लहान-मोठे प्रकल्प हाती घेऊन आवश्यक तेवढे भागभांडवल, अर्थसहाय्य व कर्ज पुरवठा उपलब्ध करून देण्याचे राष्ट्रीय धोरण जाहीर केले. या एका निर्णयामुळे सहकारी चळवळीतून विकास कामांना जबरदस्त वेग आला. खरे म्हणजे १९०४ पासून सहकारी चवळीचे बिजारोपन झालेले होते.[२२] पण त्याचे वटवृक्षात रूपांतर झाले ते स्वातंत्र्यानंतर. ब्रिटीश सरकारने १९२५ मध्येच सहकाराचा कायदा केला होता. पण तो तसाच सरकार दप्तरी धूळ खात पडलेला होता. सहकार म्हणजे काय याची जनतेला पुरेशी कल्पना नव्हती. पण डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता यांनी या कायद्याला पुन्हा जिवंत केले आणि सहकाराचा अर्थ खेड्यापाड्यात पोहचवला.

डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी संपूर्ण देशभरात त्यातही उत्तरप्रदेश आणि महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीला चालना दिली. एका अर्थाने धनंजयराव गाडगीळ आणि वैकुंठभाई मेहता हे साखर कारखान्यांचे प्रवर्तक होते. दिशादर्शक होते. पण त्या दिशेने जाण्यासाठी ध्येयवादी तरूणांची व व्यक्तींचीही तितकीच गरज होती. ती जबाबदारी पहिल्यांदा अंगावर घेतली ती प्रवराकाठचे डॉ. पद्मश्री विखे पाटील आणि माहेगांव-देशमुखचे शंकरराव काळे यांनी. परिणामी 'प्रवरा' हा पहिला तर 'कोसाका' हा भारतातला तसेच आशियतला दुसरा सहकारी साखर कारखाना ठरला.[२३] १९५० मध्ये प्रवराच्या रूपाने महाराष्ट्रात सहकाराची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यावेळी पद्मश्री विखे पाटील वयाने जेष्ठ होते. तर शंकरराव काळे बत्तीस वर्षाचे होते. मोठी स्वप्ने बघण्याची आणि ती प्रत्यक्षात आणण्याची जिद्द त्यांच्यात होती. सर्वात महत्वाचे म्हणजे गणपतराव रभाजी औताडे पाटील यांचा वडिलकीचा आशीर्वाद - शंकररावांच्या पाठीशी होता. 'कोसाका' ची मूळ कल्पना गणपतराव औताडे पाटील यांची. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी शंकरराव काळे अहोरात्र झटले.

गणपतराव रभाजी औताडे पाटील हे शंकररावांच्या वडिलांचे देवरामबाबांचे स्नेही होते. गणपतरावांचा शंकररावांवर विशेष लोभ होता. त्यांच्या धडपड्या स्वभावाचे त्यांना कौतुक होते. शेतकरी-कष्टकरी वर्गाविषयी शंकररावांना वाटत असणारी आस्था त्यांना मोहवत होती. या तरूणाच्या हातून मोठे काम घडू शकते याची गणपतरावांना पूर्ण खात्री होती. याच विश्वासामुळे त्यांनी शंकरराव यांना शेकापतर्फे १९५२ च्या निवडणुकीत उभे राहण्यासाठी दहा हजार उसनवार दिले. निवडणुकीचा निकाल शंकररावांच्या विरोधात गेल्यावर ते शेतीकडे लक्ष देत होते. त्यावेळी गणपतराव औताडे पाटील यांनी सहकारी

साखर कारखाना काढण्याची कल्पना मांडली. या कल्पनेतले आवाहन आणि हित लक्षात आल्यावर शंकरराव उत्साहात आले. औताडे पाटील शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करणारे होते. शेकापच्या तत्वांवर त्यांचा विश्वास होता. सहकाराचे महत्त्व त्यांना पूर्णपणे पटले होते. डॉ. धनंजयराव गाडगीळ, पद्मश्री विखे पाटलांना हाताशी धरून प्रवरा सहकारी साखर कारखान्यासारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प शेतकऱ्यांच्या हितासाठी–विकासासाठी राबवत आहेत याची त्यांना चांगली जाण होती. मुख्य म्हणजे तेही या कार्यात तन–मन–धनाने सहभागी झाले. एवढेच नव्हे तर त्यांनी देवरामबाबा काळेंना प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे पंचवीस हजार रूपयांचे शेअर्स विकत घ्यायला लावले. प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर डॉ. धनंजयराव गाडगीळ, पद्मश्री विखे पाटील यांच्या बरोबरीनेच गणपतराव रभाजी औताडे पाटील, शंकरराव काळे यांचाही समावेश होता. एका अर्थाने सहकाराची पहिली गुढी उभारताना जेष्ठांच्या सोबतीनेच बत्तीस वर्षाचे तरूण शंकररावांचेही हात लागले.

याबाबत शंकरराव म्हणतात की, ‘प्रवराच्या’ उभारणीच्या काळात मला केवळ चळवळीच्या विचारांचा वारसाच मिळाला नाही तर संचालक म्हणून काम करताना लोकांचे प्रश्न, कारखाना उभा करताना येणाऱ्या अडचणी, व्यवस्थापन, काटकसर, व्यापक दृष्टीकोन या सगळ्या पैलूंचा खोलवर अनुभव मिळाला. माझ्यासाठी प्रवरा कारखाना म्हणजे अनुभवांचं शिक्षण देणारी शाळाच होती. या शाळेतून पास झाल्यावर विद्यापीठात प्रवेश घेताना म्हणजे ‘कोसाका’ ची उभारणी करताना विलक्षण आत्मविश्वास होता. त्यावेळी मला खूप त्रास झाला. भरपूर कष्ट पडले. पण आपण अपयशी होऊ अशी शंकाही माझ्या मनाला कधी शिवली नाही.’’[२४]

वास्तविक ‘दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना’ हाच भारतातील पहिला सहकारी तत्वावरचा साखर कारखाना ठरला असता. कारण अशा प्रकारचा कारखाना असावा या विचाराला १९४४–४५ पासून चालना मिळालेली होती. त्याचवेळी ‘प्रवरा’ साखर कारखान्याची जुळवाजुळव सुरू होती. पण मनभिन्नता, आर्थिक परिस्थिती आणि इतर कारणांमुळे ‘कोसाका’ ची उभारणी लांबणीवर पडत गेली. कोपरगाव तालुक्यात सहकारी साखर कारखाना असावा असा विचार पुढे येण्याचे मुख्य कारण म्हणजे कोपरगाव तालुक्यात उपलब्ध ऊस क्षेत्र जवळजवळ २६०० ते २७०० एकर होते. ऊसापासून गुळाची निर्मिती मोठ्याप्रमाणावर व्हायची. त्यामुळे कोपरगाव ही गुळाची फार मोठी व्यापारी पेठ होती. पण गुळ तयार करण्यासाठी येणारा खर्च, विक्रीची परावलंबी

व्यवस्था यामुळे ऊसाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना गुळाचा वाजवी भाव मिळत नव्हता. साहजिकच शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी सहकारी तत्वावरील ऊस काखान्यांचा नितांत गरज होती. याचबरोबर प्रस्थापित धनदांडग्यांची खासगी साखर कारखानादारी मोडीत काढण्याचाही विचार होताच.

१९३० च्या सुमारास कोपरगाव तालुक्यात खासगी साखर कारखानदारीला सुरूवात झाल्याच्या नोंदी आहेत. गोदावरी नदीवरील दारणा धरणाच्या कालव्यातून कोपरगाव तालुक्याला पाणी पुरवठा व्हायचा. या पाट पाण्याचा वापर शेतीतील व्यापारी पिकांसाठी व्हावा असा प्रयत्न ब्रिटीश अधिकाऱ्यांनी केला. ब्रिटीशांनी श्रीरामपूर तालुक्यातील हजारो एकर जमीन ताब्यात घेऊन एका ब्रिटीश कंपनीमार्फत हरेगावचा साखर कारखाना काढला. त्या कारखान्याला लागणाऱ्या सामुग्रीचा पुरवठा, उत्पादित साखरेची रेल्वेने निर्यात आणि शेतीतून ऊस कारखान्यात आणण्यासाठी छोट्या–मोठ्या रेल्वे लाईन्स टाकण्यात आल्या. या सगळ्यांची दखल उद्योजक भांडवलदारांनी घेतली. करमसीभाई सोमैय्यांनी कोपरगाव तालुक्यात कान्हेगाव रेल्वे स्टेशनजवळ आणि सावळीविहीर गावाजवळ असे दोन खाजगी साखर कारखाने काढले. एका स्थानिक उद्योजकाने पुणतांब्यासही कारखाना काढला होता.[२५] शेतकऱ्यांच्या जमिनी खंडाने घेऊन त्यावर साखर कारखाने चालवयाचे आणि नफा कमवायचा असे या खासगी साखर कारखान्याचे धोरण होते. शेतकऱ्यांच्या परिसराचा विकास या गोष्टी त्यांच्या विचारात नव्हत्या. आपला ऊस कारखाना स्वीकारेलच आणि त्याला योग्य भाव मिळेल याची काहीही शाश्वती शेतकऱ्यांना नव्हती. कारखान्याने ऊस नाकारण्याच्या काही घटना घडलेल्या होत्या. परिणामी मोठ्या कष्टाने पिकविलेला ऊस शेतकऱ्यांना बांधावर फेकून द्यावा लागला किंवा जनावरांना चारा म्हणून वापरावा लागला. म्हणूनच आत्मविश्वास गमावलेल्या शेतकऱ्यांना संघटीत करून त्यांच्या आयुष्यात स्थैर्याची पहाट आणण्यासाठी सहकारी साखर कारखान्याची नितांत आवश्यकता होती.

## २.२ कारखाना उभारणीचे आव्हान –

गणपतराव औताडे आणि शंकरराव काळे यांच्यासमोर परिस्थितीचे आव्हान मोठे होते. सरकार सहकाराच्या बाजूने असल्याने एक आधार तर भक्कम होता. कोपरगाव तालुक्यातील गोदावरी डावा व उजवा पाटावरील ऊस उत्पादक बागायतदारांनी शेअर्स घ्यावेत असे ठरवण्यात आले. ३० जून १९५२ रोजी साखर कारखान्याचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव देण्यात आला. त्यानुसार शासनाने ‘दि कोपरगाव सहकारी

साखर कारखाना लि.,' या नावाने संस्था रजिस्टर केली आणि संस्थेस रजि. नं. जी २६0-२ असा दिला. २१ सप्टेंबर १९५३ पासून 'कोसाका' चे अधिकृतरित्या काम सुरू झाले. शासनातर्फे तीन वर्षाकरीता संचालक मंडळाची नेमणूक करण्यात आली. त्यात वामनराव वर्दे (बँक प्रतिनिधी), डॉ. धनंजयराव गाडगीळ (रजिस्ट्रार नॉमिनी), गणपतराव रभाजी औताडे (पोहेगाव), नारायणराव शिवराम बोरावके, शंकरराव देवराम काळे, पुरूषोत्तम त्र्यंबक मिरजकर, लक्ष्मणराव कृष्णाजी महाले (बोलकी), रावसाहेब नारायण पाटील (पुणतांबा) या संचालकांचा समावेश होता.[२६] शेतकऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांना शेअर्स घेण्यास प्रवृत्त करण्याची जबाबदारी सर्वानुमते शंकरराव काळे यांच्यावर टाकण्यात आली. येथे खरी शंकररावांसारख्या कुशल संघटकाची परीक्षा होती.

ज्या सहजतेने आज एखादी सहकारी तत्वावरील संस्था उभी करता येते, सभासद संघटित करता येतात, भाग भांडवल उभे करता येते. इतक्या सहजतेने या बाबी पाच दशकांपूर्वी होत नव्हत्या. एकतर ग्रामीण भाग संघटीत नव्हता. वर्षानुवर्षे पिळवणुकीशिवाय त्यांनी काही अनुभवलेले नव्हते. त्यांचे प्रश्नही त्यांना नीटपणे उमगलेले नव्हते. वर्षानुवर्षे फसवणूक झालेली माणसं सहजासहजी कोणावर विश्वास ठेवायला तयार होत नाहीत. अशा विस्कळीत पीडीत समाजाचे संघटन फारच अवघड होते. पण व्यायामाने कमावलेल्या देहाचा कणा जसा बुलंद होता तसेच शंकररावांचे मनही अतिशय बळकट होते. बळकट मनातच प्रबळ इच्छाशक्ती, चिकाटी, जिद्द आणि विजिगीषु वृत्ती, आणि उद्योगी, कार्यमग्न स्वभाव यांची बीजे दडलेली असतात. एकेक अनुभवातून त्यांच्यातला एकेक पैलू समोर येत गेला.

''त्या काळी दातावर मारायला पैसा नसायचा. पैसाच दिसायचा नाही. रूपयाचं नाणं बैलगाडीच्या चाकासारखं भासायचं. अशा परिस्थितीत अडीचशे रूपयांचे शेअर्स विकत घ्यायला लावणं, त्यासाठी शेतकऱ्यांना राजी करणं हे एक प्रकारचं अग्निदिव्यच होतं, पण हा सारा खटाटोप शेतकऱ्यांच्या भल्यासाठी होता. आम्ही ऊस शेतकरी बांधवांना त्यांच्या घरी-दारी शेतात-लग्नात असं कुठेही गाठायचो. साखर कारखान्यामुळे त्यांचा कसा फायदा होणार हे दातांच्या कण्या करून पटवून द्यायचो, तरी तो राजी व्हायचाच असं नाही. असं दोन-तीनदा झाल्यावर तो शेअर्ससाठी - जुळवाजुळवीच्या तयारीला लागायचा. या सर्व कामात आमचे दिवस-रात्र एक झाले.पण एक होतं, डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता यांसारख्या नेत्यांवर लोकांचा विश्वास होता. ही माणसं आपल्या भल्यासाठीच झटत आहेत. याची जाणीव शेतकऱ्यांना

होती. त्यामुळे शेअर्स विकणं हे जिकिरीचं आणि त्रासाचं होतं तरी 'कोसाका'चं काम टप्प्याटप्प्याने पुढे सरकत होतं.''[२७] असे शंकरराव काळे सांगतात.

सुदैवाने महाराष्ट्राच्या सहकारी चळवचळीला दिशा देणारे नेतृत्व होते आणि या दिशेने वाटचाल करणारे पहिल्या टप्प्यातील तरूण नेतृत्वही होते. अवमानित समाजाची पिळवणूक अनुभवणारी, सामान्य पण असामान्य इच्छाशक्ती असणारी, दूरदृष्टीचा वेध घेण्याची क्षमता असणारी काही वेगळी माणसे सहकार क्षेत्राला लाभली होती. यात शंकररावांचा समावेश होता. विस्कळीत आत्मभानशून्य समाजाच्या संघटनासाठी मुख्य गरज असते ती कृतीशील कार्यक्रम राबवण्याची, माणसे जोडण्याची, त्यांच्याशी बरोबरीने वागत संवाद साधण्याची. याचवेळी ज्यांचे संघटन करायचे आहे त्यांच्या जगण्याच्या प्रश्नाचीही जाण तुम्हाला लागते. तरच ही पीडित माणसे विश्वास टाकून आत्मविश्वासाने उभी राहतात. अशा वेळी नेतृत्वाला आधी स्वार्थाकडे पाठ फिरवावी लागते. उपेक्षा, टवाळी, उपहास, छळ, विरोध, मान–अपमान यांचा परिणाम न होऊ देता येणाऱ्या अडचणींवर मात करण्याची कुवत लागते. जनहिताची कामं करताना आधी याचक व्हावे लागते आणि देणारा माणूस मग भले तो कितीही श्रीमंत वा गरीब असो सावकाराच्याच भूमिकेत असतो याचे अनुभव अनेक ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी जागोजागी नमूद करून ठेवलेले आहेत. 'कोसाका' चे शेअर्स घेण्यासाठी शेतकऱ्यांना राजी करताना शंकरराव काळे पदोपदी हाच अनुभव घेत होते. ''समाजात एकजूट नसल्यानेही आमचा त्रास वाढला होता. कोपरगाव तालुक्यात माळी, धनगर, कुणबी यांचं प्रमाण जवळपास सारखंच असल्याने सगळा समाज एकत्र आणणं ही तारेवरची कसरतच होती. त्यात आमच्या काही मित्रांनी कारखाना होऊ नये म्हणून प्रयत्न केले होते. ही माणसं कारखाना वगैरे काढणार नाहीत, तुमच्या जमिनी बळकावून बसतील असा त्यांनी प्रचार सुरू केला. पण कारखाना होणारच याची आम्हाला पूर्ण खात्री होती. कारण सरकार आमच्या पाठीशी होतं.''[२८] शंकरराव सुरूवातीच्या दिवसांच्या आठवणी सांगतात.

'कोसाका' साठी भागभांडवल गोळा करताना शंकररावांनी अनेक प्रयोग केले. शेतकऱ्यांना राजी करावयचे, त्यांना कागदपत्रांची पूर्तता करायला तालुक्याला पाठवयाचे अशी एक–ना अनेक कामे केली. एवढेच नाही तर शेतकऱ्यांना तालुक्याला पाठवल्यावर त्यांची गाय–बैलं वळण्यांचे कामही केले. कारखाना उभा करायचाच असा ध्यास त्यांनी घेतला होता. सुरूवातीला कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस कमी पडेल याची अंदाज आल्याने नाशिक जिल्हयातील गावातल्या शेतकऱ्यांना सभासद करून घेण्याचे

धोरण राबवण्यात आले. हे सर्व करताना ऊस लागवडही मोठ्या प्रमाणावर करण्याची गरज होती. गोदावरी आणि प्रवरा यांच्या धरणावरील पाटाचे पाणी वापरण्यास शेतकऱ्यांमध्ये सुरूवातीला नाराजी होती. पाटाच्या पाण्यावर पीक घेतल्यास जमिनीचे फूल जाते म्हणजे जमिनीचा कस जातो असा समज होता. पण सुदैवाने काही काळानंतर हा समज दूर झाला. पाटाच्या पाण्यावर पीक चांगले येते याची जाणीव झाल्यावर एकरी विक्रमी उत्पन्न घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढू लागला. गणपतराव औताडे, शंकरराव काळे यांनी या दृष्टीने फार प्रयत्न केले. तरीही काही शेतकऱ्यांचा कारखाना उभारणीला विरोध होताच. त्याकाळी पाटाचे पाणी वापरण्यासाठी सरकारकडून ब्लॉक दिले जायचे. जे शेतकरी कारखान्यांचे शेअर्स घेतील त्यांनाच ब्लॉक मिळेल असे शासनाने जाहीर केले. त्यानंतर मात्र विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांनी साखर कारखान्याचे शेअर्स रांगा लावत घेतले.

एकीकडे भांडवल उभारणीचे काम सुरू असताना 'कोसाका' कुठे उभा करावा याचाही विचारविनिमय सुरू होता. कोपरगावला साखर कारखाना असावा अशा मताचे बरेच जण होते. पण शेवटी एकमताने सर्व संचालकांनी देर्डे, चांदेकसारे आणि सुरेगांव इथल्या जागेची पाहणी केली. कारखान्याची जागा ठरवताना ऊसाचे क्षेत्र, पाण्याची सोय, जमिनी, मशिनरी व इमारती उभारणीस अनुकूलता, तसेच लासलगाव–कोपरगांव रेल्वे स्टेशनापासून अंतर विचारात घेऊन सुरेगांव येथील जागा निश्चित करण्यात आली. शंकरराव काळे यांनी जमीन मालकांचा विश्वास संपादन करून कारखान्यासाठी जमीन खरेदी केली.

कारखान्याची जागा निश्चित झाल्यावर मोठमोठी यंत्र, लोखंड–बांधकामाचे साहित्य येऊन पडू लागले. कारखाना उभारणीच्या या दिवसात शंकरराव काळे आपला संपूर्ण वेळ तिथल्या कामासाठी घालवत. कामगारांसोबतच जेवण करीत. त्यांना गणपतराव औताडे यांची साथ होतीच. या दोघांनीही कारखान्याच्या कामासाठी दिवस आहे का रात्र आहे याचा विचार केला नाही. घरदार विसरून शंकरराव काळे यांनी साखर कारखाना उभारणीचा ध्यास घेतला होता. कारखान्याच्या खरेदीसाठी माल, मशिनरी खरेदी करताना असो की ऑफिसच्या कामासाठी साधी स्टेशनरी खरेदी करायचे काम असो यामध्ये वायफळ खर्च होत नाही ना या विषयी शंकरराव अतिशय दक्ष असत. कारण शेतकऱ्यांनी विश्वासाने दिलेला पैसा हा तेवढ्याच जबाबदारीने व योग्य कारणासाठी खर्च पडला पाहिजे असा त्यांचा नेहमी कटाक्ष होता. जी गोष्ट करायची ती उत्तमच असा स्वभाव असल्याने शंकरराव काळे प्रत्येक गोष्टीत लक्ष घालत होते. दादा

पाटील औताडे यांना इमारतीचे बांधकाम–कारखान्याची उभारणी यात जास्त रस होता. त्यांनी आग्रहाने आधी कामगारांची वसाहत उभारण्याचे काम हाती घेतले. कारखान्यासाठी राबणाऱ्यांचे संसार आधी उभे राहिले पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. शंकरराव प्रसंगी पत्रव्यवहार, तज्ञांच्या गाठीभेटी, सरकारी चाकोरीतून वेगवेगळे परवाने ही बाजू सांभाळत होते. तर त्याचवेळी वित्तसंस्थांकडून कर्ज मिळावे यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. सरकार आणि शेतकरी यांच्याकडून पैसे मिळाले होते. उर्वरीत मुंबई शिखर बँकेकडून पैसे कर्जाने घेण्यात आले. हे सगळे घडवून आणण्यासाठी शंकररावांनी खूप प्रवास केला. पायपीट केली.

**२.३ प्रगतीच्या मार्गावर –**

कारखाना पूर्ण झाला. तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार मे. बी. एम. ए. (वेस्ट जर्मनी) यांच्याकडून शुगर प्लॅन्ट खरेदी करण्यात आला. त्याचीही उभारणी जर्मन तंत्रज्ञांकडून करून घेण्यात आली. तिथे आता पूर्वीचे सुरेगांव राहिलेच नव्हते. विकासाचा दीपस्तंभ तिथे उभा राहिला होता. कारखाना परिसरात तितकेच समर्पक नाव देण्यात आले. गौतमनगर दंडकारण्यात गौतम ऋषींचा आश्रम म्हणजे तपस्येंचे मोठे केंद्र होते. त्यांच्याच नावावरून कारखाना परिसराला गौतमनगर हे नाव देण्यात आले. कारखाना नवीन हंगामासाठी सिद्ध झाला होता. कारखान्याच्या आवारात ऊसाच्या गाड्या लावलेल्या होत्या. दिनांक १२ फेब्रुवारी १९५६ रोजी आंतरराष्ट्रीय किर्तीचे अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या शुभहस्ते पुजा करून ऊसाची मोळी गव्हाणीत टाकण्यात आली.[२९] कारखान्याची चाके गरागरा फिरू लागली. दाणेदार, शुभ्र साखरेची पोती भरू लागली. हा दिवस गौतमनगरसाठी जणू यात्रेचा दिवस ठरला. तालुक्याच्या विविध भागांतून बैलगाडी अथवा मिळेल त्या वाहनाने हजारो लोक कारखान्यावर जमा झाले. सभासद शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. दादा पाटील औताडे–शंकरराव काळे यांच्या महेनतीचे चीज झाले होते. अशिया खंडातील दुसऱ्या साखर कारखान्याच्या उभारणीसाठी डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई, अर्थमंत्री जीवराज मेहता, महसूल व शेतकी मंत्री भाऊसाहेब हिरे, सहकार मंत्री एम.पी. पाटील, सिंचन खात्याचे मंत्री नाईक–निंबाळकर, बॉम्बे स्टेट को. ऑप बँकेचे चेअरमन सरैय्या आणि वामनराव वर्दे यांची मोलाची मदत झाली. या सगळ्यांचा शंकरराव काळे यांनी कृतज्ञापूर्वक उल्लेख केला आणि भविष्यात हा साखर कारखाना शेतकऱ्यांच्या हिताला सर्वाधिक प्राधान्य देईल याची ग्वाही दिली.

'कोसाका' च्या पहिल्या गळीत हंगामात ५२,२३४ मे. टनांचे गळीत झाले आणि त्यापासून ५२,३२५ साखर पोत्यांचे उत्पादन झाले. शेतकऱ्यांना ऊसास प्रति टनी ३७.२५ पैसे भाव देण्यात आला. ८५ लाख रूपये खर्च करून उभारण्यात आलेल्या 'कोसाका' ची ऊस गाळण्याची क्षमता प्रतिदिन ८०० मे. टन एवढी होती. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात सुरूवातीला म्हणजे पहिल्या गळीत हंगामाच्या वेळी ५९ गावे होती.[३०] आज चार दशकानंतर ही संख्या सव्वा दोनशे गावांच्यावर गेली आहे. ऊसाचे काय करायचे, कोण आपला ऊस घेणार हे शेतकऱ्यांचे प्रश्न संपुष्टात आले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची वणवण थांबली. सुरूवातीला शेकडो, मग हजारोंत आणि नंतर लाखात शेतकऱ्यांना ऊसाचा मोबादला मिळू लागला. 'कोसाका' प्रगती करणार हे दुसऱ्याच गळीत हंगामात स्पष्ट झाले. आदल्या वर्षापेक्षा तिप्पट ऊसाचे गाळप होऊन १,७०,२४० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले. साखरेचा उताराही १०.०१ वरून ११.२९ पर्यंत चढला आणि शेतकऱ्यांना टनामागे चाळीस रूपये असा अंतिम भाव देण्यात आला. मग मात्र कारखान्याने उत्तरोत्तर प्रगतीच केली. ऊसाचे गाळप, उतारा, साखरेचे उत्पादन, दर टनी अंतिम भाव यांत भरीव वाढ होत गेली हे सोबतच्या तक्त्यावरून सहज लक्षात येते.

| गळीत हंगाम | ऊस गळीत (मे.टन) | साखर पोते क्विंटल | साखर उतारा टक्के | दर टनी अंतिम भाव रू. |
|---|---|---|---|---|
| १९५५-५६ | ५२,२३४ | ५२,३२५ | १०.०१ | ३७.२५ |
| १९६५-६६ | २,२४,२२८ | २,५७,००१ | ११.४६ | ६१.२५ |
| १९७५-७६ | ४,१३,२४४ | ४,५४,१८५ | १०.९९ | १२९.५० |
| १९८५-८६ | ३,९३,३५० | ४,७६,३५० | १२.११ | ३६२.०० |
| १९९४-९५ | ६,१९,३१५ | ६,४४,४४४ | १०.४१ | ६७०.०० |
| २००५-०६ | ५,८२,२५५ | ६,११,४२१ | १०.५० | १२००.०० |
| २०१२-१३ | ५,६४,९०१ | ६,१७,००० | १०.९७ | २७००.०० |

(वरील आकडेवारी कारखान्याच्या वार्षिक अहवालावरून १० वर्षांची घेतली आहे.[३१])

आज 'कोसाका'ची गाळप क्षमता रोज ४००० मे. टन एवढी आहे. एखादी व्यक्ती एवढ्या यशाने संतुष्ट झाली असती; पण शंकरराव स्वतःही बसत नाहीत आणि आपल्या सहकाऱ्यांनाही स्वस्थ बसू देत नाहीत. कारखाना आणखीन आधुनिक कसा करता येईल. परिसराच्या विकासासाठी कुठल्या योजना राबवता येतील या बाबतीत त्यांचा नेहमी विचार-विनिमय सुरू असतो. कारण कुठलीही सहकारी संस्था चालवणे हीच मोठी कसोटी असते. अशा प्रसंगी नेतृत्वाची कसोटी लागते. हितसंबंधी गट

कृतीशील कार्यक्रम उधळून लावण्यासाठी उत्सुक असतातच. अशा वेळी नेतृत्वाची आपल्या ध्येयावर अढळ श्रद्धा तर असावीच लागते. पण सहकारी संस्था टिकल्या पाहिजेत, वाढल्या पाहिजेत, स्वयंपूर्णतेच्या दिशेने त्यांनी वाटचाल केली पाहिजे यांकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष द्यावे लागते. काळानुरूप योग्य असणारे बदलही स्वीकारले पाहिजेत सभासदांच्या अपेक्षापूर्तीसाठी अन्य समाज घटकांना ठेच लागणार नाही याची काळजी घेणेही आवश्यक असते. शंकररावांनी ही सर्व तत्वे सांभाळत कारखाना वेळोवेळी अद्ययावत केला. जुन्या मशिनरी बदलल्या, नव्या बसवल्या. हे सगळे घडवून आणताना त्यांनी कारखान्याचा आणि पर्यायाने सभासदांना फायदा हेच उद्दीष्ट ठेवले. नेतृत्व द्रष्टे असले की त्याचा फायदा सहकार चळवळीला हमखास होतो. 'कोसाका' समुहाला सुरूवातीपासून व्यापक दृष्टीकोन असलेले चेअरमन लाभले. त्यामुळे 'कोसाका' ची भरभराट झपाट्याने झाली. 'कोसाका' च्या चार दशकांच्या वाटचालीत खालील व्यक्ती चेअरमन झाल्या.

**दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर कारखान्याचे मा. चेअरमन**

| कालावधी | नाव |
|---|---|
| १९५३ ते १९५८ | मा. श्री. वा. पु. वर्दे, बी. कॉम |
| १९५८ ते १९५९ | मा. कॅप्टन भा. चिं गरूड (१९ डिसेंबर ते २५ सप्टेंबर) |
| १९५८ ते १९५८ | मा. श्री. मु. रा. लोणारी (२६ सप्टेंबर ते २३ नोव्हेंबर) |
| १९५९ ते १९६० | मा. श्री. शं. गे. कोल्हे, बी. एस्सी (ॲग्री) |
| १९६० ते १९६२ | मा. श्री. शं. दे. काळे, बी. एस्सी, बी.ई. (सिव्हील) |
| १९६२ ते १९६३ | मा. कॅप्टन भा. चिं. गरूड |
| १९६३ ते १९७७ | मा. श्री. शं. दे. काळे, बी. एस्सी, बी.ई. (सिव्हील) |
| १९७८ ते १९७९ | मा. श्री. स. य. उर्फ म्हाळू पा. आढाव |
| १९७९ ते १९८४ | मा. श्री. पं. गं. जाधव |
| १९८४ ते १९९४ | मा. खासदार श्री. शं. दे. काळे, बी. एस्सी, बी.ई. (सिव्हील) |
| १९९४ ते १९९५ | मा. श्री. अ. शं. काळे, बी. ए. एम.बी. ए. |
| १९९५ ते १९९६ | मा. श्री. भा. रे. घुमरे |
| १९९६ ते १९९९ | मा. श्री. अ. शं. काळे, बी. ए. एम.बी. ए. |
| १९९९ ते २००४ | मा. खासदार श्री. शं. दे. काळे, बी. एस्सी, बी.ई. (सिव्हील) |
| २००४ ते २०१० | मा. आमदार श्री. अ. शं. काळे, बी. ए. एम.बी. ए. |
| २०१० ते २०१४ | मा. आमदार श्री. अ. शं. काळे, बी. ए. एम.बी. ए. |

(वरील माहिती कारखान्याच्या शेतकरी कार्यालयातील फलकावरून घेतली आहे.[३२])

यापैकी प्रत्येक व्यक्तीचे काही ना काही वैशिष्टय होते. वामनराव वर्दे यांनी कारखान्याला आर्थिक शिस्त लावली तर कॅप्टन भा. चिं. गरूड यांनी एकूणच कामाची शिस्त लावली. शंकरराव काळेंचा भर व्यापक विकासावर होता. कारखाना परिसर विकासासाठी ते नवीन–नवीन कल्पना राबवत होते आणि त्याचे अपेक्षित परिणाम दिसू लागले. कारखान्यामुळे शेकडो सुशिक्षतांना आणि तंत्राज्ञांना कायमचे काम मिळाले. स्थानिक बरोजगारी बऱ्याच अंशी कमी झाली. परिसरातले उद्योग वाढले. बैलगाड्या, मालट्रक, ट्रॅक्टर यांचेसाठी डिझेल, पेट्रोल, टायर, स्पेअर पार्टस्, लोखंडी धावा, आख, चाकजोड, धुऱ्या इत्यादी साधनसामुग्रीसाठी हमखास गिऱ्हाईक मिळाले. संबंधित कारागिरांचा उदिम–उद्योग चालू लागला. किराणा, वाहने यांची मागणी वाढली. जिथे दातावर वाजवयला पैसा नव्हता. तिथे लोकांच्या हातात पैसा खेळू लागला. गौतमनगर एकदम भरभराटीला आले.

‘कोसाका’ ने सुरेगांव परिसरात रस्ते आणले. रस्ते झाल्यावर विकासाचे रथचक्र आपोआपच गौतमनगरपर्यंत विना अडथळा येऊन पोहचले. ‘कोसाका’ ने सर्वप्रथम परिसरातील रस्ते बांधणीला प्राधान्य दिले. ‘कोसाका’ चे कार्यक्षेत्र प्रामुख्याने कोपरगाव, येवला, सिन्नर, निफाड तालुक्यात आहे. ऊस क्षेत्रातील रस्ते कच्चे व जुने गाडी रस्ते असल्याने त्यांच्यात सुधारणा व दुरूस्ती कधीही झालेली नव्हती. या सगळ्यांचा परिणाम ऊस वाहतुकीवर पर्यायाने ‘कोसाका’ वर व्हायचा म्हणून शंकररावांनी आधी लक्ष घालून ठिकठिकाणचे रस्ते चांगले करून घेतले. पण त्यांचा याहीपेक्षा व्यापक दृष्टीकोन होता. कारखाना कार्यक्षेत्रातील पानंद रस्ते चांगले करावेत. त्याचा फायदा ऊस वाहतुकीला होईलच पण त्याचबरोबर त्या–त्या भागातील जनतेची फार मोठी सोय होईल हा विचार करून शंकरराव काळेंनी शासनाला एक प्रस्ताव दिला. साखर कारखान्यमार्फत शुगर केनसेस भरला जातो. हा केनसेस परत मिळाला तर रस्ते दुरूस्ती आणि बांधणी यासाठी खर्च करता येईल असा प्रस्ताव होता. हा प्रस्ताव संमत व्हावा यासाठी शंकरराव काळेंनी विशेष परिश्रम घेतले. त्यावेळचे बांधकाम मंत्री नामदार बाळासाहेब देसाई यांना ही कल्पना रूचली. त्यांनीही या प्रस्तावात लक्ष घालून शुगर केनसेस मधून कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील रस्ते दुरूस्तीसाठी अनुदान मंजूर केले. शंकररावांच्या एका निर्णयामुळे केवळ गौतमनगर, कोपरगाव तालुक्याचाच फायदा झाला असे नाही तर या निर्णयामुळे प्रत्येक साखर कारखाना परिसरातले रस्ते पक्के आणि कायमस्वरूपी झाले. या रस्त्यांवरून समृद्धी धावत आली.

## २.४ ऊस उत्पादन व गळीत –

### अ) ऊस गळीत व दर हेक्टरी सरासरी उत्पादन –

अहवाल सालात सन २०१२–२०१३ मध्ये कारखान्याने गळीत केलेल्या ऊसाच्या क्षेत्राची व त्यापासून आलेल्या टनेजची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशील | पीक प्रकार | ऊस क्षेत्र (हेक्टर) | आलेले उत्पन्न (मे. टन) | सरासरी (मे. टन/ हेक्टरी) |
|---|---|---|---|---|---|
| १. | सभासदांचा ऊस | अ) आडसाली | ३७० | ३३६७५ | ९१.०० |
| | | ब) पुर्व हंगामी | ८६४ | ६४४२३ | ७५.०० |
| | | क) सुरू | २०८ | ११५३२ | ५५.०० |
| | | ड) खोडवा | १६०५ | ८०५३० | ५०.०० |
| | | एकूण :– | ३०४७ | १९०१६० | ६२.०० |
| २. | कार्यक्षेत्रातील बिगर सभासदांचा ऊस | | ३९२२ | २२६७२४ | ५८.०० |
| ३ | कार्यक्षेत्राबाहेरील बिगर सभासदांचा व अन्य कारखान्यांचा ऊस | | २५५२ | १४८०१७ | ५८.०० |
| | **एकूण एकंदर (१+२+३)** | | **९५२१** | **५६४९०१** | **५९.००** |

(वार्षिक अहवाल, कोपरगाव सहकारी साखर कारखाना २०१२–१३[३३])

### ब) इतर विभागातील ऊस –

सन २०१२–२०१३ गळीत हंगामात कार्यक्षेत्राबाहेरील इतर विभागातून ऊस गळीतास मिळालेला आहे. त्याची जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशील | पीक प्रकार |
|---|---|---|
| १ | अहमदनगर | ६२,०४४ |
| २ | औरंगाबाद | ३१,९४४ |
| ३ | नाशिक | ४१,२९९ |
| ४ | जळगांव | ४,७३० |
| | **एकूण :–** | **१,४८,०१७** |

(वार्षिक अहवाल, २०१२–१३)

**क)  साखर शाळा –**

ऊस तोडणी मजूरांचे मुलांची शिक्षणाची सोय नजीकच्या गावातील जिल्हा परिषदेचे प्राथमिक शाळेमध्ये केलेली आहे.

**ड)  बायोकंपोष्ट खताचा पुरवठा –**

जमिनीची सुपिकता व उत्पादन क्षमता वाढविणेकरीता कंपोष्ट खताचा वापर करणे हा एक चांगला पर्याय आहे. कारखान्याने प्रेसमड, स्पेन्टवॉश व कंपोष्टींग जिवाणू यापासून चांगल्या प्रतीचे बायोकंपोष्ट खत तयार करून त्याचे सवलतीच्या दराने सभासदांना वाटप करण्यात आलेले आहे.

**इ)  ''अ'' वर्ग ऊस उत्पादक सभासदांसाठी ''नागरिक सुरक्षा विमा योजना'' –**

कारखान्याचे संचालक मंडळाने 'अ' वर्ग ऊस उत्पादक सभासदांसाठी ''नागरिक सुरक्षा अपघाती विमा'' उतरविण्याचे धोरण घेतलेले आहे. त्यानुसार मे.ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी, संगमनेर यांचेमार्फत दि.३–७–२०१२ ते २–७–२०१३ या वर्षासाठी विमा उतरविण्यास पात्र ८६३५ सभासदांचा अपघाती विमा उतरविलेला असून रक्कम रु. १००/– प्रत्येकी याप्रमाणे एकूण रु. ८,६३,५००/– एवढी रक्कम कारखान्याने प्रिमियम म्हणून इन्शुरन्स कंपनीकडे भरलेली आहे.

सदरचे कालावधीत काही अपघातग्रस्त झालेल्या सभासदांना औषधोपचारासाठी व मयत झाल्याने त्यांचे वारसास क्लेम मंजूर होवून रक्कम मिळालेली आहे.[३४]

**२.५  उपपदार्थ निर्मिती –**

**आसवनी विभाग**

अहवाल सालात म्हणजे दिनांक १–४–२०१२ ते दिनांक ३१–३–२०१३ या कालावधीमध्ये झालेले उत्पादन, विक्री यांचा आढावा पुढीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | उत्पादनाचा प्रकार | झालेले उत्पादन (लक्ष लिटर्स) | विक्री (लक्ष लिटर्स) |
|---|---|---|---|
| १ | रेक्टीफाईड स्पिरीट | ५८.९२ | ०.१७ |
| २ | देशीमद्य विभागाकडे वर्ग केलेले | –– | ४०.१८ |
| ३ | स्पिरीट | १६.३५ | १६.३५ |
| ४ | स्पेशल डिनेचर्ड स्पिरीट | –– | –– |
| ५ | ऑर्डिनरी डिनेचर्ड स्पिरीट | ०.०४ | ०.०४ |
| ६ | फ्युजेल ऑईल | ४९५.९९ | ४९४.०१ |

(वार्षिक अहवाल, कोपरगाव सहकारी साखर कारखाना २०१२–१३[३५])

ऑल इंडिया डिस्टिलर्स असोसिएशन, नवी दिल्ली व दि डिस्टिलर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या दोन्ही असोसिएशन्सचे बहुमोल मार्गदर्शन व सल्ला वेळोवेळी डिस्टिलरीस मिळत आहे. देशीमद्याची प्रत चांगली असल्याने बाजारात चांगल्यापैकी मागणी आहे. त्यामुळे एकुणात आसवनीचे कामकाज किफायतशीर आहे.

**बायोगॅस प्लँट –**

डिस्टिलरीने उभारणी केलेला बायोगॅस प्लॅन्ट पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत असून दररोज सुमारे १६००० ते १७००० घनमीटर गॅसची निर्मिती होत आहे. यामुळे इंधनात लक्षणीय बचत होत आहे.[३६]

**पतपुरवठा व हिशेब –**

**अ) अर्थव्यवस्था –**

कारखान्याच्या दैनंदिन खर्चासाठी लागणाऱ्या खेळत्या भांडवलाकामी दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अहमदनगर यांनी खालीलप्रमाणे कर्ज मंजूर केलेले आहे.

| अ. नं. | क्रेडिटचा प्रकार | मंजूर कर्ज मर्यादा (रूपये लाखात) सन २०१२–२०१३ | मुदत |
|---|---|---|---|
| **अ)** | **साखर विभाग** | | |
| | १) मालतारण कर्ज | १२,६००.०० | ३१–१०–२०१३ |
| | २) नजर गहाण कर्ज(स्टोअर / बारदान) | २००.०० | ३१–१०–२०१३ |
| **ब)** | **आसवनी विभाग** | | |
| | १) नजरगहाण कर्ज | १०००.०० | ३१–१०–२०१३ |

(वार्षिक अहवाल २०१२–१३)

वरील सर्व कर्ज मंजूरी मर्यादांचे व्यवहार नियमित आहेत. दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,अहमदनगर या बँकेने कारखान्याच्या गरजेनुसार लागणारा वित्तपुरवठा वक्तशीरपणे उपलब्ध केला आहे.[३७]

**ब)  वैधानिक लेखापरीक्षण –**

मे. कुलकर्णी ॲण्ड खानोलकर, चार्टर्ड अकौंटंटस् मुंबई यांचेकडून सन २०१२–१३ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण पूर्ण करण्यात आलेले असून संस्थेस ऑडिट वर्ग ''अ'' दिलेला आहे. या कामी मा. श्री. पी. एम. परूळेकर, सनदी लेखापाल, मुंबई यांनी व त्यांच्या सहाय्यकांनी कारखान्यास वेळोवेळी बहूमोल मार्गदर्शन व सहकार्य केलेले आहे.

**क)  अंतर्गत हिशोब तपासणी, आयकर, विक्रीकर व ऊस खरेदी कर आकारणी –**

कारखान्याच्या आयकराची आकारणी सन २००९–२०१० अखेर पूर्ण झाली असून याकामी कारखान्याचे आयकर विषयक सल्लागार मे. कुलकर्णी ॲण्ड खानोलकर, चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई यांनी काम पाहिले आहे. आयकर कायद्यातील तरतुदीनुसार सर्व हिशोब चार्टर्ड अकौंटंटस् यांच्याकडून तपासून घेऊन हिशोबपत्रके वेळीच आयकर खात्याकडे दाखल करावयाची असतात. त्याचप्रमाणे कारखान्याचा वाढता व्यवहार हा चोखरितीने व्हावा, सर्व हिशोब तपासले जावेत, म्हणून चार्टर्ड अकौंटटस्च्या प्रतिनिधींनी कारखान्याचे आयकर विषयक कामात व हिशोब व्यवस्थित ठेवणेकामी बहूमोल मार्गदर्शन केले.

ऊस खरेदी कराची आकारणी सन २००८–२००९ अखेर खात्यातर्फे एकतर्फी पूर्ण झालेली आहे. मा. हायकोर्ट औरंगाबाद खंडपीठात कारखान्याने ऊस खरेदी कर दराबाबत रिटपिटीशन दाखल केलेला असून, त्यावर कोर्ट स्थगिती असलेमुळे झालेली ऊस खरेदी कर आकारणी कारखान्यास मान्य नाही. त्याविरुद्ध कारखान्याने मा. असि. कमिशनर, नाशिक येथे अपिल दाखल केलेले आहे. व्हॅट कराचे रिटर्न सन २०११–२०१२ व्हॅट टॅक्स सल्लागारामार्फत दाखल केलेले आहे. कारखान्याचे व्हॅट / विक्रीकर विषयक सल्लागार म्हणून मे. के. डी. भंडारी ही फर्म काम पहाते.

**ड )  आयकराबाबत माहिती –**

आयकर खात्याने कारखान्याचे सन २००९–१० चे ॲसेसमेंट पूर्ण केलेले असून कारखान्याने मा. केंद्र शासनाने जाहिर केलेल्या एसएमपी ऊस दरापेक्षा जादा दिलेली ऊस किंमत तसेच सभासदांना सवलतीचे दरात दिलेली साखरेची बाजारभावापेक्षा कमी दरातील फरक रक्कम, खोडकी वेचनी खर्च इ. बाबी उत्पन्नात समाविष्ट करून आयकर आकारणी केलेली आहे. त्या विरूद्ध सन १९९१–९२ पासून वेळोवेळी आयकर सल्लागार श्री. परूळेकर साहेब, चार्टर्ड अकौंटंट मे. कुलकर्णी ॲण्ड खानोलकर, मुंबई

यांचे मार्फत अपिले दाखल केलेली आहेत. सहकारी साखर कारखान्यांकडे आयकर खात्याने कोट्यावधी रूपयांची आयकर मागणी केलेली असून त्याबाबत मा. सुप्रीम कोर्टातील अपिलासंबंधी कामकाज साखर संघामार्फत चालू आहे.

**जलसंवर्धन –**

**१) के.टी. वेअर व दगडी बंधारे –**

कार्यक्षेत्रात ऊसक्षेत्र वाढविणेसाठी कारखान्याने गोदावरी नदीवर डाऊच खुर्द, माहेगांव देशमुख व वडगांव कानळद तसेच सडे (संयुक्त बंधारा) येथे के.टी. वेअर बांधलेले आहेत. कार्यक्षेत्रातील छोट्या/ मोठ्या ओढे नाल्यांवर कारखान्याने गौतम दगडी साठवण बंधारे, पाझर तलाव व माती बंधारे बांधलेले आहेत. त्यांची साठवण क्षमता खालीलप्रमाणे आहे. [३८]

| अ. नं. | नांव | साठवण क्षमता द. ल. घ. फु. | ओलाताखाली येणारे क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| १) | वडगांव कानळद | १७३.४१ | १३०४ |
| २) | माहेगांव देशमुख | २४२.४२ | १६६१ |
| ३) | डाऊच खुर्द | ८४.५९ | १०५८ |
| ४) | सडे | २७८.९५ | १८६५ |

(वार्षिक अहवाल २०१२–१३)

सदर बंधाऱ्यांची देखभाल, दुरूस्ती व पाणी अडविण्याचे काम कारखान्यामार्फत करण्यात येते. त्याचा लाभ परिसरातील सर्व शेतकरी व सभासद यांना होत आहे.

**२) इरिगेशन चाऱ्या दुरूस्ती –**

सभासद व शेतकरी यांचे विनंतीनुसार कार्यक्षेत्रातील इरिगेशन चाऱ्या दुरूस्तीची कामे जेसीबी व पोकलेन मशिनने करण्यात येतात.

**ऊस विकास कार्यक्रम :–**

कार्यक्षेत्रातील ऊसाचे प्रति एकरी ऊस व साखर उत्पादन वाढविणेकामी तसेच जमिनीची सुपिकता व उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी अहवाल सालात खालीलप्रमाणे ऊस विकास योजना राबविण्यात आल्या आहेत.

**१)　जमीन सपाटीकरण –**

कारखान्याकडे सध्या एक चेन टाईप ट्रॅक्टर (बुलडोझर) असून, सदरचा बुलडोझर कारखान्याचे कार्यक्षेत्रातील सभासद, लाभधारकांना चढउताराच्या जमीनीचे सपाटीकरण करण्यासाठी सवलतीच्या दरात व उधारीने उपलब्ध करून देण्यात येतो. सदरच्या योजनेमुळे कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त जमीनी ऊस लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**२)　त्रिस्तरीय बेणेमळा कार्यक्रम –**

सभासदांना ऊस लागवडीसाठी चांगल्या प्रतिचे शुद्ध व निरोगी ऊस बेणे उपलब्ध करून देण्याचा कारखान्याचा प्रयत्न असतो. त्रिस्तरीय बेणे मळा कार्यक्रमांतर्गत मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव व वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, मांजरी बु. ।। येथून को – ८६०३२, कोएम – ०२६५ व व्ही एस आय ४३४ या शिफारशीत ऊस जातीचे बेणे आणून कारखाना प्रक्षेत्रावर त्याची वाढ करून सवलतीच्या दरात सभासदांना वाटप करण्यात आलेले आहे. तसेच गरजू सभासदांना कार्यक्षेत्रातील सभासदांचे ऊस बेणे प्लॉट निवड करून ऊस बेणे उधारीने कारखाना हमीवर वाटप करण्यात आलेले आहे.

**३)　उधारीने रासायनिक खतांचा पुरवठा –**

कारखान्याने सभासद शेतकऱ्यांना त्यांचे ऊस नोंदीच्या प्रमाणात उधारीने रासायनिक खतांचा पुरवठा अहवाल सालात केलेला आहे. त्याकरीता कारखान्याने एकूण रक्कम रू. १५८.०० लाख भांडवली गुंतवणूक केलेली आहे.

**४)　ठिबक जलसिंचन योजना –**

ऊस पिकामध्ये उपलब्ध पाण्याचा काटकसरीने योग्य वापर करून एकरी ऊस व साखर उत्पादन वाढविणेकरीता ठिबक जलसिंचन कार्यक्रम कार्यक्षेत्रामध्ये राबविण्यात आला आहे. ठिबक जलसिंचन योजनेतील समाविष्ट ऊस उत्पादक सभासदांना कारखान्यामार्फत कारखाना हमीवर राष्ट्रीयकृत बँकेचे वैयक्तिक स्वरूपाचे कर्ज, ठिबक संच खरेदी करणे कामी उपलब्ध करून देण्यात आले व ठिबक जलसिंचन योजना राबविण्यात आलेली आहे.

**५)　तणनाशकांचा पुरवठा –**

ऊस लागवडीमध्ये तणामुळे ऊस वाढीवर परिणाम होतो. तसेच मजूरांअभावी तण काढण्याचे काम वेळेवर होत नाही. त्यामुळे तणनाशकांचा वापर करणे अपरिहार्य असते. म्हणून तणनाशकांचा उधारीने पुरवठा केला जातो.

**६) सूक्ष्म अन्न द्रव्यांचा पुरवठा –**

सूक्ष्म मूलद्रव्यांचा (मल्टीमायक्रो न्युट्रीयंट) अनुदानावर पुरवठा करण्यात येतो.

**७) इरिगेशन पाणीपट्टी रक्कम भरणा –**

कारखाना कार्यक्षेत्रातील गोदावरी उजवा व डावा तट कालव्यावरील सभासदांचे बारमाही ब्लॉक क्षेत्र अबाधित रहावे व पाट पाण्यावरील हक्क कायम राहावा यासाठी सभासदांचे मागणीनुसार ऊस नोंदीच्याप्रमाणात बारमाही ऊस ब्लॉकची पाणीपट्टी रकमेचा आगावू भरणा इरिगेशन विभागाकडे सभासदांच्या वतीने करण्यात आला. त्यामुळे कार्यक्षेत्रात ऊस क्षेत्र वाढीस मदत झालेली आहे.

**८) हिरवळीचे खतांचा पुरवठा –**

कार्यक्षेत्रातील जमीनीचा पोत व मगदूर सुधारावा व ऊसाचे उत्पादन वाढावे म्हणून हिरवळीचे खत तयार करणेसाठी ऊस लागवडीकरीता ५०% अनुदानावर ताग व धैंचा बियाणांचा सभासदांचे मागणीनुसार उधारीने पुरवठा करण्यात येतो.

**९) वृक्षारोपण –**

कारखाना कार्यस्थळावरील साखर कारखाना, डिस्टिलरी विभाग व भगवान विष्णू मंदिर परिसरात वृक्षारोपन व बागबगीचा लागवड कार्यक्रम राबविला आहे.

**१०) प्रदूषण नियंत्रण उपाय योजना –**

कारखान्याने साखर उत्पादना व्यतिरिक्त स्पिरीट व मद्यार्क उत्पादन यशस्वीपणे चालविलेले आहेत. या प्रकल्पातून सांडपाणी, दूषित पाणी, राख, दूषित हवा इत्यादिमुळे कारखाना कार्यस्थळावर व आजूबाजूचे परिसरात प्रदूषण होऊ नये व निसर्गाचे संतूलन कायम रहावे त्यासाठी कारखान्याने वेगवेगळ्या विभागात वेगवेगळ्या ठिकाणी प्रदूषण प्रतिबंध उपाययोजना म्हणजे उपकरणे व यंत्रसामुग्री बसविली आहे.

याशिवाय डिस्टिलरी विभागातून जे दूषित व टाकाऊ पदार्थ व घटक बाहेर पडतात त्याचा इंधन म्हणून वापर करून बॉयलरसाठी जळाऊ वायू (बायोगॅस) निर्मितीचा प्रकल्प यशस्वीपणे चालविला आहे. साखर विभागात बॉयलरमधून निघणारी राख हवेत उडून इतरत्र जाऊ नये म्हणून जरूर ती उपाययोजना केलेली आहे.

**११) नागरी कामे –**

**अ) कार्यक्षेत्रातील रस्ते दुरूस्ती –**

ऊस वाहतूक सुलभरितीने होणेसाठी कारखाना कार्यक्षेत्रातील आवश्यक त्या रस्त्यावर मुरूम टाकणे, पाईप बसविणे व बुलडोझरने खड्डे व चाकोऱ्या बुजविणे इत्यादी कामे करण्यात येतात. [३९]

**ब) इमारती –**

बॉयलरसाठी आर.सी.सी. चिमणी व ॲशपीटचे काम, नवीन ट्रक केन यार्डमध्ये गॅरेज शेड, रेस्ट रूम व टॉयलेट ब्लॉक, पाण्याची टाकी, पाईप लाईन, शरद पवार नागरी पतसंस्था ऑफिस एक्सटेंशन, मंजूर गट ऑफिसकरीता तार कम्पौंड ही बांधकामे करण्यात आली. नवीन एस.टी. स्टॅण्ड व रिंगडॅम नं. ३ दुरूस्तीची कामे चालू आहेत. तसेच फॅक्टरी इमारत फौंडेशन, गोडावून, टँक व चॅनल्स्, कॉलनी, ऑफिस इमारतींचे रिपेअर व मेन्टेनन्सची कामे करण्यात आली.

**क) शैक्षणिक सोयी –**

कारखाना कार्यस्थळावरील प्राथमिक, माध्यमिक व कार्यक्षेत्रातील माध्यमिक शाळांसाठी कारखान्याने इमारती बांधून दिलेल्या आहेत. सदर इमारतींचे दुरूस्ती व देखभाल इ. कामे कारखान्यामार्फत करण्यात येतात.

**इतर कार्यक्रम –**

**अ) कृत्रिम गो–पैदास केंद्र –**

कारखान्याच्या सभासदांच्या पशुधनास वेळेवर कृत्रिमरेतन व औषधोपचार मिळावेत त्याकरिता कारखान्याने स्वयंरोजगार योजने अंतर्गत कारखाना कार्यक्षेत्रात ६ पशुउपचार केंद्रे सुरू केलेली आहेत. तसेच मुख्यालयावर एक पशुचिकित्सालय कार्यरत आहे. कारखान्याने गौतमनगर मुख्यालय केंद्राशिवाय १) सोमठाणे २) चास(नळी) ३) पाथरे ४) जेऊरकुंभारी ५) धामोरी व ६) मढी बु. या केंद्रामार्फत कृत्रिम रेतन/औषधोपचार व लसीकरणाचे काम कार्यरत आहे. या केंद्रांचा कारखान्याचे सभासदांच्या जनावरांना चांगला लाभ होत आहे.

**ब) अग्निशामक –**

कारखान्याकडे अद्ययावत अग्निशामक गाडी ठेवण्यात आली आहे. कारखान्याच्या परिसरात अगर अन्य ठिकाणी आग लागल्याची सूचना मिळताच

अग्निशामक गाडी त्वरीत आगीच्या ठिकाणी आग विझविण्यासाठी पाठविली जाते. त्यामुळे कारखान्याचे परिसरात फार मोठी सोय झालेली आहे.

**क) सांस्कृतिक मंडळ व कामगार कल्याण केंद्र –**

कारखाना कार्यस्थळावर सांस्कृतिक मंडळातर्फे श्री गणेशोत्सव, श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती, डॉ.बाबासाहेब आंबडेकर जयंती, श्री. सावता महाराज, श्री.नामदेव महाराज पुण्यतिथी आदी उत्सव साजरे करण्यात येतात.

कारखान्याचे व्यवस्थापन आणि कामगारांची प्रातिनिधीक मान्यता प्राप्त कामगार युनियन कोपरगांव तालुका साखर कामगार सभा या उभयतांमध्ये सलोख्याचे संबंध आहेत. एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण करून कारखान्याचे कामकाज कार्यक्षमतेने चालविण्याकडे सदरील प्रातिनिधिक युनियनकडून प्रयत्न केला जातो. तसेच कारखाना साईटवर वाचनालय सुरू करण्यात आलेले आहे. वाचनालयातील वर्तमानपत्र व पुस्तकांचा लाभ कामगार व त्यांचे मुलांना होत आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्र, मुंबई यांच्यामार्फत कारखाना कार्यस्थळावर कामगार कल्याण केंद्र सुरळीतपणे चालू आहे. कामगार व त्यांची मुले व त्यांच्या कुटुंबियांचे सामाजिक, कौटुंबिक व बौध्दिक जीवनमान उंचविणे तसेच त्यांच्या कला व क्रिडा गुणांची वाढ व्हावी व त्यास चालना मिळावी हाच कामगार कल्याण केंद्राच्या स्थापनेमागचा उद्देश आहे. कारखाना व्यवस्थापन व कामगार यांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत. कारखाना कामगारांना कुटुंबाचा घटक समजून त्यांचेसाठी आणि परिसरातील ग्रामीण जनतेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवित आहे. कामगार कल्याण फंडाचे मेम्बर असलेल्या कामगारांच्या मुलांना त्यांचे गुणवत्तेनुसार कामगार कल्याण मंडळामार्फत शिष्यवृत्ती मिळवून दिलेली आहे.

ऊस उत्पादक सभासदांकडून जमविलेल्या निधीतून व कारखाना निधीतून परिसरात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आरोग्य विषयक सुविधा निर्माण करून ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासाचा कारखाना केंद्रबिंदू राहिला आहे.

**ड) वैद्यकीय व्यवस्था –**

कारखाना कार्यस्थळावर सर्व सोयींनीयुक्त असा दवाखाना आहे. कारखान्याचे सभासद, परिसरातील इतर शेतकरी व इतर रूग्ण तसेच कारखान्याचे कर्मचारी व आसपासचे रहीवाशी व त्यांचे कुटुंबीय यांना त्याचा फायदा होत आहे.

रूग्णांना दुसऱ्या दवाखान्यामध्ये पुढील उपचाराकरिता पाठवावयाचे झाल्यास रूग्ण वाहिकेची सोय केलेली आहे.

**इ) शैक्षणिक सहभाग –**

कारखान्याने सुरवातीपासून कार्यक्षेत्रात ठिकठिकाणी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून रयत शिक्षण संस्था व इतर शैक्षणिक संस्थांच्या साहाय्याने माध्यमिक शाळा व महाविद्यालये चालविण्यास मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य केलेले आहे. त्यामुळे कारखान्याचे कार्यक्षेत्रातील परिसरात रहिवाशांच्या मुलांची चांगल्या तऱ्हेने शैक्षणिक सोय झालेली आहे.

**संलग्न संस्था –**

**अ) गौतम सहकारी बँक –**

ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, छोटे व्यावसायिक बंधू, कर्मचारी वर्ग, भूमिहीन इत्यादी सर्व थरातील लोकांना स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी व प्रापंचिक गरजा भागविण्यासाठी आर्थिक सहाय्य करता यावे म्हणून कारखाना कार्यस्थळावर गौतम सहकारी बँक लि., ही बँक काम करीत असून बँकेची प्रगती होत आहे. कारखान्याचे कार्यक्षेत्रातील सभासदांच्या व सर्वसामान्य जनतेच्या जास्तीत जास्त आर्थिक गरजा भागविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. कारखान्याचे ऊसाची वाहतुक चांगल्या तऱ्हेने व्हावी म्हणून गौतम सहकारी बँकेमार्फत कारखान्याचे उत्पादक सभासदांना ट्रक घेण्यासाठी सुलभ हप्त्याने कर्ज उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. तसेच सुशिक्षित बेकारांनासुध्दा स्वयंरोजगारासाठी कर्ज दिले जात आहे.

**ब) गोदावरी खोरे व गौतम केन ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि., –**

कारखान्याचे उत्पादक सभासद व इतर ऊस पुरविणारे शेतकरी यांच्या संमतीने ऊस तोडणी व वाहतुकीचे काम गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि., गौतमनगर, व गौतम केन ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि. गौतमनगर यांनी चांगल्याप्रकारे केलेले आहे.[४०] गळीत हंगामात ऊसाची तोडणी व वाहतूक नियमितपणे करून कारखान्यास पुरेसा व ताज्या ऊसाचा पुरवठा केला आणि कारखान्याचा गळीत हंगाम सुरळीतपणे चालविण्यासाठी मोलाची कामगिरी केली. याशिवाय कारखान्यास गळीत हंगामात नियमितपणे ऊसाचा पुरवठा व्हावा म्हणून ऊसाची तोडणी करणारे मजूर व वाहतूक करणारे गाडीवान यांनी हंगामात केलेल्या कामाच्या प्रमाणात हंगाम अखेरीस बक्षीसे देण्यात येतात. त्यांचे झोपड्यांचे अपघाती जळीत झाल्यास मदत व मजुरांच्या

आजारपणात वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येते. मजुरांचे बैल दुखावले अगर मरण पावल्यास त्यांना काही प्रमाणात नुकसान भरपाई देण्यात येते. साथीच्या रोगाच्या निर्मुलनासाठी आवश्यक  ती लस विनामूल्य टोचून देण्याची व्यवस्था करण्यात येते. थोडक्यात ऊस तोडणी वाहतूक मजुरांच्या समस्या सहानुभुतीपूर्वक सोडविण्यासाठी कारखाना सदैव प्रयत्नशिल असतो. कोसाका उद्योग समुहात औद्योगिक शांतता कायम राखण्याचे दृष्टीने नेहमीच सहकार्याचे धोरण ठेवलेले आहे. याचे श्रेय व्यवस्थापनाबरोबरच कामगारांच्या समंजस नेतृत्वाला आहे.

**२.६ संलग्न उद्योग –**

ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करायाची तर सहकारी साखर कारखानदारीचे जाळे मजबूत करायला हवे असे म्हटले जाते. याचे कारण उजाड माळराणावर जेव्हा एखादा सहकारी साखर कारखाना सुरू होतो तेव्हा त्या परिसराच्या विकासाची एक प्रक्रिया सुरू होत असते. या प्रक्रियेत सर्वप्रथम बदलते ती शेती. शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आत्मा. पण ती निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असल्याने तिला सहजासहजी स्थिरता प्राप्त होत नाही. परंतु एक सहकारी साखर कारखाना सुरू होतो तेव्हा त्याच्या कार्यकक्षेतील शेतीला एक नवी झळाळी प्राप्त होते. कारण कारखान्यामुळे एका ठराविक ऊस उत्पादनाला कायमची मागणी राहते. दरवर्षी आपला ऊस हमखास विकला जाणार आहे, आणि त्यातून किमान काही उत्पन्न मिळणार आहे याची शाश्वती शेतकऱ्याला येत असते.

ही शाश्वती येणे शेतीच्या दृष्टीने फार मोलाची गोष्ट असते. कारखान्यामुळे परिसरातील शेतकरी एका पातळीवर स्थिरावतो. या स्थिरावण्यातून त्याच्या विकासाला चालना मिळते. त्याच्यातल्या उद्योजकीय कौशल्याला धुमारे फुटतात. आणखी काय–काय करता येईल याचा तो विचार करायला लागतो. आपले आणि आपल्या कुटुंबाचे जीवन अधिक सुखकर कसे करता येईल हा विचार त्याला कार्यप्रवृत्त करतो. शेतकऱ्यांच्या या भावनेला कारखान्याने सकारात्मक प्रतिसाद दिला तर परिसराचा अक्षरशः कायापालट होऊ शकतो. विकासाचा सूर्य कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उगवण्याची शक्यता तयार होते. कोपरगाव सहकारी साखर कारखान्याने नेमके  हेच केले आहे.

कारखान्यात ऊसापासून साखर तयार करून थांबले नाहीत. मळीपासून स्पिरिट, बायोगॅस, कम्पोस्ट खत व कागद करण्याचा धडाका त्यांनी लावला. दुसरीकडे दूध डेअरी, कुक्कुट पालन, पशुखाद्य कारखाना अशा अनेक शेती पुरक व्यवसायांना

चालना दिली. आणि तिसरीकडे कारखाना आणि अन्य उद्योग यांच्यावर व्यापाऱ्यांचा व व्यावसायिकांचा ताबा राहू नये म्हणून गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट सारखी शेतकऱ्यांच्या मालकीचीच कंपनी काढली.

शंकरराव काळे यांनी कारखान्याच्या उभारणीनंतर असे अनेक उप्रकम चालवले. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांपलीकडील परिसरातले लोकही कारखान्याला व कोसाका उद्योग समुहालाही जोडले गेले. श्री. काळेंच्या या दृष्टिकोनामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच परिसरातले इतर घटकही एकूण विकास प्रक्रियेत सामावून घेतले गेले. कारखान्याच्या उप–उत्पादनाच्या उद्योगांद्वारे कारखाना परिसरातल्या लोकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला. ग्रामीण भागात शेती बाह्य असा रोजगार उपलब्ध होणे ही बाब अत्यंत मोठी आहे.

साखर कारखाना हा परिसराच्या विकासाची सुरूवात असते. कारखान्याच्या बरोबरीने लोकोपयोगी अन्य उद्योग सुरू केल्यामुळे ही विकासाची प्रक्रिया वेग घेते, विस्तारते, आपल्या कवेत अधिकाअधिक माणसांना घेते, त्यांच्यासह परिसराचा विकास घडवते. कुक्कुटपालन, गो पैदास, शेळी–मेंढीपालन हे व्यवसाय आपल्या शेतकी संस्कृतीत रूजलेले आहेत. त्यांना थोडासा हातभार लावला तर परिसरात अधिक पैसा निर्माण होऊ शकतो. शिवाय या व्यवसायातील उत्पादनांना परिसरात व शहारात मागणी असल्यामुळे बाहेरून पैसा मिळू शकतो. खेडी किंवा कारखान्याचे कार्यक्षेत्र स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने या उद्योगांचा वाटा मोठा असतो. या उद्योगांना लागणारे पशुखाद्य किंवा तत्स्म आवश्यक बाबी कारखान्याच्या परिसरातच उत्पादित केल्यामुळेही अन्य कुणाच्या मर्जीवर अवलंबून राहण्याची आवश्यकता उरत नाही.

कोपरगाव सहकारी साखर कारखाना आणि अन्य उद्योग यांनी परिसराच्या विकासाची क्षितिजे अशीच विस्तारली आहे.

**१ कारखान्याला आर्थिक पाठबळ देणारा आसवनी विभाग –**

शंकरराव काळे यांच्या पुढाकारातून उभ्या राहिलेल्या कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचा व्याप जसाजसा वाढत गेला तसतसे साखरेचे उत्पादन वाढू लागले आणि साखर उत्पादन प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या मळीसारख्या टाकाऊ पदार्थांचे करायचे काय हा प्रश्न उपस्थित झाला. उद्योगविषयक सरकारी नियम, टाकाऊ पदार्थामुळे निर्माण होणारा प्रदूषणाचा प्रश्न यांतून मार्ग काढण्याखेरीज पर्याय नव्हता. अशा पर्यायांचा विचार करताना एक व्यवहार्य मार्ग म्हणून स्पिरिट निर्मितीचे उद्दीष्ट प्रमुख मानून नवा प्रकल्प

उभारता येईल का असा पर्याय पुढे आला. याच दरम्यान कोसाका उद्योग समूहाला भेडसावत असलेला मळीचा प्रश्न कोसाका जवळच्या संजीवनी व गणेश या साखर कारखान्यांनाही भेडसावू लागला होता. या पार्श्वभूमीवर कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या मळीपासून रेक्टिफाईड स्पिरिट, स्पेशल डिनेचर्ड स्पिरिट, फ्युजेल ऑईल, ऑर्डिनरी डिनेचर्ड स्पिरिट अशी काही उप–उत्पादने काढून कारखाना आर्थिकदृष्ट्या अधिक भक्कम करता आला तर बघावे म्हणून कोसाका, संजीवनी व गणेश या तीनही कारखान्यांनी एकत्र येण्याचे ठरवले आणि १९७६ साली 'कोसंग' (कोपरगाव–संजीवनी–गणेश) 'को–ऑपरेटिव्ह डिस्टिलरी लिमिटेड' हा प्रकल्प उभा राहिला.[४१] तीनही कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या मळीचा एकत्रित उपयोग केला तर मोठ्या प्रमाणात स्पिरिटचे उत्पादन करता येईल आणि त्याचा फायदा तीनही कारखान्यांना होईल असा विचार या मागे होता. परंतु हा प्रयोग फार काळ टिकला नाही. कारण गणेश सहकारी साखर कारखान्याने या प्रकल्पातून अंग काढून घेतले. त्यामुळे उरले दोघेच. या दोघांनी मिळून स्पिरिटच्या उत्पादनास सुरूवात केली. तेव्हा या प्रकल्पाची उत्पादन क्षमता वर्षाला ७२ लाख लिटर होती. परंतु प्रत्यक्षात उत्पादन होत होते ते ४५ ते ५० लाख लिटर त्यापैकी ३० ते ३५ लाख लिटर स्पिरिटची विक्री होऊन दोन्ही कारखान्यांना ९५ ते सव्वा कोटी रूपयांपर्यंत उत्पन्न मिळत असे. पण जे १० ते १५ लाख लिटर स्पिरिट दरवर्षी शिल्लक राहायचे त्याचे काय करायचे, हा प्रश्न होता.

हा प्रकल्प अधिक फायद्यात आणायचा असेल तर या शिल्लक राहणाऱ्या स्पिरिटचा उपयोग आणखी काही नवी उत्पादने सुरू करण्याकरता केला पाहिजे म्हणून शंकरराव काळे यांनी शासनाकडे देशीदारुच्या निर्मितीसाठी परवानगी मागितली. ती १९७८–७९ साली मिळाली आणि लगेचच देशीमद्य निर्मितीचा प्रकल्प सुरू झाला. त्यावेळी या प्रकल्पाची उत्पादन क्षमता होती वार्षिक ५४ लाख लिटरची, आणि प्रत्यक्षात मद्यनिर्मिती होत होती ती १५ ते ३० लाख लिटरची. पण पुढे स्पिरिटचे उत्पादन क्षमतेपेक्षा जास्त होऊ लागल्याने मद्यनिर्मिती प्रकल्पांची क्षमता वाढवणे गरजेचे वाटू लागले. परंतु नेमक्या याच काळात म्हणजे १९८६ साली 'कोसंग' को –ऑपरेटिव्ह डिस्टिलरी लि. मधून संजीवनी कारखाना बाहेर पडला. तेव्हा शंकरराव काळे यांनी हिंमतीने हा प्रकल्प कोपरगाव सहकारी साखर कारखान्यातच विलिन करून घेत कारखान्याचाच एक विभाग म्हणून पुढे तो कार्यरत ठेवला.

कोळपेवाडी परिसरात उभारला गेलेला प्लँट हा विशेषत: स्पिरिट निर्मिती करत असे पण स्पिरिट निर्मितीची क्षमता वाढत गेल्यावर मद्यनिर्मिती प्रकल्प आकारला. पुढे बायोगॅस प्रकल्प आणि कंपोस्ट खत निर्मितीबाबतही या विभागाने बाजी मारली. त्यातून एकीकडे कारखान्यासाठी अत्यावश्यक उर्जानिर्मिती होऊ लागली व सवलतीच्या दरात मिळणाऱ्या खताचा उपयोग थेट स्थानिक शेतकऱ्यांना होऊ लागला.

बॅच टाईप फरमेन्टेशन प्रोसेसवर आधारित असलेला कोळपेवाडी परिसरातला डिस्टिलेशन प्लँट बडोद्याच्या मे. सवाले केमिकल्स प्रा. लि. या कंपनीमार्फत उभारला आहे. प्रतिदिन २४,००० लिटर इतकी क्षमता असलेल्या या प्लँटमध्ये स्पिरिट तयार करण्यापासून देशीदारुचे उत्पादन होऊन ते वेगवेगळ्या आकारांच्या बाटल्यांमध्ये पॅक होईपर्यंतच्या सर्व प्रक्रिया एकसाथ होतात.

स्पिरिट, बायोगॅस, कम्पोस्ट खत इ. उत्पादन काढणाऱ्या या विभागाला जो नफा होईल त्यातला बहुतांश भाग हा साखर कारखान्याकडे वर्ग केला जातो. गेल्या काही वर्षातील या विभागाला झालेला नफा लक्षात घेतला तर आजवर या विभागाने साखर कारखान्याला सुमारे ७५ ते १०० कोटी रूपयांचे थेट आर्थिक मदत केली आहे. केवळ गेल्या तीन वर्षात या विभागाला झालेल्या नफ्यामुळे साखर कारखान्याला सभासद शेतकऱ्यांना द्यावयाच्या ऊस दरात टनामागे सरसकट १०० रूपयांनी वाढ करता आलेली आहे.

या पार्श्वभूमीवर आसवनी प्रकल्पातून मिळणारा नफा वाढावा म्हणून या संपूर्ण प्रकल्पाचा गाभा ठरलेल्या स्पिरिट निर्मिती प्लँटची क्षमता वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आणि स्पिरिट उत्पादन क्षमता ७२ लाख लिटरवरून ९० लाख लिटरपर्यंत वाढवण्यात आली.

तर देशीमद्य निर्मितीची क्षमताही ५४ वरून १०८ लाख लिटर एवढी केली. त्यामुळे आज हा विभाग प्रति दिनी ३०,००० लिटर इतक्या क्षमतेने काम करत आहे. त्यासाठी प्रतिवर्षी सुमारे ३० ते ३५ हजार मे. टन मळीचा वापर करून ८० ते ८५ लाख लिटर्स एवढ्या स्पिरिटची निर्मिती करतो. या स्पिरिटपैकी ५५ ते ६० लाख लिटर्स स्पिरिट देशीमद्य निर्मितीसाठी वापरले जाते, तर उर्वरीत स्पिरिट वेगवेगळ्या रासायनिक उद्योगांना विकले जाते. या दोन्ही उत्पादनातून आसवनी विभागाला दरवर्षी सुमारे ८ ते ९ कोटी रूपयांचा नफा होतो. शिवाय हा विभाग राज्य शासनाला उत्पादन शुल्क, एक्साईज ड्यूटी, विक्रीकर अशा विविध स्वरूपात दरवर्षी ५० ते ५५ कोटी रूपयांचा महसूल देतो. 'भिंगरी' या उत्पादनाचे एकूण दर लक्षात घेतले तर असे लक्षात येईल की हा विभाग कारखाना, शेतकरी आणि शासन यांसाठी फायदेशीर ठरलेला आहे.

देशीमद्याच्या एकूण विक्रीतली बरीचशी रक्कम ही राज्य शासनाच्या तिजोरीत जमा होते. असे असताना देखील हा विभाग कारखान्याची आर्थिक स्थिती मजूबत करण्यासाठी उपयुक्त ठरला आहे. हे लक्षात घ्यावयाला हवे. खरे तर स्पिरिट प्लँटच्या संपूर्ण क्षमतेचा वापर होत नाही. तो केला तर नफ्यात आणखी वाढ होऊ शकते. तेव्हा यातून काही मार्ग काढला तर हा विभाग आणखी फायद्यात येऊ शकतो आणि त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकतो. हाच विचार महत्वाचा मानून या विभागाने शंकरराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली एक कोटी रूपयांची गुंतवणूक करून देशीमद्य निर्मिती प्रकल्पाचा विस्तार केला.

'भिंगरी' ला असलेली वाढती मागणी विचारात घेता सध्या क्षमतेपेक्षा अधिक उत्पादन करावे लागत आहे. देशीमद्य निर्मिती प्रकल्पाची क्षमता १०८ लाख लिटर असताना या प्रकल्पाद्वारे १९९७-९८ मध्ये १०९.७४ लाख लिटर्स मद्याची निर्मिती केली गेली.तर १९९९-२००० मध्ये १३४.९० लाख लिटर्स मद्यनिर्मिती झाली. याचा अर्थ १०१ ते १२५ टक्के इतक्या क्षमतेचा वापर करावा लागला. तरीही आज घडीला मागणी एवढा पुरवठा करता येत नाही. त्यामुळे वाढती मागणी आणि शिल्लक राहणाऱ्या स्पिरिटच्या विक्रीचा प्रश्न लक्षात घेता या प्रकल्पाचा विस्तार आवश्यक होता. म्हणूनच एक कोटीची गुंतवणूक केली गेली असून त्यामुळे भविष्यात शेतकऱ्यांना आणखी लाभ देणे शक्य होणार आहे. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात ४९५.९९ लाख लिटर्स मद्य निर्मिती झाली आहे.[४२]

**२. बायोगॅस प्लॅन्ट –**

स्पिरिट आणि मद्यनिर्मिती ही दोनच उत्पादने आसवनी विभाग करतो. याशिवाय या दोन्हींच्या जोडीला या विभागाने बायोगॅस प्लॅन्टची उभारणी करून साखर कारखान्याचा इंधन खर्च जवळपास ७० ते ८० टक्क्यांनी वाचवला आहे. त्यामुळे आसवनी विभागाची साखर कारखान्यासाठी ही एक फार मोठी उपलब्धी मानली पाहिजे. प्रदूषण नियंत्रणाच्या गरजेतून उभा करण्यात आलेला हा प्रकल्प आज कारखान्यासाठी काही प्रमाणात लागणाऱ्या इंधनाची गरज काही प्रमाणात पूर्ण करतो.

स्पिरिट तयार करताना सर्वच्या सर्व मळी उपयोगात येत नाही. सांडपाण्याच्या रूपाने काही मळी बाहेर पडते. त्याला स्पेंट वॉश म्हणतात. आज स्पिरिटच्या निर्मितीसाठी दरवर्षी ३० ते ३५ हजार मे. टन मळीचा वापर केला जातो. त्यापैकी २० ते २५,००० मे. टन मळी कोपरगाव कारखाना पुरवतो. बाकीची गरज इतर कारखान्यांकडून मळी घेऊन भागवली जाते. मळीचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने स्पिरिट प्रकल्पातून दररोज सुमारे ४ ते ५ लाख लिटर्स स्पेन्टवॉश (सांडपाणी)

बाहेर पडते. म्हणजे एक लिटर स्पिरिट तयार होताना सुमारे १५ लिटर वेस्ट वॉटर म्हणजेच स्पेंन्टवॉश बाहेर पडत असतो. या स्पेन्टवॉशमध्ये काही रसायने असल्याने ते वातावरण, तसेच जमीन दूषित करतात. ज्या जमिनीत हे स्पेंटवॉश सोडले जाते. ती जमीन नापिक बनू शकते. त्यामुळे पाणी प्रदूषण मंडळाने अशा स्पेंटवॉशचा सीओडी व बीओडी लोड कमी करण्यासाठी कारखान्यांनी काही उपाय योजावेत असा नियम केला आहे, या नियमांचे पालन करायचे तर कारखान्याला प्रचंड खर्च करावा लागतो. केवळ प्रदूषण टाळायचे म्हणून खर्च करायचा ठरवले तर कारखान्याला फटका बसू शकतो. तेव्हा कारखान्यांचा फायदा होईल आणि प्रदूषणही टळेल असा एखादा प्रकल्प उभा करावा अशी सूचना शंकरराव काळे यांनी केली आणि त्यानुसार आसवनी विभागाचाच एक प्रकल्प म्हणून बायोगॅस प्लँट उभारला गेला आणि १९९२-९३ मध्ये तो कार्यान्वित झाला.

५.५७ कोटी रूपये भांडवली खर्च करून उभारण्यात आलेला हा प्रकल्प आज दरवर्षी ५० ते ७० लाख घनमीटर गॅसची निर्मिती करत आहे. म्हणजे स्पिरिट प्लँटमधून प्रतिदिनी बाहेर पडणाऱ्या ४.५० लाख लिटर्स स्पेंटवॉशवर प्रक्रिया करून दररोज १७,५०० घनमीटर गॅसची निर्मिती या प्रकल्पाद्वारे होते. हा सर्व गॅस कारखान्याच्या बॉयलरला इंधन म्हणून वापरला जातो. त्यामुळे ८० टक्के बगॅसची बचत होऊन कारखान्याला त्याचा इतरत्र वापर करून आणखी उत्पन्न मिळवता येत आहे.

मागील आठ वर्षात या प्रकल्पाने उत्पादित केलेला गॅस आणि त्याची बाजारातील किंमत लक्षात घेतली तर या प्रकल्पाने कारखान्याला आणि पर्यायाने शेतकऱ्यांना मोठी आर्थिक मदत केली असल्याचे दिसून येते.

| वर्ष | गॅस उत्पादन (घन मीटरमध्ये) | उत्पादित गॅसची किंमत (लाखात) |
|---|---:|---:|
| १९९२-९३ | ३,६७,४९१ | ५.५१ |
| १९९३-९४ | ३५,९२,७६४ | ३५.९३ |
| १९९४-९५ | ४३,५०,४४४ | ४३.५० |
| १९९५-९६ | ५६,२५,००४ | ५६.२५ |
| १९९६-९७ | ६५,०६,६५९ | १०४.११ |
| १९९७-९८ | ६७,८५,८२९ | १०८.५७ |
| १९९८-९९ | ४९,३४,७५६ | ७८.९६ |
| १९९९-२००० | ४६,२५,४२८ | ७४.०१ |

(वरील आकडेवारी कारखान्याच्या विविध अहवालावरून घेण्यात आली आहे.)

त्यात वाढ होत जाऊन आज रोजी दररोज सुमारे १६००० ते १७००० घनमीटर गॅसची निर्मिती होते. म्हणजेच वर्षाला सुमारे ६० ते ६५ लाख घनमीटर गॅसचे उत्पादन होत आहे.[४३]

अर्थात एवढ्यावरच हा प्रकल्प थांबत नाही. तर बायोगॅस निर्मितीसाठी या स्पेन्टवॉशवर प्रक्रिया केली जाते. त्या प्रक्रियेतून आणखी काही प्रमाणात स्पेन्टवॉश बाहेर पडते. त्यात साधे पाणी मिसळले तर शेतीसाठी उपयुक्त ठरते. त्याची तीव्रता कमी असते. म्हणून मग या प्रकल्पाद्वारे असे पाणी मिश्रित स्पेंन्टवॉश कारखाना परिसरातील सुमारे २०० एकर जमिनीला पुरवले जाते. त्यातही शेतकऱ्यांचा थेट फायदा होतो.

**३ कंपोस्ट खत निर्मितीप्रकल्प –**

कारखान्यातून बाहेर पडणारा बगॅस आणि मळी यांचा पुरेपुर वापर करून आसवनी विभाग आपल्या उप–उत्पादनाद्वारे कारखान्याला एक प्रकारे आर्थिक स्थैर्य देत आहे. आता बायोगॅस प्लँटद्वारे स्पेंटवॉशवर प्राथमिक नियंत्रणयाचे काम चोख केले जाते. तरीही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्पेंटवॉशवर आणखी एक प्रक्रिया करून त्यातील बीओडी, सीओडी आणखी कमी करावा असे बंधन घातले आहे.

यावरही आसवनी विभागाने एक नवा तोडगा काढला, तो म्हणजे कंपोस्ट खत निर्मितीप्रकल्पाचा. बायोगॅसमधून बाहेर पडणारा स्पेंटवॉश आणि कारखान्यातून मिळणारा प्रेसमड या दोन्हींचा वापर करून १९९९–२००० मध्ये आसवनी विभागाने कंपोस्ट खत निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला. सुमारे २५ ते ३० लाख रूपये भांडवली गुंतवणूकीच्या या प्रकल्पाद्वारे फेब्रुवारी २००० मध्ये प्रत्यक्ष उत्पादनाला सुरूवात झाली. आज हा प्रकल्प वर्षाला १५ ते २० हजार टन टन कंपोस्ट खत तयार करतो. कारखान्याच्या सभासदांना हे खत केवळ वाहतूक खर्च घेऊन उपलब्ध करून दिले जाते आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही महत्वाची गोष्ट आहे.

सहकारात प्रत्येक गोष्ट विकास प्रक्रियेशी जोडून घेतली जाणे अपेक्षित असते आणि तशी ती जोडून घेतली गेली तरच विकासाची फळे सर्वसामान्यांना चाखायला मिळतात. अर्थात ही जोडण्याची प्रक्रिया दिसायला सोपी दिसत असली तरी अवघड आहे. पण शंकरराव काळे यात यशस्वी ठरले आहेत. ज्या दोन कारखान्यांना बरोबर घेऊन त्यांनी हा आसवनी विभाग सुरू केला होता तो त्या दोन कारखान्यांच्या मदतीशिवाय यशस्वी चालून दाखवणे, एवढेच नव्हे तर ते बाहेर पडल्यानंतर देखील नवनवे प्रकल्प हाती घेऊन ते यशस्वी करणे हे दूरदृष्टी असल्याशिवाय घडत नाही.

आसवनी विभाग, कारखाना व परिसरासाठी आर्थिकदृष्ट्या किफायतीशर ठरला आहे पण त्याहीपेक्षा या विभागाने मोठ्याप्रमाणात रोजगार निर्मितीचेही काम केलेले आहे. आज या विभागात १७५ कामगार कायमस्वरूपी काम करतात तर सुमारे ३५० कामगार ठेका पद्धतीने काम करत आहेत.[४४] या विभागाने काही छोट्या-छोट्या उद्योगांना ही चालना दिलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने देशीमद्याच्या पॅकिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या बाटल्या आणि खोकी यांचा पुरवठा करणाऱ्यांना रोजगार मिळवून दिला आहे. बाटल्या, खोकी आणि लेबल तसेच बाटल्यांची बुचे पुरवण्याचा व्यवसाय करणारी दहा ते पंधरा छोटी छोटी युनिटस् आज या विभागावर अवलंबून आहेत. यातली बहुतेक युनिटस् ही आसपासच्या गावागावातील व तालुक्यातीलच असल्याने एकूण परिसराच्या दृष्टीने कोपरगाव कारखान्याचा आसवनी विभाग मोठा मदतकारक ठरलेला आहे.

**४ कागद प्रकल्प -**

आसवनी विभागाच्या माध्यमातून कोपरगाव सहकारी साखर कारखान्याने काही उपपदार्थांच्या निर्मितीला सुरूवात करून अगदी अल्पकाळातच यश संपादन केले. हा विभाग आर्थिक दृष्टया सक्षम होत असतानाच केंद्र सरकारने बगॅसपासून कागदनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पाच्या उभारणीसाठी साखर कारखान्यांना प्रोत्साहन देणारे धोरण जाहीर केले. पॅकिंग पेपरची वाढती गरज आणि त्यासाठी होणारी जंगलतोड याचा विचार करता साखर कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या बगॅसचा वापर अशा कागद निर्मितीसाठी केला तर जंगलतोड थांबू शकेल आणि कागदाची गरजही पूर्ण करता येईल म्हणून केंद्र सरकारने अशा प्रकल्पांसाठी काही सवलती देऊ करून कारखान्यांना प्रकल्प उभारणीस प्रोत्साहन दिले होते. त्याचाच फायदा मिळवण्यासाठी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याने १९८६ साली बगॅसपासून क्राफ्ट पेपर निर्मितीचा प्रकल्प सुरू केला.[४५] परंतु भरमसाठ वीजबील, वाढती पाणीपट्टी, सेल्सटॅक्स, टर्नओव्हर टॅक्स, सरचार्ज अशा अनेक कारणाने वाढलेला आर्थिक बोजा, त्यातून प्रदूषण टाळण्यासाठी बसवावी लागणारी मोठी यंत्रसामुग्री, मालाच्या वाढलेल्या किंमती आणि खासगी उद्योगांशी करावी लागणारी स्पर्धा यामुळे ही पेपरमिल तोट्यात आलेली होती.

असे असले तरी या मिलमार्फत १,४८,४०० मे. टन इतक्या कागदांचा निर्मिती केली गेली. त्याहीपेक्षा ज्या भूमिकेतून हा प्रकल्प काळे यांनी हात घेतला होता, ती महत्वाची होती. आसवनी विभागाने कारखाना आणि पर्यायाने शेतकरी यांना जो फायदा मिळवून दिला तसाच फायदा पेपरमिलमधूनही मिळेल अशी अपेक्षा होती. म्हणून

२५ मे. टन क्षमतेचा हा प्रकल्प ४० मे टन क्षमतेचा करण्यासाठी सुमारे १८ कोटी रूपयांची भांडवली गुंतवणूक करण्यात आली. शिवाय पाण्याअभावी पेपरमिल बंद राहू नये म्हणून सुरेगांव शिवारात २४ एकर जमीन खरेदी करून एक साठवण बंधारा बांधला गेला. त्यासाठी ७३ लाख रूपयांचा खर्च केला गेला. या काळात शासनाने काही सवलती जाहीर केलेल्या होत्या. त्या अनेक खासगी पेपरमिल्सना मिळालेल्या होत्या. आपल्या सहकारी क्षेत्रातील मिलला मिळतील या आशेवर संचालक मंडळाने १२-१३ वर्षे पेपरमिलवर भरपूर खर्च केला. पण शासनाने सवलती दिल्या नाहीत. परिणामी हा कागदप्रकल्प आर्थिक अडचणीत आला. उत्पादन बंद करावे लागले. एका महत्वाकांक्षी प्रयोगाला असे अपयश पाहावे लागेल असे कधी कुणालाही वाटले नव्हते. परंतु शासकीय निर्णयामुळे जी परिस्थिती निर्माण झाली त्यामुळे हात टेकावे लागले. राज्यातील अन्य कारखान्यांच्या कागद प्रकल्पांसमोरही हाच यक्षप्रश्न उभा ठाकला. अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर, मुळा, राहुरी, प्रवरा इ. कारखान्यांनी त्वरीत कागद प्रकल्प बंद केले. त्यामुळे प्रचंड तोटा सहन करून उद्योग समहाचे भविष्य अंधारात ढकलण्याऐवजी हा प्रकल्प बंद करून धडा शिकलेला बरा असा विचार केला गेला आणि मनावर दगड ठेवून निर्णय घेतला गेला.

**५ गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि. –**

ऊस तोडल्यानंतर तो कमीत कमी वेळात कारखान्याच्या गव्हाणीत पडायला हवा. कारण जेवढा ताजा ऊस साखर कारखान्यांना मिळेल तेवढास साखर उतारा अधिक मिळतो. यासाठी वाहतुकीची वेगवान साधने उपलब्ध असणे ही कारखान्यांची महत्वाची गरज. परंतु 'कोसाका' कडे अशी साधने सुरूवातीपासून उपलब्ध नव्हती. ऊस वाहतुकीसाठी या कारखान्याची सारी मदार बैलगाडयांवर होती. बैलगाड्यांच्या माध्यमातून जवळचा ऊस आणणे ठीक, पण लांब अंतरावरील ऊसही बैलगाड्यांद्वारे आणायचा तर त्यात बराच वेळा जायचा. परिणामी साखर उतारा कमी व्हायचा. शिवाय बैलगाड्यांचा केव्हाही संप सुरू व्हायचा. यातून काही मार्ग काढला पाहिजे म्हणून १९७१ साली गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट ही खासगी कंपनी स्थापन केली गेली.[४६]

कंपनी खासगी असली तरी तिचे कामकाज सहकारी तत्वावर चालते. म्हणजे कंपनी खासगी असूनही तिची मालकी एका कोणाकडे नाही. मुळातच साखर कारखान्याच्या माध्यमातून जे काही करायचे असेल ते सहकारी असो किंवा खाजगी. परिसराच्या विकासाचे असले पाहिजे हे श्री.काळे यांनी अगदी पहिल्यापासून पाळलेले

तत्वे होते. त्यामुळे ही कंपनी स्थापन करताना सभासद शेतकऱ्यांना यातून जोडधंदा मिळाला पाहिजे. त्यांच्या एकूण आर्थिक उत्पन्नात भर पडली पाहिजे अशी या कंपनीची रचना केली गेली.

दहा ऊस उत्पादक शेतकरी आणि कोसाकाचे पाच जण अशा पंधरा जणांचे संचालक मंडळ बनवून या कंपनीचा कारभार त्यांच्याकडे सोपवण्यात आला. या संचालक मंडळाने काही शेतकऱ्यांना कंपनीचे सभासद करून घेतले. आणि या सभासदांना ऊस, बगॅस, साखर अशा मालाच्या वाहतुकीचा खात्रीचा धंदा उपलब्ध करून देत. ट्रक घेण्याकरीता हमीपत्र देऊन बँकेचे कर्ज उपलब्ध करून दिले. त्यामुळे स्थापनेच्या वेळीच एकूण ५१ ऊस उत्पादक शेतकरी कंपनीचे सभासद झाले. आज ही संख्या १०० च्या वर गेली असून या सर्व सभासदांच्या १६० ट्रक्स कंपनीच्या या योजनेत समाविष्ट केलेल्या आहेत.

आजही कंपनी या सभासद शेतकऱ्यांच्या ट्रक्सना खात्रीचा वाहतूक व्यवसाय तर देतेच, त्याचबरोबर गळीत हंगामाच्या काळात ट्रक्सची निगा व दुरूस्ती, टायर, स्पेअर पार्टस्, डिझेल ऑईल, ट्रक अपघात विमा, रोड टॅक्स भरणे, तसेच उत्पन्न व व्यवसाय कर भरणे अशा अनेक सेवा अगदी अल्प दरात पुरवते. कंपनीने १९९९-२००० या सालात या सेवांपोटी ट्रकधारक सभासदांना उपलब्ध करून दिलेली रक्कम पाहिली तर ही कंपनी कारखान्यासाठी जशी पूरक संस्था ठरली आहे. तशीच ती ऊस उत्पादकांनाही मदतगार ठरली आहे.

**कंपनीने २०११-२०१२ या वर्षात पुढीलप्रमाणे कार्य केलेले आहे.**

१) ट्रक दुरूस्तीसाठी ११६ ट्रकधारकांना एकूण २५.९५ लाख रूपये ॲडव्हान्स म्हणून उपलब्ध करून दिले.

२) ४०.१५ लाख रूपये किंमतीचे ४१६ टायर्स वाजवी दरात उपलब्ध करून दिले.

३) ट्रक्स्च्या विम्याचा हप्ता ११.२८ लाख रूपये आणि वाहन कराची एकूण रक्कम १३.२१ लाख रूपये असे एकूण २४.४९ लाख कंपनीने भरले.

४) सभासदांना ट्रक्ससाठी लागणारे स्पेअरपार्टस् वाजवी दरात उपलब्ध व्हावेत म्हणून कंपनीतर्फेच एक स्पेअरपार्टचे दुकान गेल्या ३४ वर्षापासून चालवले जात आहे. या दुकानामुळे काही प्रमाणात रोजगार तर उपलब्ध झालाच परंतु ट्रकधारकांना आवश्यक ते पार्टस् वेळेत उपलब्ध होऊन एकूण कामाची गती वाढवण्यासही या दुकानाचा उपयोग आजही होत आहे. २०११-२०१२ या सालात या दुकानामार्फत

कंपनीने वेगवेगळे स्पेअरपार्टस्, ऑईल, ग्रीस असा एकूण ३०.१० लाख रूपयांचा माल ट्रकधारक सभासदांना उधारीने पुरवला, अशी उधारी वाहतुकीच्या बिलांतून सुलभपणे वसूल केली जाते. यामुळे ट्रक नादुरूस्त होऊन दुरूस्ती अभावी सभासदांचे होणारे नुकसान टाळण्यास मोठी मदत होते.

५) ५ ट्रक्सची नियमित सर्व्हिसींग करता यावी, तसेच नादुरूस्त ट्रक तात्काळ दुरूस्त करता यावे म्हणून कंपनीने काही तरूणांना गॅरेजस् काढून दिली आहेत. या गॅरेजमार्फत सभासदांच्या ट्रक्सची कामे प्राधान्याने करून दिली जातात. एवढेच नव्हे तर ही कामे रास्त किंमतीत करून दिली जातात. कंपनी प्रत्येक ट्रकधारकांकडून निगा व दुरूस्तीचा खर्च म्हणून वर्षाला काही ठराविक रक्कम घेते. ही रक्कम अल्प असते. त्यामुळे ट्रक मेंटेनन्सचे काम जवळपास मोफत होते असेच म्हणावे लागेल.

अशा सर्व सेवा पुरवत असतानाच कारखान्याची गरज लक्षात घेऊन वाहतूक व्यवस्था कार्यक्षम होण्यासाठी कंपनी ऊस तोडणीचीही जबाबदारी घेते. त्यासाठी कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने काही कामगार नेमून ऊस तोडणीची व्यवस्था केली जाते. ऊस तोडणी आणि वाहतूक अशा दोन्ही व्यवस्था, एकत्र असल्याचा जो लाभ कारखान्यांना मिळतो तो मिळवून देण्याचा एक प्रयत्न म्हणून कंपनीकडून ही कामे केली जात आहेत. पण त्याचाच परिणाम म्हणून ट्रकधारकांना मिळणाऱ्या वाहतूक दरात आजवर मोठी वाढ मिळालेली आहे.

स्पेअरपार्टस्, टायर्स, डिझेलच्या दरात झालेल्या वाढीचा विचार करून कोसाकाने सर्वप्रथम दरवाढ ट्रकधारकांना दिलेली आहे. उद्देश एकच की ऊस शेतकऱ्यांचे भले व्हावे. हाच विचार करून गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीशी संलग्न राहील अशी दुसरी गौतम केन ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि. ही खासगी कंपनी १९९९ मध्ये शंकरराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन केली गेली. कंपनी कायद्यानुसार ४९ पेक्षा अधिक सभासद करता येत नाहीत. त्यामुळे अनेक शेतकरी या कंपनीच्या लाभपासून वंचित राहत होते. तेव्हा त्यांनाही लाभात सहभागी करून घेण्यासाठी ही नवीन कंपनी स्थापन केली गेली. तिचेही कामकाज गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीप्रमाणेच सहकारी तत्वावर चालू असून या दोन्ही कंपन्यांच्या माध्यमातून कोसाका आणि शंकरराव काळे यांनी एक नवा प्रयोग सहकारी क्षेत्रासमोर मांडला आहे.[४७]

## २.७ जोडधंद्याला प्रोत्साहन –

सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून शंकरराव काळे यांनी एक विशिष्ट दृष्टीकोन ठेवून अनेक प्रकल्प उभारले. पण त्याच्या जोडीलाच परिसरातील लोकांचे उद्योजकीय कौशल्य वाढावे यासाठी वेगवेगळ्या जोडधंद्याला विशेष प्रोत्साहन देण्याचे कामही ते सातत्याने करत आहेत. या कामाचा भाग म्हणूनच आज कोसाका उद्योग समूहात दूध उत्पादन आणि त्या अनुषंगाने सुरू करण्यात आलेल्या काही उद्योगांचा समावेश दिसतो. यात प्रामुख्याने कृत्रिम गो–पैदास, पशुधन, कुक्कुट पालन, गौतम मिल्क आणि पशुखाद्य निर्मितीप्रकल्प यांचा समावेश होतो. एकमेकांशी संलग्न असे हे उद्योग शेतकरी, कष्टकरी यांना जोडधंदा कसा द्यावा म्हणून सुरू करण्यात आलेले आहेत.

### १ कृत्रिम गो–पैदास व पशुधन विकास –

इ. स. १८२२–१८४३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने पशुधन विकास कार्यक्रम हाती घेऊन चांगले बीज असलेले घोडे व उंट आणि गाय व बैल शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले. त्यामुळे महाराष्ट्रात उत्तम प्रतीचे पशुधन तयार झाले होते.[४८] एकूण दूध धंद्याचा जो विकास झाला त्यात शासनाच्या कृत्रिम गो–पैदास आणि पशुधन विकास या विभागाचा मोठा वाटा आहे. हीच बाब लक्षात घेऊन शंकरराव काळे यांनी कारखान्याच्या माध्यमातून कृत्रिम गो–पैदाशीची काही केंद्रे कारखाना कार्यक्षेत्रात सुरू करून संकरित गायी घेण्यासाठी सभासद शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले.

अगदी सुरूवातीला दूधाचे उत्पादन सुरू करण्याच्या दृष्टीने सायवाल, सिंधी जातीच्या गायी सर्वात उत्तम म्हणून बँकेचे कर्ज उपलब्ध करून देत पशुधन विकासातंर्गत अनेकांना संकरित गायी घेऊन देण्याचे काम या केंद्रांनी केले.

लोकांनी संकरित गायी घ्याव्यात म्हणून कारखान्यामार्फत गायींचा विमा उतवण्यासंबंधी मार्गदर्शन केले. त्यामुळे अनेकांनी गायी घेतल्या. पण या गायींची निगा नीट राखली नाही. तर त्याचा दूध उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. म्हणून व्हेटरनरीचा कोर्स केलेल्या काही तरूणांना नियुक्त करून गौतमनगर येथील मुख्य केंद्राशिवाय शिरवाडे (निफाड), जवळके, चांदेकसारे, मळेगांव थडी, टाकळी, चासनळी, करंजी, पाथरे (सिन्नर), सोमठाणे (सिन्नर), धामोरी, सावळीविहीर, शिरसगांव, भोजडे, वारी, मढी बु., मुखेड (येवला), रवंदे, मुर्शतपूर, पोहेगांव, देवगांव (निफाड) कोळगांव (सांगवी) खेडलेझुंगे, कानळद अशा अनेक ठिकाणी केंद्र सुरू करून पशुसंवर्धनचाचे काम सुरू केले.

या केंद्रामार्फत अनेक तरूणांना स्वयंरोजगार उपलब्ध करून तर दिला गेलाच. पण कृत्रिम रेतनाचे एक मोठे काम उभे केले गेले. १९७५ साली सुरू करण्यात आलेल्या या विभागाने आतापर्यंत कृत्रिम रेतनाच्या माध्यमातून ७७१०० गायी निर्माण केल्या. त्यापैकी आज ३५ हजार गायी दूध उत्पादन प्रक्रियेत सामील असून चार तालुक्यातील या सर्व केंद्रातर्गत प्रतिदिनी २,८०,००० लिटर दूध उत्पादित केले जाते.

हे सर्व करत असतानाच सभासद शेतकऱ्यांसाठी कारखाना कॅटल कँप सारखे उपक्रम राबवतो. या कँपमध्ये दुभत्या गायींसह सर्व जनावरांना लसीकरण तर केले जातेच. पण काही शस्त्रक्रिया, औषध पुरवठा अशाही गोष्टी केल्या जातात. जिल्हा परिषदेच्या दवाखान्यामार्फतही लोक आपल्या जनावरांवर उपचार करतात. पण या दवाखान्यात पुरेसा औषधसाठा नसतो. शिवाय कोणाला काही कारणाने डॉक्टरांशी तात्काळ सपंर्क साधायचा असेल तर या दवाखान्यात साधा फोन देखील नसतो. तेव्हा बाब लक्षात घेऊन कारखान्याच्या गो-पैदास केंद्रामार्फत जि. प. च्या दवाखान्यासाठी एका फोनसह औषधांचा पुरवठा केला जातो.

**२ गौतम सहकारी कुक्कुटपालन व्यावसायिक संस्था मर्यादित, गौतमनगर –**

कृत्रिम गो-पैदास आणि पशुधन विकासासंदर्भात उभारलेल्या कामातून लोकांना दूध व्यवसायाची एक नवी दृष्टी मिळाली. तशीच नवी दृष्टी कुक्कुटपालन व्यवसायाबाबतही मिळावी म्हणून १९८६-८७ साली ही सहकारी संस्था स्थापन करण्यात आली.[४९]

एक घरगुती उद्योग म्हणून खेड्यात बहुतेक लोक गावरान कोंबड्या पाळतात. परंतु त्याकडे व्यवसाय म्हणून फारसे पाहिले जात नाही. या लोकांना प्रशिक्षणासह काही गोष्टी उपलब्ध करून दिल्या तर कुक्कुटपालनाचा व्यवसाय उत्कृष्टपणे करू शकतात आणि त्यातून त्यांना बऱ्यापैकी उत्पन्न मिळू शकते. प्रामुख्याने हाच विचार करून गौतम सहकारी कुक्कुट पालन व्यावसायिक संस्था सुरू केली गेली. परंतु लोकांचा तसेच सभासदांचा फारसा प्रतिसाद न मिळाल्याने संस्थेने स्वतःच कुक्कुटपालनाचा व्यवसाय सुरू केला.

परिसरातील शेतकरी सभासद असलेली ही संस्था आजवर फारशी नफ्यात आली नाही. याचे कारण अंडे उत्पादनाच्या एकूण खर्चात जी वाढ झाली त्याप्रमाणात अंड्याचा दर वाढला नाही. १९९३-९४ मध्ये उत्पादन खर्च प्रति अंडे केवळ ७५ पैसे येत होता. तो आज १.२० ते १.५० इतका येत आहे. याचे कारण औषधं, खाद्य, कच्चा माल यांच्या किंमतीत झालेली भरमसाठ वाढ. यावाढीमुळे एक पुलेट पक्षी अंडी देईपर्यंत

सांभाळायाचा झाला तर ८० रूपये त्यावर खर्च होतो. तो पूर्वी केवळ ५५ रूपये इतका यायचा. तरीही आर्थिक मेळ घालून संस्था नफ्यात आणण्याचा प्रयत्न केला आहे. नव्या संकल्पित प्रयोगांना आधार देण्यात गौतम सहकारी कुक्कुटपालन व्यावसायिक संस्था यशस्वी झाली होती. अंडी उत्पादन व विक्रीतून मिळणाऱ्या नफ्यावर समाधान न मानता त्याही पलीकडे जाऊन संस्थेच्या सभासदांना पक्ष्यांसह खाद्य पुरवणे, शेड बांधून देणे, कर्ज उपलब्ध करून देणे आणि सभासदांच्या प्रशिक्षणाचीही सोय करण्याचा संस्थेचा इरादा होता. याच अनुषंगाने वेगवेगळे प्रयोग राबवले जात होते.

पक्षी संगोपणासाठी संस्थेतर्फे जे खाद्य विकत घेतले जायचे त्या खाद्याचे वाढलेले दर आणि पक्षांच्या योग्य वाढीसाठी आवश्यक असणारा दर्जा विचारात घेऊन आपण स्वत:च खाद्य-निर्मिती करावी असा विचार करून संस्थेत १९९६ साली खाद्य कारखाना सुरू केला. त्यासाठी ९ लाख रूपयांची भांडवली गुंतवणूक करण्यात आली. परंतु हा कारखाना केवळ संस्थेची गरज भागवण्यापुरताच चालवला जात असल्याने तोट्यात येऊ लागला. तेव्हा हा कारखाना कुक्कुटपालन व्यवसायापुरताच न ठेवता त्यात पशुखाद्यही निर्मिती करावी असा विचार पुढे आला. तेव्हा 'गौतम पशुखाद्य प्रा. लि.' या कंपनीमार्फत काही सुधारणा करून १.१०.९९ पासून 'कांडी' पशुखाद्याच्या निर्मितीस या कारखान्याने सुरूवात केली. परंतू अनेक कारणांमुळे कुक्कुटपालन संस्था व पशुखाद्य कारखाना फार काळ व्यवस्थितपणे चालू शकले नाही. दिवसेंदिवस त्यांचा तोटा वाढत चालला होता म्हणून नाईलाजाने या दोन्हीही संस्था बंद कराव्या लागल्या.

**३. गौतम मिल्क प्रा. लि., गौतमनगर –**

कोसाका उद्योगसमुहाने सहकारी तत्वावरच परंतु खासगी स्वरूपाच्या काही संस्था उभ्या केल्या. त्यातलीच ही एक संस्था. कारखान्याचे सभासद आणि परिसरातील कष्टकरी जनतेला जोडधंद्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून संस्थेने संकरित गायी घेऊन दिल्या. कृत्रिम रेतनाचा कार्यक्रम मोठ्याप्रमाणावर राबवला आणि संवर्धनासाठी मोफत औषध पुरवठाही केला. या सर्वांचा परिणाम म्हणून परिसरात मोठ्याप्रमाणात दूध उत्पादन होऊ लागले. परंतु दूध संकलनाची योग्य सोय नसणे आणि तालुका संघाकडून वेगवेगळ्या कारणाने शेतकऱ्यांचे दूध नाकारले जाणे यामुळे प्रयत्नपूर्वक वाढवलेला हा जोडधंदा अडचणीत आला होता. त्यात हात दिला नाही तर तो उध्वस्त होऊन शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होऊ शकते; हे शंकरराव काळे यांनी ओळखले आणि २६ मे १९९३ रोजी कंपनी कायद्याप्रमाणे 'गौतम मिल्क प्रा. लि.,' ही संस्था स्थापन केली.[५०]

एकूण १ कोटी ६० लाखांची भांडवली गुंतवणूक असणारी ही कंपनी सध्या एकूण १०० दूध संकलन केंद्रामार्फत रोज ३६ ते ४० हजार लिटर दूध खरेदी करते आणि त्यावर प्रक्रिया करून ते विकते. प्रक्रियेसाठी कंपनीकडे २५,००० लिटर क्षमतेचा पाश्चयरायझेशन आणि पॅकिंग प्लँट आहे. त्याचप्रमाणे दूध संकलन आणि वितरणासाठी २० टेम्पो कंपनीकडे असून एकूण १०० ते १२५ लोकांना रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. एवढेच नव्हे तर आजवर कंपनीने ५ कोटींहून अधिक लिटर दुधाची खरेदी केली असून दूध उत्पादकांना ३५ ते ४० कोटी रूपयांची रककम दिलेली आहे. दूध उत्पादकांना योग्य भाव देण्याबरोबर वेळेत रक्कम देता यावी म्हणून गौतम सहकारी बँकेचे १ कोटी रूपयांचे कॅश क्रेडिट मिळवलेले आहे. त्यामुळे प्रत्येक दूध उत्पादकाला दुधाचे पैसे त्याच्या बँकेतील खात्यावर मिळण्याची सोय झालेली आहे.

दूध उत्पादकांच्या दूधाला योग्य बाजारपेठ मिळवून देण्याचा कंपनी सातत्याने प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांचा भाग म्हणून संकलित होणाऱ्या दुधावर प्रक्रिया करून ते दूध पिशव्यांमध्ये पॅक करून दिले जाते. निर्भेळ स्वच्छ आणि प्रमाणित असे दूध गौतम मिल्क प्रा. लि. ने उपलब्ध करून दिल्याने या दूधाला कोपरगाव, औरंगाबाद, नाशिक तसेच गुजरातमधील सुरत शहरातून मागणी येत आहे.

सध्या या संस्थेचे कामकाज 'डायनामिक्स डेअरी प्रा. लि.' ही कंपनी पहात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदाच होत आहे.

**४. गौतम पशुखाद्य प्रा. लि., गौतमनगर –**

दूधाची वाढती गरज आणि दूध उत्पादकांच्या फायद्यात वाढ होण्याची आवश्यकता लक्षात घेता दुभत्या जनावरांना योग्य आणि सकस आहाराची गरज भासते. ग्रामीण भागात असा आहार सहज उपलब्ध नसल्याने तो सुग्रास, वैभव, अमृत, नंदन किंवा गोदरेज अशा कंपन्यांनी तयार केलेले खाद्य व्यापाऱ्यांकडून घ्यावे लागते. व्यापाऱ्यांची या खाद्य विक्रीतली मक्तेदारी विचारात घेता शेतकऱ्यांना ते खरेदी करणे परवडत नाही.

कोसाका उद्योगसमूह आणि गौतम मिल्क प्रा. लि. यांच्याकडून दूध उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना विविध पातळ्यांवर प्रोत्साहन दिले जाते. पण सकस आहार उपलब्ध करून दिला जात नाही. ही बाब जेव्हा शंकरराव काळे यांच्या लक्षात आली तेव्हा त्यांनी गौतम मिल्कच्या संचालक मंडळाशी चर्चा करून पशुखाद्य प्रकल्प सुरू करण्याची कल्पना मांडली. यातून शेतकऱ्यांना उत्तम प्रतीचे पशुखाद्य वाजवी दरात

उपलब्ध होऊ शकेल असे लक्षात येताच संचालकांनीही ही कल्पना उचलून धरली आणि मार्च १९९९ मध्ये 'गौतम पशुखाद्य प्रा. लि., गौतमनगर' या नावाने एक स्वतंत्र कंपनी स्थापन केली.[५१]

वीस लाख रूपयांचे अधिकृत भांडवल असणाऱ्या या कंपनीने गौतम सहकारी बँकेकडून यंत्रासामुग्री आणि इमारत उभारणी यासाठी २० लाख रूपयाचे कर्ज घेतले असून कच्चा माल व इतर खरेदीसाठी ४० लाख रूपयांचे कॅश क्रेडिट मिळवलेले आहे. गौतम बँकेच्या या सहकार्यामुळे कंपनीला लागलीच आपले उत्पादन सुरू करता आले असून ही कंपनी ताशी दोन मे.टन पशुखाद्याची निर्मिती करत होती. त्यामुळे रोज १५ टन हायप्रोटीन कांडीचे उत्पादन आणि ५ टन कोंबडी खाद्य उत्पादन असे २० टन खाद्याचे उत्पादन होत होते.

हे खाद्य गौतम मिल्क प्रा. लि. या कंपनीमार्फत दूध उत्पादकांना उधारीवर पुरवले जात होते. ही उधारी त्यांच्या बिलातून वसूल करण्यात येत होती. त्यामुळे परिसरातील दूध उत्पादकांची सोय झाली होती. त्याचा दूध उत्पादन वाढीसाठी मोठा उपयोग होत होता. त्यामुळेच अगदी अल्पावधीतच कंपनीच्या या उत्पादनाला लोकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. तसाच प्रतिसाद कोंबडी खाद्यासही मिळू लागला होता. कंपनी प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत होती. मात्र सरकारी धोरणे व सभासदांची उदासिनता यामुळे हळूहळू संस्था तोट्यात गेली व शेवटी ती बंद करावी लागली.

कोसाका उद्योगसमुहातल्या एकूणच अशा ज्या काही कंपन्या आहेत त्यांनी आपआपल्या पातळ्यांवर जे काही काम केले आहे ते प्रामुख्याने स्थानिक लोकांच्या गरजा, परिसराचा विकास डोळ्यांसमोर ठेवून केलेले आहे. यामुळे या कंपन्या किती फायद्यात आहेत यापेक्षा यांच्यामुळे एकूण परिस्थितीत काय बदल झाला हे अधिक महत्त्वाचे आहे.

साखर कारखान्याशी संलग्न असणाऱ्या या एकूणच संस्थांचा या पातळीवर विचार केला तर आपणास या संस्थांनी एकेक कुटुंब उभे करत अवघ्या परिसरातील लोकांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसते.

## २.८ संलग्न वित्त संस्था –

महाराष्ट्र ही सहकारी चळवळीची जननी समजली जाते. या सहकारी चळवळीने राज्याची ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचे मोठे काम केले आहे. १९०५ च्या सुमारास भारतात ही चळवळ सुरू झाली. परंतु तिला बहर आला तो स्वातंत्र्यानंतर,

तोही पुरोगामी महाराष्ट्राच्या भूमीत, वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ आणि पद्मश्री विठ्ठलराव विखेपाटील यांनी नगर जिल्ह्यात प्रवरेच्या काठी पहिला सहकारी साखर कारखाना सुरू केला आणि केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या ग्रामीण विकासाला एक नवी दिशा दाखविली. सहकाराच्या माध्यमातून एकमेकांशी संलग्न असे उद्योग उभे करायचे, 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर ते चालवायचे आणि त्यातून परिसराचा चहूबाजूने विकास साधायचा, अशी ही विकासाची दिशा होती. या दिशेने सहकार वाढवत नेला तर परिसराच्या विकासाबरोबरच सर्वसामान्य ग्रामीण जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी मदत होते, हे ओळखूनच शंकरराव काळे या उच्च शिक्षित, उद्यमशील आणि प्रयोगशील शेतकऱ्याने आपल्या गावचा, तालुक्याचा विकास करायचा म्हणून विविध पातळ्यांवर काम केले आहे. त्यातीलच एक महत्त्वाचे काम म्हणजे परिसरातील शेतकरी, शेतमजूर तसेच कष्टकरी जनतेसमोरील आर्थिक अडचणी दूर करण्याच्या हेतूने स्थापन केलेल्या विविध सहकारी पतसंस्था, सोसायट्या आणि बँका या वित्त संस्था आहेत.

शंकरराव काळे यांनी १९५० नंतर म्हणजे १९५२–५३ च्या सुमारास सामाजिक, राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवले. ज्या काळी अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव, श्रीरामपूर, संगमनेर या उत्तर भागातील तालुक्याचा भाग गोदावरी, प्रवरेच्या कालव्यांमुळे सधन बनलेला होता. अगदी जागतिक मंदीच्या काळातही या भागाची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी होती. १९३० सालच्या मंदीच्या तडाख्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अडचणीत आली होती. १९३२–३३ ते १९३८–३९ या काळात अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे भाव प्रचंड प्रमाणात घसरले होते. त्यामुळे शेती व्यवसाय मोठ्या संकटात सापडला होता. पण नगर–नाशिक जिल्ह्याच्या काही भागात १९३८ ते ४० या काळात गोदावरी व प्रवरा नद्यांच्या कालव्यामुळे ओलिताखाली आलेल्या जमिनीपैकी १८,५०० एकर जमिनीवर ऊस पिकवला जात असे. त्यामुळे परिसरातील २२,००० लोकांना ४० लाख रूपयांहून अधिक रक्कम निव्वळ मजुरीच्या स्वरूपात मिळत असे. असे असले तरी शेतकऱ्यांची एकूण आर्थिक स्थिती बेताचीच होती, कारण बहूतेक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी खंडाने किंवा भाडेपट्ट्याने खासगी साखर कारखान्यांकडे दिलेल्या होत्या. कारखाने खासगी मालकीचे असल्याने त्यांचे शेतकऱ्यांच्या फायद्यापेक्षा स्वतःच्या फायद्याकडे अधिक लक्ष होते. त्यामुळे ऊसासारख्या नगदी पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असतानाही शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बेताचीच होती. अशा स्थितीत छोट्या–छोट्या शेतकऱ्यांना आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करणे कठीण जात होते.

## १. सावकारी पाशात अडकलेली ग्रामीण जनता –

याच काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सावकारी धंद्याने चांगला जोर पकडला होता. याला नगर जिल्हाही अपवाद नव्हता. छोटे शेतकरी, कामगार, कष्टकरी असे बहुतेक लोक आपल्या छोट्या–छोट्या गरजा पूर्ण करण्यासाठी सावकरांकडून कर्ज घेत. सावकारीचा व्यवसाय करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने व्यापारी लोक अधिक होते. ही मंडळी दिलेल्या कर्जाच्या बदल्यात व्याजापोटी दामदुप्पट पैसे वसूल करत. परंतु अनेकांकडे सावकाराला द्यायला पैसे नसत. तेंव्हा धान्य किंवा वस्तूच्या रूपात कर्जाची परतफेड केली जायची. त्यातही अनेक पातळ्यांवर सावकार, लोकांची लुबाडणूक करत. काही शेतकऱ्यांच्या तर जमिनी ताब्यात घेऊन त्याच जमिनी खंडाने त्याच शेतकऱ्यांना देऊन सावकारांनी मोठी पिळवणूक चालवली होती.

वास्तविक हे चित्र महाराष्ट्रात सर्वत्रच होते. बँका होत्या पण त्या खेड्यापर्यंत फारशा पोहचलेल्या नव्हत्या. शिवाय आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाला कर्जपुरवठा करायचा म्हणजे बँकांना वसुलीच्या दृष्टीने सोयीचे वाटत नसे. त्यामुळे ग्रामीण भागातला शेतकरी बँकेकडे कर्ज मागायला गेला तरी त्याला ते मिळत नसे. शिवाय बँकांच्या अनेक अटी असायच्या, याला पर्याय म्हणून लोक सावकारांकडून कर्ज उचलायचे. कर्जात अडकलेला शेतकरी समोर आला की, सावकार मंडळी वाट्टेल तसे नियम लावून त्याला लुटायचे. त्यांचा व्याजाबाबत कुठलाही नियम नव्हता. त्या काळी मुंबईसारख्या प्रांतात कामगारांना व्याजाने पैसे पुरवणारे पठाण सावकार दरमहा रूपयाला चार आणे किंवा शंभर रूपयांना दर साल तीनशे रूपये व्याज आकारत असत आणि ते वेळेवर मिळाले नाही तर दंड्याचा वापर करून वसूल करत. असाच काहीसा प्रकार महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात त्या काळी चालू होता. पुरेसे उत्पन्न मिळत नसल्याने दैनंदिन गरजांसह शेतीचे भांडवल तसेच लग्नकार्य पार पाडण्यासाठी खेड्यातल्या लोकांना पैशाची गरज भासायची. अशा वेळी जमीन किंवा तत्सम बाबी तारण ठेवून पैसे द्यायला सावकार तयार असत. सहज पैसे उपलब्ध होत आहे म्हटल्यावर सावकारांकडून पैसे घेण्याकडेच लोकांचा ओढा असायचा. पुढे पुढे या सावकारीच्या धंद्यात काही जमीनदार शेतकरीही उतरले. त्यामुळे स्थानिक लोकांना आणखी नवा, जवळचा पर्याय उपलब्ध झाला. पण सावकारीच्या स्वरूपामुळे लोकांच्या गरजा पूर्ण होण्यापेक्षा लोक अधिकच आर्थिक अडचणीत सापडू लागले. याचे कारण म्हणजे सावकारांकडून घेतले जाणारे कर्ज उत्पादक कारणांपेक्षा अनुत्पादक कारणांवरच अधिक प्रमाणात वापरले जात असे. त्याहीपेक्षा या

कर्जावर आकारले जाणारे व्याज भरमसाठ असायचे. काही जमीनदार शेतकरी छोट्या शेतकऱ्यांना बियाणे, खते यांचा पुरवठा करायचे, पण त्याची परतफेड मात्र दुप्पट, तिप्पट प्रमाणात करावी लागायची. त्यामुळे एखाद्या कोरडवाहू शेती करण्याऱ्या शेतकऱ्यांचे अर्धेअधिक उत्पादन बियाणाच्या परतफेडीमध्येच जायचे.

दुष्काळी भागातली परिस्थिती तर आणखीनच वाईट होती. नगर हा दुष्काळी भागात मोडणारा जिल्हा त्यामुळे उत्पन्नाची साधने कमी, त्यामुळे अनेकांची आर्थिक स्थिती हलाखीची. या साऱ्यांचा फायदा सावकार वर्गाने उठवला नसता तरच नवल. याबाबत श्री. काळे सांगतात. ''पुरेसे उत्पन्न मिळवून देणारे एकही चांगले साधन या परिसरात नसल्याने अनेकांना सावकारांचा आधार घ्यावा लागत असे. पण सावकारांनी मात्र त्याचाच फायदा उठवत अनेकांची लूट केली. देशोधडीला लावले. कर्जाचा डोंगर वाढत गेल्याने अनेकांचे संसार उध्वस्त झाले.''[५२]

## २. कोसाका पगारदार नोकरांची सहकारी पतपेढी –

कारखान्यातील कामगारांच्या कल्याणासाठी ही पतसंस्था स्थापन केली. तो परिसराचा आर्थिक केंद्रबिंदू आहे. दैनंदिन गरजा लक्षात घेऊन विविध वस्तू भांडार, मंगल कार्यालय तसेच कापड दुकान, पिठाची गिरणी, स्वस्त धान्य दुकान, एस.टी.डी. बूथ, मेडिकल दुकान, कँन्टीन, साखर विक्री अशा अनेक प्रकारच्या सेवा या पतपेढीमार्फत उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

अशा विविध सेवा, सुविधा पुरवणाऱ्या या पतसंस्थेकडे असलेले खेळते भांडवल २७ हजारांवरून १ कोटी ५७ लाखांवर पोहचले आहे. तर शेअर भांडवल सात हजारांवरून २१ लाख ३६ हजार इतके वाढले आहे. संस्था सभासदांच्या ठेवीही स्वीकारत असत त्याद्वारे आज संस्थेकडे ५७ लाख ८५ हजार रूपये जमलेले आहेत. जे सुरूवातीस केवळ ७०४५ रूपये इतके होते. या ठेवीतूनच गरजू सभासदांना संस्था कर्ज पुरवठा करते. १९९९–२००० या वर्षात संस्थेने एकूण ५१ लाख ८८ हजार रूपयांचे कर्ज वाटप केलेले आहे. अर्थात संस्थेची ही प्रगती एकदम झालेली नाही. त्यामागे परिसराच्या विकासाच्या विकासाचा ध्यास आणि कामगारांचे कष्ट आहेत.

### पतसंस्थेच्या स्थापनेमागची भूमिका –

कोपरगाव सहकारी साखर कारखाना १९५६ साली सुरू झाल्यानंतर परिसरातील अनेकांना रोजगार मिळाला. त्यामुळे काही प्रमाणात पैसाही हाती खेळू लागला. तेव्हा कारखान्यातील कामगारांसाठी त्यांच्या दैनंदिन गरजा भागवणारे एखादे

दुकान कारखाना परिसरात असावे असा एक विचार पुढे आला. माहेगाव सहकारी सोसायटीच्या स्थापनेतून शंकरराव काळे यांना विकासाची एक दिशा मिळालेली होती. त्यामुळे त्यांनी केवळ दुकान सुरू करण्याऐवजी एकूणच कामगारांच्या उन्नतीसाठी आपण एखादी पतपेढी का सुरू करू नये असा विचार मांडला आणि तो कारखान्यातील अधिकारी, कामगारांनी उचलून धरला.

कामगारांच्या दैनंदिन गरजा तर भागल्या पाहिजेच, परंतु अडचणीच्या वेळी त्यांना काही प्रमाणात अर्थसहाय्यही उपलब्ध झाले पाहिजे. शिवाय काटकसर, बचत, स्वावलंबन आणि सहकार या बाबीही कामगारांमध्ये पोहोचल्या पाहिजेत असे श्री. काळे यांना वाटत होते. हाती एकदम पैसा येऊ लागला की लोक तो वेड्यासारखा उडवतात हे त्यांनी जवळून पाहिलेले होते. किंबहुना विविध मार्गाने व्यापारी मंडळी खेडूतांकडचा पैसा ओढून घेतात हे त्यांना माहीत होते. म्हणून कामगारांचे हित जपणारी एखादी संस्था उभी राहावी असे शंकरराव काळे यांना मनोमन वाटत होते. त्याचबरोबर या संस्थेने इतरांसाठीही काही काम करावे जेणेकरून परिसराच्या आर्थिक विकासात भर पडेल असेही काळे यांचे म्हणणे असायचे. त्यामुळे हाच धागा पकडून, 'कोसाका पगारदार नोकरांची सहकारी पतपेढी, मर्यादित, गौतमनगर' ही पतसंस्था १५ जुलै १९५७ रोजी स्थापन करण्यात आली.

स्थापनेच्या वेळी केवळ ११० सभासद आणि त्यांनी जमा केलेले १४६० रूपयाचे भागभांडवल होते. इतक्या अल्प भांडवलावर काम सुरू करणे कठीण होते. पण संस्थेने सुरूवातीस कामगार आणि परिसरातील लोकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन एक छोटसे कंझ्युमर्स स्टोअर्स सुरू केले. उच्च दर्जाचा माल माफक दरात उपलब्ध करू दिल्यामुळे या स्टोअर्सला कामगारांसह इतर नागरिकांचाही चांगला प्रतिसाद लाभला. त्याच जोरावर संस्थेने पुढे १९६७-६८ पासून कापड दुकान, पिठाची गिरणी, स्वस्त धान्य दुकान असे आणखी काही विभाग सुरू केले. यालाही लोकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. पुढे १९७३ साली मेडिकल स्टोअर सुरू झाले आणि १९७९ साली कारखान्यामध्ये कामगारांसाठी कॅन्टीन चालवण्यास घेतले. नंतर १९८० पासून मोठ्या कार्यक्रमासाठी आवश्यक असणारा मंडप, लाऊडस्पीकर तसंच स्वयंपाकाची भांडी माफक भाड्यात उपलब्ध करून दिली गेली. असे अनेक उपक्रम संस्थेने राबवले. त्यामुळे साहजिकच संस्थेचा व्याप आणि कारभार वाढला. जागेची कमतरता भासू लागली. संस्थेचे स्वतःचे स्वतंत्र कार्यालय असावे असेही सर्वांना वाटू लागले. तेंव्हा कारखान्याचीच काही जागा शंकरराव काळे यांनी संस्थेला भाडे तत्त्वावर उपलब्ध करून दिली.

याच जागेवर आज संस्थेची भव्य इमारत उभी असून त्याच इमारतीत कोसाका बझार, मंगल कार्यालय आणि पतसंस्थेचे ऑफिस अशा सर्व गोष्टी एकत्रित केल्या आहेत. संस्थेची ही सारी प्रगती लक्षात घेऊन अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेने या पतसंस्थेस १९९१ साली १० लाखांचे कॅश क्रेडिट दिले होते. पुढे हेच कॅश क्रेडिट बँकेने ५५ लाख केले तर आज ते ७५ लाखाचे आहे.[५३] त्यामुळे गरजूंना आवश्यक तेवढा कर्जपुरवठा करतांना पतसंस्थेला फारशी अडचण येत नाही. वसुली कारखान्यामार्फत थेट पगारातून होत असल्याने त्याचाही प्रश्न येत नाही. पण त्यापेक्षाही संस्थेच्या या एकूण कामाचा परिणाम म्हणून कारखान्यातील कामगारांचे जीवनमान उंचावण्यास तर मदत झालीच, पण परिसरातील इतर लोकांच्याही आर्थिक विकासात भर पडली आहे.

**कोसाका पगारदार नोकरांची सहकारी पतपेढी लि.**

**प्रगतीचा आलेख (दर दहा वर्षे)**

| माहिती तपशील | सन १९५७-५८ | सन १९६७-६८ | सन १९७७-७८ | सन १९८७-८८ | सन १९९७-९८ | सन २००७-०८ |
|---|---|---|---|---|---|---|
| मेंबर संख्या | २५७ | ४२३ | ४२२ | ६२१ | ९२९ | ५६३ |
| शेअर्स भांडवल रू. | ७१०० | १३०००० | २३८००० | ५१२००० | १७४३००० | ५१९०८४० |
| ठेवी रू. | ७०४५ | ११५००० | २५७००० | ३१५६००० | ५१५६००० | ६०५७०८४ |
| सभासद कर्ज वाटप रू. | २०२८० | २५८००० | ४८२००० | २३८०००० | ७१८५००० | ९७५६६६० |
| निव्वळ नफा रू. | ४९२६ | ११००० | ३५००० | ७१००० | २७१००० | ६५२२९३ |
| दिलेला डिव्हिडंड | ५% | ४% | ९% | ९% | १०% | ८% |
| खेळते भांडवल | २७००० | ३३८००० | ९०५००० | ४७७८००० | १३५००००० | २२३०२५८० |

**(वरील आकडेवारी पतपेढीच्या विविध वार्षिक अहवालावरून घेतली आहे.[५४])**

कोसाका पगारदार नोकरांची पतपेढी म्हणजे कामगारांनी कामगारांसाठी राबवलेला उपक्रम असला तरी या उपक्रमाला योग्य दिशा देण्याचे काम श्री. काळे यांनी केले. ते करत असताना केवळ कामगार डोळ्यासमोर न ठेवता परिसर विकासाचा विचार समोर ठेवून त्यांनी संस्थेची उभारणी केली. म्हणून त्यांनी खासदार असताना आपल्या कोट्यातून संस्थेसाठी एक टेलिफोन बूथ खास बाब म्हणून मिळवून दिला. आज याच बूथमुळे कारखाना परिसरातला प्रत्येक माणूस देशाच्या, जगाच्या मुख्य प्रवाहाशी जोडला गेला आहे.

एका विशिष्ट दृष्टीने काम करणे आणि त्यातून विकास साधणे हेच शंकरराव काळे यांचे महत्वाचे योगदान आहे असे कामगारांना तर वाटतेच पण परिसरातील लोकांनाही वाटतं. म्हणूनच पतसंस्थेने बांधलेल्या मंगल कार्यालयास लोकांनी 'कर्मवीर शंकरराव काळे सहकार सभागृह' असं नाव देऊन काळे यांचा उचित गौरव केला आहे.

**३. गौतम बँक –**

माहेगांव देशमुख सहकारी सोसायटी आणि कोसाका पगारदार नोकरांची पतसंस्था या दोन्ही संस्था परिसरातील लोकांची मोठ्या स्वरूपातली पैशाची गरज पूर्ण करू शकत नव्हत्या. त्याचबरोबर दैनंदिन गरजा पूर्ण झाल्या म्हणजे ग्रामीण भागातील जनतेचा खऱ्या अर्थाने आर्थिक विकास होतोच असे नाही. कोपरगाव सहकारी साखर कारखाना आणि त्याच्या माध्यमातून सुरू झालेल्या इतर संस्थांमुळे परिसरात चैतन्य निर्माण झालं. पण विकासाच्या पातळीवर अद्यापही आपण मागे आहोत याची जाणीव शंकरराव काळे यांच्या सारख्यांना होती.

कारखान्याच्या एकूण प्रगतीमुळे ऊस उत्पादकांच्या हाती जसे चार पैसे खेळू लागले तसेच कारखान्याच्या माध्यतातून रोजगार उपलब्ध झाल्याने कामगार कष्टकऱ्यांच्या हातीही बऱ्यापैकी पैसा आला. शिवाय आडीनडीला सोसायट्या, पतसंस्था यांचा आधार होताच. त्यामुळे शेतकरी, कष्टकऱ्यांची मुले शिकू लागली. त्यातून काहीजण मोठ्या पदावर पोहचले. पण सर्वांनाच अशी पदे मिळतात असे नाही. किंबहूना शिक्षण पूर्ण झाले म्हणजे नोकरी मिळतेच असेही नाही, त्यामुळे शिक्षण घेऊन घरी बसण्याची संख्या वाढत होती. उच्च शिक्षणासाठी मुलांना कुठे पाठवायचे तर पुन्हा पैशाची अडचणी येऊ लागल्या. त्यामुळे शिकलेल्यांनाही पुन्हा शेती करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

शिक्षणानंतरही अनेकांना शेतीच करावी लागत असेल तर शेतीवरचा एकूण बोजा वाढत जाणार, परिणामी एक वेळ अशी येईल की शेतीही परवडेनाशी होईल, तेव्हा पुन्हा नवे प्रश्न उपस्थित होतील हे शंकरराव काळे यांनी हेरले आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी शेतीला पर्याय म्हणून लहानमोठे उद्योग इथल्याच लोकांकडून उभे राहिले पाहिजेत असा एक विचार त्यांच्या मनात आला. पण उद्योग उभारणीत पुन्हा पैशाचीच अडचण येणार होती. कारखाना किंवा पतसंस्थामार्फत हा पैसे पुरवता येणार नाही. राष्ट्रीयकृत बँका आहेत पण त्यांच्याकडून कर्ज मिळविण्यात ग्रामीण जनतेला अनेक

अडचणी येतात. हे काळे यांनी स्वतः अनुभवलेले होते. त्यामुळे आपल्या परिसरासाठी एक सहकारी बँक असली पाहिजे असा विचार त्यांच्या मनात घोळू लागला आणि तोच विचार १९७६ साली गौतम बँकेच्या स्थापनेद्वारे मूर्त स्वरूपात आला.

ग्रामीण जनतेला रोजगाराबरोबर आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणाऱ्या छोट्या मोठ्या उद्योग धंद्यांच्या उभारणीसाठी लोकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १४ मार्च १९७७ रोजी 'गौतम सहकारी बँक लि.' या नावाने रीतसर बँकेची नोंदणी करण्यात आली.[५५] तेव्हापासून आजतागायत बँकेने आपल्या शाखांचा विस्तार वाढवत अहमदनगर जिल्हयासह नाशिक, औरंगाबाद, पुणे आणि ठाणे हे जिल्हेही कार्यकक्षेत आणले आहेत. एवढेच नव्हे तर बँक आज आपल्या एकूण नऊ शाखांद्वारे ग्रामीण भागाच्या विकासाला हातभार लावते आहे. किंबहूना १९७७ ते २००० या २३ वर्षाच्या काळात बँकेने केलेल्या कर्जपुरवठ्यामुळे नगर आणि नाशिक जिल्हयाच्या ग्रामीण परिसराचा मोठा विकास झालेला दिसतो. कारण या काळात बँकेने व्यापार, नित्योपयोगी वस्तू खरेदी, पगारांपोटी कर्ज, सोनेतारण, कुटीर उद्योग, स्वयंरोजगार, शेती व शेतीपूरक उद्योग तसेच ट्रान्सपोर्ट, छोटी छोटी दुकाने, गॅरेजेस, हॉटेल्स अशा अनेक कारणांसाठी खेड्यातील जनतेला अर्थसहाय्य उपलब्ध करून दिलेले आहे अशा अनेक कारणांसाठी आजवर दिलेले एकूण कर्ज विचारात घेतले तर गौतम बँकेच्या कामाची आपल्याला नेमकी कल्पना येऊ शकेल.

सोबतच्या तक्त्यातील कर्जाचे आकडे पाहिले तर ठेवीच्या जवळपास ७० ते ९० टक्के इतक्या रकमेंचे कर्ज म्हणून वाटप केले आहे. हे करत असताना सामान्य माणूसही आपल्या सेवेपासून वंचित राहू नये याचा बँकेने अगदी कसोशीने प्रयत्न केला आहे. सहकारी बँकांनी दुर्बल घटकांसाठी किती कर्जपुरवठा करावा हे रिझर्व बँकेने ठरवून दिलेले आहे. रिझर्व बँकेच्या पतपुरवठा धोरणानुसार एकूण कर्ज वाटपाच्या ६०% कर्ज वाटप हे अग्रक्रम व्यवसायासाठी म्हणजे शेती, शेतीपूरक उद्योग किंवा तत्सम यांना करावे आणि १५ टक्के कर्ज हे दुर्बल घटकांसाठी द्यावं असा नियम आहे. गौतम बँकेने मात्र यापेक्षा अधिक कर्ज उपलब्ध करून दुर्बल घटकांना चांगलाच आधार दिलेला आहे.

| अ. नं. | सन | सभासद | वसूल भाग भांडवल | ठेवी | कर्ज पुरवठा | खेळते भांडवल | निव्वळ नफा | डिव्हीडंड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९७६–७७ | ११८१ | ३०७२०० | ४०७४४२ | -- | ७३१८१५ | १०२८६ | -- |
| २ | १९८१–८२ | २१६२ | ६२२३०० | ४८८८४५४ | ३९४८४३९ | ६२१२६८३ | १२०१३४ | ९% |
| ३ | १९८६–८७ | ३०१९ | ११८९८२५ | १६७३६८४० | १९७८१८०६ | २७७५५६३५ | ५६७३८० | १२% |
| ४ | १९९१–९२ | ३५७४ | २०७११७५ | ४६८७७८४६ | ४८०२९९२५ | ७२९१५१२७ | १४०९११६ | १२% |
| ५ | १९९६–९७ | ४१४० | २७५३४७५ | १८१०२६८०० | १६३४९१८६० | २३४२४७५६२ | ३५२६३३१ | १८% |
| ६ | २००२–०३ | ४८८५ | ५७४८७२५ | ५१६६७१९४८ | ४०८३८८२९६ | ६००५५८६०३ | ५७४५००० | १८% |
| ७ | २००७–०८ | १५९०३ | १४३८६३० | ८५३३८८२८२ | ३५०८९३५०९ | ४०००००० | २५२५००० | -- |

(वरील आकडेवारी गौतम बँकेच्या विविध वार्षिक अहवालावरून घेतली आहे.[५६])

**कर्ज वाटपाचे प्रमाण –**

| तपशील | रिझर्व बँकेने ठरवलेले प्रमाण | प्रत्यक्षात बँकेने दिलेले कर्ज | |
|---|---|---|---|
| | | १९९८–९९ | १९९९–२००० |
| एकूण कर्जाशी अग्रक्रम क्षेत्र कर्जाचे प्रमाण | ६०% | ६५.२२% | ६५.०८% |
| एकूण कर्जाशी दुर्बल घटक कर्जाचे प्रमाण | १५% | १६.०२% | १९.०४% |
| दुर्बल घटकाचं अग्रक्रम क्षेत्र कर्जाशी प्रमाण | १५% | २४.५७% | २९.२५% |

(वरील आकडेवारी वार्षिक अहवाल१९९९–२०००वरून घेतली आहे. )

**महिलांसाठी विशेष कर्ज योजना –**

ग्रामीण भागातील महिलांना क्षमता असूनही इतर व्यवसायाची संधी न मिळाल्याने शेतीतल्या कामाशिवाय पर्याय नसतो. कष्ट करण्याची प्रचंड ताकद असणाऱ्या ग्रामीण महिलांना जर योग्य दिशा मिळून किमान अर्थसहाय्य उपलब्ध झाले तर त्या आपल्या संसारास हातभार लावू शकतात. ही बाब लक्षात घेऊन बँकेने गृहउद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या महिलांना आवश्यक तेवढे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिलेले आहे. आजवर अर्थसहाय्यातून अनेक महिलांनी आपले स्वतःचे छोटे–छोटे उद्योग सुरू करून कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारली आहे. याबाबत बँकेचे चेअरमन अशोकराव काळे मोठ्या अभिमानाने सांगतात की, ‘सहकारी क्षेत्रात या पद्धतीचा कर्जपुरवठा करून समाजतल्या एका दुर्लक्षित घटकाला प्रथम आमच्या बँकेने अर्थसहाय्य उपलब्ध करून दिलेले आहे.’[५७]

गोरगरीब ग्रामीण जनतेचे कल्याण करणे हा दृष्टीकोन मनाशी बाळगुण शंकरराव काळे यांनी बँक स्थापन केली असल्याने अगदी तळातल्या लोकांपर्यंत बँकेचा

लाभ पोहोचला पाहिजे असा या बँकेचा प्रयत्न असतो. म्हणून बँकेकडून कर्जाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी बाहेरील बँकाकडून अर्थसहाय्य घेतले जाते. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेकडून याचसाठी गौतम बँकेने पाच कोटी रूपयांचे कॅश क्रेडिट मजूंर करून घेतलेले आहे.

**विकासासाठी प्रयत्न –**

गेल्या छत्तीस वर्षाच्या कारकिर्दीत बँकेने आपली प्रगती तर करून दाखविली आहेच पण आपल्या विविध शाखांच्या माध्यमातून नगर आणि नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण जनतेच्या घरापर्यंत विकासाची गंगाही नेली आहे. बँकेने सुशिक्षीत बेकारांना वेगवेगळ्या धंद्यासाठी कर्ज उपलब्ध करून देत त्यांचे संसार उभे केले. किराणा मालाच्या दुकानापासून अगदी एखाद्या मोठ्या वर्कशॉपपर्यंत अशा विविध कारणांसाठी अर्थसहाय्य केले. शेतकऱ्यांना ट्रॅक्टर्स, ट्रक्स, वैयक्तिक वापरासाठीची वाहने घेण्यासाठी तसेच शेतात पाण्याचा पंप बसवायचा असेल, पाईप लाईन टाकायची असेल तर गौतम बँक सदैव शेतकऱ्यांच्या मागे उभी असते.

अर्थात केवळ कर्ज देण्याचेच काम आजवर बँकेने केले आहे असे नाही, तर एक सामाजिक बांधिलकी म्हणूनही बँकेने आजवर अनेकांना सढळ हाताने मदतही केली आहे. एकतर बँकेने सभासद आणि कर्जदार यांची जनता अपघात विमा पॉलिसी उतरवून त्यांना संरक्षण दिले आहे. त्याचप्रमाणे खातेदारांच्या ठेवींनाही विमा संरक्षण उपलब्ध करून दिलेले आहे. एवढेच नव्हे तर देशाच्या सीमांचे रक्षण करताना शहीद झालेल्या जवानांच्या कुटूंबियांना बँकेने वेळोवेळी मदत केली आहे. या मदतीत बँकेने स्वतःचे ५१,००० कर्मचाऱ्यांचे आणि संचालक मंडळाचे प्रत्येकी १०,००० असे एकूण ७१,००० रूपये दिले आहेत, ओरिसा वादळग्रस्तांसाठी बँकेने २१,००० रूपयांची मदत केली आहे.[५८]

असे अनेक उपक्रम राबवत असतानाच बँकेने कोसाका कारखाना परिसरात आपल्या मुख्य कार्यालयासाठी म्हणून ३६ लाख रूपये खर्च करून सुसज्ज इमारत बांधली आहे. या ठिकाणी आज सर्व व्यवहार संगणकाद्वारे करण्यात येतात. अशाच इमारती प्रत्येक शाखेसाठी बांधण्याचा विचार बँक करत असून कोपरगाव शाखेची इमारत नुकतीच बांधून पूर्ण केली आहे. या इमारतीत जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

प्रत्येक जिल्ह्याच्या ग्रामीण भागात नवे उद्योग सुरू व्हावेत आणि त्यातून ग्रामीण युवकांना पर्यायी रोजगार उपलब्ध होऊन शेतीवरला भार कमी व्हावा हा शंकरराव काळे यांनी मांडलेला विचार चेअरमन अशोकराव काळे यांच्यासह सर्व संचालक अंमलात

आणत आहेत. म्हणूनच आज बँकेकडे ७० कोटीच्या ठेवी जमा असून ५५ कोटी रूपयांपर्यंत कर्जाचे वाटप केलेले आहे. हे सारे सहज शक्य झाले ते आकर्षक व्याजदरामुळे.[५९]

**बँकेचे व्याज दराचे धोरण –**

| अ.नं. | तपशील | व्याज | रू. १५ लाखाचे पुढील सिंगल ठेव पावतीसाठी व्याजदर |
|---|---|---|---|
| १) | सेव्हिंग्ज खाते | ५.५% | -- |
| २) | चालू खाते | व्याज नाही | -- |
| ३) | मुदत ठेव | | |
| | अ. ३१ दिवस ते १ वर्षापर्यंत | १२.५% | १३.0% |
| | ब. १ वर्षापेक्षा जादा ते २ वर्ष | १३.0% | १३.५% |
| | क. २ वर्षापेक्षा जादा ते ५ वर्ष | १४.0% | १४.५% |
| | ड. ५ वर्षापेक्षा जादा मुदतीसाठी | १४.५% | १५.५ % |
| | दामदुप्पट ठेव योजना | | ६0 महिने |
| | तिप्पट ठेव योजना | | ९२ महिने व १५ दिवस |
| | चौप्पट ठेव योजना | | ११७ महिने |
| ४. | पुनर्गुंतवणूक ठेव योजना | | या ठेव योजनेत तिमाही चक्रवाढ पद्धतीने एकरकमी व्याज दिले जाते. |
| ५. | कल्पतरू ठेव योजना (कुंटुंब मंगल) | | या ठेव योजनेत आपण बँकेत येण्याऐवजी आपली दैनंदिन बचत बँकेच्या प्रतिनिधीमार्फत घरी येऊन जमा केली जाते. |
| ६. | रिकरींग ठेव योजना | | या ठेव योजनेत प्रति मासिक एक ठराविक रक्कम बँकेत जमा केल्यास मुदतीनंतरची सदरची ठेव सव्याज परत मिळते. |
| ७. | सहकारी संस्था व ट्रस्टच्या ठेवीला प्रचलीत व्याजदरापेक्षा १% जादा व्याजदर. | | |
| ८. | आपल्या ठेवीवर व्याज दरमहा किंवा तिमाही आपल्या सेव्हिंग्ज खात्यात जमा करता येते व पेन्शनप्रमाणे रक्कम प्राप्त करता येते. | | |

(वरील माहिती गौतम सह. बँकेच्या अहवालावरून घेतली आहे.[६0])

अशा आकर्षक व्याजदरामुळे बँकेने आपल्या ठेवीत वाढ करून ग्रामीण परिसराच्या विकासात मोठी भर टाकली आहे.

## ४. शरद पवार नागरी सहकारी पतसंस्था –

याच विकासाला आणखी हातभार लागावा म्हणून शंकरराव काळे यांनी श्री. शरद पवार यांच्या नावाने आणखी एक छोटी पतसंस्था चालवली आहे.

पतसंस्थेची १९८८ साली स्थापना झाली. ९६६ एवढी सभासद संख्या असलेल्या या पतसंस्थेकडे १४,५७,३०,९६८ रू. ठेवी जमा झालेल्या आहे. भाग भांडवल असलेल्या या पतसंस्थेने आतापर्यंत सुमारे ९,४९,७६,६६७ रू. कर्ज वाटप केलेले आहे.[६१] अर्थात हे कर्जवाटप केवळ कोसाका उद्योग समूहातील कर्मचाऱ्यांनाच केलेले आहे असे नाही. एका मर्यादित क्षेत्रात संस्था आपले काम करीत असून गेल्या चोवीस वर्षाच्या काळात पतसंस्थेने बरीच प्रगती केलेली आहे.

**संस्थेच्या प्रगतीचा आलेख –**

| तपशील | सन २००८–०९ | सन २००९–१० | सन २०१०–११ | सन २०११–१२ | सन २०१२–१३ |
|---|---|---|---|---|---|
| सभासद | ६०१ | ६४३ | ७०३ | ८२५ | ९६६ |
| भागभांडवल | ११,२७,१८५ | १४,३८,८८५ | १९,४३,८८५ | २९,५१,२८५ | ३५,५९,८८५ |
| राखीव निधी | ११,२३,४५७ | १३,८१,४२८ | १८,२१,९०५ | २३,४९,४०० | २९,७१,९८१ |
| इमारत निधी | ९,१२,४२९ | ११,२२,९६८ | १५,२२,९६८ | २०,२२,९६८ | २५,७२,९६८ |
| इतर निधी | ५१,७६,०४८ | ६५,८८,५०३ | ८०,०४,२८० | ८८,२४,००८ | १,०५,२४,९५१ |
| ठेवी | ७,२५,८७,४६८ | ८,४१,८४,४४४ | ११,६४,६१,३६० | १२,५१,६९,२७५ | १४,५७,३०,९६८ |
| गुंतवणूक | ३,६१,४६,७७५ | ४,५२,२३,०५० | ५,७०,१२,२४३ | ६,४३,३८,१३६ | ८,४६,८३,६६८ |
| कर्ज | ४,५८,९६,४२९ | ५,५१,४०,१३८ | ७,६६,४०,४११ | ८,४४,१८,०२६ | ९,४९,७६,७६७ |
| नफा | ९,३६,००० | १३,८६,४९० | १८,०३,६७७ | २०,३३,८३३ | ३४,६८,८०८ |
| बाहेरील कर्ज | नाही | २९,७३,६५५ | ४८,५९६ | ९,७०,७६,६२३ | १,०७,८४,३५० |
| थकबाकी | ९.००% | ९.५०% | ८.००% | ७.००% | ९.००% |
| एन.पी.ए. | शून्य टक्के | शून्य टक्के | शून्य टक्के | शून्य टक्के | शून्य टक्के |
| डिव्हीडंड | १५.००% | १५.००% | १५.००% | १५.००% | १५.००% |
| ऑडिट वर्ग | अ स्टार विशेष नामांकन | अ वर्ग | अ वर्ग | अ वर्ग | अ वर्ग |

(वरील आकडेवारी संस्थेच्या विविध वार्षिक अहवालावरून घेतली आहे.)

खरे म्हणजे ग्रामीण विकासाचा विचार करताना संस्था मोठी आहे की छोटी आहे हा विचार महत्वाचा नसून ग्रामीण जनतेला किती सहजपणे आणि सुलभरित्या अर्थसहाय्य उपलब्ध होते हे महत्वाचे मानले जाते. मोठ्या राष्ट्रीयकृत बँका किंवा खाजगी बँकाकडून शासनाच्या पतधोरणानुसार ग्रामीण भागासाठी काही प्रमाणात अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. परंतु ते मिळवताना शेतकऱ्यांना तसेच सुशिक्षित बेकारांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे ग्रामीण परिसराच्या एकूण विकासास मोठी खीळ बसते. नेमकी हीच खिळ मोकळी करून खेड्यात नवनव्या उद्योगांद्वारे गावचा आणि परिसराचा विकास शंकरराव काळे यांनी या विविध संस्थांद्वारे साधला आहे. आर्थिक कारणांमुळे इतरत्र दिसणारा भकासपणा लक्षात घेतला तर कोपरगाव कारखाना आणि परिसरात जाणवणारा विकासात्मक बदल फार मोठा आहे. एकेकाळी सावकारांच्या जोखडता अडकलेला इथला शेतकरी कष्टकरी वर्ग आज दुचाकी, चारचाकीच्या वेगाने धावताना दिसतो आहे तो या सहकारी वितसंस्थांच्या जाळ्यामुळेच.

कोपरगाव परिसराची सुरूवातीची आर्थिक स्थिती लक्षात घेता आज जो बदल जाणवतो आहे. त्यात या चार संस्थांचा वाटा मोठा आहे हे त्यांच्या आजवरच्या कामावरून आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. पन्नास वर्षापूर्वी सावकारी पाशात अडकलेले येथील सामान्य जीवन आज माहेगांव देशमुख सेवा सोसायटी, कोसाका पगारदार नोकरांची पतपेढी, गौतम बँक आणि शरद पवार नागरी सहकारी पतसंस्था या संस्थांनी पार बदलून टाकले आहे. म्हणजे सावकारांच्या जोखडात अडकलेल्या या परिसरातील लोकांना आपल्या आयुष्यात आर्थिक विकासाचा सूर्योदय कधी होईल का असे वाटत असतानाच या संस्थांनी ग्रामीण जनतेचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी जे काही केले त्यातूनच आज हा परिसर स्वबळावर उभा राहिला.

### २.९ दि कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचे नामांतर –

शंकरराव काळे यांनी साखर कारखान्याच्या उभारणीपासून ते अखेरच्या श्वासापर्यंत जे योगदान दिले त्याबद्दल आदराची भावना व्यक्त करण्यासाठी शंकररावांचे नाव कारखान्यास देण्याची मागणी सभासदांनी केली. त्यानुसार दिनांक २८–६–२०१३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांनी केलेल्या मागणीनुसार मा. संचालक मंडळाने वार्षिक सर्वसाधारण सभेतील विषय क्र. ११ प्रमाणे सुचविलेली पोटनियम दुरूस्ती करून ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

**पोटनियम दुरूस्ती शब्द योजना पुढीलप्रमाणे –**

| पो. नि. नं. | प्रचलित पोटनियम शब्दरचना | पोटनियमात सुचविलेली दुरूस्ती | दुरूस्तीनंतर अस्तित्वात येणारा पोटनियम | दुरूस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|
| १. | **प्रास्ताविक :** या संस्थेचे नाव दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., असे असून, तिचा नोंदविलेला पत्ता मुक्काम गौतमनगर, पोस्ट–कोळपेवाडी, तालुका–कोपरगाव, जिल्हा–अहमदनगर असा आहे. पत्त्यात होणारा बदल मेहरबान साखर संचालक व अप्पर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांना बदल झाल्यापासून १४ दिवसाचे आत कळविण्यात येईल. | **प्रास्ताविक :** या संस्थेचे नाव **कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर** असे असून तिचा नोंदविलेला पत्ता मुक्काम – गौतमनगर, पोष्ट – कोळपेवाडी, तालुका – कोपरगाव, जिल्हा – अहमदनगर असा आहे. पत्त्यात होणारा बदल मा.प्रादेशिक सह. संचालक (साखर) अहमदनगर व मा.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना बदल झाल्यापासून १४ दिवसाचे आत कळविण्यात येईल. | **प्रास्ताविक :** या संस्थेचे नाव **कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर** असे असून तिचा नोंदविलेला पत्ता मुक्काम – गौतमनगर, पोष्ट – कोळपेवाडी, तालुका – कोपरगाव, जिल्हा – अहमदनगर असा आहे. पत्त्यात होणारा बदल मा.प्रादेशिक सह. संचालक (साखर) अहमदनगर व मा.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना बदल झाल्यापासून १४ दिवसाचे आत कळविण्यात येईल. | स्व.शंकरराव काळे साहेब यांनी या साखर कारखान्याचे उभारणी पासून अखेरच्या श्वासा पर्यंत जे योगदान दिले त्याबद्दल आदराची भावना व्यक्त करणेसाठी दि. २८/६/२०१३ रोजीचे मा. वार्षिक सर्व साधारण सभेत सभासदांनी सर्वानुमते केलेल्या मागणीनुसार कारखान्याचे नावात बदल करणे. |

दि कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचे सन २०११–१२ च्या दिनांक २८–६–२०१३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांनी केलेल्या मागणीनुसार मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कारखान्याच्या नावात बदल करून 'कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर' असे नामांतर करण्यात आले आहे.[६२]

## – संदर्भ –


| | | | |
|---|---|---|---|
| १) | भाऊसाहेब थोरात | : | अमृतगाथा, अमेय प्रकाशन पुणे – १९९९, पृ. १२६ |
| २) | अरूण खोरे | : | महाराष्ट्र विकासाचे नव्हे प्रवाह, संजीवनी रौप्य स्मृती ग्रंथ – १९९१ पृ. ४१ |
| ३) | गो. स. कामत | : | सहकार तत्व व व्यवहार व्यवस्थापन स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे – १९९३, पृ. ७५ |
| ४) | S.D. Dr. Tupe | : | Sugar Co-operatives and Rural Change, Dwaraka Prakashan, Pune – 1992, Pg. 73 |
| ५) | गणेश देशमुख | : | ग्रामवेद, के. बी. रोहमारे स्मृतीग्रंथ, के. जे. सोमय्या कॉलेज, कोपरगाव १९९८, पृ. ११७ |
| ६) | सुलभा ब्रम्हे | : | ध.रा. गाडगीळ लेखसंग्रह, खंड–१, प्रकाशक, वि. म. दांडेकर, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे – १९७३, पृ. ३०३ |
| ७) | कित्ता | : | पृ. ४२ |
| ८) | त्रैमासिक | : | सहकार शक्ती, अहमदनगर – १९७०, पृ. ३८ |
| ९) | स्मरणिका | : | अहमदनगर जिल्हा सहकारी बँक लि, अहमदनगर रौप्य महोत्सव स्मरणिका, पृ. ७१,७२ |
| १०) | सरकारी कागदपत्रे | : | सहकार उपनिबंधक कार्यालय, कोपरगाव, जि. अ.नगर |
| ११) | जयराम देसाई | : | कार्यकारी संपादक, सहकारी महाराष्ट्र–पुणे महाराष्ट्र विकासाचे नवे प्रवाह – अरूण खोरे, पृ. ४० |
| १२) | ज्ञानेश्वर सोनवणे | : | समाज अभियंता, पद्‌मगंधा प्रकाशन – पुणे, २००९, पृ. ४७ |
| १३) | वार्षिक अहवाल | : | माहेगांव देशमुख ग्रामविविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि., माहेगांव देशमुख, १९५७–५८, पृ. ३ |
| १४) | कित्ता | : | पृ. ४ |
| १५) | कित्ता | : | पृ. ५ |
| १६) | कित्ता | : | पृ. ६ |
| १७) | वार्षिक अहवाल | : | माहेगांव देशमुख वि. का. से. संस्था २०१२–१३, पृ. २ |
| १८) | कित्ता | : | पृ. ३ |
| १९) | कित्ता | : | पृ. ४ |
| २०) | कित्ता | : | पृ. ६ |

२१) सुहास कुलकर्णी : विकाससूर्य, युनिक फिचर्स, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे, शंकरराव काळे गौरव ग्रंथ - २००१, पृ. ६५
२२) द. को. साळुंखे : महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन पुणे - प्रकाशन वर्ष -१९९३, पृ. ७५
२३) सुहास कुलकर्णी : विकाससूर्य, उपरोक्त, पृ. २६
२४) मुलाखत : शंकरराव काळे, ६ मे २०१२
२५) कित्ता :
२६) वार्षिक अहवाल : दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर १९५६-५७, पृ. ९
२७) मुलाखत : शंकरराव काळे, दिनांक ६ मे २०१२
२८) कित्ता :
२९) मुलाखत : शंकरराव काळे, उपरोक्त
३०) वार्षिक अहवाल : उपरोक्त - १९५६-५७, पृ. ६
३१) वार्षिक अहवाल : उपरोक्त - १९५६ ते २०१३
३२) दि कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या शेतकरी कार्यालयातील फलक
३३) वार्षिक अहवाल : उपरोक्त, २०१२-१३, पृ. ११
३४) कित्ता :
३५) कित्ता :
३६) कित्ता :
३७) कित्ता :
३८) कित्ता :
३९) कित्ता :
४०) कित्ता :
४१) वार्षिक अहवाल : दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, १९७६-७७, पृ. ९
४२) वार्षिक अहवाल : उपरोक्त, २०१२-१३, पृ. १०
४३) कित्ता :
४४) कित्ता :
४५) वार्षिक अहवाल : उपरोक्त, १९८६-८७, पृ. ६

४६) वार्षिक अहवाल : उपरोक्त, १९७२–७३, पृ. १४

४७) वार्षिक अहवाल : उपरोक्त, १९९९–२000, पृ. ११

४८) भा.इ.सं.मं. : अप्रकाशित, पुरंदरे दप्तर, रूमाल क्र. १, कागद क्र.३७ व अप्रकाशित, हिंगणे दप्तर, रूमाल क्र. ३, पत्र क्र. ६१

४९) वार्षिक अहवाल : उपरोक्त, १९८६–८७, पृ. ७

५0) मुलाखत : शंकरराव काळे, ६ मे २0१२

५१) कित्ता :

५२) कित्ता :

५३) वार्षिक अहवाल : कोसाका पगारदार नोकरांची सहकारी पतपेढी लि., गौतमनगर, प्रकाशक – चेअरमन, १९९९–२000, पृ. ३

५४) उपरोक्त : वार्षिक अहवाल – १९५७ ते २00८, पृ. ७

५५) वार्षिक अहवाल : गौतम सहकारी बँक लि., गौतमनगर १९७७–७८ प्रकाशक – चेअरमन, गौतम सह. बँक लि., पृ. १२

५६) कित्ता : वार्षिक अहवाल १९७६ ते २00८

५७) मुलाखत : आमदार अशोकराव काळे चेअरमन, गौतम सह. बँक लि. २0 मे २0१२

५८) कित्ता :

५९) कित्ता :

६0) वार्षिक अहवाल : गौतम सहकारी बँक लि., गौतमनगर – २00७–0८ प्रकाशक – चेअरमन, गौतम सह. बँक लि., पृ. ९

६१) वार्षिक अहवाल : शरद पवार नागरी सहकारी पतसंस्था, गौतमनगर २0१२–१३, प्रकाशक – चेअरमन, पृ. ५

६२) वार्षिक अहवाल : कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, प्रकाशक – चेअरमन, कोसाका – २0१३, पृ. ३

## प्रकरण – ५

# शंकरराव काळे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

**प्रस्तावना**

शिक्षण ही विकसनशिल सामाजिक प्रक्रिया आहे. कोणत्याही समाजाच्या गरजा, आशा, आकांक्षा व उद्दिष्टे यांच्याशी शिक्षणाचा निकटचा संबंध आहे. गेल्या १५० वर्षात झालेल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक व आर्थिक परिवर्तनाबरोबरच शिक्षणाचे स्वरूप बदलत गेले. शिक्षणाच्या विविध स्वरूपात बदल घडवून आणण्याचे कार्य अनेक शिक्षण तज्ज्ञ विचारवंतांनी केल्याचे दिसून येते. त्यामध्ये राजाराम मोहन रॉय, महात्मा ज्योतीबा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी कर्वे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य अधिक मोलाचे होते. मानवी जीवनातील शिक्षणाचे महत्व जाणून बदलत्या व गतिमान जीवनास उपयुक्त अशा शिक्षणाचा पुरस्कार या शिक्षण तज्ञांनी केला. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवूनच पुढील पिढीने हा वारसा चालविला त्यामुळे शिक्षणातून सामाजिक व धार्मिक कार्याला गती मिळाली.

### ५.१ शंकरराव काळे यांच्या जन्मापूर्वीची महाराष्ट्रातील शैक्षणिक परिस्थिती –

पेशव्यांची सत्ता संपुष्टात आल्यानंतर मुंबईचा गव्हर्नर माऊन्ट स्टुअर्ट एलफिन्स्टन याने त्यावेळचा सुशिक्षित ब्राम्हणवर्ग असंतुष्ट राहू नये म्हणून दक्षिणा पद्धत चालू ठेवली. पेशवाईत मुलांना घरगुती व काम करता करता शिक्षण मिळे. सर्व शास्त्रात व कलेत या वेळी प्रगतीचा अभाव दिसून येतो. खेड्यामधून पंतोजी शाळा असत, त्यांचा फायदा ब्राम्हण, वैश्य व कायस्थ घेत असत. या काळात शिक्षणावर अंध:श्रद्धेचा पगडा बसल्यामुळे प्रगती खुंटली, पडदा पद्धती व बालविवाहामुळे स्त्रियांना शिक्षण मिळत नव्हते. ब्राम्हण वर्गास शिक्षण घेण्याचा अधिकार असे. शिक्षण ही त्यांची मक्तेदारी समजली जात असे. ब्राम्हणांशिवाय इतरांनी शिक्षण घेऊ नये, असा दंडकच होता. अस्पृश्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. शेतकऱ्यांच्या कुटुंबामध्ये मुले शिकल्यानंतर नोकरी करतील, मग शेती कोणी करावयाची अशी समजूत होती. शेती करणे खेड्यात प्रतिष्ठेचे समजले जात असे. महाराष्ट्रात इंग्रजी अंमल सुरू होईपर्यंत शिक्षणाकरिता सरकारी अथवा खाजगी व्यवस्था नव्हती. विद्वांनाना राजाश्रय मिळे अथवा दक्षिणा किंवा शालजोडी मिळे. विद्वानांनी शिष्य परंपरा निर्माण केली होती. शिक्षण म्हणजे धार्मिक शिक्षण हीच प्रामुख्याने कल्पना होती. पेशवाईच्या श्रावण मास दक्षिणा अंगीकारून

विद्वानांचा परामर्श घेतला जाई. व्यावहारिक शिक्षणासाठी तात्या पंतोजी शाळा त्या शहरात असे. मोठ्या खेड्यात शाळा असे पण आजच्यासारखी शाळा नसे. देऊळ, चावडी येथे शिक्षण शिकवत असत. घोकंपट्टीवर भर दिला जात असे. पंतोजींना दक्षिणा मिळे. मुलींना शिक्षण ही कल्पनाच नव्हती. पेशवाईच्या अंतःकाळी पुणे शहरात २२२ अशा शाळा होत्या. पेशवाईच्या काळात उच्चवर्णीयांचे धार्मिक आणि सामाजिक वर्चस्व होते. पुरोहित वर्ग बौद्धिक व धार्मिक कृत्य करीत होता. ईस्टइंडिया कंपनीने व्यापाराबरोबरच शिक्षणाचा प्रसार करण्याचे धोरण आखले व ख्रिस्ती धर्म प्रसाराचे हेतूने प्राथमिक शाळा स्थापन झाल्या. (Charity Schools गरीबांना मोफत शिक्षण देण्याकरीता शाळा.)

मुंबई इलाख्यात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी इ. स. १८१५ मध्ये मुंबई येथे 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची स्थापना करण्यात आली. तिचा मुख्य उद्देश गरिबांमध्ये शिक्षण प्रसर करणे हा होता. या संस्थेला माऊन्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांचा पाठिंबा होता. याच संस्थेच्या द्वारा देशी भाषेतून ग्रंथ निर्मिती करण्यासाठी एल्फिन्स्टनच्या प्रेरणेने इ. स. १८२० मध्ये 'दि नेटिव्ह स्कूल अँड स्कूल बुक कमिटी' या नावाची संस्था स्थापन केली. पण हिंदूंना बाटवण्यासाठी मिशनरी शाळा काढतात असे लोकांना वाटू लागले. त्यामुळे एलफिन्स्टनने जमशेटजी, जिजीभाई, नाना शंकर शेठ यांच्या आर्थिक सहकार्याने शाळा आणि पुस्तकमंडळी स्थापन केली. (२१ ऑगस्ट १८२१) १८२७ साली या संस्थेला 'द बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' असे नाव देण्यात आले.[१] इ. स. १८२४ साली इंग्रजी शाळा मुंबईत सुरू होऊन शाळेस 'एलफिन्स्टन' हायस्कूल नाव दिले. इ. स. १८३४ साली मुंबईला एल्फिन्स्टन कॉलेज सुरू झाले. 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' ने ठाणे, पनवेल येथे हायस्कूल्स काढली तर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात प्राथमिक शाळा सुरू केल्या. इ.स. १८५३ साली मुंबई प्रांतात २३३ प्राथमिक शाळा होत्या. जॉर्ज बेस्टो जर्व्हिस याने गणित शिल्प विद्यालय या नावाने इ.स. १८२३ मध्ये मुंबईतच इंजिनिअरींग स्कूल व एक मेडिकल कॉलेज स्थापन केले. संस्कृत भाषा व प्राचीन धर्मशास्त्रांचे अध्ययन करणाऱ्या पंडितांना विद्यावेतन दिले. ब्रिटीश सरकारच्या पुढाकाराने १८२१ साली पुण्यात 'संस्कृत पाठशाला' नावाची शिक्षण संस्था काढली. एकूण १०० ब्राम्हण विद्यार्थ्यांचीच शिक्षणाची सोय करण्यात आली.[२] इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारासाठी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी प्रयत्न केले. १८ व्या शतकाच्या शेवटी त्यांनी इंग्रजी शिक्षण देणारी स्कूल काढली होती. मुंबईला विल्सन कॉलेज काढले. नागपूर येथे अशाच शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. हिंदी जनतेस इंग्रजी शिक्षण दिले पाहिजे, या मताचा

पुरस्कार राजाराम मोहनरॉय यांनी केला. लॉर्ड विल्यम बेटींकने भारतीयांना पाश्चात्य शिक्षण इंग्रजी भाषेतून देण्यासाठी १८३४ मध्ये लॉर्ड मेकॉलेच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. समितीच्या अहवालानुसार लॉर्ड विल्यम बेंटींकने ७ मार्च १८३५ रोजी इंग्रजी शिक्षण देण्याबाबतचा कायदा केला.

इ. स. १८४० मध्ये मुंबई येथे 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' या संस्थेची स्थापना सरकारने केली. या संस्थेवर तीन सभासद बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे प्रतिनिधी होते. या संस्थेमुळे महाराष्ट्रातील शिक्षणाला मोठी चालना मिळाली व शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होऊ लागला. इंग्रजी व मराठी शाळेंच्या स्थापनेमुळे या काळात बाळशास्त्री जांभेकर आणि दादोबा पांडूरंग यांनी शिक्षण क्षेत्रात मोठी कामगिरी केली.[३] लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख), ज्योतीबा फुले, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीही यावेळी शिक्षण क्षेत्रात बहुमोल कामगिरी केली. न्यायमूर्ती रानडे यांनी पुण्यात हुजूरपागेची स्थापना केली. तेव्हा त्यांना थोडा विरोध झाला. रावसाहेब मंडलिक, न्या. रानडे, म.फुले, पंडिता रमाबाई यांनी मुलींच्या शिक्षणास सुरूवात केली. त्यापूर्वी शाळा न शिकल्यामुळे स्त्री शिक्षणाची प्रगती झाली नाही. इ.स. १८४२ साली मुंबई येथे मिशनऱ्यांनी मुलींसाठी शाळा काढली. इ.स. १८४५ साली एल्फिन्स्टन कॉलेजच्या तरूणांनी स्टुडंटस् लिटररटी व सायंटिफीक सोसायटीची स्थापना करून मुलींची शाळा मुंबईत सुरू केली.[४] जगन्नाथ शंकर शेठ, डॉ. भाऊदाजी, सर मंगलदास नथुभाई यांचा सोसायटीला पाठिंबा होता व महर्षी दादाभाई नौरोजी हे सोसायटीचे आधारस्तंभ होते.

महात्मा फुलेंनी महाराष्ट्रात स्त्री-शिक्षण, अस्पृश्यता निवारण व अस्पृश्य वर्गाचे शिक्षणविषयक कार्यास सुरूवाती केली. समाजातील गरीब व कष्टाळू दलित व पतित यांच्यावरील अन्यायास वाचा फोडण्यासाठी त्यांनाच प्रथम जागृत करावयास पाहिजे आणि अशी जागृती शिक्षणाशिवाय होऊ शकत नाही हे ज्योतिरावांनी अचूक जाणले. शिक्षण ही ब्राम्हण वर्गाची मक्तेदारी होती. जिथे मराठा शिकत नव्हते तिथे ज्योतिरावांनी शुद्रतिशुद्रासाठीच नव्हे तर त्यांच्या मुलांसाठी शाळा पुणे येथे सुरू करून सार्वजनिक जीवनास सुरूवात केली. मुलींच्या शिक्षणास हिंदु धर्माची अनुज्ञा नव्हती. अशा परिस्थितीत ज्योतिरावांनी अस्पृश्य मुलांची शाळा सुरू करून महाराष्ट्रातील कृतिशील सामाजिक क्रांतीची सुरूवात केली होती.

जॉन इलियट बेथूंट या डलहौसीच्या गव्हर्नर जनरल मंडळाच्या सदस्याने ७ मे १८४८ रोजी मुलींसाठी मुंबई येथे खाजगी शाळा काढली. वुडच्या खलित्यातील शिफारशीनुसार मुलींच्या शिक्षणाची शिफारस करण्यात आली. मुलींच्या शिक्षणाची बाब सरकारने खाजगी संस्थांकडे सोपविली. महत्मा फुलेंना रयत व अस्पृश्यांच्या सामाजिक कठिण आर्थिक गुलामगिरीच्या शृखंला तोडण्यासाठी शिक्षण हाच उपाय वाटत होता. आपल्यावरील अन्यायाचा प्रतिकार करण्याची शक्ती शिक्षणामुळेच या वर्गामध्ये निर्माण होईल, असे फुलेंचे मत होते. हिंदू धर्म संस्थेने शुद्रातिशुद्रावर शिक्षणाची बंदी घातली हा मोठा अन्याय होता. या अन्यायाने शुद्रातिशुद्रांचे कसे नुकसान झाले आहे, हे ज्योतिराव सांगतात.

''विद्याविना मती गेली । मती विना नीती गेली ।
नीती विना गती गेली । गती विना वित्त गेले ।।
वित्तविना शुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।''

म्हणून म. फुलेंनी अविद्येचा नाश करण्यासाठी शिक्षण प्रसाराला प्राधान्य दिले. सरकारच्या शिक्षण खात्याने उच्चवर्णीयांच्या उच्च शिक्षणावर खर्च करण्यापेक्षा बहुजन समाजाच्या सार्वत्रिक व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा अशी मागणी ज्योतिरावांनी सरकाराच्या सन १८८२ च्या हंटकरमिशन समोर केली. अशा सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची मागणी करणारे ज्योतिराव हिंदुस्थानातील पहिले सुधारक होते. शिक्षणाच्या सर्व सुविधा ब्राम्हणवर्गच घेतो. तो स्वयंकेंद्रित व स्वार्थी असल्याने शिक्षणाच्या झिरपण्याच्या सिद्धांताप्रमाणे शिक्षण खालच्या थरापर्यंत कधीच पोहचू शकणार नाही. सरकारने शुद्रातिशुद्रांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रीत करावे अशी मागणी ज्योतिरावांनी केली. इ. स. १८४८ साली ज्योतिबांनी पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली. १८५२ साली पुण्यालाच त्यांनी हरिजन मुलांसाठी शाळा सुरू केली. १८५३ पर्यंत ज्योतिरावांनी मुलींसाठी तीन शाळा सुरू केल्या.[५]

हिंदुस्थानातील इंग्रजी शिक्षण व्यवस्थेचा पद्धतशीर अभ्यास लॉर्ड डलहौसीच्या काळात झाला. डलहौसीच्या काळात १८५४ मध्ये सरचार्ल्स वूड याने शिक्षणविषयक खलिता प्रसिद्ध केला. या खलित्यानुसार इ.स. १८५५ मध्ये मुंबई येथे शिक्षण खात्याची स्थापना करण्यात आली. १८५७ मध्ये मुंबईला विद्यापीठाची स्थापना झाली.

बहुजनअज्ञानी समाजाला मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी वायव्य प्रांताचा ले. गव्हर्नर जेम्स थॉमसन याने १८४३ ते १८५३ या काळात प्रत्येक तालुक्यात प्राथमिक शाळा काढल्या. प्रारंभी मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्यांची विद्यार्थी संख्या तीस वरून तीस हजारापर्यंत गेली. एल्फिन्स्टनने बहुजन समाजासाठी मातृभाषा हे माध्यम असावे असा निर्णय घेतला.[६] सरकारने खाजगी संस्थांना अनुदान देणे सुरू केल्यामुळे खाजगी शिक्षण संस्था उदयास आल्या.

**मुंबई राज्यातील एकूण शिक्षणाचा प्रसार पुढील सारांशावरून दिसून येईल –**

सन १८४० मध्ये मुंबई इलाख्यातील शिक्षण संस्थांची संख्या ९७ होती. त्यामध्ये ५९४१ विद्यार्थी शिक्षण घेत होते व १८५२–५३ या काळात शिक्षण संस्था २४५ होत्या. एकूण विद्यार्थी १३७५७ होते.[७]

सन १८५४–५५ या काळात ४९ लक्ष विद्यार्थी शिक्षण घेत होते. यावेळी मुंबई इलाख्यात शिक्षणावर एकूण २८ कोटी रूपये खर्च झाला. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी संख्या ३३ लक्ष होती. प्राथमिक शाळेतील सक्तीच्या शिक्षण योजनेखाली असणारे विद्यार्थी १६ लक्ष होते. या काळात शेतकी महाविद्यालये तीन, व्यापार महाविद्यालये अकरा, कायद्याची महाविद्यालये सात, वैद्यकीय महाविद्यायलये पंधरा होती.

सर चार्ल्स वूडच्या खलित्यापासून (१८५४ ते हंटर कमिशनपर्यंत (१८८२) महत्वाच्या गोष्टी शिक्षण क्षेत्रात घडूल आल्या. या काळात माध्यमिक व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या वाढत होती. तसेच शिक्षण क्षेत्रामध्ये हिंदी लोकांचा सहभाग वाढला. त्याचबरोबर सरकारचे प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. यातच याच काळात ख्रिस्ती मिशनऱ्यांची शिक्षण क्षेत्रात पिछेहाट झाली.

सन १८८० नंतर राष्ट्रीय शिक्षणाचे प्रवाह वाहू लागले. लोकमान्य टिळक, आगरकर, चिपळूणकरांनी शिक्षणप्रसारास वाहून घेतले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे व शिक्षण प्रसारक मंडळी ह्या पुण्यामधील संस्थांचा पश्चिम महाराष्ट्रातील शिक्षण प्रसारात मोठा सहभाग राहिला. महात्मा फुलेंनी बहुजन समाजाला वरिष्ठ वर्गाच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी व जातीभेद नष्ट करण्यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या सहाय्याने अस्पृश्यांमध्ये शिक्षण प्रसाराचे कार्य म. फुले यांनी केले.[८]

**महात्मा फुलेंच्या काळात ब्रिटीशांनी शिक्षण विषयक काहीशी प्रगती केल्याचे दिसून येते–**

१८८१ मध्ये शिक्षणावर ७० लाख खर्च होते. त्यापैकी १७.७७ लाख प्राथमिक शिक्षणावर खर्च केले गेले. २१ लाख विद्यार्थी शिक्षण घेत होते. १८८१–८२ च्या काळात माध्यमिक शाळा १३६२ होत्या व विद्यार्थी संख्या ४४,६०५ इतकी होती. १८८२ साली ८२ महाविद्यालये होती. या काळात मॅट्रीकची परिक्षा देण्याऱ्यांची संख्या २७७८ इतकी होती.[९]

लॉर्ड रिपनने शिक्षण कार्यास गती देण्यासाठी सर चार्लस वूडच्या खलित्याखाली शिफारशी स्वीकारल्या. हंटर कमिशनने ग्रामीण भागातील मागास जाती–जमातींना शिक्षणाची सुविधा द्यावी असा आग्रह धरला, त्यामुळे लॉर्ड रिपनच्या काळात शिक्षण प्रसाराला गती मिळाली. परंतु फार मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात शिक्षण प्रसाराचे काम होऊ शकले नाही. इंग्रज राजवटीमध्ये शहरी भागातील वरिष्ठ वर्गानांच शिक्षणाची संधी मिळाली. त्यामुळे वरील वर्गाचा समाजावर पगडा बसून बहुजन समाज अज्ञानी व अडाणी राहिला होता.

शिक्षण हे सार्वत्रिक झाले पाहिजे. बहुजन समाजास ते मिळाले पाहिजे, शिक्षणाशिवाय तो आर्थिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त होणार नाही हे लक्षात घेऊन सामाजिक समतेसाठी म. फुले, विठ्ठल रामजी शिंदे, महर्षि आण्णासाहेब कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आगरकर, रानडे, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी शैक्षणिक संस्था सुरू केल्या.

**५ कर्मवीर भाऊराव पाटील यांचे ऐतिहासिक शैक्षणिक योगदान –**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रातील बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहचविण्याचे कार्य केले. सामाजिक परिवर्तन ही त्यांच्या शैक्षणिक कार्याची मुख्य प्रेरणा होती. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यार्थी म्हणून कोल्हापूरात शिक्षण घेत होते तेव्हापासून त्यांचा सत्यशोधक समाजाच्या विचारप्रणालीशी संबंध आला. त्यामुळे सामाजिक विषमता व अन्यायाविषयी त्यांच्या मनात मनस्वी चीड होती. पुढे किर्लोस्कर कंपनीचे अधिकृत विक्रेते म्हणून त्यांना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरावे लागले. तेव्हा सर्वसामान्य लोकांशी त्यांचा जास्त जवळून संबंध आला. तेथील बहुजन समाजाचे दैन्य, अज्ञान, अंधश्रद्धा इ. गोष्टींचे त्यांनी बारकाईने अवलोकन केले. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, आर्थिक दुरावस्था दूर करण्यासाठी त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे असे कर्मवीरांना वाटत होते. म्हणून त्यांनी शैक्षणिक कार्यास सुरूवात केली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर महात्मा फुले यांचा प्रभाव होता, म. फुले यांनी महाराष्ट्रातील बहुजन समाजात वैचारिक जागृती घडवून आणली. बहुजन समाजाला वरिष्ठ वर्गाच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्याद्वारे बहुजन समाजाला संघटित करण्याचा प्रयत्न केला व बहुजन समाजाला आपल्या हक्कांची जाणीव करून दिली. महाराष्ट्रात स्त्री–शिक्षण, अस्पृश्यांसाठी शाळा उघडून त्यांनी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. शेतकऱ्यांची दुःखे वेशीवर टांगली. फुले यांचेप्रमाणेच कर्मवीरांनी बहुजन समाजातील लोकांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्यासाठी समाजाच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले.

छत्रपत राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव कर्मवीर भाऊराव यांच्यावर पडला होता. राजवाड्यातील वास्तव्यात त्यांना छत्रपतींच्या लोकहित कार्याची माहिती मिळाली. गोरगरीब आणि अस्पृश्य यांच्यासाठी छत्रपतींनी केलेले कार्य त्यांना पहावयास मिळाले. दलित वर्गाच्या सुधारणांसाठी तसेच बहुजन समाजाच्या हितासाठी राजर्षींनी केलेल्या कार्याने कर्मवीर आण्णा प्रभावीत झाले. महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या दोन नेत्यांचे कार्य व विचार यांचा कर्मवीर आण्णा यांच्यावर मोठा प्रभाव होता. या प्रभावातून त्यांनी बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजाच्या उद्धारासाठी शैक्षणिक कार्य हाती घेतले. कर्मवीरांनी सांगली जिल्हयातील दुधगाव येथील ग्रामस्थांच्या सहकार्याने १९१० साली 'दुधगांव शिक्षण प्रसारक संस्था' स्थापन केली. याचवर्षी 'दुधगांव विद्यार्थी आश्रम' नावाचे वसतिगृह सुरू केले.[१०] सदरचे वसतिगृह दुधगांव शिक्षण प्रसारक संस्थेमार्फत चालविले जाऊ लागले. या वसतिगृहामध्ये सर्व जाती, धर्म, पंथ व वर्गाचे विद्यार्थी राहत होते. या वसतिगृहासाठी व्यापारी व शेतकऱ्यांनी साहाय्य केले. दुधगांव येथील 'दुधगांव शिक्षण प्रसारक संस्था' आणि 'दुधगांव विद्यार्थी आश्रम' यांच्या कार्यातील भाऊरावांचा सक्रिय सहभाग म्हणजे त्यांच्या भावी शैक्षणिक कार्याचा पायाच होय.

## ५.३ रयत शिक्षण संस्थेचा इतिहास

### १. संस्थेची स्थापना –

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे हे ओळखून आम जनतेच्या शिक्षणासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन १९१९ मध्ये काले, जि. सातारा येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. गौतम बुद्धाचा मागोवा घेत व महात्मा फुले, महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, संत गाडगे महाराज यांना

वाट पुसत शिक्षणप्रसार व समाजप्रबोधन यासाठी कर्मवीरांनी हयात वेचली. अन्न, वस्त्र व निवारा याप्रमाणे शिक्षण ही सुद्धा मानवाची मूलभूत गरज आहे व सर्वांना शिक्षणाची समान संधी लाभली पाहिजे या ध्येयाने प्रेरित होऊन जात, गोत, धर्म, पंथ इत्यादी सामाजिक भेद नष्ट करून समता, बंधुता व मानवता याकडे स्वावलंबनाने संस्थेची वाटचाल सुरू आहे. यासाठी कर्मवीर भाऊराव यांच्यावर श्रद्धा असणारे सेवक व हितचिंतक यांच्या सहकार्याने संस्थेचा विस्तार व विकास सातत्याने चालू आहे.

**२. वसतिगृहे –**

नव्या मनुतील नव्या दमाचा मानव घडविण्यासाठी योग्य असे सुसंस्कार वसतिगृह–जीवनातच करता येतात, या धारणेने कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ अण्णा यांनी वसतिगृहाच्या स्थापनेने संस्थेच्या कार्याला सुरूवात केली. संस्थेच्या स्थापनेबरोबरच सन १९१९ मध्ये काले (जि. सातारा) येथे पहिले वसतिगृह स्थापन झाले. १९२१ साली नेर्ले (जि. सांगली) या ठिकाणीही वसतिगृह सुरू केले. संस्थेच्या स्थापनेपूर्वीही अण्णांचे शैक्षणिक प्रयोग सुरू होते. त्याचा भाग म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेपूर्वी सुमारे दहा वर्षे दुधगांव (जि. सांगली) येथे वसतिगृह चालविले होते.[११]

सातारा येथे १९२४ साली हरिजन विद्यार्थी घेऊन वसतिगृह सुरू केले. १९२७ साली महात्मा गांधी यांच्या शुभहस्ते त्याचे 'श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस' असे नामाभिधान झाले.[१२] विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या सोईसाठी १९३२ साली गांधी–आंबेडकर कराराच्या स्मृत्यर्थ पुणे येथे 'युनियन बोर्डिंग हाऊस' ची स्थापना केली. स्वातंत्र्यपूर्व काळातही या सर्व वसतिगृहांतून मागासलेल्या समाजातील विद्यार्थ्यांसह अठरापगड जातींच्या विद्यार्थ्यांना एकत्र राहण्याचे, जेवणाचे व काम करण्याचे धडे दिले. कोर्ट कमिटेड विद्यार्थी वेगळे न ठेवता त्यांना इतर विद्यार्थ्यांत समाविष्ट करून त्यांच्यावर सुसंस्कार करण्याचा यशस्वी प्रयोगही केला.

आजही संस्थेच्या शैक्षणिक शाखांना जोडलेल्या, मुला–मुलींच्या ७५ वसतिगृहात सर्व भेदरहित व काहींमध्ये 'कमवा आणि शिका' या तत्वावर आधारित अशी व्यवस्था आहे.[१३]

**३. शिक्षकांचे प्रशिक्षण –**

'शाळेविना खेडे असू नये व प्रशिक्षित शिक्षकाविना शाळा असून नये' ही अण्णांची धारणा होती. सातारा जिल्हयातील प्राथमिक शिक्षणाची सार्वत्रिक सोय करण्याची पूर्वतयारी म्हणून १९३५ साली सातारा येथे संस्थेतर्फे 'सिल्व्हर ज्युबिली रूरल

ट्रेनिंग कॉलेज' (सध्याचे 'महात्मा फुले अध्यापक विद्यालय') या प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या अध्यापन विद्यालयाची स्थापना झाली. ही संस्थेची पहिली शैक्षणिक शाखा. संस्थेमार्फत सध्या एकूण ८ अध्यापक विद्यालये चालविली जात आहेत. त्यांपैकी एक विना अनुदान तत्वावर चालविले जाते.

पूर्व माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी सन १९४८ साली सातारा येथे टी.डी. चा वर्ग उघडला. इतर ठिकाणाही काही काळी टी.डी. चे वर्ग सुरू होते. संस्थेने काही काळ 'हिंदी शिक्षक सनद' चे वर्गही चालविले होते.

पदवीधर माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी १९५५ साली सातारा येथे अध्यापक महाविद्यालयाची स्थापना केली. नंतर त्याचे 'आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन' असे नामाभिधान झाले.[१४] १९७० साली श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर येथे 'स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन' सुरू केले. या दोन्ही महाविद्यालयांतून हल्ली पदव्युत्तर शिक्षणाची सोय आहे.

**४. प्राथमिक शिक्षण –**

धोंडेवाडी, ता. कराड, जि. सातारा येथे संस्थेने १९१९ साली एक प्राथमिक शाळा चालविली होती. १९३६ साली कै. रावबहादूर रामचंद्र रावजी काळे यांच्या स्मरणार्थ संस्थेने सातारा येथे प्राथमिक शाळा स्थापन केली. प्रत्येक खेड्यात शिक्षण उपलब्ध व्हावे, या उद्देशाने शाळाविरहित खेडयात संस्थेने १९३८ पासून व्हॉलंटरी शाळा उघडण्यास सुरूवात केली. प्रामुख्याने सातारा जिल्ह्याच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागात व पूर्वेकडील दुष्काळी भागात या शाळा सुरू केल्या आणि ध्येयवादी, त्यागी व निष्ठावंत शिक्षकांच्या व ग्रामस्थांच्या सहकार्याने या शाळा चालविल्या. अशा शाळांची संख्या ५७८ पर्यंत वाढली होती. या विराट योजनेने संस्थेच्या पायाभरणीचे काम मजबूत झाले. स्वातंत्र्योत्तर काळात प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शासनाने स्वीकारल्यामुळे शिक्षकांसह या शाळा लोकल बोर्डाकडे सूपूर्द केल्या. सध्या ही संस्था १२ प्राथमिक शाळा चालविते. यापैकी ५ ठिकाणी इंग्रजी माध्यम आहे. १२ पैकी ९ प्राथमिक शाळा विनाअनुदान तत्वावर चालू आहे.

**५. माध्यमिक शिक्षण :–**

प्राथमिक शिक्षणाच्या पाठोपाठ संस्थेने माध्यमिक शिक्षणाचे काम हाती घेतले. १९४० साली सातारा येथे 'महाराजा सयाजीराव विद्यालय' या 'मोफत आणि निवासी' माध्यमिक शाळेची स्थापना केली. सर्व विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहावे लागत

असे व सर्वांना शारीरीक श्रमाची कामे करावी लागत, त्यामुळे स्वावलंबन व श्रमाची प्रतिष्ठा वाढण्यास मदत झाली. परंतु बदलेल्या परिस्थितीत ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणासाठी सातारा येथे येणे अशक्य होऊ लागले. यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांच्या गावीच माध्यमिक शाळा उघडण्याचा सपाटा सुरू केला. कर्मवीर अण्णा यांनी १९४८ साली महात्मा गांधी यांच्या स्मरणार्थ संस्थेतर्फे १०१ माध्यमिक विद्यालये सुरू करण्याची घोषणा केली. इतर जिल्ह्यांतून संस्थेकडे अर्ज येऊ लागले.[१५]

सध्या महाराष्ट्रातील तेरा व कर्नाटकातील एक अशा चौदा जिल्ह्यांत मिळून संस्था ३३३ माध्यमिक विद्यालये चालवित आहे. मध्यंतरी नवीन माध्यमिक शाळा उघडण्यास परवानगी न देण्याच्या शासकीय धोरणामुळे संस्थेने २२ ठिकाणी भागशाळा सुरू केल्या आहेत. ३३३ पैकी विनाअनुदान तत्वावर १३ माध्यमिक शाळा सुरू आहेत.

**६. उच्च शिक्षण –**

स्वातंत्र्यपूर्व काळात संस्थेच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी पुणे, मुंबई, कोल्हापूर, बडोदा इत्यादी ठिकाणी जावे लागे. यामुळे अनेक हुशार पण गरीब विद्यार्थी उच्च शिक्षणास मुकत असत. त्याकरिता संस्थेने १९४७ साली सातारा येथे 'छत्रपती शिवाजी कॉलेज' या 'मोफत आणि निवासी' कॉलेजची स्थापना केली.[१६] सर्व विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहावे लागे व शारीरिक श्रमांची कामेही करावी लागत. कॉलेज सर्वांसाठी खुले झाल्यानंतरही विद्यार्थ्यांसाठी 'कमवा आणि शिका' ही योजना सुरू आहे.

ज्या वेळी महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याच्या गावीही कॉलेज नव्हते, अशा वेळी सैदापूर, ता. कराड या लहान खेड्यात संस्थेने 'सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज' सुरू केले. आर्टस, सायन्स व कॉमर्सचे शिक्षण देणारी महाविद्यालये, प्रशिक्षण देणारी महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालय व विधी महाविद्यालय मिळून सध्या संस्थेमार्फत ४० महाविद्यालये चालविली जातात.[१७]

वरीलपैकी १६ महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर शिक्षणाची सोय करण्यात आली आहे. एम.ए., एम.एस्सी., एम. कॉम., एम. एड., एम. बी.ए., डी. बी.एम. इत्यादी पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविले जातात. शासनाच्या धोरणामुळे ७ महाविद्यालये विनाअनुदान तत्तावर चालवावी लागत आहेत.

## ७. उच्च माध्यमिक शिक्षण –

महाराष्ट्र शासनाने १९७२ पासून १०+२+३ आकृतिबंध स्वीकारला. त्याचा परिणाम म्हणून माध्यमिक विद्यालयांतील इ. ११ वी चे वर्ग १९७५ पासून बंद झाले व उच्च माध्यमिक शिक्षणातील इ. ११ वी (एफ.वाय.जे.सी.) चे वर्ग सुरू झाले. नंतर महाविद्यालयांतील प्रीडिग्रीचे वर्ग १९७६ पासून बंद झाले व इयत्ता १२ वी (एस.वाय.जे.सी.) चे वर्ग सुरू झाले. संस्थेच्या ११३ माध्यमिक विद्यालयांमध्ये व २० महाविद्यालयांमध्ये हल्ली ११ वी व १२ वी चे वर्ग सुरू आहेत.[१८]

## ८. तांत्रिक शिक्षण –

शिक्षण हे केवळ पुस्तकी न राहता ते मानवाला स्वावलंबानाने जगण्यास समर्थ करणारे असावे अशी कर्मवीर अण्णांची धारणा होती. संस्थेचे काही विद्यार्थी त्यांनी धंदेशिक्षण शाळेत घातले होते. शिवाय ओगले, किर्लोस्कर आणि कूपर कारखान्यांतील अण्णांचा स्वतःचा अनुभव जमेस होताच, त्याचाही उपयोग झाला.

काही माध्यमिक विद्यालयांतून संस्थेने तांत्रिक शिक्षणाचे विभाग सुरू केले व तांत्रिक शिक्षणासाठी आठवड्यातून एक दिवस विद्यार्थ्यांना शासकीय तांत्रिक शाळांत पाठविले. आज संस्थेच्या २० माध्यमिक विद्यालयात वर्कशॉपसह परिपूर्ण तांत्रिक विभाग सुरू आहेत. त्यांपैकी १७ ठिकाणी हे विभाग विनाअनुदान तत्वावर चालतात. काही ठिकाणी संस्थेच्या स्वतंत्र तांत्रिक शाळा सुरू आहेत. ज्युनिअर कॉलेज विभागात तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाची सोय करण्यात आलेली आहे.

सातारा येथे १९८३ पासून विनाअनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन सुरू केले आहे. कर्मवीर जन्मशताब्दीच्या सांगता समारंभप्रसंगी या महाविद्यालयाचे ‘कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालय’ असे नामकरण झाले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयात (१) कन्स्ट्रक्शन/सिव्हील इंजिनिअरींग (२) प्रॉडक्शन इंजिनिअरींग (३) इलेक्ट्रॉनिक्स व तंत्रनिकेतन विभागात (१) कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी (सिव्हील) (२) प्रॉडक्शन इंजिनिअरींग (३) डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स या विषयांची सोय केली आहे.[१९]

अभियांत्रिकी महाविद्यालयात एम. ई. व्हेकेशनल (कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहे.

याशिवाय (१) कॉम्प्युटर प्रोग्रॅमिंग अॅड सिस्टिम अॅनॅलिसीस सर्टिफिकेट कोर्स व (२) रेडिओ अॅण्ड टी. व्ही. रिपेअरींग अँड सर्व्हिसींग कोर्स हे अल्पमुदतीचे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू आहेत.

**९. स्त्री शिक्षण –**

राष्ट्राच्या उभारणीसाठी स्त्री वर्गाच्या शिक्षणाची अधिक आवश्यकता आहे, याची जाणीव अण्णांना प्रथमपासूनच होती. संस्थेच्या व्हॉलंटरी शाळांपैकी काही शाळा फक्त मुलींच्यासाठी चालविल्या जात होत्या. संस्थेचे पहिले अध्यक्ष हमीद अली यांच्या सुविद्य पत्नी सौ. शरीफा बेगम यांनी अण्णांच्या स्त्रीशिक्षणाच्या कार्याला विशेष प्रोत्साहन दिले. आवश्यक अशी स्त्री–शिक्षिका तयार करण्यासाठी संस्थेने १९४२ साली सातारा येथे जिजामाता अध्यापिका विद्यालयाची स्थापना केली. त्याच वर्षी कै. सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या स्मरणार्थ सातारा येथे मुलींच्या वसतिगृहाची सोय केली. डॉ. आंबेडकर यांच्या मातुश्री सौ. भिमाबाई यांच्या स्मरणार्थ सातारा येथेच १९६० साली मुलींसाठी एक माध्यमिक विद्यालय सुरू केले. सध्या संस्थेमार्फत केवळ मुलींसाठी ९ वसतिगृहे, १ अध्यापिका विद्यालय, १४ माध्यमिक शाळा व ४ महिला महाविद्यालये चालविली जात आहेत.[२०]

**१०. पूर्वप्राथमिक शिक्षण –**

पूर्वप्राथमिक शिक्षणाचे महत्व ओळखून सातारा येथे संस्थेने १९५४ पासून एक बालवाडी व एक बालवसतिगृह चालविले होते. सध्या १२ ठिकाणी मराठी माध्यमाच्या बालवाड्या चालविल्या जात आहेत. तसेच वाशी (नवी मुंबई), करंजे (जिल्हा रायगड), कराड (जिल्हा सातारा), शिरूर (जिल्हा पुणे) व शिंदेवाडी (जि. सोलापूर) या ५ ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या बालवाड्या चालविल्या जात आहेत. मराठी व इंग्रजी माध्यमांच्या मिळून संस्थेमार्फत एकूण १७ बालवाड्या चालविल्या जात आहेत. या सर्व विनाअनुदान तत्वावर सुरू आहेत.[२१]

**११. प्रौढ शिक्षण –**

बालकांच्या शिक्षणाइतकेच पालकांचे शिक्षण महत्वाचे आहे. या जाणिवेने संस्थेने शासनाच्या सहकार्याने प्रौढ स्त्री–पुरूषांसाठी साक्षरतेचे व सामाजिक शिक्षणाचे वर्ग चालविले आहे.

**१२. संस्थेचे प्रशासकीय विभाग –**

संस्थेचे कार्य सुरूवातीला सातारा जिल्ह्यापुरते मर्यादित होते. संस्थेच्या कार्याचा विस्तार होत गेला. तसे कार्यक्षेत्रही विस्तृत होत गेले. प्रशासनाच्या सोईसाठी संस्थेच्या कार्यक्षेत्राचे चार विभाग केले आहेत. विभागवार जिल्हे पुढीलप्रमाणे.

१) मध्य विभाग :– सातारा व सोलापूर
(सातारा)

२) दक्षिण विभाग :– सांगली, कोल्हापूर, बेळगांव, रत्नागिरी व सिंधुदुर्ग
(सांगली)

३) उत्तर विभाग :– अहमदनगर, नाशिक व बीड
(अहमदनगर)

४) पश्चिम विभाग :– पुणे
(पुणे)

५) रायगड विभाग :– रायगड, ठाणे, बृहन मुंबई
(पनवेल)

याशिवाय सातारा येथे मध्यवर्ती कार्यालयात ऑडिटचा स्वतंत्र विभाग आहे. [२२]

संस्थेच्या कार्याचा विस्तार व विकास विशाल वटवृक्षाप्रमाणे झालेला आहे. संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती झाली आहे. याचे श्रेय प्रामुख्याने संस्थेचे द्रष्टे संस्थापक कर्मवीर आण्णा, त्यांनी घालून दिलेले ध्येयधोरण व कार्यपद्धती यांना आहे. संस्थेचे ध्येयधोरण व कार्यपद्धती आणि संस्थेचे हितचिंतक, कार्यकर्ते, शाखाप्रमुख, सेवक व विद्यार्थी या सर्वांच्या प्रयत्नांचे फलित म्हणजे आजची रयत शिक्षण संस्था आहे.

**५.४ कर्मवीर भाऊराव पाटील : शंकरराव काळे यांचे प्रेरणास्थान**

कर्मवीर भाऊराव पाटील यांना ज्यांनी प्रत्यक्ष काम करताना बघितले त्या सुदैवी लोकांपैकी शंकरराव काळे हे आहेत. कर्मवीरांबरोबर त्यांचा संपर्क १९४८ च्या सुमारास आला. शिक्षण प्रसारासाठी अहोरात्र झटणाऱ्या या ऋषीतुल्य व्यक्तिमत्वाने शंकरराव भारावले होतेच. कारखाना सुरू झाल्यावर १९५७ साली कर्मवीर भाऊराव पाटील कोपरगाव साखर कारखान्यावर शंकररावांना भेटायला आले. शंकररावांच्या आयुष्यातला तो अत्यंत महत्वाचा दिवस होता. एवढेच नव्हे तर कर्मवीर शंकररावांच्या माहेगांव देशमुख येथील वस्तीवर मुक्कामीही आले.[२३] यावेळी आण्णा शंकररावांना म्हणाले ''शेतकऱ्यांसाठी कारखाना काढलास ही अभिनंदनीय गोष्ट आहे. तू

शेतकऱ्यांसाठी झटतोस, मी त्यांच्या मुला-मुलींसाठी शिक्षण मिळावे म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून गोरगरीब पद दलितांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करतो आहे. रयत महाराष्ट्रात काम करते आहे. सर्वांना शिक्षण मिळावे हा उद्देश आहे. नगर जिल्हा पुरोगामी विचारांचा आहे. तुम्ही रयतच्या कामास हातभार लावावा, अशी विनंती करायला आलो आहे. रयतचे काम मोठे आहे. त्यासाठी आर्थिक मदतीची गरज आहे. सरस्वती आणि लक्ष्मी हातात हात घालून शेतकऱ्यांच्या झोपडीपर्यंत गेली पाहिजे. शिक्षणाची जोड नसेल तर आर्थिक सुबत्तेचा उपयोग नाही.''[२४] कर्मवीरांच्या या उपदेशाचा शंकररावांवर फार मोठा परिणाम झाला. याबाबत शंकरराव म्हणतात की, ''कर्मवीरांच्या उपदेशाचा माझ्यावर फार चांगला परिणाम झाला. त्यांनी सांगितलेल्या मंत्रांचे मी आजपर्यंत काटेकोरपणे पालन करीत आहे. तो दिवस माझ्या जीवनाला कलाटणी देणारा ठरला आहे. मनात आणले असते तर मी व्यक्तीगत जीवनात फार मोठी झेप घेतली असती. पण कर्मवीर आण्णांच्या भेटीने स्वार्थाकडे पाठ फिरवून मला समाजसेवेची जी दीक्षा दिली. ती निष्ठेने आजपर्यंत सांभाळत आलो आहे.''[२५]

''मला तुम्ही खळ्यातलं मातेरं द्या आणि धान्य तुम्हाला ठेवा'' म्हणजे शिक्षणप्रसारासाठी रयत शिक्षण संस्थेला कारखान्यामार्फत थोडी मदत करा. शंकररावांनी कर्मवीरांचा हा शब्द प्रमाण मानला. त्यांनी थोडी नाही तर भरघोस मदत केली. स्वतः नव्या शाळा काढल्या, इतरांना शाळा सुरू करायला मदत केली व रयत शिक्षण संस्थेच्या शाळांचा प्रसार केला. प्रसंगी पदरमोड करून अनेक शाळा-महाविद्यालये सुरू केली. हे सर्व करत असताना त्यांनी कसलाही हेतू मनात ठेवला नाही. म्हणून आशियातील सर्वात मोठी शिक्षण संस्था म्हणून नावाजलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमन या पदावर काम करण्याची त्यांना संधी मिळाली ही त्यांच्यासाठी सर्वात महत्वाची बाब होती. प्रसिद्धीपासून दूर राहण्याच्या स्वभावाने त्यांनी केलेल्या भरीव कामाची नोंद अक्षर साहित्यात झाली नसली तरीही पुढच्या अनेक पिढ्यांसाठी ते काम अनमोल ठेवा ठरले आहे. 'शहाणे करून सोडावे सकळ जन' ही उक्ती प्रत्यक्षात आणत ते सतत झटले. रयत शिक्षण संस्था त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता.

### ५.५ शंकरराव काळे यांचे संस्थात्मक कार्य -

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट गाठायचे असेल तर त्यात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. शिक्षणाची गंगा ग्रामीण भागात पोहोचली नाही तर विकास साधण्यात मोठीच अडचण येते. स्वातंत्र्यापूर्वी महात्मा

ज्योतीबा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांसारख्या मोजक्या महामानवांनी शिक्षणाचे महत्व ओळखले होते. हे महामानव कृतीशील विचारवंत होते. त्यामुळे बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहचवण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. स्वातंत्र्यानंतर सरकारने शिक्षण ही आपली जबाबदारी मानली आणि त्यामुळे शिक्षणाचे मोठ्याप्रमाणात सार्वत्रिकरण झाले. अर्थात, शिक्षण खेड्यापाड्यात पोहोचण्यासाठी ध्येयनिष्ठ आणि दमदार कार्यकर्त्यांची फळी आवश्यक होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेसारख्या तळमळीने काम करणाऱ्या संस्थेची गरज होती. नगर जिल्ह्यात भाऊराव पाटलांचे दोन प्रमुख कार्यकर्ते सांगता येतील. एक होते त्यांचे सहकारी कर्जतचे दादापाटील आणि दुसरे अनुयायी कोपरगावचे शंकरराव काळे.

कर्मवीरांच्या प्रेरणेने शंकरराव काळे यांनी नगर जिल्ह्यात खेड्यापाड्यात शिक्षणप्रसाराचे मोठे काम केले. शंकररावांनी आयुष्यात महत्वाच्या अनेक जबाबदाऱ्या पार पाडत असताना आपल्या शैक्षणिक कार्याकडे अजिबात दुर्लक्ष होऊ दिले नाही. कर्मवीर भाऊराव पाटलांची शिक्षणाविषयीची तळमळ त्यांनी स्वतःच्या अंगी भिनवून घेतली होती. त्यामुळे कर्मवीरांचा आदर्श मनात जागता ठेवून शंकरराव आयुष्यभर शिक्षण प्रसार करू शकले.

खेड्यापाड्यात बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहचवण्याचा कर्मवीरांचा संदेश जसा त्यांनी अंगी बाणवलेला दिसतो. त्याचप्रमाणे गुरूकुल पद्धतीची इंग्रजी माध्यमाची एक शाळा काढून शेतकऱ्यांच्या मुलांना आत्मविश्वासाने जगासमोर जाण्याची ताकदही त्यांनी दिलेली दिसते. शंकरराव काळे यांच्या हातात आयुष्यभर एवढी सत्ता होती की त्यांनी मनात आणले असते तर ते शिक्षण सम्राट बनू शकले असते. स्वतःच्या एखाद्या संस्थेमार्फत शाळा–कॉलेजस काढून ते स्वतःचे वेगळे विश्व निर्माण करू शकले असते. परंतु त्यांनी या प्रक्रियेपासून स्वतःला दूरच ठेवलं. रयतसारखी कर्मवीरांनी सुरू केलेली संस्था असताना स्वतःचा सवता सुभा त्यांनी उभा केला नाही. खेड्यापाड्यातील गोरगरीब मुलामुलींना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळाले पाहिजे या तळमळीपोटी त्यांनी ‘रयत’ मार्फत काम केले.[२६] त्यांनी रयतच्या शाळांना जागा मिळवून दिली. इमारती बांधून दिल्या आणि नंतर ते रयत शिक्षण संस्थेचे चेअरमनच बनले. अमुक एका गावात शाळा सुरू करायची आहे असे कळले की मदतीसह शंकरराव तिथे हजर असायचे. शिक्षणाचे इतके महत्व त्यांना वाटत असे.

शंकरराव काळे यांनी ज्याप्रमाणे रयतचे काम समरसून केले त्याचप्रमाणे गौतम पब्लिक स्कूल ही आधुनिक शाळाही झपाटयाने विकसित केली. ही दोन्ही कामे करत असताना बहुजन समाजाच्या विकासाचा विचार त्यांनी कधी सोडला नाही. त्यांच्या डोळ्यांसमोर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा आदर्श होता. शंकररावांवर ज्याप्रमाणे यशवंतराव चव्हाण यांचा अमीट ठसा उमटला आहे, तसा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर कर्मवीरांचा प्रभाव पडला आहे. शंकरराव कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत गुंतलेले असताना त्यांची आणि कर्मवीरांची जी भेट झाली आणि त्यांनी जो संदेश दिला तो शंकररावांनी आयुष्यभर उरी बाळगला. कर्मवीरांचे व्यक्तिमत्वच तेवढे थोर होते. त्यांच्या संपर्कात जे यायचे ते शिक्षणाच्या पवित्र कामाने झपाटून जायचे.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे हे ओळखून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आम जनतेच्या शिक्षणासाठी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी सातारा जिल्ह्यातील काले येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली होती. कर्मवीर भाऊराव पाटील याचं जीवन म्हणजे सामाजिक अन्याय, जन्मधिष्ठित उच्चनीचता, अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा या सर्वांविरूद्ध पुकारलेले एक बंड होते. ऐन तारूण्यात ते महात्मा जोतीराव फुल्यांच्या सत्यशोधक समाजाच्या विचारसरणीने झपाटलेले होते. शिक्षण घेणं कोणत्याही विशिष्ट जातीची मक्तेदारी असू शकत नाही हा अण्णांचा रास्त आग्रह होता. शिक्षण हे मूठभर भाग्यवंतापुरतेच मर्यादित न राहता ते समाज्यातल्या यच्चयावत मुलांमुलींपर्यंत पोहोचलं पाहिजे हा त्यांचा विचार फुले यांच्या शिकवणुकीवर आधारलेला होता. हाच विचार प्रत्यक्षात उतरवण्यसाठी त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. समाजात जी विषमता दिसून येते ती बुद्धीची विषमता नसून संधीची विषमता आहे असा अण्णांचा दावा होता. ही संधीची विषमता दूर करून अठरापगड जातीतील मुलामुलींना शिक्षण घेण्याची व त्यांच्या अंगातल्या सुप्त शक्तींचा विकास करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबरोबर तळागाळातल्या कुटुंबातील मुले विश्वविद्यालयीन परीक्षांमध्ये पुढे जाऊ शकतात हे कर्मवीर अण्णांनी सिद्ध करून दाखवले. एवढेच नव्हे तर त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ज्ञानाची गंगा गोरगरीब, शेतकरी आणि बारा बलुतेरांच्या झोपडीपर्यंत नेण्याचे ऐतिहासिक काम करून ग्रामीण महाराष्ट्राचा एकूण चेहरामोहराच बदलून टाकला.

कर्मवीर भाऊराव पाटील हे करू शकले कारण त्यांचे कार्य केवळ शिक्षणप्रसारापुरतेच मर्यादित नव्हते. एक नवा माणूस, एक नवा समाज निर्माण करण्याच्या कल्पेनेने ते झपाटलेले होते. जन्माधिष्ठित उच्चनीच व जातीपाती यांना मूठमाती देणे हे कर्मवीरांच्या कार्याचे एक अंग होते. त्याचबरोबर 'सर्वांसाठी शिक्षण' हे त्यांच्या कार्याचे दुसरे अंग होते. ते करताना इतरांप्रमाणे थेट हायस्कूल किंवा महाविद्यालये काढली नाहीत. त्यांनी अठरापगड जातींच्या मुलांसाठी वसतिगृह सुरू करून, ज्या खेड्यापाड्यात प्राथमिक शाळा देखील नव्हत्या अशा ठिकाणी व्हॉलंटरी प्राथमिक शाळा सुरू केल्या. त्यांनी आपली सर्व शक्ती जनतेच्या प्राथमिक शिक्षणासाठी खर्च केली. थोडक्यात सांगायचे तर कर्मवीर अण्णांनी झाडाच्या शेंडयाला खत घालण्याऐवजी ते बुंध्याला घालण्याचा रास्त आग्रह शैक्षणिक क्षेत्रात धरलेला होता. एक प्रकारे या आग्रहातून त्यांनी प्राथमिक शिक्षणाचे महत्व अधोरेखित केलेले होते.

कर्मवीर अण्णांच्या या ठाम वैचारिक भूमिकेमुळे आणि अथक प्रयत्नांमुळेच 'रयत' चा वटवृक्ष वाढत गेला आणि बहरत गेला. कर्मवीरांनी पेरलेल्या बीजाचा आता एवढा विस्तार झाला आहे की 'रयत' च्या महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत एकूण ६९७ शाखा आहेत.[२७]

| | विभाग | जिल्हे | शाखा संस्था |
|---|---|---|---|
| १) | मध्य विभाग | सातारा, सोलापूर | २१९ |
| २) | दक्षिण विभाग | सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि कर्नाटकातील बेळगांव | १२६ |
| ३) | उत्तर विभाग | अहमदनगर, नाशिक, बीड, धुळे | १९३ |
| ४) | पश्चिम विभाग | पुणे | १०१ |
| ५) | रायगड विभाग | रायगड, बृहन्मुंबई, ठाणे | ५८ |
| | | **एकूण** | **६९७** |

(रयत शिक्षण संस्था वार्षिक अहवाल, २०११-१२ वरून)

या ६९७ शाखांमध्ये प्राथमिक, माध्यमिक शाळा, ज्युनिअर, सिनिअर कॉलेजस अशा अनेक शाखा प्रकारांचा समावेश आहे.

| शाखा प्रकार | संख्या |
|---|---|
| * महाविद्यालये (४० पैकी ४ महिलांसाठीची महाविद्यालये आहेत तर २१ मध्ये ज्युनिअर कॉलेजचे वर्ग आहेत. ) | ४० |
| * माध्यमिक विद्यालये | ४३२ |
| यात फक्त मुलींची विद्यालये | २८ |
| उच्च माध्यमिक विद्यालये | १५३ |
| उच्च माध्यमिक मुलींसाठीची | ४ |
| शेती विद्यालये | १७ |
| तांत्रिक विद्यालये | २१ |
| * अध्यापक विद्यालये (पैकी १ महिलांसाठी ) | ८ |
| * प्राथमिक शाळा (१ मुलींसाठी) | २४ |
| * पूर्व प्राथमिक | ४० |
| * वसतिगृह (१२ मुलींसाठी ) | ७६ |
| * प्रशासन कार्यालये | ७ |
| * आश्रमशाळा | ८ |
| * औद्योगिक प्रशिक्षण संस्था | ६ |
| * इतर शाखा (महिलांसाठी शिवणकला वगैरे ) | ५६ |

वरीलप्रमाणे सध्या रयत शिक्षण संस्थेच्या शाखा महाराष्ट्रभर कार्यरत आहे.[२८]

संस्थेने आपला पाया असा भरभक्कम केलेला आहे. शाखाविस्तारही वाढवला आहे. ज्या १४ जिल्ह्यांमध्ये रयत शिक्षण संस्था कार्यरत आहे, त्यात सुमारे सव्वा चार लाख विद्यार्थी शिकत आहे. स्थापनेनंतरच्या सुमारे ऐंशी वर्षातील १५ वर्षाचा काळ शंकरराव काळे रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन होते. त्यांच्या कारकिर्दीत अथक परिश्रमांमुळे त्यांनी 'रयत' च्या विस्तारात आपले वैशिष्टपूर्ण योगदान दिले. या पंधरा वर्षात त्यांनी शंभरहून अधिक शाळा-कॉलेजस सुरू केली. या काळात विद्यार्थीसंख्या १,१८, १५५ वरून ३,१०, ३६६ पर्यंत वाढवली. याचाच अर्थ सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोचवण्यात शंकरराव काळे यशस्वी झाले. प्राध्यापक-शिक्षक-सेवक यांची संख्याही दुपटीपेक्षा अधिक वाढवली. खेड्यापाड्यात शिक्षण पोहचवण्याच्या

उदात्त हेतूने शंकररावांनी विक्रमी वेगाने शाळा काढल्या आणि चालवल्या. तीन लाखांहून अधिक विद्यार्थी आणि १३,७५० शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वर्ग हा पसारा चालविण्यासाठी १९७५ सालचे ५ कोटी रूपयांचे बजेट शंकरराव काळे यांनी १९९० साली ५० कोटीचे बनवले. पंधरा वर्षात संस्थेची दहा पटीने वाढ झाली असा त्याचा अर्थ होतो. 'रयत' शिक्षण संस्थेच्या ऐंशी वर्षाच्या इतिहासात म्हणूनच शंकरराव काळेंच्या १५ वर्षाच्या कारकिर्दीला अनन्यसाधारण महत्व आहे.[२९]

शंकरराव काळे ज्या १९७५ ते १९९० या पंधरा वर्षाच्या काळात 'रयत' चे चेअरमन होते, त्याआधीही त्यांचा संस्थेशी निकटचा संबंध होता. 'रयत' च्या विविध शाळांच्या उभारणीच्या कामात ते सढळ हातांनी मदत करत होतेच. कोपरगाव साखर कारखान्याच्या वतीने त्यांनी 'रयत' च्या वाढीला नेहमीच मदत केली आहे.

कर्मवीरांचा वारसा घेऊन, 'कमवा आणि शिका' या योजनेत अनेक गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

**१) कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची शैक्षणिक मदत -**

| अ. नं. | विद्यालयाचे नाव | कारखान्याने दिलेली जमीन |
|---|---|---|
| १) | * श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, कोळपेवाडी | १ हेक्टर, २४ आर जमीन दिली असून एक भव्य इमारत बांधून दिली. |
| २) | * न्यू इंग्लिश स्कूल, चासनळी | ८० आर जमीन दिली. |
| ३) | * येवला तालुक्यातील मुखेडचे हायस्कूल | ४० आर जमीन दिली. |
| ४) | * निफाड तालुक्यातील देवगावचे हायस्कूल | ४० आर जमीन दिली. |
| ५) | * श्री ग. र. औताडे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पोहेगांव | ५९ आर जमीन दिली. |
| (वरील सर्व माहिती 'कोसाका उद्योग समुहाची वाटचाल - १९९८' या पुस्तिकेतून घेतली आहे.)[३०] | | |

कारखान्यामार्फत शंकरराव काळे त्यांनी केवळ जमिनीच शाळांना दिल्या असे नाही तर काही शाळांना इमारतीही बांधून दिल्या.

| अ. नं. | विद्यालयाचे नाव | कारखान्याने दिलेल्या खोल्या / हॉल | बांधकामावर केलेला खर्च (लाखात) रू. |
|---|---|---|---|
| १) | * श्री छत्रपती संभाजी विद्यालय, गौतमनगर | २८ खोल्या व एक हॉल | १४.३५ |
| २) | श्री शिवशंकर विद्यामंदिर, रवंदे | १६ खोल्या | ७.५५ |
| ३) | श्री ग. र. औताडे पाटील माध्यमिक विद्यालय, पोहेगांव | ३० खोल्या | ४.९९ |
| ४) | न्यू इंग्लिश स्कूल, चासनळी | १२ खोल्या व हॉल | ८.११ |
| ५) | श्री गुरूवर्य तुकाराम बाबा विद्यालय, कुंभारी | १२ खोल्या | ९.२४ |
| ६) | डी. आर. भोसले विद्यालय, देवगांव | १४ खोल्या | ३.९९ |
| ७) | जनता विद्यालय, मुखेड | ९ खोल्या | ६.६९ |
| ८) | देर्डे–चांदवड भाग शाळा | ५ खोल्या | १.६६ |
| ९) | न्यू इंग्लिश स्कूल, सोनेवाडी | ४ खोल्या | १.५२ |

(कोसाका उद्योग समुहाची वाटचाल– १९९८)

रयत शिक्षण संस्थेतील न्यू इंग्लिश स्कूल भोजडे, संवत्सर, करंजी (कोपरगाव), सोमठाणे इत्यादी शाळांना तसेच इतर संस्थांच्या उक्कडगांव, मदरसा (कोपरगाव), दहीवडी, चांदेकसारे इत्यादी शाळांना इमारत बांधकाम, क्रीडांगणे, विनाअनुदानित काळात शिक्षकांचे वेतन या स्वरूपात कारखान्यामार्फत मदत केली आहे. शिवाय देर्डे–चांदवड येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्राला गौतम बँकेने दिलेल्या १० लाख रूपये कर्जाचे व्याजही कारखान्यामार्फत दिले जायचे. शिवाय विविध शाळांच्या इमारती बांधकामासाठी कारखान्याने ५८ लाख रूपये खर्च केले आहेत. म्हणजे कारखान्याने शाळांसाठी सुमारे ७५ लाख रूपये खर्च केले आहेत. शिवाय काही शाळांना सुमारे ९ एकर जमीन विविध कारणांसाठी मिळवून दिली आहे.[३१]

शंकरराव काळेंनी आपल्या कारखान्याच्या मार्फत छोट्या–छोट्या शाळांना मदत करण्यामागे कर्मवीर भाऊराव पाटील यांचा प्रभाव निश्चितपणे होता. महाराष्ट्रात गावोगाव हिंडून कर्मवीर भाऊराव शाळा उभारण्याचे प्रयत्न करत असताना त्यांच्याबरोबर शंकररावांची झालेली भेट ऐतिहासिक ठरली. गणपतराव औताडे, पद्मश्री विठ्ठलराव विखे

पाटील यांच्यासारख्या मंडळीना हाताशी धरून कर्मवीरांचे नगरमध्ये शाखा विस्तार करण्याचे प्रयत्न चालू होते. प्रवरानगरच्या महात्मा गांधी विद्यालयापाठोपाठ कोपरगाव तालुक्यातही शाळा सुरू करावी असे त्यांच्या मनात होते. गणपतराव औताडे यांनी या कामी पुढाकार घेतला आणि मुद्दामहून माहेगांवला आणले व शंकरराव काळेंची गाठ घालून दिली. ही त्यांची पहिली १९५७ सालातली ही भेट म्हणजे शंकरराव काळे यांच्या रयतमधील कामाचा शुभारंभ. या भेटीपासून श्री. काळे यांनी रयतच्या माध्यमातून आपल्या शैक्षणिक कार्याला जी सुरूवात केली ते कार्य शेवटपर्यंत चालूच होते. अण्णांच्या या भेटीविषयी शंकरराव काळे सांगतात, ''अण्णांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाचं मोठं काम उभे केले होते. सर्वांना शिक्षण मिळालं पाहिजे ही त्यांची तळमळ होती. त्याच तळमळीतून ते काम करत असल्याने त्यांचं नाव सर्वदूर परसलेलं होते. असा हा मोठा माणूस स्वतःहून आपल्या घरी आला, याने मी अगदी भारावून गेलो होतो. त्यात ते मला म्हणाले, तुझ्यासारख्या तरूण, तडफदार आणि उच्च शिक्षिताने औताडेंच्या बरोबर कारखाना उभारणीचं काम हाती घ्यावं ही चांगली बाब आहे. तुम्ही या कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करत आहात. शेतकऱ्यांच्या कष्टाचं चीज व्हायचं असेल तर त्यांच्या मालाला पुरेसा भाव मिळाला पाहिजे. सहकारी साखर कारखानदारीतून  हे घडणार आहे. त्यामुळे तुम्ही आरंभिलेलं काम मोठचं आहे. त्यातून शेतकऱ्यांच्या घरात लक्ष्मी येणार आहे. पण केवळ लक्ष्मी आली म्हणजे विकास झाला असं नाही. लक्ष्मीच्या जोडीला सरस्वतीही असावी लागते, आणि या दोघी जेव्हा एकमेकींच्या हातात हात घालून शेतकऱ्यांच्या घरात नांदू लागतील तेव्हा खऱ्या अर्थाने या परिसराला रया येईल. तेव्हा तुमच्यासारख्या तरूणांनी 'रयत'च्या या कामास थोडा हातभार लावला तर बरं होईल अण्णांचे हे बोल माझ्या मनावर एक वेगळाच प्रभाव पाडून गेले, आणि मी ठरवलं की हे काम आपण करायचं आणि मी ते काम कारखाना परिसरातच 'छत्रपती संभाजी विद्यालय' ही पहिली शाळा काढून सुरू केलं.''[३२]

या सुरूवातीच्या काळात सातारा, सांगली, कोल्हापूर या भागात रयतच्या अनेक शाळा अण्णांनी सुरू केल्या होत्या. त्याला लोकांचाही चांगला प्रतिसाद मिळाला होता. पण नगर जिल्ह्यात तसे रयतचे काहीच काम नव्हते. त्यामुळे अण्णांनी या जिल्ह्यावर अधिक लक्ष केंद्रित केले होते. त्यात त्यांना कर्जतचे दादापाटील हा एक चांगला कार्यकर्ता मिळाला. अण्णांच्या एका भाषणाने प्रभावित झालेल्या दादापाटील यांनी नगर जिल्ह्यातले कर्जतचे पहिले विद्यालय सुरू करण्यापासून अण्णांच्या प्रत्येक

कार्याला साथ दिली. त्यांच्याच मदतीने पुढे अण्णांनी नगर जिल्ह्यात रयतचे काम वाढवले. १९५७ नंतर शंकरराव काळे यांनी गौतमनगरच्या संभाजी प्राथमिक विद्यालयाच्या स्थापनेनंतर तर नगर आणि नाशिक जिल्ह्यात रयतच्या शाळांचे एक जाळेच विणले.

हे जाळे विणत असताना त्यांनी एक चांगली गोष्ट केली. ती म्हणजे शिक्षणाला सहकाराची एक मजबूत जोड दिली. यातून त्यांनी परिसराचा विकास तर साधलाच पण कर्मवीर अण्णांचे एक स्वप्नही साकार केले. अण्णांची अशी धारणा होती की, शिक्षणाच्या या कामात शेतकऱ्यांनी आपल्या खळ्यातले मातेरे जरी दिले तरी त्यातून जे काम उभे राहील ते खऱ्या अर्थाने खेड्यांच्या विकासाचे असेल. म्हणून ते शेतकऱ्यांना नेहमी म्हणत, 'तुम्ही तुमच्या खळ्यातली रास घेऊन जा. पण मातेरं आम्हाला मदत म्हणून द्या.' याच भूमिकेतून त्यांनी साखर कारखान्यांकडेही मदतीची अपेक्षा व्यक्त केली होती. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, गणपतराव औताडे अशा काही लोकांशी ते याबाबत नेहमी बोलायचे, त्यांचे म्हणणे एवढेच असायचे की, 'ज्या लोकांसाठी रयत शिक्षण संस्था स्थापन झाली त्यांच्याच मदतीतून ती वाढणार आहे. तेव्हा प्रत्येकाने आपला खारीचा वाटा म्हणून ५-१० पैशांची मदत केली तरी ती संस्थेसाठी मोठी रक्कम ठरू शकते.'[३३] सहकारी साखर कारखानदारीत परिसर विकासाचे एक मिशन म्हणून गुंतलेल्या विखे पाटील, औताडे आणि इतरांना अण्णांचे हे मत पटल्यामुळे कारखान्याच्या प्रत्येक ऊस उत्पादक सभासदाच्या बिलातून टनाला २५ पैसे शिक्षणासाठी म्हणून रयतला द्यायचे ठरवले. ठरवले म्हणण्यापेक्षा हा एक अलिखित नियमच ठरून गेला. त्यामुळे कारखान्यांच्या माध्यमातून उभा राहिलेला निधी रयतच्या विस्तारासाठी मोठा मोलाचा ठरला. शंकररावांनी स्वतः आयुष्यभर कारखान्यामार्फत शिक्षणाला मदत करण्याची सामाजिक बांधिलकी पाळली. त्यामुळे अहमदनगरसारख्या दुष्काळी भागातील गोरगरिबांना शिक्षण मिळू शकले, त्यामागे या सामाजिक बांधिलकीचा मोठा हिस्सा आहे. शंकरराव 'रयत' चे चेअरमन असतानाच्या काळात तर त्यांनी शाळा काढण्याचा जो धडाका लावला त्यामुळे काही बाबतीत त्यांनी सातारा जिल्ह्यालाही मागे टाकले. अर्थात या कामी कर्मवीरांचे सुपूत्र श्री. आप्पासाहेब पाटील व संस्था कार्यकारिणीचा त्यांना संपूर्ण पाठिंबा होता.

२) अहमदनगर – सातारा एक तुलना –

| शैक्षिणक कार्य | एकूण महाराष्ट्र | सातारा | अहमदनगर | नगर जिल्ह्यातील विद्यार्थी संख्या | एकूण शिक्षक |
|---|---|---|---|---|---|
| महाविद्यालये | ४० | १५ | ७ | १३,३१५ | ४४८ |
| माध्यमिक महाविद्यालये | ४३२ | ९५ | ९९ | ९३,४६० | २५९५ |
| प्राथमिक विद्यालये | २६ | ५ | ५ | ३,८०० | ६२ |
| अध्यापक विद्यालये | ८ | ३ | १ | ७८ | ७ |
| औद्योगिक प्रशिक्षण संस्था | ६ | १ | २ | १०० | १० |
| आश्रम शाळा | ८ | -- | १ | २०२ | ५ |
| | **६०६** | **११९** | **११५** | **१,१०,९५५** | **३१२७** |

याशिवाय एकूण ७४ वसतिगृहांपैकी २६ वसतिगृहे नगर जिल्ह्यात आहेत. ज्याचा सुमारे १५०० विद्यार्थ्यांना आज लाभ मिळत आहे.[३४] ही एकूण उपलब्धी लक्षात घेतली तर आपल्याला निश्चित असे दिसेल की स्वतःच्या माध्यमातून शंकरराव काळे यांनी शिक्षणाच्या बाबतीत नगर जिल्ह्याचा अगदी चेहरामोहराच बदलून टाकला आहे. नगर जिल्ह्यात रयतशिवाय अन्य शिक्षण संस्थाही होत्या. पण त्या प्रामुख्याने शहरी भागात कार्यरत होत्या. शिक्षणाची खरी गरज ग्रामीण भागात होती. पण ग्रामीण भागात शाळा काढणाऱ्या संस्था नव्हत्या. ही गरज शंकररावांनी ओळखली आणि त्यांनी शिक्षणप्रसार केला. खरे पाहता शंकरराव काळे यांच्यासारखे हाडाचे कार्यकर्ते संस्थेला मिळाले म्हणून आज कर्मवीर अण्णांचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार झाले. सध्या आपल्या बोध चिन्हाप्रमाणे संस्था वटवृक्षासारखी वाढली आहे.

वास्तविक, अगदी सुरूवातीला म्हणजे गौतमनगरचे संभाजी प्राथमिक विद्यालय उभारतांना, ‘कर्मवीर अण्णा हा एक मोठा माणूस आहे, त्यांनी हाती घेतलेलं काम मोठं आणि चांगलं आहे. तेव्हा या कामाला आपण मदत केली पाहिजे’ एवढा एकच विचार शंकरराव काळे यांच्या मनात होता. त्यानंतर त्यांनी त्याच विचाराने कोळपेवाडी येथे श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय सुरू केले. त्यासाठी कारखान्याने जागा दिली. इमारत बांधून दिली. यानंतर त्यांनी तालुक्यात काही शाळा

काढता येतात का ते पाहिले, त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले आणि एकापाठोपाठ एक; अशी माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये संपूर्ण नगर जिल्ह्यात उभारायला त्यांनी सुरूवात केली. त्यात शारदा विद्यामंदिर, राहाता (१९५७), कान्हूर पठार जनता विद्यामंदिर, पारनेर (१९५८), न्यू इंग्लिश स्कूल, वाळकी, नगर (१९५८), न्यू इंग्लिश स्कूल, कोल्हार बु. (१९५८), महात्मा फुले विद्यालय, भाळवणी, पारनेर (१९५८), कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, कोपरगाव (१९५९), छत्रपती शिवाजी विद्यालय, अकोळनेर, नगर (१९५९), कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, सारोळा कासार (१९६०) श्री गणेश विद्यालय, गणेशनगर, ता. कोपरगाव (१९६०), श्री ग. र. औताडे विद्यालय पोहेगांव (१९६०), भास्करराव गलांडे पाटील विद्यालय, अशोकनगर (१९६०), यशवंत विद्यालय, पढेगांव (१९६०), काही माध्यमिक विद्यालये, तसेच रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर (१९६०), चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर (१९६१), अशी महाविद्यालये यांचा समावेश करता येईल. म्हणजे १९५६ ते ६० या पहिल्या चार वर्षाच्या काळात त्यांनी अगदी संस्थेला वाहून घेतल्यागत काम केले. हे काम करत असताना त्यांनी कोणतीच अपेक्षा ठेवली नव्हती. केवळ कर्मवीर अण्णांसारखा माणूस आपणाला हे काम करायला सांगतो, आणि असे चांगले काम आपण केले पाहिजे या एकाच भावनेतून त्यांनी ज्ञानाची गंगा खेडोपाडी पोहचविण्याच्या कार्यात भाग घेतला होता.[३५]

अर्थात याच कामातून त्यांना स्वतःला बरेच काही शिकायला मिळाले. ग्रामीण भागतली शैक्षणिक अवस्था जवळून पाहायला मिळाली. लोकांना शिक्षण हवे असताना त्यांना ते मिळत नाही हेही लक्षात आले आणि शिक्षण सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर लोक त्याला कसा उदंड प्रतिसाद देतात हेही त्यांना अनुभवता आले. कामाची प्रेरणा अण्णांकडून मिळालेली होतीच. शिवाय दादा पाटील यांच्यासारखे ज्येष्ठ कार्यकर्ते या कामात त्यांच्या साथीला होते. त्यामुळे १९६० नंतरही खंड न पडता हे काम सुरूच ठेवले. किंबहुना त्यांच्या या कामाला १९६० नंतर खऱ्या अर्थाने गती मिळाली. याच काळात त्यांच्याकडे अनेक अधिकारपदे आली. त्या पदांचा त्यांनी अगदी जाणीवपूर्वक 'रयत' च्या वाढीसाठी, शिक्षणाच्या प्रसारासाठी सुयोग्य वापर करून घेतला.

१९६१ साली संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर जिल्हा निर्मितीचे काम सुरू झाले. एकूण प्रशासकीय आणि विकासाच्या कामांसाठी जिल्हा परिषदांची निर्मिती ही महत्वाची प्रक्रिया होती. या प्रक्रियेतून १९६२ साली अहमदनगर जिल्हा परिषदेची स्थापना झाली. या नवनिर्मित जि. प. चं पहिले अध्यक्षपद शंकरराव काळे

यांना मिळाले. केवळ मिळालेच नाही तर १९६२ ते ७२ अशी सलग दहा वर्षे त्यांनी हे पद सांभाळले. या अध्यक्षपदामुळे काळे यांचे शैक्षणिक कामांकडे विशेषतः 'रयत' च्या कामाकडे दुर्लक्ष होणार असे अनेकांना वाटत होते. पण तसे घडले नाही. कारण 'रयत' च्या कामाला त्यांनी केव्हाच आपले म्हणून स्वीकारलेले होते. या काळात काळे त्यांनी 'रयत' च्या कामाला आणखी गती दिली. त्याकाळी शाळा, कॉलेजेस काढायची तर स्थानिक स्वराज्य संस्थांची मंजुरी लागत असे. ग्रामपंचायतींना, पंचायत समित्यांना असे अधिकार दिले होते. पण या संस्था जिल्हा परिषदांमार्फत मंजुरी घ्यायच्या. तेव्हा नगर जिल्हयातील अनेक ग्रामपंचायतीची, पंचायत समित्यांच्या मंजुऱ्या घेऊन काळे यांनी 'रयत' ची विद्यालये, महाविद्यालये सुरू केली. १९६४ साली सुरू झालेले कर्जतचे महाविद्यालय त्यांनी याच पद्धतीने सुरू केले. अण्णांच्या अगदी जवळचे आणि धडाडीचे कार्यकर्ते म्हणून परिचित असणारे दादा पाटील यांची फार इच्छा होती की, कर्जतला एक महाविद्यालय असावे. दादा पाटील हा माणूस वडिलांकडे असणारी पाटीलकी वारसा हक्काने स्वतःकडे येणार असताना तिला ठोकर देऊन आणि वडिलांचा विरोध पत्करून अण्णांबरोबर काम करायचे म्हणून घराबाहेर पडलेला कार्यकर्ता. स्वतःचे शिक्षण शून्य. पण काम हाती घेतले ते शिक्षणाचं. असा हा माणूस कॉलेजचे स्वप्न बघत होता. तेव्हा कर्जत, श्रीगोंदा, जामखेड अशा काही ग्रामपंचायतींची मंजुरी घेऊन दादा पाटील यांच्याच नावाने कॉलेज सुरू केले. त्याच्या इमारतीसाठी निधी गोळा केला. जिल्हा परिषदेकडूनही मोठी आर्थिक मदत मिळवली. आज ते जिल्ह्यातले उत्तम कॉलेज म्हणून पुढे आलेले आहे.[३६]

याच पद्धतीने 'रयत' च्या विस्तारासाठी काळे यांनी संपूर्ण दहा वर्षाच्या कारकीर्दीत मोठा सहभाग दिला. कर्जतच्या कॉलेजनंतर कोपरगावला श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम ऑर्टस् आणि संजीवनी कॉर्मस कॉलेज १९६५ साली सुरू केले. त्यानंतर १९७० साली स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर याची सुरूवात केली. काही माध्यमिक शाळाही त्यांनी याच पद्धतीने जिल्ह्यातील गावागावत काढल्या. त्यांचे हे काम केवळ नगर जिल्ह्यापुरतेच मर्यादित राहिले नाही तर ते नाशिक, बीड, ठाणे अशा अनेक जिल्हयांमध्ये पसरले. कारण योगायोगाने म्हणा किंवा सुदैवान म्हणा, १९७५ साली शंकरराव काळेंकडे 'रयत' चं चेअरमनपद आले. हे पदही त्यांच्याकडे तब्बल पंधरा वर्षे राहिले.[३७]

या पंधरा वर्षाच्या काळात 'रयत' चा जो विस्तार झाला तेवढा अन्य कोणाच्या काळात झाला नाही. सरकारच्या ताब्यात असलेली वाशीची शाळा 'रयत' च्या ताब्यात मिळवून तिथे कॉलेज काढण्यापासून नगर जिल्ह्यांतले महिला महाविद्यालय सुरू करण्यापर्यंतची तसेच विद्यालये, महाविद्यालये, वसतिगृहे, इतर व्यावसायिक अभ्यासक्रम आणि तत्सम उपक्रम श्री. काळे यांनी राबविले. वाशीची एक शाळा शासनाच्या ताब्यात होती. तेव्हा वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होते. तेव्हा शंकरराव काळे यांनी यशवंतराव चव्हाण यांना सांगून ती शाळा रयत शिक्षण संस्थेला मिळवून दिली. पुढे वाशीच्या या शाळेला जोडूनच त्यांनी कॉलेजला मंजूरी मिळवली. विशेष म्हणजे या कॉलेजला वसंतदादांनी अडीच एकर जागा देऊन मोठी मदत केली. शिवाय त्यावेळचे नगर विकास खात्याचे मंत्री असलेले बळीराम हिरे यांनी सिडकोमार्फत २५ लाखाची इमारत पैसे परत करण्याच्या बोलीवर बांधून दिली.[३८] श्री. काळे यांनी ते पैसे परत करून या कॉलेजचा पुढे मोठा विस्तार केला. 'रयत' चे काम पाहात असताना गेल्या अनेक वर्षात ते विविध मिटिंगसाठी सातारा व अन्य ठिकाणी उपस्थित राहीले. परंतु त्यांनी कधीही मानधन अथवा प्रवास भत्ता घेतला नाही हे विशेष होय.

अर्थात या पद्धतीने केवळ शाळा कॉलेजस काढून संस्थेची संख्यात्मक वाढ करण्याचेच काम त्यांनी केले असे नाही, तर ते करत असताना एक व्यापक दृष्टीकोणही त्यांनी बाळगलेला होता. अखेरपर्यंत स्व. शंकरराव काळे 'रयत' शिक्षण संस्थेच्या मध्यवर्ती कार्यकारिणीवर काम करीत होते. 'रयत' च्या शिक्षण प्रसाराचे काम अखंडपणे करीत राहीले. सर्वांना शिक्षण आणि स्वावलंबन ही दोन तत्वे कर्मवीर अण्णांनी घालून दिली होती. ती बाळगताना तळागाळातल्या आणि दुर्लक्षित वर्गापर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे या विचाराने त्यांनी हे काम केले. आज संस्थेच्या काही आश्रमशाळा दिसतात तशाच काही खास मुलींसाठीच्या शाळा दिसतात, हे सारे काम काळे यांनी स्वीकारलेल्या कर्मवीरांच्या दृष्टीमुळे शक्य झाले आहे. आदिवासी भागातल्या मुलांना शासनामार्फत शिक्षण दिले जातेच. पण आपणही तिथे जाऊन चांगले शिक्षण त्या मुलांपर्यंत पोहचवू शकलो तर एक दुर्लक्षित वर्ग मुख्य प्रवाहात येऊ शकेल म्हणून शंकरराव काळे यांनी 'रयत' मार्फत आश्रमशाळा सुरू केल्या. त्याचप्रमाणे मुलींसाठी काही माध्यमिक व महाविद्यालयेही सुरू केली. त्यामध्ये प्रामुख्याने ठाणे जिल्हयातील मोखाडा येथील महाविद्यालय तसेच याच तालुक्यातील काही आश्रम शाळांचा त्यात समावेश आहे.

'रयत' शिक्षण संस्थेतील शंकररावांच्या कार्याबद्दल बोलतांना त्यांचे संस्थेतील एक सहकारी श्री. शंकरराव कोल्हे म्हणतात, 'कोपरगाव तालुका व नगर जिल्हा शिक्षणात फार मागे होता. परंतु काळे साहेब रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाले. रयत शिक्षण संस्थेचे ते १५ वर्षे अध्यक्ष होते. त्यांनी नगर जिल्ह्यात इतके काम केले की, रयत शिक्षण संस्थेच्या जितक्या शाखा सातारा जिल्ह्यात आहेत त्यापेक्षा जास्त शाखा नगर जिल्ह्यात निर्माण झाल्या, हे मला या ठिकाणी नमूद केले पाहिजे.'[३९]

**५.७ विविध महाविद्यालयांची स्थापना –**

१९७५ ते १९९० पर्यंत पंधरा वर्षे शंकरराव काळे 'रयत'चे चेअरमन म्हणून काम पाहत होते. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील आणि शरदराव पवार अशा मातब्बर अध्यांक्षाच्या काळात शंकरराव 'रयत' चे चेअरमन होते. 'रयत' च्या कामामुळे त्यांची एक वेगळी ओळख निर्माण झाली होती. चेअरमनपदाच्या अगोदरपासूनही त्यांनी संस्थेचे निष्ठेने व तळमळीने काम चालविले होते. अनेक प्राथमिक व माध्यमिक शाळा उघडण्याचा सपाटा त्यांनी सुरू ठेवलाच होता. त्याचप्रमाणे उच्च शिक्षणही खेड्यापाड्यात पोहचले पाहिजे म्हणून त्यांनी विविध ठिकाणी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांची स्थापना केली. अनेक अडचणींवर मात करून ही महाविद्यालये सुरू केली. आजही सर्व महाविद्यालये नामांकित महाविद्यालये म्हणून नावरूपास आलेली आहेत.

**१) दादा पाटील महाविद्यालय कर्जत –**

सन १९६२-७२ या काळात शंकरराव जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. जिल्हयात कर्जत, श्रीगोंदा, जामखेड हा अहमदनगरच्या दक्षिणेकडील पट्टा जिराईत होता. त्यांना न्याय मिळाला पाहिजे, त्यांच्या शिक्षणाची सोय झाली पाहिजे असे माजी मंत्री आबासाहेब निंबाळकर व दादा पाटील यांना वाटत होते. या दुष्काळी भागातील मुले शिकून मोठे होतील. त्यांच्यातून उद्याचे डॉक्टर, वकील, पुढारी निर्माण होतील हा उद्देश होता. कर्जतचे दादा पाटील हे कर्मवीरांचे परमभक्त होते.[४०] १९४८ मध्ये त्यांनी कर्मवीरांना कर्जतला बोलावून तेथे महात्मा गांधी विद्यालय सुरू केले होते. याच कर्जतमध्ये कॉलेज व्हावे अशी दादा पाटलांचीही इच्छा होती. त्यांनी आबासाहेबांना कॉलेज सुरू करण्यासाठी सांगितले. आबासाहेबांनी शंकररावांना सूचना केली. आबासाहेबांचा शब्द शंकररावांना हुकुमांप्रमाणे होता. त्यांनी पुणे विद्यापीठाकडे अर्ज केला. त्यावेळी कर्जतला ग्रामपंचायत होती. तेथे १९६४ साली कॉलेज सुरू करणे मोठे अवघड काम होते. या कॉलेजला जिल्हा परिषदेकडून शंकररावांनी ५०,००० रू. दिले. याशिवाय कर्जत, जामखेड, श्रीगोंदा या

पंचायत समित्यांनी प्रत्येकी २५,००० अशी सव्वा लाख रू. देणगी कॉलेजला मिळाली. त्यावेळी विनाअनुदानित प्रकार नव्हता. पहिल्या वर्षी आर्टस्–कॉर्मस् सुरू केले होते. ग्रामीण भागातून दरवर्षी कॉलेजसाठी २०० ते २५० पोती ज्वारी गोळा केली जायची. दादा पाटील इमारत बांधकामासाठी देणगी गोळा करायचे. ग्रामपंचायतीकडून देणगी मिळवून देण्यासाठी त्यांचे ठराव दादा पाटील जिल्हा परिषदेत शंकररावांकडे घेऊन यायचे आणि मंजूर करून घ्यायचे. दादा पाटलांनी ग्रामपंचायतीकडून अशा प्रकारे लाखो रूपये गोळा करून भव्य इमारत बांधली. या महाविद्यालयासाठी दादा पाटलांनी फार मोठी धडपड केली होती. म्हणून त्यांच्या निधनातनंतर या महाविद्यालयाला दादा पाटलांचे नाव देण्यात आले.

**२. श्री सद्‌गुरू गंगागीर महाराज महाविद्यालय, कोपरगांव –**

जिल्हा परिषद अध्यक्ष असताना 'रयत' शिक्षण संस्थेच्या माध्यमातून कर्जतला कॉलेज काढले. श्रीरामपूरला सुरू झाले. मग आपल्या कोपरगावला का नको, असे कार्यकर्ते म्हणू लागले. शिवाय तालुक्यात 'रयत' ची हायस्कूल्स जास्त आहेत. सर्वांच्या आग्रहावरून १९६४ मध्ये कोपरगाव येथे कॉलेज सुरू करण्यासाठी विद्यापीठाकडे अर्ज केला. परंतु कोपरगावातील काही मंडळींनी 'तालुका एज्युकेशन सोसायटी' ही संस्था स्थापन करून 'रयत' च्या कॉलेजला विरोध केला. शेवटी स्थानिक म्हणून त्या संस्थेला परवानगी मिळाली. यावेळी शंकरराव खूप नाराज झाले. मात्र स्वामी सहजानंदभारती म्हणाले ''होना तो होना ! कर्मवीर भाऊराव पाटील का कॉलेज होना'' दुसरे कॉलेज को हम कभी अनुमती नही देंगे।''[४१]

कारण जिल्ह्यात कॉंग्रेसमध्ये बाळासाहेब भारदे व स्वामी सहजानंद भारती असे दोन गट होते. आणि ते कॉलेज भारदे गटाला मिळाले होते. त्यावेळी शंकरराव कोल्हे हे के. बी. रोहमारे यांच्या गटामध्ये होते. त्यांना शंकररावांनी फोडून एक चांगला आधार मिळविला. कोपरगाव एज्युकेशन सोसायटीला आर्टस् आणि कॉमर्स अशा दोन शाखांना परवानगी मिळाली होती. सायन्स खर्चिक असल्याने त्यांनी ते सुरू केले नाही. शंकररावांनी विद्यापीठाकडे सायन्सची मागणी केली. शेवटी विद्यापीठाने सायन्सला परवानगी दिली.[४२]

रयत शिक्षण संस्था, कोपरगाव सहकारी साखर कारखाना आणि संजीवनी सहकारी साखर कारखाना, जिल्हा परिषद व पंचायत समिती, कोपरगांव यांनी मिळून एक इमारत बांधली. आज त्याला जुने सायन्स कॉलेज म्हणून ओळखले जाते. नंतर आर्टस् व

कॉर्मस कॉलेज मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यासाठी शंकररावांनी पुणे विद्यापीठाची एक्झीक्युटीव्ह कमिटीची निवडणूक लढविली. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजच्या प्राचार्यांच्या विरोधात ते निवडून आले आणि एक्झीक्युटीव्ह कमिटीत गेले.[४३] आणि कोपरगावला सायन्सच्या जोडीने त्यांनी आर्टस् व कॉमर्सला परवानगी मिळविली. सहजानंद भारती म्हणजे संत गंगागिर महाराजांचे परमभक्त व पट्ट शिष्य होते. गंगागीर महाराज म्हणजे या परिसरातील मोठे संत होते. दिडशे वर्षांपासून त्यांच्या अखंड हरिनाम सप्ताहाची अखंड परंपरा आजही सुरू आहे. सात दिवस सप्ताहात आमटी भाकरीचे जेवण असते. शेवटच्या दिवशी शंभर शंभर पोती साखर गाळून बुंदीचा प्रसाद केला जातो. त्यांचे नाव स्वामी सहजानंद भारती यांनी सुचविले आणि दोन्ही कारखान्यांनी मदत केली म्हणून या महाविद्यालयाचे ''श्री सद्‌गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्टस् आणि संजीवनी कॉमर्स'' असे नामकरण करण्यात आले.[४४]

### ३. महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा –

अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिण भागात श्रीगोंदा येथे कॉलेज काढावे ही गोष्ट पुणे विद्यापीठाने मान्य केली. त्या अगोदर मराठा शिक्षण प्रसारक समाजाने कॉलेज काढण्यासाठी हालचाली सुरू केल्या. त्या काळात बाळासाहेब काळे, बापूसाहेब व हिराबाई भापकर हेच मराठा विद्याप्रसारक समाजाचे कामकाज पहात होते. परंतु भापकर कुटुंबाचा कर्मवीर भाऊराव पाटलांशी खूपच चांगला संबंध होता. त्यामुळे त्यांनी रयत शिक्षण संस्थेला खूपच सहकार्य केले होते. 'राजकारणात व समाजकारणात बापूसाहेब व हिराबाई भापकर आमचे आदर्श होते. कर्मवीर आण्णा शेवटच्या दिवसात खूपच आजारी होते. तेव्हा याच मंडळींनी अण्णांना पुण्याच्या ससून रूग्णालयात जाऊन एक लाख रूपयांची थैली दिली होती. त्यांची अण्णांवर व त्यांच्या कार्यावर नितांत श्रद्धा होती.'[४५] म्हणून रयतने मनाचा मोठेपणा दाखवून मराठा विद्याप्रसारक समजाला कॉलेज काढण्यास ना हरकत पत्र (नो ऑब्जेक्शन लेटर) दिले. परंतु कॉलेज कोठे काढावे यावरून त्यांच्यात मतभेद झाले. त्यामुळे त्यांनीच 'रयत' ला कॉलेज काढण्यास सुचविले.

मराठा विद्याप्रसारक मंडळाचा नकार मिळाल्यानंतर लगेच शंकररावांनी श्रीगोंद्याला कॉलेज काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले. 'यावेळी आमच्या असंख्य कार्यकर्त्यांबरोबरच तरूण आमदार बबनराव पाचपुते हे आमच्याबरोबर होते आजही आमच्याबरोबर आहेत. त्यांनी जो पर्यंत श्रीगोंद्याला कॉलेज सुरू होत नाही. तोपर्यंत लग्न करणार नाही, अशी प्रतिज्ञा केली होती'.[४६] मुख्यमंत्री बॅरिस्टर बाबासाहेब भोसले यांनी

'रयत' शिक्षण संस्थेच्या कॉलेजला परवानगी दिली. ग्वाल्हेरच्या शिंदे सरकारने अकराशे एकर जमीन 'रयत' शिक्षण संस्थेला दिली आहे. या ठिकाणी असलेल्या महादजी शिंदे यांच्या वाड्यात कॉलेज सुरू होऊन माध्यमिक, ज्युनिअर, सिनियर कॉलेज, कन्याशाळा, वसतिगृह असे 'रयत'चे मोठे संकूल आज उभे आहे. याबाबत श्री. बबनराव पाचपुते विनोदाने सांगतात की, 'जर काळे साहेबांनी श्रीगोंद्याला कॉलेज सुरू केले नसते तर कदाचित मी अविवाहीतच राहीलो असतो'.[४७]

**४. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, वाशी –**

मुंबईसारख्या महाराष्ट्राच्या राजधानीत 'रयत' शिक्षण संस्थेचे एखादे हायस्कूल असावे ही कर्मवीर अण्णांची फार इच्छा होती. म्हणून शंकरराव संस्थेचे चेअरमन झाल्यानंतर त्या दृष्टीने प्रयत्न करण्यास सुरूवात केली. पण मुंबईसारख्या ठिकाणी जागेचा प्रश्न फार मोठा होता. त्याचवेळी महाराष्ट्र सरकारने नवी मुंबई (वाशी) येथे मराठी, इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांसाठी चांगल्या इमारती बांधल्या होत्या. या शाळा स्वतः सरकारने चालविण्याऐवजी एखाद्या ख्रिश्चत मिशनऱ्यांच्या संस्थेकडे वर्ग कराव्यात, असा विचार तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात येण्याच्या हालचाली सुरू होत्या.[४८] ही कुणकुण शंकररावांच्या कानावर आली आणि ९ मेला अण्णांच्या पुण्यतिथी समारंभासाठी यशवंतराव चव्हाण साताऱ्याला आले होते. त्यांच्यासोबत वसंतदादाही होते. शंकररावांनी यशवंतरावांना विनंती केली की, 'आपण वसंतदादाना सांगून वाशीची महाराष्ट्र शासनाची प्रॉपर्टी व तेथे माध्यमिक शाळेची परवानगी संस्थेला मिळवून द्यावी.' यशवंतरावांनी हा विचार स्टेजवरूनच वसंतदादांसमोर मांडला. यशवंतरावांचा शब्द वसंतदादा मोडत नव्हते. त्यांनी तात्काळ संमती दिली आणि विनामोबादला बक्षिस पत्राने 'रयत' कडे शाळेची परवानगी आणि इमारती सोपविल्या. 'मुंबई काय किंवा नवी मुंबई काय? त्यात आम्ही संतुष्ट होतो' असे शंकरराव म्हणाले. संस्थेने मुंबईत आपले पाऊल रोवले. वाढत्या नागरीकरणामुळे माध्यमिक शिक्षणाबरोबरच महाविद्यालय असावे अशी लोकांची इच्छा होती. शंकररावांनी त्यासाठी प्रयत्न केले. वसंतदादा मुख्यमंत्री आणि डॉ. बळीराम हिरे नगरविकास मंत्री होते. त्यांच्याकडून सिडकोची ५ एकर जागा विनामोबदला संस्थेला मिळविण्याशिवाय नगर विकास खात्याकडून रू. २५ लाख बिनव्याजी कर्ज इमारतीसाठी मिळविले. अनेक दानशूर व्यक्तींनी वाशी कॉलेजला मदत केली आणि अल्पावधीतच कॉलेज नावरूपाला आले. या महाविद्यालयाचे 'कर्मवीर भाऊराव पाटील' असे नामकरण करण्यात आले आहे.[४९]

## ५. राधाबाई काळे महाविद्यालय, अहमदनगर

अहमदनगर येथे कन्या शाळा होती. त्याचप्रमाणे 'रयत' चे महिला महाविद्यालयही असावे अशी नागरीकांची इच्छा होती. म्हणून शासनाकडे महिला महाविद्यालयाची मागणी करण्यात आली. शरदराव पवार त्यावेळी मुख्यमंत्री होते. त्यांनी अहमदनगरला महिला महाविद्यालयास परवानगी दिली. या महिला महाविद्यालयाची संपूर्ण जबाबदारी शंकररावांनी स्वीकारली. विनाअनुदानीत महाविद्यालय शिवाय महाविद्यालयाला जागा नाही अशा प्रकारच्या अडचणी घेऊन हे महाविद्यालय १९९२ सुरू झाले.[५०]

'रयत' शिक्षण संस्थेचे अहमदनगरला पूर्वी 'लक्ष्मीबाई भाऊराव पाटील' हे महाविद्यालय होते. त्याच ठिकाणी महिला महाविद्यालय सुरू करण्यात आले. त्याचवेळी तारकपूर बस स्टॅण्डजवळची मध्यवर्ती असलेली जागा कॅन्टोनमेंट बोर्डाने विकण्याचा निर्णय घेतला. संस्थेचे अध्यक्ष शरदराव पवार त्याचवेळी देशाचे संरक्षण मंत्री होते. शंकरराव देखील यावेळी खासदार होते. भिंगार कॅटोन्मेंट बोर्डाचे उपाध्यक्ष ॲबट यांनीही या कामात शंकररावांना खुप मदत केली. त्यामुळेच तारकपूर एस.टी. स्टॅण्डजवळ राधाबाई काळे महिला महाविद्यालयाची भव्य व सुसज्ज इमारत आज उभी आहे. अर्थात या महाविद्यालयास पूर्वी केवळ महिला महाविद्यालय असेच नाव होते. परंतु नंतर 'रयत' शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व सर्व कौन्सिल सदस्यांनी ठराव करून शंकररावांच्या आईचे नाव महाविद्यालयाला दिले. त्यामुळे महाविद्यालयाचे नाव 'राधाबाई काळे महिला महाविद्यालय' असे झाले. शंकररावांची आई गरीबीत जन्मलेली होती. रात्रंदिवस तिने काबाडकष्ट केले होते. अशा आईचे नाव संस्थेने महाविद्यालयाला दिल्याने शंकररावांनी महाविद्यालयासाठी खुप मोठ्याप्रमाणात कष्ट घेतले. त्यांचे नातेवाईक, इतर कारखानदार, नोकरदार, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट, गौतम बँक, कंट्री लिकर डिलर यांच्याकडून त्यांनी पैसे गोळा केले आणि चाळीस लाखांची बिल्डींग उभी केली. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कन्या विद्यालयाचे ज्युनियरचे वर्ग सिनियरला जोडले. त्यामुळे सुसज्ज कॉलेज म्हणून हे कॉलेज नावरूपास आले आहे. सर्व शाखा अनुदानित झालेल्या आहेत. शिवाय आता युजीसीच्या विविध अनुदानातून आज य महाविद्यालयात अनेक योजना राबविण्यात येत आहे. महाविद्यालयास सन २०१३-१४ मध्ये नॅकची 'बी' ग्रेड मिळालेली आहे.[५१]

## ५.८ गौतमनगर एज्युकेशन सोसायटीची स्थापना –

शंकरराव काळे यांनी आपल्या शैक्षणिक कामातून कर्मवीरांचा वारसा जपण्याचाच प्रयत्न केला. महाराष्ट्रातील माणूस विविध क्षेत्रात चमकतो. त्याचे एकूण काम आणि विकासासाठी असलेली धडपड वाखणण्याजोगी असते. पण तो नेमका इंग्रजीमुळे मुख्य प्रवाहाच्या द्वारापाशी अडखळतो. मराठी माणसाला, शेतकऱ्याला जगाशी व्यवहार करून आपला विकास साधायचा असेल तर इंग्रजी आले पाहिजे आणि या वर्गाला इंग्रजी माध्यामातल्या शाळा ग्रामीण भागात सुरू केल्या पाहिजेत. हा हेतू ठेवून शंकरराव काळे यांनी २० डिसेंबर १९७० रोजी 'गौतमनगर एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना केली आहे.[५२] आज या संस्थेमार्फत 'गौतम पब्लिक स्कूल' ही इंग्रजी माध्यमाची नामांकित शाळा चालविली जाते. तसेच दोन माध्यमिक शाळा व एक महाविद्यालयही चालविले जाते. या संस्थेच्या सर्व सभासद व सदस्यांची नुकतीच ९ फेब्रुवारी २००८ रोजी विशेष सभा होऊन या संस्थेचे 'कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी' असे नामकरण करण्यात आले आहे.[५३] सदर संस्थेची गौतम पब्लीक स्कूल ही शाळा व मुख्य कार्यालय गौतमनगर (कोळपेवाडी), ता. कोपरगाव येथेच कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या शेजारी आहे.

### १ गौतम पब्लिक स्कूल –

रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्याचे काम करत असताना शंकरराव काळे यांना इंग्रजी भाषेअभावी शेतकऱ्यांची मुले मागे पडत आहेत याची जाणीव झाली. शहरी भागात इंग्रजी शिक्षणाची सोय उपलब्ध असल्याने शहरी मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळत असे. तसे चित्र खेड्यात दिसत नव्हते. मोठ्या पदांवर ग्रामीण भागातील मुले पोहचायची असतील तर त्यांना इंग्रजी शिकविणे आवश्यक होते. गौतम पब्लिक स्कूल स्थापन करताना शंकरराव काळेंच्या मनात हीच गोष्ट होती.

१४ जून १९७१ रोजी प्राथमिक विभाग एक व तीन आणि माध्यमिक विभागात पाचवीचा वर्ग सुरू करून गौतम पब्लिक स्कूलच्या कार्याला सुरूवात झाली. शहरी गजबजलेल्या वातावरणापासून दूर निसर्गाच्या सानिध्यात शाळेची उभारणी करण्यात आली असून भव्य इमारत, सुसज्ज प्रयोग शाळा, वसतिगृह, भोजनगृह, कर्मचारी निवास, क्रीडांगण, पोहण्याचा तलाव अशा अनेक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या शिवाय मुलांच्या एकूण विकासासाठी, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून

शाळाबाह्य काही उपक्रम राबवले जातात. त्यात छंदवर्ग, प्रश्नमंच, संगीत, नाटक, गिर्यारोहण अशा अनेक उपक्रमांचा समावेश असतो. थोडक्यात, सर्व अंगाने मुलांना घडवण्याचा एक स्तुत्य उपक्रम या पब्लिक स्कूलद्वारे राबवला जातो.

गेल्या ३७ वर्षात शाळेने जो पसारा वाढवला आहे तो लोकांच्या प्रचंड प्रतिसादातूनच वाढवला आहे. आज या शाळेत के. जी. पासून १० वी पर्यंतच्या एकूण २७ तुकड्या आहेत. या तुकड्यांमधून आज १२२४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्रामुख्याने ही निवासी शाळा असल्याने वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९७० आहे. या सर्व मुलांची एकूण तीन इमारतींमध्ये वेगवेगळ्या हाऊसेसच्या स्वरूपात राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सध्या सहा सिनियर, चार ज्युनियर आणि मुलींसाठीचे एक स्वतंत्र हाऊस अशी अकार हाऊसेस आहेत.या प्रत्येक हाऊससाठी स्वतंत्र हाऊसमास्टर असून गुरूकुल पद्धतीने वसतिगृहातील मुलांवर संस्कार केले जातात.[५४]

एकाचवेळी सर्व विद्यार्थी जेवणासाठी बसू शकतील असे भव्य भोजनालयही शाळेने उभारलेले आहे. मुलांच्या एकूण आरोग्याचा विचार करून शुद्ध, सात्विक असा आहार दिला जातो. जोडीला वैद्यकीय सेवाही विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिली जाते. त्यासाठी एक वैद्यकीय अधिकारी आणि एक परिचारिका यांची नियुक्ती केलेली आहे. आज या शाळेत केवळ कोपरगाव तालुका परिसरातील नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातून मुले येथे शिक्षण घेत आहेत. शिवाय गुजराथ, मध्यप्रदेशातून काही मुले या शाळेत शिक्षण घेण्यासाठी आलेले आहेत.

विना अनुदानित ही शाळा प्रामुख्याने ऊस उत्पादक तसेच शेतकऱ्यांच्या मुलांना इंग्रजी शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी या उद्देशाने सुरू करण्यात आली होती. त्यामुळे या शाळेचा लाभ प्रामुख्याने साखर कारखान्याच्या सभासद शेतकऱ्यांना होणार होता. तेव्हा कोपरगाव सहकारी साखर कारखान्याने गौतमनगर एज्युकेशन सोसायटीला काही जागा भाडे पट्टयाने उपलब्ध करून द्यावी असा ठराव शंकरराव काळे यांनी मांडला आणि तो सर्वानुमते मंजूर होऊन सोसायटीस ३३ हेक्टर आणि ७ आर एवढी जमीन ९९ वर्षाच्या भाडे पट्टयाने उपलब्ध करून दिली. याशिवाय संस्थेने स्वत:कडे जमलेल्या निधीतून एकूण ७ हेक्टर ६८ आर एवढी जमीन विकत घेतली. त्यामुळे संस्थेकडे एकूण ४० हेक्टर ७५ आर इतक्या क्षेत्राची जागा उपलब्ध आहे. ४० पैकी १२ हेक्टर जमीन शेतीसाठी व उर्वरीत २८ हेक्टर क्षेत्रात शाळेसाठी इमारत व क्रीडांगण यांची आखणी केलेली आहे.[५५]

एकेक नव्या–नव्या गोष्टी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होत गेल्या. त्यातून शाळेचा दर्जा वाढत गेलेला दिसतो. शहरी शाळांच्या तोडीची, उच्च दर्जाचे शिक्षण देणारी शाळा, मुलांच्या सर्वांगीण विकासात भर टाकणारी शाळा म्हणून गौतम पब्लिक स्कूलने नावलौकिक मिळविला आहे. या शाळेतून बाहेर पडणारे अनेकजन डॉक्टर, इंजिनिअर, कलेक्टर, अधिकारी अशा विविध क्षेत्रांत नाव कमावत आहे. बास्केट बॉल, फुटबॉल, हॉकी अशा विविध खेळांमध्ये या शाळेची काही मुले दरवर्षी राष्ट्रीय पातळीवर खेळताना दिसतात. सन २000 मध्ये राष्ट्रीय पातळीवर स्पर्धेत भाग घेणाऱ्या महाराष्ट्राच्या संघासाठी या शाळेतील फुटबॉलसाठी व हॉकीसाठी तीन अशा नऊ मुलांची निवड झाली होती. ग्रामीण फुटबॉल स्पर्धेत तसेच सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत राज्य पातळीवर या शाळेच्या संघाने अनेकदा अजिंक्यपद पटकावलेले आहे. या स्पर्धांसाठी राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याचा मानही या शाळेने मिळविला आहे.

खेळाबरोबरच विविध कलांचे शिक्षण दिले जाते. त्यामध्ये संगीत, गायन, लोककला, गिर्यारोहन, क्रिएटीव्ह रायटींग, चित्रकला, रंगकाम, बागकाम, पेपर आणि कार्डबोर्ड वर्क, सामाजिक सेवा याबरोबर सायन्स क्लब, निसर्ग अभ्यास असे अनेक उपक्रम राबवले जातात. यामध्ये संगणक शिक्षण आणि तंत्र शिक्षणाचा विभागही सुरू केलेला आहे. गौतम पब्लिक स्कूलने १९९७ पासून संगणक प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे.[५६] चौथीपासून दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना या विशेष शिक्षणाचा लाभ मिळत आहे. संगणकाप्रमाणेच आठवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी तंत्रशिक्षण दिले जाते. नियमित अभ्यासक्रमात शाळा आपला दर्जा कायम टिकवून आहे. निकालाची परंपरा जपत शाळेने आपल्या ध्येयाकडे वाटचालू चालू ठेवली आहे. शाळेच्या स्थापनेमागचा हेतू उदात्त होता. शेतकऱ्यांच्या मुलांना आत्मविश्वासाने जगात आघाडीवर जाता यावे, इंग्रजीच्या अभावामुळे त्यांच्यात न्यूनगंड राहाता कामा नये, त्यांची सर्वांगीण वाढ व्हावी आणि नव्या समाजासाठी आवश्यक नवा माणूस घडवावा ही शाळेच्या स्थापनेच्या वेळची काळाजी गरज होती. गेली ४४ वर्षे गौतम पब्लिक स्कूल त्या दृष्टीने काम करत आहे. शंकरराव काळे यांनीही संस्थेचा फापटपसारा न वाढवता एकाच शाळेवर आपले श्रम आणि लक्ष केंद्रित केले होते. आज या संस्थेचा कारभार आमदार अशोकराव काळे व त्यांचे चिरंजीव आशुतोषराव काळे पहात आहेत.

## २. माध्यमिक विद्यालये –

कर्मवीरांच्या प्रेरणेने शंकरराव काळे यांनी खेड्यापाड्यात शिक्षण प्रसाराचे काम केले आहे. 'रयत' च्या माध्यमातून त्यांनी अनेक विनाअनुदानित विद्यालये सुरू केली. तसेच अनुदान मिळेपर्यंत ती स्वतः झळ सोसून चालविली आणि अनुदान मिळाल्यानंतर ती संस्थेला कायमची जोडून दिली आहे. मात्र कालांतराने शासनाचे धोरण बदलले. शाळांना कायमस्वरूपी विनाअनुदानित मान्यता दिली जाऊ लागली. त्यातच रयत शिक्षण संस्थेनेही आपले धोरण बदलून विनाअनुदानित शाळांची जबाबदारी घेण्यास नकार दिला. त्यामुळे शंकरराव काळेंनी 'गौतमनगर एज्युकेशन सोसायटी' मार्फत दोन कायमस्वरूपी विनाअनुदानित माध्यमिक विद्यालये स्वतः आर्थिक झळ सोसून चालविली आहेत.

कोपरगांव तालुक्यात अनेक गावांमध्ये शंकरराव काळे यांनी विनाअनुदानित शाळा सुरू करून त्या रयत कडे जोडून दिल्या. मात्र अजूनही कोपरगावातील अनेक गावे अत्यंत अडचणीच्या व दळणवळणाच्या दृष्टीने दुर्गम ठिकाणी वसलेली आहेत. अशा गावामधील मुलांना प्राथमिक शिक्षणासाठी तसेच माध्यमिक शिक्षणासाठी शेजारच्या गावांमध्ये सात ते आठ किलोमीटर पायी किंवा सायकलवर प्रवास करून जावे लागते. त्यामुळे अशा गावांमध्ये माध्यमिक शाळा सुरू करण्यासाठी त्या गावातील कार्यकर्त्यांनी श्री. काळे यांच्याकडे आग्रह धरला. मात्र दरम्यानच्या काळातील शासनाचे अनुदानाचे धोरण बदलल्यामुळे मोठी अडचण निर्माण झाली. शेवटी श्री. काळे यांनी गौतमनगर एज्युकेशन सोसायटी मार्फत कोपरगाव तालुक्यील न्यू इंग्लिश स्कूल, देर्डे चांदवड व न्यू इंग्लिश स्कूल, काकडी ही दोन माध्यमिक विद्यालये कायम विनाअनुदान तत्वावर सन २००३ पासून सुरू केलेली आहे.[५७] मात्र अलीकडे शासनाने विनाअनुदानित माध्यमिक विद्यालये अनुदानित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता ही विद्यालये 'रयत' शिक्षण संस्थेला जोडण्याचा शंकररावांचा विचार होता. त्यांनी संस्थेशी तसा पत्रव्यवहार केला होता. मात्र दरम्यान त्यांच्या निधनामुळे ही प्रक्रिया होऊ शकली नाही.

## ३. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय –

कोळपेवाडी परिसरामध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून शंकरराव काळे यांनी रयतच्या माध्यमातून अनेक शाळा उभ्या केल्या. मात्र उच्च शिक्षणाची गैरसोय तशीच राहिली. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था या कोपरगाव तसेच सिन्नर तालुक्यांच्या गावी होत्या. ही शहरे कोळपेवाडीपासून २५–३० किलो मीटर

अंतरावर असल्यामुळे या परिसरात उच्च शिक्षणाचे प्रमाण अत्यंत अल्प होते. विशेषतः या परिसरातील बहुतेक मुली उच्च शिक्षणापासून वंचित रहात होत्या. मुलांच्या उच्च शिक्षणाबरोबरच मुलींनाही उच्च शिक्षण मिळावे म्हणून परिसरातच उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय सुरू करण्याचा शंकरराव काळे यांनी विचार सुरू केला. मात्र रयत शिक्षण संस्थेच्या धोरणानुसार त्यांनी विनाअनुदानित महाविद्यालयांची जबाबदारी घेण्यास नकार दिला. त्यामुळे शंकरराव काळे यांनी गौतमनगर एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून सन २००२ पासून कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरू केले आहे. कोळपेवाडी परिसरातील सुमारे ४० ते ४५ खेड्यातील व वाड्यावस्त्यावरील मुला-मुलींच्या त्यामुळे उच्च शिक्षणाची सोय झाली आहे. आज या महाविद्यालयात २५७ मुली व ३९१ मुले उच्च शिक्षण घेत असून दरवर्षी ही संख्या वाढत आहे.[५८]

शंकरराव काळे यांच्या कार्यामध्ये त्यांच्या सुविद्य पत्नी कै. सौ. सुशिलामाई काळे यांचा मोलाचा वाटा होता. तसेच परिसरातील मुलींना उच्च शिक्षण मिळावे अशी त्यांच्या पत्नीची सतत तळमळ होती. त्यामुळेच काळे यांनी ग्रामीण भागात उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला. परिणामी कोळपेवाडी परिसरात मोठ्या प्रमाणात मुली पदवीधर होत आहेत. शंकरराव काळे व त्यांच्या पत्नी कै. सौ. सुशिलामाई काळे यांच्या कार्याची दखल घेऊन गौतमनगर एज्युकेशन सोसायटीच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी एक विशेष सर्व साधारण सभा घेऊन या महाविद्यालयाच्या 'सौ. सुशिलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय' या नामकरणास मंजुरी दिली आहे. या महाविद्यालयाच्या भव्य अशा इमारतीचे उद्‌घाटन दिनांक १४ जानेवारी २००८ रोजी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू मा. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते नुकतेच झाले असून त्याचवेळी मा. कुलगुरूंनी या नामकरणाची घोषणा केली आहे.

**४. सौ. सुशिलामाई काळे माध्यमिक विद्यालय –**

उक्कडगांव (देवीचे) हे कोपरगाव तालुक्याचे पूर्वेकडील शेवटचे सतत दुष्काळग्रस्त असे गाव आहे. जेमतेम प्राथमिक शिक्षणाची त्याठिकाणी सोय होती. माध्यमिक शिक्षणासाठी मुलांना आडवळणी असलेल्या ९ कि.मी. अंतरावरील गोधेगांवला जावे लागत असे. त्यामुळे बहुसंख्य विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणापासून वंचित रहावे लागत असे. आपल्या गावी माध्यमिक विद्यालय असावे अशी ग्रामस्थांची इच्छा होती. परंतु निधीची उपलब्धता नसल्यामुळे ते हतबल झाले होते.

१९९२ साली महाराष्ट्र शासनाच्या बृहत आराखड्यात या गावाचा समावेश झाल्याने ग्रामीण अवर्षण क्षेत्र विकास संस्था, खडके वाके, ता. राहाता या स्वंयसेवी संस्थेने जून १९९२ साली या गावात माध्यमिक विद्यालय सुरू केले. त्यावेळी महाराष्ट्र शासनाने अनुदानित तत्वावर माध्यमिक शाळांना मंजूरी देण्याचे नाकारल्याने विना अनुदानित तत्वावर 'न्यू इंग्लिश स्कूल, उक्कडगांव' हे विद्यालय सुरू करावे लागले.[५९] त्यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी शंकरराव काळे यांची भेट घेऊन मदत मागितली. श्री.काळे यांनी या संस्थेला सर्व प्रकारची मदत देण्याचे मान्य केले. न्यायालयीन कामामध्ये मदत केली. तसेच मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली.

आज या विद्यालयात उक्कडगांव शिवाय वैजापूर व येवला तालुक्यातील बेलगांव, खामगांव, नांदगांव इ. ठिकाणचे मुले-मुली शिक्षणाचा लाभ घेत आहेत. १९९५ पासून विद्यालयास विना-अनुदानित तत्वावर मान्यता मिळाली असून जून २००० पासून इ. ५ वी ते ७ वीचे वर्गही विनाअनुदानित तत्वावर विद्यालयास जोडले आहेत. शंकरराव काळे यांनी या शाळेला दोन एकर जागा घेऊन जवळपास तीन लाख रूपये खर्च करून चार खोल्यांची इमारत बांधून दिली आहे. या शाळेला सर्व प्रकारची मदत देण्यामध्ये त्यांची पत्नी सौ. सुशिलामाई काळे यांचाही फार मोठा सहभाग होता. त्यामुळे या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सर्वसाधरण सभेत एक ठराव मंजूर करून १९ जानेवारी २००३ रोजी या शाळेला '' सौ. सुशिलामाई काळे माध्यमिक विद्यालय'' असे नाव दिले.[६०] आता ही शाळा १०० टक्के अनुदानित झाली आहे.

शंकरराव काळे यांनी रयत व गौतमनगर एज्युकेशन सोसायटीमार्फत जे काम उभे केले आहे ते अत्यंत मोठे आहे. अनेक मोठमोठ्या माणसांनी वेळोवेळी आपल्या भाषणातून ते मान्य केले आहे. गौतम पब्लिक स्कूलच्या उद्घाटनच्यावेळी तत्कालीन शिक्षण राज्यमंत्री कै. ना. आबासाहेब निंबाळकर बोलताना म्हणाले होते, ''काळाची पावलं ओळखून दर्जेदार शिक्षणावर भर दिला पाहिजे व त्यासाठी इंग्रजी सारखे विषय सक्तीचे केले पाहिजेत. शंकरराव काळे यांनी नेमका हाच विचार करून गौतम पब्लिक स्कूल सुरू केले. किंबहुना रयत शिक्षण संस्थेचे काम करतानाही त्यांनी याच विचाराला प्राधान्य देऊन संस्थेचा विस्तार वाढवला.''[६१]

बारामती कृषी प्रतिष्ठानचे अध्यक्ष कै. डॉ. आप्पासाहेब पवार, शंकरराव काळे यांच्या शैक्षणिक कामगिरीबद्दल एका कार्यक्रमात म्हणाले होते की, ''माझा भाऊ रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आहे, मेहुणे कार्याध्यक्ष आहेत आणि मी स्वतः संस्थेचा एक

पदाधिकारी आहे असे असूनही रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात शिक्षण पोहचवण्याचं मला न जमलेलं काम शंकरराव काळे यांनी करून दाखवलं आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आमच्या मनात न्यूनगंड होता; परंतु श्री. काळे व श्री. दत्ता देशमुख यांच्यासारखे ग्रामीण भागातील तरूण त्या काळात अभियंते झाले. तेच आमचे आदर्श होते. हा आर्दश श्री. काळे यांनी अद्यापपर्यंत आपल्या कामातून टिकविला आहे. एवढेच नव्हे तर नि:स्वार्थी वृत्तीने शिक्षण प्रसारचे जे काम त्यांनी केले आहे त्यातून आजच्या एकूण शिक्षण क्षेत्रापुढे त्यांनी आणखी एक नवा आदर्श निर्माण केला आहे.''[६२] अहमदनगर जिल्ह्यातील काँग्रेसचे जेष्ठ नेते व शंकरराव काळे यांचे एक सहकारी भाऊसाहेब थोरात श्री. काळे यांच्याबद्दल म्हणतात की, ''कर्मवीर अण्णांनी ज्या ध्येयाने रयत शिक्षण संस्था सुरू केली त्याच ध्येयाने शंकरराव काळे यांनी रयत शिक्षण संस्था वाढवली. केवळ वाढवली नाही तर त्यामागची तळमळ इतरांनीही विचारात घेण्यासारखी आहे. किंबहुना कर्मवीरांच्या तोडीचेच काम त्यांनी केले आहे. म्हणूनच अण्णांच्या नंतर 'दुसरे कर्मवीर' म्हणून आपण त्यांचा उल्लेख करायला हवा असे मला मनोमन वाटते.''[६३]

मुख्यमंत्री असताना कै. विलासराव देशमुख हे कोळपेवाडी येथील कन्या विद्यालयाच्या प्रयोगशाळा उद्घाटनासाठी आले होते. तेव्हा त्यांनीही शंकररावांच्या शैक्षणिक कार्याबद्दल गौरोद्गार काढले, '' शंकरराव काळे हे आम्हा सर्व राजकारणी लोकांमध्ये  आश्चर्य आहे की, ज्यांनी पैसा कमावण्यासाठी व्यावसायिक शिक्षण संस्था काढल्या नाहीत. संपूर्ण महाराष्ट्रातील नेत्यांमध्ये असे एकमेव आहेत.''[६४] केंद्रिय संसदीय कामकाज खात्याचे मंत्री असताना ना. पृथ्वीराज चव्हाण एका कार्यक्रमासाठी कोळपेवाडीला आले होते. त्यावेळी बोलताना ते म्हणाले, ''शंकरराव काळे यांच्या कामगिरीला तोड नाही. खऱ्या अर्थाने ते ''कर्मवीर अण्णांचे वारसदार'' आहेत.[६५]

केवळ रयत शिक्षण संस्थेच्या शाळांना किंवा महाविद्यालयांनाच त्यांनी मदत केली असेही नाही. इतर अनेक शैक्षणिक संस्थांच्या शाळांना त्यांनी वर्ग खोल्या बांधून दिल्या. कोपरगाव येथील कोपरगाव एज्युकेशन सोसायटीच्या के. जे. सोमय्या महाविद्यालयाला त्यांनी विज्ञान विभागाच्या आधुनिक प्रयोगशाळेसाठी २००९ साली १ लाख ११ हजार देणगी दिली होती. सोनेवाडी, ता. कोपरगाव येथील हायस्कूल हे भारत सेवा संघ पाचेगाव, ता. नेवासा या संस्थेचे आहे. मात्र या शाळेला इमारत नसल्याने शंकररावांनी या शाळेला इमारत बांधून दिली. त्यामुळे सदर संस्थेच्या व्यवस्थापनाने या शाळेला 'कर्मवीर शंकरराव काळे' असे नाव दिले आहे. ७ एप्रिल २००८ रोजी मा. ना.

पतंगराव कदम यांच्या उपस्थितीत हा भव्य नामकरण सोहळा पार पडला होता. यावेळी ना. पतंगराव कदम यांनी शंकररावांच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक केले होते. शंकररावांनी अखेरच्या श्वासापर्यंत 'रयत' च्या शाळा काढण्याचे काम सुरूच ठेवले होते. कोपरगाव तालुक्यातील अलीकडच्या काळातील अनुदानित झालेल्या करंजी बु., व भोजडे येथील न्यू इंग्लिश स्कूल या शाळा शेवटच्याच टप्प्यात काढल्या होत्या. त्यापैकी २००४ साली भोजडे येथील हायस्कूलचे रयत शिक्षण संस्थेने 'सौ. सुशिलामाई शंकरराव काळे' असे नामकरण केलेले आहे.[६६]

थोडक्यात शंकरराव काळे यांच्या सहकारी क्षेत्रातील व राजकीय क्षेत्रातील कार्यापेक्षाही त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान एकप्रकारे इतिहासातील एक सुवर्णपानच आहे. त्यामुळेच रयत शिक्षण संस्थेमधील पदाधिकारी, सेवक व अनेक जाणकार स्व. शंकरराव काळे यांच्या 'रयत' मधील कामाचा आदर करून कर्मवीर आण्णांच्या नंतर रयत शिक्षण संस्थेचे निष्ठापूर्वक काम करणारे 'दुसरे कर्मवीर' असाच उल्लेख करतात.

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | ग. बा.सरदार | : | महाराष्ट्र जीवन (खंड दुसरा), मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, १९८३ सदाशिव पेठ, पुणे–९, पृ. ९३ |
| २) | नुरूल्ला सैद व जे. पी. नाईक | : | ए स्टुंडंट हिस्ट्री ऑफ एज्युकेशन इन इंडिया, मॅकमिलन प्रकाशन, मुंबई – १९७१, पृ. ६९ |
| ३) | शं. दे. जावडेकर | : | आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे – ३०, पृ. ५९ |
| ४) | H.V.Hampton | : | Eiographical Studies in Modern Indian Education, Pg.25 |
| ५) | धनंजय किर | : | महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि., भुलाभाई देसाई रोड, मुंबई –२०११, पृ. ३७ |
| ६) | प्रमोद ओक | : | एलफिन्स्टन, पुणे – १९९९, पृ. २०५–२०६. |
| ७) | वार्षिक अहवाल | : | महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती शिक्षण खाते, मुंबई, वर्ष – १९५४–५५, पृ. ४१ |
| ८) | डॉ. के. के. चौधरी | : | झुंजार पुणे, वसाहतवाद व सामाजिक विषमतेशी लढा, कॉन्टीनेंटल प्रकाशन – २००८, पुणे – ३०, पृ. ९१ |
| ९) | धनंजय किर | : | उपरोक्त, पृ. १४७ |
| १०) | डॉ. ए. व्ही. मॅथ्यु | : | कर्मवीर भाऊराव पाटील, प्रकाशक –सुभाषचंद्र भोसले, सचिव –रयत शिक्षण संस्था, सातारा, प्रथमावृत्ती –१९८८, पृ. ५० |
| ११) | कित्ता | : | पृ. ५१ |
| १२) | अजित पाटील | : | कर्मवीरायण, डायमंड पब्लीकेशन, १६९१, शंकरप्रसाद बिल्डींग, टिळक रोड, पुणे –२००६, पृ. ८५ |
| १३) | कित्ता | : | पृ. १२१ |
| १४) | कित्ता | : | पृ. १०९ |
| १५) | एस.एस.गाठाळ | : | आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद – २०१३, पृ. ३०२ |
| १६) | डॉ. ए. व्ही. मॅथ्यु | : | उपरोक्त, पृ. ११६ |
| १७) | वार्षिक अहवाल | : | रयत सेवक, प्रकाशन – सचिव रयत शिक्षण संस्था, सातारा – २००१–२००२ |

| | | |
|---|---|---|
| १८) कित्ता | : | पृ. ३ |
| १९) कित्ता | : | पृ. ४ |
| २०) कित्ता | : | २००५–०६, पृ. ३ |
| २१) कित्ता | : | पृ. ३ |
| २२) आर. के. शिंदे | : | एक महान कर्मयोगी– कर्मवीर भाऊराव पाटील, प्रकाशक– कर्मवीर विद्याप्रबोधिनी, सातारा, २२ सप्टेंबर २००६, पृ. ७ |
| २३) सुहास कुलकर्णी | : | विकाससूर्य, युनिक फिचर्स, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे – २००१, पृ. ७५ |
| २४) ज्ञानेश्वर सोनवणे | : | समाजअभियंता, प्रकाशक – अरूण जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे – २००९, पृ. १०३ |
| २५) कित्ता | : | पृ. १०४ |
| २६) अजित पाटील | : | उपरोक्त पृ. १०१ |
| २७) वार्षिक अहवाल | : | रयत सेवक, प्रकाशक – रयत शिक्षण संस्था सातारा, २०११–२०१२, पृ. १३ |
| २८) कित्ता | : | १९८९–९०, पृ. १६ |
| २९) कित्ता | : | पृ. १७ |
| ३०) वार्षिक अहवाल | : | दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि. १९९८ प्रकाशक– चेअरमन, कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर पृ. ९ |
| ३१) कित्ता | : | पृ. १० |
| ३२) मुलाखत | : | श्री. शंकरराव काळे, दि. ७ मे २०१२ |
| ३३) कित्ता | : | |
| ३४) स्मरणिका | : | रयत शिक्षण पत्रिका, प्रकाशक– मध्यवर्ती कार्यालय, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९८९–९०, पृ. २८ |
| ३५) विकाससूर्य | : | उपरोक्त पृ. ८८,८९ |
| ३६) बिरबल शिंदे, विठ्ठल मासाळ | : | कर्मवीर दादासाहेब पाटील, जीवन व कार्य, डेक्कन जिमखाना, आमराई कॅम्प, पुणे – १९७०, पृ. १०१ |
| ३७) ज्ञानेश्वर सोनवणे | : | समाज अभियंता, उपरोक्त, पृ. ११५ |
| ३८) कित्ता | : | पृ. ११७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३९) | शंकरराव कोल्हे | : | सत्याग्रही शेतकरी, सुधाकर जोशी, राजमयूर सोसायटी, एरंडवणे, पुणे, प्रकाशक – चेअरमन, संजीवनी सह. सा. कारखाना लि., कोपरगांव – २०१२, पृ. २१६ |
| ४०) | महादेव वरडुळे | : | सीनापुत्र, ए. बु. तथा आबासाहेब निंबाळकर, जीवन व कार्य, प्रकाशक , नरूभाऊ लिमये, गतिमान प्रकाशन, पुणे ह्व १९६० पृ. ११५. |
| ४१) | मुलाखत | : | श्री. काळे शंकरराव, ७ मे २०१२ |
| ४२) | कित्ता | : | |
| ४३) | कित्ता | : | |
| ४४) | कित्ता | : | |
| ४५) | कित्ता | : | |
| ४६) | कित्ता | : | |
| ४७) | कित्ता | : | |
| ४८) | मुलाखत | : | मा. आमदार श्री. बबनराव पाचपुते(माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य ) २० मे २०१२ |
| ४९) | ज्ञानेश्वर सोनवणे | : | समाज अभियंता, उपरोक्त, पृ. १०६ |
| ५०) | कित्ता | : | पृ. १०८ |
| ५१) | कित्ता | : | पृ. १०९ |
| ५२) | कित्ता | : | पृ. ११० |
| ५३) | वार्षिक अहवाल | : | गौतम एज्युकेशन सोसायटी, गौतमनगर ता. कोपरगांव, १९७२–७३, प्रकाशक – चेअरमन काळे शं. दे. पृ. २ |
| ५४) | कित्ता | : | पृ. ३ |
| ५५) | कित्ता | : | पृ. ६ |
| ५६) | वार्षिक अहवाल | : | कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी, गौतमनगर प्रकाशक – चेअरमन आ. अशोक काळे, २०११–१२, पृ. ४ |
| ५७) | कित्ता | : | पृ. ५ |
| ५८) | कित्ता | : | पृ. ६ |
| | कित्ता | : | पृ. ७ |

५९) स्मरणिका : ग्रामिण अवर्षण क्षेत्र विकास संस्था, उक्कडगांव,, ता. कोपरगांव – २००३, प्रकाशक – सचिव संस्था, पृ. ३

६०) वार्षिक अहवाल : गौतम एज्युकेशन सोसायटी, उपरोक्त, २००३–०४, पृ. ६

६१) कित्ता :

६२) कित्ता :

६३) कित्ता :

६४) कर्मवीर जयंती उत्सव कार्यक्रम, रयत संकूल, कोळपेवाडी, २९ सप्टेंबर २००८ (प्रमुख अतिथी, समारंभ)

६५) कित्ता : २६ सप्टेंबर २००९, (प्रमुख अतिथी, समारंभ)

६६) स्मरणिका : संकल्पातून सिद्धीकडे, नामकरण सोहळा, सौ. सुशिलाबाई शंकरराव काळे माध्यमिक विद्यालय, भोजडे, ता. कोपरगांव.

## प्रकरण – ६

# शंकरराव काळे यांचे सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान

**प्रस्तावना**

ऐतिहासिक व्यक्तींचा दृष्टीकोन बघितला तर त्या व्यक्तींना एका विशिष्ट क्षेत्रातील विकास हा परिपूर्ण व्यक्तिमत्वासाठी उपयुक्त ठरू शकत नाही. त्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक अशा विविध क्षेत्रात विकास झालाच पाहिजे, असे वाटत असते. त्यामुळेच शंकरराव काळे यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि कार्याचा अभ्यास करतांना त्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्याचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे.

सहकाराच्या माध्यमातून निर्माण होणारी ताकद ही ग्रामीण भागाच्या सामाजिक व सांस्कृतिक विकासासाठी जर वापरली गेली नाही तर त्या आर्थिक समृद्धीला काहीच अर्थ उरत नाही. या समृद्धीतून अनेक गंभीर सामाजिक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणूनच असे प्रश्न निर्माण होऊन द्यायचे नसतील तर देशात, राज्यात, प्रांतात, विभागात, शहरात व खेड्यात समृद्ध आणि संपन्न समाजनिर्मिती आवश्यक आहे. हे ओळखण्याची दुरदृष्टी शंकरराव काळे यांना अवगत होती. शंकररावांचे बालपण हे ग्रामीण महाराष्ट्राच्या एका खेड्यात गेले होते. तेथे शिक्षणाची सोय नसल्यामुळे शिक्षणाच्या निमित्ताने त्यांना अनेक ठिकाणी भ्रंमती करावी लागली. कारण सुरूवातीचे शिक्षण हे ग्रामीण भागत तर उच्च शिक्षण हे शहरी भागात गेल्यामुळे त्यांना शहरी व ग्रामीण भागातील जीवनातील तफावत विशेषत्वाने जाणवली होती. अलीकडच्या काळात खेड्यातून शहराकडे होणाऱ्या स्थलांतराप्रमाणे शिक्षण, आरोग्य, रोजगार व विकासाभिमुख सुविधांची उपलब्धता व खेड्यातील सुविधांचा अभावा ही प्रमुख कारणे आहेत. स्थलांतर ही प्रक्रिया कायदा करून किंवा काही बंधने लादून सुटणारी गोष्ट नाही. हा स्थलांतराचा प्रश्न जर सोडावयाचा असेल तर आपण त्यासाठी खेड्यात, मागासलेल्या वाड्या–वस्त्यांवर शिक्षण, आरोग्य, सिंचन, रस्ते यासारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. यासाठी शंकरराव काळे यांनी सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले आहे.

सहकारी साखर कारखान्यामुळे होणारा विकास हा कोणा एका व्यक्तीचा अथवा, व्यक्तीच्या गटाचा विकास नसतो, तर तो आजूबाजूच्या सर्व परिसराचा विकास

असतो. याचे कारण कोणताही ऊस उत्पादक शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा सभासद झाला की तो एका अर्थाने कारखान्याच्या अनेक मालकांपैकी एक मालक बनतो. हे सभासदच मग कारखान्याचे व्यवस्थापन बघणाऱ्या संचालकांना निवडतात. या संचालकांचे मंडळ कारखान्याचा कारभार पाहते. अर्थातच सहकारी कारखान्याचा कारभार हा सामान्य ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन होतो हे गृहीत असते. सहकाराचे हे कल्याणकारी तत्व प्रत्यक्षात यावे म्हणून शंकरराव काळे यांनी अनेक प्रकारचे प्रयत्न केले व आधुनिक सुखसोयींपासून दूर असणाऱ्या कोळपेवाडीसारख्या खेड्यात विकासाची गंगा नेण्याचा मार्ग यशस्वी केला. कारखान्यातून येणारी आर्थिक सुबत्ता पुरेशी न मानता कोसाकाच्या माध्यमातून सामाजिक विकास साधायचे ध्येयही त्यांनी पूर्ण केले. त्यांनी प्रसंगी आर्थिक मदतही दिली. त्यामुळे मग सरकारचे प्राथमिक आरोग्य केंद्र गेल्या पन्नास वर्षात ज्या कोळपेवाडी नावाच्या खेड्यात पोहोचू शकले नाही. तिथे १९७७ सालीच सहकारी कारखान्यामार्फत पॉलिक्लिनीक सुरू झाले. कोळपेवाडी परिसर रस्ते दुरूस्ती व बांधणी यांमुळे अहमदनगर, पुणे, कोपरगाव यासारख्या शहरी भागांशी जोडला गेला. कारखान्याच्या पुढाकारामुळेच शेण, मैल्यापासून गावातल्या गावातच गोबरगॅसची पर्यायी इंधनाचा प्रयोग राबवला गेला. सहकारी साखर कारखाना हे सामाजिक विकासाचे एक उत्तम माध्यम बनू शकले. पण त्याला शंकरराव काळे यांचे प्रोत्साहन कारणीभूत ठरले.

कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीमुळे कोळपेवाडी परिसरातल्या लोकांना रोजगार मिळाला. त्यांची आर्थिक स्थिती सुधारली. त्यांच्या आयुष्यात स्थैर्य आले पण त्यातून शहरापासून दूर असलेल्या या लोकांचे दैनंदिन आयुष्य सुकर झाले असे मात्र नाही. हे लक्षात घेऊन त्यावर उपाय शोधण्यात कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या पगारदार नोकरांच्या सहकारी पतपेढीने पुढाकर घेतला. या उपक्रमात कामगारांच्या हिताचा जसा विचार होता तसाच परिसरातल्या नागरिकांसाठी सोयी उपलब्ध करून देण्याचाही विचार केला.

पूर्वी कोळपेवाडीतल्या लोकांना आपले प्रत्येक छोटे–मोठे काम करायला शहरात जावे लागत असे. कारखान्याने सर्व सोयी सुविधा पतपेढीच्या माध्यमातून पुरवल्यामुळे गावकऱ्यांची अनेक कामे गावात होऊ लागली. त्यामुळे गावातल्या गावात रोजगार निर्मिती झाल्याने मोठे व्हायचे असेल तर शहराकडे धाव घ्यायची गरज नाही हेही लोकांना पटू लागले. कारखाना फक्त नफ्यासाठी काम करत नाही तर कारखाना आपला आहे त्याची यंत्रणा आपल्या सोयीसुखात सहभागी होऊ पाहते असे परिसरातल्या लोकांना

वाटू लागले आणि कल्याणाकरीता तत्व प्रत्यक्षात येऊ लागले. त्यातून शंकरराव काळे यांनी परिसरातील सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे.

### ६.१ कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून केलेली सामाजिक कामे

### १. रस्ते बांधणी –

कारखान्याला केंद्रीभूत मानून परिसराचा विकास साधताना कारखान्याने उपक्रम हाती घेतला तो रस्ते दुरूस्ती व बांधणीचा. कोपरगाव साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात कोपरगाव तालुक्यातली व नाशिक जिल्ह्यातील काही गावे येतात. साखर कारखाना होण्यापूर्वी कोळपेवाडीला या सर्व विभागांशी जोडणारा रस्ता कच्चा होता. साखरेचा उतारा जास्त हवा असल्यास ऊस तोडणी झाल्यापासून एक दिवसाच्या अवधीत हा ऊस कारखान्याच्या यंत्रात पडला तरच काही फायदा शेतकऱ्याला मिळू शकतो. कोळपेवाडीतल्या या साखर कारखान्याला आजूबाजूच्या एकशे पन्नास कि. मी. च्या परिसरातून ऊसाचा पुरवठा होत असतो. रस्ते दुरूस्तीला सुरूवात होण्यापूर्वी रस्ते खराब असल्यामुळे ठरलेल्या वेळात हा ऊस कारखान्यात पडायचा नाही. त्यामुळे साखरेचा उतारा बऱ्याचदा कमी यायचा. कोळपेवाडी गावाला आजूबाजूच्या परिसराशी जोडणारा रस्ता पक्का केला. तर ऊसाचा उतारा वाढेल हे जाणून शंकरराव काळे यांनी हा रस्ता पक्का करण्याच्या दृष्टीने १९८० पासून स्वतः लक्ष घातले. फंडस्मधून येणारे पैसे रस्त्याचे डांबरीकरणासाठी वापरायचे ठरवले. हे पैसे मिळविण्यासाठी खूप पाठपुरावा करावा लागला. पण त्या प्रयत्नामुळे कोळपेवाडी गावाला शहरांशी तसेच आजूबाजूच्या ग्रामीण भागाशी जोडणारे पक्के रस्ते तयार झाले. यापैकी काही रस्त्यांचे काम कोपरगाव सहकारी साखर कारखान्याने स्वतःच्या भाग विकास निधीतून केले.[१] कोळपेवाडी गावाला आजूबाजूच्या भागांशी जोडणाऱ्या पक्क्या रस्त्यांची बांधणी झाल्याने ऊसापासून मिळणारा साखरेचा उतारा तर वाढलाच पण एकूण दळवळणाची गतीही वाढली.

कोपरगाव तालुक्यातला कुंभारी–कोळपेवाडी हा रस्ता कारखान्याच्या भाग विकास निधीतून पक्का करून घेतला. रवंदा–सोनारी रस्ता व धामोरी–शिरवाडे रस्ता हा पावसाळ्यात पाण्याखाली जायचा. कारखान्याने एक लाख रूपये खर्चून या रस्त्यावर भर टाकून घेतली. त्यामुळे पावसाळ्यातही हा रस्ता राहू लागला. नाशिक जिल्ह्यातल्या विघनवाडी ते कारवाडी रस्त्याच्या कडेला मोठी विहीर होती. त्यामुळे रात्रीच्या वेळी या विहिरीच्या परिसरात अनेक अपघात होत. कारखान्याने या विहिरीच्या कडेला भिंत बांधली.[२] या भिंतीमुळे नंतरच्या काळात वाहतूक सुरक्षित झाली. मुख्य म्हणजे या

भागातून कारखान्याला ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांची ऊस वाहतूक त्यामुळे बरीच सुरक्षित झाली. कोळपेवाडी ते माहेगांव देशमुख हा कच्चा रस्ता डांबरी करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे गेली अनेक वर्षे पडून आहे. या रस्त्याच्या दुरूस्तीचे कामही कारखाना आता हाती घेत आहे. सहकाराच्या माध्यमातून परिसराचा विकास कसा होऊ शकतो याचे उदाहरण कोसाकाने घालून दिले आहे. यामध्ये सहकारी साखर कारखाना उभा करणाऱ्या शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाची भूमिका महत्वाची ठरली. कारण जे शेतकरी एकएकटे काहीच करू शकत नव्हते, त्यांना सहकाराच्या माध्यमातून एकत्र आणण्याचे काम त्यांनी केले.

**२. पॉलिक्लिनिकच्या माध्यमातून आरोग्यसेवा –**

साखर कारखाना स्थापन होण्यापूर्वी कोळपेवाडीत कुठल्याही प्रकारची वैद्यकिय सेवा नव्हती. साखर कारखाना उभा राहिल्यावर या भागात कारखान्याच्या कामगारांची वसाहत बांधण्यात आली. या वसाहतीत राहणाऱ्या कामगारांसाठी व परिसरातल्या इतर ग्रामस्थांसाठी कारखान्याच्या आवारात एक दवाखाना सुरू करण्यात आला. सुरूवातीच्या काळात या दवाखान्यात रोग्यांना तपासण्यासाठी एक पदवीधर डॉक्टर असायचा. हा डॉक्टर रोग्यांना प्राथमिक सल्ला आणि औषधे द्यायचा पण दुखणे जास्त वाढले तर तज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि औषधोपचार कोळपेवाडी गावातल्या रूग्णांना मिळत नव्हते. त्यासाठी त्यांना कोपरगाव या तालुक्याच्या किंवा अहमदनगर जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत असे. ही दोन ठिकाणे कोळपेवाडीपासून बऱ्याच अंतरावर असल्याने कोळपेवाडीतल्या रहिवाशांचा निदान एक दिवस यात जात असे. ग्रामस्थांची ही अडचण लक्षात घेऊन साखर कारखान्याच्या परिसरातच १९७७ साली एक पॉलिक्लिनीक सुरू करण्यात आले.[३] आता दवाखान्याच्या या केंद्रात नाक, कान, घसा, स्त्रीरोग, बालरोग, ह्रदयरोग, नेत्र, दात इत्यादी विभागाचे तज्ञ येऊन रूग्णांना वैद्यकिय सल्ला देतात आणि त्यांच्यावर उपचार करतात. या रोग्यांवर औषधोपचार करण्यासाठी कारखान्याचे हे पॉलिक्लिनीक वर्षाला दहा लाख रूपयांची औषधे खरेदी करते. यापैकी ३ लाख रूपयांची औषधे पॉलिक्लिनीक स्वतःच्या खर्चाने रूग्णांना मोफत देते. हा खर्च कारखाना करतो तर बाकीच्या किंमतीची औषधे पॉलिक्लिनीक 'ना नफा–ना तोटा' या तत्वावर वितरित करते. पॉलिक्लिनीक खूप मोठ्या प्रमाणावर औषधे घेत असल्यामुळे ती स्वस्तात मिळतात आणि ही औषधे 'ना नफा–ना तोटा' या तत्वाने दिल्यामुळे रूग्णांना ती बाजारापेक्षा माफक किंमतीत मिळतात. याशिवाय पॉलिक्लिनीकची एक रूग्णवाहिका

आहे. त्यामुळे तातडीने रूग्णावर उपचार करण्यासाठी गावाच्या बाहेर कोपरगावला, नगरला, नाशिकला किंवा पुण्याला न्यायचे असल्यास ही रूग्णवाहीका सवलतीच्या दरात कारखान्याच्या कामगारांना व सभासद शेतकऱ्यांना वापरता येते.

लोकसंख्या नियंत्रणाचे देशाच्या विकासात महत्व ओळखून त्यादृष्टीने काही कार्यक्रम पॉलिक्लिनीक हाती घेते. यासाठी पॉलिक्लिनीकने गावात पुरूष नसबंदी करण्याची सात–आठ शिबीरे आतापर्यंत घेतलेली आहेत. स्वतःची नसबंदी करून घेणाऱ्या पुरूषाला प्रत्येकी ३०० रूपये कारखान्याने दिले. या कार्यक्रमावर कारखान्याने साधारण तीन लाख रूपये खर्च केले आहेत. तसेच स्त्रियांची संतती नियमन शस्त्रक्रिया करण्यासाठी दर आठवड्याला पॉलिक्लिनीक शिबीर घेत असतेच. यासाठी कारखाना सेंटरला ५० हजार रूपये वार्षिक अनुदान देतो. याशिवाय या पॉलिक्लिनिक सेंटरचे स्वतःचे ऑपरेशन थिएटर आहे. तिथे लोकांची मोतीबिंदूची शस्त्रक्रिया होते. विषमज्वर, हिपॅटायटीस–बी या रोगांबाबतच्या लसीकरणाचे कामही या सेंटरने हात घेतले. तर पोलिओ, कावीळ यासारख्या रोगांवर लस देण्याचे काम सेंटरने गेली ३५ वर्षे सातत्याने चालवलेले आहे.

शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना 'संर्पदंश' होण्याची खूप शक्यता असते. या सर्पदंशावर लस उपलब्ध आहे. पण ही लस फारच महाग असल्याने शहरातसुद्धा डॉक्टर्स किंवा औषध दुकानदार ती सहसा ठेवतच नाहीत. पण कारखान्याचे सेंटर मात्र ही लस आवर्जून ठेवते. सर्पदंश झालेल्यांना ती 'ना नफा–ना तोटा' या तत्वावर दिली जाते. या पॉलिक्लिनीकचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे ऊस तोडणी कामगारांना काम करताना काही इजा झाली किंवा इतर आजार झाला तर सेंटरतर्फे ताबडतोब आरोग्यसेवा पुरवली जाते.

या सर्व प्रयत्नांचा परिणाम म्हणजे कोळपेवाडी आणि परिसरातल्या लोकांची आरोग्यविषयक जागरूकता वाढली आहे. जास्तीत जास्त लोक कारखान्याच्या पॉलिक्लिनिक सेंटरचा फायदा घेत आहेत. आज वर्षाला जवळजवळ २५ हजार रूग्ण या पॉलिक्लिनिकमधून वैद्यकिय सल्ला किंवा उपचार घेतात. गावात काहीच आरोग्यसेवा नसल्यामुळे आजारपणात कोळपेवाडीतले लोक पूर्वी देवऋषी –बाबा, अंगारे, धुपारे करायचे त्यातले बहुसंख्य पॉलिक्लिनिकच्या सुविधेचा लाभ घेतात आणि आजारातून बरे होतात.

कोळपेवाडीत आरोग्यविषयक जागरूकता वाढावी म्हणून पॉलिक्लिनिकने 'एड्स' रोगाविषयी केलेल्या प्रयत्नांची दखल घ्यावी लागेल. या सेंटरने वेळोवेळी घेतलेल्या 'एड्स' या प्राणघातक रोगाची माहिती देणाऱ्या कार्यशाळांमुळे या रोगाबाबतची जागरूकता या भागात मोठ्याप्रमाणावर झाली. एडस् या रोगावर औषधे उपलब्ध नाही. त्यामुळे 'हा रोग टाळण्यासाठी घ्यायची काळजी हीच त्यावरची लस' असे सांगितले जाते. तसेच एड्स झालेल्या रूग्णांशी समाजाने निरोगी व्यवहार ठेवण्याचा प्रश्नही महत्वाचा आहे. 'एड्स' या विषयीच्या अशा अनेक मुद्यांना या कार्यशाळांमध्ये स्पर्श करण्यात येतो. अशा गावोगावच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात एड्सचे वाढते प्रमाण रोखण्यास काही प्रमाणात तरी मदत होईल असे वाटते.

पॉलिक्लिनिक सेंटरच्या कामाचे आणखी एक वैशिष्टये म्हणजे गुजराथमधल्य भूकंपाला मदत म्हणून दोन लाख रूपयांची मदत आणि एक रूग्णवाहीका काही काळ पाठविण्याचा निर्णय पॉलिक्लिनिक सेंटरने घेतला. ही सर्व मदत अर्थात कारखान्यानेच दिली.[४]

**३. परिसरासाठी अग्निशमन सेवा –**

कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या पुढाकारामुळे परिसरासाठी अग्निशामक गाडी उपलब्ध होऊ शकली आहे. कारखाना येण्यापूर्वी कोळपेवाडीच्या परिसरात कुठेही आग लागली तर कोपरगावहून अग्निशामक गाड्या मागवाव्या लागत. कोपरगाव कोळपेवाडीपासून वीस कि.मी. लांब असल्याने या गाड्या पोहचण्यास तसा वेळच लागत असे. पण आता कोळपेवाडीच्या आसपास असलेल्या ग्रामीण भागात कुठल्याही घराला आग लागली, कोणाची पिके पेटली, कुठले दुकान जळू लागले तर आग शमवण्यासाठी या अग्निशामक गाड्या तातडीने धावतात. अग्निशामक गाड्यांची सोय परिसराला त्वरीत उपलब्ध होऊ लागल्यामुळे परिसरातले खूप नुकसान टळले आहे.

**४. टंचाईग्रस्त गावांच्या पिण्याच्या पाण्यासाठी टँकरने पाणी पुरवठा –**

काही गावांमध्ये पाणीपुरवठा योजना अपूर्ण असल्याने, उन्हाळ्यात पाणी टंचाई जाणवते.दुष्काळग्रस्त गावांमध्ये पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कारखान्यामार्फत स्वनिधीतून टँकर उपलब्ध करून दिला जातो. पाणीटंचाई असेपर्यंत अशा टँकरने संबंधित गावांना पाणीपुरवठा केला जातो.

### ५. नैसर्गिक साधन संपत्तीतून पर्यावरण संरक्षण –

भारताला पेट्रोलियम गॅस हे इंधनाचे प्रकार इतर देशातून आयात करावे लागतात. या इंधनाची किंमत जास्त असल्यामुळे ग्रामीण भागापर्यंत स्वयंपाकाचा गॅस पुरवणे सरकारला परवडत नाही. त्याची किंमतही जास्त असल्यामुळे ग्रामीण भागातले लोक ते खरेदी करू शकत नाही. दुसरीकडे, जंगलातला लाकूडफाटा स्वयंपाकासाठी इंधन म्हणून वापरण्याची ग्रामीण भागात परंपरा आहे. जंगलातल्या लाकडाच्या अशा वापरामुळे निसर्गाचा तोल बिघडतो. इंधनाच्या या गुंतागुंतीच्या समस्येवरचा उपाय म्हणजे ग्रामीण भागात गोबरगॅसचा वापर करणे. गोबरगॅस तयार करण्यासाठी लागणाऱ्या शेणाची मुबलकता, किफायतशीरपणा आणि पर्यावरणीय संरक्षण या दृष्टींनी गोबरगॅसचा ग्रामीण भागात प्रसार करणे महत्त्वाचे ठरते. हे लक्षात घेऊन गोबरगॅस सयंत्र निर्मिती व त्यासाठीचे अनुदान शेतकऱ्याला मिळावे म्हणून शंकरराव काळे यांनी प्रयत्न केले. त्यातून गोबरगॅस प्लॅन्टकरीता राज्यशासन व जिल्हा परिषदेकडून ३०० रूपयांचे अनुदान शेतकऱ्याला मिळू लागले होते. याशिवाय शेतकऱ्यांना गोबरगॅससाठी कारखान्यामार्फत अनुदान दिले जात असे. यामुळे शेतकऱ्याला प्रदूषणमुक्त इंधन मिळत असे. विशेषतः लाकूड किंवा कोळसा चुलीत पेटवून स्वयंपाक करणाऱ्या महिलांची सोय झाली होती. चुलीमध्ये होणारा धूर गोबरगॅसमुळे होत नाही. म्हणूनच गोबरगॅस प्लॅन्टनिर्मिती शेतकऱ्यांनीही उत्साह दाखवला होता.[५]

### ६. कामगारांच्या हितासाठी कल्याणकेंद्र –

कारखान्यातल्या कामगारांनी एकत्र येऊन कामगार कल्याण केंद्र स्थापन केले आहे. या कामगार कल्याण केंद्रामार्फत कारखाना परिसरातल्या कामगार वसाहतीत राहणाऱ्या कामगारांच्या घरात केबल टि.व्ही. चे कनेक्शन देण्यात आले आहे. त्यामुळे अवघे जग कोळपेवाडीसारख्या छोट्या गावाच्या जवळ येऊ शकले. तसेच शिवजयंती, गणेशोत्सव अशा सांस्कृतिक सणांच्या वेळी विद्यार्थ्यांना वकृत्त्व स्पर्धा, विविध खेळांच्या स्पर्धा, रांगोळी स्पर्धा तसेच भजनी मंडळांचे कार्यक्रम असे विविध कार्यक्रम कामगार कल्याण केंद्रामार्फत चालवले जातात. या सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच कामगारांच्या लहान मुलांसाठी बालवाडी, महिलांसाठी शिवणक्लास तसेच सर्वांकरीता वाचनालय असे समाजपयोगी उपक्रम कामगार कल्याण केंद्र चालवते. बालवाडीत शिकवायला येणाऱ्या शिक्षकांना साखर कारखान्यामार्फत पगार दिला जातो. त्यांची राहण्याची व्यवस्थाही साखर कारखानाच करतो.[६]

कोपरगाव सह. सा. कारखान्याचा कोणताही कामगार त्यांच्या नोकरीच्या कालखंडात आजारी पडला, तर त्याची जबाबदारी कारखाना उचलतो. यासाठी नोकरीच्या काळात दुर्धर रोगाने आजारी पडणाऱ्या कामगाराला कारखान्यामार्फत वर्षाची भरपगारी रजा तसेच त्याच्या आजारपणासाठी पन्नास हजार रूपये खर्च अशा सोयी दिल्या जातात.

आतापर्यंत कोपरगाव सहकारी साखर कारखान्यात काम करणाऱ्या ५ कामगारांना राज्य शासनाचा गुणवंत कामगार पुरस्कार मिळालेला आहे. त्यापैकी एक गुणवंत कामगार सुरूवातीला कारखान्यात कामाला लागला तेव्हा मॅट्रीकही पास झालेला नव्हता. या कामगाराला शिक्षणाची आवड होती. पण घरच्या गरिबीच्या परिस्थितीमुळे शिक्षण सोडून नोकरी करावी लागली होती. त्याच्या शिक्षणाच्या आवडीला शंकरराव काळे यांनी प्रोत्साहन दिले. शंकरराव काळे यांचे प्रोत्साहन व कारखान्याची आर्थिक मदत या बळावर हा अकुशल कामगार पदवीपर्यंत शिकला. पदवी परीक्षा पास झाल्यानंतर कारखान्याने त्याला अकुशल कामगाराच्या कामावरून लेखनिकाच्या कामावर बढती दिली. हा कामगार शंकरराव काळेंविषयी म्हणतो, ‘कामगारांच्या सुप्त गुणांना हेरून त्यांना योग्य पद्धतीचे कार्य करून घेणे याकडे साहेबांचे लक्ष असत’ या गुणवंत कामगाराने १९९४ साली कोळपेवाडी येथे एक दिवसांचे ग्रामीण साहित्य संमेलन भरवले होते.[७] या साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी कारखान्याने सर्व आर्थिक सहाय्य केले होते. यावरून केवळ परिसराचा आर्थिक विकास करून न थांबता साहित्य, संस्कृती व वेगवेगळ्या कला यांना प्रोत्साहन देण्याचे शंकरराव काळे यांचे धोरण स्पष्ट होते.

ऊस तोडणी कामगार हा सहकारी साखर कारखानदारीतला पहिल्यापासूनचा एक दुर्लक्षित घटक राहिलेला आहे. कोळपेवाडी परिसरातल्या ऊस तोडणी कामगाराची कोपी जळाली, बैल मेला तर कारखान्यामार्फत त्यासाठी नुकसानभरपाई दिली जाते. तसेच या ऊस तोडणी कामगाराला काम करताना काही इजा झाली किंवा त्याच्या आरोग्याच्या इतर तक्रारी असतील तर कारखान्यामार्फत आरोग्यसेवा पुरवली जाते. यामध्ये कारखान्याने चालवलेले आरोग्य केंद्र आणि पॉलिक्लिनिक महत्वाची भूमिका बजावतात.

**३. उच्च शिक्षणासाठी व व्यवसायासाठी कर्जपुरवठा –**

कोपरगाव सहकारी साखर कारखान्यानेच सुरू केलेली गौतम सहकारी बँक कारखान्याच्या कामगार कल्याणात महत्वाची भूमिका बजावते. कारखान्याच्या कामगाराच्या घरातील लग्न, कामगाराच्या मुलांचे शिक्षण याकरीता गौतम बँक

कामागारांना सवलतीच्या दरात कर्ज पुरवते. आजच्या खाजगीकरण, जागतिकीकरणाच्या काळात तरूणांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता स्वयंरोजगाराचाही विचार करावा असे म्हटले जाते. कामगारांच्या मुलांना जर स्वतःचा उद्योग सुरू करायचा असेल तर गौतम बँक या मुलांना अग्रक्रमाने व वेळ न दवडता कर्जपुरवठा करते. अशा मुलांना कर्ज मिळावे म्हणून गौतम बँक कर्जाच्या प्रशासकीय प्रक्रिया जलदपणे पार पाडते. अशा मदतीच्या जोरावर इथल्या कामगारांची अनेक मुले आज अहमदनगर, नाशिक पुणे यासारख्या ठिकाणी प्रथितयश उद्योजक म्हणून नावारूपास आलेली आहेत.

### ६.२ कोपरगाव तालुक्याच्या हक्काच्या पाण्यासाठी संघर्ष

महाराष्ट्र हे दुष्काळग्रस्त राज्य म्हणून पूर्वी ओळखले जायचे. त्या पार्श्वभूमीवर १९१५ ते १९४७ या काळात ब्रिटिश सरकारने जलसंधारणाच्या अनेक योजना इथे कार्यान्वित केल्या. यात भंडारदरा, दारणा, गंगापूर, घाटघर या योजनांचा समावेश आहे. या योजनांमुळे अहमदनगर, नाशिक, पुणे या जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात जलसिंचनासाठी कालवे काढले गेले. या कालव्यांच्या लाभक्षेत्रातच शेतीचा विकास झाला. त्या परिसरात ऊसाचे पीक मोठ्या प्रमाणावर येऊ लागले. यातून सहकारी साखर कारखान्याची चळवळ उभी राहीली. पण तरीही उर्वरीत महाराष्ट्राचे चित्र मात्र फारस बदलेले नाही. उर्वरित महाराष्ट्रात काही भागात ५० सें.मी. पेक्षा कमी पाऊस होतो तर काही ठिकाणी ७० से. मी. पेक्षा जास्त पाऊस होतो. या विषम पर्जन्यमानामुळे इतर भागातल्या शेतीचे प्रश्नही गंभीर बनत जातात. हे लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्याची १९६० ला स्थापना झाल्यानंतर शेती आणि पाणी या विषयांवर महाराष्ट्रातल्या राज्यकर्त्यांनी गांभीर्याने विचार करायला सुरूवात केली. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, शेतकरी नेते वसंतदादा पाटील, अर्थतज्ज्ञ डॉ. वि. म. दांडेकर, शेती तज्ञ कॉम्रेड दत्ता देशमुख या सर्व मंडळींनी 'पाणी अडवा आणि पाणी जिरवा' या योजनेवर विचार करायला सुरूवात केली. त्यातूनच हा कार्यक्रम महाराष्ट्र सरकारने स्वतः राबवयाला घेतला. त्यासाठी जलसंधारण आणि पाटबंधारे अशी स्वतंत्र खाती निर्माण केली गेली. महाराष्ट्रभर कोयना, पैठण (नाथसागर), उजनी, कुकडी, चासकमान अशी धरणे बांधली गेली. त्यावर कालवे काढले गेले. दुसऱ्या बाजूला वसंत बंधारे, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, दगडी साठवण बंधारे, गावतळी, पाझर तलाव अशा पाणी अडवण्याच्या योजना पूर्ण केल्या गेल्या. १९७२ साली महाराष्ट्रभर दुष्काळ पडला होता. त्याचवेळी 'पाणी अडवा

आणि जिरवा' ही योजना यशवंतरावाच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर राबवण्याचे धोरण महाराष्ट्र शासनाने घेतले.[८]

शंकरराव काळे हे त्यावेळी अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांनी जिल्हाभर ही योजना राबवली. विशेषतः जिल्ह्यातल्या पारनेर, जामखेड, कर्जत या परिसरात तर ह्या योजनेखाली खूप कामे झाली. कोपरगाव तालुक्याचे नेतृत्व करत असताना आणि कोपरगाव सहकारी साखर कारखाना चालवत असताना परिसरात शेतीसाठी १९८५ नंतर पाणी कमी पडू लागले. गोदावरी डाव्या व उजव्या कालव्यांतून कोपरगाव परिसरात पाणी मिळते. त्या पाण्याचा शेती व पिण्यासाठी उपयोग होतो. या कालव्यांमध्ये दारणा व गंगापूर या धरणांतून पाणी येते. परंतु दारणा व गंगापूरचे पाणी कोपरगावच्या वरचे लोक बेकायदा घेत असल्याने खाली पाणी कमी येऊ लागले. शेतकरी आणि साखर कारखाना धोक्यात येऊ नये. म्हणून शंकरराव काळे यांनी एका बाजूला पाण्यासाठी सरकारशी संघर्ष सुरू केला आणि दुसऱ्या बाजूला जलसंधारण आणि जलसंवर्धानाची कामे कारखान्याच्या माध्यमातून सुरू केली. या जलसंवर्धनाच्या कामात त्यांनी कार्यक्षेत्रातल्या गावांमध्ये दगडी साठवण बंधारे, पाझर तलाव, गावतळी, के.टी. वेअर्स अशा विविध योजना राबवल्या. पाण्याच्या योग्य वापरासाठी शेतीत ठिबक सिंचन व तुषार सिंचन या सारखे प्रगत तंत्रज्ञान वापरण्याची शेतकऱ्यांना शिकवण दिली. त्याचबरोबर सरकारशी भांडतानाही पायी पाणी दिंडी, उपोषणे, दुष्काळपरिषद, मोर्चे यासारखी जणू पाण्यासाठी लढाईच सुरू ठेवली. त्यांनी पाण्याच्या हक्कासाठी न्यायलय, ग्राहक मंच या न्यायालयीन प्रक्रियेत लक्ष घातले.

शंकरराव काळे यांचे हे सर्व काम बघत असताना त्यांचे नेतृत्व ज्या काळात फुलत होते त्या काळाचा संदर्भ महत्वाचा आहे. स्वातंत्र्यलढा म. गांधीच्या नेतृत्वाखाली लढला जात होता. त्या वेळी ते शिक्षण घेत होते. कॉम्रेड दत्ता देशमुखांसारखा मार्क्सवादी मित्र त्यांना शेतकऱ्यांच्या कल्याणाचे धडे देत होता. पुढे काँग्रेसमध्ये काम करताना यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील तसेच स्वामी सहजानंदभारती अशा नेत्यांच्या सहवासात ते राजकारण करत होते. अशा पार्श्वभूमीवर शंकरराव काळे यांचे नेतृत्व विकसित झाले. स्वातंत्र्योत्तर काँग्रेसच्या राजकारणाला म. गांधीचा वारसा होता. म. गांधींची पूर्ण चळवळ ही रचनात्मक काम आणि राजकीय संघर्ष यांचे कालोचित मिश्रण होती. या स्वरूपाच्या राजकारणाचा वारसा शंकरराव काळे यांच्या राजकीय जीवनात दिसतो. कोपरगाव तालुक्यात ते रचनात्मक कामातून साखर कारखाना,

उद्योग समुह जलसंवर्धानाची कामे करतात. तर दुसऱ्या बाजूला काँग्रेस पक्षात सक्रिय राजकारणही करतात. पाणी प्रश्नावर त्यांनी १९८९ नंतर सतत लढा दिला तो त्यांच्या जीवनातला एक संघर्षमय भाग आहे.

**१. कोपरगाव तालुक्याच्या पाणी प्रश्नाची पार्श्वभूमी –**

कोपरगांव परिसर हा तसा संपूर्ण दुष्काळी. दुष्काळ जणू इथल्या शेतकऱ्यांच्या पाचवीला कायमचाच पुजलेला. फेब्रुवारी ते जून या उन्हाळ्याच्या महिन्यात या परिसरात पिण्यासाठीही पाणी मिळायचे नाही. जून ते सप्टेंबर या महिन्यांत पाऊस जेमतेम पडायचा. अपुऱ्या पावसामुळे सहामाहीच शेती होत असे. ज्वारी, बाजरीसारखी अन्नधान्याची पिकेच शेतीतून निघायची. १९१५ च्या अगोदर या परिसरात भयंकर दुष्काळ पडायचा. शेती पिकली नाही तर शेतकरी, शेतमजूर उन्हाळयात धुळे, जळगांव या जिल्ह्यात मजुरीसाठी जात असत. कोपरगाव परिसराचे भयावह दुष्काळी वातावरण ब्रिटीशांनाही बघवले नाही. त्यातून ब्रिटीशांनी दारणा नदीवर धरण बांधले. या धरणात ७७६३ दश लक्ष घन फुट साठा करण्याची क्षमता आहे. दारणा धरणापासून ४७ मैलांवर नांदूरमधमेश्वर उंचावणीचा बंधाराही बांधला गेला. या बंधाऱ्यातून गोदावरी डावा व उजवा हे दोन कालवे काढण्यात आले.[१] त्यातून सिन्नर, कोपरगांव, निफाड या परिसरात पाणी उपलब्ध झाले. इ.स. १९२८ नंतर ह्या कालव्यातून पाणी सोडले जाऊ लागले. निफाड, येवला, वैजापूर व श्रीरामपूर या कोपरगावच्या संलग्न तालुक्यांनाही ह्या कालव्याचे पाणी काही प्रमाणात मिळू लागले. दारणा धरणाचे संपूर्ण पाणी गोदावरीच्या डाव्या व उजव्या कालव्यात सोडण्यात येऊ लागले. परंतु कोपरगाव परिसरात अज्ञानामुळे शेतकरी कालव्यांचे पाणी वापरायला धजावत नसत. कालव्यातले पाणी साठवलेले पाणी असते. त्यामुळे त्या पाण्यापासून शेतीतली पिके जळतील किंवा जमीन नासेल अशी भीती शेतकऱ्यांना वाटत असे. त्यामुळे शेतकरी शेतीसाठी कालव्याचे पाणी वापरत नसत. जेव्हा दुष्काळ पडला तेव्हाच शेतकरी या कालव्याच्या पाण्याचा उपयोग थोड्या प्रमाणात शेतीसाठी व पिण्यासाठी करू लागले. जे पाणी कालव्यात दारणा धरणातून सोडले जाई त्या संपूर्ण पाण्याचा वापर मात्र त्या काळात होत नसे.

दरम्यानच्या काळात या परिसराकडे मुंबई–सासवड या ठिकाणच्या भांडवलदार – व्यापाऱ्यांचे लक्ष वेधले गेले. या भांडवलदारांनी कोपरगाव परिसरात खंडाने जमिनी घेतल्या आणि ऊसाची शेती करण्यास सुरूवात केली. या ऊस उत्पादनातून या ठिकाणी  गोदावी शुगर मिल्स, साकरवाडी, लक्ष्मीवाडी व मोरारका उद्योग समुहाचा

पुणतांबा (चांगदेवनगर) येथे असे तीन खासगी कारखाने निघाले.[१०] हजारो एकर शेतीतून ऊसाचे पीक घेतले जाऊ लागले. या मोठ्या शेतकऱ्यांचे बघून या परिसरातले छोटे शेतकरीही ऊसाचे पीक घेऊ लागले.

१९३४ साली ब्रिटीश सरकारने कालवे पाणी वाटप नियम तयार केला. या नियमानुसार शासनाने ब्लॉक पद्धत ठरवून दिली. बारमाही, आठमाही, रब्बी ब्लॉक अशा पद्धतीने कालव्याद्वारे शेतीला पाणी पुरवले जाऊ लागले.[११] कालव्यातले पाणीही पूर्णपणे वापरले जाऊ लागले. आधी कालव्यांना पाणी असूनही शेतकरी ते पाणी घेत नसत. परंतु शेतकऱ्यांमध्ये जागृती झाल्यानंतर पाऊस कमी झाला तरी या ठिकाणी शेतीला कालव्याच्या माध्यमातून पाणी मिळत गेल्याने दुष्काळातही शेती फुलू लागली. कालव्याच्या पाण्याचा जास्तीत जास्त वापर करून घेत सगळीकडे ऊसाचे पीक घेतले जाऊ लागले.

ऊसाची उपलब्धता जशीजशी वाढू लागली तसतशी कारखानदारी वाढू लागली. तीन खासगी व तीन सहकारी साखर कारखाने उभे राहिले. त्या माध्यमातून विकास होऊ लागला. विकासगंगा शेतकऱ्यांच्या घरापर्यंत येऊ लागली. त्यातून तालुक्याचा विकासही होऊ लागला. पण काही काळाने मात्र परिस्थिती पालटू लागली. कोपरगाव तालुक्याचे पाणी नाशिक व निफाड या तालुक्याला मिळावे, अशी राज्यकर्त्यांनीच भुमिका घेतली. नाशिक शहरात उद्योगांसाठी व पिण्यासाठी मोठ्या प्रमाणावर असे पाणी वापरले जाऊ लागले. निफाड तालुक्यातल्या शेतकऱ्यांनी तर दारणा धरण ते नांदूरमधमेश्वर उंचावणी बंधाऱ्याच्या दरम्यान मोठमोठया लिफ्ट योजना राबवून पाणी उपसणे सुरू केले. त्यामुळे गोदावरी डाव्या व उजव्या कालव्यांत पाणी खूपच कमी झाले. परिणामी कोपरगाव परिसरात पाण्याची टंचाई जाणवू लागली. वास्तविक कोपरगाव तालुक्याला दारणा धरणाचे ८ टी.एम.सी. पैकी सर्वच पाणी ४०-५० वर्ष मिळत होते. ते धरण खास कोपरगाव परिसरासाठीच बांधले होते. धरणाच्या प्रकल्प आराखड्यात तशी तरतूद होती. गंगापूर धरणाच्या ८ टी.एम.सी. पाण्यातला ४% वाटाही कोपरगावसाठी राखीव होता. पण तो सुद्धा मिळण्यात अडचणी येऊ लागल्या.

१९८९-९० साली कोपरगाव परिसरात पाण्याचे खऱ्या अर्थाने दुर्भिक्ष सुरू झाले. त्याच वेळी शंकरराव काळे यांनी कोपरगावच्या हक्काच्या पाण्यासाठी सरकारकडे आग्रह धरला. नाशिक शहर आणि त्या परिसरातील उद्योगधंद्याना कोपरगावच्या वाट्याचे शेतीचे पाणी वापरू देण्यास श्री. काळेंचा मोठा विरोध होता. मोठ्या शहराची निर्मिती

होत असताना त्या शहर परिसरात औद्योगिक विकास होत असताना रस्ते बांधणीसाठी, मोठे गृहबांधणी प्रकल्प तयार करण्यासाठी ज्याप्रमाणे जागतिक बँकेकडून निधींची उपलब्धता केली जाते. त्याच धर्तीवर मोठी शहरे व त्या शहरात होणाऱ्या औद्योगिकरणासाठी पाणी पुरवठा योजना तयार करण्यास निधींची उपलब्धता केली जावी, अशी शंकरराव काळेंची भूमिका राहिली. शेतीचे पाणी उद्योगांना व शहरांना देऊन शेती ओस पडावी या धोरणाला त्यांनी सरकार – दरबारी प्रखर विरोध नोंदवला. औद्योगिकीकरणाला विरोध नाही. परंतु शेतीही मरू देता कामा नये अशी त्यांची भूमिका होती.

१९९० च्या दशकात सहकारी साखर कारखान्याच्या भरभराटीच्या काळात कोपरगाव परिसरात पाण्याची भयंकरच समस्या उभी राहीली. कारखानदारी भरभराटीस येत होती. नाशिक शहरातील उद्योगांना पाणी देताना कोपरगाव तालुक्यातील साखर कारखाने धोक्यात येतील हे जाणून शंकरराव काळे यांनी पावले उचचली. महाराष्ट्र शासनाने पाणी वाटपा संदर्भात प्रथम पिण्यासाठी पाणी, नंतर उद्योगासाठी व शेवटी शेतीसाठी पाणी देण्याची जी भूमिका घेतली या भूमिकेला शंकरराव काळे यांचा विरोध होता.

शेतीला अग्रक्रमाने पाणी न देण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या धोरणामुळे कोपरगावची ऊसशेती धोक्यात येईल व तसे झाल्यास सहकारी साखर कारखान्याची चळवळही मरेल अशी भीती शंकरराव काळे यांना नेहमी वाटायची. सहकारी साखर कारखाना संपला तर शेतकरी संपले आणि एकूणच परिसराचा विकास खुंटेल असे त्यांचे नेहमी मत होते. तसेच गोदावरी डाव्या व उजव्या कालव्यातून कोपरगावच्या वाटयाला ११ टी.एम.सी. पाण्याऐवजी फक्त ४ टी.एम.सी. पाणी मिळू लागल्याने शेती उजाड होण्याची भाती त्यांना वाटत होती. दुसऱ्या बाजूला केंद्र सरकारने पाणी वाटपा संदर्भात प्रथम पिण्यासाठी, मग शेतीसाठी व शेवटी उद्योगासाठी असा क्रम लावला. महाराष्ट्र शासनाने शेतीला शेवटचा क्रमांक दिल्यामुळे ही विसंगती मांडून शंकरराव काळेंनी शेतीच्या विकासाचा मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न केला.

एकीकडे ऊसाचे पीक घेण्याकडे कल वाढत होता. मात्र त्याचवेळेस मिळणारे पाणी अपुरे पडत होते. कोपरगाव तालुक्यासाठी दारणा धरणातून ८८०० दश लक्ष घन फूट आणि गंगापूर धरणातून २२०० दश लक्ष घ. फूट पाणी मिळण्याची तरतूद होती. एवढे पाणी १९७८–७९ पर्यंत मिळतही होते.[१२]

२. दारणा धरणातील पाणी वाटपाची तरतूद –

| | | |
|---|---|---|
| १) | दारणा धरणात बाष्पीभवन वजा उरलेले पाणी | ७७१३ द. ल. घ. फूट |
| २) | नांदूर मधमेश्वर बंधाऱ्याच्या पाठीमागे साठलेले उपयुक्त पाणी | २२५ द. ल. घ. फूट |
| ३) | पावसाचे पाणी | १५०० द. ल. घ. फूट |
| ४) | **एकूण पाणी** | **९४३८ द. ल. घ. फूट**[१३] |

दारणेच्या काठावर असणाऱ्या गावांना पिण्याचे पाणी, खरीप व रब्बी काळात पावसाच्या पाण्यापासून मिळते. मात्र उन्हाळ्यात दारणा धरणातून सोडलेल्या पाण्यातूनच दारणा नदीच्या काठावरील गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणीपुरवठा केला जातो. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | नाशिक रोड व नाशिक शहराला पिण्यासाठी पाणी | २३५ द. ल. घ. फूट |
| २) | देवळाली संरक्षण विभाग | ५८ द. ल. घ. फूट |
| ३) | देवळाली कॅन्टॉमेन्ट बोर्ड | ३३ द. ल. घ. फूट |
| ४) | सिन्नर, भगूर परिसर | १० द. ल. घ. फूट |
| ५) | नाशिक कारखाना | ६ द. ल. घ. फूट |
| | **एकूण** | **३४२ द. ल. घ. फूट** |
| | शिल्लक पाणी | ९०९६ द. ल. घ. फूट |
| | नदी प्रवाहातून उन्हाळ्याच्या बाष्पीभवनामुळे होणारी पाण्यातील घट १०% | ३०० द. ल. घ. फूट |
| | होणारी पाण्यातली घट १०% | ८७९६ द. ल. घ. फूट |
| | पूर्णांकामध्ये | ८८०० द. ल. घ. फूट |
| | गंगापूर धरणाची पाणी तरतूद | २१८० द. ल. घ. फूट |
| | | १०९८० द. ल. घ. फूट |
| | पूर्णांकात | ११००० द. ल. घ. फूट (११ टी.एम.सी.)[१४] |

मात्र त्यानंतर हे पाणी कमी होत जाऊन १९९१–९२ मध्ये ते जवळजवळ निम्म्यावर येऊन ठेपले. १९८०–८१ पासून १ महिन्याने तर १९८४–८५ पासून दोन महिन्याने पाण्याच्या पाळ्या मिळत असत. त्यामुळे या कालव्या खालील शेतीला बारमाही तर राहिले. पण रब्बी हंगामातही पिकासाठी पुरेसे व वेळेवर पाणी मिळेनासे झाले. यामुळे सिन्नर, निफाड,

श्रीरामपूर या तालुक्यातले काही क्षेत्र आणि संपूर्ण कोपरगाव तालुक्यातले शेतीक्षेत्र ओसाड पडण्याची शक्यता निर्माण झाली.

**३. पाण्याच्या तुटवड्याचे कारण –**

गोदावरीच्या डाव्या व उजव्या कालव्यामध्ये पाणी टंचाई निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे दारणा धरण व नांदूर मधमेश्वर उंचावणीच्या बंधाऱ्यादरम्यानच्या नदीपात्रातून पाण्याचा होणारा बेकायदा उपसा. नदीपात्रातून अहोरात्र पाण्याची बेकायदा उचल होत असताना यावर सरकारच्या पाटबंधारे खात्याचे मात्र कोणतेही नियंत्रणा नव्हते. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १९–८–१९७७ च्या निर्णयानूसार दारणा धरण ते नांदूर मधमेश्वरचा उंचावणीचा बंधारा या दरम्यानच्या नदी पात्रातून दारणा प्रकल्पाच्या भिजणाऱ्या क्षेत्राच्या ५ टक्के म्हणजे १६५८ हेक्टर क्षेत्रात रब्बी व खरीप पिकांसाठी व त्यातील ५ टक्के म्हणजे ८३ हेक्टरपर्यंत बारमाही पिकांस अशी एकूण फक्त १७४१ हेक्टरलाच मंजूरी मिळायला हवी होती. परंतु १९७३ ते १९७८ पर्यंत २२४२ हेक्टर सिंचनक्षेत्र उपसासिंचन द्वारे खरीप व रब्बीला मंजुरी दिली गेली होती, त्यांना ६८ हेक्टर ऊसास परवानगी देण्यात आली. त्यामुळे शासनाच्या १९–८–१९७७ च्या निर्णयानूसार या नदीवरील भागास उपसा सिंचनाचा कोटा संपला होता.[१५] तरीही नांदूर मधमेश्वरच्या बंधाऱ्यामुळे, दारणा, गोदावरी नदीत, होणाऱ्या फुगवट्यामुळे महाराष्ट्र शासनाने १९८१ ते ८५ या दरम्यान ११६३६ हेक्टरच्या व त्यात १६३ हेक्टर ऊस असलेल्या उपसा सिंचन योजनांना फुगवट्यातून पाणी उचलण्याची बेकायदा मंजूरी दिली गेली. सरकारचे या संदर्भात कोणतेच धोरण नसल्याने या परिसरात असंख्य अनाधिकृत उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित झाल्या. १९८२ व १९८४ साली काहीही संयुक्तिक कारण नसताना शासनाने नाशिक डाव्या कालव्यावरील लाभक्षेत्रातील १५४२७.१५ हेक्टर क्षेत्र व त्यात ११९.१५ हेक्टर ऊसक्षेत्र गोदावरी नदीतील नांदूर मधमेश्वरच्या उंचावणीच्या बंधाऱ्याच्या फुगवट्यावर वर्ग केले.[१६] हे वर्ग केलेले क्षेत्रसुद्धा गोदावरी नदीत बंधाऱ्याचा फुगवटा ज्या ठिकाणापासून सुरू होतो, त्या ठिकाणापासून तर उंचावणीच्या बंधाऱ्यापर्यंत व फुगवट्याच्या समांतर अशा क्षेत्रातच येते. हे सर्व निर्णय बेकायदा पाणी उपसण्याला परवानगी देण्याच्याच निर्णयाच्या तंत्राचाच भाग ठरले. वरील दोन्ही प्रकारची मंजुरी ११६३६+ १५४२७.१५ =२७०६३.१५ हेक्टर क्षेत्राकरता आहे व त्यामध्ये फक्त १६३ + ११९.१५ =२८२.१५ हेक्टर ऊसाला परवानगी दिली गेली आहे.[१७] या परिसरात सहज फिरतानाही १३ ते १४ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये हिरवेगार ऊसाचे पीक डौलाने उभे असलेले

दिसते. दारणा धरणातून सोडलेल्या पाण्यावर हा ऊस पिकतो. दारणेच्या पाण्यावर उभा असलेला हा १३–१४ हजार हेक्टरचा ऊस म्हणजे गोदावरी कालव्यांना सोडलेल्या पाण्याची उघड उघड केलेली चोरीच आहे. एवढे प्रचंड ऊसक्षेत्र विना परवाना उपसा केलेल्या पाण्यावर उभे असताना शासन व पाटबंधारे खाते मात्र त्याकडे लक्ष देत नाही. याउलट बिगरशेती क्षेत्रासाठी व पिण्यासाठी मोठ्याप्रमाणावर पाणी लागते. त्यामुळे पाण्याचा तुटवडा येतो, अशा पद्धतीने शासनाचे प्रतिनिधी मोघम विधाने करतात. परंतु शासनाला हजारो बेकायदा उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित असलेल्या दिसत नाहीत. नव्या–नव्या बेकायदा उपसा जलसिंचन संस्थांना परवानगी देण्याबाबत आजही सरकारचे काहीही धोरण नाही. शेतीसाठी अशा पद्धतीने मोठ्याप्रमाणावर होणाऱ्या पाण्यावर उपशामुळे गोदावरीच्या डाव्या व उजव्या कालव्यांमध्ये पाणी कमी येते.

**४. पाणी व्यवस्थापनात असलेला बेशिस्तपणा –**

गोदावरीच्या डाव्या व उजव्या कालव्यामध्ये सध्या येत असलेला पाण्याचा तुटवडा पाणी व्यवस्थापनात बेशिस्त असल्याने निर्माण झाला आहे. दारणा धरण ते नांदूर मधमेश्वर उंचावणी बंधारा या दरम्यानचा नदी पात्रातून पाण्याचा बेकायदा उपसा झाला. शासन व शासकीय अधिकारी यांनी पाणी नियोजनात व त्याच्या व्यवस्थापनात शिस्तीचे पालन केले नाही. 'महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६' कालवे नियम १९३४ आणि दिनांक १९–८–१९७७ चा निर्णय सर्व धाब्यावर बसवले गेले. दारणा धरण व नांदूर मधमेश्वर येथील उंचवणीचा बंधारा यांमधील नदीच्या भागाला कायद्याने कालवा म्हणून संबोधण्यात आले. या नदीच्या भागावर दारणा गोदावरी नदीच्या संगमानंतर व नांदूर मधमेश्वर बंधाऱ्याच्या फुगवट्यावर प्रकल्पामुळे भिजणाऱ्या २२७८० हेक्टर क्षेत्राच्या ५ टक्के म्हणजे ११३९ हेक्टर क्षेत्रास उचलून पाणी घेण्याची परवानगी आहे. ही क्षमता १९७३ ते १९७८ दरम्यान संपूर्ण वापरली गेल्यानंतरही १९८१ ते १९८५ या काळात जादा ११६३६ हेक्टर क्षेत्र भिजवण्यासाठी कालव्यातून (नदी) पाणी उचलण्याची परवानगी देण्यात आली.[१८]

त्याचप्रमाणे नाशिक डाव्या कालव्याखाली असलेले १५४२७.१५ हेक्टर क्षेत्र विनाकारण १९८२–८४ मध्ये नांदूर मधमेश्वर उंचावणीच्या बंधाऱ्याच्या पाण्यावर वर्ग करण्यात आले. त्यामुळे पाण्याच्या साठ्यावर जास्त ताण आला. एकलहरे औष्णिक वीज केंद्र, औद्योगिक वसाहत यांच्या विस्तारामुळे नाशिक उजव्या कालव्यातले पाणी खूप मोठ्याप्रमाणावर वापरले जाते.[१९] अलिकडे हा पाण्याचा वापर इतका वाढला आहे की

गोदावरी उजवा कालवा जवळजवळ बंद पडत चालला आहे. अशा पद्धतीने पाण्याचे बेशिस्त व्यवस्थापन, सर्व सरकारी नियम धाब्यावर बसवणे आणि पाण्याचा बेकायदा उपसा करण्याकडे जाणून–बुजून दुर्लक्ष करण्यामुळे गोदावरी डाव्या व उजव्या कालव्यांमधले पाणी कोपरगावपर्यंत कमी क्षमतेने येते. त्यातून पाण्याची मोठी टंचाई निर्माण होते.[२०]

**५. पाणी टंचाईचे परिणाम –**

दारणा धरण कोपरगाव परिसरासाठी बांधलेले असताना त्याचे पाणी या भागाला खूप कमी मिळते. गोदावरी खोऱ्यातील दारणा व गंगापूर धरणातील पाणी वाटपाबाबतच्या मूळ प्रकल्प तरतुदींप्रमाणे गोदावरी कालव्यांना मंजूर झालेले हक्काचे पाणी व सध्या मिळणारे पाणी यात दिवसेंदिवस पचंड तफावत पडत चालेली आहे. या परिस्थितीमुळे मानवनिर्मित पाणी टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रातील शेती पूर्णतः उध्वस्त होत चालली आहे. शेतीला पाणी नाही त्यामुळे ऊसाचे पीकही धोक्यात आले आहे. गोदावरी कालव्यांच्या लाभक्षेत्रातील शेतीवर व ऊस पिकावर अवलंबून असणारे साखर कारखाने, त्यांचे उपपदार्थ निर्मितीप्रकल्प व इतरही निरनिराळ्या ॲग्रो बेस इंडस्ट्रीजचे अस्तित्व शेवटच्या घटका मोजत आहे. या सर्व परिस्थितीचा परिणाम म्हणून स्थानिक शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे. परिसरात रोजंदारीचे प्रमाणही दिवसेंदिवस कमी होत आहे. पूर्वीचा जवळजवळ दुष्काळीच असलेला हा परिसर आज पुन्हा जुन्याच मार्गावर जाताना दिसत आहे. सहकारी चळवळीचे जे भरभराटीला आलेले वातावरण मध्यंतरीच्या काळात होते त्याला गालबोट लागण्याची शक्यता आज निर्माण झालेली आहे.

**६. गोदावरी कालवा पाणी संघर्ष समिती –**

कोपरगाव परिसर पाण्याच्या वाढत्या टंचाईमुळे उध्वस्त होत जाईल हे शंकरराव काळे यांच्या १९८८ सालीच लक्षात आले. तेव्हापासून त्यांनी या संदर्भात महाराष्ट्र सरकारकडे योग्य पाणी वाटपा संदर्भात मागणी करायला सुरूवात केली होती. सहकारी साखर करखान्यामुळे परिसरातल्या विविध गावांचे शेतकरी श्री. काळे यांच्या नेहमी संपर्कात असत. शेतकऱ्यांमध्येही शंकरराव काळे यांनी पाणीहक्काबाबत जागृती करण्यास सुरूवात केली होती. पाणी टंचाई वाढल्यास आपले काय होणार, या प्रश्नामुळे शेतकऱ्यांमध्येही भीतीचे वातावरण तयार झाले होते. हे लक्षात घेऊन शंकरराव काळे यांनी गोदावरी कालव्याचे पाणी वाटप योग्य व्हावे आणि आमच्या हक्कांचे पाणी आम्हास

मिळावे अशी मागणी शासनाकडे सातत्याने केली होती. परंतु या मागणीला सरकारकडून आणि पाटबंधारे खात्याकडून कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता. म्हणून आपण आता सरकारशी संघर्षाचीच भूमिका घेतली पाहिजे, त्याशिवाय आपल्याला न्याय मिळणार नाही, अशी त्यांची भावना झाली. या भावनेतून मुंबईच्या विधानभवनावर शेतकऱ्यांची पायी पाणी दिंडी काढून धडक मारायची असा निर्णय शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाखाली घेतला. या निर्णयानुसार १७ एप्रिल १९८९ रोजी कोपरगाव ते मुंबई पायी दिंडीचे आयोजन केले होते.[२१] या पाणी दिंडीत कोपरगाव तालुक्यातून आणि परिसरातून जवळजवळ पाच हजार शेतकरी सामील झाले होते. मुंबईपर्यंत पाच हजार लोक पायी जातात आणि तेही पाण्याच्या प्रश्नासाठी ही त्या काळातील एक अभूतपूर्व अशीच घटना होती. त्यानंतर १६ ऑक्टोबर १९८९ रोजी नागपूर येथे महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशन काळात विधानभवनासमोर कै. चंद्रकांत सदाशिवराव लोणकर यांच्या नेतृत्वाखाली अनेक शेतकरी उपोषणासही बसले होते.[२२]

गोदावरी डाव्या व उजव्या कालव्याच्या हक्काच्या पाण्यासाठी अशा पद्धतीने लढाई चालू असताना हा लढा तीव्र करण्याच्या दृष्टीने 'गोदावरी कालवा पाणीवाटप संघर्ष समिती' स्थापन करण्याचा निर्णय परिसरातल्या शेतकऱ्यांच्या मागणीमुळे घेण्यात आला. १९९२ साली संघर्ष समितीची अधिकृत स्थापना करण्यात आली. या समितीचे निमंत्रक म्हणून शंकरराव काळे यांची निवड करण्यात आली. यानंतर समितीने रास्ता रोको, रेल रोको आंदोलन करून पाण्याचा लढा तीव्र केला. या लढ्यात पुढे विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते व नेते सामील झाले. १६-६-१९९२ रोजी पाणी प्रश्नावर संघर्ष समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत संघर्ष समितीतील पदाधिकाऱ्यांची व परिसरातील शेतकऱ्यांची मोठी उपस्थिती होती. या बैठकीत शंकरराव काळे यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. या संघर्ष समितीवर तत्कालीन पाटबंधारे मंत्री व शिर्डी राहता मतदार संघाचे त्यावेळेचे आमदार आण्णासाहेब म्हस्के, विधान परिषदेचे माजी उपसभापती सूर्यभान वहाडणे, भारतीय जनता पक्षाचे नेते ना. स. फरांदे, कामगार नेते किशोर पवार, भि. र. बोरावके, शेतकरी संघटनेचे नेते भास्करराव बोरावके, माजी आमदार दादा शहाजी रोहमारे, मोहनराव गाडे, के. बी. रोहमारे, भानुदास दंडवते, भास्करराव जाधव, काँग्रेस नेते लहानुभाऊ नागरे, नामदेवराव परजणे, छबुराव आव्हाड, सुधाकरराव आवारे, वैजापूरचे माजी नगराध्यक्ष आर. एम. वाणी, स. म. कुलकर्णी, माजी खासदार भीमराव बडदे इत्यादीं सदस्य म्हणून निवडण्यात आले.

यावेळी शंकरराव काळे यांचे पाणी प्रश्नाविषयी सविस्तर भाषण झाले. त्यात त्यांनी स्पष्ट केले की, 'कोपरगाव भागाचं नाशिकशी कोणतंही भांडण नाही. त्यांचं पाणी आम्ही हिरावून घेण्याचा प्रश्नच नाही. स्वातंत्र्यपूर्व काळापासून दारणा-गंगापूर धरणातून गोदावरी कॅनॉलद्वारे कोपरगांव तालुक्याचं जेवढ पाणी मिळत होतं, तेवढंच आमच्या हक्काचं पाणी आम्हाला मिळावं. सरकार या प्रश्नात लक्ष घालून योग्य पाणी वाटपाची भूमिका घेत नसेल तर आपण पाण्याच्या हक्कासाठी सरकारचे दरवाजे ठोठावलेच पाहिजेत. प्रसंगी न्यायासाठी जागृतपणे संघर्ष करण्यासाठी आपण तयार व्हायला हवं. या भागातल्या शेतकऱ्यांच्या जीवन -मरण्याच्या प्रश्नाचा राज्यकर्त्यांकडून आपल्याला निकाल लावून घ्यायचा आहे. विनाकारण नाशिक जिल्ह्यातील काही मंडळी या प्रकरणास भांडणांच स्वरूप देत आहेत. नाशिक जिल्ह्यातल्या जनतेने वस्तुस्थिती समजावून घ्यावी.'[२३]

### ७. दुष्काळ परिषद -

गोदावरी कालवे पाणीवाटप संघर्ष समितीच्या कार्यक्रमाचाच एक भाग म्हणून कोपरगाव येथे १८-५-१९९२ रोजी आयोजित दुष्काळ परिषदेला तत्कालीन अर्थ व नियोजन मंत्री बॅ. रामराव आदिक, माजी मंत्री शंकरराव कोल्हे, माजी पाटबंधारे राज्यमंत्री आण्णासाहेब म्हस्के यांची उपस्थिती होती. दुष्काळ परिषदेची तयारी करताना शंकरराव काळे यांनी कोपरगाव परिसर, गोदावरी डाव्या व उजव्या कालव्यांच्या लाभ क्षेत्रातील गावा-गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांच्या बैठका, सभा घेऊन त्यांच्यामध्ये जागृती केली होती. त्याचाच परिणाम म्हणून शेतकरी मोठ्या संख्येने या परिषदेला हजर होते. .

या परिषदेचे निमंत्रक म्हणून शंकरराव काळे यांनी कोपरगाव तालुक्यातील शेतीच्या पाणी प्रश्नाबाबत दुष्काळ परिषदेची भूमिका मांडली, यावेळी केलेल्या भाषणात त्यांनी कोपरगाव तालुक्याचा पाणी प्रश्न मानवनिर्मित असल्याचे सांगितले, महाराष्ट्रात जे काही दुष्काळी जिल्हे येतात त्यात अहमदनगर हा अग्रगण्य जिल्हा आहे. त्यातही कोपरगाव तालुक्यात सदोदित दुष्काळ पडतो. गोदावरी कालव्यातून मिळणाऱ्या पाण्यामुळे दुष्काळी परिस्थिती आटोक्यात आली होती. ४०-४५ वर्षे परिस्थिती चांगली होती. शेतीच्या भरभराटीचे दिवस होते. परंतु आता पुन्हा शेती व सहकारी साखर कारखाने उद्धवस्त होण्याच्या मार्गावर आहेत. ब्रिटीशांना सुद्धा या परिसरातला दुष्काळ व शेतकऱ्यांनी दुर्दशा बघवली नाही. त्यातूनच दारणा धरणाची निर्मिती ब्रिटीशांनी केली. परंतु मायबाप सरकारला स्वदेशी लोकांची मात्र काळजी वाटत नाही. आज आम्ही

कष्टातून ऊसाची शेते दारणेच्या पाण्यावर उभी केली. त्या ऊसातून साखर कारखाने उभे राहिले. साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांची घरे उभी राहीली. शेतकऱ्यांची मुले शिकू लागली. आताशी कुठे आमचा शेतकरी सुस्थितीत जगू लागला तर लगेच त्याच्या तोंडातला घास काढून घेण्याचा घाट घातला गेला आहे. आम्हाला पाणी नाकारण्याची भूमिका मांडताना उद्योग व शहरांना पाणी द्यावे लागते अशी भूमिका सरकार घेते. नाशिकसारख्या मोठ्या शहरालाही पाणी लागते हे आम्हाला कळते. तिथल्या औद्योगिक वसाहतीला पाणी पुरवावे लागते हेही मान्य परंतु जसे मोठ्या शहराच्या निर्मितीसाठी व त्या शहराच्या औद्योगिक विकासासाठी रस्ते बांधणी, मोठे गृहबांधणी प्रकल्प यासाठी जागतिक बँकाकडून निधींची उपलब्धता केली जाते त्याच धर्तीवर या नाशिक सारख्या शहरांच्या विकासावर व तेथील औद्योगिकरणासाठी आवश्यक तो निधी गोळा करून स्वतंत्ररित्या पाण्याची उपलब्धता करणे जरूरीचे होते व त्याची आजही आवश्यकता आहे. परंतु तसे न करता सरकारने शेतीसाठी वर्षानुवर्ष देत असलेल्या पाण्यामधील मोठा भाग शहर व औद्योगिक विकासासाठी दिल्यामुळेच कोपरगाव तालुक्याचा शेतीच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पाणी प्रश्नाच्या गांभीर्याची व तीव्रतेची तुलना श्री. काळे यांनी कॅन्सर सारख्या दुर्धर रोगाशी केली.[२४]

गंगापूर धरणाच्या ८ टी.एम.सी. पाण्यातून ४% पाणी व दारणा धरणातील ८ टी. एम. सी. पाणी ४०–४५ वर्षापासून कोपरगावला मिळत असताना ते आज नाशिक शहराच्या वापरासाठी व औद्योगिककरणासाठी वापरले जाते. महाराष्ट्र हे जर शेतीप्राधान्य राज्य आहे असे आम्ही म्हणत असू तर शेतीला पाणी न मिळू देण्यामागची सरकारची भूमिकाच कळत नाही. उद्योगांना विरोध नाही. परंतु शेती मरता कामा नये. शेतीवर जी साखर कारखानदारी उभी राहीली तो सुद्धा एक उद्योगच आहे, असे उद्योगही वाचलेच पाहिजेत. महाराष्ट्र शासनाच्या धरणातील पाण्याच्या वाटपाच्या प्रचलित प्राधान्यक्रमात सर्वप्रथम पिण्यासाठी पाणी देण्याला आहे. दुसरा अग्रक्रम उद्योगांसाठी आहे. तर अगदी शेवटी उरले तर शेतीसाठी पाणी देण्याची तरतूद आहे. केंद्र सरकारचा अग्रक्रम मात्र प्रथम पिण्यासाठी पाणी नंतर शेतीसाठी व शेवटी उद्योगांसाठी पाणी असा आहे. म्हणजे महाराष्ट्र शासनाचे पाणी देण्याचे धोरण केंद्र सरकारच्या धोरणाशी विसंगत असे आहे आणि शेती व्यवसायावर अन्याय करणारे आहे. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, ठाणे या शहरानां लागणाऱ्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी स्वतंत्र निधीची निर्मिती करून पाणी उपलब्ध केले जाते तर मग नाशिक शहरासाठी असे धोरण सरकारने का घेतले नाही. या विसंगत धोरणामुळे नाशिक

शहराला पाणी देण्याच्या नादात सरकारने कोपरगाववर अन्याय केला आहे. या विसंगत धोरणामुळे कोपरगाव व श्रीरामपूर तालुक्यातील सहकारी साखर कारखानदारी व त्यामुळे निर्माण झालेले शेतकऱ्यांचे वैभव नष्ट होण्याची शक्यता आहे. हे विचार शंकरराव काळे यांनी दुष्काळ परिषदेत मांडले होते.[२५]

**८. दुष्काळ परिषदेत केलेल्या मागण्या –**

'गोदावरी कालवा पाणी वाटप संघर्ष समिती' कोपरगाव यांच्यातर्फे दुष्काळ परिषदेत खालील मागण्या करण्यात आल्या.

१. दारणा धरण व गंगापूर धरण ही प्रामुख्याने शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी बांधलेली आहेत. परंतु त्या पाण्यातून उद्योगधंदे व एकलहरे वीजप्रकल्पासाठी मोठ्याप्रमाणात पाणी वापरल जाते. त्यामुळे शेतीच्या उत्पन्नाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे व होत आहे. त्या अन्य कारणासाठी वापरल्या गेलेल्या पाण्याची भरपाई करण्याच्या दृष्टीने शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

२. जोपर्यंत गंगापूर व दारणा धरणातील पाण्याचे न्याय्य वाटप होत नाही. तोपर्यंत दारणा ते नांदूरमधमेश्वर व गंगापूर ते नांदूरमधमेश्वर नदीमधून तसेच दारणा व गंगापूर धरणातून पाणी उचलण्याची नवीन परवानगी देऊ नये.

३. महाराष्ट्र राज्याच्या पाटबंधारे खात्याने ३०–४–१९९२ रोजी काढलेला गोदावरी कालवे लाभक्षेत्रातील सिंचनक्षेत्र कमी करण्याविषयीचा निर्णय स्थगित ठेवावा व त्याची अंमलबजावणी करू नये.

४. दारणा ते नांदूरमधमेश्वर व गंगापूर ते नांदूरमधमेश्वर या परिसरातील पाणी लिफ्टद्वारे मोठ्याप्रमाणात विनापरवानगी उचलले जाते. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी कार्यवाही करावी.

५. गंगापूर व दारणा धरणातील १५ टी.एम.सी. पाण्याचे न्याय वाटप करण्यासाठी लाभक्षेत्रातील संबंधित प्रतिनिधींची बैठक बोलवावी.

६. गोदावरी कॅनॉलचे पाणी रब्बी हंगामात उन्हाळ्यात मिळाले नसल्याने १९९१–९२ मध्ये पाणी टंचाई निर्माण झाली. त्यामुळे फळबाग व ऊस या बारमाही पिकांची प्रचंड हानी झालेली आहे. त्या पिकांवर जिल्हा बँकेचा राष्ट्रीयकृत बँकांचा व लँड मॉर्गिज बँकांचा कर्जाचा मोठ्याप्रमाणावर बोजा आहे. रब्बी व उन्हाळी हंगामातील पिके पूर्णपणे जळून गेली आहेत. शेतकरी कर्जाच्या हप्त्यांची वसूली ३०–६–१९९३ पर्यंत होणे अशक्य आहे. त्यामुळे पुढील वर्षी शेतकऱ्यांना

थकबाकीदार न मानता त्यांनी नवीन शेती उभारण्यासाठी कर्जपुरवठा करण्यात यावा.

७. महाराष्ट्रातील अतिदुष्काळी भागाला पाणी मिळण्यासाठी ब्रिटीशांनी महाराष्ट्रात भाटघर, भंडारदरा व दारणा ही धरणे प्रामुख्याने बांधली. भाटघर धरणातून निरा कालवे, भंडारदरा धरणातून प्रवरा कालवे आणि दारणा धरणातून गोदावरी कालवे काढले गेले. जवळ जवळ एकाच कालखंडात हे कालवे काढण्यात आलेले आहेत. स्वातंत्र्यानंतर निरा आणि प्रवरा कालव्यांचे नूतनीकरण करण्यात आले. या कालव्यांची पाणी वहन क्षमता त्यामुळे जवळजवळ दुप्पट करण्यात आली. या कालव्याप्रमाणे गोदावरी कालव्यांचे मात्र नूतनीकरण करण्यात आले नाही. आज या कालव्यांची पाणी वहन क्षमता कितीतरी कमी झालेली आहे. तरी या कालव्यांचे नूतनीकरण जलद गतीने करण्यात यावे.

८. गोदावरी कालव्यांच्या आर्वतन काळात नाशिक विभागातील सर्व उपसा जलसिंचन योजना बंद ठेवाव्यात. त्यासाठी महाराष्ट्र वीज मंडळाची स्वतंत्र फिडर लाईन टाकावी. (भंडारदरा पाणी वाटपात अशी कार्यवाही केलेली आहे.)

यावेळी बॅ. रामराव आदिक यांना वरील मागण्यांचे निवदेन दिले गेले. या निवेदनावर शंकरराव काळे, सुर्यभान वहाडणे, ना. स. फरांदे, किशोर पवार, आमदार आण्णासाहेब म्हस्के, मोहनराव गाडे इत्यादी मान्यवरांच्या सह्या होत्या.[२६]

**९. पाण्यासाठी न्यायालयीन लढाई –**

गोदावरी डाव्या व उजव्या कालव्यात सरकारशी दोन हात करणे चालू असताना दिवसें न् दिवस पाणी कमीच पडत चालले होते. मुंबईला शेतकऱ्यांची पायी दिंडी आयोजित करून तत्कालीन मुख्यमंत्र्यांना पाणी प्रश्नाबद्दल निवेदन दिले गेले. नागपूरच्या विधानभवनासमोर विधानसभा अधिवेशन काळात शेतकरी उपोषणास बसले. कोपरगावात दुष्काळ परिषदेचे आयोजन केले. तालुक्यात मोर्चे, रास्ता रोको, रेल रोको, धरणे, उपोषण असे कार्यक्रमही अनेक वेळा झाले. परंतु सरकारने या प्रश्नाकडे दुर्लक्षच केले. त्यामुळे आपण न्यायालयात गेले पाहिजे, असा निर्णय पाणी वाटप संघर्ष समितीने घेतला. शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाखाली कालवा लाभ क्षेत्रातील दहा शेतकऱ्यांनी बेकायदा पाणी उचलणाऱ्या संस्था, महाराष्ट्र शासनाचे पाटबंधारे खाते आणि स्वतः महाराष्ट्र शासनाचे प्रशासकीय विभाग यांच्या विरोधात न्यायालयात मार्च १९९३ साली दावा दाखल केला. कोपरगावच्या सिव्हील कोर्टात स्पेशल सिव्हील सूट नं. १९/१९९३

नुसार हा दावा सुरू झाला. कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक छबुराव फक्कडराव आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली इतर नऊ शेतकरी या दाव्यात वादी झाले आणि महाराष्ट्र सरकार, इतर ९६ संस्था आणि सरकारी खात्यांना प्रतिवादी करण्यात आले. प्रतिवादी करण्यात आलेल्यांत पाटबंधारे विभाग महाराष्ट्र राज्य, मुख्य अभियंता उत्तर महाराष्ट्र पाटबंधारे विभाग, नाशिक, कलेक्टर, कलेक्टर अहमदनगर, दारणा व नांदूर मदमेश्वर उंचावणी बंधाऱ्याच्या दरम्यानच्या उपसा जलसिंचन योजना व त्या योजनांचे पदाधिकारी यांचा समावेश होता.[२७]

या दाव्यात वादींच्या बाजूने भूमिका मांडताना पुढील मजकूर न्यायालयात सादर करण्यात आला. '१९१५-१६ साली दारणा धरण बांधण्यात आले. या धरणामुळे २१,८०० हेक्टर कोपरगाव अहमदनगर परिसराचे जमीन क्षेत्र जलसिंचनाखाली येणार असे प्रकल्पात नमूद केलेले आहे.' नाशिक जिल्ह्यासाठी ४,०७० हेक्टर शेतीला पाणी देण्यात यावे, असेही मूळ प्रकल्पात म्हटलेले आहे. १९५४ मध्ये गंगापूर धरणाच्या पाण्याचाही ४०% वाटा कोपरगाव तालुक्याला मिळावा अशी तरतूद आहे.[२८]

सुरूवातीपासून १९८८-८९ पर्यंत दारणा व गंगापूर या दोन्ही धरणांच्या पाण्याचा कोपरगावचा वाटा ४०-४५ वर्ष मिळत होता. हे पाणी प्रामुख्याने शेती व पिण्यासाठी वापरले जायचे १९७६ च्या महाराष्ट्र जलसंधारण कायद्यानुसार उपसा जलसिंचन योजना स्थापन करण्यास शेतकऱ्यांना परवानगी मिळाली. त्यामुळे दारणा ते नांदूर मधमेश्वर उंचावणीच्या बंधाऱ्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर उपसा जलसिंचन योजना शेतकऱ्यांच्या संस्थांनी सुरू केल्या. या संस्थांच्या बाबतीतले कोणतेही नियम सरकारने काटेकोरपणे पाळले नाहीत. राजकीय दृष्ट्या सोय व्हावी म्हणून या उपसा जलसिंचन संस्थांना परवानगी देण्यात आली. त्यामुळे पाण्याचा बेकायदा उपसा मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. वारंवार पाटबंधारे खात्याच्या हे लक्षात आणून देऊनही सदरच्या प्रकरणात सरकारने लक्ष घातले नाही. नाशिक शहर, मिलीटरी कॅम्प व भगूर या महानगरपालिकेलाही कोपरगावच्या पाण्यातून पाणी दिले गेले. नाशिकची औद्योगिक वसाहत, एकलहरे वीजनिर्मितीचे केंद्र या ठिकाणी लागणारे पाणी दारणा व गंगापूर धरणाच्या पाण्यातूनच वापरण्यात येते. अर्थातच कोपरगावला जे पाणी अपेक्षित आहे, ते पाणी मिळत नाही. त्यामुळे कोपरगाव परिसराची शेती व सहकारी साखर कारखाना उद्योग समूह धोक्यात आलेला आहे. अशी बाजू वादीतर्फे मांडण्यात आली. या दाव्यात पुढील मागण्या करण्यात आल्या.[२९]

१. बेकायदा सहकारी उपसासिंचन योजना रद्द कराव्यात.

२. बेकायदा पाणी उपसण्याला बंदी करावी.

३. कालव्याला १५ दिवसांच्या रोटेशनने पाणी सोडावे.

४. कोपरगावच्या हक्काचे ११ टी.एम.सी. पाणी मिळावे.

५. औद्योगिक वसाहतींचे पाणी बंद करावे.

मार्च १९९३ पासून सदरचा दावा न्यायालयात सुरू होता. न्यायालयात आपल्या बाजूने निकाल लागेल असे परिसरातल्या शेतकऱ्यांना वाटत होते. या दाव्यात आपल्या बाजूने निर्णय लागल्यानंतर उद्धवस्त होत असलेले आपले संसार परत फुलतील अशी शेतकऱ्यांची आशा होती. तब्बल २० वर्षानंतर या दाव्यांचा निकाल शेतकऱ्यांच्या बाजुने लागलेला आहे. परंतु त्यांची अंमलबजावणी होणे अवघड बनले आहे. पाटबंधारे खात्याने या निकालाकडे मात्र दुर्लक्षच केलेले आहे.[३०]

**१०. ग्राहक मंचाकडे तक्रार –**

गोदावरी डाव्या व उजव्या कालव्याच्या लाभ क्षेत्रातील ब्लॉकधारक शेतकऱ्यांचे हक्काचे पाणी १०–१२ वर्षापासून अनियमित आणि कमी कमी झाल्याने पिकांचे नुकसान झाले होते. त्या शेतकऱ्यांना सरकारकडून पाणीपट्टी येते. त्यांना पाटबंधारे खात्याचे परवाने आहेत. तरीही पाणी मिळत नाही अशी अवस्था आहे. शेतीला पाणी नाही, ऊस आणि फळबागा पाण्याअभावी जळून जातात मात्र पाणीपट्टी व शेतसारा नियमित लावला जातो आणि तो भरण्यासाठी शेतकऱ्यांकडे सरकारचा तगादाही चालू असतो. सरकारच्या या मनमानी धोरणाला शेतकरी कंटाळले होते. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे होणाऱ्या ऊस पिके आणि फळबागा यांच्या नुकसानीच्या भरपाईसाठी ग्राहक मंचाकडे तक्रार करून भरपाई मागण्याचे शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींनी ठरवले. शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १२.४.१९९३ रोजी ग्राहक सरंक्षण मंच, अहमदनगर यांच्यासमोर सदर तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणात ११५ शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचे दावे करण्यात आले. या दाव्यात ११५ शेतकरी वादी झाले. तसेच सेक्रेटरी, पाटबंधारे खाते आणि महाराष्ट्र सरकार यांना प्रतिवादी करण्यात आले.[३१]

नुकसान झालेल्या शेतकऱ्यांमध्ये जगन्नाथ शंकर वारूळे, राहणार – कुंभारी, या शेतकऱ्याच्या लाखो रूपयांच्या पिकांचे नुकसान झाले. या शेतकऱ्यासारखेच इतरही शेतकरी आहेत. या दाव्यात शेतकरी हा पाटबंधारे खात्याकडून पाणी शुल्क भरून पाणी पुरवठ्याची सेवा (गुडस् /सर्व्हिस) घेणारा असल्याने ते ग्राहक (कंझ्युमर) या

व्याख्येत समाविष्ट होत आहेत. त्याचप्रमाणे पाटबंधारे खात्याने पाणी शुल्काच्या मोबदल्यात अर्जदार शेतकऱ्यांना प्रत्येक पिकाच्या जोपासनेसाठी आवश्यक असलेले पाणी हमीपूर्वक पुरवण्याचे कबूल करून त्याप्रमाणे ब्लॉक मंजूर केलेले आहेत. अशा परिस्थितीत पाटबंधारे खात्यात ब्लॉकधारक शेतकऱ्यांना पिकांसाठी लागणारे किमान गरजा भागवण्यासाठी आवश्यक असलेले पाणी पुरवण्याचे बंधन होते आणि आहे. ब्लॉकधारक शेतकऱ्यांचा पाणी मिळविण्याचा हक्कच आहे. पाटबंधारे खात्यानेही पाणीपट्टी स्वीकारताना पाण्याच्या हमीचा पास शेतकऱ्यांना दिलेला असतोच. या आधारे नुकसान भरपाई मागणाऱ्या शेतकऱ्यांना १९७८–७९ पर्यंत सर्वसाधारण नियमित पाणी मिळत होते. पाण्याच्या उपलब्धतेमुळे शेतीपासून चांगले उत्पन्नही मिळत होते. अर्जदार शेतकरी शेती क्षेत्रात ऊस फळगाब ही नगदी पिके घेत. या पिकांच्या जोडीला कापसू, कांदे व भुसारपद्धतीचे उत्पन्न देणारी पिकेही घेत असत. परंतु त्यानंतर पाणी मिळण्याचे प्रमाण कमी झाले. वास्तविक अर्जदारांना त्यांच्या ब्लॉकच्या क्षेत्राइतके बारमाही, खरीप आणि रब्बी हंगामात दर १४ दिवसांनी व उन्हाळी हंगामात दर २१ दिवसांनी, नियमितपणे पाणी देण्याचे पाटबंधारे खात्याला बंधन आहे.[३२]

१९९१–९२ या वर्षात अर्जदार शेतकऱ्यांची लाखो रूपयांची पिके ऊस, फळबाग यांच्या रूपाने पाणी टंचाईने जळाली. कालव्याचे पाणी हमखास मिळणार या भरवशावर त्यांनी पिकांचे नियोजन केले होते. पिकांच्या वाढीसाठी व जास्तीत जास्त उत्पन्न मिळण्यासाठी मेहनत, मशागत,खत यासाठी हजारो रूपयांची कर्ज बँक, साखर कारखाना, सहकारी पतसंस्था यांच्याकडून घेतलेली होती. मात्र पिकांसाठी पाणीच न मिळाल्याने पिके जळाली. पिकासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड शेतकऱ्यांना करता आली नाही. ते कर्जबाजारी झाले. एकदा कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्याला दुसऱ्या नवीन वर्षासाठी नव्याने कोणतीही वित्तसंस्था कर्जपुरवठा करत नाही. त्यामुळे नव्याने शेती व्यवसाय करण्यात शेतकऱ्याला भांडवली अडचणी येऊन तो मेटाकुटीला आल्यासारखी परिस्थिती अनेक शेतकऱ्यांची झाली.

पाटबंधारे खात्याकडून पाणी परवाना मिळावा म्हणून शेतकरी वेळप्रसंगी कर्ज काढून पाटबंधारे खात्याची पाणीपट्टी दर वर्षी वेळेत भरतात. ब्लॉकधारक शेतकऱ्यांना पाणीपट्टी भरण्यास उशीर झाल्यास पाटबंधारे खाते शेतकऱ्यांकडून पाणीपट्टी अग्रहक्काने दंडासह वसूल करते. कित्येकवेळा पाणी नाकारण्याचेही धोरण या खात्याने ठेवलेले आहे. पाटबंधारे खात्याने त्यांचे ग्राहक असलेल्या शेतकऱ्यांना सदोष पाणीवाटप

केले. (डेफिशियन्सी इन सर्व्हिसेस) त्यामुळे अर्जदार शेतकऱ्याचा पिकांवरील खर्च मशागत, मेहनत, खते या रूपाने वाया गेला. यातून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. अशी दाव्याची मांडणी ग्राहक मंचासमोर केली गेली.[३३]

दाव्यामध्ये जगन्नाथ शंकरराव वारूळे या शेतकऱ्याची केस अशी –

१९८६–८७ च्या हंगामापासून तर १९९१–९२ च्या हंगामात दरवर्षी पुढीलप्रमाणे नुकसान झाले.

| अ.नं. | पीक | क्षेत्र (एकरात) | मशागत खर्च + निव्वळ नफा | एकूण |
|---|---|---|---|---|
| १) | ऊस | १ | ५,००० +५,००० | १०,००० |
| २) | फळबाग | २ | ५,००० +१०,००० | १५,००० |
| ३) | भुसार | २ | ३,००० +४,००० | ७,००० |
| | | | **एकूण :–** | **३२,०००** |

(कारखान्याचे लिगल कार्यालयाच्या कागदपत्रांवरून)

| दर एकरी पिके जळल्याने नुकसान | | |
|---|---|---|
| १) | ऊस = | ५,००० |
| २) | फळबाग = | १०,०००० |
| ३) | भुसार | ४,००० |
| | **एकूण :–** | **१९,०००** |
| मशागत, निव्वळ नफा, पिक जळल्याने नुकसान | | |
| | १९,००० + ३२,०००= ५१,००० | |
| | ८६–८७ ते ९१–९२ या ६ वर्षातले नुकसान ५१,००० × ६ | |

ग्राहक मंचाच्या या तक्रार प्रकरणी शंकरराव काळे यांनी लक्ष घातल्यामुळे ११५ शेतकऱ्यांना लढण्यासाठी बळ मिळाले. या तक्रारील्या शंभर केसेस १९९३ पासून राज्य ग्राहक संरक्षण आयोगासमोर न्यायप्रविष्ट होत्या. एप्रिल २०१३ मध्ये त्याचा निकाल लागला मात्र शेतकऱ्याला ग्राहक ठरविण्याशिवाय कोणताच फायदा झालेला नाही.[३४]

## ६.३ जलसंवर्धनाची कामे

नव्वदच्या दशकात आवश्यकतेपेक्षा पाणी अपुरे मिळते हे लक्षात आल्यावर हक्काचे पाणी मिळवण्यासाठी संघर्ष उभारला गेला. परंतु त्यातील बऱ्याच बाबी शिल्लक राहीलेल्या होत्या. पाण्याअभावी परिसरातील शेती व शेतकरी मात्र मरता कामा नये, यासाठी ठोस काहीतरी उपाय काढण्याची नितांत आवश्यकता होती. शंकरराव काळे यांच्यामधील नेतृत्वगुणांची हीच खरी कसोटीची वेळ होती. ते या कसोटीत कुठेही मागे पडले नाहीत. त्यांनी संघर्ष आणि रचनात्मक काम यांना हातात हात घालून पाणी प्रश्न सोडवण्याची युक्ती शोधून काढली. शेती वाचावयाची या हेतूने एका बाजूला शंकरराव काळे यांनी गोदावरी कालव्यातल्या पाण्यासाठी संघर्ष सुरू ठेवला. पण त्याचबरोबर दुसऱ्या बाजूने कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून जलसंवर्धनाची कामे करताना सहकारी साखर कारखान्याची चळवळ वाचली पाहिजे. को.सा. का. कार्यक्षेत्रात ऊसाचे उत्पादन वाढले पाहिजे. परिसरातील विहिरीच्या पाण्याची पातळी वाढली पाहिजे. दूरवरून कारखान्यास ऊस आणण्यासाठी लागणारा वाहतूक खर्च वाचवून कारखाना नफ्यात आला पाहिजे, अशी काळे यांची भूमिका होती. त्यादृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे योजनेचा उपयोग त्यांनी करून घेतला.

### १. कोल्हापूर पद्धतीचे बंधारे (के. टी. वेअर्स ) –

या प्रकारच्या बंधाऱ्यात मान्सूनोत्तर नदीचा प्रवाह अडवून पाणी साठवण्यात येते. साठलेल्या पाण्याचा उपयोग कालवे न काढता उपसा जलसिंचन योजनेद्वारे नदीकाठच्या परिसरातील शेतीसाठी केला जातो. या पद्धतीच्या बंधाऱ्यात शेतजमीन बुडत नाही, कारण नदीच्या पात्रातच पाणी साठवले जाते. त्यामुळे भूसंपादनाचा व पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होत नाही.

पावसाचे प्रमाण कमी होत चालले असताना कोपरगावच्या विहिरीच्या पाण्याची पातळीही खालावू लागली. गोदावरी डाव्या व उजव्या कालव्याचे रोटेशन अधिकाअधिक लांबत जाऊ लागले. त्याचा परिणाम साखर कारखाना कार्यक्षेत्रात शेतीला पाणी कमी पडू लागले. त्यामुळे ऊसाचे प्रमाण घटत चालले. कारखान्याच्या गाळप क्षमतेचा विचार करता कार्यक्षेत्रात मोठ्याप्रमाणावर ऊस उत्पादन होण्याची आवश्यकता

होती. त्याकरीता कोपरगाव सहकारी साखर कारखाना कार्यक्षेत्रातल्या गोदावरी नदीवर के. टी. वेअर्स (कोल्हापूर पद्धतीचे बंधारे) बांधण्याचा कार्यक्रम शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाखाली घेतला. या के. टी. वेअर्ससाठी राज्य शासनाची मंजुरी घेण्यात आली. कोपरगाव सहकारी साखर कारखान्याने स्व-भांडवलातूल खालीलप्रमाणे के. टी. वेअर्स बांधून पूर्ण केले.

| अ.नं. | के. टी. वेअर्सचे नांव | साठवण क्षमता (द.ल.घ. फुट) | भिजणारे क्षेत्र (हेक्टर) | को.सा.का. ने केलेला खर्च (रू. लाखात) | लाभ क्षेत्रातील गावे |
|---|---|---|---|---|---|
| १) | डाऊच खु. ।। | ८४.५९ | १०५८ | ९७.०७ | डाऊच खुर्द, डाऊच बु., चांदगव्हाण, जेऊर कुंभारी, घारी, चांदेकसारे, इ. |
| २) | दत्तासागर (माहेगांव देशमुख) | २४२.४२ | १६६१ | १७७.०० | माहेगांव देशमुख, मळेगांव थडी, सुरेगांव, कोळगांव थडी, सांगवी भुसार, मायगांव देवी |
| ३) | ह.भ.प. तुकाराम बाबा खेडलेकर जलसागर (वडगांव कानळद) | १७३.४१३ | १३०४ | २६८.०० | बक्तरपूर, मोर्विस, चास (नळी), सोमठाणे, कानळद, कोळगांव |
| ४) | सडे (संयुक्त) | २७८.९५ | १८६५ | १८१.८२ | सडे, संवत्सर, कोकमठाण, कोपरगांव, सावळविहीर |
| | | | एकूण – | ७२३.८९ | |

(कोसाका वार्षिक अहवाल – १९९४–९५ वरून )

सडे के. टी. वेअर्ससाठी कोसाका, संजीवनी व गणेशनगर कारखान्यांनी अनुक्रमे ४०:४०:२० या प्रमाणात खर्च केलेला आहे.[३५] या के. टी. वेअर्समुळे हजारो हेक्टर पाणी शेतीला उपलब्ध झाले. त्यामुळे कालव्याच्या पाण्याची टंचाई असतानाही या परिसरात शेतीला पाणी उपलब्ध होत असल्याने संकटातल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

**२. दगडी साठवण बंधारे –**

दुष्काळ व पाणी टंचाईवर मात करण्यासाठी को.सा.का. च्या वतीने शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाखाली आणि जवाहर रोजगार योजने अंतर्गत दगडी साठवण बंधारे बांधण्यात आले. हे बंधारे कारखाना कार्यक्षेत्रातल्या कोपरगाव, सिन्नर, निफाड, येवला या तालुक्यातील गावात बांधण्यात आले. छोट्या छोट्या बंधाऱ्यांतून पावसाचे पाणी साठवून ते जमिनीत जिरवायचे अथवा पाण्याचा साठा करून ते शेतीसाठी वापरायचे हा या बंधाऱ्यांच्या निर्मितीमागचा उद्देश आहे. कारखाना कार्यक्षेत्रातल्या चार तालुक्यांमध्ये एकूण अठरा (१८) दगडी बंधारे बांधण्यात आले आहेत. पूर्वी पडणाऱ्या पावसाचे पाणी ओढ्या – नाल्यातून वहात जायचे त्यामुळे शेतीसाठी पाणी मिळत नसे. आता या बंधाऱ्यात पाणी साठवल्याने जमिनीतल्या पाण्याची पातळीही मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

कोपरगाव तालुक्यात पोहेगांव, चांदेकसारे, बक्तरपूर, धामोरी, वेळापूर, रवंदे, सुरेगांव, मुर्शतपूर या गावांच्या परिसरात दगडी साठवण बंधारे बांधण्यात आले आहेत. या दगडी साठवण बंधाऱ्यातल्या पाण्यामुळे हजारो एकर जमीन सिंचनाखाली आली आहे.[३६] कालव्याच्या पाण्यावर अवलंबून असलेली ही गावे या बंधाऱ्यामुळे फुलली. या गावांच्या शेतीतून आज कोपरगाव कारखान्यासाठी मोठ्या प्रमाणात ऊस उपलब्ध होतो. त्याच आधारावर शेतकऱ्यांचा आर्थिक विकासही मोठ्या प्रमाणावर झाला आहे. सिन्नर, निफाड, येवला या तालुक्यांच्या गावात कोपरगाव साखर कारखाना कार्यक्षेत्रातही दगडी साठवण बंधाऱ्यांची निर्मिती झाली आहे. त्या गावांमधेही शेतीसाठी या बंधाऱ्यामुळे पाणी उपलब्ध झाले आहे. येवला तालुक्यातली धुळगाव, खैरगव्हाण, सोमठाणा देश ही तशी दुष्काळी गावे परंतु त्या गावांतही शेतीसाठी पाणी उपलब्ध झाले आहे.[३७]

**कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर व जवाहर रोजगार योजना अंतर्गत संयुक्तपणे बांधलेले दगडी साठवण बंधारे –**

| अ. नं. | बंधाऱ्याचे नांव | साठवण क्षमता (द.ल.घ. फुट) | खर्च (रू. लाखात) |
|---|---|---|---|
| | **कोपरगांव तालुका –** | | |
| १) | पोहेगांव नं. १ | ३.०५ | ८.८९ |
| २) | चांदेकसारे नं. १ | २.४६ | ६.३२ |
| ३) | बक्तरपूर नं. १ | २.२० | ५.१० |
| ४) | धामोरी नं. १ | ५.८८ | १५.१८ |
| ५) | वेळापूर | १.४४ | ३.५६ |
| ६) | रवंदे नं. १ | ३.६१ | ४.७३ |
| ७) | सुरेगांव | ०.८८ | २.१८ |
| ८) | चांदेकसारे नं. २ | १.२५ | ३.०७ |
| ९) | मुर्शतपूर | १.९३ | २.११ |
| १०) | धामोरी नं. २ | ९.८२ | २६.४४ |
| | **सिन्नर तालुका –** | | |
| ११) | सोमठाणे नं. १ | ४.१८ | १०.८१ |
| १२) | सोमठाणे नं. २ | ५.४३ | १०.३० |
| १३) | सांगवी | ५.५६ | ७.८८ |
| | **निफाड तालुका –** | | |
| १४) | शिरवाडे (वाकद) | ३.१६ | ७.९९ |
| १५) | शिरवाडे (मोर्वीस) | ४.१६ | ९.०१ |
| | **येवला तालुका –** | | |
| १६) | खैरगव्हाण नं. ४ | १.३५ | १.६२ |
| १७) | धुळगांव नं. २ | १.४९ | २.८४ |
| १८) | सोमठाणा देश | २.०६ | ४.२८ |
| | जवाहर योजना + कारखाना निधी | | १३२.३१ |
| | कारखाना स्वनिधी | | ५९.२३ |
| | साठवण बंधारे एकूण खर्च रू. | | १९१.५४[३८] |

**(कोसाका वार्षिक अहवाल – १९९४–९५ वरून )**

३. **माती बंधारे, गावतळी व पाझर तलाव –**

कोपरगाव सहकारी साखर कारखान्याने स्वनिधीतून माती बंधारे, गावतळी व पाझर तलाव बांधण्याचा कार्यक्रम शंकरराव काळे यांच्या प्रोत्साहनामुळे हाती घेतला. या कार्यक्रमाची कल्पनाही कारखान्याचे चेअरमन म्हणून काळे यांनीच मांडली होती. पाणी टंचाई आणि दुष्काळावर मात करण्यासाठी प्रत्येक गावात पडणारे पावसाचे पाणी त्याच गावात अडवून पिण्यासाठी व शेतीसाठी उपलब्ध व्हावे अशी काळे यांची यामागील भूमिका होती. त्यापूर्वी परिसरात पडणाऱ्या पावसाचे पाणी ओढ्या नाल्यातून वाहून जायचे आणि परिसरात पाण्याची मोठी टंचाई निर्माण व्हायची. या परिस्थितीवर मात करण्याच्या गरजेतून मातीचे बंधारे, गावतळी व पाझर तलावांची कल्पना शंकरराव काळे यांनी मांडली व प्रत्यक्षात आणली.

आज कोपरगाव सहकारी साखर कारखाना कार्यक्षेत्रातल्या गावांमध्ये दोन गावतळी, तीन पाझर तलाव व बारा माती बंधारे कारखान्याच्या माध्यमातून बांधले गेले आहेत. यासाठी कोकमठाण, भोजडे, सोनेवाडी, देर्डे, वडगांव, वारी, कान्हेगाव, जेऊर कुंभारी, चांदेकसारे, पोहेगांव, शिरवाडे, माहेगांव देशमुख, टाकळी, कुंभारी या गावांची निवड केली मातीबंधारे, गावतळी व पाझर तलाव या माध्यमातून पावसाचे पडणारे पाणी आज मोठ्या प्रमाणावर त्या त्या गावच्या परिसरात अडवले गेले आहे. त्यामुळे पूर्वी ते पावसाचे पाणी वाहून जात असे ते आता जमिनीतली पाण्याची पातळी वाढण्यासाठी उपयोगी ठरते आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील इतर सहकारी साखर कारखाने आणि कोपरगाव सहकारी साखर कारखाना यांच्यात जलसंवर्धन कार्यक्रमामध्ये खूप फरक आहे. कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचे नेतृत्व शंकरराव काळे यांच्याकडे असल्यामुळे आणि काळे यांचे नेतृत्व जलसंवर्धानाबद्दल जागरूक असल्याने हे प्रयोग कोपरगाव सहकारी साखर कारखान्यामार्फत राबवले गेले आहेत.

कोपरगाव सहकारी साखर कारखान्याने स्वतःच्या विकासनिधीतून ही जलसंवर्धानाची कामे केली. त्यासाठी ५९.२३ लाख रूपये खर्च आला. खर्चाचा हा आकडा जरी मोठा असला तरी शेतीच्या विकासासाठी आणि ऊस पिकाचे उत्पादन वाढवण्यासाठी हा खर्च आवश्यक असल्याची भूमिका शंकरराव काळे यांनी नेहमीच मांडली आहे.

**कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर स्वनिधीतून बांधलेले बंधारे, गावतळे व पाझर तलाव.**

| अ. नं. | बंधाऱ्याचे नांव | साठवण क्षमता (द.ल.घ. फुट) | खर्च (रू. लाखात) |
|---|---|---|---|
| अ) | **गावतळे, पाझर तलाव, माती बंधारे** | | |
| १) | कोकमठाण नं. १ | ०.५० | २.२९ |
| २) | भोजडे नं. १ | ०.७० | २.३४ |
| ३) | सोनेवाडी | २.०० | ५.२५ |
| ४) | देर्डे (गावतळे) | २.०० | २.९६ |
| ५) | वडगांव (पाझरतलाव) | १.५० | १.०७ |
| ६) | वारी (मातीबंधारा) | १.५० | १.६७ |
| ७) | कोकमठाण नं. २ | १.२५ | १.६१ |
| ८) | कान्हेगांव | १.०० | ०.९२ |
| ९) | भोजडे नं. २ | १.०० | ०.७३ |
| १०) | जेऊर कुंभारी | १.२५ | १.१४ |
| ११) | चांदेकसारे नं. ३ | १.७५ | २.०८ |
| १२) | पोहेगांव नं. २ | १.२५ | १.९९ |
| १३) | शिरवाडे (वेस्टवेअर) | १.५० | ४.८४ |
| १४) | माहेगांव देशमुख (वेस्टवेअर) | २.५० | ८.६३ |
| १५) | टाकळी (वेस्टवेअर) | १.५० | ४.१८ |
| १६) | कोकमठाण (शेततळे) | ०.६० | ०.५१ |
| १७) | कुंभारी, माहेगाव (वेस्टवॉटर) | १.५० | ४.२३[३९] |

(कोसाका वार्षिक अहवाल – १९९५–९६ वरून )

| अ. नं. | बंधाऱ्याचे नांव | खर्च (रू. लाखात) |
| --- | --- | --- |
| ब) | **बंधारे साठवण क्षमता वाढवण्यासाठी बुलडोझरने भराव केले.** | |
| १) | नाटेगांव बंधारा | ०.५४ |
| २) | मढी नं. २ | ०.३६ |
| ३) | घारी | १.८१ |
| ४) | हिंगणवेढे | ०.२७ |
| ५) | पोहेगांव नं. ३ (साधी लिफ्ट) | १.९४ |
| ६) | मढी नं. १ | २.०९ |
| ७) | डाऊच बु. ।। | १.६५ |
| ८) | पोहेगांव | ०.८० |
| ९) | कोकमठाण | ०.६१ |
| १०) | धोत्रे | ०.४२ |
| ११) | डाऊच | १.४२ |
| १२) | पाथरे | ०.८८ |
| | **बंधारे एकूण खर्च रू.** | **५९.२३**[४०] |

(कोसाका वार्षिक अहवाल – १९९७–९८ वरून )

**४. उपसा जलसिंचन योजना –**

पाणीसाठ्यापासून शेतीपर्यंत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर पाणी उचलता यावे या कल्पनेतून उपसा जलसिंचन योजना या प्रकल्पाची कल्पना पुढे आली. पाणी साठ्यापासून शेती चार–पाच किलोमीटर लांब असते. त्या शेतीपर्यंत पाणी न्यायचे तर ते लिफ्टने न्यावे लागते. परंतु लिफ्टचा खर्च एक शेतकरी पेलू शकत नाही. त्यात परिसरातल्या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती जेमतेमच. शंकरराव काळे यांनी या अडचणीवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांना एकत्र करून सहकारी उपसा जलसिंचन योजनेची कल्पना मांडली. शेतकरी जे काम एकटा करू शकत नाही ते अनेक शेतकरी एकत्र आले तर लवकर आणि सहज होऊ शकते ही काळे यांची परिसरातल्या शेतकऱ्यांना शिकवण

होतीच. त्यामुळे शेतकरी एकत्र आले आणि शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाखाली परिसरात वेगवेगळ्या गावांतल्या शेतकऱ्यांनी उपसा जलसिंचन संस्था स्थापन केल्या. उपसा जलसिंचन संस्था स्थापन झाल्या. परंतु त्या संस्थांना मोठा निधी आवश्यक होता. निधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारीही साखर कारखान्याच्या माध्यमातून केली गेली. या उपसा जलसिंचन संस्थांना एकत्रित रू. ६७.६० लाख इतकी मदत कारखान्याच्या माध्यमातून केली गेली. गोदावरी नदीवर प्रामुख्याने या उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित आहेत यामध्ये श्री सरस्वती उपसा जलसिंचन संस्था – वडांगळी, दत्त दिगंबर सहकारी उपसा जलसिंचन संस्था – माहेगांव देशमुख, कुंभारी माहेगांव देशमुख सहकारी पाणी पुरवठा संस्था – कुंभारी, श्री संत ज्ञानेश्वर माऊली सहकारी उपसा जलसिंचन संस्था – ठाणगांव, श्रीराम सहकारी उपसा जलसिंचन संस्था – पाथरे, पांडुरंग रोकडे जलसिंचन योजना – माहेगांव देशमुख, राधाबाई काळे उपसा जलसिंचन योजना – माहेगांव देशमुख, जगदंबा उपसा सहकारी जलसिंचन योजना – धामोरी, रेणुकामाता उपसा जलसिंचन योजना – मायगांव देवी इ. उपसा जलसिंचन संस्था सध्या कार्यान्वित आहेत.[४१]

**५. विहिर, पाईपलाईन, कूपनलिकांसाठी मदत –**

उपसा जलसिंचन, बंधारे, गावतळी, पाझर, तलाव, के. टी. वेअर्स या योजना यशस्वीपणे राबवत असतानाच कारखाना कार्यक्षेत्रातल्या पाण्याच्या उपलब्धतेच्या सर्व साधनांचा विकास झाला पाहिजे, अशी शंकरराव काळे यांची भूमिका राहिली. कारखाना कार्यक्षेत्रात विहिर खोदलेल्या होत्या. परंतु त्या विहिरींमध्ये गाळ, दगड, माती पडलेली होती. त्यामुळे विहिरी अर्धवट अवस्थेत बुजलेल्या होत्या. अशा प्रकारे बुजलेल्या विहिरींमधील गाळ काढण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर शेतकरी साखर कारखान्याकडे आर्थिक मदत मागत होते. शंकरराव काळे यांनी शेतकऱ्यांची ही अडचण ओळखली. विहिरी बुजलेल्या असल्याने पाणी कमी पडायचे आणि शेतीला उन्हाळ्यात पाणी टंचाई जाणवयाची. त्यातूनच कारखान्यामार्फत विहीर खोदाईचा कार्यक्रम हाती घेण्याचा निर्णय काळे यांनी घेतला. ज्या ज्या शेतकऱ्यांना जुन्या विहिरींच्या खोदाईसाठी आर्थिक साह्य पाहिजे होते त्यांना त्यांना आर्थिक साह्य कारखान्यामार्फत केले गेले. या विहीर खोदाई योजनेच्या माध्यमातून कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या आर्थिक सहाय्याने अनेक जुन्या विहिरींची खोदाई केली गेली. यामुळे ज्या विहिरींना उन्हाळ्यात कमी पाणी कमी पडायचे ते त्या विहिरीत उपलब्ध झाले. शेतकरी स्वतः जुनी विहीर खोदाई करण्यास

असमर्थ असायचा. त्याला कारखान्याकडून आर्थिक मदत उपलब्ध झाल्याने तो सहजासहजी विहीर खोदाई करू शकला. पाऊस,कालवा या माध्यमातून शेतीला लहरी स्वरूपात पाणीपुरवठा होत होता. परंतु आता विहिरींचाही आधार शेतकऱ्यांना मिळाला. त्यातून ऊस शेतीसाठी मोठ्याप्रमाणात पाणी उपलब्ध झाले. पिण्यासाठीच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यासही मदत झाली.[४२]

विहिरीला पाणी उपलब्ध झाले परंतु जमीन सपाट नसल्याने सर्व शेतीला पाणी नेण्यात अडचण निर्माण होत असे. त्यामुळे छोट्या शेताच्या तुकड्यांना पाईपलाईन करून पाणी पोहोचवण्याची गरज असते. शेतकऱ्यांनी पाईप लाईनची आवश्यकता शंकरराव काळे यांच्याजवळ व्यक्त केली. त्या मागणीवर काळे यांनी तात्काळ कारखान्याच्या माध्यमातून पाईपलाईनसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याची योजना आखली. आज कारखाना परिसरातील जवळ जवळ सर्व शेतीत शेतकऱ्यांनी पाईपलाईन टाकून शेतीच्या छोट्या छोट्या तुकड्यांना पाणी पुरवले आहे.

विहिर खोदाई, पाईप लाईन या योजना प्रभावीपणे राबवल्यानंतर सुद्धा विहिरींना उन्हाळ्यात पाणी कमी पडू नये, या दृष्टीने विहिरींमध्ये बोअरींग टाकण्याची योजनाही कारखान्याच्या मार्फत राबवण्याचे काळे यांनी ठरवले व त्याची प्रभावी अंमलबजावणीही केली.

**६. ठिबक व तुषार सिंचन योजना –**

कोपरगाव तालुक्यात १९९० नंतर पाणी टंचाई जास्त जाणवू लागली. दारणा व नांदूरमधमेश्वर धरणातून गोदावरी डाव्या व उजव्या कालव्यात पाणी कमी येऊ लागले. दारणा धरण ते नांदूरमधमेश्वर धरणा दरम्यान बेकायदा उपसा जलसिंचन योजनांना मंजूरी देण्याच्या सरकारच्या धोरणामुळे आणि नाशिक व निफाड परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा उपसा केल्यामुळे मानवनिर्मित पाणी टंचाईवर मात करण्यासाठी त्यांनी ठिबक सिंचन व तुषार सिंचन योजना सुरू केली. पाण्याच्या शेतीसाठी उपयोग काटकसरीने कसा करता येईल व त्यातून अधिक चांगल्या पद्धतीने ऊसाचे उत्पादन कसे घेता येईल. या पद्धतीनेच शंकरराव काळे यांनी नेहमी प्रयत्न केले. कोपरगाव परिसरातील पाण्याची टंचाई लक्षात घेता पाणी कितीही अडवण्याचा प्रयत्न केला तरी कमीच पडणार होते. अशा वेळी शंकरराव काळे यांनी शेतकऱ्यांमध्ये प्रगत शेती तंत्रज्ञानाचा प्रचार केला. त्यात ठिकब सिंचन आणि तुषार सिंचन या योजनांचा मुख्यत्वे समावेश होता.

आपल्या परिसरातील शेती व्यवसायासमोर त्या त्या काळात समस्या येते, या समस्यांवर काय उपाय शोधायचा यात काळे यांचा नेहमीचा हातखंडा राहिला आहे. त्यामुळे पाणी टंचाई सगळीकडे जाणवू लागल्यावर त्यांनी ठिबक सिंचन तंत्र शेतकऱ्यांनी वापरावे व त्या माध्यमातून शेती करावी असा शेतकऱ्यांमध्ये प्रचार केला. शंकरराव काळे यांच्या या आवाहनाला परिसरातील शेतकऱ्यांनी उत्सफूर्त प्रतिसाद दिला. या ठिबक व तुषार सिंचन तंत्रज्ञानाचा परिचय व्हावा म्हणून काळे यांनी कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कार्यशाळा घेतल्या. या कार्यशाळांमधून शेतकऱ्यांना या नवीन शेती तंत्रज्ञानाचा प्रशिक्षण दिले.[४३] शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा आपल्या शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर उपयोग केला. कोपरगाव परिसरात ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनाची जवळ जवळ एक चळवळच उभी राहीली.

## ६.४ जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून कार्य (१९६२–१९७२)

शंकरराव काळे यांच्या राजकीय जीवनाची सुरूवात त्यांच्या जन्मगावच्या विविध कार्यकारी विकास सेवा सोसायटीतून झाली. सहकाराचे बाळकडू त्यांनी या सोसायटीतून मिळाले. काँग्रेस पक्षाच्या झेंड्याखाली काम करताना स्वामी सहजानंद भारती, वसंतदादा पाटील आणि यशवंतराव चव्हाण यांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. यशवंतरावांचा सहकारी चळवळीचा विचार त्यांच्या अंगात मुरला, शिक्षण, सहकार, ग्रामीण विकास आणि कल्याणकारी राज्य संकल्पनांचा त्यांनी अंगिकार केला. अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अहमदनगर जिल्ह्यात पंचायत राज्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न केले. लोकशाही संस्थांना व पद्धतींना प्रामाण्य मिळवून देण्याच्या दृष्टीतून त्यांनी जिल्हा परिषदेचा कारभार केला. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि सरकार यांचा सुसंवाद त्यांनी त्यांच्या काळात घडवून नवा पायंडा पाडला. लोकशाही मूल्ये लोकांत रूजवून लोकशाही मार्गानेच आर्थिक प्रगती घडवून आणता येईल हा विश्वासही त्यांनी लोकांमध्ये जिल्हाभर निर्माण केला.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी पारनेर तालुक्याकडे विशेष लक्ष दिले. त्यामुळे ते कोपरगावचे असूनही पारनेर तालुक्यात आमदार म्हणून निवडून येऊ शकले. पारनेरच्या लोकांनीही त्यांना आपले मानले. १९७२ साली दुष्काळात त्यांनी आमदार म्हणून खूप काम केले. विधानसभेत त्यांनी शिक्षण, सहकार, शेती, पाण्याचा प्रश्न यासंबंधी अभ्यासक्रमपूर्ण काम केले. त्यामुळे १९७७ साली दुसऱ्यांदा ते पारनेरमधून विधानसभेवर निवडून गेले. सहकार आणि शिक्षण या क्षेत्रांत त्यांच्या

असलेल्या सहभागामुळेच त्यांना शरदराव पवारांच्या नेतृत्वाखाली पुरोगामी लोकशाही दल सरकारमध्ये सहकार व शिक्षण राज्यमंत्री म्हणून स्थान मिळाले. १९९१ साली जिल्ह्यात काँग्रेस पक्ष अडचणीत असताना त्यांनी कोपरगाव लोकसभा मतदार संघातून खासदार म्हणून निवडून येऊन पक्षाला बळ मिळवून दिले. १९९१–९६ या दहाव्या लोकसभेने पंचायत राज्याच्या संबंधीची ७३ वी घटना दुरूस्ती केली.[४४] या दुरूस्तीच्या वेळी लोकसभेला शंकरराव काळे यांच्या सहभागाचा फायदा झाला. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी पंचायत राज्यासाठी केलेल्या कामाचा अनुभव त्यांना लोकसभेत उपयोगी पडला.

शंकरराव काळे यांचे नेतृत्व उभे राहिले. ते संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर नव महाराष्ट्र घडवावयाचा असा यशवंतरावांचा निर्धार होता. त्या दृष्टीने ते महाराष्ट्रभर जाणीवपूर्वक कार्यकर्ते तयार करत होते.[४५] त्यांनी महाराष्ट्रात कार्यकर्त्यांची जी फळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला त्यात अहमदनगर जिल्ह्यात शंकरराव काळे यांचे स्थान खूप वरचे होते. शंकरराव यशवंतरावांच्या मुशीत तयार झाले आणि आयुष्यभर त्यांच्या स्वप्नातला महाराष्ट्र घडवण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यात कार्यरत राहिले. यशवंतरावांनी तयार केलेला हा माणूस त्यांचा वारसा सतत जपत राहिला.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रातच प्रथमच जिल्हा परिषद अस्तित्वात आल्या. संयुक्त महाराष्ट्रातील जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने हा नवा प्रयोग राबवण्याची राज्यकर्त्यांची इच्छा होती. म. गांधीच्या सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या संकल्पनेला या 'पंचायतराज' प्रयोगाच्या रूपाने नवा आयाम मिळणार होता. 'पंचायतराज' प्रयोगाचा एक भाग म्हणून जिल्हा परिषदांची निर्मिती होण्यापूर्वी लोकल बोर्ड असायचे[४६]. या लोकल बोर्डाचे रूपांतर जिल्हा परिषदांमध्ये झाल्यानंतर अहमदनगरमध्ये तयार झालेल्या पहिल्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळण्याचा मान शंकरराव काळे यांना मिळाला. ते कर्जत तालुक्यातून जिल्हा परिषदेवर निवडून आले होते. कर्जत तालुक्याशी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातूनही त्यांचा बराच संपर्क आला होता. त्या पार्श्वभूमीवर नव्या संसाराची जशी पूर्वतयारी करावी लागते तशी जिल्हा परिषदेचे कामकाज सुरळीत व्हावे म्हणून अत्यावश्यक असलेल्या मूलभूत व्यवस्था लावण्याची जबाबदारी काळे यांच्यावर पडली. एका अर्थाने अहमदनगर जिल्ह्याने त्यांच्यातील नेतृत्वगुणाला ही मोठी संधीच उपलब्ध करून दिली होती. अहमदनगर

जिल्ह्यात त्यावेळी अण्णासाहेब शिंदे, आबासाहेब निंबाळकर, चंद्रभान आठरे अशी मातब्बर नेतेमंडळी होती. या नेत्यांच्या आग्रहामुळे व विश्वासामुळे दिनांक १२–०८–१९६२ रोजी शंकरराव काळे यांनी अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारला.[४७]

अहमदनगर जिल्हा परिषदेवर सलग दहा वर्षे अध्यक्ष म्हणून कार्यरत राहण्याची संधी शंकरराव काळे यांना मिळाली. या कार्यकाळात त्यांनी 'पंचायतराज' व्यवस्थेच्या संरचनेच्या दृष्टीने जे काम केले ते त्यांच्या विविध क्षेत्रातील वैशिष्टयपूर्ण कामांमुळे लोकांच्या लक्षात राहिले. या अनुषंगाने जिल्हा – तालुक्याच्या पातळीवर आरोग्यविषयक सुधारणा घडवून आणताना त्यांनी लसीकरणापासून कुटूंब–नियोजनापर्यंत विविध मोहिमा राबवल्या. अशा प्रासंगिक प्रयत्नांच्या बरोबरीनेच परस्परपूरक ठरणाऱ्या सहकारी संस्थांचे जाळे निर्माण करून स्थानिक समाजकारण अर्थकारणालाही त्यांनी चिरकालीन दिशा मिळवून दिली. सहकारातून ग्रामीण विकास हे तत्व प्रत्यक्षात आणताना स्थानिक पातळीवरील शेतीव्यवसाय त्यांनी केंद्रीभूत मानला. त्याला आधुनिक रूप देण्यासाठी बियाणांपासून यंत्रापर्यंतची सामुग्री शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात त्यांनी पुढाकार घेतला. तसेच शेतीपूरक व 'अर्थ' वर्धक असे पशुसंवर्धनासारखे प्रयोग राबवले. एकीकडे, स्थानिक पातळीवरील अशा साधनसंपत्तीतून विकासाचा मार्ग खुला करतानाच शंकरराव काळे यांनी दुष्काळ निर्मूलनासाठी बांधकाम विभागाला कार्यान्वित केले. तसेच समाजातील दुर्बल घटकांना या ना त्या मार्गाने मदतीचा हात देण्याचे धोरणही राबवले. म्हणून जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी सहकाराच्या दिशेने पावले टाकत विविध सामाजिक –आर्थिक प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न केला.

**१. आरोग्यविषयक मूलभूत सुधारणा –**

अहमदनगरचा बहुतेक भाग त्या काळी अति ग्रामीण आणि मागास होता. त्या भागात आरोग्याच्या सोयी कमी होत्या. लोकांमध्ये रोगराईचे प्रमाण खूप होते. टी.बी. कॉलरा, देवी या रोगांमुळे अनेक दगावत असत. लहान मुलांचे मरण्याचे प्रमाणही खूप होते. लोक अंधश्रद्धांना बळी पडत. बुवा–बाबा यांच्याकडे जाण्याचे प्रमाण खूप होते. एकूण जिल्हाभर आरोग्याची हेळसांड होत होती.[४८] या पार्श्वभूमीवर शंकरराव काळे यांनी पदभार सांभाळला. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आरोग्याची कामे करत असताना जिल्हा परिषदे अंतर्गत आरोग्यासाठी स्वतंत्र खाते निर्माण केले. त्या खात्यात प्राथमिक आरोग्य पथक स्थापन करून त्या पथकामार्फत संपूर्ण जिल्हाभर आरोग्याची सुविधा प्रभाविपणे पुरवली गेली. टी.बी. सारख्या दुर्धर रोगांचे रोगी सापडवून त्यांच्याकडे विशेष लक्ष देऊन

उपचार केले गेले. जिल्हाभर स्वच्छतेच्या कार्यक्रमांतर्गत संडास बांधण्याची योजना गावागावात राबवली गेली. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून या योजनांना अनुदान दिले गेले. जिल्ह्यातल्या प्रत्येक गटात जिल्हा परिषदेमार्फत प्राथमिक आरोग्य केंद्राची निर्मिती केली गेली. प्रत्येक आरोग्यकेंद्रात एक पूर्ण वेळ डॉक्टरच्या निवासासह सोय करून रूग्णांची सोय करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या वैद्यकिय अधिकाऱ्याने खाजगी प्रॅक्टिस करू नये अशा प्रकारचा नियम केला गेला. वैद्यकिय अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रात लोकांना पूर्ण वेळ दिला पाहिजे, अशी सक्ती करण्यात आली. कुटूंब–नियोजनाची संकल्पना त्या काळात नवी होती. कुटूंब–नियोजनास चालना, प्रोत्साहन मिळावे म्हणून जिल्हा परिषदेमार्फत कुटूंब–नियोजन करवून घेणाऱ्यांसाठी बक्षिसे ठेवण्यात आली होती. त्यामुळे अहमदनगर जिल्हयात कुटूंब–नियोजनात त्या काळी विक्रम केला गेला.

जिल्हा परिषदेने काळे यांच्या कार्यकाळात आरोग्याच्या क्षेत्रात केलेले काम म्हणजे जिल्हाभर प्रसूतीगृहांची निर्मिती करणे. ग्रामीण भागात प्रसूतीच्या सोयी पूर्वी नव्हत्या. त्यामुळे अनेक स्त्रिया प्रसूतीच्या काळात दगावत असत. बालमृत्यूचे प्रमाणही जास्त होते. अशा परिस्थितीत काळे यांनी जिल्हा परिषदेच्या कामांच्या अग्रक्रमात प्रसतीगृहाची योजना घेतली आणि प्रभावीपणे राबवली गेली. प्रत्येक प्राथमिक आरोग्यकेंद्रात विविध रोगांवरची चांगली औषधे असावीत; असा त्यांचा आग्रह असायचा. त्यामुळे अनेक रोगी असाध्य रोगांतून वाचले. त्यापूर्वी जिल्हयात आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणामुळे देव, देवस्की, भानामती व बुवाबाबांकडे जाण्याचे प्रमाण फार होते. त्यातून माणसे मरायची. परंतु मोफत आणि अल्पदरात औषधे, इंजेक्शनं गावाजवळच मिळू लागल्यामुळे लोकांमध्ये आरोग्याच्या विषयी जागृती होण्यास चालना मिळाली. त्यातून अंधश्रद्धांना काही प्रमाणात आळा बसला. आरोग्य केंद्रात नेत्रतपासणी, मुलांची संपूर्ण शरीर तपासणी, देवीची लस टोचणे, कॉलरा, हिवताप आदी साथींच्या रोगांवर उपचार शिबीरे आयोजित करणे हे त्या काळात जिल्हा परिषदेच्या आरोग्य खात्याचे वैशिष्टय ठरले.[४१]

## २. आधुनिक शेतीसाठी उपाययोजना –

शंकरराव काळे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाल्यामुळे अहमदनगर जिल्हा परिषदेला शेतीच्या संदर्भात भूमिका घेताना त्यांच्या पूर्व अनुभवांचा फायदा झाला. शेती व्यवसायातल्या अडी–अडचणी त्यांना चांगल्या माहीत होत्या. त्या विचारात घेऊन जिल्हा परिषदेच्या शेती विभागातर्फे त्यांनी वेगवेगळया योजना सुरू केल्या. शेतकऱ्यांसाठी पीक–

स्पर्धा सुरू केली. ही स्पर्धा गाव, गट, तालुका, जिल्हा या वेगवेगळ्या पातळ्यांवर राबवली जायची. शेतकऱ्यांची पिके दर्जेदार यावीत, त्यातून त्यांचे उत्पन्न वाढावे, ही या स्पर्धेमागची कल्पना होती. या स्पर्धेला जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांचा भरघोस पाठिंबा मिळाला. अनुसूचित जाती–जमातींच्या शेतकऱ्यांना शेती विभागामार्फत लागवडीदारांना बक्षिसे देण्याचीही योजनाही यांच्याच काळात सुरू झाली. सुधारलेल्या बी–बियाणांचे गुणन व वाटप करण्याची योजना सुरू करण्यात आली. ही 'अधिक धान्य पिकवा योजना' शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहन देणारी ठरली.[५०]

जिल्हा परिषदेमार्फत बाजरी, तूर, साळ, तीळ, मूग, ज्वारी, गहू, हरभरा यांची चांगली बियाणे देऊन त्या बियाण्यांची निवडक क्षेत्रात सधन लागवड करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. सुधारित कृषी पद्धतीचा प्रचार हे त्याकाळी अहमदनगर जिल्हा परिषदेचे मोठे काम ठरले. रोप संरक्षण साधनांचा प्रचार व साधन पुरवण्याची योजना राबवली गेली. नव्या भाजीपाला विकास या योजेनमुळे भाजीपाला मोठ्या प्रमाणावर पिकू लागला. सुधारित शेती करता यावी म्हणून जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विहीर खोदणी, बोअरींग यंत्र, सुरूंग लावणे, ट्रॅक्टर, इतर कृषी यंत्र शेती विभाग स्वतः पुरवू लागला. कृषी यंत्राच्या सहाय्याने बांध–बंधिस्ती केलेल्या कोरडवाहू शेतीच्या पद्धतीही शेती विभागाने सुरू केल्या होत्या. शेतीसाठी अमोनियम सल्फेट व इतर रासायनिक खते खरेदी व वाटप योजना राबवली गेली. गावातल्या विविध कार्यकारी सहकारी सोसायटीत अशी खते मिळत असत. 'ग्रामीण मिश्र खत योजना' अशीच त्याकाळी गाजलेली योजना; अहमदनगर जिल्हा परिषदेने राबवली. या योजनेत गावातील मैला व कचरा यांपासून कंपोस्ट खत बनवले जायचे.[५१]

जिल्हा परिषदेच्या शेती विभागाने जिल्हाभर शेतकऱ्यंना आधुनिक शेती कशी करावी. चांगली पिके कशी घ्यावी व ती सुद्धा ज्यादा किफायतशीर ठरणारी असावी; असा शेतकऱ्यांच्या शिक्षणाचा एक प्रयोगच १९६२ ते ७२ या काळात केला. त्यानंतर जिल्ह्यात खऱ्या अर्थाने आधुनिक शेती सुरू झाली. आज अहमदनगर जिल्ह्यात शेती किफायतशीर केली जाते व मोठ्याप्रमाणावर लोकांना शेतीत रोजगार मिळतो. आज शेतकरी मोठ्याप्रमाणावर कृषी यंत्र आणि ट्रॅक्टर वापरतो. पूर्वी बैलजोडीने व पारंपारिक नांगराने शेती केली जायची. हा मोठा बदल एकूणच कृषीक्षेत्रात जिल्हा परिषदेच्या धोरणांमुळे झाला. आज नगर जिल्ह्यात भाजीपाला मोठ्या प्रमाणात पिकतो. त्या काळातल्या 'भाजी पिकवा' योजनेचाच हा परिणाम आहे. मागासवर्गीय समाजातले

शेतकरी नगर जिल्ह्यात आज मोठ्या प्रमाणावर आधुनिक शेती करतात. इतरत्र हे प्रमाण कमी दिसते. हा सुद्धा मागासवर्गीय शेतकऱ्यांच्या त्या काळी जिल्हा परिषदेने केलेल्या मदतीचा परिणाम आहे.

अहमदनगर जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत त्या काळात पुणतांबा, ता. कोपरगाव येथे शेतीशाळा सुरू करण्यात आली. या शाळेत शेतकऱ्यांच्या मुलांना प्रवेश दिला जायचा. दोन वर्षाचा अभ्यासक्रम या शाळेत शिकवला जायचा. कृषी अधिक्षक, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक अशा पद्धतीने तज्ञ शिक्षक या शाळेत शिकवत असे. या शाळेत पीक संरक्षण, उत्पादन, जमीनशास्त्र, औत, औजारे, फळबागशास्त्र, वनस्पतीशास्त्र, हिंदी, नागरिकशास्त्र इत्यादी विषय शिकवले जात. सहकार हा एक विशेष विषय या विद्यार्थ्यांना होता. परिसरातील शेतकऱ्यांची ५६ मुले दरवर्षी या शाळेत शिकत असत. या शाळेला जिल्हा परिषदेचे चांगले सहाय्य मिळे. स्वतः काळे यांना शेती व शेतकरी यांच्या प्रगतीविषयी नेहमीच आस्था असल्याने मुलांना आधुनिक शेतीचे ज्ञान झाले पाहिजे, असे वाटे. त्यामुळेच त्यांनी शेतीशाळांना प्रोत्साहन दिले.[५२]

या शेती शाळेतले विद्यार्थी पुढे आपापल्या शेतातच आधुनिक शेती करू लागले. त्या शाळेतील मुले पुढे प्रगतशील शेतकरी म्हणून नावारूपास आली. शेती व्यवसायाचे आधुनिकीकरण करण्यात शेती शाळेचा वाटा मोठा आहे.

### ३. पशुसंवर्धनातून अर्थवर्धन –

अहमदनगर जिल्हा परिषदेने पशुसंवर्धन होण्याच्या दृष्टीने त्या काळी पशुसंवर्धन कार्यक्रम राबवला. जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम सुरू केला. पशुधनाची चांगली निपज व पशुवैद्यकीय सहाय्य या दोन महत्वाच्या गोष्टी या योजनेत होत्या. त्या–त्या काळात प्राण्यांना होणाऱ्या रोगांवर उपाय केले जात असत. शेळ्या, मेंढ्या यांना देवी, बुळकांड्या, विषमज्वर, घटसर्प, फाशी, फऱ्या खरकुत, अश्वरोग, डेंग, सरा, हगवण असे रोग होत असत. त्या रोगांवर तालुक्यात उपचाराची सोय होण्यासाठी पशुवैद्यकीय दवाखाने काढले गेले. त्या दवाखान्यामध्ये रोग प्रतिबंधक लसी टोचण्याचा कार्यक्रम घेतला गेला. त्यामुळे रोगापायी होणाऱ्या पशु हानीचे प्रमाण कमी होत गेले. शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाभर दवाखाने व पशुवैद्यकिय सहाय्यक केंद्रे उभी राहीली. जिल्ह्यात १४ पशुवैद्यकीय दवाखाने काढण्याचा विक्रमच त्या काळात झाला. ४२ पशु सहाय्यक केंद्र चालवली गेली. या दवाखान्यात गोऱ्हे व बोकड यांच्यापासून आधुनिक रेतन तयार करण्याचे कामही चाले. कृत्रिम गर्भधारणा केंद्रं जिल्हा

परिषदेमार्फत चालवली जात. कोंबड्या पाळण्याच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी जिल्हा परिषदेने कुक्कुट विकास योजनाही राबवली. पशु पैदास फार्म, गीर जातीच्या गाईंची पैदास, गो सेवा संघ, जिल्हा वळू योजना, पूरक पशु पैदास योजना अशा विविध योजना या काळात राबविल्या आहेत.[५३]

**४. सहकाराच्या जाळ्यातून वातारवण निर्मिती –**

अहमदनगर जिल्ह्यात सहकाराची पाळेमुळे १९६२ पूर्वीच रूजायला सुरूवात झाली होती. पण मध्यंतरी शांत झालेल्या सहकारी चळवळीला शंकरराव काळे यांनी त्यांच्या जिल्हा परिषदेच्या, कार्यकाळात चालना दिली. त्यांनी शेतकऱ्यांसाठी शेतकी पत पुरवठा सहकारी संस्था काढल्या. विविध कार्यकारी सेवा संस्थांची निर्मिती केली. बिगर शेतकी पतपुरवठा संस्थाचे एक जाळे त्यांनी जिल्हाभर निर्माण केले. नागरी सहकारी संस्था व बँका, नागरी पतपुरवठा, पगारदार नोकरांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था यांची नोंदणी या काळात मोठ्याप्रमाणावर केली गेली. भूविकास बँकेची उभारणी याच काळात झाली. धान्य बँका मोठ्या प्रमाणात याच काळात निघाल्या. पणन संस्था प्रत्येक तालुक्यात काढण्यात जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला. कापूस फळे व भाजीपाला यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्यामुळे त्याच मालाच्या विक्रीची व्यवस्था करण्यासाठी शेतकी माल संस्था सुरू करण्यात आल्या.

खरेदी विक्री संघ, दूध पुरवठा संस्था, दूध संघ, कुक्कुट व्यावसायिक सहकारी संस्था, संयुक्त शेती सहकारी संस्था, बिगर प्रकल्प संयुक्त सहकारी शेती संस्था, पाणी पुरवठा संस्था, कापूस जिनिंग प्रेसिंग संस्था, सहकारी साखर कारखाने, तेलगिरणी, सुधारित शेती संस्था अशा पद्धतीच्या असंख्य सहकारी उद्योगांना चालना देणाऱ्या संस्था या काळात नोंदल्या गेल्या व कार्यान्वित झाल्या. कामगारांसाठी जंगल कामगार, मजूर, वाहतूक, शैक्षणिक, ग्राहक, सहकारी क्षेत्रातील संस्था सुरू केल्या. गृहबांधणी सहकारी प्रकल्पही मोठ्या प्रमाणावर सुरू झाले.[५४]

**५. दुष्काळ निर्मूलनासाठी महत्वाकांक्षी कार्यक्रम –**

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून बांधकाम विभागामार्फत कालवे, पाण्याच्या टाक्या, रस्ते दुरूस्ती, पाझर तलाव, रस्ते तयार करणे, डांबरीकरण, पाणी साठवण बंधारे, खडीचे रस्ते, मुरूम –मातीचे रस्ते मोठ्याप्रमाणावर बांधले गेले. जलसिंचन तलाव व विहिरी यांच्या बांधणीला अग्रक्रम देण्यात आला. नळ पाणी पुरवठा योजना मोठ्या प्रमाणावर कार्यान्वित करण्यात आल्या. नगर जिल्ह्यात आज गावोगावी जाण्यासाठी रस्ते

तयार आहेत. परंतु त्या काळात रस्ते नव्हते. मोठ्या दूरदृष्टीनेच रस्ते बांधणीचा कार्यक्रम व पाणी अडवा व जिरवण्याचा कार्यक्रम काळे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आला. जिल्हा परिषदेने पिण्याच्या पाण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबवला.

**६. प्राथमिक शिक्षणाला अग्रक्रम –**

शंकरराव काळे यांनी ग्रामीण भागातल्या प्राथमिक शाळांकडे विशेष लक्ष दिले. प्राथमिक शिक्षण सकस मिळाले तर उद्याचे नागरिक आपण चांगले घडवू शकू असा त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच त्यांनी जिल्ह्यातल्या प्रत्येक गावात चवथीपर्यंत शाळा असावी. यासाठी कार्यक्रम हाती घेतला. जिल्ह्यात त्यामुळे अनेक गावात शिक्षणाची सोय झाली. जिल्हा परिषदेमार्फत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असा प्रयोग त्यांनीच प्रथम हाती घेतला.

अल्पसंख्यांकाना त्यांच्या भाषेतून प्राथमिक शिक्षण मिळावे, अशी योजना जिल्हा परिषदेमार्फत सुरू केली गेली.[५५] त्या वेळी प्राथमिक शिक्षणाला जे महत्व दिले, त्यामुळे आज जिल्ह्यात उच्चशिक्षणाचे प्रमाण आणि साक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे.

**७. दुर्बल घटकांना मदतीचा हात –**

समाजकल्याण खात्याअंतर्गत अहमदनगर जिल्हा परिषदेने चर्मकारांच्या कातडी कमावण्याच्या उद्योगाला मोठ्या प्रमाणावर सवलती दिल्या. चर्मकार सहकारी उद्योग संस्थांना परवानगी दिली. दलितांना व आदिवासींना शिक्षणाची सोय करून दिली. दलितांच्या शेतीच्या विकासासाठी अनुदान देण्याची योजना याच काळात सुरू झाली. शंकरराव काळे यांचे नेतृत्व सर्वसमावेशक असल्याने त्यांनी मागास घटकांना, विकासाच्या मुख्य प्रवाहात नेहमीच समाविष्ट करून घेण्याचा विचार मांडला व तशी कृती केली. दलितांच्या मुलांना शिष्यवृत्त्या, पुस्तके, कपडे वाटप हे कार्यक्रम त्या काळात लोकप्रिय झाले. सहकारी चळवळीत दलितांना सामावून घेण्यासाठी त्यांच्या सहकारी संस्थांना अग्रक्रमाने मंजूरी देऊन, अनुदान देऊन त्यांची अडचण दूर करण्याचे धोरण शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेने राबवले.[५६]

'पंचायतराज' च्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या कामाची जबाबदारी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष या नात्याने शंकरराव काळे यांच्यावर पडली होती. ग्राम, तालुका आणि जिल्हा या त्रिस्तराव विकेंद्रित पद्धतीने शेवटच्या माणसापर्यंत विकासाची गंगा पोहचवण्याचा संकल्प करण्यात आला होता. जिल्हा परिषद प्रथमच अस्तित्वात आली

होती. त्यामुळे स्वतः कार्यपद्धती विकसित करण्याचे आव्हान होते. हे आव्हान त्यांनी पेलले. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या तीनही पातळ्यांवर त्यांनी या संस्थांची प्रभावी रचना केली. त्यांच्या कामात सुसंवाद तयार केला. एकमेकांच्या मनात आणि कामात विश्वासाचे वातावरण तयार केले. शेतकरी, कामगार मागासवर्गीय यांच्या सर्वांगिण विकासाच्या योजना तयार केल्या व त्या यशस्वीपणे राबवल्या. शिक्षण, आरोग्य, शेती, बांधकाम, सहकार, पशुसंवर्धन, समाजकल्याण, पिण्याचे पाणी या सर्व गोष्टींवर त्यांनी भर दिला. विकेंद्रित लोकशाहीच्या माध्यमातून राज्यकारभार करत विकास कामे खेड्या-पाड्यापर्यंत त्यांनी नेली. म. गांधीनी 'विकेंद्रित कार्यपद्धतीने सर्वोदय' अशी संकल्पना मांडली. याच पद्धतीने काळे यांनी विकेंद्रीत कारभार करून शेवटच्या माणसाच्या घरात विकासगंगा नेण्याचा प्रयत्न केला. ग्रामपंचायत, पंचायत समिती यांची कार्यपद्धती त्यांनी शिस्तबध्दपणे विकसित केली होती. मूलभूत सुविधा त्यातून जनतेपर्यंत गेल्या पाहिजेत, अशी त्यांची सततची धारणा होती. त्यांचे कामही त्या दिशेनेच होत राहिले.

आज 'पंचायतराज' या संकल्पनेला गावा-गावात आणि मना-मनात स्थान मिळाले आहे. परंतु ज्यावेळी ही संकल्पना आपल्या समाजात नवी होती, त्या काळात या संकल्पनेच्या विकासासाठी महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जे प्रयत्न झाले त्यात शंकरराव काळे सारख्या नेत्यांनी मोठे योगदान दिले आहे. महाराष्ट्र पंचायत राज्याच्या संकल्पनेला मूर्त रूप देणारी जी दहा-पंधरा माणसे आठवणीत राहतात. त्यात यशवंतरावांच्या अनुयायांपैकी श्री. शंकरराव काळे यांचे योगदान निश्चितच उल्लेखनीय आहे.

१९७२ नंतर अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झालेले माजी खासदार यशवंतराव गडाख यांनीही शंकररावांच्या जिल्हा परिषदेतील कार्याचा आदर्श आपल्या पुढे ठेवला होता. याबाबत 'अर्धविराम' या आपल्या आत्मचरित्रात यशवंतराव गडाख लिहितात की, ''शंकरराव काळे विसर्जित जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. एक कर्तृत्वान जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून त्याकाळी महाराष्ट्रात त्यांचं स्थान होतं. जिल्ह्याच्या राजकारणात त्यांचा मोठा दबदबा होता. आम्हा तरूण कार्यकर्त्यांना त्यांचं मागदर्शन नेहमीच मिळत असे. त्यांचा आम्हाला आधार वाटे.''[५७]

## ६.५ पारनेर तालुक्याचे आमदार म्हणून केलेली कामे (१९७२–८०)

जिल्हा परिषदेत अध्यक्ष म्हणून काम करत असताना शंकरराव काळे यांनी पारनेर तालुक्यात महत्वाची विकासाची कामे केली होती. १९७२ साली महाराष्ट्रभर दुष्काळ पडला होता. पारनेर हा तर अहमदनगर जिल्ह्यातला पारंपारिक दुष्काळी तालुका होता. १९७२ साली शंकरराव काळे पारनेर विधानसभेच्या निवडणूकीस उभे राहिले आणि भरघोस मतांनी विजयी झाले. त्यांनी पारनेरचे स्थानिक उमेदवार डि. के. भगत यांचा मोठ्या मतांनी पराभव केला. पुढे शंकरराव पारनेरचे आमदार म्हणून १९७७ साली दुसऱ्यांदाही निवडून आले.[५८] १९७२–८० या एकूण आमदारकीच्या काळात त्यांनी दुष्काळावर मात करण्यासाठी विविध विकास कामे केली. हे त्यांच्या कारकिर्दीचे वैशिष्टय म्हणता येईल.

पारनेरची अर्थव्यवस्था पूर्णतः शेतीवर आधारीत होती. शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून होती. पावसाचे प्रमाण नेहमी ५० से.मी. पेक्षा कमीच असायचे. शेतीला पाणी नसल्याने शेतकरी वर्षातून फक्त एकच पीक घेऊ शकत असत. त्यातच पारनेर तालुक्यातला बराचसा भाग डोंगराळ आहे. उरलेली जमीन जिरायती आहे. त्यातही या परिसरात सातत्याने दुष्काळ पडायचा. जानेवारी ते जून या महिन्यात पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा मोठा तुटवडा जाणवायचा. त्यामुळे परिसरातले छोटे शेतकरी–शेतमजूर मजुरीसाठी तालुक्याबाहेर जात. काही तरूण नोकरीसाठी मुंबईला जाऊन राहत आणि पोटापुरते कमावत. एक काळ असा होता की मुंबईत मिळणाऱ्या रोजगारावरच या परिसराची अर्थव्यवस्था अवलंबून होती. तालुक्यात उद्योगधंदे नव्हते. पाण्याच्या तुटवड्यापायी पारनेरच्या ११४ गावात शेतीचा अर्थातच जगण्याचा प्रश्न सतत जळता असायचा. त्यामुळे सरकारने आम्हाला पाणी द्यावे अशी भावना प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात असायची. अशा पार्श्वभूमीवर तालुक्याचे नेतृत्व करण्याची जबाबदारी शंकरराव काळे यांच्यावर आली. आमदारकीच्या कारकिर्दीच्या अगदी सुरूवातीचे १९७२ साल महाराष्ट्रात गाजले ते दुष्काळाने. त्या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. पावसाळ्यात २५ से.मी. पेक्षा कमी पाऊस झाला होता.[५९] काही ठिकाणी तर संपूर्ण पावसाळा कोरडाच गेला होता. या दुष्काळात पारनेरचे खूप हाल झाले. शेती वर्षभर ओस पडली. शेतकरी–शेतमजुरांना मजुरी मिळत नव्हती. पाणी आणण्यासाठी पाच–सात कि.मी. जावे लागायचे. पाणीही खराब असायचे. त्यामुळे आजार व्हायचे त्या काळात पारनेरमधल्या शेतीतून जवळ जवळ शून्य उत्पन्न निघाले. या पार्श्वभूमीवर शंकरराव काळे

या तालुक्याचे आमदार झाले. त्यांच्यापुढे ही सर्व आव्हाने आ वासून उभी होती. आतापर्यंत सार्वजनिक जीवनात  काळे यांनी पाणी प्रश्न, दुष्काळ या गोष्टींचा सखोल अभ्यास केला होता. स्वतः दुष्काळी तालुक्यातले असल्याने त्यांना या प्रश्नांची तीव्रता माहीत होती. शेतकऱ्यांचे जळते अंतःकरण त्यांनी स्वतः अनुभवले होते. शेतकऱ्यांचीही त्यांच्याकडून खूप अपेक्षा होत्या.

विधानसभेत पारनेरचे नेतृत्व करत असताना त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न, जिरायत जमिनीचा प्रश्न, जलसंधारण व संवर्धनाच्या कामांची गरज, शेती पूरक उद्योगांची गरज, शेती विकासाच्या योजना या प्रश्नांवर प्रभावी मांडणी केली. मुळात त्यांचा दुष्काळी लोकजीवनाचा अभ्यास होता. त्या अभ्यासाचा त्यांना विधानसभेत पारनेरची बाजू मांडताना खूप उपयोग झाला.

**१ पाणी प्रश्न –**

पारनेरच्या शेतीच्या पाण्याच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने शंकरराव काळे यांनी तालुक्यातल्या सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले. त्याचा त्यांना प्रत्यक्षात काम करताना खूपच उपयोग झाला. शेतकऱ्यांच्या मनात पाण्यासाठी कुणीतरी काही करेल अशी आशा असायची. त्या दृष्टीने काळे यांनी लघु पाटबंधारे प्रकल्प एका बाजुला आणि दुसऱ्या बाजूला जलसंधारण व संवर्धनाची कामे हाती घेतली. त्या दृष्टीने खात्याला योजना तयार करायला भाग पाडले. सतत दुष्काळी असणाऱ्या ११४ गावांना शेती व पिण्यासाठी पाणी मिळावे अशीही योजना बनवली. या योजनांचा भाग म्हणूनच काळू प्रकल्प आणि मांड–ओहळ प्रकल्प या योजनांस त्यांनी मंजूरी मिळवली. या बंधारे प्रकल्पांमुळे पावसाचे पडणारे पाणी मोठ्या प्रमाणावर अडवले गेले. या पाण्याच्या साठ्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीला व पिण्यासाठी वर्षभर पाणी पुरवले जाऊ लागले. भाळवणी, तिखोल, पळशी या गावांमध्येही लघु–पाटबंधारे योजना राबवल्या गेल्या. १९७२–७७ या काळात काळे यांच्या प्रयत्नांतून १५० पाझर तलाव पूर्ण करण्यात आले.[६०] या योजना तयार करताना तसेच त्या मंजूर करून आणताना काळे यांना सरकारशी संघर्षही करावा लागला. आपल्याच पक्षाच्या मंत्र्यांशी भांडावे लागले. परंतु ते सर्व पारनेरच्या जनतेच्या काळजीमुळे, प्रेमामुळे त्यांनी केले. लघु पाटबंधारे योजना, पाझर तलाव या योजनांच्या माध्यमातून पारनेरची त्या वेळी दोन हजार एकर शेतजमीन पाण्याखाली आली. तालुक्यातल्या प्रत्येक गावाला पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळाले पाहिजे असा आग्रह काळे यांनी धरला. त्यामुळेच प्रत्येक गावात नळपाणीपुरवठा योजना

मंजूर झाल्या. पिण्यासाठी गावच्या मालकीच्या विहिरी खोदण्यात आल्या. जिथे पाणी खूप खोलवर लागते त्या गावात बोअरवेल (कूपननलिका) टाकण्यात आल्या. १९७३–७६ या काळात पारनेर तालुक्यात बहुतांशी गावात पिण्याचे पाणी पुरवण्यात आले. पिण्याचे स्वच्छ पाणी मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जलसंधारण खाते या सर्वांना बरोबर घेऊन शंकरराव काळे यांनी परिश्रम घेतले.

लघु पाटबंधारे, पाझर तलाव, पिण्याच्या पाण्याच्या योजना कार्यान्वित झाल्या. त्याचा लाभही लोकांना मिळू लागला. परंतु दुष्काळग्रस्त भाग तरीही मोठ्या प्रमाणावर शिल्लक होताच. या दुष्काळी भागातील शेती विकासासाठी काळे यांनी जागतिक बँकेच्या मार्फत प्रवण क्षेत्रविकास योजना राबवली. महाराष्ट्रातून त्या काळी फक्त दोनच योजना जागतिक बँकेमार्फत राबवल्या होत्या. त्यातली एक योजना काळे यांनी पारनेर तालुक्यात आणली. कुठलीही नवीन योजना असो आपल्या मतदार संघाला तिचा लाभ मिळाला पाहिजे अशी त्यांची नेहमी भावना असे. यामुळेच त्यांनी जलसंधारण,शेतजमीन विकास, पिण्याचे पाणी यासाठी अनेक योजना पारनेर तालुक्यात राबवल्या. याशिवाय महाराष्ट्रातील इतर ठिकाणच्या पाण्याचे प्रश्नही सोडविण्यासाठी प्रयत्न केले. दारणा नदीवरील पाणी उपसण्यास घातलेल्या बंदीबाबत त्यांनी विधानसभेत आवाज उठविला होता.[६१]

**२ शेतीपूरक उद्योगधंदे –**

शेतकऱ्यांनी शेती करता करता जोडधंदा केला तर तो चांगल्या पद्धतीने स्वतःची प्रगती करू शकतो. हे काळे यांना कोळपेवाडीतील अनुभवातून माहीत होते. एखाद्या पिकात शेती तोट्यात गेली तर जोडधंद्यात शेतकरी तो तोटा भरून काढतो. म्हणून शेतीला जोडधंदा असला पाहिजे अशा हेतूने त्यांनी १४ सहकारी दूध सोसायट्यांची स्थापना केली. शेतकऱ्यांना दुधाचा जोडधंदा करण्यासाठी प्रोत्साहन दिले. चांगल्या दूध देणाऱ्या गायी घेण्यासाठी मार्गदर्शन केले. भूविकास बँक कर्ज देत नाही म्हणून त्यांनी विधानसभेत संबंधित मंत्र्यांना जाब विचारला होता.[६२] त्या काळात गावा–गावात शेतकऱ्यांनी गायी घेतल्या. केवळ दोनच वर्षात हजारो लिटर दूध पारनेर तालुक्यात जमा होऊ लागले. पारनेर तालुक्यात आज दुधाचे विक्रमी उत्पादन वाड्या–वस्त्यावर होत आहे. याचे श्रेय त्या काळी आमदार असताना काळे यांनी दूध व्यवसायाला जे प्रोत्साहन दिले त्यालाच द्यावे लागेल. शेतकरी दूध उत्पादक बनल्यानंतर त्याच्या मासिक उत्पन्नात वाढ झाली. शेतकरी अठराविश्व दारिद्र्यात होता. मुले मुंबईत नोकरी करायची तेव्हा त्याला पैसा बघायला मिळायचा. आता शेतकरी स्वतः पैसे कमावू लागला होता.

### ३. मजुरांचा प्रश्न –

पारनेर तालुक्यात शेती आणि पाण्याचा प्रश्न जसा गंभीर होता. तसाच असंघटीत मजुरांचाही प्रश्न गंभीर होता. या प्रश्नाकडेही शंकरराव काळे यांनी कधीच दुर्लक्ष होऊ दिले नाही. त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी काय करता येईल; अशी त्यांना चिंता असायची. त्यातूनच असंघटित मजुरांसाठी मजूर सहकारी संस्था स्थापण्यात त्यांनी पुढाकार घेतला.[६३] थोड्याच काळात संपूर्ण तालुक्यातले आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेले जवळपास सहा हजार असंघटित मजूर या संस्थेचे सभासद झाले. तालुक्यातल्या १४ हजार मजुरांना या मजुर संस्थांच्या माध्यमातून काम मिळू लागले. पारनेरमधून मुंबईला मजुरीसाठी जाणाऱ्या मजुरांना स्थानिक ठिकाणी कामे मिळू लागली. ज्या भागात दुष्काळ पडायचा, दुष्काळाने शेती ओस पडायची, तिकडे मजुरीवर गदा यायची त्या परिसरात स्थानिक १६ हजार मजुरांना काम देण्याच्या योजनेमुळे मजुरांची खूप सोय झाली. तालुक्यातल्या बारा बलुतेदार समाजाचीही दुष्काळात फारच ससेहोलपट व्हायची. त्यांना उत्पन्नांचे हुकूमी साधन गावत मिळायचे नाही. दुष्काळामुळे शेतीपूरक धंदे बंद पडत.पण मजूर संस्थांच्या माध्यमातून या बारा बलुतेदार वर्गाला रोजंदारी मिळू लागली. त्याच्या हातातही पैसा खेळू लागला. मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांना कर्ज मिळवून देण्यासाठी विधानसभेत प्रश्न उपस्थित केले.[६४]

पूर्वी पारनेर तालुका जसा दुष्काळी होता तसा दुर्लक्षितही होता. शंकररावांनी आमदारकीच्या काळात दुष्काळावर मात करण्याचा जसा प्रयत्न केला तसाच पारनेरच्या जडणघडणीचा नवा अध्याय सुरू करण्याचाही प्रयत्न केला. राज्यशासनाच्या विकास योजना राबवल्यानंतर पूर्वीच्या दुष्काळी पारनेर तालुक्यातही शेतीत वर्षभर पिके उभी राहू लागली. ऊस, कांदा, कापसू, गहू, बाजरी, ज्वारी, हरभरा अशी पिके शेतकरी घेऊन लागला. त्यातून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली. ऊस पिकवला जाऊ लागल्यानंतर पारनेर तालुक्यात पारनेर सहकारी साखर कारखाना उभा राहिला. या कारखान्याच्या माध्यमातून पुढे विकासाची गंगा खेड्यापाड्यावर पोहचण्यास मदत झाली. शेतमजूरांना–कामगारांना स्थानिक रोजगार मिळाला. या सर्व प्रक्रियेतून पारनेरच्या विकासाला गती मिळाली.

## ६.६ मंत्रिपदाची कारकिर्द (१९७८–८०)

पारनेर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करत असतानाच शरद पवार यांच्या पुरोगामी लोकशाही दलाच्या (पुलोद) मंत्रिमंडळात शंकरराव काळे यांचा समावेश करण्यात आला. त्यांच्याकडे शिक्षण आणि सहकार खात्याचे राज्यमंत्रीपद सोपवले गेले.[६५] रयत शिक्षण संस्थेमार्फत प्राथमिक शिक्षणप्रसाराचे केलेले व्यापक काम आणि कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची यशस्वी वाटचाल याची दखल घेतली गेली.

राज्यमंत्री म्हणून काम करताना त्यांनी पहिला महत्वाचा प्रश्न सोडवला तो म्हणजे खाजगी प्राथमिक शाळांच्या अनुदानाचा. महाराष्ट्रभर शिक्षणाचा प्रसार करण्याचे तत्कालीन सरकारचे धोरण होते. शिक्षण घेण्याची इच्छाही वेगवेगळ्या घटकांमध्ये जागृत होत होती. त्यातून महाराष्ट्रभर विविध भागात खाजगी प्राथमिक शाळा निघाल्या. सरकारने त्यांना मान्यता दिली होती. परंतु त्यांना अनुदान दिले जात नव्हते. काळे हे स्वतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना व सर्वच मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे मिळाले पाहिजे, या विचाराचे प्रतिपादन करणारे, कर्मवीरांच्या सान्निध्यात राहिल्याने त्यांचे हे मत पक्क झाले होते. त्या आधारे शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारची असेल तर मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना अनुदानही दिले पाहिजे असा धोरणात्मक निर्णय मंत्रिमंडळाकडून करवून घेतला.[६६] त्या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे यासाठी त्यांनी स्वतः लक्ष घातले या निर्णयामुळे महाराष्ट्रातल्या शेकडो शाळांना अनुदान मिळू लागले. या शाळांमधून हजारो मुलांना शिक्षणाची संधी मिळाली. शिक्षणातील गुणवत्तेबाबत शंकरराव काळे नेहमी आग्रही असत. महाराष्ट्र सरकारच्या शिक्षणखात्याला आणि महाराष्ट्रातील शिक्षण संस्थांना ते गुणवत्ता वाढवण्यासाठी मार्गदर्शन करत असत. शाळा मंजुरीसाठी लागणाऱ्या निकषांबाबत त्यांनी त्यावेळी विधानसभेत प्रश्न उपस्थित केले व त्यात बदल करण्यास शासनाला भाग पाडले.

सहकार खात्याचा कारभार बघत असताना सहकार क्षेत्रात लोकशाही निर्णय प्रक्रिया बळकट झाली पाहिजे, असा काळे यांचा कटाक्ष होता, महाराष्ट्रभर सहकारी संस्था मोठ्या प्रमाणावर वाढत असताना त्या संस्थांमध्ये लोकशाही प्रक्रिया मात्र बळकट होत नाही, ही त्यांची खंत होती. सहकारी क्षेत्रातल्या नेतृत्वात सरंजामशाही एकचालकत्व, एकाधिकारशाही या पद्धतीचे दोष असले तर या चळवळीचा मूळ उद्देशच बाजूला पडेल, अशी चिंता त्यांना वाटायची. त्यामुळेच सहकार खात्याचा कारभार बघत असताना सहकारी संस्थांत लोकशाही प्रक्रियेला महत्व व सहकारी चळवळीचे महत्व

त्यांना माहित होते. परंतु ते या चळवळीच्या मर्यादातही जाणत होते. यात काही दोष येऊ शकतात; याचीही त्यांना माहिती होती. आपल्या राज्यमंत्रिपदाच्या काळात त्यांनी सहकारी चळवळीला गती देण्यासाठी आणि तिला लोकाभिमुख करण्यासाठी प्रयत्न केले.[६७]

महाराष्ट्रात दुधाचा धंदा मोठ्या प्रमाणावर वाढत असताना दुधाचे दर मात्र उत्पादन खर्चाच्या रकमेच्या तुलनेत ठरवले जात नव्हते. वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी दुधाचे दर ठरवण्यात लक्ष घातले नव्हते. महाराष्ट्रभर खेड्यापाड्यात दुधाचा धंदा पोहोचत होता. शेतकरी, छोटा शेतकरी, शेतमजूर यांची कुटूंब या धंद्यावर अवलंबून होती. या दृष्टीने या धंद्याला महत्व येत असताना दुधाला भाव व्यस्थित मिळाला नाही तर दुध उत्पादकांचे नुकसान होऊ शकते. ही दृष्टी डोळ्यांसमोर ठेवून काळे यांनी दुधाचा दर उत्पादित खर्चाशी निगडीत ठेवण्याचा क्रांतिकारी निर्णय सरकारला घ्यायला लावला.[६८] खेड्यापाड्यात शेतकऱ्यांच्या दूध–उत्पादकांच्या हिताच्या दृष्टीने हा निर्णय फार महत्वाचा ठरला.

सहकारी संस्थांचे जाळे सगळीकडे वाढत असताना त्या संस्थांच्या तांत्रिक गोष्टीतील क्लिष्टतेपायी सामान्य माणूस नाडला जाऊ नये असे काळे याचे नेहमी मत असे. थकबाकीदार सहकारी संस्थांच्या सभासदांना व्यक्तिशः ते थकबाकीदार नसतानाही थकबाकीदार समजले जाई. त्यामुळे त्यांना इतर सहकारी संस्थांवर प्रतिनिधित्व करता यायचे नाही. वास्तविक संस्था थकबाकीदार असेल तर तो संस्थेच्या कार्यपद्धतीचा, धोरणाचा दोष असतो.

व्यक्तिगत सभासदाला मात्र विनाकारण त्या कारणासाठी इतर सहकारी संस्थांवर प्रतिनिधित्व करण्यास बंदी घातली जायची. सरकारच्या या धोरणावर त्यांनी कडाडून टीका केली. सहकार खात्यातला हा नियम बदलवून व्यक्तिगतपणे सभासदांना सगळीकडे सभासद होण्याची संधी देण्याचा नियम करण्यात आला. त्यामुळे हजारो थकबाकीदार सोसायट्या, संस्थांच्या सभासदांना इतर संस्थांच्या योजनांचा लाभ घेता आला.[६९]

पुरोगामी लोकशाही आघाडीचे सरकार महाराष्ट्र आले ही महत्वपूर्ण घटना होती. महाराष्ट्रातल्या जनतेने आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर त्या सरकारचे मोठ्या प्रमाणावर स्वागत केले होते. या सरकारने आपल्या जाहिरनाम्यात जनताभिमूख कारभाराची आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची घोषणा केली होती. लोकांच्या मोठ्या अपेक्षा या सरकारकडून असताना शंकरराव काळे यांच्याकडे शिक्षण व सहकारसारखी महत्वाची

खाती होती. या खात्यांचा कारभार पाहत असताना जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे काम त्यांनी त्यांच्या कारभारातून केले. सहकाराचा वारसा त्यांनी यशवंतराव चव्हाणांकडून घेतला व शिक्षणाचे महत्व त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटल्यांच्या शब्दांतून जाणले या दोनही आदर्शाच्या कल्पनेतला बहुजन समाज आणि नवा महाराष्ट्र घडवण्याची संधी त्यांना मंत्रीपदाच्या कालावधीत मिळाली.

खरे म्हणजे मंत्रिपद त्यांना मिळाले ते खूप अल्पकाळ. दोन वर्षात शिक्षण, सहकारासारख्या एवढ्या मोठ्या क्षेत्रात काम करता येणे अशक्य. परंतु त्यातही शंकरराव काळे यांनी जे निर्णय घेतले ते खूपच महत्वाचे आहेत. या विनाअनुदानित खाजगी शाळांना अनुदान, दुधाचा दर उत्पादनाच्या खर्चाच्या रकमेच्या तुलनेत ठरवणे आणि थकबाकीदार संस्थांच्या सभासदांना दुसऱ्या संस्थांत सभासदत्व मिळणे हे निर्णय त्यांनी करवून घेतलेले क्रांतिकारी निर्णय आहेत.

**६.७ कोपरगाव लोकसभा मतदार संघाचे खासदार म्हणून केलेली कामे (१९९१–९५)**

१९७२ ते ८० या काळात पारनेरचे प्रतिनिधीत्व करत असताना शंकरराव काळे यांच्यावर रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमपदाची जबाबदारी आली. १९७५ ते ९० अशी तब्बल पंधरा वर्षे ते ही जबाबदारी पार पाडत होते. शिवाय कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या उद्योगसमूहाच्या वाढीचा आणि विस्ताराचाही हाच काळ होता. त्यानंतर १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने त्यांना कोपरगावमधून तिकिट दिले व ते निवडून आले. नरसिंहरावांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे सरकार स्थापन झाले. या काळात राजकीय अस्थिरतेचे पर्व सुरू झाले. परंतु शंकररावांनी आपले लक्ष ढळू न देता आपल्या मतदारसंघासाठी त्यांनी चौफेर कार्य केले. अर्थातच शिक्षणाचा प्रसार, पाणी प्रश्नाची सोडवणूक आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांना त्यांनी प्राधान्याने हात घातला. सत्ताधारी काँग्रेस पक्षाचा खासदार म्हणून संसद या व्यासपीठाचाही त्यांनी प्रभावी वापर केला. मतदार संघाच्या महत्वाच्या समस्यांवर त्यांनी संसदेत प्रश्न विचारून त्या समस्या सोडवून घेतल्या. वेगवेगळ्या विषयांची माहिती करून घेणे, चर्चेत भाग घेणे अशा पद्धतीच्या त्यांनी संसदीय कामकाजात सक्रीय सहभाग घेतला. कोपरगाव लोकसभा मतदार संघातील व अहमदनगर जिल्ह्यातील शेतकरी, कामगार व प्रमुख सहकारी उद्योगांच्या समस्यांबाबत त्यांनी निवेदन देणे, मागण्या करणे या स्वरूपात कृतिशीलता दाखविली. मंत्रालय व शासकीय कार्यालयांशी सतत संपर्क ठेवून लोकांच्या विविध समस्यांचा पाठपुरावा केला होता. संसदीय अधिवेशन काळात दिल्लीत राहत असतानाही

मतदार संघातल्या जनतेशी त्यांचा संपर्क कायम असे. बऱ्याचदा खासदार झाल्यानंतर लोकप्रतिनिधी दिल्लीतच राहतात. मतदार संघाशी त्यांचा संपर्क राहतच नाही. काळे यांनी ही अवघड गोष्ट जुळवून आणली. कोळपेवाडी असो वा दिल्लीत; ते लोकांच्या संपर्कात असत. दिल्ली गटबाजीच्या राजकारणात रस न घेता काँग्रेस पक्षाचा एक प्रामाणिक कार्यकर्ता या नात्याने त्यांनी लोकांची कामे केली.[७०]

दिल्लीत वास्तव्य असण्याच्या काळात त्यांनी महाराष्ट्रातल्या सहकारी साखर कारखाने व ग्रामीण सहकारी बँकांचे अनेक महत्वाचे प्रश्न मार्गी लावले. समाजातल्या तळातल्या जनतेच्या समस्यांचे निराकरण कसे होईल याचे त्यांना सतत भान असे. पक्षाच्या जागृत व अभ्यासू कार्यकर्त्यांकडून स्थानिक प्रश्नांची माहिती घेत असत. आपल्याकडे आलेला कार्यकर्ता कोणत्या गटाचा वा पक्षाचा आहे याचा विचार ते कधी करत नसत. त्याचा प्रश्न महत्वाचा असेल तर प्राधान्याने तो प्रश्न सुटावा असा त्यांचा प्रयत्न असायचा. 'मला जनतेचं ऋण फेडायचं आहे' अशी त्यांची भूमिका असे. गरिबांसाठी केंद्र सरकारच्या योजनांचा मतदार संघातील लोकांना लाभ मिळावा, अशी त्यांची धडपड असे आणि याच धडपडीतून त्यांची कामे होत, योजना व प्रकल्प प्रत्यक्षात येत असत.

**१. दळणवळणाच्या सोयी –**

परिसराच्या विकासासाठी दळणवळणाच्या सुविधा असल्या पाहिजेत. त्याशिवाय लवकर संपर्क होत नाही व कामांना गती येत नाही. त्यामुळे आपल्या परिसरात रस्ते पक्के असले पाहिजेत असा त्यांचा आग्रह असे. खासदार असताना त्यांनी पाच वर्षाच्या काळात जवळ जवळ १ कोटी रूपये खर्च करून चांगले रस्ते तयार कण्याचे काम केले. हा सर्व निधी खासदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करावयाच्या कामांतून त्यांनी उभा केला. पारनेर, श्रीरामपूर, कोपरगांव, संगमनेर, राहुरी, राहाता, शिर्डी या परिसरात त्यांनी ही कामे केली.

खासदारनिधीच्या माध्यमातून त्यांनी कोपरगाव लोकसभा मतदार संघातील कार्यक्षेत्रात दळणवळणाची अत्याधुनिक संपर्क–साधने आणण्यातही पुढाकार घेतला. त्यात कोपरगाव शहरात टेलिफोन एक्सचेंजचे आधुनिकीकरण व एस.टी.डी. ची व्यवस्थित सुविधा मिळवण्यासाठी त्यांनी तत्कालीन केंद्रीय दळणवळण खात्याचे राज्यमंत्री राजेश पायलट यांना निवेदन देऊन ती सुविधा कोपरगाव शहराला मिळवून दिली. त्या सुविधेमुळे कोपरगाव शहराच्या दृष्टीने दळणवळणास खूप मदत झाली आणि नागरिकांची सोय झाली.

राहाता टेलिफोन एक्सचेंज सुविधेत वाढ व अस्तगांव येथे नविन टेलिफोन एक्सचेंज सुरू करण्यास त्यांनीच मंजूरी आणली. म. फुले विद्यापीठ, राहुरी येथे एस.टी.डी. सुविधा नव्हती. विद्यापीठातल्या कारभाराच्या दृष्टीने ते गैरसोयीचे होते. त्यामुळे या प्रश्नावर काळे यांनी तातडीने प्रयत्न करून कृषी विद्यापीठाला एस.टी.डी. सुविधा उपलब्ध करून दिली.

कोपरगाव मतदार संघातल्या इतरही शहर आणि गावांमध्ये त्यांनी टेलिफोन एक्सचेंज व एस.टी.डी. ची सुविधा मिळवून दिली. यामध्ये कोळपेवाडी मौजे वारी, ता. कोपरगांव, संगमनेर, टाकळीभान, ता. श्रीरामपूर, पारनेर, शिर्डी राहाता सात्रळ, ता. राहुरी, आश्वी, ता. संगमनेर या ठिकाणांचा समावेश होता.[७१]

**रस्ते खडीकरण व डांबरीकरण –**

| अ. नं. | कामाचे नांव | मंजूर रक्कम (रू. लाखात) | वर्ष |
|---|---|---|---|
| १) | कर्जुले हर्या, ता. पारनेर रस्त्याची मोरी बांधणे | ०.३५ | ९३–९४ |
| २) | कोपरगाव नगरपालिका हद्दीतील रस्ते | १.०० | ९३–९४ |
| ३) | सावळविहीर भरवस रोड ते कारवाडी डांबरीकरण ०.० ते १ कि.मी. | २.०० | ९४–९५ |
| ४) | सावळविहीर भरवस रोड ते शहा रस्ता डांबरीकरण २ कि.मी. | ४.०० | ९४–९५ |
| ५) | चास ते हंडेवाडी डांबरीकरण १ कि.मी. | १.५० | ९४–९५ |
| ६) | माहेगांव देशमुख ते मढी रस्ता १ कि.मी. | २.५० | ९४–९५ |
| ७) | काकडी ते कोऱ्हाळे डांबरीकरण २ कि.मी. | २.५० | ९४–९५ |
| ८) | सडे ते वाकचौरे वस्ती खडीकरण ८०० मीटर | ०.८० | ९४–९५ |
| ९) | निमगांव कोऱ्हाळे ते नांदुर्खी खडीकरण १ कि.मी. | २.०० | ९४–९५ |
| १०) | चव्हाण वस्ती ते कोपरगाव पुणतांबा रस्ता १ कि.मी | २.०० | ९४–९५ |
| ११) | मढी ते सावळविहीर भरवस रस्ता खडीकरण १ कि.मी. | २.५० | ९४–९५ |
| १२) | प्र. जि. मा. नं. ६ ते भैरवनाथ मंदिर रस्ता डांबरीकरण ३ कि.मी. | २.५० | ९४–९५ |
| १३) | राहता पिंपळस नगरपालिका, रस्ते डांबरीकरण | १.०० | ९४–९५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४) | कोपरगाव नगरपालिका, रस्ते डांबरीकरण | ५.०० | ९४–९५ |
| १५) | संगमनेर नगरपालिका, रस्ते डांबरीकरण | ६.८० | ९४–९५ |
| १६) | श्रीरामपूर नगरपालिका, रस्ते डांबरीकरण | ५.०० | ९४–९५ |
| १७) | वाडेगव्हाण ते राळेगण, वेसमाळ रस्ता डांबरीकरण १ कि.मी. | २.०० | ९४–९५ |
| १८) | राजमार्ग ५१ ते देवीभोयरे खडीकरण रस्ता ०० ते १.३०० कि.मी. | ०.३६ | ९४–९५ |
| १९) | पारनेर ते वरखेड मळा रस्ता बांधणी ०० ते १.८०० | ४.०० | ९४–९५ |
| २०) | वाडेगव्हाण ते पाडळी रांजणगांव रस्ता मोरी बांधणे | ०.७४ | ९४–९५ |
| २१) | पडदे जोड रस्ता मोरी बांधणे | ०.६० | ९४–९५ |
| २२) | प्र. जि. मा. ३४ ते मालुंजे रोड ४०० ते ८६० कि.मी. खडीकरण, डांबरीकरण | १.५० | ९४–९५ |
| २३) | प्र. जि. मा. ६४ वडनेर हवेली २.२०० मध्ये पूल बांधणे | १.६२ | ९४–९५ |
| २४) | जवाहर माळवाडी रस्ता ०० ते ०.९०० | १.६६ | ९४–९५ |
| २५) | कोळपेवाडी ते चारी नं. ६ रस्ता डांबरीकरण १ कि.मी. | ४.०० | ९५–९६ |
| २६) | मढी ते माहेगाव देशमुख खडीकरण ४ था कि. मी. | २.५० | ९५–९६ |
| २७) | कोपरगाव टाकळी रोड ते आश्रम शाळा रस्ता तयार करणे. | १.०० | ९५–९६ |
| २८) | कोळपेवाडी ते सावळविहीर भरवस रस्ता डांबरीकरण | ५.०० | ९५–९६ |
| २९) | मढी ते माहेगाव देशमुख डांबरीकरण (माहेगांवकडून) | ४.०० | ९५–९६ |
| ३०) | रवंदे ते मळेगांव थडी खडीकरण व डांबरीकरण | ४.०० | ९५–९६ |
| ३१) | गोधेगांव ते कासली डांबरीकरण | ४.०० | ९५–९६ |
| ३२) | राहाता पिंपळस नगरपालिका रस्ते डांबरीकरण | ५.०० | ९५–९६ |
| ३३) | कोपरगाव नगरपालिका रस्ते डांबरीकरण | ५.०० | ९५–९६ |
| ३४) | वडनेर हवेली ते पारनेर विसापूर रस्ता डांबरीकरण | २.०० | ९५–९६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५) | नळवणे फाटा ते काटाळवेढे रस्ता डांबरीकरण | २.०० | ९५–९६ |
| ३६) | घाणेगांव ते नगर रस्ता खडीकरण | २.०० | ९५–९६ |
| ३७) | पठाणदरा ते बारगाव नांदूर रस्ता | १.९३ | ९५–९६ |
| ३८) | देवळाली प्रवरा ते राहुरी रस्ता | ४.०० | ९५–९६ |
| ३९) | संगमनेर अकोला रस्ता ते धांदरफळ खडीकरण | ४.०० | ९५–९६ |
| ४०) | शिरसगांव रस्ता ते अंडरग्राऊंउ पर्यंत डांबरीकरण (श्रीरामपूर) | ३.०० | ९५–९६ |
| ४१) | रेव्हेन्यु सोसायटी ते प्रमुख रस्ता श्रीरामपूर खडीकरण | १.०० | ९५–९६ |
| ४२) | संगमनेर नगरपालिका, संगमनेर | ५.०० | ९५–९६ |
| ४३) | रवंदे मळेगांव थडी दुसरा कि.मी. खडीकरण | १.०० | ९५–९६ |

(स्मरणिका – प्रयत्नांच्या पाऊलखुणा – १९९६ [७२])

**२. नवीन शाळा, व्यायामशाळा, समाजमंदिर , सांस्कृतिक केंद्र –**

शैक्षणिक संस्था वाढाव्यात त्यांनी शिक्षणाचं काम प्रांजळपणे करावे असा शंकरराव काळे यांचा सतत आग्रह असते. यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी काम केलेच, परंतु छोट्या–छोट्या शिक्षणसंस्थांनाही त्यांनी मदत केली. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना त्यांनी खासदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कामांच्या मदत निधीतून भरघोस मदत केली. जिल्हा परिषदेच्या शाळांना सुरक्षिततेसाठी कंपाऊंड, मेनगेट बांधण्यासाठी सुद्धा त्यांनी खासदार–निधीतून मदत केली. मागासवर्गीय समाजासाठी गावात समाजमंदिर बांधण्यासाठी त्यांनी प्राधान्याने मदत निधी उपलब्ध करून दिला. [७३]

तरूण पिढी निर्व्यसनी राहून शाकाहाराकडे वळावी म्हणून तरूणांसाठी गावात व्यायामशाळा असावी ही त्यांची इच्छा होती. तरूण पिढी सदृढ असली पाहिजे, अशी त्यांची या मागची भावना होती. त्यामुळे त्यांनी शैक्षणिक संस्थांच्या बरोबरच व्यायामशाळांनाही मदत केली. समाज मंदिरे तसेच सांस्कृतिक केंद्रांनाही त्यांनी आर्थिक मदत मिळवून दिली. स्वतः खासदार निधीतून अशा कामांना ते मदत देत असत. मराठी शाळांच्या इमारतींना त्यांनी मदत दर दिलीच. परंतु उर्दू शाळेच्या इमारतींसाठीही त्यांनी निधी उपलब्ध करून दिला.

| अ. नं. | कामाचे नांव | स्थळ | मंजूर रक्कम | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | पढेगांव जि. प. शाळा मेनगेट बांधकाम | पढेगांव | १६,००० | ९३-९४ |
| २) | कान्हेगांव जि. प. शाळा कम्पौंड बांधकाम | कान्हेगांव | १८,००० | ९३-९४ |
| ३) | मेंढवण येथील गावठाणातील सामुहिक सभागृह | मेंढवण | १,१०,००० | ९३-९४ |
| ४) | आंग्रेवाडी म्हैंसगांव, ता. राहुरी नविन शाळा इमारत बांधकाम | आंग्रेवाडी | १,००,०० | ९३-९४ |
| ५) | लोणंद, ता. पारनेर येथील कोल्हे वस्तीवर शाळा खोली बांधकाम | लोणंद | १५,००० | ९३-९४ |
| ६) | शिरसगांव समाजमंदिर, शिरसगांव | शिरसागांव | ७१,६५० | ९४-९५ |
| ७) | सोनेवाडी समाज मंदिर, सोनेवाडी | सोनेवाडी | ७१,६५० | ९४-९५ |
| ८) | ओगदी समाज मंदिर, ओगदी | ओगदी | ७१,६५० | ९४-९५ |
| ९) | नवीन शाळा इमारत, पोहेगांव (शिंदे वस्ती) | पोहेगांव | ७१,६५० | ९४-९५ |
| १०) | नवीन शाळा इमारत,चरमळ वस्ती(करंजीबु.) | करंजी बु. | ७१,६५० | ९४-९५ |
| ११) | नवीन शाळा इमारत, पानमळा वस्ती, चांदेकसारे | चांदेकसारे | ७१,६५० | ९४-९५ |
| १२) | नवीन शाळा इमारत, वेळापूर | वेळापूर | ७१,६५० | ९४-९५ |
| १३) | नवीन शाळा इमारत, कोकमठाण | कोकमठाण | ७१,६५० | ९४-९५ |
| १४) | नवीन शाळा इमारत, माहेगांव देशमुख | माहेगांव दे | ७१,६५० | ९४-९५ |
| १५) | नवीन शाळा इमारत, मांजरे वस्ती | धामोरी | ७१,६५० | ९४-९५ |
| १६) | नवीन शाळा इमारत, उक्कडगांव | उक्कडगांव | ७१,६५० | ९४-९५ |
| १७) | नवीन शाळा इमारत, मुर्शतपूर | मुर्शतपूर | ७१,६५० | ९४-९५ |
| १८) | नवीन शाळा इमारत, दवंगे वस्ती | मळेगांव थडी | ७१,६५० | ९४-९५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९) | नवीन शाळा इमारत, डाऊच बु. | धामोरी | ७१,६०० | ९४-९५ |
| २०) | जिल्हा परिषद प्रा. शाळा, कपौंड | माहेगांव दे | १,८१,००० | ९४-९५ |
| २१) | नवीन शाळा मानोरी (उर्दु शाळा) | मानोरी | ७१,६५० | ९४-९५ |
| २२) | नवीन शाळा खोली, टाकळी मियाँ | टाकळी मि. | ७१,५०० | ९४-९५ |
| २३) | नवीन शाळा खोली, चेडगांव | चेडगांव | ७१,६५० | ९४-९५ |
| २४) | व्यायामशाळा धांदरफळ खुर्द, ता. संगमनेर | धांदरफळ | १,२७,००० | ९४-९५ |
| २५) | व्यायाम शाळा निमोण, ता. संगमनेर | निमोण | १,२८,०० | ९४-९५ |
| २६) | व्यायाम शाळा, कोळवाडा, ता. संगमनेर | कोळवाडा | १,४५,००० | ९४-९५ |
| २७) | व्यायाम शाळा, समनापूर, ता. संगमनेर | समनापूर | १,००,००० | ९४-९५ |
| २८) | व्यायाम शाळा, निमज, ता. संगमनेर | निमज | १,५०,००० | ९४-९५ |
| २९) | कोळपेवाडी येथे प्राथमिक शाळा इमारत बांधणे (जि. प.) | कोळपेवाडी | ७१,६५० | ९४-९५ |
| ३०) | दैठणे, गुंजाळ समाजमंदिर, ता. पारनेर | दैठणे गुंजाळ | ७५,००० | ९४-९५ |
| ३१) | काळे वस्ती निघोज समाजमंदिर | निघोज | ७५,००० | ९५-९६ |
| ३२) | व्यायाम शाळा, गोरेगांव ता. पारनेर | गोरेगांव | ७५,००० | ९५-९६ |
| ३३) | सांस्कृतिक केंद्र, नाऊर, ता. श्रीरामपूर | नाऊर | २,००,००० | ९५-९६ |
| ३४) | समाज मंदिर, आशिर्वादनगर, श्रीरामपूर | श्रीरामपूर | ४०,००० | ९५-९६ |
| ३५) | कोळपेवाडी उर्दु प्राथमिक शाळा, इमारत | कोळपेवाडी | ५०,००० | ९५-९६ |
| ३६) | वृद्ध-अपंग निवास कोल्हार बु. ।। | कोल्हार | ५०,००० | ९५-९६ |

(स्मरणिका - प्रयत्नांच्या पाऊलखुणा - १९९६ [७४])

### ३. सांस्कृतिक भवन, स्मशानभूमी, प्रवासी थांबा -

खासदार निधीतून शंकरराव काळे यांनी कोपरगाव मतदार संघातल्या वेगवेगळ्या गावांमध्ये सांस्कृतिक भवन, स्मशानभूमी, प्रवासी थांबे यांसाठी मदत मिळवून दिली. मतदारसंघात एकूण सहा लाख रूपयांची मदत या स्वरूपत कामांना त्यांनी उपलब्ध करून दिली. कोपरगाव, राहुरी, पारनेर या परिसरात अशा स्वरूपाची मदत करण्यात आली.[७५]

| अ. नं. | कामाचे नांव | स्थळ | मंजूर रक्कम रू. लाखात | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | वाडेगव्हाण, ता. पारनेर स्मशानभूमीसाठी | वाडेगव्हाण | ०.५० | ९३–९४ |
| २) | माहेगांव देशमुख एस.टी. प्रवासी थांबा | माहेगांव देश | ०.३० | ९४–९५ |
| ३) | जवळके एस.टी. प्रवासी थांबा | जवळके | ०.३० | ९४–९५ |
| ४) | स्मशानभूमी शेड, कुकुडवेढे, ता. राहुरी | कुकुडवेढे | ०.५२ | ९४–९५ |
| ५) | स्मशानभूमी शेड, गणपतीघाट, ता. राहुरी | राहुरी | १.०० | ९४–९५ |
| ६) | स्मशानभूमी शेड, येवले–आखाडा, ता.राहुरी | राहुरी | १.०० | ९४–९५ |
| ७) | स्मशानभूमी शेड, जोगेश्वर आखाडा, राहुरी | राहुरी | १.०० | ९४–९५ |
| ८) | चांदेकसारे एस.टी. प्रवासी थांबा | चांदेकसारे | ०.३० | ९४–९५ |
| ९) | मढी बु. एस.टी. प्रवासी थांबा | मढी बु. | ०.५० | ९५–९६ |
| १०) | राहुरी कॉलेजवळ नगर मनमाड रस्त्याच्या कडेस एस.टी. प्रवासी थांबा | राहुरी कॉलेज | १.२७ | ९५–९६ |
| ११) | कन्नड स्मशानभूमी बांधकाम | कन्नड (राहुरी) | १.०० | ९५–९६ |
| १२) | जिल्हा परिषद ग्रामीण रूग्णालयाजवळ वांबोरी धर्मशाळा | वांबोरी (राहुरी) | ३.०० | ९५–९६ |

(स्मरणिका – प्रयत्नांच्या पाऊलखुणा – १९९६)

**४. पिण्याच्या पाण्याच्या योजना –**

शंकरराव काळे यांनी कोपरगाव मतदारसंघातील गावांमध्ये खासदार निधीतून पिण्याच्या पाण्याची टंचाई येऊ नये म्हणून नळ पाणीपुरवठा योजना मोठ्या प्रमाणावर राबवल्या. मतदार संघातल्या पाचही तालुक्यात या योजनांची गरज होती. कोपरगाव मतदार संघात दोन विभाग पडतात. एका विभागात जिरायती शेती आणि पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारा भाग येतो. दुसऱ्या विभागात बागायती शेती केली जात असे. पाण्याची टंचाई मुख्यतः जिरायती भागात निर्माण व्हायची. या भागात उन्हाळ्यात पिण्यासाठीच्या पाण्याची उणीव भासायची. काळे यांनी या जिरायती परिसरात पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी नळ पाणीपुरवठा योजना खासदार–निधीच्या पैशातून

पूर्ण केल्या. १९९३–९६ या काळात त्यांनी ११ पाणी पुरवठ्याच्या नळ योजना जवळ जवळ १२ लाख रूपये खर्च करून पूर्ण केल्या. यामुळे त्या–त्या गावात पिण्याच्या पाण्याची मोठी सोय झाली. या नळ पाणीपुरवठा योजनांमध्ये पाण्याची टाकी बांधणे, नळ योजनेचा विस्तार करणे, पाण्यासाठी हेड टँक बांधणे, पाण्याची पाईप लाईन टाकणे, वाढीव पाईप लाईन टाकणे अशा कामांचा समावेश होता.[७६]

| अ. नं. | कामाचे नांव | मंजूर रक्कम रू. लाखात | वर्ष |
|---|---|---|---|
| १) | लाडगांव, ता. श्रीरामपूर पाणीपुरवठा योजना | ०.१६ | ९३–९४ |
| २) | वाघाचा आखाडा विस्तारीत नळ पाणीपुरवठा, राहुरी | १.०० | ९४–९५ |
| ३) | रामकृष्णनगर सिरसगांव नळ पाणीपुरवठा योजना | १.०० | ९४–९५ |
| ४) | कारवाडी पिण्याच्या पाण्यासाठी हेड टँक बांधणे | २.०० | ९५–९६ |
| ५) | मोत्याची वाडी राहुरी नळ पाणीपुरवठा | २.९९ | ९५–९६ |
| ६) | मालुंजे पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे | १.२२ | ९५–९६ |
| ७) | कन्नड, ता. राहुरी पिण्याच्या पाण्याची योजना | १.०५ | ९५–९६ |
| ८) | वळण येथे पिण्याच्या पाण्याची योजना | १.०५ | ९५–९६ |
| ९) | अतिथी हौसिंग सोसायटी, श्रीरामपूर पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे | १.०० | ९५–९६ |
| १०) | शिंगवे येथील वाढीव पाईप लाईन | १.०० | ९५–९६ |
| ११) | रूई येथील वाबळे वस्तीवर पाणीपुरवठा | १.०० | ९५–९६ |

**५. पाझर तलाव, दगडी साठवण बंधारे, के.टी. वेअर्स यांची निर्मीती –**

कोपरगाव लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करत असताना या परिसरातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न शंकरराव काळे यांना चांगलाच माहित होता. या परिसरातील शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून त्यांनी मतदार संघात भाळवणी, ता. पारनेर येथे दहा लाख रूपये खर्च करून १९९५–९६ या साली एक. के. टी. वेअर बांधला. त्याचप्रमाणे कवठे धांदरफळ, खांडगांव, जवळके, नाटेगांव, देर्डे–कोऱ्हाळे या गावांमध्ये दगडी साठवण बंधारे बांधले. १९९५–९६ या काळात ही कामे पूर्ण झाली. या कामासाठी जवळ जवळ २३ लाख रूपये खर्च केला गेला. धामोरी येथील गोई नदीवर दहा लाख रूपये खर्च करून वसंत बंधारा बांधण्यात आला. १९९५–९६ या एकाच वर्षात हा बंधारा बांधण्यात आला होता.[७७]

दगडी साठवण बंधारे/पाझर तलाव/के. टी. वेअर्स या योजनांमुळे आज हजारो एकर जमीन त्या परिसरातील जलसिंचनाखाली आली आहे. पारनेर तालुक्यातील भाळवणी या दुष्काळी गावात के. टी. वेअर्समुळे वर्षभर शेतीला पाणी मिळण्याची सोय झाली. अशा पद्धतीने कवठे धांदरफळ, खांडगांव या संगमनेर तालुक्यातल्या गावातही शेतकऱ्यांना दगडी साठवण बंधाऱ्यामुळे पाणी उपलब्ध होऊ लागले. धामोरी, ता. कोपरगांव या गावात तर त्यांनी दहा लाख रूपये खर्च करून त्या काळातली सर्वात मोठी योजना त्या परिसरात राबवली. या गावात गोई नदीचे पाणी वाहून जात असे. हे वाहत जाणारे पाणी अडवल्याने त्या परिसरातल्या शेतकऱ्यांना त्याचा आज लाभ होत आहे.

| अ. नं. | कामाचे नांव | मंजूर रक्कम रू. लाखात | वर्ष |
|---|---|---|---|
| १) | कवठे धांरदफळ दगडी साठवण बंधारा बांधणी | ५.०० | ९४–९५ |
| २) | खांडगांव दगडी साठवण बंधारा बांधणे | ५.०० | ९४–९५ |
| ३) | भाळवणी के. टी. वेअर बांधण्यासाठी | ५.०० | ९४–९५ |
| ४) | जवळके येथील दगडी साठवण बंधारा बांधणे | ६.०० | ९५–९६ |
| ५) | नाटेगांव दगडी साठवण बंधारा बांधणे | २.०० | ९५–९६ |
| ६) | देर्डे–कोऱ्हाळे दगडी साठवण बंधारा बांधणे | ५.०० | ९५–९६ |
| ७) | धामोरी येथील गोई नदीवर वसंत बंधारा बांधणे | १०.०० | ९५–९६ |
| ८) | भाळवणी (ता. पारनेर) के. टी. वेअर बांधणे | ५.०० | ९५–९६ |

(स्मरणिका – प्रयत्नांच्या पाऊलखुणा – १९९६)

**६. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्णांना मदत –**

शंकरराव काळे यांनी मतदार संघातल्या रूग्णांना जवळजवळ दोन कोटी रूपयांची मदत पंतप्रधान राष्ट्रीय सहाय्यता निधीतून मिळवून दिली. ही मदत हृदय शस्त्रक्रिया, औषधोपचार, कॅन्सर, किडनीरोपण या स्वरूपाच्या रूग्णांना दिली गेली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातल्या रूग्णांना या मदतींचा विशेष उपयोग झाला. काळे यांनी या बाबतीत पूर्वीच्या लोकप्रतिनिधींचे मदतीचे सर्व आकडे कमी ठरवले आहे.[७८]

**७. निळवंडे धरण भूसंपादन–पुनर्वसन समितीचे अध्यक्ष**

शंकरराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६–५–१९८६ रोजी महाराष्ट्र सरकारने निळवंडे धरणाच्या भूसंपादन व पुनर्वसन याचा विचार करण्यासाठी निळवंडे धरण भूपसंपादन व पुनर्वसन समिती नेमली. या समितीला 'काळे समिती' असेही म्हणतात.[७९] प्रवरा नदीवर निळवंडे, ता. अकोले, जि. अहमदनगर येथे जे धरण नियोजित आहे. त्या

निळवंडे धरणाच्या अडचणींच्या संदर्भात ही समिती सरकारला अहवाल–शिफारशी सादर करणार होती. या समितीच्या एकूण सहा बैठका झाल्या. समितीने निळवंडे धरण क्षेत्रातल्या अकोले, संगमनेर, लोणी या ठिकाणी लाभधारक खातेदारांच्या बैठका घेतल्या. बैठकांमध्ये काळे यांनी निळवंडे धरणाने विस्थापित होणाऱ्यांची जबाबदारी सरकार, समाज व लाभ क्षेत्रातील शेतकरी या सर्वांनी घेण्याची गरज आहे अशी भूमिका घेतली. निळवंडे धरण लाभ क्षेत्रातील ज्या खातेदारांच्या जमिनी त्या कायद्याखाली मागितल्या जातील त्यांना त्या स्वखुशीने कसलाही कोर्ट कचेरीचा आधार न घेता शासनाला उपलब्ध करून द्याव्यात. विस्थापितांचा प्रश्न केवळ कायद्याने सुटणार नाही. त्यासाठी व्यवहार व माणुसकीचा दृष्टीकोन हवा. अशा स्वरूपात प्रतिपादन त्यांनी केले होते. धरणग्रस्तांच्या प्रश्नावर धोरण ठरवताना 'आधी पुनर्वसन, नंतर धरण' अशीच भूमिका खासदार असतानाही त्यांनी घेतली होती. एकंदरच विस्थापितांच्या पुनर्वसनासंदर्भात खासदार असताना काळे समितीने सरकारला महत्वाच्या सूचना केल्या. वास्तविक निळवंडे धरणामुळे विस्थापित धरणग्रस्त कोपरगाव लोकसभा मतदार संघात येत नाहीत. तरीही या धरणग्रस्तांच्या संदर्भात अहमदनगर जिल्ह्यातल्या इतर नेत्यांपेक्षा त्यांची भूमिका ही जास्त सामाजिक न्यायाची होती. विस्थापितांना जमिनीला जमीन देण्याची भूमिका घेऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे, अशी मागणी करणारेही ते एक नेते होते. लाभक्षेत्रातील उपलब्ध जमिनी विस्थापितांना दाखवून त्यांच्या पसंतीप्रमाणे दिली जावी अशी सूचनाही त्यांनी सरकारला केली. त्यांनी धरणग्रस्तांच्या संदर्भात ज्या सूचना केल्या त्यात पुढील सूचनांचा समावेश होता.

सर्व प्रकल्पग्रस्तांना एकाच वेळी उठवून धरणाचे काम सुरू करणे व्यवहार्य होणार नाही. पुनर्वसनाचा एक व्यवस्थित कालबद्ध आराखडा तयार करून, सबंधितांशी चर्चा करून, प्रत्यक्ष कारवाई करावी. विस्थापित कुटुंबांचे दहा–पंधरा असे गट करून एका गावात–एका गटाला वसवण्याचा प्रयत्न केला. तर विस्थापितांना एक मानसिक आधार राहील. त्या गावात राहताना त्यांना सुरक्षितताही वाटेल. निळवंडे धरणातील विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी जी जमीन १–४–१९८६ राजी दिली गेली ती इतर कामांसाठी वापरू नये.[८०] अशा प्रकारे  काळे यांनी धरणग्रस्तांना; न्याय मिळेल अशी राजकीय भूमिका तर घेतलीच परंतु सरकारकडे सूचनाही केल्या. या समितीचा अहवाल शंकरराव काळे यांनी खासदार असताना महाराष्ट्र सरकारला सादर केला होता.

शंकरराव काळे यांनी आपल्या मतदार संघाच्या संदर्भात वेगवेगळ्या सामाजिक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. काम

करताना लोकांच्या ज्या प्रश्नांची तीव्रता अधिक तो प्रश्न त्यांनी अग्रक्रमाने सोडवला. सरकारी यंत्रणेशी मैत्री, सामान्य कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष कामात सहभागी करून घेणे, त्यांना विश्वास देणे आणि स्वतः एक सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भूमिकेतून काम करणे हे काळे यांचे महत्वाचे वैशिष्टय ठरले, कोपरगाव मतदार संघातल्या इतर खासदारांपेक्षा त्यांनी स्वतःचा वेगळा ठसा उमटवला होता.

**६.८ धार्मिक क्षेत्रातील सहभाग**

शंकरराव काळे यांचे वडील कै. देवरामबाबा काळे हे खेडले ता. निफाड, जि. नाशिक येथील ह. भ.प. तुकाराम बाबा खेडलेकर यांचे परमभक्त व शिष्य होते. ह. भ.प. तुकाराम बाबांचे वास्तव्य काही दिवस काळे यांच्या माहेगांव येथील घरी असायचे. त्यावेळी शंकरराव काळे कॉलेजमध्ये शिकत होते. या वयातच परमेश्वराबद्दल काळे यांच्या मनात श्रद्धा निर्माण झाली होती. खेडले या ठिकाणी ह.भ.प. तुकाराम बाबांचा आश्रम आहे. वडिलांबरोबर ते खेडल्याला दर्शनासाठी जात असत. त्यामुळेच त्यांच्या मनावर धार्मिकपणाबद्दलची आस्था निर्माण झाली होती. वेळोवेळी कार्यक्रमाच्या निमित्ताने ह.भ.प. तुकाराम महाराज खेडलेकर हे त्यांच्या घरी येत असत.[८१]

**१. श्री. हनुमानदेव संस्थान –**

तुकाराम बाबांच्या प्रेरणेने देवराम बाबांनी काळे वस्तीवर एक भव्य असे श्री हनुमानाचे मंदिर बांधलेले आहे. या मंदिरातील मूर्तीची प्राण प्रतिष्ठा शंकरराव काळे व सौ. सुशिलामाई काळे यांच्या हस्ते झालेले आहे. याबाबत सांगताना शंकरराव काळे म्हणतात की, 'या मंदिराच्या मूर्ती आणण्याकरिता मी व माझे वडील देवरामबाबा विमानाने राजस्थानातील जयपूर येथे गेलो होतो, मुंबईला आलो व विमानतळावर व परिसरात लोक आमच्याकडे पहायचे. माझ्या वडिलांचा पेहराव धोतर, सदरा व पागोटे व पायात पायतान आणि डोक्यात पगडी असा होता. विमानातील लोक आमच्याकडे मोठ्या कुतूहलाने पहायचे. त्यांनाही आश्चर्य वाटायचे.' काळे वस्तीवरील या देवस्थानचे धर्मदाय आयुक्तांकडे रजिस्ट्रेशन करून श्री हनुमान देव देवरामबाबा काळे संस्थान असे नामकरण केलेले आहे. या देवस्थानाला काळे यांनी १२ एकर जमीन दिली आहे. दरवर्षाला या जमिनीच्या खंडाच्या माध्यमातून देवस्थानला १५,००० रूपयांचे उत्पन्न मिळते. त्याप्रमाणे देवस्थानच्या जागेत २०–२५ खोल्या राहण्याकरीता बांधलेल्या आहेत. या खोल्यांच्या माध्यमातून भाड्याचे वर्षाला जवळ जवळ ६ ते ७ हजार उत्पन्न मिळते. त्याचप्रमाणे श्री हनुमानदेव देवराम बाबा काळे संस्थानच्या नावाने बँकेत १,२५,००० चे फिक्स डिपॉझिट

केलेले आहे. त्याचेही व्याज दर वर्षाला देवस्थानच्या खात्यावर जमा होते. अशा तऱ्हेने मिळणाऱ्या खंडाच्या व व्याजाच्या रकमेतून देवस्थानचा खर्च भागविला जातो. हा ट्रस्ट काळे कुटूबियांच्या पुरता मर्यादित केलेला आहे. त्यांचीच चार मुले व त्यांची येणारी पुढची पिढी या ट्रस्टचे ट्रस्टी राहतील असा ट्रस्टडीड मध्ये उल्लेख केलेला आहे. श्री. काळे या ट्रस्टचे कायम चेअरमन होते. आता त्यांचे नातु आशुतोष काळे चेअरमन आहेत. श्री हुनमान जयंतीच्या कार्यक्रमासाठी खेडलेझुंगे येथील ह.भ.प. काशिनाथ महाराज खराटे येत असतात. तसेच त्यांचे शिष्य ह.भ.प. विठ्ठल महाराज वक्ते हे सुद्धा श्री हनुमान जयंतीच्या दिवशी पहाटेच्या काकड आरती कार्यक्रमाला हजर राहतात. अशा प्रकारे काळे यांनी हनुमान मंदिराची पुष्कळ प्रगती केलेली आहे. या मंदिरभोवती वाल कंपाऊंडचे काम केलेले आहे. श्री हनुमान मंदिर व परिसराची स्वच्छता व निगा चांगल्या तऱ्हेने राखली जाते.[८२]

## २. श्री दत्त मंदिर देवस्थान ट्रस्ट –

शंकरराव काळे यांच्या माहेगाव देशमुख या गावी गोदावरी नदीच्या काठी श्री दत्त मंदिर आहे. गवळीबाबा व ब्रम्हचारी महाराज या दोन सत्पुरूषांनी या मंदिराची उभारणी केली आहे. हे मंदिर गोदावरी नदीकाठी असल्याने त्याला विशेष महत्व आहे. माहेगाव देशमुखचे वैभव असलेल्या या श्री दत्त देवस्थानचे चेअरमन स्वतः शंकरराव काळे होते. त्यांनी भाविक भक्तांची गोदावरी नदीत स्नान करण्याची व्यवस्था म्हणून गोदावरी नदीकाठी दहा लाख रूपये खर्च करून महाराष्ट्र शासनाच्या यशवंत ग्रामसमृद्धी योजने अंतर्गत कोपरगाव पंचायत समितीच्या माध्यमातून चांगला घाट बांधलेला आहे. त्यांचे बंधू कै. गोविंदराव देवराम काळे यांनी ट्रस्टला जमीन मिळवून दिली आहे. आज या जमिनीच्या खंडाच्या माध्यमातून वर्षाला पन्नास हजार रूपयांचा खंड या ट्रस्टला मिळतो.[८३]

## ३. श्री अमृतेश्वर महादेव मंदिर संस्थान –

माहेगांव देशमुखच्या उत्तरेला पुरातन हेमापंथीय महादेवाचे मंदिर होते. हे मंदिर पूर्णपणे पडलेले होते. मंदिर म्हणून त्या ठिकाणी काहीही राहिलेले नव्हते. तेथे फक्त महादेवाची पिंड होती. या पिंडीला कोणतेही संरक्षण नव्हते. माहेगांव देशमुख या गावी सन १९८१–८२ मध्ये राष्ट्रसंत श्री संत जनार्दन स्वामी महाराज हयात असताना प्रवचनासाठी आले होते, त्यावेळी त्यांनी माहेगांव देशमुख येथील श्री महादेव मंदिराचा जिर्णोध्दार करावा अशी सूचना केली. त्याचप्रमाणे गावातील काही शिवभक्त व जनार्दन

स्वामींच्या भक्तांनी पुढाकार घेऊन शंकरराव काळे यांच्यासमोर श्री महादेव मंदिर बांधण्याचा प्रस्ताव मांडला. या भक्तांच्या भावनांचा आदर करून काळे यांनी ग्रामसभा आयोजित करून या प्रस्तावाला ग्रामस्थांची एकमुखाने मान्यता घेतली. त्यानंतर भग्न मुर्तीची शांतीपूजा करणे, मंदिर बांधकामाचा शुभमुर्हूत ठरविणे यासाठी नाशिक येथील वेद शास्त्रज्ञांशी संपर्क साधून दिनांक २० ऑक्टोबर १९९७ रोजी भग्न मूर्तींची विधिपूर्वक शांतीपूजा करण्यात आली व त्या गोदावरी नदीत समर्पित करण्यात आल्या. त्यानंतर दिनांक १ नाव्हेंबर १९९७ रोजी विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर परमपुज्य रमेशगिरी महाराज यांच्या शुभहस्ते मंदिर बांधकामाचा शुभारंभ विधीपूर्वक करण्यात आला. सर्वानुमते या ट्रस्टला श्री संत सद्‌गुरू जनार्दन स्वामी (मौनगिरी) महाराज श्री अमृतेश्वर महादेव मंदिर संस्थान माहेगांव देशमुख, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर असे नाव देण्यात आले. या संस्थांनची चॅरिटी कमिशनरकडे नोंदणी करण्यात आलेली असून रजिस्ट्रेशन नंबर ए–११४५ दिनांक ४ मे २००१ याप्रमाणे आहे. [८४]

ग्रामस्थांनी या मंदिर उभारण्याकामी सहकार्य करण्याचे ठरविल्यामुळे कामाला गती मिळाली. देणगी रूपाने बरेच पैसे गोळा झाले. मंदिराचे प्लॅन इस्टीमेट करण्यात आले. त्याप्रमाणे माहेगांवच्या उत्तरेला गोदावरी नदी काठी एक चांगले भव्य मंदिर अल्पावधित उभे राहिले. या मंदिराच्या बांधकामासाठी जवळ–जवळ तीस लाख रूपये खर्च झालेला आहे. या मंदिरामध्ये परम आराध्य दैवत भगवान शिवशंकर, पार्वती माता, गणपती व नंदिकेश्वर या देवतांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा व पूर्णाहूती सोहळा धर्मसम्राट विश्ववंद्य जगत्‌गुरू शंकराचार्य, परमपुज्य वासुदेवानंद सरस्वती महाराज, ज्योतिष पिठाधीश्वर बद्रिनाथ व अलाहाबाद यांचे शुभहस्ते रविवार दिनांक २ जानेवारी २००५ ते बुधवार दिनांक ५ जानेवारी २००५ रोजी संपन्न झाला. यावेळी अनेक साधू संत महात्मे उपस्थित होते. [८५]

**४. श्री अंबाबाई देवी जिर्णोध्दार समितीस मार्गदर्शन व मदत –**

कोपरगाव तालुक्यातील मायगावदेवी येथे गोदावरी नदी काठावर श्री. देवी अंबाबाईचे अतिप्राचीन सन १२२७ च्या पूर्वीचे मंदिर होते. हे मंदिर वेळोवेळी गोदावरी नदीच्या पुरामुळे वाहून गेल्याने साधारण १२० वर्षापूर्वी साध्या बांधकामात मंदिर उभारले होते. हे मंदिर भाविकांच्या दृष्टीने लहान होते, सभामंडप लहान होता. मंदिर मोडकळीस आलेले होते. मंदिराच्या भिंती व छत जीर्ण झाले होते. त्यामुळे मंदिराला धोका निर्माण झाला होता. अशा परिस्थितीत या मंदिराचा जीर्णोध्दार होणे गरजेचे आहे, या विचाराने

मायगाव देवी गावातील ग्रामस्थ व मंदिराचे पुजारी यांनी एकत्र येऊन बैठक घेतली व मंदिराचा जिर्णोध्दार करण्याचे ठरविले. मंदिर जिर्णोध्दार करण्याच्या दृष्टीने श्री अंबाबाई जिर्णोध्दार समिती, मायगांव देवी या नावाने बँकेत खाते उघडले. मान. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडून जीर्णोद्धार समितीने वर्गणी गोळा करण्यास तसेच मंदिर जिर्णोद्धार कामासाठी परवानगी घेतली. मात्र निधी जमवूनही तीन चार वर्षे मायगांवदेवी येथील ग्रामस्थ व श्री. देवीचे पुजारी यांच्यात मतभेदत निर्माण झाले. त्यामुळे काही काळ मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम थांबले. ग्रामस्थ व पुजारी यांच्यातील मतभेद फारच विकोपाला गेल्यामुळे मायगावदेवीची काही बुजूर्ग मंडळी प्रातानिधीक स्वरूपात शंकरराव काळे यांना येऊन भेटली. या प्रतिनिधींसमवेत त्यांनी तीन–चार बैठका घेतल्या. ग्रामस्थ व पुजारी यांच्यात मध्यस्थी करून श्री देवी अंबाबाई जिर्णोद्धाराचे काम पूर्ण करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. जिर्णोद्धार समितीला मार्गदर्शन केले तसेच मंदिर बांधकामासाठी स्वतः भरीव अशी आर्थिक मदत दिली. त्यांच्या या प्रयत्नाला यश आले असून हे मंदिर पुर्णत्वास आले आहे. मायगाव देवी येथील श्रीकृष्ण गाडे हे या ट्रस्टचे अध्यक्ष आहेत. पुजारी व ग्रामस्थ यांना या ट्रस्टवर घेतले आहे. शंकरराव काळे यांचे पी.ए. श्री. के. एस. डघळे हे समितीवर ऑननरी सेक्रेटरी म्हणून नेमलेले आहेत. [८६]

या मंदिर बांधकामासाठी एकूण तीस लाख रूपये खर्च आला आहे. दैवतशास्त्र व वास्तुशास्त्राचा आधार घेऊन एक भव्य व वैभवशाली सुंदर नक्षीकामात अप्रतिम असे मंदिर उभारले आहे. या मंदिराचा गाभारा १८ × १८ व सभामंडप ४५ × ४५ फुट आहे. या मंदिराला दोन कळस असून चार उपकळस आहेत. मुख्य महाद्वार, मोठे दरवाजे तीन आहेत, उपदरवाजे पाच आहेत, एकंदर खिडक्या वीस आहेत. मंदिराच्या कळसाची उंची ५१ फूट इतकी आहे. [८७]

**५. संतवन ट्रस्टला मदत –**

शंकरराव काळे यांची धर्मपत्नी कै. सौ. सुशिलामाई शंकरराव काळे यांनी ह.भ.प. काशिनाथ महाराज खराटेंना गुरू केलेले आहे. त्यामुळे खेडले येथील संतवन या ट्रस्टच्या सदस्यपदी सुशिलामाईंना घेतले होते. स्वर्गीय सुशिलामाईंनी संतवनच्या भक्त निवाससाठी पन्नास हजार रूपये मदत स्वरूपात दिले होते. कै. सुशिलामाईंच्या निधनानंतर संतवनने श्री. काळे यांना ट्रस्टी केले होते. पंढरपूर येथे क्षेत्र खेडलेझुंगे येथील ह. भ.प. काशिनाथ महाराज यांनी वैकुंठवासी ह.भ.प. तुकाराम बाबा खेडलेकर यांच्या नावाने एक आश्रम काढला आहे. काळे यांनी या आश्रमाच्या ठिकाणी जाऊन भेट दिली. तसेच

आश्रमाच्या बांधकामासाठी एक लाख रूपयांची आर्थिक देणगीही दिली आहे. तसेच संतवन ट्रस्टच्या प्रत्येक कार्यात वेळोवेळी सहभागी होत असत.[८८]

याशिवाय कोपरगाव येथे श्री साईबाबा तपोभूमी मंदिराची उभारणी करण्यामध्ये त्यांनी पुढाकार घेऊन भव्य अशी श्री साईबाबांची मूर्ती त्या ठिकाणी स्थापन केली आहे. तसेच कारखाना कार्यस्थळावरील भव्य विष्णू मंदिरांची उभारणी त्यांच्या नेतृत्वाखाली झाली आहे. कागद कारखाना स्थळावर श्री दत्त मंदिर उभारले आहे. तसेच परिसरातील विविध गावांच्या मंदिर बांधकामासाठी सतत भरघोस मदत ते देत असायचे. 'सर्व धर्म समभाव' या न्यायाने त्यांनी कोपरगाव, श्रीरामपूर व कोळपेवाडी येथील मुस्लिम बांधवांनाही मशिद उभारणीसाठी मोठी आर्थिक देणगी दिलेली आहे.[८९]

अशा प्रकारे शंकरराव काळे यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष, आमदार, मंत्री, खासदार तसेच इतर अनेक पदांच्या माध्यमातून केवळ कोपरगावतच नव्हे तर संपूर्ण अहमदनगर जिल्ह्यात सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात अत्यंत महत्वाचे योगदान दिलेले आहे.

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | वार्षिक अहवाल | : | दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, प्रकाशक, चेअरमन कोसाका – १९८२–८३, पृ.४ |
| २) | कित्ता | : | पृ. ५ |
| ३) | कित्ता | : | पृ. ७ |
| ४) | वार्षिक अहवाल | : | दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, प्रकाशक, चेअरमन कोसाका – २००२–०३, पृ.९ |
| ५) | कित्ता | : | पृ. ७ |
| ६) | कित्ता | : | पृ. ८ |
| ७) | सुहास कुलकर्णी | : | विकाससूर्य, युनिक फीचर्स, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे – २००१, पृ. १०७ |
| ८) | शासकीय दस्तऐवज | : | माहिती व जनसंपर्क महासंचलनालय प्रकाशित, महाराष्ट्र शासन –१९७२, सचिवालय, मुंबई – १९७३, पृ. ९३ |
| ९) | संजीव कोद्रे | : | असे होते कोपरगाव, चक्रपाणी प्रिंटर्स, बाजारतळ, कोपरगाव – २०१४, पृ. १६५ |
| १०) | कित्ता | : | पृ. १७० |
| ११) | Gazetters of India, | | Ahmednagar District ( Revised Edition) Published by Gazetteers Department of Maharashtra, Bombay-1976, Pg. 131 |
| १२) | कित्ता | : | पृ. १३३ |
| १३) | कित्ता | : | पृ. १३४ |
| १४) | शंकरराव काळे | : | अंतरलेले पाणी, प्रकाशक, अध्यक्ष गोदावरी कालवा पाणी वाटप संघर्ष समिती, कोपरगांव – १९९२, पृ. ३१ |
| १५) | शासकीय दस्तऐवज | : | महाराष्ट्र राज्य पाटबंधारे मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय – १९७७, पृ. १६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १६) | कित्ता | : | पृ. १८ |
| १७) | शंकरराव काळे | : | उपरोक्त, पृ. ३२ |
| १८) | शासकीय दस्तऐवज | : | महाराष्ट्र राज्य पाटबंधारे विभाग, नाशिक विभागीय कार्यालय, नाशिक – १९८५, पृ. ८ |
| १९) | कित्ता | : | पृ. ६७ |
| २०) | कित्ता | : | पृ. ९ |
| २१) | शंकरराव काळे | : | अंतरलेले पाणी, उपरोक्त, पृ. ११ |
| २२) | वृत्तपत्र | : | दै. लोकमत, अहमदनगर आवृत्ती, दि. १७–६–१९९२ |
| २३) | वृत्तपत्र | : | दै. लोकसत्ता, पुणे दिनांक १९–५–१९९२ |
| २४) | वृत्तपत्र | : | दै. सकाळ, अहमदनगर व पुणे आवृत्ती, दिनांक १९–५–१९९२ |
| २५) | वृत्तपत्र | : | दै. सार्वमत, अहमदनगर आवृत्ती, दिनांक १९–५–१९९२ |
| २६) | वृत्तपत्र | : | दै. महाराष्ट्र टाईम्स, मुंबई आवृत्ती, दिनांक २०–५–१९९२ |
| २७) | मुलाखत | : | शंकरराव काळे, दि ७ मे २०१२ |
| २८) | कार्यालयीन कागदपत्रे | : | लिगल विभाग, दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर – २०१३ |
| २९) | मुलाखत | : | छबुराव फक्कडराव आव्हाड, संचालक, कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, दि. ११ मे २०१२ |
| ३०) | कार्यालयीन कागदपत्रे | : | लिगल विभाग, दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर – २०१३ |
| ३१) | मुलाखत | : | श्री. जगन्नाथ शंकर वारूळे, मु. पो. कुंभारी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर दि. १२ मे २०१२ |
| ३२) | कित्ता | : | |
| ३३) | कार्यालयीन कागदपत्रे | : | लिगल विभाग, दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर – २०१३ |
| ३४) | कित्ता | : | |
| ३५) | वार्षिक अहवाल | : | दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर प्रकाशक चेअरमन, कोसाका – १९९४–९५, पृ. ६ |

३६) कित्ता : पृ. ७

३७) कित्ता : पृ. ८

३८) कित्ता : पृ. ९

३९) वार्षिक अहवाल : दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर प्रकाशक चेअरमन, कोसाका – १९९७–९८, पृ. ५

४०) कित्ता : पृ. ६

४१) स्मरणिका : कोसाका उद्योग समुहाची वाटचाल, प्रकाशक, चेअरमन कोसाका गौतमनगर, १९९७–९८, पृ. ११

४२) कित्ता : पृ. १२

४३) कित्ता : पृ. १३

४४) व्ही.बी.पाटील : महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, के. सागर प्रकाशन, पुणे – २००८, पृ. ११

४५) व्ही.जी.नांदेडकर : पंचायतराज एक विश्लेषणात्मक परामर्श, के सागर प्रकाशन, पुणे, तिसरे आवृत्ती – २००८, पृ. ११०

४६) मनोज आवळे : पंचायतराज कार्य – कायदा – योजना, अनुबंध प्रकाशन, पुणे, २०००, पृ. २३

४७) ज्ञानेश्वर सोनवणे : समाज अभियंता, पद्मगंधा प्रकाशन, पुणे – २००८, पृ. १३४

४८) Government of Maharashtra : Gazetteers of India, Maharashtra State Ahmednagar District, Published by – Secretary Gazetteer Department of Maharashtra -1976, Pg. 83

४९) वार्षिक प्रशासन अहवाल : मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अहमदनगर (प्रकाशक) अहमदनगर जिल्हा परिषद – १९६७–६८, पृ. ६

५०) कित्ता : पृ. २६

५१) कित्ता : वार्षिक प्रशासन अहवाल– १९६९–७०, पृ. २३

५२) कित्ता : पृ. २४

५३) कित्ता : पृ. २५

५४) कित्ता : वार्षिक प्रशासन अहवाल, १९७१–१९७२, पृ. १६

५५) कित्ता : पृ. २१

५६) कित्ता : पृ. २३

५७) यशवंतराव गडाख : अर्धविराम, ऋतुरंग प्रकाशन, गोरेगांव (पूर्व), मुंबई – २००३, पृ. ७७

५८) ग. दि. देशमुख : ग्रामवेद, स्वातंत्र्योत्तर अहमदनगर जिल्ह्यातील राजकारण, प्रा. आवारी व्ही. डी., के. बी. रोहमारे स्मृतीग्रंथ, कोपरगांव – १९९८, पृ. १४९

५९) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग : पंचायत राज मूल्यमापन समितीचा अहवाल, मुंबई – १९७४

६०) डिबेटस्, महाराष्ट्र विधानसभा, कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन : व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई संचालक शासन मुद्रणलेखन सामग्री व प्रकाशन संचलनायलय, महाराष्ट्र शासन, मुंबई,मार्च १९७६, पृ. १६/४४

६१) कित्ता : एप्रिल १९७६, पृ. ९/३६

६२) कित्ता : १७ मार्च १९७६, पृ. १०/२१

६३) कित्ता : १२ मार्च १९७६, पृ. ३१/६

६४) कित्ता : ३२/१८

६५) डिबेटस्, महाराष्ट्र विधानसभा, कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन : व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक शासकीय मुद्रण महाराष्ट्र शासन, मुंबई – ४ डिसेंबर – १९७८, पृ. १८/७६

६६) कित्ता : बुधवार १४ जून १९७८, पृ. ३४/१४

६७) ज्ञानेश्वर सोनवणे : समाज अभियंता, उपरोक्त, पृ. १८२

६८) डिबेटस्, महाराष्ट्र विधानसभा, कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन : व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई संचालक शासन, मुद्रन लेखनसामग्री व प्रकाशन संचलनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई ऑगस्ट १९७९ पृ. २२/७३.

६९) कित्ता : पृ. २४/६३

७०) मानपत्र : पुणे विद्यापीठ, जीवन साधना गौरव, पुरस्कार – २००५

७१) Performance Bugget : Ministry of Civil Aviation and Tourism Government of India, New Delhi – 1994-95, Pg. 29.

७२) स्मरणिका : प्रयत्नांच्या पाऊलखुणा, शंकरराव काळे – १९९८, पृ. १६

७३) कित्ता : पृ. १९

७४) कित्ता : पृ. ३१,३२

७५) Debeates, Loksabha : 10th Loksabha ( English Version) Vol. XVII, Loksabha, Secretariat, New Delhi – 1993, Pg. 83

७६) स्मरणिका : प्रयत्नांच्या पाऊलखुणा, प्रकाशक – शंकरराव काळे – १९९६, पृ. २८

७७) कित्ता : पृ. २९

७८) Performance Bugget : Ministry of Health and Family welfare, Govt. of India, New Delhi – 1994-95, Pg. 103

७९) भाऊसाहेब थोरात : अमृतमंथन, अमेय प्रकाशन, पुणे – १९९८, पृ. २४

८०) स्मरणिका : संकल्पातून सिद्धीकडे, प्रकाशक – बाळीकाई बी.डी. – १९९८, पृ. १७

८१) मुलाखत : शंकरराव काळे, २४ जून १९१२

८२) कित्ता :

८३) कित्ता :

८४) कित्ता :

८५) कित्ता :

८६) बाळ ज. बोठे : कारभारी जिल्ह्याचे, सुसंस्कृत नेता, विशेष लेख (शंकरराव काळे) दै. पुणे सकाळ – दिनांक १२–५–२०१३

८७) मुलाखत : श्री. के. एस. डगळे, शंकरराव काळे यांचे स्वीय सहाय्यक गौतमनगर, २४ मे २०१३

८८) मुलाखत : श्री. बी.डी. बाळीकाई, शंकरराव काळे यांचे स्वीय सहाय्यक, गौतमनगर, दि. २४ मे २०१३

८९) मुलाखत : श्री. आशुतोष अशोकराव काळे, माहेगांव देशमुख ता. कोपरगाव, जि. अ.नगर, दि. २८ जून २०१३

# प्रकरण – ७

## निष्कर्ष

संशोधन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेद्वारे प्राप्त होणारे निष्कर्ष हे स्पष्टपणे मांडले जातात. म्हणजेच निष्कर्षाचे प्रकटीकरण केले जाते. निष्कर्ष हे वस्तुनिष्ठ असावेत आणि तितक्याच प्रामाणिकपणे त्या निष्कर्षांचे प्रकटीकरण होणे हे शास्त्राचे मूलभूत तत्व आहे. या तत्वाला अनुसरून ''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहासः विशेष संदर्भ – शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य'' या संशोधन विषयाचे निष्कर्ष मांडण्यात आलेले आहे.

जेव्हा संशोधन हे ऐतिहासिक दस्तऐवज, संदर्भ आणि माहितीच्या आधारे केले जाते, अशा संशोधन पद्धतीस ऐतिहासिक संशोधन पद्धती असे म्हणतात. ऐतिहासिक संशोधन पद्धत ही निरीक्षणावर अवलंबून असते. यामध्ये संशोधक हा वेगवेगळ्या घटनांचे आणि संदर्भ साहित्यांचे निरिक्षण करतो. संशोधनाची ही पद्धत इतिहास तज्ञ, मानसशास्त्रज्ञ, तत्वज्ञ, सामाजिक शास्त्रांज्ञाकडून अवलंबिली जाते. या पद्धतीद्वारे ऐतिहासिक घटनांच्या संदर्भात उपयुक्त माहिती प्राप्त होते. इतिहासाची पुनारावृत्ती होते या प्रेरणा घेऊन नवीन इतिहासाची निर्मिती व्हावी या उद्देशातून इतिहासाचे अध्ययन केले जाते. भूतकालीन घटनांच्या आधारे भविष्यकालीन अंदाज करता येत असल्याने संशोधनामध्ये या पद्धतीचे महत्व अनन्यसाधारण आहे, म्हणून प्रा. पी.व्ही. यंग यांनी ''The Historical Method is the induction of Principles through research into the past-social force and influences which have shaped the present '' अशी व्याख्या केली आहे.

ऐतिहासिक संशोधनाद्वारे समाजासाठी विविध आधार संदर्भ म्हणून उपलब्ध होतात. भूतकालीन जीवनविषयक मूल्य आणि सामाजिक मान्यतेचे निष्कर्ष कळण्यास मदत होते. भूतकालीन चुकांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरते. आपली ऐतिहासिक संस्कृती, विचार, वारसा कळण्यास ही पद्धत उपयुक्त ठरते.

इंग्रज इतिहासकार कार्लाईलच्या मते ''थोर व्यक्तींची चरित्रे आणि त्यांनी केलेली कामगिरी म्हणजेच इतिहास होय.'' या व्याख्येचा विचार करता अनेक थोर व्यक्तींच्या इतिहासातून समाजाला दिशा व प्रेरणा मिळत असते. शिक्षणक्षेत्रात क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या फ्रोबेल, मॉंटेसरी, जॉन ड्यूई, रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, विनोबा भावे, म. फुले, कर्मवीर भाऊराव पाटील इ. थोर व्यक्तींची

जीवनचरित्रे शैक्षणिक संस्थांच्या शिक्षणाचा विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

कार्लाईलच्या मते इतिहासात प्रतिभेला फार महत्व आहे. जमावाला नाही, कारण सर्वसामान्य माणूस कायमच्या रूळलेल्या मार्गानेच जातो. परंतु काही श्रेष्ठ व्यक्ती आपल्या प्रतिभेच्या जोरावर संपूर्ण समाजाची दिशाच बदलतात. राजकारणाबरोबर काही व्यक्ती शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक तसेच सहकाराच्या माध्यमातून समाजाची जडणघडण करीत असतात. त्यांच्या कार्यातून समाजाला प्रेरणा मिळते. तसेच समाजात परिवर्तन घडून येते. अहमदनगर जिल्हयाच्या सहकारी चळवळीच्या पार्श्वभूमीवर शंकरराव काळे यांचे नेतृत्व उदयास आले. शंकरराव काळे यांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व सहकार क्षेत्रातील कामगिरीमुळे बहुजन समाजात परिवर्तन घडून आले. त्यांच्या सामाजिक कार्यातून सहकार चळवळ उभी राहीली. त्यांचे चरित्र व कामगिरीमुळे नवसमाज निर्माण झाला. त्यांनी केलेल्या कामगिरीतून बहुजन समाजाला प्रेरणा मिळाली आहे.

**१. अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळीतून सामाजिक व आर्थिक परिवर्तन घडून आले.**

प्रस्तुत संशोधनात प्रामुख्याने सहकारी चळवळीचा इतिहास आणि मानवी जीवनाच्या विकासातील सहकारी चळवळीने केलेल्या ऐतिहासिक योगदानावर लक्ष केंद्रित केले आहे. संशोधनात प्रामुख्याने जगातील सहकार चळवळीची सुरूवात आणि चळवळीच्या विकासासाठी कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीच्या इतिहासाचा सुद्धा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळीची उत्क्रांती आणि सहकारी चळवळीने जिल्हयातील ग्रामीण जनतेच्या बहुविध विकासाच्या कामी जे योगदान दिले, त्यांचाही सुत्रबद्ध पद्धतीने इतिहास लिहीण्याचा प्रयत्न केला आहे. शास्त्रोक्त पद्धतीने संबंधित विषयावर अभ्यास केल्यानंतर सहकारी चळवळीने समाज जीवनाच्या परीवर्तनाच्या कामी उल्लेखनीय कामगिरी इतिहासात पार पाडली असे दिसते. सहकारी चळवळीने मानवी जीवनाच्या परिवतर्नाच्या कामी जे ऐतिहासिक योगदान केले आहे, ते एकमेवद्वितीय असल्याचे सापडते. संशोधनाच्या कामी जेव्हा कोपरगाव तालुक्यातील सहकारी चळवळीने केलेल्या योगदानाचा इतिहास अभ्यासणे सुरू झाले, त्यावेळी संशोधनाचा मुलभूत हेतू पुर्ण होत असल्याचे समाधान लाभले. परंतु त्याच वेळी जेंव्हा काही वयस्कर सुशिक्षित आणि अहमदनगर जिल्हयाच्या सहकारी चळवळीत

सुरूवातीपासून काम करणाऱ्या जाणकारांनी शंका उपस्थित केल्या, त्यावेळेस मात्र अवघड प्रसंगाला सामोरे जावे लागते. कारण त्यांनी उपस्थित केलेल्या शंका अनपेक्षित अशा स्वरूपाच्या तर होत्याच परंतु अनुभवावर आधारित कटू सत्येच्या निकषावर उतरणाऱ्या सुद्धा होत्या. त्यातील प्रमुख शंका म्हणजे सहकार चळवळीने समाजाच्या बहुविध विकासासाठी फार महत्वाचे काम केलेले असले तरी नंतरच्या काळात निर्माण झालेल्या नकळत स्वरूपाचा वर्ग कलह सुद्धा सहकाराचा इतिहास लिहीताना दुर्लक्षित करता येणे शक्य नाही.

दुसरा महत्त्वाचा प्रश्न सुद्धा विचार करण्यास प्रवृत्त करणारा होता आणि तो प्रश्न म्हणजे सहकारी चळवळीने ग्रामीण भागाच्या विकासासाठी जे योगदान दिले ते योगदान सधन क्षेत्रापुरतेच मर्यादित राहिल्याचा इतिहास सुद्धा दुर्लक्षुन चालणार नाही. या संदर्भात अभ्यास करताना असे दिसून आले कि ज्या भागात मोठ्या प्रमाणावर सरकारी प्रयत्नातून पाणी पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध झाल्या त्या भागात मोठ्या प्रमाणात सहकारी साखर कारखानदारी उभी राहिली. परिणामी सहकारी चळवळ श्रीमंत होऊन अनेक प्रकारच्या शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणा घडून आल्या. सहकारी साखर कारखानदारीच्या माध्यमातून अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागाचे परिवर्तन होत असताना सरकारी मदत आणि मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक मदतीचे स्थान अत्यंत महत्वाचे राहिले. परंतु दुर्देवाने सुरूवातीच्या काळातील अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळ एका विशिष्ट भागापुरतीच मर्यादित राहिल्याने आर्थिक मदतीचा ओघ सुद्धा या भागाकडे जास्तीत जास्त गेला. काळाच्या ओघात सहकारी चळवळ अत्यंत श्रीमंत झाल्याने आणि चळवळीत काम करणाऱ्या लोकांचा जनसंपर्क वाढल्याने त्यांना राजकीय अधिष्टान प्राप्त झाले. सहकारी चळवळीने उत्कृष्ट दर्जाचे राजकिय नेतृत्व निर्माण केले. परंतु श्रीमंत झालेल्या सहकारी चळवळीत केंव्हा प्रवेश केला हे इतिहासाच्या लक्षात सुध्दा आले नाही. परिणामी राजकारणातून आर्थिक सत्तेचे स्वामित्व आणि आर्थिक श्रीमंतीच्या सहाय्याने राजकारण अशा प्रकारचे दृष्टचक्र समाजजीवनाच्या इतिहासात सुरू झाले.

राजकारणात मिळालेले प्रभुत्व टिकविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे हा मानवी जीवनाचा स्थायीभाव असल्याने अहमदनगर जिल्हा त्याला अपवाद ठरणे शक्य नव्हते. यामधूनच जिल्ह्याचे राजकिय जीवन आणि सहकारी चळवळीत घराणेशाहीने नकळत प्रवेश केला. ज्या भागात सहकारी चळवळ फोफावली त्या भागात सुद्धा कौटूंबिक वारसा नसलेल्या हुशार लोकांना चळवळीच्या नेतृत्वावर प्रवेश करता आला

नाही आणि ज्या भागात शेती सधनतेच्या अभावी ग्रामीण सहकारी चळवळ फोफावू शकली नाही त्या भागातील समाजाला चळवळीच्या माध्यमातून सुधारीत झालेल्या समाजाकडून अस्पृश्यतेची वागणूक मिळाल्याचा इतिहास आणि वर्तमान सुद्धा मिळतो. सधन भागातील सहकारी चळवळीने लोकांच्यात नेतृत्व गुण विकसित केले परंतु राजकारणात आलेल्या या मंडळीना खुप स्पर्धा असल्याने स्वत:च्या भागात मतदार संघ सुद्धा कमी पडले. परंतु वेगवेगळ्या राजकीय पक्षात या लोकांचे वजन वाढलेले असल्याने त्यांना सहकारात प्रवेश मिळविण्यासाठी जिल्ह्याच्या मागासलेल्या भागातून उमेदवारी देऊन वेगवेगळी पदे बहाल करण्यात आली.

सुरूवातीच्या काळात सहकारी चळवळीच्या विकासासाठी सरकारी साहाय्य घेतलेल्या लोकांनी राजकारणातील सत्ता पदे मिळाल्यानंतर त्यांचा उपयोग चळवळीच्या विकासासाठी केला. परंतु त्यामधून पुन्हा एकदा सरकारी मदतीचा ओघ सधन भागाकडे अधिक वळला. संशोधनाच्या ओघात हे सर्व घटक लक्षात आल्यामुळे आवश्यक तेथे त्यांचा उल्लेख करणे जरूरीचे असल्यामुळे कटू अनुभव सुद्धा लिहिण्याचे टाळता आले नाही. परंतु यामुळे सहकारी चळवळीच्या यशाला मर्यादा येत नाहीत हे सुद्धा निश्चित.

वैकुंठलाल मेहता, डॉ. धनंजयराव रामचंद्र गाडगीळ, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इत्यादींनी राज्यातील सहकारी चळवळ दृढ पायावर उभी केली. इ. स. १९४८–४९ साली धनंजयराव गाडगीळ आणि विठ्ठलराव विखे पाटील या द्वयीने सहकारी तत्वार आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना उभा केला आणि महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्ह्यातील समाज जीवनाच्या परिवर्तनास सुरूवात झाली. शंकरराव काळे यांनी १९५३ साली माहेगांव देशमुख सहकारी सोसायटीच्या माध्यमातून आपल्या कार्यास सुरूवात केली होती. त्याचवेळी गणपतराव औताडे यांनी कोपरगाव साखर कारखान्याची संकल्पना मांडली व शंकरराव काळे यांनी ती प्रत्यक्षात आणून आशिया खंडातील दुसरा सहकारी साखर कारखाना उभा केला.

ब्रिटीशकालीन सरकारने केलेल्या पाणी पुरवठ्याच्या सुविधा आणि नंतरच्या काळात या सुधारणांचा वेग पुढे चालू राहिल्याने शेतीची उत्पादकता वाढून पीक पद्धतीत बदल झाल्याने सहकारी साखर कारखानदारीची चळवळ झपाट्याने फोफावली.

अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीने जिल्ह्याच्या बहुविध विकासाच्या कामी फार मोलाचे योगदान दिले. पूर्वीपासून दुष्काळाच्या सावटाखाली असणारा जिल्हा सहकारी चळवळीच्या माध्यमातून आमुलाग्र बदलला. सहकारी साखर

कारखानादारीमुळे झालेला विकास हा कोणा एका व्यक्तिचा किंवा व्यक्तिच्या गटाचा विकास नव्हता, तर तो आजूबाजूच्या सर्व परिसरासचा विकास होता.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले जाते. ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी शिक्षणाला अनन्य साधारण महत्व आहे. अहमदनगर जिल्ह्यात सहकारी चळवळीच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा अवतरली. जोडीला कर्मवीर अण्णांची रयत शिक्षण संस्था होतीच. श्रीमंत झालेल्या सहकारी चळवळीने रयत शिक्षण संस्थेला फार मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करून ग्रामीण भागात शैक्षणिक संस्थांचे जाळे निर्माण केले. सहकारी चळवळीमुळे देशाच्या महानगरांमध्ये उपलब्ध असणारी अपरंपरागत उच्च शिक्षणाची सुविधा जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सुरू झाली. यामध्ये प्रामुख्याने अभियांत्रिकी, तंत्रशिक्षण आणि आरोग्य शिक्षणाचा समावेश करावा लागेल. इंग्रजी माध्यमांचे शिक्षण सहकारी चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागात सुरू झाले.

शिक्षण आणि उद्योजकता यांना इतिहास काळापासून समाज परिवर्तनाचे निर्देशक मानले जाते आणि ते काम सहकारी चळवळीने करून दाखविल्याचा इतिहास सापडतो.

इ. स. १९१५ पर्यंत अहमदनगर जिल्ह्याचा इतिहास दुष्काळांनी भरल्याचा दिसतो. परंतु इ.स. १९२८ आणि नंतर १९३४ साली ब्रिटीश सरकारने कालव्याच्या माध्यमातून पाणी पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध केल्या. त्यामधून नंतरच्या काळात सहकारी साखर कारखानदारींने फार मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे करून पाणी पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध केल्या.

इ. स. १९४८ सालाच्या दरम्यान सुरू झालेली जिल्ह्यातील सहकारी साखर कारखानदारीची चळवळ विसाव्या शतकाच्या शेवटपर्यंत कार्यरत आणि विस्तारत असल्याचा अनुभव आहे.

सहकारी चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शैक्षणिक खाजगीकरणास सुरूवात झाली असे मान्य करावे लागेल. अनेक सहकारी संस्थांनी आणि साखर कारखान्यांनी खाजगी शैक्षणिक संस्था काढून ग्रामीण भागात शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. परंतु त्याचबरोबर अपरंपरागत तंत्र आणि आरोग्य शिक्षण ग्रामीण भागातील सर्वसामान्यांच्या कुवतीबाहेर गेले.

आदर्श जीवन पद्धती, त्यागाचा आधार आणि लोकशाही तत्वाज्ञानाचा भक्कम पाया असणाऱ्या सहकारी चळवळीने जागतिक समाज जीवनाच्या परिवर्तनात फार

मोठे योगदान केल्याचा इतिहास आहे. त्याचबरोबर काही अपप्रवृत्तींचा उदय सुद्धा टाळता आला नाही.

थोडक्यात असे सांगता येईल की, सहकारी चळवळीने काही अपवाद वगळता अहमदनगर जिल्ह्याची नेत्रदिपक सामाजिक आणि आर्थिक प्रगती घडवून आणली आहे.

**२. शंकरराव काळे यांचे जीवन ग्रामकेंद्रित होते.**

कोणतीही व्यक्ती असो त्या व्यक्तीवर परिस्थितीचा बराच प्रभाव पडत असतो. त्यामुळे त्याला परिस्थितीचे अपत्य असे म्हणतात. शंकरराव काळे यांच्यावर ग्रामीण जीवनाचा प्रभाव पडला होता. ग्रामीण भागात शेतकरी कुटूंबात जन्म व खेड्यातील वास्तव्य यामुळे त्यांचे जीवन ग्रामकेंद्रित बनले होते. बालपण आणि शैक्षणिक जीवन या कालखंडात त्यांनी आजुबाजूच्या समाजाची परिस्थिती जाणून स्वतःला समाजकार्यात झोकून दिले. बी. एस्सी. बी. ई. सिव्हील एवढे उच्च शिक्षण घेतले असले तरी नोकरी न करता अडाणी अशिक्षित व आर्थिक दृष्ट्या दुर्बल समाजाला दिशा देण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. अत्यंत साध्या पद्धतीने जुन्या कपड्यांवर मंदिरात विवाह करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला. यशवंतराव चव्हाणांच्या आग्रहास्तव काँग्रेसमध्ये प्रवेश करून सामाजिक कार्य केले. अहमदनगर जिल्हा परिषदेचे १९६१ साली अध्यक्ष म्हणून धुरा स्वीकारल्यानंतर संपूर्ण अहमदनगर जिल्ह्यात झपाटल्यासारखे काम केले. ग्रामीण विकासाचे महत्व ओळखून आपल्या जीवनात ग्रामीण विकासाला त्यांनी प्राधान्यक्रम दिलेला दिसतो. शासनानेही ग्रामीण विकासाला प्राधान्य द्यावे असे त्यांना वाटते. ग्रामीण विकास विषयक त्यांचा निश्चित असा दृष्टीकोन होता. खेडी सुधारली तर देश सुधारेल या महात्मा गांधीच्या मताशी ते पुर्णपणे सहमत होते. शेती हा ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय असला तरी केवळ शेती विकासावरच अवलंबून न राहाता औद्योगिक विकेंद्रीकरणाचा स्वीकार करून ग्रामीण भागात कृषी औद्योगिक विकासाला चालना द्यावी असे त्यांना वाटत असे.

**३. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा शंकरराव काळे यांचेवर वैचारिक प्रभाव होता.**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सहकार क्षेत्रात फार मोठी प्रगती झालेली आहे. हा सारा डोलारा यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, धनंजयराव गाडगीळ, केशराव जेधे, शंकरराव मोरे, यांच्या सारख्या द्रष्टया आणि धुरंधर नेत्यांच्या विचारसरणीवर उभा राहिला आहे.

महाराष्ट्राची सर्वांगीण बांधणी करताना या सर्व दुरदृष्टीच्या नेत्यांनी सहकाराची गंगा आणली. या धोरणी तसेच जनतेच्या कल्याणासाठी झटणाऱ्या नेत्यांच्या विचारांनी भारलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये राहाणाऱ्या बहुजन समाजापर्यंत विकासाचे पाट नेले. दुष्काळाच्या माळरानावर विकासाचे नंदनवन फुलविले. सहकाराच्या पक्क्या विचारांच्या मुशीतून तयार झालेले यापैकी अनेक कार्यकर्ते फारसे प्रसिद्धीस आले नाहीत, पण त्यांनी उभ्या केलेल्या कामाने त्यांचे नेतृत्वही समाजाने मान्य केले. शंकरराव देवराम काळे यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. माजी खासदार, माजी मंत्री ही त्यांची राजकीय ओळख आहे. पण चार लोकांना बरोबर घेऊन त्यांच्यातील गुणांना फुलवून त्यांच्याकडून असाधारण काम करून घेणारी, शिक्षण प्रसारासाठी पदरचे सगळे काही देणारी, शेतकऱ्यांच्या तसेच परिसराच्या विकासासाठी झटणारी व्यक्ती ही शंकरराव काळे यांची खरी ओळख आहे. 'गीव्ह अस वेस्ट लॅण्ड, वुई विल टर्न इट टू बेस्ट लॅण्ड' असे कर्मवीर भाऊराव पाटील आपल्या भाषणातून शिक्षणाचा प्रसार करत असताना नेहमी म्हणत असत. कर्मवीरांच्या विचारांचा प्रभाव असलेल्या शंकरराव काळे यांनी आपल्या जीवनाचे हेच तत्वज्ञान बनवले होते. समाजात जी विषमता दिसून येते ती बुद्धीची विषमता नसून संधीची विषमता आहे असा कर्मवीर आण्णांचा दावा होता. ही संधीची विषमता दूर करून अठरा पगड जातीतील मुला–मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, हे कर्मवीर अण्णांचे स्वप्न साकार करण्यासाठी शंकररावांनी अखेरपर्यंत त्यांच्या विचारांनी 'रयत' साठी काम केले. माहेगांव देशमुख, कोळपेवाडी, कोपरगाव आणि पुढल्या आयुष्यात संपूर्ण नगर जिल्ह्यात संपन्नता आणण्यासाठी शंकरराव काळे यांनी अविरत कष्ट करत स्वतःला कामात गाडून घेतले. सहकाराच्या मोठ्या वृक्षाचे ते एक मूळ ठरले. कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून त्यांनी सहकार क्षेत्राला जीवनरस पुरविला शिवाय एक गाव बसवले, उद्योगधंदे आणले, रोजगार आणला, शेतीत सुधारणा केली, दुष्काळावर मात करत जलसंवर्धने केले, शाळा काढल्या, बँकेची उभारणी केली. पुरोगामी आणि सहकारी चळवळीच्या विचारांवर तयार झालेल्या शंकरराव काळे यांनी खूप मोठे काम केले आहे. म्हणूनच त्यांच्या आयुष्याचा जीवनट हा एक प्रकारे अहमदनगर जिल्ह्याच्या जवळपास गेल्या पन्नास वर्षाचा एक इतिहासच ठरतो.

माहेगांव देशमुख, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर येथील शेतकरी कुटूंबातला एक तरूण प्रतिकूल परिस्थितीत उच्च शिक्षण घेतो, मोठ्या पगाराची, हुद्याची लालसा न धरता चार लोकांना हाताशी धरून राजकारणातून समाजकारण करत एका

माळरानावर संपन्नता आणतो तेव्हा कर्तबगारी मोठीच असते. शेवटी सामान्यातच असामान्यत्व दडलेले असते हे शंकरराव काळेंच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास करताना कर्मवीर भाऊराव पाटलांचा त्यांच्यावर वैचारिक प्रभाव होता असे दिसून येते.

**४. शंकरराव काळे यांच्या सहकारी चळवळीतील योगदानामुळे सामाजिक जनजागृती घडून आली.**

शंकरराव काळे यांनी नेतृत्व गुणांच्या जोरावर व्यक्तिगत आयुष्यात स्वतःची प्रगती साधली. पण त्याचबरोबर आपल्या परिसराच्या आणि जिल्ह्याच्या विकासासाठी सहकार चळवळीची तत्वे अंगी बाणवत महाराष्ट्राच्या विकासाला मोठा हातभार लावला. त्यांनी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या निमित्ताने जे काही केले त्यातून या भागाचा विकासच झाला. त्यांच्या कर्तृत्वामुळे कोपरगाव सहकारी साखर कारखाना उभा राहिला आहे. गौतमनगर हे गाव उभे राहिले आहे. कोपरगाव तालुक्यातील शेतकरी सावकारी पाशातून मुक्त झाला आहे. चाळीस-पन्नास वर्षापूपर्वी ग्रामीण भागातली माणसे अत्यंत मागासलेली होती. शेतकऱ्यांना सावकारी पाशाने करकचून आवळलेले होते. त्यात शेतकरी समाज संघटीत नव्हता. त्यामुळे त्यांचे मूक रूदन कोणाच्याही कानी पडत नव्हते. आपली दैन्यावस्था ही आपल्या पूर्वजन्माचे फळ आहे व आपण आपल्या कर्माचीच फळे भोगत आहोत असा निराशावाद सर्वत्र पसरलेला होता. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश लोक भारतीयांवर अन्याय-अत्याचार करीत असत. त्याचबरोबर सावकार शेतकऱ्यांची पिळवणूक करत होते. शेतकऱ्यांना कर्ज देऊन त्यांच्या जमिनी हडप करणे, चक्रवाढ व्याजाने कर्ज वसूली करणे यात शेतकरी कर्जाच्या चरकात पिळला जात होता. 'शेतकरी कर्जातच जन्मतो, कर्जातच मरतो' अशी परिस्थिती सर्वत्र होती. अशा दिवसात शेतीच्या विकासाचा विचारही कोणाच्या मनात येत नव्हता. शेतीमध्ये ज्वारी-बाजरीच्या पिकांप्रमाणे ऊस लागवड काही प्रमाणात केली जात होती. पुंड्या ऊसाची लागवड काही प्रमाणात शेतकरी करायचे. ऊस पिकविल्यानंतर आसपासच्या बाजारात नेऊन विकण्याची प्रथा होती. ऊसापासून गुळही मोठ्या प्रमाणात बनवला जात असे. पण गुऱ्हाळे टाकण्याची आणि चालवण्याची ऐपत फारच थोड्या शेतकऱ्यांकडे असल्याने सर्वच शेतकऱ्यांना गुळाचा गोडवा चाखायला मिळत नव्हता. कोल्हापूर प्रमाणेच कोपरगाव, नाशिक, श्रीरामपूर ही गावे गुळाच्या बाजारपेठेसाठी प्रसिद्ध होती. पण या व्यवसायातही सावकार गुंतलेले असल्याने शेतकऱ्याने स्वतः ऊस पिकवला, गुळ बनवला तरी तो कर्जातच राहत असे. अशा परिस्थितीत शंकरराव काळे यांच्या

कार्यामुळे कोपरगाव तालुक्यात सहकारी चळवळीच्या माध्यमातून समाजात जनजागृती घडून आली.

**५. शंकरराव काळे यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे नवसमाज निर्माण झाला.**

कर्मवीर भाऊराव पाटलांच्या प्रेरणेने शंकरराव काळे यांनी अहमदनगर जिल्ह्यात खेड्यापाड्यात शिक्षण प्रसाराचे मोठे काम केले. शंकररावांनी आयुष्यात महत्वाच्या अनेक जबाबदाऱ्या पार पाडत असताना आपल्या शैक्षणिक कार्याकडे अजिबात दुर्लक्ष होऊ दिले नाही. कर्मवीर भाऊराव पाटलांची शिक्षणा विषयीची तळमळ त्यांनी स्वतःच्या अंगी भिनवून घेतली होती. त्यामुळे कर्मवीरांचा आदर्श मनात जागता ठेवून शंकरराव काळे आयुष्यभर शिक्षण प्रसार करू शकले. खेड्यापाड्यात बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहचविण्याचा कर्मवीरांचा संदेश जसा त्यांनी अंगी बाणवलेला दिसतो. त्याचप्रमाणे गुरूकुल पद्धतीची इंग्रजी माध्यमाची एक शाळा काढून शेतकऱ्यांच्या मुलांना आत्मविश्वासाने जगासमोर जाण्याची ताकदही त्यांनी दिलेली दिसते. शंकरराव काळे यांच्या हातात एवढी सत्ता होती की, त्यांनी मनात आणले असते तर ते शिक्षण सम्राट बनू शकले असते. स्वतःच्या एखाद्या संस्थेमार्फत शाळा–कॉलेजेस काढून ते स्वतःचे वेगळे विश्व निर्माण करू शकले असते. परंतु त्यांनी या प्रक्रियेपासून स्वतःला दूरच ठेवले. रयत सारखी कर्मवीरांनी सुरू केलेली संस्था असताना स्वतःचा सवतासुभा त्यांनी उभा केला नाही. खेड्यापाड्यातील गोरगरीब मुलामुलींना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळाले पाहिजे या तळमळीपोटी त्यांनी 'रयत' मार्फत काम केले. त्यांनी रयतच्या शाळांना जागा मिळवून दिली, इमारती बांधून दिल्या आणि नंतर ते 'रयत' शिक्षण संस्थेचे चेअरमन बनले. एखाद्या गावात शाळा सुरू करावयाची आहे असे कळले की, मदतीसह शंकरराव तेथे हजर असायचे. शिक्षणाचे त्यांनी इतके महत्व ओळखले होते.

शंकरराव काळे यांनी ज्याप्रमाणे रयतचे काम समरस होऊन केले, त्याचप्रमाणे 'गौतम पब्लिक स्कूल' ही आधुनिक शाळाही झपाट्याने विकसित केली. ही दोन्ही कामे करत असताना बहुजन समाजाच्या विकासाचा विचार त्यांनी कधी सोडला नाही. त्यांच्या डोळ्यासमोर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा आदर्श होता. त्यांच्या व्यक्तिमत्वावर कर्मवीरांचा प्रभाव पडला आहे. शंकरराव काळे कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत गुंतलेले असताना त्यांची आणि कर्मवीरांची जी भेट झाली आणि त्यांनी जो संदेश दिला तो शंकररावांनी आयुष्यभर उरी बाळगलेला दिसून येतो.

शंकररावांनी स्वतःची शिक्षण संस्था काढली नाही. मात्र या परिसरातील मुलांच्या उच्च शिक्षणाची भूक ते भागवू शकले नाही. इंजिनिअरींग, मेडिकल या सारखी कॉलेजेस त्यांनी काढली नाही. हे जरी खरे असले तरी परिसरातील मुलांवर तो एकप्रकारे अन्याय झाल्यासारखाच वाटतो. कारण या परिसरातील सर्व सामान्य शेतकऱ्यांची अनेक मुले व्यावसायिक शिक्षण घेऊ शकले नाहीत. ज्या मुलांनी असे व्यावसायिक शिक्षण घेतले त्यांना मेडिकल, इंजिनिअरींगच्या शिक्षणासाठी बाहेर जावे लागले होते. त्यामुळे अशा मुलांची बाहेरच्या शिक्षण सम्राटांनी फार मोठी आर्थिक पिळवणूक केलेली दिसते. असे असले तरीही शंकरराव काळे यांनी रयत शिक्षण संस्थेमार्फत चालवलेले काम आणि गौतम एज्युकेशन सोसायटीमार्फत चालवलेले काम याकडे बारकाईने पाहिले तर ग्रामीण भागाच्या शिक्षणाची आस त्यांना लागून राहिलेली दिसते. ग्रामीण भागात शिक्षणाचे वारे शिरावे आणि उद्याच्या जगाला सामोरे जाण्याचे, त्यावर स्वार होण्याचे बळ खेड्यापाड्यातील मुला–मुलींमध्ये यावे ही धडपड त्यामागे दिसते. त्यामुळेच शंकरराव काळे हे खऱ्या अर्थाने कर्मवीर भाऊराव पाटील यांचे वारसदार ठरतात. त्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या कामामुळे नवसमाज निर्माण झालेला दिसून येतो.

**६. शंकरराव काळे यांच्या सामाजिक क्षेत्रातील योगदानामुळे तालुक्याच्या तसेच जिल्ह्याच्या विकासाला फार मोठा हातभार लागला आहे.**

सहकाराचे कल्याणकारी तत्व प्रत्यक्षात यावे म्हणून शंकरराव काळे यांनी अनेक प्रकारचे प्रयत्न केले व आधुनिक सुखसोयींपासून दूर असणाऱ्या कोळपेवाडी सारख्या खेड्यात विकासाची गंगा नेण्याचा मार्ग यशस्वी केला. कारखान्यातून येणारी आर्थिक सुबत्ता पुरेशी न मानता कोसाकाच्या माध्यमातून सामाजिक विकास साधण्याचे ध्येयही त्यांनी पूर्ण केले. कोळपेवाडी परिसर रस्ते दुरूस्ती व रस्ते बांधणी यामुळे अहमदनगर, पुणे, कोपरगाव यांसारख्या शहरी भागांशी जोडला गेला. मोठ्या राष्ट्रीयकृत बँका किंवा खाजगी बँकाकडून ग्रामीण भागासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते पण ते मिळवताना अनेक अडचणी येतात. त्यामुळे ग्रामीण विभागाच्या एकूण विकासास मोठी खीळ बसते. मात्र या अडचणीला पर्याय म्हणून शंकरराव काळे यांनी विविध संस्थांद्वारे परिसराचा, तालुक्याचा तसेच जिल्हयाचा विकास साधला आहे. त्यामुळे कोपरगाव कारखाना आणि परिसरात जाणवणारा विकासात्मक बदल फार मोठा आहे. एकेकाळी सावकारांच्या जोखडात अडकलेला इथला शेतकरी, कष्टकरी वर्ग आज दुचाकी, चारचाकीच्या वेगाने धावताना दिसत आहे. कोपरगाव परिसराची सुरूवातीची आर्थिक

स्थिती लक्षात घेता आज जो बदल जाणवतो आहे त्यात शंकरराव काळे यांनी स्थापन केलेल्या संस्थांचा वाटा फार मोठा आहे. पन्नास वर्षापूर्वी सावकारी पाशात अडकलेले इथले सामान्य जीवन या संस्थांनी पार बदलून टाकले आहे. सामान्य लोकांचे जीवनमान उंचावण्यास या संस्था मदतगार ठरल्या आहेत. या संस्थांनी एकमेकांना पूरक काम उभे करत परिसराचा कायापालट करण्यात मोठे यश मिळवले आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष असतांना शंकरराव काळे यांनी जिल्हाभर 'पाणी अडवा आणि पाणी जिरवा' ही योजना राबवली. जिल्हयातल्या पारनेर, जामखेड, कर्जत या दुष्काळी तालुक्यांना त्याचा फार मोठा फायदा झाला. १९८५ नंतर कोपरगाव तालुक्याला मिळणारे हक्काचे ११ टी.एम.सी. पाणी दारणा व गंगापूर धरणातून कमी झाले. त्यासाठी काळे यांनी सरकारशी संघर्ष केला व दुसऱ्या बाजुला जलसंधारण आणि जलसंवर्धनाची कामे केली. काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून त्यांनी सक्रिय राजकारणही केले. त्यांच्या राजकीय जीवनाची सुरूवात त्यांच्या जन्मगावच्या विविध कार्यकारी विकास सेवा सोसायटीतून झाली होती. अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अहमदनगर जिल्हयात पंचायत राज्य व या व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न केले. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि सरकार यांचा सुसंवाद त्यांनी त्यांच्या काळात घडवून नवा पायंडा पाडला. पारनेरचे सलग दहा वर्षे आमदार आणि कोपरगाव लोकसभा मतदार संघाचे पाच वर्षे खासदार, दोन वर्षे मंत्री यातून त्यांचे नेतृत्व उभे राहिले. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रात कार्यकर्त्यांची जी फळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला त्यात अहमदनगर जिल्हयात शंकरराव काळे यांचे स्थान खूप वरचे आहे. यशवंतरावांनी तयार केलेला हा माणूस त्यांचा वारसा सतत जपत राहीला आहे.

**७. शंकरराव काळे यांनी जलसंवर्धन व जलसिंचनाच्या माध्यमातून पाणी टंचाईचा सामना करण्याचे पथदर्शक उदाहरण महाराष्ट्रापुढे ठेवले आहे.**

कोपरगाव तालुक्यातला दुष्काळ कसा हटवता येईल यासाठी अहोरात्र प्रयत्न करणाऱ्या शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाखाली कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून जलसंवर्धन व जलसिंचनाचे विविध उपक्रम या परिसरात प्रभावीपणे राबवले गेले. स्वातंत्र्यपूर्व काळात दारणा धरण कोपरगावसाठी बांधले गेले पण दारणा धरणाचे पाणी गोदावरी कालव्यातून कमी क्षमतेने उपलब्ध होऊ लागले. दारणा धरणाच्या आसपासच्या लोकांनी पाणी बेकायदा उपसल्याने ही पाणी टंचाई निर्माण झाली. पाण्याची टंचाई जाणवू लागल्याने लाभ क्षेत्रातील शेतकरी, शेतमजूर व उद्योगधंद्यासह

सर्वच घटक अडचणीत आलेले असताना, कारखान्याचे चेअरमन म्हणून शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाने सजगता दाखवली. कारखान्याच्या परिसरात जलसंवर्धन व जलसिंचनाच्या उपक्रमांना प्राधान्य दिले गेले. या उपक्रमांमध्ये बंदिस्त नालाबंडिंग, पाझर तलाव, भूमिगत बंधारे, गावतळी, दगडी बंधारे, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे हे प्रकल्प हाती घेण्यात आले. कारखान्याने या उपक्रमांमध्ये फार मोठ्या प्रमाणार आर्थिक योगदान दिले आहे, यामागे शंकरराव काळे यांची शेतकऱ्यांच्या विकासाठी दृष्टी दिसून येते. जलसंवर्धनाच्या या उपक्रमामुळे लाभक्षेत्रात व परिसरात भूगर्भातील पाण्याची पातळी सुधारण्यास मदत झाली. यामुळे या भागात ऊसासारखे बारमाही पीक व त्यावर प्रक्रिया करणारी साखर कारखानदारी भरभराटीस आली. कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचा व उद्योगसमूहाचा मोठा विस्तारही केवळ यामुळेच होऊ शकला. एका अर्थाने शेतकऱ्यांच्या हिताचे आर्थिक परिवर्तनच या परिसरात झाले. त्यातून सामाजिक सुरक्षितता, शांततेचे व समृद्धीचे वातावरण निर्माण झाले. थोडक्यात सहकारी साखर कारखान्याने स्वतःच्या निधीतून पाणी टंचाईशी सामना करण्याबाबतचे पथदर्शक उदाहरण काळे यांनी संपूर्ण महाराष्ट्रापुढे ठेवले आहे.

जलसंवर्धन व जलसिंचन या योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी काळे यांचे अनुभवी नेतृत्व या परिसरात मदतकारक ठरले असेच म्हणावे लागेल. अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना संपूर्ण जिल्हाभर त्यांनी 'पाणी अडवा पाणी जिरवा' ही योजना प्रभावीपणे राबवली होती. अहमदनगर जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यात एका साठवण बंधाऱ्याच्या भूमिपुजनासाठी यशवंतराव चव्हाण आले होते. त्यावेळी मा. यशवंतराव चव्हाण म्हणाले होते की, 'महाराष्ट्रात जेव्हा जेव्हा दुष्काळ पडेल तेव्हा तेव्हा दुष्काळाशी लढण्याची हत्यारे म्हणून आपल्याला या साठवण बंधारे व पाझर तलावांचा उपयोग होईल.' शंकरराव काळे यांनी यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील यासारख्या मातब्बर आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल जाणीव असणाऱ्या नेत्यांबरोबर प्रदीर्घकाळ काम केले आहे. त्यातूनच त्यांचे नेतृत्व घडले. अशा तावून सुलाखून निघालेल्या नेतृत्वामुळे ते तालुक्याच्या पाणी प्रश्नाला विविध उपक्रमांकच्या माध्यमातून तोंड देऊ शकले.

कारखान्याने ६७.६० लाख रूपये खर्चून उपसा जलसिंचन योजना राबवल्या. या योजनांचा हजारो शेतकरी लाभ घेत आहेत. या उपसा जलसिंचन योजनेच्या लाभ २४०० हेक्टर शेती क्षेत्राला होतो आहे. आजपर्यंत ९८१.८३ लाख रूपये के. टी. वेअर्ससाठी खर्च आला. साठवण बंधाऱ्यासाठी १९१.५४ लाख रूपये आला. या

योजनांमुळे मोठा पाणीसाठा उपलब्ध झाला. १० हजार हेक्टर शेतीला पाण्याची व्यवस्था एकूण जलसंवर्धनांच्या कामामुळे झाली. त्यातून कारखान्याला आवश्यक तो ऊसाचा पुरवठा होऊ शकला. शेतीचा विकास, शेतकऱ्यांचा विकास आणि परिसराचा विकास अशी मोठ्या पल्ल्याची शेती आणि पाणी या क्षेत्रात क्रांतीच शंकरराव काळे यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात झाली.

गोदावरी डाव्या व उजव्या कालव्यात दारणा व गंगापूर धरणांचे पाणी शहर व उद्योगांसाठी नाशिक परिसरात वापरल्याने कोपरगांव तालुक्याला पाणी कमी येणार हे संकट श्री. शंकरराव काळे यांनी १९८५ नंतरच ओळखले होते. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी कोपरगाव परिसरात त्यांनी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून एका बाजूला जलसंवर्धनाची कामे सुरू केली. त्यात के.टी. वेअर्स, साठवण बंधारे, गावतळे, उपसा जलसिंचन योजना, ठिबक व तुषार सिंचन या प्रकल्पांचा समावेश होता. या प्रकल्पांच्या माध्यमातून त्यांनी कोपरगावचा परिसर पाणी टंचाईपासून अक्षरशः वाचवलाच. दुसऱ्या बाजूला सरकारबरोबर पाण्यासाठी संघर्ष सुरू केला. यात पाणी परिषद, पायी पाणी दिंडी, मोर्चे, उपोषणे, रास्तारोको, रेलरोको अशा आंदोलनांचा समावेश होता. तिसऱ्या बाजूला ते स्वतः आमदार – खासदार असताना पाणी प्रश्नावर सातत्याने शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय विधानसभा आणि लोकसभेत व्हावेत म्हणून झगडत होते. त्याचबरोबर पाणी प्रश्नावरचा त्यांचा अभ्यासही चालूच होता. 'पाणी अडवा पाणी जिरवा' या योजनेची प्रभावी अंमलबजावणी जशी त्यांनी कोपरगाव परिसरात केली, तसेच कोपरगावच्या शेतकऱ्यांना पाण्याच्या प्रश्नावर हक्कासाठी लढायलाही त्यांनी शिकवले. प्रतिकूल परिस्थिती असतानाही कोपरगाव परिसरात आजही ऊसाचे पीक उभे आहे. सहकारी साखर कारखाना पूर्ण क्षमतेने चालू आहे. कारखान्याबरोबर इतर उद्योगही सुरू आहेत. त्यातून विकासाची गंगा शेतकऱ्यांच्या घरात जात आहे. शंकरराव काळे यांनी केलेल्या कामांचे फळ आहे असेच मानावे लागेल.

**८. शंकरराव काळे यांनी कोपरगाव तालुक्यात निर्माण केलेल्या सहकारी संस्थांच्या माध्यमातून सर्वसामान्य, आर्थिक दृष्ट्या दुर्बल समाजाला जीवन जगण्याचा नवा मार्ग मिळाला.**

ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करायची असेल तर सहकारी साखर कारखानदारीचे जाळे मजबूत करावे असे म्हटले जाते. याचे कारण उजाड माळरानावर जेव्हा एखादा सहकारी साखर कारखाना सुरू होतो तेव्हा त्या परिसराच्या विकासाची एक

प्रक्रिया सुरू होत असते. या प्रक्रियेत सर्व प्रथम शेती बदलते. शेती हा ग्रामीण अर्थ व्यवस्थेचा आत्मा आहे पण ती निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असल्याने तिला सहजासहजी स्थिरता कधीच प्राप्त होत नाही. परंतु एक सहकारी साखर कारखाना सुरू होतो तेव्हा त्याच्या कार्यक्षेत्रातील शेतीला एक नवी झळाळी प्राप्त होते. कारण कारखान्यामुळे एका ठराविक ऊस उत्पादनाला कायमची मागणी राहते. दरवर्षी आपला ऊस हमखास विकला जाणार आहे, याची शाश्वती शेतकऱ्याला येत असते.

कारखान्यामुळे परिसरातील शेतकरी एका पातळीवर स्थिरावतो. या स्थिरावण्यातून त्याच्या विकासाला चालना मिळते. त्याच्यातल्या उद्योजकीय कौशल्याला धुमारे फुटतात. आणखी काय–काय करता येईल याचा विचार तो करायला लागतो. आपले आणि आपल्या कुटुंबाचे जीवन अधिक सुखकर कसे करता येईल हा विचार त्याला कार्यप्रवृत्त करतो. शेतकऱ्यांच्या या भावनेला कारखान्याने सकारात्मक प्रतिसाद दिला तर परिसराचा अक्षरशः कायापालट होऊ शकतो. विकासाचा सूर्य कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उगवण्याची शक्यता तयार होते. शंकरराव काळे यांनी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून नेमके हेच काम केल्याचे दिसून येते.

कारखान्यातून ऊसापासून साखर तयार करून ते थांबले नाहीत, तर मळीपासून स्पिरिट, बायोगॅस, कम्पोस्ट खत व कागद इत्यादी उद्योग सुरू केले. दुसरीकडे दूध डेअरी, कुक्कुटपालन, पशुखाद्य अशा अनेक शेतीपूरक व्यवसायांना चालना दिली आणि तिसरीकडे कारखाना आणि अन्य उद्योगांवर व्यापाऱ्यांचा  व व्यावसायिकांचा ताबा राहू नये म्हणून गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट सारखी शेतकऱ्यांच्या मालकीचीच कंपनी काढली.

शंकरराव काळे यांनी कारखान्याच्या उभारणीनंतर असे अनेक उपक्रम चालवले. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांपलीकडील परिसरातले काही लोकही कारखान्याला व कोसाका उद्योग समुहाला जोडले गेले. कारखान्याच्या उपपदार्थ उत्पादनाच्या उद्योगांद्वारे कारखाना परिसरातल्या लोकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला. आज संपूर्ण कोसाका उद्योग समूहामध्ये जवळ जवळ ३ हजार लोकांना रोजगार मिळाल्याने परिसरातील ३ हजार कुटूंब आर्थिक दृष्टीने भक्कम बनली आहेत. त्यामुळे या कुटूंबातील सरासरी १० संख्येने विचार करता आज ३० हजार लोकांचे जीवनमान उंचावले आहे. सहकारी साखर कारखान्यामुळे केवळ सभासद व कामगारांचीच आर्थिक प्रगती होत असते असे नाही तर कारखाना परिसरातील व कार्यक्षेत्रातील इतर

बहुसंख्य शेतकरी, शेतमजूर, कारागीर व इतर व्यावसायिकांना सुद्धा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लाभ मिळतो. शंकररावांनी कुशल उद्योजक आणि विकासकर्ता या नात्याने 'कोसाका उद्योग समुह' कल्पवृक्षाप्रमाणे वाढवत नेला आहे. मूळ कारखान्याला जोड उद्योगांची भर टाकली. कागद निर्मिती, अल्कोहोल, मद्यार्क, रसायने यांचे उत्पादन करून कारखान्याच्या यशात भर टाकली आहे. शिवाय सहकारी बँक, पतपेढी, कुक्कुटपालन, गोपैदास, दुग्ध व्यवसाय, खत प्रकल्प, पशुखाद्य प्रकल्प यांना प्राधान्य देऊन हजारो शेतकरी आणि कष्टकरी जनतेच्या विकासात महत्वाची भूमिका शंकरराव काळे यांनी केली आहे.

कोसाका उद्योगसमूहातल्या एकूण ज्या काही संस्था आहेत त्यांनी आपआपल्या पातळ्यांवर जे काही काम केले आहे ते प्रामुख्याने स्थानिक लोकांच्या गरजा, परिसराचा विकास, डोळ्यासमोर ठेवून केलेले आहे. त्यामुळे या संस्था किती फायद्यात आहेत यापेक्षा त्यांच्यामुळे एकूण परिस्थितीत काय बदल झाला हे अधिक महत्वाचे आहे. साखर कारखान्याशी संलग्न असणाऱ्या या संस्थांचा सर्व बाजूंनी विचार केला असता आपणास या संस्थांनी एक एक कुटुंब उभे करत अवघ्या परिसरातील लोकांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. थोडक्यात शंकरराव काळे यांनी तालुक्यात निर्माण केलेल्या सहकारी संस्थांच्या माध्यमातून सर्वसामान्य, आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजाला जीवन जगण्याचा नवा मार्ग मिळाला आहे.

**९. शंकरराव काळे यांच्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यातील सहभागामुळे समाजात एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली.**

शंकरराव काळे यांच्या घराण्यात पूर्वीपासून उत्तम शेतीबरोबरच भागवत धर्माची परंपरा आहे. त्यांनी सुखी प्रपंचातील सुख-समाधान श्रद्धा-भक्तीच्या परमानंदातून मिळवले आहे. त्यांचे वडील कै. देवरामबाबा काळे हे ह.भ.प. तुकाराम महाराज खेडलेकर यांचे परमभक्त व शिष्य होते. देवरामबाबांनी काळे वस्तीवर श्री. हुनमानाचे मंदिर बांधलेले आहे. या देवस्थानचे शंकररावांनी संस्थान केले असून ते या संस्थानचे कायम चेअरमन होते. या ट्रस्टच्या उत्पन्नातून दरवर्षी श्री हनुमान जयंती उत्सव पार पडतो. त्याचप्रमाणे भजनी मंडळ दर एकादशीला मंदिरात भजनासाठी येत असतात. त्याचप्रमाणे भजन, किर्तन , स्नान, काकड आरती इत्यादी कार्यक्रम कार्तिक मासात दरवर्षी मंदिरात होत असतात. दरवर्षी काकड आरती समाप्तीच्या दिवशी रात्री जाहीर किर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. चांगले साधू संत, किर्तनकार, प्रवचनकार किर्तनासाठी आमंत्रित केले जातात. श्री. हुनमान जयंतीच्या कार्यक्रमासाठी खेडलेझूंगे

येथील ह.भ.प. काशिनाथ महाराज खराटे येत असतात. हनुमान मंदिरातील विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने परिसरातील विविध जाती धर्मातील लोक एकत्र येतात. तसेच एकत्रितपणे महाप्रसादाचा लाभ घेतात.

माहेगांव देशमुख येथील गोदावरी काठी श्रीदत्त मंदिर आहे. या मंदिराचेही श्री. काळे यांनी संस्थान केले आहे व त्याचेही ते चेअरमन होते. भाविक भक्तांची गोदावरी नदीवर स्नान करण्याची व्यवस्था व्हावी म्हणून त्यांनी गोदावरी काठी दहा लाख खर्च करून चांगला घाट बांधला आहे. या मंदिरात परिसरातील सर्व जातीचे पुरूष व महिला भाविक येत असतात.

माहेगांव देशमुखच्या उत्तरेला हेमाडपंथी महादेवाचे मंदिर होते. परंतू ते पूर्णपणे पडलेले होते. श्री संत जनार्दन स्वामी महाराज यांच्या सूचनेनुसार शंकरराव काळे यांनी २० ऑक्टोबर १९९७ रोजी भग्न मुर्तींची विधीपूर्वक शांतीपूजा केली व त्या गोदावरी नदीत समर्पित केल्या. विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर परमपुज्य रमेशगिरी महाराजांच्या शुभहस्ते मंदिर बांधकामाचा शुभारंभ विधीपूर्वक केला. सर्व ग्रामस्थांनी या मंदिर उभारणीकामी सहकार्य केले. देणगी रूपाने पैसे गोळा करून शंकरराव काळे यांनी गोदावरी नदीकाठी तीस लाख रूपयांचे एक चांगले अमृतेश्वर महादेव मंदिर बांधले आहे. या देवतांच्या मुर्तिंची प्राणप्रतिष्ठा व पुर्णाहूती सोहळा २ जानेवारी २००५ ते ५ जानेवारी २००५ या काळात संपन्न झाला. यावेळी परिसरातील प्रचंड जनसमुदाय या कार्यक्रमात सहभागी झाला होता. महाप्रसादाबरोबरच सर्व जातीधर्माच्या महिला व पुरूष भाविक भक्तांना मोठमोठ्या साधू संतांच्या, महात्म्यांच्या सत्संगाचा लाभ झाला होता.

खेडलेझुंगे येथील संतवन आश्रमाचे ते ट्रस्टी होते. वै. ह.भ.प. तुकाराम बाबा खेडलेकर यांच्या नावाने पंढरपूर येथे एक धर्मशाळा बांधण्यात आली आहे. या धर्मशाळेसाठी शंकररावांनी एक लाख रूपयांची आर्थिक देणगी दिली आहे. यातून शंकरराव काळे यांच्या दातृत्वाचा गुण दिसून येतो.

मायगांव देवी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर येथे गोदावरी काठावर श्री देवी अंबाबाईचे अतिप्राचीन मंदिर होते. या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यासाठी मायगाव देवीचे ग्रामस्थ व पुजारी एकत्र आले होते. त्यांनी धर्मदाय आयुक्तांची परवानगी घेऊन मोठा निधी वर्गणीरूपाने गोळा केला मात्र ग्रामस्थ व पुजारी यांच्यात मतभेद निर्माण झाले. त्यामुळे काही काळ मंदिराचे बांधकाम थांबले गेले होते. अशावेळी शंकरराव काळे यांनी मध्यस्थी करून श्री देवी अंबाबाई मंदिराचे जिर्णोद्धाराचे काम पूर्ण करण्यासाठी पुढाकार

घेतला. त्यास तेथील ग्रामस्थ व पुजाऱ्यांनी साथ दिली. त्यांच्या या प्रयत्नाला यश आले असून तीस लाख रूपयांचे हे मंदिर नुकतेच पुर्णत्वास आले आहे.

याशिवाय शंकरराव काळे यांनी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर एक भव्य विष्णू मंदिर स्थापन केले आहे. कागद कारखाना स्थळावरही भव्य श्री दत्त मंदिराची उभारणी केली आहे. तसेच परिसरातील अनेक गावातील मंदिर बांधकामासाठी ते अखेरपर्यंत सढळ हाताने मदत करीत असत. 'सर्व धर्म समभाव' या न्यायातून त्यांनी मुस्लिम बांधवांनाही मशिद बांधकामासाठी वेळोवेळी भरीव मदत केलेली आहे. विविध ठिकाणी आयोजित केल्या जाणाऱ्या भागवत कथा, रामायण, हरिनाम सप्ताह अशा कार्यक्रमांना ते स्वतः उपस्थीत राहून भरघोस मदतही करीत असत.

शंकरराव काळे यांनी विविध विषयांवरील ग्रंथ, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, भगवद्‌गीता, संत तुकारामांची गाथा अशा विविध संत वाङ्‌मयाचे वाचन, मनन, चिंतन केले होते. यातूनच त्यांना समाज प्रबोधनाची प्रेरणा मिळालेली दिसून येते. आपल्या भागातील व परिसरातील लोकांच्या मनात श्रद्धायुक्त धार्मिक भावनेच्या निर्मितीसाठी नामांकित किर्तन व प्रवचन करणाऱ्या तपस्वी लोकांना ते आमंत्रित करत असत. यामध्ये सर्व जाती-पातींचे लोक सहभागी होताना दिसून येतात. धार्मिक व सामाजिक कार्य करीत असतांना त्यांनी कधीही जाती-पातीला महत्व दिल्याचे दिसत नाही. सर्व जाती धर्मांमध्ये त्यांचे चांगले मित्र होते. त्यांच्या धार्मिक कार्यातील सहभागामुळे समाजात एकात्मता निर्माण होण्यास मदत झाल्यचे दिसून येते.

कोपरगाव तालुक्यात तसेच अहमदनगर जिल्ह्यात शंकरराव काळे यांनी वेगवेगळ्या सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. कामे करताना लोकांच्या ज्या प्रश्नांची अधिक तीव्रता तो प्रश्न त्यांनी अग्रक्रमाने सोडविला. सरकारी यंत्रणेशी मैत्री, सामान्य कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष कामात सहभागी करून घेणे, त्यांना विश्वास देणे आणि स्वतः एक सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भूमिकेतून काम करणे हे शंकरराव काळे यांचे महत्वाचे वैशिष्ट्ये दिसून येते. थोडक्यात अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीच्या पार्श्वभूमीवर शंकरराव काळे यांच्या सहकार, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील योगदानामुळे केवळ कोपरगाव तालुक्याच्याच नव्हे तर संपूर्ण अहमदनगर जिल्ह्याच्या विकासाला फार मोठा हातभार लागलेला दिसून येतो.

# – संदर्भ ग्रंथसूची –


**I) प्राथमिक साधने**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | डिबेटस्, महाराष्ट्र विधानसभा, कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन | : | व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, प्रकाशक संचलनालय महाराष्ट्र शासन, मुंबई – १९७२ ते १९८० |
| **ब)** | **वार्षिक अहवाल** | | |
| १) | वार्षिक अहवाल | : | दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर, (१९५५ ते २०१३) |
| २) | वार्षिक अहवाल | : | माहेगाव देशमुख विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर (१९५६ ते २०१३) |
| ३) | वार्षिक अहवाल : | : | को–ऑपरेटीव्ह शुगर, नवी दिल्ली – १९८३ |
| ४) | वार्षिक अहवाल | : | अहमदनगर जिल्हा सहकारी बँक लि., अहमदनगर |
| ५) | वार्षिक अहवाल | : | गौतम सहकारी बँक लि., गौतमनगर, ता. कोपरगाव |
| ६) | वार्षिक अहवाल | : | कोसाका कामगार पतपेढी लि., पतसंस्था |
| ७) | वार्षिक अहवाल | : | शरद पवार नागरी सहकारी पतसंस्था, गौतमनगर, ता. कोपरगाव |
| ८) | वार्षिक अहवाल | : | रयत सेवक, रयत शिक्षण संस्था, सातारा |
| ९) | वार्षिक अहवाल | : | गौतमनगर एज्युकेशन सोसायटी, गौतमनगर, ता. कोपरगाव |
| १०) | वार्षिक अहवाल | : | कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी, गौतमनगर ता. कोपरगाव |
| ११) | वार्षिक अहवाल | : | महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती शिक्षण खाते, मुंबई – १९५४–५५ |
| १२) | वार्षिक प्रशासन अहवाल | : | जिल्हा परिषद – अहमदनगर मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. अहमदनगर. |
| **क)** | **इंग्रजी साधने** | : | |
| 1) | Gazetteers of India | : | State Gazetter, Ahmednagar edition – 1976. |
| 2) | Performance Bugget | : | Ministry of Civil Aviation and Tourism, Government of India, New Delhi – 1994-95 |
| 3) | Debates | : | 10th Loksabha (English Version) Vol. XVII. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | Loksabha, Secretariat, New Delhi – 1993 |
| 4) | Performance Bugget | : | Ministry of Health and Family Welfare, Govt. of India New Delhi – 1994-95. |
| 5) | Indian Performance Bugget | : | Dept of Animal Husbandary and Dairying – 1993 |
| 6) | Indian Performance Budgget | : | Dept of Agriculture and C-operation, New Delhi – 1994. |

**II) दुय्यम साधने**

**अ) प्रकाशित संदर्भ ग्रंथ (मराठी)**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | राजवाडे वि. का. | : | राजवाडे लेखनसंग्रह, ऐतिहासिक साहित्य अकादमी प्रकाशन – १९९९, खंड –४ पुणे |
| २) | जोशी त. ल. | : | मराठी विश्वकोश खंड – ११, महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे – १९८३ |
| ३) | मिरीकर ना. स. | : | अहमदनगरचा प्राचीन इतिहास, सुयश प्रकाशन, पुणे – १९६८ |
| ४) | आमटे बाबा | : | उज्ज्वल उदयासाठी, युवक अकादमी, महाराष्ट्र आरोग्य मंडळ, पुणे – १९९५ |
| ५) | बोरगांवकर रा. व. | : | प्राचीन मराठीतील चरित्रलेखन, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे – १९८५ |
| ६) | वेस्ट जे. डब्ल्यू. | : | रिसर्च इन एज्युकेशन, प्रेन्टीस हॉल ऑफ इंडिया – १९६३ |
| ७) | भांडारकर पु. ल. | : | सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, पुणे – १९९९ |
| ८) | गॅझेटीअर ऑफ इंडिया | : | महाराष्ट्र स्टेट– अहमदनगर डिस्ट्रिक्ट रिव्हाईज्ड एडिशन – १९७६ |
| ९) | गॅझेट ऑफ इंडिया | : | मिनीस्ट्री ऑफ इनफॉर्मेशन ॲण्ड ब्रॉडकास्टींग इंडिया, न्यु दिल्ली – २००४ |
| १०) | वाड गणेश चिमणाजी, साने | : | सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, ९. माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे |

| | | | |
|---|---|---|---|
| | काशिनाथ नारायण | | यांच्या कारकिर्दीतील भाग पहिला, पुणे – १९११, |
| ११) | कोठेकर शांता | : | इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर –१०–२०१२, चौथी आवृत्ती |
| १२) | सरदेसाई बी. एन. | : | इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर – २०११, दुधाळी. |
| १३) | मालशे स. ग. | : | भाषा व साहित्य संशोधन, प्रकाशक – जोशी वसंत, पुणे –१९९७ |
| १४) | घाटोळे रा. ना. | : | समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर – १९९० |
| १५) | कारवा जे. पी. | : | सामाजिक समस्या व सामाजिक परिवर्तन श्रीरंग प्रकाशन, पुणे |
| १६) | घागरेकर वि. ग. | : | आधुनिक राजकीय नेतृत्व, विद्या प्रकाशन, पुणे –१९९७ |
| १७) | चिटणीस के. एन. | : | मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, भाग–२, प्रकाशक, सौ. रा. कृ. चिटणीस, रामबाग कॉलनी, नवीपेठ, पुणे – १९८७. |
| १८) | ब्रम्हे सुलभा | : | ध.रा. गाडगीळ, लेखसंग्रह, खंड–१, प्रकाशक, वि. म. दांडेकर, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे – १९७३ |
| १९) | देव प्रभाकर | : | इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, शिवाजीनगर, नांदेड – १९९७ |
| २०) | काचोळे दा. धो. | : | सामाजिक संशोधन पद्धती, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद – १९९३ |
| २१) | खरे ग. ह., कुलकर्णी गो. त्र्यं. | : | मध्ययुगीन भारताचा इतिहास, मुंबई – २००१. |
| २२) | दाते य. रा. | : | सुलभ विश्वकोष, खंड–५, महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे – १९७८ |
| २३) | कामत गो. स. | : | सहकार तत्व व व्यवहार व्यवस्थापन, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे – १९९३ |
| २४) | साळुंके द. को. | : | महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, |

कोल्हापूर – १९८२

२५) कुलकर्णी, खरे : मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला

२६) सावंत शिवाजी : लढत, भाग पहिला, प्रकाशक– डॉ. आर. जी. काकडे प्रवरानगर– १९८५

२७) कोल्हे शंकरराव : सत्याग्रही शेतकरी, सुधाकर जोशी, राजमयुर सोसायटी, एरवंडवणे, पुणे – २०१२

२८) कुलकर्णी सुहास : विकाससूर्य, युनिक फिचर्स, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे – २००१

२९) सोनवणे ज्ञानेश्वर : समाज अभियंता, पद्मगंधा प्रकाशन, पुणे – २००९

३०) भावे सविता : कृषीक्रांतीचे सेनानी– आण्णासाहेब शिंदे, कल्पना मुद्रणालय, पुणे – १९९४

३१) थोरात भाऊसाहेब : अमृतगाथा, अमेय प्रकाशन, पुणे – १९९९

३२) सरदार ग. बा : महाराष्ट्र जीवन (खंड दुसरा) मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे

३३) जावडेकर शं. दे. : आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

३४) किर धनयंज : महात्मा जोतीराव फुले, आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाश, मुंबई – २०११.

३५) डॉ. मॅथ्यु ए. व्ही. : कर्मवीर भाऊराव पाटील, प्रकाशक सचिव – रयत शिक्षण संस्था, सातारा.

३६) पाटील अजित : कर्मवीरायण, डायमंड पब्लिकेशन, पुणे – २००६

३७) गाठाळ एस.एस. : आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद

३८) शिंदे आर. के. : एक महान कर्मयोगी, कर्मवीर भाऊराव पाटील प्रकाशक– कर्मवीर विद्या प्रबोधिनी, सातारा

३९) कोद्रे संजीव : असे होते कोपरगाव, चक्रपाणी प्रिंटर्स, बाजारतळ, कोपरगाव – २०१४

४०) पाटील व्ही. बी. : महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, के सागर प्रकाशन, पुणे

४१) गडाख यशवंतराव : अर्धविराम, ऋतुरंग प्रकाशन, गोरेगांव (पूर्व),

मुंबई – २००३

४२) घाटे वि. द. : असे होते दिवस, मौज प्रकाशन, गिरगाव, मुंबई – १९६१

४३) थोरात भाऊसाहेब : अमृतमंथन (आत्मवृत्त), अमेय प्रकाशन, पुणे – १९९७

४४) भापकर बापुसाहेब : हिराप्रभाची कहानी, सुगम साहित्य प्रकाशन, अहमदनगर – १९८७

४५) सरदेसाई गो. स. : मराठी रियासत, खंड ६, १९९१, मुंबई.

४६) ठाकूर वा. वा. : होळकरशाहीचा इतिहास, भाग पहिला, १९४४, इंदोर, पृ. १५६

४७) केळकर य.न., संग्रह : अप्रकाशित, रूमाल क्र. १, पत्र क्र. २४, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.

४८) भा.इ.सं.मं. : अप्रकाशित, पुरंदरे दत्तक, रूमाल क्र. १, कागद क्र.३७ व अप्रकाशित, हिंगणे दप्तर, रूमाल क्र. ३, पत्र क्र. ६१

४९) सैद नुरूल्ला व नाईक जे. पी. : ए स्टुंडंट हिस्ट्री ऑफ एज्युकेशन इन इंडिया, मॅकमिलन प्रकाशन, मुंबई – १९७१.

५०) ओक प्रमोद : एलफिन्स्टन, पुणे – १९९९.

५१) डॉ. चौधरी के. के. : झुंजार पुणे, वसाहतवाद व सामाजिक विषमतेशी लढा, कॉन्टीनेंटल प्रकाशन – २००८, पुणे – ३०, पृ. ९१

५२) दास्ताने संतोष : महाराष्ट्र – २००३, दास्ताने रामचंद्र ॲण्ड कंपनी, पुणे

५३) खोरे अरूण : महाराष्ट्र विकासाचे नवे प्रवाह, संजीवनी स्मृतीग्रंथ, कोपरगाव – १९९१

५४) कदम शंकरराव : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे – साहित्य व कार्य, औरंगाबाद – २००५

५५) डॉ. पटेल जी. एच. : मराठी वृत्तपत्रे आणि सामाजिक आंदोलन स्वाभिमान प्रकाशन, औरंगाबाद – २००४

५६) वरडुळे महादेव : सीनापुत्र, ए. बु. तथा आबासाहेब निंबाळकर जीवन व कार्य, प्रकाशक – नरूभाऊ लिमये, गतिमान प्रकाशन, पुणे –१९९०

५७) शिंदे बिरबल, मासाळ विठ्ठल : कर्मवीर दादासाहेब पाटील जीवन व कार्य, डेक्कन जिमखाना, पुणे – १९७०

**ब)   प्रकाशित (इंग्रजी)**


1) Borgpruds E.S. : Principles of Co-operative, New Delhi

2) Stickland C.F. : Co-operation of India, New Delhi

3) Hough R.M. : The Co-operative Movement in India Oxford – Calcutta -1966

4) Naik K.N., Vakil C.N. : The Co-opeartive Movement in the Bombay State, Popular Book Depot, Bombay - 1953

5) E.D. Maclagaon, Laloobhai Sambaldas, A.E. English, M. Azar Ali, Comittee on Co-operative Report.

6) Future of Co-operative Movement in India

7) Report of the Co-operative Committee – New Delhi, GOI

8) Mahamahopadhya, Dr. V.V. Mishra, Dr. B.G. Kunte, Oturkar, Maharashtra Gazetterers- Ahmednagar

9) Sankliya H.D., Indian Archeology Today

10) History to Pre Histroy

11) Muris Original Sanskrit Tex – Vol- I

12) Medows Taylor, Manual of History

13) History of freedom movement In Indian Vol- I

14) Margaret Digby : The world Co-operative Movement, Hutchison University Library, London, 1948

15) Widwans M.D. : The Maharashtra Co-operative Society Act – 1960, Co-operataor Book Depot,Bombay -1962

16) Shrishrimal W.C. : Co-operative Economy Problems and Potentialities, The Maharashtra State Co-operative Bank Ltd., 1978.

17) Sirsikar V.M. : Politics of Modern Maharashtra Orient Longman Ltd., Kamani, Marg, Bombay.

18) Dr. Tupe S.D. : Sugar Co-operative and Rural Change, Dwarka Prakashan, Pune - 1992

19) Priollkar A.K. : Biography of Dadoba Pandurang

20) Dr. Talole : Economics of well Irigation Equipped with electric pumpsets Agricultural Development of Ahmednagar – 1996.

21) Dr. Vijay N. Nalawade : The Life & Career of Deshbhakt Keshavrao Jedhe, 1997, Pune –7.

**क) अप्रकाशित :**

१) गांधी बनायत (अप्रकाशित) : प्रबोधनकार ठाकरे यांचे सामाजिक विचार लघुशोध प्रबंध (२००६)

२) इथापे देवीदास (अप्रकाशित) : यशवंतराव चव्हाणांचे राजकीय नेतृत्व – एक राजकीय चिकित्सा, शोधप्रबंध, नागपूर विद्यापीठ – १९९६

३) सोनखासकर जो. वि. (अप्रकाशित) : भाऊसाहेब हिरे यांचे राजकीय नेतृत्व, शोधप्रबंध, नागपूर विद्यापीठ – २००२

४) विसपुते शा. म. (अप्रकाशित) : एस.एम. जोशींच्या सामाजिक, राजकीय विचारांचा अभ्यास, शोधप्रबंध, जळगांव विद्यापीठ– १९९७

५) राजदेव टी. बी. (अप्रकाशित) : कॉ. दत्ता देशमुख यांचे महाराष्ट्राच्या जडघडणीतील योगदान, शोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विद्यापीठ – २००१

६) देवरे आर. ए. (अप्रकाशित) : यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय, शैक्षणिक, सामाजिक नेतृत्वाचा अभ्यास, शोध प्रबंध जळगांव विद्यापीठ – २००९

७) देशमुख गणेश : ग्रामवेद, के. बी. रोहमारे गौरवग्रंथ, कोपरगाव – १९९८

८) आव्हाड सुहास (अप्रकाशित) : सहकारी साखर कारखानदारी आणि ऊस लागवडीचे अर्थशास्त्र, शोधप्रबंध, पुणे – १९९२

९) बोठे बाळ ज. : कारभारी जिल्ह्याचे, सुसंस्कृत नेता, शंकरराव काळे (विशेष लेख) दै. पुणे – २०१३

## III) स्मरणिका, वर्तमानपत्रे, मानपत्र, भाषणे, मुलाखती :

**अ) स्मरणिका**

१) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर रौप्य महोत्सवी वर्ष – १९८५

२) संकल्पातून सिद्धीकडे, शंकरराव काळे – कार्य व कर्तृत्व, प्रकाशक बी. डी. बाळीकाई, गौतमनगर – २००४

३) अंतरलेले पाणी, शंकरराव काळे, अध्यक्ष गोदावरी कालवे, पाणी वाटप संघर्ष समिती – १९९२

४) अमृतवाणी, कर्मवीर शंकरराव काळे यांचे विचारधन – २०१३

५) स्नेहांजली, शंकरराव काळे, बी. डी. बाळीकाई– १९९९

६) माझी आई, शंकरराव काळे – १९९९

७) स्मरणिका, कर्मवीर शंकरराव काळे स्मृती उद्यान – २०१४

८) त्रैमासिक, सहकार शक्ती, अहमदनगर – १९७०

९) ग्रामीण अवर्षण क्षेत्र विकास संस्था, उक्कडगांव, ता. कोपरगाव – २००३

१०) कोसाका उद्योग समूहाची वाटचाल, प्रकाशक, चेअरमन कोसाका – १९९७

११) प्रयत्नांच्या पाऊलखुणा, शंकरराव काळे – १९९६

**ब) वर्तमानपत्र व नियतकालिके –**

१) दै. सकाळ, अहमदनगर, पुणे आवृत्ती

२) दै. लोकमत, अहमदनगर आवृत्ती

३) दै. लोकसत्ता, अहमदनगर, पुणे आवृत्ती

४) दै. सार्वमत, अहमदनगर आवृत्ती

५) दै. पुढारी, अहमदनगर आवृत्ती

६) दै. महाराष्ट्र टाईम्स् मुंबई, आवृत्ती

७) Times of India

८) The Economic Times

९) The Indian Express

**क ) विविध समारंभातील भाषणे –**

१) श्री. शरदराव पवार

२) श्री. पृथ्वीराज चव्हाण

३) श्री. पतंगराव कदम

४) श्री. बाळासाहेब विखे पाटील

५) स्व. विलासराव देशमुख

६) स्व. भाऊसाहेब थोरात

७) स्व. आबासाहेब निंबाळकर

८) स्व. गोपीनाथ मुंडे

**ड) मानपत्र**

१) अहमदनगर, महानगर पालिका, १३ जानेवारी १९९६

२) रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग - अहमदनगर

३) दि अहमदनगर जिल्हा सहकारी बँक लि., अहमदनगर १९९५

४) पुणे विद्यापीठ जीवन साधना गौरव पुरस्कार - २००३

५) दि अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर -२००८

६) गिरणा गौरव पुरस्कार, मालेगांव - २०१२

७) रयत माऊली पुरस्कार, सातारा - २०११

८) गुलाबराव पाटील - सहकार भूषण पुरस्कार, सांगली - २०१२

**इ ) मुलाखती -**

१) स्व. शंकरराव देवराम काळे

२) आ. अशोकराव शंकरराव काळे

३) सौ. स्नेहलता अनिलराव शिंदे

४) श्री. बबनराव पाचपुते

५) श्री. शंकरराव कोल्हे

६) श्री. बाळासाहेब थोरात

७) श्री. छबुराव आव्हाड

८) श्री. जगन्नाथ वारूळे

९) श्री. बाळीकाई बी. डी.

१०) श्री. डगळे के. एस.

११) श्री. आशुतोष अशोकराव काळे

# – संदर्भ ग्रंथसूची –


**I) प्राथमिक साधने**

अ) डिबेटस्, महाराष्ट्र विधानसभा, कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन : व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, प्रकाशक संचलनालय महाराष्ट्र शासन, मुंबई – १९७२ ते १९८०

**ब) वार्षिक अहवाल**

१) वार्षिक अहवाल : दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर, (१९५५ ते २०१३)

२) वार्षिक अहवाल : माहेगाव देशमुख विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर (१९५६ ते २०१३)

३) वार्षिक अहवाल : : को–ऑपरेटीव्ह शुगर, नवी दिल्ली – १९८३

४) वार्षिक अहवाल : अहमदनगर जिल्हा सहकारी बँक लि., अहमदनगर

५) वार्षिक अहवाल : गौतम सहकारी बँक लि., गौतमनगर, ता. कोपरगाव

६) वार्षिक अहवाल : कोसाका कामगार पतपेढी लि., पतसंस्था

७) वार्षिक अहवाल : शरद पवार नागरी सहकारी पतसंस्था, गौतमनगर, ता. कोपरगाव

८) वार्षिक अहवाल : रयत सेवक, रयत शिक्षण संस्था, सातारा

९) वार्षिक अहवाल : गौतमनगर एज्युकेशन सोसायटी, गौतमनगर, ता. कोपरगाव

१०) वार्षिक अहवाल : कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी, गौतमनगर ता. कोपरगाव

११) वार्षिक अहवाल : महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती शिक्षण खाते, मुंबई – १९५४–५५

१२) वार्षिक प्रशासन अहवाल : जिल्हा परिषद – अहमदनगर मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. अहमदनगर.

**क) इंग्रजी साधने :**

1) Gazetteers of India : State Gazetter, Ahmednagar edition – 1976.

2) Performance Bugget : Ministry of Civil Aviation and Tourism, Government of India, New Delhi – 1994-95

3) Debates : 10th Loksabha (English Version) Vol. XVII. Loksabha, Secretariat, New Delhi – 1993

4) Performance Bugget : Ministry of Health and Family Welfare, Govt. of India New Delhi – 1994-95.
5) Indian Performance Bugget : Dept of Animal Husbandary and Dairying – 1993

6) Indian Performance Budgget : Dept of Agriculture and C-operation, New Delhi – 1994.

**II) दुय्यम साधने**

**अ) प्रकाशित संदर्भ ग्रंथ (मराठी)**

१) राजवाडे वि. का. : राजवाडे लेखनसंग्रह, ऐतिहासिक साहित्य अकादमी प्रकाशन – १९९९, खंड –४ पुणे
२) जोशी लक्ष्मणशास्त्री : मराठी विश्वकोश खंड – ११, महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे – १९८३
३) मिरीकर ना. स. : अहमदनगरचा प्राचीन इतिहास, सुयश प्रकाशन, पुणे – १९६८
४) आमटे बाबा : उज्ज्वल उदयासाठी, युवक अकादमी, महाराष्ट्र आरोग्य मंडळ, पुणे – १९९५
५) बोरगांवकर रा. व. : प्राचीन मराठीतील चरित्रलेखन, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे – १९८५
६) वेस्ट जे. डब्ल्यू. : रिसर्च इन एज्युकेशन, प्रेन्टीस हॉल ऑफ इंडिया – १९६३
७) भांडारकर पु. ल. : सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, पुणे – १९९९
८) गॅझेटीअर ऑफ इंडिया : महाराष्ट्र स्टेट– अहमदनगर डिस्ट्रिक्ट रिव्हाईज्ड एडिशन – १९७६
९) गॅझेट ऑफ इंडिया : मिनीस्ट्री ऑफ इनफॉर्मेशन ॲण्ड ब्रॉडकास्टींग इंडिया, न्यु दिल्ली – २००४
१०) वाड गणेश चिमणाजी, साने काशिनाथ नारायण : सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, ९. माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे यांच्या कारकिर्दीतील भाग पहिला, पुणे – १९११,
११) कोठेकर शांता : इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर –१०–२०१२, चौथी आवृत्ती

१२) सरदेसाई बी. एन. : इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर – २०११, दुधाळी.

१३) मालशे स. ग. : भाषा व साहित्य संशोधन, प्रकाशक – जोशी वसंत, पुणे –१९९७

१४) घाटोळे रा. ना. : समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर – १९९०

१५) कारवा जे. पी. : सामाजिक समस्या व सामाजिक परिवर्तन श्रीरंग प्रकाशन, पुणे

१६) घागरेकर वि. ग. : आधुनिक राजकीय नेतृत्व, विद्या प्रकाशन, पुणे –१९९७

१७) चिटणीस के. एन. : मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, भाग–२, प्रकाशक, सौ. रा. कृ. चिटणीस, रामबाग कॉलनी, नवीपेठ, पुणे – १९८७.

१८) ब्रम्हे सुलभा : ध.रा. गाडगीळ, लेखसंग्रह, खंड–१, प्रकाशक, वि. म. दांडेकर, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे – १९७३

१९) देव प्रभाकर : इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, शिवाजीनगर, नांदेड – १९९७

२०) काचोळे दा. धो. : सामाजिक संशोधन पद्धती, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद – १९९३

२१) खरे ग. ह., कुलकर्णी गो. त्र्यं. : मध्ययुगीन भारताचा इतिहास, मुंबई – २००१.

२२) दाते य. रा. : सुलभ विश्वकोष, खंड–५, महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे – १९७८

२३) कामत गो. स. : सहकार तत्व व व्यवहार व्यवस्थापन, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे – १९९३

२४) साळुंके द. को. : महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर – १९८२

२५) कुलकर्णी, अ. रा. खरे ग. ह. : मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला, पुणे – १९८४

२६) सावंत शिवाजी : लढत, भाग पहिला, प्रकाशक– डॉ. आर. जी. काकडे प्रवरानगर– १९८५
२७) कोल्हे शंकरराव : सत्याग्रही शेतकरी, सुधाकर जोशी, राजमयुर सोसायटी, एरवंडवणे, पुणे – २०१२
२८) कुलकर्णी सुहास : विकाससूर्य, युनिक फिचर्स, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे – २००१
२९) सोनवणे ज्ञानेश्वर : समाज अभियंता, पद्मगंधा प्रकाशन, पुणे – २००९
३०) भावे सविता : कृषीक्रांतीचे सेनानी– आण्णासाहेब शिंदे, कल्पना मुद्रणालय, पुणे – १९९४
३१) थोरात भाऊसाहेब : अमृतगाथा, अमेय प्रकाशन, पुणे – १९९९
३२) सरदार ग. बा : महाराष्ट्र जीवन (खंड दुसरा) मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे
३३) जावडेकर शं. दे. : आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
३४) किर धनयंज : महात्मा जोतीराव फुले, आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाश, मुंबई – २०११.
३५) डॉ. मॅथ्यु ए. व्ही. : कर्मवीर भाऊराव पाटील, प्रकाशक सचिव – रयत शिक्षण संस्था, सातारा.
३६) पाटील अजित : कर्मवीरायण, डायमंड पब्लिकेशन, पुणे – २००६
३७) गाठाळ एस.एस. : आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद
३८) शिंदे आर. के. : एक महान कर्मयोगी, कर्मवीर भाऊराव पाटील प्रकाशक– कर्मवीर विद्या प्रबोधिनी, सातारा
३९) कोद्रे संजीव : असे होते कोपरगाव, चक्रपाणी प्रिंटर्स, बाजारतळ, कोपरगाव – २०१४
४०) पाटील व्ही. बी. : महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, के सागर प्रकाशन, पुणे
४१) गडाख यशवंतराव : अर्धविराम, ऋतुरंग प्रकाशन, गोरेगांव (पूर्व),मुंबई –२००३
४२) घाटे वि. द. : असे होते दिवस, मौज प्रकाशन, गिरगाव, मुंबई – १९६१
४३) थोरात भाऊसाहेब : अमृतमंथन (आत्मवृत्त), अमेय प्रकाशन, पुणे – १९९७
४४) भापकर बापुसाहेब : हिराप्रभाची कहानी, सुगम साहित्य प्रकाशन, अहमदनगर – १९८७

४५) सरदेसाई गो. स. : मराठी रियासत, खंड ६, १९९१, मुंबई.

४६) ठाकूर वा. वा. : होळकरशाहीचा इतिहास, भाग पहिला, १९४४, इंदोर, पृ. १५६

४७) केळकर य.न., संग्रह : अप्रकाशित, रूमाल क्र. १, पत्र क्र. २४, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.

४८) भा.इ.सं.मं. : अप्रकाशित, पुरंदरे दत्तक, रूमाल क्र. १, कागद क्र.३७ व अप्रकाशित, हिंगणे दप्तर, रूमाल क्र. ३, पत्र क्र. ६१

४९) सैद नुरूल्ला व नाईक जे. पी. : ए स्टुंडंट हिस्ट्री ऑफ एज्युकेशन इन इंडिया, मॅकमिलन प्रकाशन, मुंबई – १९७१.

५०) ओक प्रमोद : एलफिन्स्टन, पुणे – १९९९.

५१) डॉ. चौधरी के. के. : झुंजार पुणे, वसाहतवाद व सामाजिक विषमतेशी लढा, कॉन्टीनेंटल प्रकाशन – २००८, पुणे – ३०, पृ. ९१

५२) दास्ताने संतोष : महाराष्ट्र – २००३, दास्ताने रामचंद्र ॲण्ड कंपनी, पुणे

५३) खोरे अरूण : महाराष्ट्र विकासाचे नवे प्रवाह, संजीवनी स्मृतीग्रंथ, कोपरगाव – १९९१

५४) कदम शंकरराव : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे – साहित्य व कार्य, औरंगाबाद – २००५

५५) डॉ. पटेल जी. एच. : मराठी वृत्तपत्रे आणि सामाजिक आंदोलन स्वाभिमान प्रकाशन, औरंगाबाद – २००४

५६) वरडुळे महादेव : सीनापुत्र, ए. बु. तथा आबासाहेब निंबाळकर जीवन व कार्य, प्रकाशक – नरूभाऊ लिमये, गतिमान प्रकाशन, पुणे –१९९०

५७) शिंदे बिरबल, मासाळ विठ्ठल : कर्मवीर दादासाहेब पाटील जीवन व कार्य, डेक्कन जिमखाना, पुणे – १९७०

५८) देशमुख गणेश : ग्रामवेद, के. बी. रोहमारे गौरवग्रंथ, कोपरगाव – १९९८

**ब) प्रकाशित (इंग्रजी)**

1) Borgpruds E.S. : Principles of Co-operative, New Delhi

2) Stickland C.F. : Co-operation of India, New Delhi

3) Hough R.M. : The Co-operative Movement in India Oxford – Calcutta -1966

4) Naik K.N., Vakil C.N. : The Co-opeartive Movement in the Bombay State, Popular Book Depot, Bombay - 1953

5) E.D. Maclagaon, Laloobhai Sambaldas, A.E. English, M. Azar Ali, Comittee on Co-operative Report.

6) Future of Co-operative Movement in India

7) Report of the Co-operative Committee – New Delhi, GOI

8) Mahamahopadhya, Dr. V.V. Mishra, Dr. B.G. Kunte, Oturkar, Maharashtra Gazetterers- Ahmednagar

9) Sankliya H.D., Indian Archeology Today

10) History to Pre Histroy

11) Muris Original Sanskrit Tex – Vol- I

12) Medows Taylor, Manual of History

13) History of freedom movement In Indian Vol- I

14) Margaret Digby : The world Co-operative Movement, Hutchison University Library, London, 1948

15) Widwans M.D. : The Maharashtra Co-operative Society Act – 1960, Co-operataor Book Depot,Bombay -1962

16) Shrishrimal W.C. : Co-operative Economy Problems and Potentialities, The Maharashtra State Co-operative Bank Ltd., 1978.

17) Sirsikar V.M. : Politics of Modern Maharashtra Orient Longman Ltd., Kamani, Marg, Bombay.

18) Dr. Tupe S.D. : Sugar Co-operative and Rural Change, Dwarka Prakashan, Pune - 1992

19) Priollkar A.K. : Biography of Dadoba Pandurang

20) Dr. Talole : Economics of well Irigation Equipped with electric pumpsets Agricultural Development of Ahmednagar – 1996.

21) Dr. Vijay N. Nalawade : The Life & Career of Deshbhakt Keshavrao Jedhe, 1997, Pune –7.

**III) स्मरणिका, वर्तमानपत्रे, मानपत्र, भाषणे, मुलाखती :**

**अ) स्मरणिका**

१) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर रौप्य महोत्सवी वर्ष – १९८५

२) संकल्पातून सिद्धीकडे, शंकरराव काळे – कार्य व कर्तृत्व, प्रकाशक बी. डी. बाळीकाई, गौतमनगर – २००४

३) अंतरलेले पाणी, शंकरराव काळे, अध्यक्ष गोदावरी कालवे, पाणी वाटप संघर्ष समिती – १९९२

४) अमृतवाणी, कर्मवीर शंकरराव काळे यांचे विचारधन – २०१३

५) स्नेहांजली, शंकरराव काळे, बी. डी. बाळीकाई– १९९९

६) माझी आई, शंकरराव काळे – १९९९

७) स्मरणिका, कर्मवीर शंकरराव काळे स्मृती उद्यान – २०१४

८) त्रैमासिक, सहकार शक्ती, अहमदनगर – १९७०

९) ग्रामीण अवर्षण क्षेत्र विकास संस्था, उक्कडगांव, ता. कोपरगाव – २००३

१०) कोसाका उद्योग समूहाची वाटचाल, प्रकाशक, चेअरमन कोसाका – १९९७

११) प्रयत्नांच्या पाऊलखुणा, शंकरराव काळे – १९९६

१२) बाळ ज. बोठे – कारभारी जिल्ह्याचे, सुसंस्कृत नेता, शंकरराव काळे (विशेष लेख) दै. पुणे – २०१३

**ब) वर्तमानपत्र व नियतकालिके –**

१) दै. सकाळ, अहमदनगर, पुणे आवृत्ती

२) दै. लोकमत, अहमदनगर आवृत्ती

३) दै. लोकसत्ता, अहमदनगर, पुणे आवृत्ती

४) दै. सार्वमत, अहमदनगर आवृत्ती

५) दै. पुढारी, अहमदनगर आवृत्ती

६) दै. महाराष्ट्र टाईम्स् मुंबई, आवृत्ती

७) Times of India

८) The Economic Times

९) The Indian Express

**क ) विविध समारंभातील भाषणे –**

१) श्री. शरदराव पवार

२) श्री. पृथ्वीराज चव्हाण

३) श्री. पतंगराव कदम

४) श्री. बाळासाहेब विखे पाटील

५) स्व. विलासराव देशमुख

६) स्व. भाऊसाहेब थोरात

७) स्व. आबासाहेब निंबाळकर

८) स्व. गोपीनाथ मुंडे

**ड) मानपत्र**

१) अहमदनगर, महानगर पालिका, १३ जानेवारी १९९६

२) रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग – अहमदनगर

३) दि अहमदनगर जिल्हा सहकारी बँक लि., अहमदनगर १९९५

४) पुणे विद्यापीठ जीवन साधना गौरव पुरस्कार – २००३

५) दि अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर –२००८

६) गिरणा गौरव पुरस्कार, मालेगांव – २०१२

७) रयत माऊली पुरस्कार, सातारा – २०११

८) गुलाबराव पाटील – सहकार भूषण पुरस्कार, सांगली – २०१२

**इ ) मुलाखती –**

१) स्व. शंकरराव देवराम काळे

२) आ. अशोकराव शंकरराव काळे

३) सौ. स्नेहलता अनिलराव शिंदे

४) श्री. बबनराव पाचपुते

५) श्री. शंकरराव कोल्हे

६) श्री. बाळासाहेब थोरात

७) श्री. छबुराव आव्हाड

८) श्री. जगन्नाथ वारूळे

९) श्री. बाळीकाई बी. डी.


१०) श्री. डगळे के. एस.

११) श्री. आशुतोष अशोकराव काळे

## IV) अप्रकाशित शोध प्रबंध :


| | | | |
|---|---|---|---|
| १) | गांधी बनायत | : | प्रबोधनकार ठाकरे यांचे सामाजिक विचार लघुशोध प्रबंध (२००६) |
| २) | इथापे देवीदास | : | यशवंतराव चव्हाणांचे राजकीय नेतृत्व – एक राजकीय चिकित्सा, शोधप्रबंध, नागपूर विद्यापीठ – १९९६ |
| ३) | सोनखासकर जो. वि. | : | भाऊसाहेब हिरे यांचे राजकीय नेतृत्व, शोधप्रबंध, नागपूर विद्यापीठ – २००२ |
| ४) | विसपुते शा. म. | : | एस.एम. जोशींच्या सामाजिक, राजकीय विचारांचा अभ्यास, शोधप्रबंध, जळगांव विद्यापीठ– १९९७ |
| ५) | राजदेव टी. बी. | : | कॉ. दत्ता देशमुख यांचे महाराष्ट्राच्या जडघडणीतील योगदान, शोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विद्यापीठ – २००१ |
| ६) | देवरे आर. ए. | : | यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय, शैक्षणिक, सामाजिक नेतृत्वाचा अभ्यास, शोध प्रबंध जळगांव विद्यापीठ – २००९ |
| ७) | आव्हाड सुहास | : | सहकारी साखर कारखानदारी आणि ऊस लागवडीचे अर्थशास्त्र, शोधप्रबंध, पुणे – १९९२ |

## (III) मोडी लिपीतील पत्र (य.न. केळकर संग्रह, पुणे)


श्री

warning for negligence of duty (— failed to bring a bamboo

कपतान हेनरि पाटंजर साहब बाहादर कलकटर आमदानगर

य. न. केळकर खाजगी संग्रह

## (IV) मुलाखत पत्र (शंकरराव काळे यांची मुलाखत)

मुलाखतदार :- श्री.शंकरराव देवराम काळे (माजी खासदार)
मु.पो.माहेगांव देशमुख
ता.कोपरगांव जि.अहमदनगर

मुलाखतकार :- प्रा.सुरेश पंढरीनाथ काळे
मु.पो.रवंदे
ता.कोपरगांव जि.अहमदनगर

मुलाखतीची वेळ:- सकाळी ८.०० वा.
मुलाखतीची तारीख व वार:- रविवार दि. ५ मे २००९
मुलाखतीचे ठिकाण:- माहेगाव-देशमुख-काळे वस्ती

प्रश्नः- १. संपूर्ण नाव.

शंकरराव देवराम काळे मु.पो. माहेगाव-देशमुख ता.कोपरगाव

प्रश्नः- २. वडीलांचे संपूर्ण नाव.

देवराम विठूजी काळे

प्रश्नः- ३. आईचे नाव.

राधाबाई देवराम काळे

प्रश्नः- ४. जन्मतारीख व वय.

६ एप्रिल १९२९ वय- ८१ वर्षे २ महिने

प्रश्नः- ५. आपणाला किती मुले आहेत? त्यांची नावे सांगा तसेच त्यांच्या मुलांचीही माहीती सांगा.

एक मुलगा अशोक व मुलगी स्नेहलता शिंदे. अशोकला दोन मुले व एक मुलगी आहे. चि. अभिषेक, आशुतोष व कन्या मेघना स्नेहलताला दोन मुली- अनिकेता व नेहा.

प्रश्नः- ६. आपणाला भाऊ किती? त्यांची माहिती सांगा.

तीन भाऊ - किसनराव, शुकदेवराव व गोविंदराव आज तिन्ही हयात नाहीत. संभाजी, शिवाजी, भास्कर, कै. वसंत, ज्ञानेश्वर तसेच संजय इ. पुतणे आहेत.

प्रश्नः- ७. आपली मुले व नातु कोठे कार्यरत आहेत?

चि. अशोकराव एम.बी.ए. चे शिक्षण घेऊन सध्या राजकारणात सक्रीयपणे कार्यरत आहे. कोपरगाव मतदार संघाचे विद्यमान आमदार व 'कोकाका' उद्योग समुहाचे चेअरमन म्हणून यशस्वीपणे काम पहात आहे. मुलगी अमेरिकेत स्थायिक आहे. त्यांची मुले उच्च शिक्षण घेत आहेत. नातु आशुतोष अमेरिकेतून उच्च शिक्षण घेऊन नुकताच आला आहे. त्यालाही समाजकार्याची आवड आहे.

प्रश्नः- ८. आपले बालपण व शिक्षणाबद्दल सांगा.

जन्म सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. मोहेगाव-देशमुख येथे बालपण. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण. गावापासून शाळा तीन-चार किलोमीटरवर होती. ~~[illegible]~~ वयाच्या पाचव्या वर्षी शिक्षणास सुरुवात
मोहेगाव-देशमुख गावात आजीकडे राहून प्राथमिक शिक्षण पूर्ण. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये पुढील शिक्षण. १९४७ साली बी.एस्सी. बी.ई. (सिव्हिल) झालो. त्याकाळात एवढे उच्चशिक्षण घेणारा कोपरगाव तालुक्यातील मी एकमेव होतो.

प्रश्नः- ९. आपला विवाह व कौटूंबिक जीवनाबद्दल सांगा.

१९४८ मध्ये विवाह. श्री. शंकरराव जगताप यांची कन्या सुशीलाबाई. वडिलांची इच्छा हुंडा घेण्याची होती परंतु वडिलांच्या इच्छेविरुद्ध हुंडा न घेता अतिशय साध्या पद्धतीने मंदिरात लग्न केले.
सुशीलाबाई सोबत लग्न झाल्यानंतर आयुष्याला चांगली कलाटणी मिळाली पत्नीची खूप मोलाची साथ मिळाली मात्र नियतीने त्यांना माझ्यापासून, १९ जानेवारी १९९९ रोजी कायमचे हिरावून नेले. ही माझ्या आयुष्यातील सर्वात दुःखदायक घटना आहे.

प्रश्नः- १०. त्या काळामध्ये एवढे उच्च शिक्षण घेऊनही आपण नोकरी का केली नाही?

नगर लोकल बोर्डात नोकरी स्वीकारली पण सात ते आठ महिन्यात नोकरी सोडली. कदाचित मी नोकरी करू नये अशी नियतीची इच्छा असावी. कारण त्यामुळेच माझ्या आयुष्याला एक वेगळीच दिशा

मिळाली. सामाजिक कार्याची आवड, लोकांची सेवा करण्याची वृत्ती यामुळे समाजकारणात व राजकारणात उतरण्याचा निर्णय घेतला.

प्रश्नः- ११. आपण सामाजिक कार्याकडे कसे ओढले गेलात?

शेतकरी व कष्टकरी यांच्या आयुष्यातील अडीअडचणी व समस्या जवळून पाहिल्या होत्या. बराचसा समाज अशिक्षित होता. आज तो दोन वेळचे अन्न हया प्रयत्नात दिसून येत होता त्यामुळे समाजाच्या उन्नतीकरिता काही तरी करावे, यासाठी समाजकारणात उतरण्याचा निर्णय घेतला.

प्रश्नः- १२. राजकारणामध्ये आपण कसे ओढले गेलात?

सामाजिक कार्याची आवड, लोकसेवा करण्याची वृत्ती, आणि समाज कल्याणासाठी चाकली कामे अंगावर घेण्याचा स्वभाव ह्यामुळे समाजकारणात आणि राजकारणात उतरलो. कॉंग्रेस सारख्या मोठ्या राष्ट्रीय पक्षातर्फे राजकारणात न उतरता शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून राजकारणाला सुरुवात केली. आणि राजकारण करत-करत समाजकारणही केले. पुढे कॉंग्रेसमध्ये प्रवेश करून जिल्हा परिषद अध्यक्ष, आमदार, मंत्री आणि खासदार म्हणूनही काम करण्याची संधी मिळाली.

प्रश्नः- १७. साखर कारखान्यासारखी एवढी मोठी सहकारी संस्था उभी करण्याची प्रेरणा कशी मिळाली?

साखर कारखान्याची कल्पना गणपतराव औताडेंची. जयपूर त्या निवडणूकीत उभे राहण्याबाबत त्यांनी दहा हजार रुपये उसने दिले. परंतु निवडणूकीत पराभव झाल्यामुळे शेती कर लागली आणि गणपतरावांनी आणि बरोबरच सहकारी साखर कारखान्याची कल्पना मांडली. कल्पनेतले आव्हान आणि हित लक्षात घेऊन उत्साह वाढला, नेत्यांच्या मदतीने सहकारी साखर कारखाना उभा करण्यासाठी प्रयत्न सुरु केले. प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक म्हणूनही अनुभव उपयोगी आला.

प्रश्नः- १८. सहकारी तत्वावरील साखर कारखाना उभारताना कोणकोणत्या अडचणी आल्या?

त्याकाळी पैशाला महत्व. रुपयांचे नाव आणि बैलगाडीच्या चाकासारखे भासत. अशा परिस्थितीत शंभरी पन्नास रुपयांचे शेअर्स शेतकऱ्याला विकत घ्यायला लावणे एक अशक्यच. शेतकऱ्यांच्या घरी, शेतात, लग्नासारख्या एखाद्या कार्यक्रमात दारांच्या कड्या ठोठावून पटवायचो. असे पटविणे वाद-विवाद झाल्यावर ते शेअर्स खरेदीच्या तयारीसाठी प्रयत्न करीत असे. मान-अपमान सहन करावा लागला. लासलगाव-कोपरगाव रेल्वेस्टेशन अंतर विचारात घेऊन सुरेगाव येथे कारखाना उभारणीचे काम सुरु केले. घरदार विसरुन संपूर्ण वेळ त्याठिकाणी थांबत असे.

प्रश्नः- १९. सहकारी साखर कारखाना सुरू करताना शासनाचे कितपत सहकार्य मिळाले?

त्यावेळचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई, अर्थमंत्री जीवराज मेहता, महसूल व शेतकी मंत्री भाऊसाहेब हिरे, सहकार मंत्री [illegible] पाटील. सिंचन खात्याचे मंत्री नाईक निंबाळकर

बॉम्बे स्टेट को. ऑप. बँकेचे चेअरमन सरैय्या यांची
मदत. त्याबरोबर डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता
यांचे सहकार्य मिळाले.

प्रश्नः- २०. शासनाच्या व्यतिरिक्त आणखी कोणाकोणाची सकारात्मक मदत मिळाली?

डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, बॉम्बे स्टेट
को. ऑप. बँकेचे चेअरमन सरैय्या आणि वामनराव वर्दे
यांची मदत मिळाली. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक,
वसंतदादा पाटील, शरद पवार, बाळासाहेब देसाई,
शंकरराव चव्हाण, आण्णासाहेब शिंदे, बाळासाहेब
भारदे, ना. ग. गोरे, रत्नाप्पा कुंभार इ. नेते
व्यक्तींनी कामाचे कौतुक केले. त्यामुळे
अधिक उत्साह वाढला.

प्रश्नः- २१. सहकाराच्या माध्यमातून आणखी कोणत्या सहकारी संस्था आपण उभ्या केल्या?

गौतम सह. बँक, कोसाका पगारदार नोकरांची सहकारी पतपेढी
गौतम मिल्क, कोसाका पेपरमिल, बायोगॅस प्लँट, मोरगाव
सहकारी सेवा संस्था, या संस्थांमुळे परिसरातील
शेतकरी, शेतमजूर तसेच कष्टकरी जनतेसमोरील
आर्थिक अडचणी दुर होण्यास मदत झाली.

प्रश्नः- २२. सहकारी बँका उभारणीसाठी लोकांचा प्रतिसाद कसा होता?

ग्रामीण भागाच्या विकासासाठी ग्रामीण पर्याय म्हणून लहान मोठे उद्योग सुरु करण्यासाठी कर्जपुरवठा करणारी सहकारी बँक असावी. म्हणून गौतम सहकारी बँक स्थापन. शेतकऱ्यांनी बँकेकडून ट्रॅक्टर, ट्रक, वैयक्तिक वापरासाठी वाहने, व शेतीउपयोगी औजारे कर्जरुपाने खरेदी. त्यामुळे लोकांनी चांगला प्रतिसाद दिला.

प्रश्नः- २३. सहकारी बँकेच्या माध्यमातून परिसरातील शेतकरी किंवा कामगारांना कितपत फायदा झाला?

सहकारी बँकेमुळे शेतकरी व कामगार सावकाराच्या कचाट्यातून सुटला. सावकाराच्या तुलनेत बँकेचे व्याज कमी असल्यामुळे शेतकरी व कामगार बँकेच्या माध्यमातून आर्थिक अडचणी सोडवू लागला.

प्रश्नः- २४. पतसंस्था व इतर सहकारी संस्था या एकमेकांस पूरक आहेत का?

परिसरातील शेतकरी, शेतमजुर व कष्टकरी असे बहुतेक लोक सावकाराकडून कर्ज घेत असत. त्यांच्या आर्थिक अडचणी दूर करण्याच्या हेतूने स्थापन केलेल्या विविध सहकारी पतसंस्था, सोसायट्या आणि बँका आहेत. या संस्थांनी ग्रामीण भागाला एक नवे रुप दिले. या संस्था एकमेकाला पूरक ठरल्या. त्यामुळे गावाच्या विकासाला चालना मिळाली.

प्रश्नः- २५. कोपरगांव तालुक्यातील सहकारी चळवळीबरोबरच संपूर्ण अहमदनगर जिल्हयाच्या सहकार चळवळीशी आपला संबंध आला का?

जिल्ह्याच्या सहकारी चळवळीमध्ये प्रामुख्याने अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या स्थापनेमध्ये

एक संस्थापक म्हणून सहभागी होतो. त्याचबरोबर जिल्ह्यातील नव्याने स्थापन झालेल्या विविध सहकारी साखर कारखान्यांनाही मार्गदर्शन केले. विशेषत: अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेवर अनेक वर्ष संचालक म्हणूनही काम केले आहे.

प्रश्नः– २६. अहमदनगर जिल्हयातील सहकाराशी संबंधित काही नेत्यांबरोबर काम करण्याची संधी कशा प्रकारे मिळाली?

डॉ. धनंजयराव गाडगीळ, पद्मश्री विखे पाटील, गणपतराव औताडे, या नेत्यांबरोबर सहकारी साखर कारखाना उभारणीचे काम करण्याची संधी मिळाली. तसेच नेते स्व. आण्णासाहेब शिंदे, स्व. मारुतीराव घुले, कै. आबासाहेब निंबाळकर, कै. आप्पासाहेब राजळे, कै. बाळासाहेब थोरात, कै. बाबुराव तनपुरे, यशवंतराव गडाख, शंकरराव कोल्हे, बाळासाहेब विखे इ. बरोबर सहकारात काम केले. जिल्ह्यातील राजकारणात कै. बापूसाहेब भापकर व हिराबाई भापकर हे आमचे आदर्श आहेत.

प्रश्नः– २७. कोपरगांव सहकारी साखर कारखाण्याच्या माध्यमातून रोजगार वाढीसाठी कशाप्रकारे हातभार लावला?

कारखान्याच्या मळीपासून स्पिरिट व त्यापासून उच्च प्रतीचे मद्य तयार होऊ लागल्यामुळे परिसरातील ८५० कामगारांना रोजगार मिळाला. तसेच केंद्र सरकारने

ऑगस्टपासून कागदनिर्मितीसाठी साखर कारखान्यांना प्रोत्साहन देणारे धोरण जाहीर केल्यामुळे १९८६ साली कागदप्रकल्प सुरू करून परिसरातील कामगारांना बहुशिक्षित बेकारांना रोजगार मिळण्यास मदत झाली. तसेच परिसरातील अनेकांना रोजगार मिळू लागला आहे.

प्रश्नः- २८. कोपरगांव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून परिसर विकासासाठी कोणकोणत्या योजना राबविल्या?

परिसरात गावतळी पाझरतलाव व मातीचे बंधारे बांधले परिसरात शेतीला पाणी टंचाई जाणवू नये म्हणून कोल्हापूर पद्धतीचे बंधारे माहेगाव, डाऊच, वडगाव-कोळपे व सडे ह्या ठिकाणी बंधारे बांधले ठिबक सिंचन व तुषार सिंचन योजना सुरू केली तंत्रज्ञानाचा परिचय व्हावा म्हणून शेतकऱ्यांच्या कार्यशाळा घेतल्या. विहीरी, पाईपलाईन, बोअरिंग साठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य केले.

प्रश्नः- २९. सहकाराबरोबरच शैक्षणिक कार्यासाठी आपण काय काम केले?

गौतमनगर येथे संभाजी प्राथमिक विद्यालय, नगर नाशिक जिल्ह्यात रयतच्या शाळेचे जाळे विणले. शिक्षणाला सहकाराची मजबूत जोड. कारखान्याच्या प्रत्येक ऊस उत्पादक सभासदांच्या बिलातून टनाला २५ पैसे शिक्षणासाठी म्हणून रयतला मदत केली. कर्मवीर अण्णांबरोबर झालेली भेट ही घटना आयुष्यातील सर्वात मोलाची ठरली. १९५७ पासून रयत शिक्षण संस्थेच्या कार्याला वाहून घेतले. १९८५ ते १९९०

पर्यंत रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमन म्हणून १५ वर्षे काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे संस्थेच्या विस्तार करण्यासाठी झपाट्याने काम केले.

प्रश्नः- ३०. रयत शिक्षण संस्थेच्या कार्याकडे आपण कशाप्रकारे ओढला गेलात?

कर्मवीरांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. [illegible] त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन रयतचे काम समरस होऊन केले. कर्मवीरांच्या शिक्षणाविषयी तळमळ स्वतःच्या अंगी भिनल्यामुळे कर्मवीरांचा खेड्यापाड्यात [illegible] समाजापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा संदेश अंगी बाणवला आणि रयतचे कार्य अहोरात्र चालू ठेवले. हे काम करत असताना आपण कोणतीच अपेक्षा ठेवली नव्हती. केवळ [illegible] माणूस आपणाला हे काम करायला सांगतो आणि असे चांगले काम आपण केले पाहिजे. या भावनेतून या कार्यात भाग घेतला.

प्रश्नः- ३१. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आपण कशाप्रकारे कार्य केले आहे?

ओमनगर याठिकाणी छत्रपती शिवाजी विद्यालय व कॉलेज महाविद्यालय, डॉ. छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, राधाबाई काळे कन्या विद्यामंदिर, गोरगरीब मुलामुलींना मोफत व गावाजवळ शिक्षण घेता यावे म्हणून २० ठिकाणी (छत्रपती शिवाजी विद्यालय कोळेवाडी) इमारती बांधून दिल्या. स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून ओमनगर मध्ये [illegible] काळे कन्यामंदिर व अहमदनगर राधाबाई काळे महिला महाविद्यालय स्थापन केले. नंतर सुशीलामाई काळे महाविद्यालय याशिवाय अनेक शाखा स्थापन करण्यात पुढाकार घेतला.

प्रश्नः- ३२. आपणास स्वतःची एखादी शिक्षण संस्था काढावीशी वाटली नाही का?

वाटले. हातात सत्ता. आपण एखादी शिक्षण संस्था

काढावी. पण रयत सारखी कर्मवीरांनी सुरु केलेली संस्था असतांना आपण कशाला संस्था काढायची. खेड्या-पाड्यातील गोरगरीब मुलामुलींना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे म्हणून रयत चे काम सुरु केले व करत आहे. केवळ पैसा कमावण्यासाठी शिक्षण संस्था काढल्या जातात मात्र आपल्याला हे तत्व अजिबात मान्य नाही. म्हणूनच स्वतःची शिक्षण संस्था काढली नाही.

प्रश्नः- ३३. शेती व पिण्याच्या पाण्यासाठी काय काय प्रयत्न केले?

विहीर खोदाईचा कार्यक्रम हाती घेतला. नव्या विहिरींच्या खोदाईसाठी आर्थिक सहकार्य. धरणाच्या पाईप लाईन साठी अर्थसहाय्य. ठिबक सिंचन व तुषार सिंचन योजना सुरु केल्या. दुष्काळग्रस्त गावांमध्ये पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कारखान्यामार्फत टँकर उपलब्ध करून दिला जातो. पाणी टंचाई असेपर्यंत अशा टँकरने संबंधित गावांना पाणीपुरवठा केला जातो. त्याशिवाय गोदावरी नदीवर कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधून साखळी तयार केली. गोदावरी कालव्यांच्या पाण्यासाठी शासनाशी संघर्ष केला.

प्रश्नः- ३४. अहमदनगर जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष म्हणून आपली कशी निवड झाली?

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रात प्रथमच जिल्हा परिषदा अस्तित्वात आल्या. पंचायतराज प्रयोगाचा एक भाग म्हणून जिल्हा परिषदांची निर्मिती होण्यापूर्वी लोकल बोर्ड होते. त्याचे रुपांतर जिल्हा परिषदेत. [illegible] तालुक्यातील राहाता गटातून जिल्हा परिषदेवर निवड. व अध्यक्षपदाचा मान मिळून सलग १० वर्षे जिल्हा परिषद अध्यक्ष

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत ५८ पैकी ३४ जागा जिंकून काँग्रेसने बहुमत मिळवले होते. त्यामुळे बिनविरोध अध्यक्ष झालो. बाबासाहेब विखे उपाध्यक्ष झाले. यामध्ये श्री. के.बी. रोहमारे व दादा शहाजी रोहमारे यांचे सहकार्य मिळाले होते.

प्रश्नः- ३५. एक आदर्श जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून आजही आपले नाव आहे, त्यासाठी आपण या कार्याला कशाप्रकारे दिशा दिली?

जिल्हा परिषदेमार्फत स्वतंत्र आरोग्यखाते निर्माण केले. आरोग्य पथक स्थापन करून पथकामार्फत जिल्हाभर आरोग्य सुविधा पुरविली. कुटुंबनियोजनास चालना मिळावी म्हणून जिल्हापरिषदेमार्फत बक्षिस योजना. शेतकऱ्यांसाठी पीकस्पर्धा सुरु केली. त्यामुळे पीक दर्जेदार येऊन उत्पन्न वाढले. पुणतांबा, कोपरगाव येथे शेतीशाळा सुरु केली व पशुवैद्यकीय दवाखाने काढले. कोंबड्या पाळण्याच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी कुक्कुट विकास योजना राबविली. जिल्ह्यातील प्रत्येक गावात चौथीपर्यंत प्राथमिक शाळा व्हावी म्हणून प्रयत्न केल्यामुळे प्रत्येक गावात शिक्षणाची सोय झाली.

प्रश्नः- ३६. पारनेर तालुक्याचे लोक प्रतिनिधी म्हणून आपण विकासासाठी काय काम केले आहे?

दुष्काळावर मात करण्यासाठी विविध विकास कामे. पारनेरच्या शेतीच्या पाण्याची सोडवणूक करण्यासाठी सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले. लघुपाटबंधारे प्रकल्प एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला जलसंधारण व संवर्धनाची कामे हाती घेतली. त्यासाठी शासनाला योजना बनविण्यास भाग पाडले. त्या योजनांचा भाग काळू प्रकल्प व मांडओहळ प्रकल्प योजनांना मंजुरी. ३५० पाझर तलाव पूर्ण केले. योजना मंजूर करून आणताना आवश्यक पक्षांच्या नेत्यांशी प्रसंगी भांडलो. ७२ सहकारी दुग्ध सोसायट्यांची स्थापना.

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत ५८ पैकी ३४ जागा जिंकून कॉंग्रेसने बहुमत मिळवले होते. त्यामुळे बिनविरोध अध्यक्ष झालो. बाबासाहेब विखे उपाध्यक्ष झाले. यामध्ये श्री. के.बी. रोहमारे व दादा शास्त्री रोहमारे यांचे सहकार्य मिळाले होते.

प्रश्नः- ३५. एक आदर्श जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून आजही आपले नाव आहे, त्यासाठी आपण या कार्याला कशाप्रकारे दिशा दिली?

जिल्हा परिषदेमार्फत स्वतंत्र आरोग्य खाते निर्माण केले. आरोग्य पथक स्थापन करून पथकामार्फत जिल्हाभर आरोग्य सुविधा पुरविल्या. कुटुंबनियोजनास चालना मिळावी म्हणून जिल्हापरिषदेमार्फत बक्षिस योजना. शेतकऱ्यांसाठी पीकस्पर्धा सुरु केली. त्यामुळे पिके दर्जेदार येऊन उत्पन्न वाढले. पुणतांबा, कोपरगाव येथे शेतीशाळा सुरु केली. ७२ पशुवैद्यकीय दवाखाने काढले. कोंबड्या पाळण्याच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी कुक्कुट विकास योजना राबविली. जिल्ह्यातील प्रत्येक गावात चौथीपर्यंत प्राथमिक शाळा व्हावी म्हणून प्रयत्न केल्यामुळे प्रत्येक गावात शिक्षणाची सोय झाली.

प्रश्नः- ३६. पारनेर तालुक्याचे लोक प्रतिनिधी म्हणून आपण विकासासाठी काय काम केले आहे?

दुष्काळावर मात करण्यासाठी विविध विकास कामे. पारनेरच्या शेतीच्या पाण्याची सोडवणूक करण्यासाठी सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले. लघुपाटबंधारे प्रकल्प एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला जलसंधारण व संवर्धनाची कामे हाती घेतली. त्याद्वारे आपल्याला योजना बनवण्याचा मार्ग सापडला. त्या योजनांचा मुळा कालवा प्रकल्प व मांडओहळ प्रकल्प योजनांना मंजुरी. ३५० पाझर तलाव पूर्ण केले. योजना मंजूर करून आणताना आपल्याच पक्षाच्या नेत्यांशी प्रसंगी भांडण. ७२ सहकारी दूध सोसायट्यांची स्थापना

प्रश्नः- ३७. आपल्या मंत्रीपदाच्या काळातील विकासकामांबदल सांगा?

खाजगी प्राथमिक शाळेच्या अनुदानाचा महत्वाचा प्रश्न पहिल्यांदा सोडविला. सहकार खात्याचा कारभार बघत असतांना सहकार क्षेत्रात लोकशाही निर्णय प्रक्रिया बळकट करण्याचा प्रयत्न केला. ऊसाचा दर उत्पादीत खर्चाशी निगडीत ठेवण्याचा क्रांतिकारी निर्णय घेण्याच सरकारला भाग पाडले हा निर्णय शेतकऱ्यांच्या ऊसउत्पादकांच्या हिताच्या दृष्टीने महत्वाचा ठरला. थकबाकीदार सहकारी संस्थांच्या सभासदांना व्यक्तीशः ते थकबाकीदार नसतांनाही थकबाकीदार समजले जाई ह्या निर्णयावर टिका करुन हा नियम बदलण्यास भाग पाडले

प्रश्नः- ३८. कोपरगांव लोकसभा मतदार संघाचे खासदार म्हणून कशाप्रकारे मतसंघाचा विकास केला?

१९८९ लोकसभा निवडणूकीत कोपरगावमधून निवडून खासदार. शिक्षणाचा प्रसार, पाणी प्रश्नाची सोडवणूक व ग्रामीण विकास क्षेत्रांना प्रथम प्राधान्य दिले. मंत्रालय व शासकीय कार्यालयांशी संपर्क ठेवून लोकांच्या विविध प्रश्नांचा व समस्यांचा पाठपुरावा केला. खासदार निधीतून कार्यक्षेत्रात दळणवळणाच्या आत्याधुनिक संपर्क साधने आणण्यात पुढाकार. खासदार निधीतून धर्मशाळा, स्मशानभूमी, प्रवासी शेड, ह्यासाठी मदत मिळवून दिली. नळ पाणीपुरवठा योजना मोठ्या प्रमाणात राबविल्या.

प्रश्नः- ३९. राजकीय व सामाजिक कार्याबरोबरच आपण धार्मिक कार्यातही बरेच अग्रेसर आहात, त्याबाबत काय सांगाल?

हनुमान देव संस्थान ट्रस्टची स्थापना. श्री दत्त मंदिर देवस्थान ट्रस्ट, अमृतेश्वर महादेव मंदिर संस्थान. कोपरगाव तालुक्यातील मायगाव देवी येथे श्री अंबाबाई देवीच्या मंदिराच्या ग्रामस्थ व पुजारी ह्यांच्या मदतीने जिर्णोद्धाराचे काम केले. खंडाळे संतवन ट्रस्टला पन्नास हजार रुपये मदत तसेच पंढरपूर

येथील ह.भ.प. तुकाराम बाबा खेडलेकर यांच्या आश्रमाला एक लाखाची मदत दिली. कारखाना कार्यस्थळावर भव्य विष्णुमंदिर, दत्तमंदिर स्थापन केले. विविध गावातील मंदिरांनाही मदत करतो आहे. कोपरगावच्या साईबाबा तपोभूमीचीही देखभाल चालू आहे. कोपरगाव, श्रीरामपूर, कोळपेवाडी येथील मुस्लीम बांधवांच्या मस्जिद उभारणी साठीही वेळोवेळी आर्थिक मदत केली आहे.

प्रश्नः- ४०. आजच्या तरूण पिढीला आपण कोणता संदेश द्याल?

आजचे युवक देशाचे आधारस्तंभ असून त्यांनी व्यसनापासून दुर राहिले पाहिजे. छ. शाहू, म. फुले, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, म. गांधी यांच्या चरीत्राचा अभ्यास केला पाहिजे. त्यांचे आचार-विचार अंगी बाणवले पाहिजे. त्याचप्रमाणे अपयश ही यशाची पहिली पायरी असते. अपयश आल्याशिवाय यशाचे महत्व समजत नाही. त्यामुळे अपयशाने खचून जाणं हा गुण तरुणांना शोभत नाही. जी आव्हानं समोर येतील त्यांना निधड्या छातीने भिडणं हा गुण तरुणांना शोभून दिसतो. त्यातूनच जडण-घडण होते.

सुपंकाळे. शंकरराव काळे

प्रा.सुरेश पंढरीनाथ काळे
(संशोधक)

मान.श्री.शंकरराव देवराम काळे
(माजी मंत्री,माजी खासदार)

(पीएच.डी. संशोधन प्रबंधाकरीता मुलाखत)

## V - **फोटो**



**अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या कोपरगाव शाखेचा शुभारंभ करताना मा. श्री. शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे व दादा पाटील रोहमारे.**



**दि कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या एका कार्यक्रमात मार्गदर्शन करताना संस्थापक मा. श्री. गणपतराव औताडे, समवेत यशवंतराव चव्हाण, सौ. वेणुताई चव्हाण व श्री. शंकरराव काळे**

VikasSurya 198

# सन्मान पत्र

साधुसंतांची भूमी, पुरोगामी चळवळीचे माहेरघर, सहकार चळवळीचे उगमस्थान, क्रांतिकारक शूरवीरांची जन्मभूमी, कर्तृत्वसंपन्न कार्यकर्त्यांची कर्मभूमी असलेल्या आपल्या या अहमदनगर जिल्ह्यात; अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जिल्ह्याच्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनाची केंद्रबिंदु आहे. दुष्काळपीडित, अहमदनगर जिल्ह्याच्या कृषी क्षेत्रात शेतकरी बांधवांना अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून संजीवनी देणाऱ्या व त्यासाठी धोरण आखणाऱ्या या बँकेच्या संचालक मंडळाचे सदस्य म्हणून तसेच आपल्या सहकारी क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाबद्दल हे गौरवपत्र प्रदान करण्यास आम्हास अतिशय आनंद होत आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची विकासाची कामधेनु ठरलेल्या या जिल्हा सहकारी बँकेची स्थापना १९५८ साली झाली. बँकेच्या स्थापनेनंतर गेल्या चार दशकांत सहकारी चळवळीतील आपल्या कार्यकर्त्यांनी, शेती व शेतीपूरक व्यवसायाला चालना देण्याच्या दृष्टिकोनातून; सहकारी साखर कारखानदारी व जिनिंग प्रेसिंग, सूतगिरण्या स्थापन करून शेतकरी हा यशस्वी कारखानदारही होऊ शकतो हे सिद्ध केले. या चार दशकांत आपल्या या बँकेने सहकारी कृषी उद्योगाबरोबर सहकारी तत्वावर उपसा जलसिंचन, दुग्ध व्यवसाय, गोबरगॅस, कुक्कुटपालन इत्यादी योजनांचे आराखडे तयार करण्यापासून योजना कार्यान्वित होण्यासाठी व्यावसायिक व आर्थिक सहाय्य केले आणि देशातील सहकारी चळवळीत मानाचे स्थान प्राप्त केले.

सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून व सामान्य जनांच्या विकासाच्या इच्छेने तुम्ही-आम्ही प्रेरित असल्याने बँकेचे पदाधिकारी, संचालक व सेवक एकाच विचाराने झपाटून गेल्याचे दुर्मिळ चित्र अहमदनगर जिल्ह्यात दिसले, हा दुग्धशर्करा योग आहे.

गेल्या पाच वर्षांत आपण घेतलेल्या उपक्रमांची गौरवपूर्वक नोंद घ्यावयाची ठरल्यास पाईप लाईनसाठी एकरी कर्ज मर्यादेत वाढ, दुधाला योग्य भाव मिळण्यासाठी शासनास विनंती, उपसा जलसिंचन योजनेच्या कर्जहप्ता पुनर्रचना, नॉन फार्म सेक्टर अंतर्गत सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य, नैसर्गिक परिस्थितीत शेतकऱ्यांना थकीत कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रूपांतर करून पुन्हा कर्ज मिळण्यास पात्र केले. कृषी उत्पादनाचा वाढणारा खर्च लक्षात घेऊन पीक कर्जदर वाढविले, तर १९९२ साली दुग्ध उत्पादन व शेळी संगोपनासाठी चालना दिली. जळालेल्या उसाच्या कर्जाचे रूपांतर तसेच दगडी साठवण बंधाऱ्यासाठी मध्यम मुदत कर्जाचे धोरण घेतलेत. यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टरसाठी मोठ्या प्रमाणात कर्जवितरण केलेत. कृषी पतपत्र योजना सुरू केलीत. ग्रामीण लघु उद्योगांसाठी कर्जयोजना सुरू केलीत. सर्वंकष पीकविमा योजनेखाली रु. ८/- कोटींपेक्षा जास्त नुकसान भरपाई मिळवलीत. सचिव केडर निमंत्रण व कार्यवाहीसाठी मा. भाऊसाहेब थोरात अभ्यासगटाची स्थापना व याबाबत शासनास शिफारस. सहकारी संस्थांमार्फतच शेती उपयोगी खते, बियाणांचा तसेच इले. मोटर्स, पाईप्स खरेदी विक्रीचे धोरण घेतलेत. या सर्वांच्या यशस्वितेसाठी आपण घेतलेले एकमुखी धोरण व सहभाग यांमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी आपण हातभार लावलात. आपल्या कार्यकाळात बँकेच्या ठेववृद्धीसाठी व कर्जवसुलीच्या विशेष मोहिमेस प्रतिसाद देऊन, त्यामध्ये सक्रिय सहभाग घेऊन, बँकेच्या भरभराटीस, प्रगतीस, मोलाचा सहभाग घेतलात. बँकेच्या आजच्या आर्थिक मजबुतीस असलेले आपले योगदान वर्णन करण्यास शब्दही अपुरे आहेत.

आपल्या या योगदानाबद्दल आपले हार्दिक आभार मानीत आहोत!!

आपला संचालक मंडळातील सहवास सुवर्णाला सुगंध देणारा ठरला! आपणास यापुढील काळात, व्यक्तिगत व सार्वजनिक तसेच सभासद-शेतकरी व जिल्हा सहकारी बँकेकरिता प्रेरणादायी कार्य करण्यासाठी; उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभो, अशी आम्ही सर्वजण सदिच्छा व्यक्त करतो!

यापुढेही जिल्हा सहकारी बँकेस, तसेच बँक सेवकांना जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विकासाच्या योजना राबविण्यासाठी आपल्या मार्गदर्शनाची अपेक्षा करीत आहोत.

जयहिंद! जय सहकार!!

**सुधाकर शेरकर**
कार्यकारी संचालक

| | | |
|---|---|---|
| **व्ही. टी. साळुंके**<br>जनरल मॅनेजर (पर्सोनेल) | **एस. जे. धुमाळ**<br>जनरल मॅनेजर (शेती कर्ज) | **आर. डी. मंत्री**<br>जनरल मॅनेजर (अकौंटस् व बँकिंग) |
| **डी. आर. भगत**<br>जनरल मॅनेजर (प्रशासन) | **एस. ए. पाटील**<br>जनरल मॅनेजर (बिगरशेती कर्जे) | **वाय. एस. वाकचौरे**<br>जनरल मॅनेजर (वसुली) |

**व सर्व अधिकारी आणि सेवक**

**दि अहमदनगर सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर**

अहमदनगर नगर परिषद, अहमदनगर

# सन्मान पत्र

महाराष्ट्राचे सुविद्य ज्येष्ठ सहकारमहर्षी, शिक्षणतज्ज्ञ, ग्रमीण विकासाचे पितामह व सृजनशील नेतृत्व...

## आदरणीम खा. श्री. शंकरराव काळे यांना विनम्र अभिवादन

अहमदनगर या ऐतिहासिक नगरीत आपल्या अमृतमहोत्सवी वर्षातील पदार्पणाच्या ऋणनिर्देश सोहळ्याप्रसंगी आपल्या ४५ वर्षांच्या प्रदीर्घ लोकसेवेनिमित्त कृतज्ञतापूर्वक अभिवादन करताना शहरवासियांना मनापासून आनंद होत आहे. आपल्या भावी आयुष्यास अंत:करणपूर्वक शुभेच्छा देऊन हे मानपत्र आपणास सविनय अर्पण करीत आहोत.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन १९४७ साली आपण अभियांत्रिकी शाखेचे पदवीधर झालात. शासकीय नोकरीचा त्याग करून माहेगाव देशमुख या जन्मगावी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची स्थापना करून सहकार क्षेत्रातील कार्याचा प्रारंभ केलात. सन १९५२ मध्ये कष्टकरी चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाच्या विधानसभा उमेदवारीने राजकारणात प्रवेश केलात.

दि. ४ जून १९५३ रोजी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची स्थापना करून सतत २५ वर्षे संचालकपद भूषवून देदीप्यमान कामगिरी पार पाडलीत.

पावसाच्या लहरीवर अवलंबून असणाऱ्या दुष्काळी व अवर्षणप्रवण क्षेत्रासाठी जलसंचय व जलसंवर्धनाच्या अनेक महत्त्वाकांक्षी योजना राबवून व अल्पभूधारकांच्या आर्थिक विकासासाठी कुक्कुटपालन, शेळीमेंढी पालन, दुग्धसंस्था कार्यान्वित करून विकासाचे नवे दालन खुले केले. कर्जत व पारनेरसारख्या दुष्काळी भागात उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्यात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.

सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी व जनतेचा सहभाग सत्तेत वाढविण्यासाठी पुरोगामी महाराष्ट्राने सन १९६२ साली जिल्हा परिषदांची स्थापना केली. स्थापना वर्ष १९६२ ते १९७२ पर्यंत सलग दहा वर्षे आपण जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद भूषविले. सन १९७२ ते १९८० सलग दहा वर्षे विधानसभा सदस्य या नात्याने लोकनेतृत्व. सन १९७८ ते १९८० सहकार व शिक्षण क्षेत्रातील अभ्यास व दांडगा व्यासंग याचा महाराष्ट्रातील जनतेला लाभ व्हावा म्हणून शिक्षण व सहकार खात्याचे राज्यमंत्रीपदाची जबाबदारी. सन १९७५ ते १९९० कै. कर्मवीर भाऊराव पाटील व कै. यशवंतराव चव्हाण यांनी सोपविलेली गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारून, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन. सन १९७६ साली कोपरगाव तालुक्यातील बेरोजगार, कारागीर यांच्या अर्थसहाय्यासाठी गौतम सहकारी बँकेची स्थापना. सन १९८० ते १९९० गौतम सहकारी बँकेचे संचालक, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिकल असो., पुणे यांचे अध्यक्ष व संचालक, महाराष्ट्र राज्य शेती मंडळाचे तीन वर्षे संचालक, सहकार क्षेत्रातील आशिया खंडातील अग्रणी सहकारी बँकेचे संचालक.

सन १९९१कोपरगाव मतदार संघातून प्रचंड मतांनी विजयी व गेली ५ वर्षे लोकसभेत जिल्ह्याचे खंबीर नेतृत्व. संसदीय स्थायी समिती, विज्ञान तथा तंत्रज्ञान, पर्यावरण व वनखाते, भारत सरकार, राष्ट्रीय साखर उद्योग विकास परिषद, अन्न मंत्रालय, भारत सरकार, ग्रमीण विकास सल्लागार समिती, ग्रामविकास मंत्रालय, नवी दिल्ली या विविध समित्यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी. झोनल रेल्वे युजर्स कंन्सलटेटिव्ह कमेटी, मध्य रेल्वे, महाराष्ट्र राज्य ग्रहक संरक्षण परिषद, महाराष्ट्र सहकारी विकास परिषद, मुंबई यांचे सदस्य व महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या. च्या संचालकपदी राहून विधायक कार्य केले. गव्हर्निंग कौन्सिल वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे चे सदस्य, कोपरगाव तालुका जिनिंग व प्रेसिंग सहकारी संस्था मर्या.चे संचालक, अहमदनगर, जिल्हा क्रिकेट असो. चे अध्यक्ष. यासारख्या विविध संस्थांची धुरा यशस्वीपणे सांभाळली.

आपण अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असताना सहकार, कृषी, पर्यावरण व शिक्षणक्षेत्रात अजूनही महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या अत्यंत समर्थपणे पार पाडीत आहात. इतकी वर्षे समर्थपणे जनसेवा करणारा एखादाच नेता जन्म घेत असतो. ज्या मातीत आपण जन्म घेतला त्या मातीचे ऋण फेडण्यासाठी आपण संपूर्ण आयुष्य वेचले आहे.

आपले अलौकिक अष्टपैलू नेतृत्व आम्हास दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरेल.

यापुढील काळातही आपणास निरोगी व समृद्ध आयुष्य लाभावे व आपल्या सर्व मनोकामना पूर्ण व्हाव्यात या सदिच्छेसह नगरवासियांतर्फे हे मानपत्र आपणास आदरपूर्वक अर्पण करीत आहोत.

पुनश्च एकवार आपणास सादर अभिवादन...

अरुण ब. जगताप

दि. १३ जानेवारी १९९६
अहमदनगर

अरुण ब. जगताप
अध्यक्ष, अहमदनगर नगर परिषद,
अहमदनगर

VikasSurya 190





**साखर कारखान्याच्या उत्कृष्ट व्यवस्थापनाचा पुरस्कार राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा यांचे हस्ते स्वीकारताना मा. श्री. शंकरराव काळे**

## II - अभिप्राय

शंकररावजी काळे यांच्या नेतृत्वाखालील कृषी औद्योगिक प्रकल्प पाहून मनस्वी समाधान वाटले. शेतकऱ्यांच्या उत्क्रांतीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांबद्दल मन:पूर्वक धन्यवाद.

---

शरद पवार १९७० साली कारखान्याला भेट देण्यास आले होते. १९७६ साली त्यांनी पुन्हा एकदा भेट दिली. तेव्हाची त्यांची प्रतिक्रिया अशी--

*सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा विचार घेऊन कृषी औद्योगिक प्रकल्प उभारणीचा विचार महाराष्ट्राला मा. श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनी दिला. या विचारांना मूर्त स्वरूप देण्यासाठी कार्यक्रमावर निष्ठा असलेल्या कार्यकर्त्यांचे मोहोळ महाराष्ट्रात उभे करण्याचे प्रयत्न त्यांनी केले. यामध्ये ज्यांनी उत्तम कार्य केले अशांच्या मालिकेमध्ये श्री. शंकरराव काळे यांचे स्थान वरचे आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याच्या माध्यमातून परिसर सर्वार्थाने समृद्ध करण्याचे प्रयत्न बघितले म्हणजे बलदंड भारत उभारणीचे स्वप्न साकार होत असल्याचे मनस्वी समाधान मिळते.* १४.१०.७०

*या कारखान्यामार्फत हे कार्य अखंड सुरू राहावे व सामाजिक व आर्थिक न्यायाचा विचार मूर्त स्वरूपात यावा एवढीच अपेक्षा.*

*श्री. शंकरराव काळे व त्यांचे सहकारी यांना या प्रयत्नांत माझ्या संपूर्ण शुभेच्छा.*

**शरद पवार**
विजया दशमी, २/१०/१९७६

---

*आज दुसऱ्यांदा कोळपेवाडीस भेट देण्याचा योग आला. ३४ वर्षांपूर्वी महाराष्ट्रात सुरू झालेला हा नंबर दोनचा सहकारी कारखाना. समाजवादी श्रद्धा व ध्येयाची पक्की निष्ठा असलेल्या मा. शंकररावांनी अनेक दिशेने या कारखान्याचा परिसर विकास कार्यांनी फुलवून टाकलेला दिसतो. उसाच्या कमतरतेमुळे अनेक अडचणी असल्यामुळे विकासाचा वेग मर्यादित झाला असला तरी कष्टाने डिस्टिलरी, देशी दारू व कागद कारखाना अशा चारी दिशांनी त्यांनी विस्तार केला आहे. त्यांच्या सदस्यांचा त्यांच्यावरचा विश्वास हा सर्व कामांत स्पष्ट दिसतो. त्यांच्या संचालक मंडळात सहा सदस्य पदवीधर आहेत तर त्यातले दोन डबल पदवीधर आहेत. सर्व जाती जमातींचे व वेगवेगळ्या राजकीय मतांची मंडळी एकत्र बसून एकमताने निर्णय करू शकतात ही शंकररावांच्या स्वभाव चातुर्याची व सर्वसमावेशकतेची साक्ष आहे. आर्थिक विकासाबरोबरच शैक्षणिक व सांस्कृतिक कामाकडे तेवढेच बारीक लक्ष आहे. सर्व पाहून मनाला अतिशय समाधान वाटले. शंकरराव व त्यांचे सर्व सहकारी आपल्या सर्व सदस्यांचे जीवन सुखमय करण्यात यशस्वी होतील हीच आशा.*

**शिवाजीराव पाटील**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सह. साखर कारखाना संघ.

---

# - परिशिष्टे –

| क्रमांक | शीर्षक |
|---|---|
| I) | मानपत्र |
| II) | अभिप्राय |
| III) | मोडी पत्र (केळकर संग्रह, भा.इ.सं.मं. पुणे) |
| IV) | मुलाखत पत्र (श्री. शंकरराव काळे यांची मुलाखत) |
| V) | फोटो |